# सोलापूर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2012-2013

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई

रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे सोलापूर महानगरपालिका यांनी 2012-2013 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

**<u>सोलापूर महानगरपालिकेचा 2012-13 या वित्तीय वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल</u>**

जा.क्र.स्था 18/ब/सोलापूर मनपा/ 1261

उपसंचालक (मनपालेप),
स्थानिक निधी लेखा परिक्षा,
7वा मजला,रायगड भवन,
सी.बी.डी.बेलापूर,
नवी मंबई - 400614.
दिनांक - 16/12/2015

प्रति,
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर.

सोलापूर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखा परिक्षण श्री. ध. सा. आंधळे, सहाय्यक संचालक यांचे पथकाने दिनांक 27/01/2015 ते 25/08/2015 या कालावधीत पूर्ण केले. श्री. सिताराम काळे, उपसंचालक (मनपालेप), उपविभाग-2 स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मंबई यांनी दिनांक 24/11/2015 रोजी आयुक्त,सोलापूर महानगरपालिका यांचे समवेत चर्चा करुन अहवालाचे अंतिमिकरण केले.

लेखा परिक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी कार्यरत होते.

**महापौर**

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| 1. | सौ. अलका दगडू राठोड | 01/04/2012 ते 31/03/2013 |

आयुक्त

| अ.क्र. | नाव | कालावधी |
|---|---|---|
| 1. | श्री. अजय सावरीकर | 01/04/2012 ते 31/03/2013 |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 1

I PART I : भाग १ ........ 3

मागील लेखा परीक्षण अहवाल ........ 3

PART II ........ 13

**कलम ९ अ खालील आक्षेप** ........ 14

1 सोलापूर महानगरपालिकेच्या 2012-13 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील अनियमिततांबाबत ........ 15

2 2012-2013 चे वार्षिक लेखे परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत. ........ 18

3 प्रमाणके रेखांकनास उपलब्ध न करण्याबाबत ........ 19

4 करांची जमा रक्कम लेखाशाखेत जमा न करता परस्पर बँकेतुन खर्च केल्याबाबत. ........ 21

5 कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल न केल्याबाबत. ........ 22

6 गौण खानिजावरील स्वामीत्वधनाची वसूल केलेली रक्कम शासनास विलंबाने जमा केलेबाबत. ........ 23

7 नियमबाह्यरित्या रोखीने रकमा प्रदान केल्याबाबत ........ 24

8 धनादेश नोंदवही,बँक स्टेटमेंट व वापरलेल्या धनादेशाच्या स्थळप्रती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत ........ 25

9 दोन किंवा त्यापेक्षा जास्त कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या कर्मचारी व अधीकारी यांना सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजना मंजूर केल्याबाबत. ........ 26

10 बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना कामातील अनियमितता ........ 27

11 शहरी गरीबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घटकाखाली केलेला रुपये 838000 खर्चाचे आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झालेबाबत. ........ 30

12 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनांतर्गत सामाजिक संरचनेमध्ये समाजविकास संस्थाना केंद्र शासनाने दिलेल्या अनुदानातुन केलेल्या रुपये 930225/- खर्चापृष्ठयर्थचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेबाबत ........ 31

13 महानगरपालिकेकडील स्थानिक संस्था कर प्रणाली अंतर्गत आढळून आलेल्या त्रुटीबाबत. ........ 35

14 अनोंदणीकृत व्यापा-याकडून स्थानिक संस्था कराची वसूली न केलेबाबत. ........ 37

15 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मल:निस्सारण व्यवस्था सुधारणे कामाबाबत. ........ 38

16 पोस्ट बेसिक शाळा नेहरुनगर येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत. ........ 39

17 उजणी/पाकणी पंपहाउस येथील देखभाल दुरुस्ती कामाचे मजुरीसह 3 वर्षासाठी चालविण्यास देणे कामामधील अनियमिततेबाबत ........ 42

18 अनुसूचित जाती / नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करतांना झालेली अनियमितता. ........ 44

19 अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजने मध्ये झालेली अनियमितता. ....47
20 गलिच्छ वस्ती सुधारणा योजना विभागाकडील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत ....52
21 आरोग्य विभागाकडील रु. 2495532 ची औषध खरेदीची अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झाल्या बाबत. 54
22 महिला व बालकल्याण समितीने राबविलेल्या योजना वरील खर्चानुषगाने आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत. ....56
23 अवैध बांधकामाना लावलेल्या शास्तीबाबतची कर निर्धारण प्रकरणे व शास्ती वसुली बाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्याबाबत. ....59
24 मोठ्या निवासी इमारतीवरील कर ( फ्लोरेज टॅक्स ) निर्धारण प्रकरणे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून न दिल्याबाबत. ....60
25 मोठ्या निवासी इमारतीवर निवासी कर न लावता कर निर्धारण केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ..61
26 महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) शासनाकडे उशिराने जमा केले बाबत. ....62
27 बांधकाम परवानाबाबत लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत. ....65
28 विकास हक्क प्रमाणपत्राबाबत लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत.(विकास हक्क प्रमाणपत्र (डी.आर.सी.) ....67
29 बाजार गाळे बाजारभावापेक्षा कमी दराने भाड्याने दिल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. ....67
30 सोलापूर मनपा हद्दीत वृक्षसंवर्धन व जतन अधिनियम 1975 ची अंमलबजावणी न केल्याबाबत. ....69
31 यांत्रिक विभागाकडील अभिलेख्यातील अनियमततेबाबत. ....71
32 महानगरपालिका सेवकांना लागू करण्यात आलेल्या 6 व्या वेतन आयोगानुसारच्या सुधारित वेतनश्रेणीस शासनाची मान्यता घेण्यात आली नसल्याबाबत. ....72
33 महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षकांचे कामकाजाबाबत... ....73
34 आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधील खर्चाबाबत. ....81

**कलम ९ ब खालील आक्षेप ....83**

35 आयकराच्या रक्कमा विलंबाने भरणा केल्याबाबत. ....84
36 भविष्य निर्वाह निधीमधील मुदत ठेवीवर व्याजाची रक्कम कमी मिळालेलेबाबत. ....85
37 निवृतीवेतन निधीमधील रक्कम कमी व्याज दराने गुंतवणूक केल्याबाबत. ....87
38 मक्तेदारांच्या देयकातून कमी दराने व्हॅट वसूल केल्याने झालेल्या रु.5129050 इतक्या रक्कमेच्या आर्थिक नुकसानी बाबत. ....88
39 कर्मचारी/अधिकारी यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यातील नोंदीच्या त्रुटीबाबत. ....89
40 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील त्रुटीबाबत ....92
41 अग्रीम नोंदवहीतील त्रुटीबाबत. ....93
42 भविष्य निर्वाह निधीमध्ये शिल्लक कमी असल्याबाबत. ....97

43 UIDSSMT निधीचे रोखवहीशी बँक खाते पासबुकाचा ताळमेळ घेतला नसल्याबाबत....98
44 म.न.पा.निधी (जनरल फंड ) च्या रोखवही ( किर्द ) मधील अनियमितता ....99
45 धनादेश साठा नोंदवही ठेवण्यात आली नसल्याबाबत ....101
46 अश्वासित प्रगती योजनेची (पहिला लाभ) चुकीच्या पध्दतीने अंमलबजावणी केली जात असल्याबाबत. ....102
47 आवेक्षक चौबे यांचे पदोन्नती व पदावनीबाबत. ....104
48 कर्ज निवारण निधी (सिंकींग फंड) बाबत..... ....106
49 माहे फेब्रुवारी 2013 मध्ये म.न.पा. च्या विविध विभागासाठी घेतलेल्या डिझेल बिलाबाबत. ....109
50 डिझेल बिलापोटी परिवहन विभागास देण्यात आलेल्या अग्रिमाबाबत. ....110
51 स्थानिक संस्था कराची कमी आकारणी केलेबाबत. ....112
52 युनायटेड जनरल एजन्सी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत व्यवसायाची नोंदणी न करता व्यवसाय केल्यामुळे नियम 48 (2) (क) व (3) नुसार कार्यवाही करणेबाबत. ....113
53 ईचगेरीमठ ते व्दारकानगरी ते मशाळवस्तीपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत. ....115
54 पिण्याच्या पाण्याचे पाईप खरेदीचे साठा नोंदवही ठेवले नसलेबाबत. ....117
55 कस्तुरबा टाकीजवळ 2.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे कामाचे अनियममिततेबाबत. 119
56 पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाची निविदा जादा दराने निश्चीत केलेबाबत. ....121
57 आदित्यनगर ते नवीन डोणगांवनाका येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत. 123
58 सैफुल चौक ते नाथ होम्स ते डायमंडशाळेपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामातील अनियमिततेबाबत. ....126
59 देगांव येथे 1.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत. ....128
60 बसवेश्वरनगर येथे 0.60 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत. ....132
61 छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालय येथे 300 MM व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत. 136
62 होटगीरोड कंबर तलाव लगतची ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत. ....139
63 सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये पाणी पुरवठा सुधारणा करणेसाठी इलेक्ट्रो मॅग्नेटिक मिटर व बल्क वॉटर मिटर बसविणे. ....140
64 बाळेगाव येथे 2.0 द.ल.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे कामातील अनियमितता ....143
65 सोलापूर महानगरपालिका हद्दीतील केगांव भागात 0.8 द.ल.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे कामातील अनियमितता ....146

66 मजरेवाडी 2+2 द.ल.लि., सोरेगाव 1 द.ल.लि. प्रतापनगर 0.5 द.ल.लि.क्षमतेची उंच टाकी बांधणे कामातील अनियमितता ....147
67 उजनी,पाकणी,टाकळी,भवानी पेठ व MBR जुळे सोलापूर, जलशुध्दीकरण केंद्राचे पंपीग स्टेशनवर APFC पॅनल व कॅपॅसिटर बसविणे. ....150
68 वडकबाळ ते होनमुर्गी फाटा पर्यंत 1200 MM व्यासाची M.S. पाण्याची पाईप लाईन घालणेबाबत. ....153
69 ट्रान्समिशन पाईप लाईन टाकणे स्पेशल्स व व्हॉल्व्ह बसविणे कामाचा मजुरीसह मक्ता देणे कामाबाबत...156
70 UIDSSMT योजनेअंतर्गत जुळे सोलापूर ते डी.एस.पी. बंगल्यापर्यंत 1016 मी.मी. व्यासाची लोखंडी पाईपलाईन घालणे या कामातील अनियमिततेबाबत....157
71 केंद्र शासन पुरस्कृत राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्ट्यातून सर्वेक्षण करणे या कामातील अनियमितता. ....158
72 एकात्मिक झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत भगवाननगर येथे घरकुल बांधणे या कामातील अनियमितता. ....160
73 अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा पुरविणे या कार्यक्रमांतर्गत वार्ड क्रमांक 63 मधील जन्नत ए फिरदोस मुस्लीम कब्रस्ताण येथे रस्ता तयार करणे या कामातील अनियमितता....164
74 13 व्या वित्त आयोगा अंतर्गत एम्पलॉयमेंट चौक ते कुमार चौक व रामलाल चौक,महापौर बंगला ते राष्ट्रीय महामार्ग पर्यंत रस्ता विकसित करणे या कामातील अनियमितता....166
75 सर्व साधारण रस्ते अनुदानातून केलेल्या रस्त्याच्या कामातील अनियमितता....168
76 नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत कामाच्या देयकातून मूल्यवर्धित कर, कामगार कल्याण उपकर व विमा रक्कम वसूल न केल्याबाबत....170
77 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजनेतर्गत रस्ते अनुदानातून केलेल्या रस्त्याच्या कामातील अनियमितता....172
78 जिल्हा वार्षिक योजना 2011-12 अंतर्गत रस्ते विकसित करण्यासाठी प्राप्त अनुदानातून केलेल्या खर्चातील अनियमितता. ....174
79 वार्ड क्रमांक 29 विडी घरकुल येथे पिरॅमिड मेडीटेशन हॉल बांधणे या कामावरील खर्चाबाबत. 177
80 महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे मास्टर प्लॅन अंतर्गत स्नेक एन्क्लोजर या कामाचा विमा न उतरविल्यामुळे मक्तेदाराकडून विमा रक्कम वसूल करणे बाबत....179
81 नगर अभियंता यांचे अधिनस्त असलेले भांडार व हॉटमिक्स प्लॅन्ट च्या लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमितता....180
82 केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेंतर्गत मनपा क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तीक शौचालय बांधकामाच्या खर्चातील अनियमितता ....181
83 मनपा परिसरातील कचरा गोळा करून त्याची वाहतूक करणे कामातील अनियमितता....194
84 आरोग्य विभागांतर्गत अँटीरॅबीज इंजेक्शन खरेदीमधील अनियमितता....195

85 आरोग्य विभागाकडील वाहनाच्या देखभाल/दुरुस्तीवर केलेल्या खर्चातील अनियमितता बाबत. ....197
86 आरोग्य विभागाकडील वाहनांच्या इंधनावर व देखभाल दुरुस्तीवर मर्यादेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत. ....198
87 इंद्रभुवन बिल्डिंग मधील मेन इलेक्ट्रिक पॅनेल पासून केबल घालणे स्वीच बसविणे याकामातील अनियमितता. ....200
88 सोलापूर शहरातून जाणाऱ्या शिवाजी चौक ते भैया चौक ते पत्रकार भवन- कंबर तलाव ते सोरेगाव रस्ता दरम्यान रस्त्याचे मध्यभागी पोल उभारून लाईट व्यवस्था करणे या कामातील अनियमितता. ....201
89 नगरसेवक - पदाधिकारी यांचे दूरध्वनी, लेखनसामुग्री व लेटरपॅड छपाईवर करण्यात आलेल्या खर्चाबाबत. 204
90 करसंकलन (शहर) विभागाने केलेल्या करनिर्धारणातील अनियमितता. ....205
91 बांधकाम परवानगी न घेतलेल्या बांधकामावर शास्ती आकारून वसूल न केल्याबाबत. ....208
92 मोबाईल टॉवर वरील थकीत कराबाबत. ....209
93 अवैध मालमत्ता करावर दुप्पट शास्ती आकारणी करुन वसुली केले नसलेबाबत. ....211
94 मिळकत कर कमी आकारणीबाबत. ....212
95 श्री.मारुती निवृत्ती नवले अध्यक्ष तथा सचिव सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केगाव यांना मालमत्ता कर कमी आकारणी केलेबाबत. ....213
96 पाणीपट्टी थकबाकी बाबत. ....215
97 मालमत्ता कर थकबाकी बाबत. ....217
98 कर संकलन रक्कम जमा करण्यात येत असलेल्या बँक खात्याचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही. ....218
99 बांधकाम वापर परवानाधारकाकडून कामगार कल्याण उपकर वसुल न केलेबाबत. ....220
100 मोकळया जागेतील ले आऊट मंजूरीतील अनियमिततेबाबत. ....221
101 बांधकाम परवाना मिळकतदाराकडून बांधकाम विकास शुल्क वसुल न केलेबाबत. ....223
102 बांधकाम परवाना धारकाकडून उपकर व त्यावरील व्याज वसुल केले नसलेबाबत. ....225
103 डॉ.अंत्रोळीकर मेजर शॉपींग सेंटरमधील भाडयाने दिलेल्या गाळेधारकाकडून भाडे व व्याज वसुल न केल्याबाबत. ....226
104 बाजार गाळे भाडयाने देणेत आलेल्या नोंदवहीतील अनियमिततेबाबत. ....229
105 मंडई विभागामार्फत भाडयाने देणेत आलेल्या गाळयाची भाडे वसुली न केल्याबाबत. ....231
106 उद्यान विभागामार्फत लोखंडी बाकडे खरेदीतील अनियमततेबाबत. ....233
107 आवेक्षक पदावरील 5 वर्षाच्या सेवेनंतर केलेल्या वेतन निश्चितीबाबत.... ....235
108 स्त्री सेवक कर्मचा-यासाठी गणवेश खरेदीबाबत. ....236
109 पुरुष सेवकांसाठी गणवेश कापड खरेदीबाबत. ....238
110 अग्निशामक सेवकांसाठी गमबुट खरेदी मधील अनियमितता. ....240
111 स्टेशनरी साहित्य खरेदी मधील अनियमितता ....241
112 ट्रक माऊंटेड, सक्शन कम जेटिंग मशिन खरेदीबाबत. ....242
113 इ.1ली ते 10 वी पर्यतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेतील अनियमितता बाबत ....244

**कलम ९ क खालील आक्षेप** ........................................ **247**

**------------------- निरंक ------------------** ........................................ **248**

**कलम ९ ड खालील आक्षेप** ........................................ **250**

114 शिल्लक रक्कमेची गुंतवणूक व गुंतवणूक नोंदवही मधील त्रुटी बाबत. ........................................ 251

115 अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेस दिलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबत. ...... 252

116 अनुसूचित जाती / नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविणे लाभार्थ्यांचा बायोमेट्रीक सर्व्हे करणे ........ 253

117 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत 2012-13 वित्तीय वर्षात घटकनिहाय प्राप्त अनुदानातून झालेल्या कमी अधिक खर्चाबाबत. ........................................ 255

118 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत 2012-13 आर्थिक वर्षाकरीता निश्चित केलेली भौतिक उद्दिष्टे साध्य झाली नसल्याबाबत. ........................................ 258

119 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या बचतगट या घटकाच्या भौतिक व आर्थिक उद्दिष्ट साध्य न झाल्याबाबत. ........................................ 260

120 शहरी स्वयंरोजगार कार्यक्रमातील अनियमितता. ........................................ 261

121 हुतात्मा स्मृति मंदीर विभागाकडील लेख्यातील अनियमितता बाबत ........................................ 262

122 निवडणूक खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नसल्या बाबत. ........................................ 264

123 विभागीय कार्यालयाकडील वर्ग 4 कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील उणिवाबाबत. ........................................ 264

124 स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची 2012-2013 आर्थिक वर्षाचे बजेट बुकमधील प्रत्यक्ष जमा व स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्राप्रमाणे जमा यामधील तफावतीबाबत. ........................................ 266

125 पारगमन शुल्क वसुली संदर्भात अभिलेख्यात आढळून आलेल्या त्रुटींबाबत. ........................................ 267

126 महानगरपालिका यांनी रस्ता अनुदानामधून किमान 10% तरतूद वाहतूक नियंत्रणव्यवस्था, रस्त्यावरील दिशा दर्शक फलक व इतर स्ट्रीट फर्निचर बसविणे, झेब्रा क्रॉसिंग तयार करणे इत्यादीसाठी खर्च करणेबाबत. ......... 268

127 महानगरपालिकेच्या सर्व विभागाकडील वाहनांचे लॉगबुक हिस्ट्रीशीट नोंदवहया अपूर्ण असल्या बाबत. ........................................ 269

128 केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेंतर्गंत मनपा क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबतचे दस्तऐवज उपलब्ध करुन देणेबाबत ........................................ 272

129 विद्युत विभागाकडील विद्युत साहित्य खरेदी व साठा नोंदवही बाबत. ........................................ 273

130 शासनाकडून निवृत्ती वेतनापोटी अनुदान उपलब्ध करून न घेतलेबाबत. ........................................ 274

131 महिला व बाल कल्याण समिती नर्सिंग प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमितता .................. 276

132 150 एम.एम. व्यासाचे विंधन विहिरी घेणे व त्यावर इंडिया(मार्क2) ची हातपंप पुरवणे व बसविणे कामाची अनियमिततेबाबत. ........................................ 277

133 8 % ईटीपी (ETP) चार्जेस वसुलीबाबत. ........................................ 279

134 पेटी कॅशबुक ठेवले नसलेबाबत. ........................................ 279

135 झोन क्र.3 मधील रस्त्यासाठी मुरुम पुरवठा केलेबाबत. ....281
136 झोन क्र.1 मधील रस्त्यासाठी मुरुम पुरवठा केलेबाबत. ....282
137 झोन क्रमांक 2 कडील प्रभाग समिती बैठकीच्या नोंदवहीतील अनियमितता ....283
138 मालकत्ता कराची धनादेशाव्दारे / जमा रकमांची पक्की पावती उशिराने केली जात असल्याबाबत. ....285
139 कर संकलन विभाग व संगणक विभाग यांचे कडील मालमत्ता करांचे जमा रकमा यामध्ये असलेल्या तफावतीबाबत. ....287
140 करमणूक कराची रक्कम वेळीच वसूल केली नाही.... ....289
141 विवाह नोंदणी फी रक्कम वसुलीबाबत. ....290
142 अतिक्रमण विभागाकडील नोंदवहयातील अनियमितता ....292
143 जन्म-मृत्यू विभागाचे जमा रक्कमांचे लेखापरीक्षणाबाबत ....295
144 आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेतल्याबाबत. 296
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....300
**विवरणपत्रे व जोडपत्रे ....301**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | | | 141 |
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | 32 | 107, 108, 109, 110, 111 | | 121, 122, 123 |
| नगर सचिव | | 89 | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | | 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82 | | 126, 127, 128 |
| शहर अभियंता आणि विद्‌युत विभाग | | 87, 88 | | 129 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 15, 16, 17 | 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70 | | 132, 133 |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9 | 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50 | | 114, 115 |
| लेखापरीक्षण | 33 | | | |
| नगर रचना | 28 | 99, 100 | | |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 13, 14 | 51, 52 | | 124, 125 |
| कर निर्धारण व संकलन | 23, 24, 25, 26 | 90, 91, 92, 93, 94, 95, 96, 97, 98 | | 138, 139, 140 |
| आरोग्य | 21 | 84, 85, 86 | | |
| भूमी व मालमत्ता विभाग | 29 | 103, 104 | | |
| वाहन विभाग | 31 | | | |
| घन कचरा | | 83 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| व्यवस्थापन प्रकल्प | | | | |
| भांडार | | 113 | | |
| परवाना व मंडई विभाग | | 105 | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | | | | 130 |
| झोपडपट्टी सुधार | 18, 19, 20 | 71, 72 | | |
| नागरी समुदाय विकास प्रकल्प विभाग | 10, 11, 12 | | | 116, 117, 118, 119, 120 |
| महिला व बालकल्याण विभाग | 22 | | | 131 |
| अग्निशमन विभाग | 34 | | | 144 |
| अतिक्रमण विभाग | | | | 142 |
| प्रभाग कार्यालये | | | | 134, 135, 136, 137 |
| उद्यान विभाग | 30 | 106 | | |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | | | | 143 |
| इमारत मंजूरी विभाग | 27 | 101, 102 | | |
| जल निस्सारण | | 112 | | |

# I Part I : भाग १

## *मागील लेखा परीक्षण अहवाल*

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमाचे वैधानिक लेखापरीक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.स्थानिले-1010/प्र.क्र.26ब/विमाप्रशा, दि.31/03/2011 अन्वये संचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेचे 2011-12 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आले आहे. प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्रलंबित परिच्छेद वर्ष 2011-12

| अ.क्र. | ले.प.वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 1 ते 158 | 158 |

2011-12 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद (चालू लेखापरीक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)

कलम 9 अ खालील आक्षेप

| परि.क्र. | शिर्षक |
|---|---|
| 1 | कर्ज विषयक वार्षिक विवरणपत्र सादर केले नसले बाबत |
| 2 | सर्वसाधारण रोकड वही विहित नमुन्यात ठेवली नसलेबाबत |
| 3 | नियमबाहयरित्या रोखीने रक्कम प्रदान केल्या बाबत |
| 4 | भविष्य् निर्वाह निधीच्या कपाती बँक खाते मध्ये भरणा केल्या नसलेबाबत |
| 5 | वेतनातून कपात केलेला आयकर शासनाकडे विहित वेळेत भरणा केला नसलेबाबत |
| 6 | विभाग प्रमुखांना कार्यालयीन कामासाठी दिलेले अग्रीम समायोजित केले नसलेबाबत |
| 7 | ठेकेदार यांचे देयकातून कपात केलेला आयकर (टी.डी.एस) शासनास भरणा केला नसलेबाबत |
| 8 | निवृत्ती वेतन अंशदान निधी न ठेवल्याबाबत |

| | |
|---|---|
| 9 | निलंबित कर्मचा-यांच्या निलंबनाच्या चौकशीतील दिरंगाईबाबत |
| 10 | उपर्जित दविनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे (ACRUAL BASED DOUBLE ENTRY SYSTEM) |
| 11 | अंदाजपत्रक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानुसार जमेच्या अवास्तव रकमा वाढविण्यात आल्याबाबत |
| 12 | रस्ते विकास शासन अनुदानामधून करणेत आलेल्य आर्थिक तरतुदीमधील अनियमिततेबाबत |
| 13 | तेराव्या वित्त आयोगाचा निधी नियमबाह्यरित्या खर्च केल्याबाबत |
| 14 | बांधकाम परवाना शुल्काची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसलेबाबत |
| 15 | महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनावरील अनुदान शासनाकडुन प्राप्त करुन घेतले नसलेबाबत |
| 16 | वार्षिक प्रशासन अहवाल व वार्षिक लेखे सादर केले नसले बाबत |
| 17 | निलंबित कर्मचा-यांच्या निलंबनाच्या चौकशीकरिता चौकशी अधिकारी यांची नियुक्ती न केल्याबाबत |
| 18 | वर्ग अ व वर्ग ब पदाकरिता बिंदू नामावली तयार करुन शासनाची मान्यता न घेताच पदे भरण्याबाबत |
| 19 | कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मान्यता न घेताच नियमबाह्यरित्या कर्मचारी भरती केल्या बाबत |
| 20 | सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडुन संकीर्ण या लेखाशिर्षखालील बाबींच्या खरेदीतील अनियमिततांबाबत |
| 21 | नगर विकास विभागाने मंजुर केलेल्या आकृतीबंधाची अंमलबजावणी केली नसलेबाबत |
| 22 | नगर अभियंता विभागांतर्गत वाहनांवरील खर्चाचे अनियमिततेबाबत |
| 23 | कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून मिळणारे वेतन अनुदानाबाबत |
| 24 | वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत |
| 25 | आरोग्य् विभागाकडील वाहन दुरुस्तीवर करणेत आलेल्या नियमबाह्य खर्चाबाबत |
| 26 | पाणीपुरवठा विभागाकडील वाहनांच्या लॉगबुकमधील त्रुटी व टँकर खरेदीच्या नस्ती तपासणीस उपलब्ध न झालेबाबत |

| | |
|---|---|
| 27 | एस्कॉर्ट विभागाची पावती पुसतके लेखापरिक्षणास उपलब्ध केली नसलेबाबत |
| 28 | धर्मवीर संभाजी तलावामधील मत्स्य विक्रीच्या ठेक्यातील अनियमिततेबाबत |
| 29 | जन्म-मृत्यू विभागाचे जमा रकमांचे लेखापरीक्षणाबाबत |
| कलम 9 ब खालील आक्षेप | |
| 30 | सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन प्रकरणामधील अनियमिततेबाबत |
| 31 | आरोग्य विभागाकडील साहित्य खरेदीमधील गंभीर अनियमिततेबाबत |
| 32 | आरोग्य विभागाच्या सादीलवार साहित्याच्या खरेदीतील अनियमिततेबाबत |
| 33 | किटकनाशके, जंतुनाशके खरेदीमधील गंभीर अनियमिततेबाबत |
| 34 | नागरी हिवताप योजना अंमलबजावणीतील अनियमिततेबाबत |
| 35 | मलेरिया विभागाकडील फवारणी/धुरावणी करणेकामी 67 (3) क खाली नेमणूक दिलेल्या कर्मचाऱ्याबाबत |
| 36 | मलेरिया विभागाकडे स्टॉकबूक मधील त्रुटीबाबत |
| 37 | आरोग्य विभाग औषधे खरेदीमधील अनियमिततेबाबत |
| 38 | अन्न व परवाने विभागांतर्गत असणा-या आस्थापनांकडील प्रलंबित वसुलीबाबत |
| 39 | आरोग्य केंद्राकरिता आवश्यक असणारे साहित्य व उपकरणे खरेदी मधील अनियमिततेबाबत |
| 40 | DIK-7 पाईप्स खरेदी कामातील अनियमिततेबाबत |
| 41 | अक्कलकोट रोड येथे संप व पंपहाऊस येथे झालेल्या कामातील अनियमिततेबाबत |
| 42 | घरपट्टी करनिर्धारणामधील त्रुटीमुळे झालेल्या कामातील अनियमिततेबाबत |
| 43 | मालमत्ता कर दप्तर व मालमत्ता कराची थकबाकी वसुली केली नसलेबाबत |
| 44 | शिक्षण कर व नौकर शाश्वती कर शासन तिजोरीत विहित मुदतीत जमा केला नसलेबाबत |
| 45 | अवैध इमारती वर शास्ती न बसविल्या बाबत |
| 46 | मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यातून नियमबाह्यपणे 15% वजावट केल्याने झालेल्या आर्थिक |

| | |
|---|---|
| | नुकसानीबाबत |
| 47 | शहर हद्दवाढ विभागाने अवैध इमारतीवर शास्ती न बसविल्या बाबत |
| 48 | शहर हद्दवाढ कर दप्त्तर व मालमत्ता कराची थकबाकी वसुल केली नसले बाबत |
| 49 | शहर हद्दवाढ विभागाने मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यातून 15% वजावट नियमबाह्यपणे केले बाबत |
| 50 | शहर हद्दवाढ विभागातील नविन कर निर्धारणामधील त्रुटी बाबत |
| 51 | घरपट्टी विभागातील नवीन कर आकारणीमधील त्रुटी बाबत |
| 52 | मालमत्ता कराच्या थकीत रकमेवर 2% शास्ती लावली नसलेबाबत |
| 53 | शिक्षण कर व नौकर शाश्वती कर विहित मुदतीत जमा केला नसलेबाबत |
| 54 | मोबाईल टॉवर थकबाकीवर शास्ती आकारली नसलेबाबत |
| 55 | नवीन मालमत्ता करआकारणी चुकीची केलेने झालेल्या नुकसानी बाबत |
| 56 | बसवेश्वर नगर येथे 0.6 दशलक्ष लिटरच्या दोन टाक्या बांधणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 57 | कुमठेगांव येथे टाकीजवळ 1 दशलक्ष लिटरची उंच टाकी बांधणेसाठी महानगरपालिका निधीमधुन रक्कम आदा केली नसलेबाबत |
| 58 | मजरेवाडी 2+2 दशलक्ष लिटरच्या उंचावरील पाण्याच्या टाक्या बांधणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 59 | केगांव येथे 0.8 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधितुन रक्कम आदा केली नसलेबाबत |
| 60 | बाळेगांव येथे 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधितुन रक्कम आदा केली नसलेबाबत |
| 61 | कुमठानाका डीएसपी टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधितुन रक्कम आदा केली नसलेबाबत |
| 62 | जूळे सोलापुर एम बी आर टाकीजवळ 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणेसाठी स्वनिधितुन रक्कम आदा केली नसलेबाबत |

| | |
|---|---|
| 63 | हायलेव्हल टाकीजवळ (महानगरपालिका स्टोअर जवळ) 2 दशलक्ष लिटरची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 64 | हददवाढ भागात विविध ठिकाणी वितरण नलिका टाकणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 65 | कस्तुरबा टाकीजवळ 2 दशलक्ष लिटर उंचावरील टाकी बांधणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 66 | दहिटणे येथे 0.6 दशलक्ष लि. क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे कामातील अनियमिततेबाबत |
| 67 | भद्रावती येथे 1 दशलक्ष लिटर व मित्रगोत्री येथे 2 दशलक्ष लिटरच्या दोन टाक्या बांधणेसाठी स्वनिधितुन रक्कम खर्च केली नसलेबाबत |
| 68 | कोंडी एम.बी.आर. ते जूना पुना नाकापर्यंत 1016 मि.मी. व्यासाची एम.एस. पाईपलाईन टाकणे |
| 69 | सोरेगांव जलशुध्दीकरण केंद्र येथील पंपींग मशिनरी नुतनीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 70 | ट्रक माउंटेड सक्शन कम जेटींग मशिन चेसीससह खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत |
| 71 | सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र चालविणे कामामधील अनियमिततेबाबत |
| 72 | मुस्लिम कब्रस्तान सलगर वस्ती येथे कंपौंड वॉल बांधणे, रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 73 | गुडलक हॉटेल ते नॅशनल हायवे पर्यंतचा रस्ता डांबरी करणे या कामातील अनियमिततेबाब |
| 74 | बलिदान चौक ते कौंतम चौक ते समाचार चौक पर्यंत रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 75 | अक्क्लकोट रोड ते समाधान नगर रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 76 | शासन अनुदानातून केलेल्या रस्त्याचे कामातील अनियमिततेबाबत |
| 77 | मुळेगांव रोड ते जवाहर टाकी ते 256 गाळे MSRDC रस्त्यापर्यंत रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 78 | वॉ.क्र. 68 मुनशी बंगला ते धमाका ढोली बाजा ते सतनाम चौक रस्ता करणे या कामतील अनियमिततेबाबत |
| 79 | पमा कोळी शॉपींग सेंटर ते घोंगडे वस्ती रस्ता करणे या कामातील अनियमिततेबाबत |

| | |
|---|---|
| 80 | अक्क्लकोट रोड, मल्लिकार्जून ते समाधान नगर रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत |
| 81 | समता नगर ते जयप्रकाश नगर या भागात रस्ते करणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 82 | IHSDP अंतर्गत भगवाननगर झोपडपट्टी घरकुल बांधणे कामातील अनियमिततेबाबत |
| 83 | वॉ.क्र. 92 अंबिका शिवगंगा नगर येथे सुधारणा करणे या कामातील अनियमिततेबाबत |
| 84 | बांधकाम वापर परवाना शुल्क वसुलीबाबात |
| 85 | कामगार कल्याण निधी वसुल केला नसलेबाबत |
| 86 | अनुसुचित जाती, नवबौध्द घटकाच्या घरकुल योजनेमधील अनियमिततेबाबत |
| 87 | डॉ. कोटणीस स्मृती स्मारक उभारणे या कामातील अनियमितता |
| 88 | नगर अभियंता, विद्युत भांडार विभागाकडील खरेदी, लेखे/नोंदवह्यामधील आढळुन आलेल्या अनियमितता |
| 89 | नगर अभियंता, विद्युत भांडार विभागाकडील रु. 41,02,017/- च्या विद्युत साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत |
| 90 | व्यापा-यांनी भरलेल्या स्थानिक संस्था कराचे कर निर्धारण न केल्याबाबत |
| 91 | गजानन महिला मंडळ झुणका भाकर केंद्रास मोकळी जागा भाडयाने देण्यामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत |
| 92 | कुंभार वेस शॉपींग सेंटर मधील गाळा क्र. 17 मधील अनियमिततेबाबत |
| 93 | मोतीबाग प्राणीसंग्रहालयाचे समोरील बाजूची 400 फु. इतकी खुली जागा भाडयाने देणेमधील अनियमिततेबाबत |
| 94 | राघवेंद्र क्रीडा व शैक्षणिक संस्थेस झुणका भाकर सुरु करणेस दिलेल्या मोकळया जागेबाबत |
| 95 | महानगरपालिका शॉपींग सेंटर गाळा क्र. 1 तुळजापूर वेस लगतची खुली जागा भाडयाने देणेबाबत |
| 96 | सोलापूर महानगरपालिकेच्या मेजर शॉपींग सेंटरमधील भाडयाच्या अनियमिततेबाबत |
| 97 | भद्रावती पाण्याच्या टाकी परिसरातील जागा झुणका भाकर केंद्रासाठी देण्यात झालेल्या अनियमिततेबाबत |

| | |
|---|---|
| 98 | श्री. महालक्ष्मी मागासवर्गीय महिला विकास मंडळ यांना जागा भाडयाने देणेबाबत |
| 99 | महापालिकेच्या ताब्यात असलेल्य मिनी शॉपींग सेंटरचे भाडे वसुलीबाबत |
| 100 | महापालिका क्षेत्रातील खोक्यांची थकबाकी वसुल करणेबाबत |
| 101 | कुंभार वेस शॉपींग सेंटर मधील गाळा क्र. 18 मधील अनियमिततेबाबत |
| 102 | जोडभावी पेठ सि.स.नं. 9062 पैकी 550 चौ.फु. जागा भाडयाने देणेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत |
| 103 | महात्मा गांधी प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना बीफ पुरवठा करणे कामातील अनियमिततेबाबत |
| 104 | धर्मवीर संभाजी तलाव नौका विहार मक्त्यामधील अनियमिततेबाबत |
| 105 | महात्मा गांधी प्राणीसंग्रहालयास दुधपुरवठा करण्याच्या ठेक्यातील अनियमिततेबाबत |
| 106 | महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना फळभाज्या, पालेभाज्या व फळफळावळ पुरविण्याच्या ठेक्यातील अनियमिततेबाबत |
| 107 | उद्यान विभागांतर्गत जयभवानी बागेच्या खाजगीकरणातील अनियमिततेबाबत |
| 108 | मौलाना आझाद बागेच्या निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत |
| 109 | सभापती, महिला व बालकल्याण आणि अधिकारी यांच्या वाहनांवरील खर्चाबाबत |
| 110 | महिला व बालकल्याण समितीने राबविलेल्या संगणक (एम.एस.सी.आय.टी) प्रशिक्षणाबाबत |
| 111 | इंदिरा गांधी स्टेडियममधील गाळयांच्या भाडे थकबाकीबाबत |
| 112 | झोपडपटटीधारकांना ओळखपत्र वितरीत न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत |
| 113 | घर तेथे शौचालय अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधणे (फेज-1) कामातील अनियमितताबाबत |
| 114 | घर तेथे वैयक्तिक शौचालय बांधणे कामासाठी प्राप्त निधी व खर्चामधील तफावतीबाबत |
| 115 | घर तेथे शौचालय अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधणे (फेज-4) मधील अनियमितताबाबत |
| 116 | कमी खर्चाचे शौचालय प्रकरणी निवड केलेले लाभार्थी व वैयक्तिक बांधलेल्या शौचालयाच्या कामामधील अनियमिततेबाबत |
| 117 | स्टेशनरी खरेदी निविदा प्रक्रिया न राबविता तूकडे पाडून केल्याने झालेली अनियमितता |

| | |
|---|---|
| 118 | जनन व मृत्युच्या नोंदीच्या कामामध्ये विलंब होवुनही दंडात्माक कार्यवाही केली नसलेबाबत |
| 119 | टॅबलेट पी.सी. खरेदीमधील अनियमितता |
| 120 | नगरसेवक, पदाधिकारी यांचे दुरध्वनी व लेटरपॅड छपाईवर करणेत आलेल्य नियमबाह्य खर्चाबाबत |
| कलम 9 क खालील आक्षेप | |
| 121 | गलिच्छ वस्ती सुधारणा विभागाने वसुलीच्या रक्कमा कमी जमा केल्याने झालेल्या अपहाराबाबत व इतर अनियमितताबाबत |
| 122 | श्री. बी.बी.इंगळे - क.श्रे.लि. यांनी घरपट्टी विभागाकडे केलेल्या अपहाराबाबत |
| कलम 9 ड खालील आक्षेप | |
| 123 | स्थायी समितीने विहीत केलेल्या लेख्यांचे नमुने सादर केले नसलेबाबत |
| 124 | अग्रीमासंबंधी कागदपत्रे सादर न केल्याबाबत |
| 125 | मुदतबाह्य व न वटलेले धनादेशाची माहिती सादर केली नसलेबाबत |
| 126 | अदा बील नमुन्याप्रमाणे देयके सादर न करता प्रदान केल्याबाबत |
| 127 | भविष्य निर्वाह निधीमधील त्रुटीबाबत |
| 128 | सुरक्षा, अनामत व इसारा रक्कम नोंद वहीतील त्रुटीबाबत |
| 129 | वेतन राखीव निधीचे स्वतंत्र खाते न ठेवलेबाबत |
| 130 | जमानत / तारणठेव नोंदवही ठेवली नसल्याबाबत |
| 131 | परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील त्रुटीबाबत |
| 132 | सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन विषयक लाभ वेळेत प्रदान केले नसल्याबाबत |
| 133 | रोखवही व बँकपासबुक ताळमेळ जुळत नसल्याबाबत |
| 134 | सर्वसाधारण सभेकडे प्रलंबित असलेल्या विषयावर निर्णय न घेतलेबाबत |
| 135 | सर्वसाधारण सभेकडे प्रलंबित असलेल्या विषयावर निर्णय न घेतलेबाबत |
| 136 | मलेरिया विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत |

| | |
|---|---|
| 137 | नगरसचिव विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत |
| 138 | सोलापूर महानगरपालिका कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत |
| 139 | अग्निशमन विभागाकडील सेवापुस्तकामधील त्रुटीबाबत |
| 140 | श्री. मल्लिकार्जून भिमा गजधाने, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकातील त्रुटीबाबत |
| 141 | श्रीमती सिध्दम्मा कोंडय्या येनमूल, सफाई कामगार यांच्या विनापरवाना गैरहजरीबाबत |
| 142 | सामान्य् प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडील लेखे/नोंदवह्या नियमानुसार न ठेवणे |
| 143 | मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाचे मंजुर कर्मचारी आकृतीबंध व लेखापरिक्षण अहवालाबाबत |
| 144 | अग्निशमन विभागाकडील जमा रक्कमांच्या तपासणीत आढळलेल्या त्रुटीबाबत |
| 145 | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमांच्या उल्लंघनाबाबत |
| 146 | अन्न व परवाना विभागाच्या नर्सिंगहोमच्या नोंदवहीतील त्रुटीबाबत |
| 147 | नगर अभियंता, भांडार (मुख्यालय) विभागाकडील सिमेंट खरेदीमधील अनियमितता |
| 148 | बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिकेमध्ये नियमानुसार मोजमापे नोंदविली नसलेबाबत |
| 149 | नगर अभियंता, भांडार विभागाकडील लेखे/नोंदवह्या नियमातील तरतुदीनुसार न ठेवणे |
| 150 | सुवर्ण जयंती रोजगार योजनेच्या रोकड वहीतील अनियमिततेबाबत |
| 151 | सुवर्ण जयंती शहर रोजगार योजनेमधील अनियमिततेबाबत |
| 152 | एस्कॉर्ट विभागाकरिता पावतीपुस्तकांच्या छपाई निविदेमधील अनियमिततेबाबत |
| 153 | महिला व बालकल्याण विभागाने अर्थसंकल्पीय तरतूद खर्च केली नसलेबाबत |
| 154 | अतिक्रमण विभागाचे आस्थापनेवर झालेल्या अनावश्यक खर्चाबाबत |
| 155 | गलीच्छ वस्ती सुधारणा विभागाच्या थकबाकीबाबत |
| 156 | महाराष्ट्र विद्युत महामंडळ यांना नाटयगृहाच्या विद्युत देयकांचे जादा प्रदान होत असलेने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत |

| | |
|---|---|
| 157 | हुतात्मा स्मृतीमंदिर नाटयगृहातील खुर्ची दुरुस्ती बाबतचे अभिलेख उपलब्ध केले नसलेबाबत |
| 158 | भाडयाने लावलेल्या जनरेटरची नस्ती उपलब्ध करुन न दिल्याबाबत |

उपरोक्त नमूद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या पुढील वर्षाचे अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावेत.

पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ले.प.वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 13,19,31,46,70,77,82,88,96,103,106,107,112,121, 122,133,151,10,43,6 | 20 |

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 सोलापूर महानगरपालिकेच्या 2012-13 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 07**

*अनियमितता कलम : 9अ*

***खर्चाचे अंदाज वाढविण्यासाठी जमा बाजू अवास्तवरित्या वाढविलेली आहे. अर्थसंकल्प हा वास्तववादी असणे आवश्यक आहे. अवास्तविक अंदाजपत्रकीय जमेच्या आधारावर विकास कामांना मंजुरी दिल्यामुळे मार्च 2013 अखेर मनपाचे दायित्व(spill over) रु. 267 कोटी झाले आहे.***

सोलापूर मनपाच्या 2012-13 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील उणीवाबाबत अर्धसमास क्र.151 दि. 31.07.2015 नुसार प्राप्त अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

सोलापूर महानगरपालिकेच्या 2012-2013 या आर्थिक वर्षाच्या मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम कलम 95,96,100 अन्वये अनुक्रमे मा.आयुक्त, मा.स्थायी समिती, मा.महासभा यांनी मान्य केलेल्या अर्थसंकल्पीय रक्कमा खालीलप्रमाणे आहेत.

(आकडे - रुपये कोटी मध्ये)

| | आयुक्त | | | स्थायी समिती | | | महासभा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अंदाज पत्रक अ | अंदाज पत्रक क | एकूण | अंदाज पत्रक अ | अंदाज पत्रक क | एकूण | अंदाज पत्रक अ | अंदाज पत्रक क | एकूण |
| जमा | 239.43 | 45.79 | 285.22 | 302.7 | 46.99 | 349.69 | 363.20 | 48.99 | 412.19 |
| खर्च | 239.43 | 45.79 | 285.22 | 302.7 | 46.69 | 349.69 | 363.20 | 48.99 | 412.19 |

1) महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30(बी) नुसार मागील 3 वर्षाचे प्रत्यक्ष जमा खर्च विचारात घेऊन अर्थसंकल्पीय अंदाज करणे आवश्यक आहे. मागील वर्षांच्या जमा रकमा खालीलप्रमाणे आहेत.

| आर्थिक वर्ष | प्रत्यक्ष जमा(कोटी.रु) | वाढीची टक्केवारी |
|---|---|---|
| 2008-09 | 144.45 | |
| 2009-10 | 162.52 | 12.50 |

| | | |
|---|---|---|
| 2010-11 | 200.38 | 23.29 |
| 2011-12 | 157.54 | (-) 21.37 |
| 2012-13 | 218.73 | |

वरील तक्ता विचारात घेता, मागील तीन वर्षाची जमेची सरासरी वाढ 4.80% आहे. 2011-12 च्या प्रत्यक्ष जमेशी तुलना करता, 2012-13 चे अंदाजपत्रक 162 % वाढ केली आहे. आयुक्तांनी 81%, स्थायी समिती ने 122%, मनपा ने 162% पर्यंत वाढ केली आहे. यावरुन खर्चाचे अंदाज वाढविण्यासाठी जमा बाजू अवास्तवरित्या वाढविलेली आहे. अर्थसंकल्प हा वास्तववादी असणे आवश्यक आहे. अवास्तविक अंदाजपत्रकीय जमेच्या आधारावर विकास कामांना मंजुरी दिल्यामुळे मनपाच्या दायित्वामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. 2012-13 अखेर एकूण स्पील ओव्हरची रक्कम रु.267 कोटी आहे. स्पील ओव्हरची रक्कम 2012-13 च्या प्रत्यक्ष जमा रु.218.73 कोटीपेक्षा जास्त आहे.

2) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जीईएन-1093/325/प्र.क्र.24/नवी-32, दि.17/04/1993 व शासन निर्णय क्र.जीईएन-1093/1198/नवी-14, दि.14/07/1993 अन्वये महिला व बाल विकास कल्याण यासाठी बांधील खर्च वजा जाता उर्वरीत अंदाजपत्रकीय रकमेच्या 5% तरतूद करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2012-13 च्या अंदाजपत्रकात बांधील खर्च नमूद केला नाही.त्यामुळे महिला बालकल्याणकारी योजनांसाठी बांधील खर्च वजा जाता आवश्यक 5% तरतूद किती येते,याची परिगणना करता येत नाही. 2012-13 च्या अंदाजपत्रकात महिला बालकल्याण समिती खर्चासाठी रु.2 कोटी ची तरतूद केली आहे. व 2014-15 चे अंदाजपत्रकातील नक्की आकडयानुसार 2012-13 आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष खर्च रु.84.77 लाख इतकाच केला आहे.

3) नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक 3 जुलै 1982 नुसार मागासवर्गीय कल्याणकारी योजनांवर बांधील खर्च वगळता उर्वरीत अंदाजपत्रकीय रकमेच्या 5% तरतूद करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2012-13 च्या अंदाजपत्रकात बांधील खर्च नमूद केला नाही.त्यामुळे मागासवर्गीय कल्याणकारी योजनांसाठी बांधील खर्च वजा जाता आवश्यक 5% तरतूद किती येते,याची परिगणना करता येत नाही. 2012-13 च्या अंदाजपत्रकात आंबेडकर आवास योजनेसाठी रु.2 कोटी तरतुद केली आहे. व 2014-15 चे अंदाजपत्रकातील नक्की आकडयानुसार 2012-13 आर्थिक वर्षामध्ये केलेला खर्च निरंक आहे.

4) नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक जीईएन-1655/प्र.क्र.46/नवी-33, दि.14/02/2002 अन्वये अपंगकल्याणासाठी बांधील खर्च वगळता उर्वरीत अंदाजपत्रकीय रकमेच्या 3% तरतूद करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2012-13 च्या अंदाजपत्रकात बांधील खर्च नमूद केला नाही.त्यामुळे अपंगकल्याणासाठी बांधील खर्च वजा जाता आवश्यक 3% तरतूद किती येते,याची परिगणना करता येत नाही. 2012-13 च्या अंदाजपत्रकात अपंग सहाय्य योजनेसाठी तरतूद रु.1.5 कोटी केली आहे. 2014-15 चे अंदाजपत्रकातील नक्की आकडयानुसार 2012-13 आर्थिक वर्षामध्ये केलेला खर्च निरंक आहे.

5) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.जीईएन-1098/प्र.क्र.-21/98, नवी-24 मंत्रालय मुंबई दिनांक 9 मार्च 1988 अन्वये महानगरपालिकांनी व नगरपालिकांनी बांधील खर्च वगळता

उर्वरीत अंदाजपत्रकीय रकमेच्या दरवर्षी किमान 5% तरतूद करून खेळ व संघ दत्तक घेणे आणि क्रीडा यावर खर्च करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपाच्या मुख्य सभेने मान्य केलेल्या 2012-13 च्या अंदाजपत्रकात बांधील खर्च नमूद केला नाही.त्यामुळे खेळ व संघ दत्तक घेणे आणि क्रीडा यासाठी बांधील खर्च वजा जाता आवश्यक 5% तरतूद किती येते,याची परिगणना करता येत नाही. 2012-13 अंदाजपत्रकात क्रिडा विभागासाठी 1.45 कोटी तरतूद करुन 2014-15 चे अंदाजपत्रकातील नक्की आकडयानुसार खर्च रु.42.44 लक्ष केला आहे. तसेच हा खर्च देखील प्रामुख्याने कर्मचा-यांच्या वेतनावर झाला आहे.

6) महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 प्रकरण 6, कलम 15 अन्वये एकूण जमा रकमेच्या अर्धा टक्का रकमेची वृक्ष प्राधिकरण खाती तरतूद करणे आवश्यक आहे.2012-13 च्या एकूण जमेच्या अर्धा टक्का रु.1.094 कोटी तरतूद करणे आवश्यक होते. तथापि अशी तरतूद अंदाजपत्रकात आढळून आली नाही.

7) मालमत्ता करासाठी सुमारे 50,000 प्रॉपर्टीजचा शोध या सदराखाली 2012-13 आर्थिक वर्षात 10 कोटी जमा अपेक्षित धरली असताना त्या सदरी कोणतीही रक्कम जमा करणेसाठी कोणतीही कार्यवाही केली नाही.

**महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत अभिप्राय**

सोलापूर महानगरपालिकेच्या 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये अर्धसमास पत्र क्र.11 दि.26-02-2015 अन्वये विहित नमुन्यात महानगरपालिकेचे दि.31.03.2013 अखेरचे मत्ता व दायित्व विवरणपत्राची मागणी करण्यात आली होती. परंतु सदरची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या दि.31.03.2013 अखेर असणारी मत्ता व दायित्व यांची पडताळणी करता आलेली नाही. तथापि 2012-13 आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा, गुंतणुका, कर्जे, अग्रीमे व इतर अभिलेख्यांच्या पडताळणीवरुन महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सोलापूर महानगरपालिकेस येणे असलेली अग्रीम रक्कम रु.50 कोटी आहे. सदर अग्रीमांमध्ये 2003 पासून प्रलंबित असलेल्या रकमांचा समावेश आहे.

2) मार्च 2013 अखेर मिळकत कराची थकबाकी रक्कम रु.89.27 कोटी आहे. मार्च 2011 अखेर सदरची थकबाकी रु.52.89 कोटी होती. म्हणजेच मिळकत कराचे थकबाकीमध्ये वाढ होत आहे.

3) मार्च 2013 अखेर पाणीपट्टीची येणे असलेली थकबाकी रु.44.93 कोटी आहे. मार्च 2011 अखेर सदरची थकबाकी रु.33.50 कोटी होती. म्हणजेच पाणीपट्टीचे थकबाकीमध्ये वाढ होत आहे.

त्यामुळे या रकमा पूर्णत: वसुल झाल्याशिवाय ख-या अर्थाने मत्ता म्हणता येणार नाही.

4) महानगरपालिकेवर मार्च 2013 अखेर रु.32.43 कोटी इतके कर्ज शिल्लक आहे. वेळेत कर्ज फेड न केल्यामुळे रु.4.12 कोटी व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागला आहे.

5) '2012-13 चे हिशोब व शिल्लक रकमांचे नुतनीकरण' या टिपणीवरुन असे दिसून येते की, मनपावर मार्च 2013 अखेर रु.267.38 कोटी इतके दायित्व आहे. ही रक्कम वित्तीय वर्ष 2012-13 ची प्रत्यक्ष जमा रक्कम रु.218 कोटीपेक्षा जास्त आहे.

6) मनपाची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे 2012-13 मधील आयकर कपातीची रक्कम रु.53.45 लक्ष विलंबाने भरणा केली आहे.

7) मनपाचे भविष्य निर्वाह निधीमध्ये कर्मचा-यांना देय असणा-या रकमेपेक्षा रु.3.77 कोटी इतकी रक्कम कमी आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता महानगरपालिकेचे आर्थिक स्थिती अत्यंत असमाधानकारक आहे.

महानगरपालिकेने आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

1) अनुत्पादक व भांडवली खर्चामध्ये काटकसर करणे.

2) प्रशासकिय खर्च कमी करणे. आस्थापना खर्चामध्ये काटकसर करणे.

3) मिळकत कराची व पाणीपट्टीची थकबाकी वसुल करणे.

4) महानगरपालिका आकारु शकते असे सर्व कर आकारणी करुन वसुल करणे. त्यासाठी करदात्या नागरींकाचा असंतोष होवु नये म्हणून दिल्या जाणा-या सर्व सुविधांचा दर्जा अत्यंत समाधानकारक होईल, याद्दष्टीने प्रशासनात कार्यक्षमता व व्यावसायिकता निर्माण करणे.

5) पाणी पुरवठा योजनेमध्ये पाण्याचा अपव्यय टाळावा. पाणी गळती, चोरी होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा योजना आर्थिक द्दष्टया स्वंयपूर्ण होण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

6) वाहनाचा वापर काटकसरीने करावा. अतितातडीच्या प्रसंगी विमान प्रवासाचा अवलंब करावा.

7) मनपाच्या मालमत्तेपासून मिळणा-या उत्पन्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

8) निरुपयोगी साहित्य, जसे वाहनांचे सुटे भाग, फर्निचर, वर्तमानपत्र रद्दी, जुनी यंत्रसामुग्री व अवजारे, जुनी वाहने इ.ची किमान किंमत ठरवून जाहिर लिलावाव्दारे विक्री करणे.

9) अंदाजपत्रकातील तरतूदी व कायदेशीर तरतूदींचे पालन करावे.

DATDSAM7301 (Ref No : 8, Hmm No : 151)

## *2 2012-2013 चे वार्षिक लेखे परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 02**

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.लेखास/102004/प्र.क्र.5/नवि-31, नुसार महानगरपालिकेने दि.01/04/2005 पासून लेखे दुहेरी नोंद पद्धतीने ठेवणे बाबत आदेशित केले आहे. तथापि लेखे दुहेरी नोंद पद्धतीने ठेवलेले नाहीत. राष्ट्रीय लेखा संहितेतील 31.3 नुसार 31.4 मध्ये नमूद केलेली वित्तीय विवरणपत्रे तयार करण्यात आलेली नाहीत. तसेच स्थायी समितीने कोणत्या आर्थिक वर्षा पर्यंत वार्षिक लेखे मान्य केले आहेत याची माहिती प्राप्त झाली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 94 (1) नुसार आयुक्तांने प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील परिवहन उपक्रमांच्या प्रशासना व्यतिरिक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासना संबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रकमा व अशा वर्षाच्या अखेरीस जमा असलेली शिल्लक दर्शविणा-या विवरण पत्रासहित तयार करुन स्थायी समितीस सादर केली पाहिजे. शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.लेखास/102004/प्र.क्र.5/नवि-31, नुसार महानगरपालिकेने दि.01/04/2005 पासून लेखे दुहेरी नोंद पद्धतीने ठेवणे बाबत आदेशित केले आहे. तथापि लेखे दुहेरी नोंद पद्धतीने ठेवलेले नाहीत.
राष्ट्रीय लेखा संहितेतील 31.3 नुसार 31.4 मध्ये नमूद केलेली खालील वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याची जबाबदारी लेखा विभाग प्रमुखाची राहील.

ताळेबंद ( Balance sheet)
उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र (Income & expenditure statement)
रोखता प्रवाह विवरणपत्र (Cash flow statement )
जमा व प्रदान खाते (Receipt & payment account )

नमूद केलेली वित्तीय विवरणपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

अर्ध समास पत्र क्रमांक 10, दि.26/02/15 अन्वये लेखा विभागास 2012-13 या आर्थिक वर्षाच्या वार्षिक लेख्यांची मागणी केली. तथापि 2012-2013 या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे सादर केले नाही. 2012-2013 या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे तयार करण्याचे काम चालू असून अंतिम होताच सादर करण्यात येईल असे त्यांचे दि.26/02/15 चे अनुपालनामध्ये कळविले आहे. त्यामुळे वार्षिक लेख्या वरील अभिप्राय देता आले नाहीत.

2. स्थायी समितीने कोणत्या आर्थिक वर्षा पर्यंत वार्षिक लेखे मान्य केले आहेत याची माहिती प्राप्त झाली नाही.

DATDSAM7301 (Ref No : 7, Hmm No : 10)

## *3 प्रमाणके रेखांकनास उपलब्ध न करण्याबाबत .*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

Solapur (M Corp.)

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 154789.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 154789.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2012-13 च्या लेखा परीक्षणास मार्च 2013 मधील मनपा निधीची 9 प्रमाणके रेखांकनास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे सदर प्रमाणकाव्दारे खर्च करण्यात आलेली रक्कम रु 154789/- लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2012-13 च्या लेखा परीक्षणातील निवड महिना मार्च 2013 मधील मनपा निधीची खालील प्रमाणे 9 प्रमाणके रेखांकनास उपलब्ध झाली नाहीत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम रु. | रक्कम कोणास दिली | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3676 | 30/03/2013 | 2111/- | परिवहन उपक्रम | विभाग क्र. 6 कडील वाहनासाठी इंधन खरेदी |
| 2 | 3792 | 30/03/2013 | 17170/- | आरोग्य अधिकारी | वाहन सुटेभाग खरेदी |
| 3 | 4108 | 30/03/2013 | 10000/- | सहा.आयुक्त सा.प्र. | वाहनासाठी इंधन खरेदी |
| 4 | 4450 | 30/03/2013 | 19195/- | आरोग्य अधिकारी | वाहन सुटेभाग खरेदी |
| 5 | 4451 | 30/03/2013 | 19000/- | आरोग्य अधिकारी | वाहन सुटेभाग खरेदी |
| 6 | 4452 | 30/03/2013 | 24920/- | आरोग्य अधिकारी | वाहन सुटेभाग खरेदी |
| 7 | 4453 | 30/03/2013 | 14170/- | आरोग्य अधिकारी | वाहन सुटेभाग खरेदी |
| 8 | 4454 | 30/03/2013 | 24150/- | आरोग्य अधिकारी | वाहन सुटेभाग खरेदी |
| 9 | 4455 | 30/03/2013 | 24073/- | आरोग्य अधिकारी | वाहन सुटेभाग खरेदी |

वित्तीय वर्ष 2012-13 च्या लेखा परीक्षणातील निवड महिना मार्च 2013 मधील मनपा निधीची प्रमाणके व रोखवही ( डे बुक ) यांचे रेखांकन करताना 1224 प्रमाणके रेखांकनास उपलब्ध झाली नसल्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.7 दिनांक 26/02/2015 अन्वये कळविण्यात आले होते विभागाने त्यापैकी 1215 प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध केली परंतु वरील 9 प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे सदर प्रमाणकाव्दारे खर्च करण्यात आलेली रक्कम रु 154789/-लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधीनियम 2011 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणासाठी मागणी करण्यात आलेले अभीलेखे, कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी उक्त अधिनियमाच्या कलम 4 नुसार महापालिकेची आहे.परंतु सदर जबाबदारीचे पालन झाले नाही.

## 4 करांची जमा रक्कम लेखाशाखेत जमा न करता परस्पर बँकेतुन खर्च केल्याबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेचे जनरल फंडाचे एकच डेबुक (रोखवही) असल्याने त्याचे एकच खाते असणे आवश्यक असताना सदर फंडाची दोन खाती असुन प्रत्येक वर्षी वेगवेगळया खात्यामधुन खर्च केला जातो, त्यामुळे सदर दोन खात्यापैकी एकच खाते वापरात असते. अशा वापरात असणा- या खात्यामध्ये महानगरपालिकेच्या वतीने संकलित केलेल्या करांची व भाडयाची रक्कम जमा करुन त्यातुन खर्च करणे आवश्यक असताना वरील प्रमाणे स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या बँक खात्यामधुन परस्पर खर्च केला असल्याचे आढळून आले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखा परीक्षणामध्ये जकात / स्थानिक संस्था कर, घरपट्टी, भुमी व मालमत्ता, गलिच्छ वस्ती सुधारणा योजना इ. करांची दैनंदिन संकलित रक्कम स्वतंत्र बँक खातेमध्ये परस्पर जमा केली जाते व त्याची चलन प्रत लेखा शाखेकडे (मुख्यलेखापाल कार्यालय) जमा केली जाते.सदर खात्यामधून खर्च करण्याचे अधिकार मुख्यलेखापाल यांना असुन सदर खात्यातुन रक्कम मनपाच्या मुख्य खात्यामध्ये वर्ग न करता वेतन खात्यामध्ये जमा केली आहे व त्यातुन वेतन व भत्ते यावरील खर्च भागविला आहे. तसेच काही वेळा काही बाबीवरील खर्च मुख्यलेखापाल यांचे मुख्य खात्यामध्ये वर्ग न करता खर्च परस्पर सदर स्वतंत्र बँकेतुन केल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले. महानगरपालिकेचे जनरल फंडाचे एकच डेबुक (रोखवही) असल्याने त्याचे एकच खाते असणे आवश्यक असताना सदर फंडाची दोन खाती असुन प्रत्येक वर्षी वेगवेगळया खात्यामधुन खर्च केला जातो. त्यामुळे सदर दोन खात्यापैकी एकच खाते वापरात असते. अशा वापरात असणा-या खात्यामध्ये महानगरपालिकेच्या वतीने संकलित केलेल्या करांची व भाडयाची रक्कम जमा करुन त्यातुन खर्च करणे आवश्यक असताना वरील प्रमाणे स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या बँक खात्यामधुन परस्पर खर्च केला असल्याचे सोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्र. **1** मध्ये नमुद असलेल्या उदाहरणावरुन दिसुन येते.

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 46 दि. 07/05/2015 अन्वये कळविण्यात आले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 03/07/2015 रोजी सादर केले असुन त्यामध्ये 2014-15 या वित्तीय वर्षापासून स्थानिक संस्था कर, घर पटटी, भुमी मालमत्ता, गलीच्छ वस्ती सुधारणा योजना या खात्यात जमा होणा-या रकमा

मुख्यलेखापाल यांचेकडील मुख्य खात्यामध्ये वर्ग करुनच खर्च करण्यात येत असल्याचे व परस्पर खर्च करण्यात येत नसल्याचे नमुद केले आहे.

महानगरपालिकेच्या वतीने जमा करण्यात येणा-या सर्व रकमा विविध खात्यामध्ये परस्पर जमा करण्यात येत असल्याने व त्यातुन परस्पर खर्च करण्यात येत असल्याने महानगरपालिकेच्या वतीने जमा झालेली करांची रक्कम व खर्च यानुसार मुख्य लेखापाल यांचे रोखवही नुसार जमा व खर्च रक्कम तसेच बँक शिल्लक यांचा ताळमेळ घेण्यात आला नाही. त्यामुळे जमा व खर्च रकमांची लेखा परीक्षणास खात्री करता येत नाही.

राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावली 2005 मधील परिछेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपद्धतीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिनाअखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या नोंदीबरोबर बँक पासबुक / विवरणपत्र नोंदीची तुलना करून महिनाअखेरीचे शिलकेचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 102, Hmm No : 46)

## *5 कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 0**

*अनियमितता कलम : 9अ*

***1 जुलै 2010 व तद्नंतर करण्यात केलेल्या कामाच्या करारावरील रक्कमेवर कामगार कल्याण उपकराची 1 टक्का रक्कम दि.1/07/2010 पासून वसूल केली नसल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.***

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे कडील शासन निर्णय क्रमांक बिसीए 2009/प्र.क्र.108/कामगार, 7-अ दिनांक 17 जून 2010 नुसार इमारत व इतर बांधकाम कामगार ( रोजगार विनियमन व सेवाशर्ती ) अधिनियम 1996 व त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम 1996 नुसार बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करण्याबाबत तरतूद आहे. सदर उपकर अधिनियमाच्या कलम 3 आणि केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 च्या नियम 3 नुसार निर्गमित केलेल्या दि.26.9.1996 च्या अधिसूचने नुसार ज्यांचे काम घेण्यासाठीचे करार 1 जुलै 2010 व तद्नंतर करण्यात येईल अशा बांधकाम मूल्याच्या 1 टक्का उपकराची रक्कम दि.1/07/2010 पासून न चुकता वसूल करून शासन जमा करणे बाबत तरतूद आहे.

उपकर उशिरा भरल्यास कलम 8 नुसार कोणताही मालक विहित केलेल्या वेळेत उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकराची रक्कम न भरल्यास उपकराच्या रक्कमेवर प्रतीमहा किंवा ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत त्या तारखेपासून 2% व्याज भरण्यास पात्र राहील. अशी तरतूद असतांना सोलापूर महानगरपालिकेने उपकर वसूल केला नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सदरची रक्कम वसूल करून दंडाच्या रक्कमेसह शासन जमा होणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.04 दि,26/02/2015 अन्वये कळविले असता लेखा विभागाने अर्धसमासावरील उत्तरामध्ये कामगार कल्याण उपकाराची रक्कम वसूल करण्याबाबत कार्यालयाकडून दि. 29/03/2014 चे पत्राद्वारे कळविले असल्याचे नमूद केले आहे. परंतु दि.17/06/2010 चे शासन निर्णयानुसार कामगार उपकर वसूल करण्याची कार्यवाही 1/07/2010 पासून करणे आवश्यक असतांना दि.29/04/14 रोजी संबंधित विभागास कळविले आहे. व प्रत्यक्षात वसुलीची कार्यवाही 2014-15 या आर्थिक वर्षापासून सुरु केली आहे. वास्तविक शासन निर्णयातील तरतुदी नुसार मक्तेदारास बिलाची रक्कम प्रदान करण्यापूर्वी कामगार कल्याण कर व शासनास येणे असललेल्या रक्कमा वसूल करून प्रदान करणे आवश्यक होते. परतू मनपाच्या लेखा विभागाकडून सदरची रक्कम वसूल न करताच प्रदाने करण्यात आल्याने कामगार कल्याण उपकरापोटी येणे असलेली रक्कम प्रलंबित राहिली आहे. तरी 1/07/2010 पासून येणे असलेली कामगार कल्याण उपकराची रक्कम परीगणित करून व्याजासह शासन जमा करावी.

DATVCSM6501 (Ref No : 17, Hmm No : 04)

## *6 गौण खानिजावरील स्वामीत्वधनाची वसूल केलेली रक्कम शासनास विलंबाने जमा केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 31103862.00 /-

***आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये गौण खनिजाची रक्कम रु.31103862 शासन जमा न करता स्वतंत्र खात्यावर दीर्घकाळ पर्यंत जमा ठेवून दोन वर्ष विलंबाने शासन भरणा केली आहे.***

आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये महानगरपालिकेतील विविध कामावर वापर करण्यात आलेल्या गौण खनिजाची रक्कम कंत्राटदारांच्या देयकातून वसूल केलेली आहे. सदर रक्कमा शासनाकडे तात्काळ भरणा करणे आवश्यक

Solapur (M Corp.)

असतांना देना बँक, नवी पेठ शाखा सोलापूर येथील खाते क्रमांक 041410034090 मध्ये जमा केल्या आहेत. गौण खानिजापोटी सदर खात्यावर जमा झालेली रक्कम रु.31103862 शासनाकडे दिनांक 3/12/2014 रोजी भरणा केली आहे. शासन महसुलाची वसूल केलेली रक्कम तात्काळ जमा करणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने दोन वर्ष विलंबाने रक्कम जमा केली आहे. त्यामुळे शासनाचा महसूल गुंतून पडला. याबाबत अर्धसमास पत्र क्र.54 दि.12/05/15 अन्वये विचारणा केली असता प्राप्त अनुपालन विचारात घेऊन आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATDSAM7301 (Ref No : 4, Hmm No : 54)

## *7 नियमबाह्यरित्या रोखीने रकमा प्रदान केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84 (2 ) नुसार शंभर रुपयापेक्षा अधिक किंवा स्थायी समिती सामान्यता किंवा कोणत्याही विनिर्दीष्ठ प्रदानाच्या वर्गासाठी वेळोवेळी निश्चित करील अशी त्याहून अधिक रक्कम महानगरपालिकेकडून देय असेल तेंव्हा ती धनादेशाव्दारे दिली पाहिजे व ती अन्य कोणत्याही रीतीने देता कामा नये तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.14 अन्वये नगरपरिषद निधीतून कोणतेही प्रदान धनादेशाव्दारे देणे आवश्यक आहे असे असताना वित्तीय वर्ष 2012 -13 चे लेखापरीक्षण मध्ये माहे मार्च 2013 या महिन्याची रोकडवहीची तपासणी केली असता 107 प्रमाणकाव्दारे रक्कम रु.441564/- चे प्रदान धनादेशाव्दारे न करता रोखीने केले आहे .***

सोलापूर महानगरपालिकेडील वित्तीय वर्ष 2012 -13 चे लेखापरीक्षणामध्ये माहे मार्च 2013 या महिन्याची महानगरपालिकेच्या जनरल फंड रोकडवहीची तपासणी केली असता 107 प्रमाणकाव्दारे रक्कम रु.441564/-चे प्रदान धनादेशावव्दारे न करता रोखीने केले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84 (2 ) नुसार शंभर रुपयापेक्षा अधिक किंवा स्थायी समिती सामान्यता किंवा कोणत्याही विनिर्दीष्ठ प्रदानाच्या वर्गासाठी वेळोवेळी निश्चित करील अशी त्याहून अधिक रक्कम महानगरपालिकेकडून देय असेल तेंव्हा ती धनादेशाव्दरे दिली पाहिजे व ती अन्य कोणत्याही रीतीने देता कामा नये तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.14 अन्वये नगरपरिषद निधीतून कोणतेही प्रदान धनादेशाव्दारे देणे आवश्यक

आहे असे असताना वरील 107 प्रमाणकाव्दारे रक्कम रु.441564/-चे प्रदान धनादेशाव्दरे न करता नियमबाह्यपणे रोखीने केले आहे .
याबाबत अर्धसमास पत्र क्र. 06 दि. 26/02/2015 अन्वये कळविण्यात आले होते. विभागाने दिलेल्या अनुपालन मध्ये वरील नियमाप्रमाणे  कार्यवाही दि.01/04/2014 पासून करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.
विभागाने दिलेले अनुपालन  संयुक्तिक नाही.

DATRNDM7201 (Ref No : 94, Hmm No : 06)

## *8 धनादेश नोंदवही,बँक स्टेटमेंट व वापरलेल्या धनादेशाच्या स्थळप्रती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***वर्ग केलेल्या- धनादेशाची धनादेश नोंदवही, बँक स्टेटमेंन्ट, वापरलेल्या धनादेशाच्या स्थळप्रती इत्यादी आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास सत्वर सादर करणेबाबत. अर्धसमास पत्र क्र. 45 दि. 07/05/2015 अन्वये कळविण्यात आले होते. त्याचे अनुपालन विभागाने दि. 15/07/2015 रोजी सादर केले आहे. त्यामध्ये वरील अभीलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. परंतु लेखापरीक्षण कालावधीत वरील अभीलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.***

सोलापूर महानगरपालिका कडील मनपा, स्थानिक संस्था कर, कर विभाग, गलिच्छ वस्ती सुधारणा, भुमी व मालमत्ता इत्यादी विभागांचे जमा रक्कम स्वतंत्र बँक खात्यांमध्ये जमा केली जाते व सदर बँक खात्यामधुन रक्कम काढण्याचे अधिकार मुख्यलेखापाल यांना आहेत. 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये वरील बँक खात्यामधून धनादेशाव्दारे काढण्यात आलेल्या किंवा इतर बँक खात्यामध्ये वर्ग केलेल्या- धनादेशाची धनादेश नोंदवही, बँक स्टेटमेंन्ट, वापरलेल्या धनादेशाच्या स्थळप्रती इत्यादी आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास सत्वर सादर करणेबाबत. अर्धसमास पत्र क्र. 45 दि. 07/05/2015 अन्वये कळविण्यात आले होते. त्याचे अनुपालन विभागाने दि. दि. 15/07/2015 रोजी सादर केले आहे. त्यामध्ये वरील अभीलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. परंतु लेखापरीक्षण कालावधीत वरील अभीलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम 2011 मधील कलम 6 नुसार अभिलेख्याची

लेखापरीक्षणासाठी मागणी करण्यात येवूनही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम 2011 मधील कलम 7 नुसार अभीलेखे, कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेची असुन यामध्ये कसुर झाल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम 2011 मधील कलम 8 अन्वये रु. 25000/- पर्यंतची दंडाची तरतुद आहे.

परंतु वरील अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नाहीत.

DATRNDM7201 (Ref No : 101, Hmm No : 45)

## *9 दोन किंवा त्यापेक्षा जास्त कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या कर्मचारी व अधीकारी यांना सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजना मंजूर केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***लेखा परीक्षणामध्ये निवडक सेवापुस्तके तपासणी केली असता दोन किंवा त्यापेक्षा जास्त कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या कर्मचारी व अधीकारी यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना मंजूर केल्याचे आढळून आले. शा.नि.क्र. वेतन/1999/5क 2/99/सेवा-3 दिनांक. 20/07/2001 मधील मार्गदर्शक तत्व 2 (3) नुसार सेवेत दोन किंवा त्याहून अधीक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही असे स्पष्ट नमूद असताना अशा तीन अधिकाऱ्यांना महानगरपालिकेने सदर योजनेचा लाभ मंजूर केला आहे व सदर अधिकारी हे सध्या सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांना निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान ,अंशराशीकरण रक्कम यांचेही अतिप्रदान झाले आहे.***

सोलापूर महानगर पालिकेच्या वर्ग 4 ते वर्ग 1 च्या कर्मचा-यांना व अधीका-यांना महानगरपालिकेने सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ महाराष्ट्र शासन ( वित्त विभाग) चे शा.नि.क्र. वेतन/1999/5क 2/99/सेवा-3, दिनांक. 20/07/2001 अन्वये मंजूर करुन वरिष्ठ वेतन श्रेणी मध्ये/ग्रेड वेतन मध्ये वेतन निश्चीती केली असल्याचे आढळुन आले.

पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालवणेसाठी शासनाने दि. 8 जुन 1995 अन्वये गट क व ड या कर्मचा-यांसाठी कालबध्द पदोन्नती दि. 04/10/1994 पासुन अंमलात आणली होती नंतर दिनांक. 20/07/2001 च्या शा.नि. प्रमाणे अधीकारी व कर्मचारी यांना सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजना लागू केली त्यामध्ये सेवेत दोनपेक्षा कमी वेळा पदोन्नती मिळालेल्या व संबंधीत पदावरील 12 वर्षाची नियमीत सेवा पूर्ण

करणा-या व 5 वे वेतन आयोगातील 8000-13500 व त्याहून कमी वेतन श्रेणीमध्ये वेतन घेणा-या अधीकारी व कर्मचारी यांना सदरची योजना अटी व शर्तीच्या अधीन मंजुर करण्यात आली.

सदरची योजना मनपा कर्मचारी व अधीकारी यांना लागू करण्यात आली असल्याचे आढळून आले. परंतु शासन निर्णय क्र. 1109/प्र.क्र.44/सेवा-3 दि. 01/04/2010 अन्वये राज्य शासकीय कर्मचा-याना लागू करण्यात आलेली सुधारित सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजना मनपा कर्मचारी व अधीकारी यांना अद्याप लागू करण्यात आली नाही.

1) लेखा परीक्षणामध्ये निवडक सेवापुस्तके तपासणी केली असता दोन किंवा त्यापेक्षा जास्त कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या कर्मचारी व अधीकारी यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना मंजूर केल्याचे आढळून आले. शा.नि.क्र. वेतन/1999/5क 2/99/सेवा-3 दिनांक. 20/07/2001 मधील मार्गदर्शक तत्व 2 (3) नुसार सेवेत दोन किंवा त्याहून अधीक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही असे स्पष्ट नमूद असताना अशा तीन कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना महानगरपालिकेने सदर योजनेचा लाभ मंजूर केला आहे तरी अशा कर्मचारी/अधीकारी यांची माहिती लेखा परीक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.101 दि.22/07/2015 अन्वये कळविले होते विभागाने त्याचे अनुपालन दि. 01 /08/2015 रोजी सादर केले असून त्यामध्ये खालील अधिकाऱ्यांना सेवेत दोन किंवा त्याहून अधीक वेळा पदोन्नती मिळालेल्या असतानाही पुन्हा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देवून वेतन निश्चिती करून त्यानुसार वेतन व भत्ते अदा केल्याने सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लाभ दिनांकापासून वेतन व भत्ते यांचे अतिप्रदान झाले आहे.

| अ.क्र. | कर्मचारी / अधिकारी नांव व पदनाम | सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिनांक | सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभापूर्वी मिळालेल्या पदोन्नती संख्या |
|---|---|---|---|
| 1. | श्री.जी.आर.गोडबोले सहायक आयुक्त (म ) | 09/01/2008 | 3 (तीन ) |
| 2. | श्री.ए.एस.विपत सहायक आयुक्त (वि.) | 12/03/2011 | 6 (सहा ) |
| 3. | श्री.पी.वाय.बिराजदार सहायक आयुक्त (म ) | 27/08/2008 | 5 (पाच ) |

तरी वरील अधिकाऱ्यांना झालेली अतिप्रदान रक्कम परीगणित करून वसूल करणे आवश्यक आहे.

2.वरील अधिकारी हे सध्या सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांना निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान ,अंशराशीकरण रक्कम यांचेही अतिप्रदान झाले असल्याने ते परीगणित करून वसूल करणे आवश्यक आहे. तसेच निवृत्ती वेतन /कुटुंब निवृत्ती वेतन सुधारित करून त्याचे सुधारित आदेश काढणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 131, Hmm No : 101)

## *10 बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*राज्यशासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 96000.00/-

| |
|---|
| ***शासन मान्यतेशिवाय सदनिका बांधण्याच्या जागेत बदल करण्यात आलेला आहे. तसेच सदनिका बांधण्यासाठी टी पी.2 फा.प्लॉ.न.80 मड्डी बाजार या जागेवर स्थायी समिती ठराव क्र.1059/4.12.2010 नुसार गाळे बांधण्यासाठी मंजूर आरक्षणानुसार आरक्षण असतांना सदर जागेवरील आरक्षण रद्द न करता सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत.*** |

शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक सकानि.2007/प्र.क्र.176/2007/नवि.6 दिनांक 22 ऑक्टोबर 2008 नुसार राज्यातील महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरुपाचे काम विचारात घेवून ज्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्ष किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारास सेवेत असतांना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्याच्या पात्र वारसास मालकी तत्त्वावर मोफत सदनिका देणेबाबत शासन आदेश आहेत. त्याबाबत विभागाने उपलब्ध करुन नस्तीचे परीक्षणानुसार अर्धसमास पत्र क्रमांक 20 दिनांक 31.3.2015 बाबत दिनांक 17.4.2015 नुसार विभागाने दिलेला खुलासा तपासुन खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1. शासन निर्णय दिनांक 22.10.2008 मधील अ.क्र.6 नुसार मंजूर सोलापूर शहर विकास आराखडयात सफाई कामगारांच्या गृहनिर्माण/सेवानिवासस्थाने यांच्यासाठी आरक्षण आहे अशा भुखंडावर आणि मंजूर सोलापूर श्हर विकास आराखडयात कोणतेही आरक्षण नसलेल्या जागेवर सफाई कामगारांना मोफत द्यावयाच्या निवासस्थानांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. सदर आदेशाचे पालन न करता सदर कामाबाबत नगर रचना विभागाचे पत्र क्र. 1192/18.7.2009 नुसार सदर कामासाठी सोलापुर शहर सुधारित मंजूर विकास योजना आराखडा 1997 -2017 नुसार मनपा मालकीची उत्तर बझार येथील प्लॉट क्र. 3/19 ही जागा निश्चित करणेत आली आहे. सदर जागेवर बेघरांसाठी घरे बांधणेसाठी (Housing for dishoused) मनपाचे आरक्षण होते. व ते आरक्षण बदलुन घेण्यास विलंब झाल्यामुळे 2008-09 या वर्षात काम सुरु करण्यात आलेले नाही. याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार उत्तर बझार येथील प्लॉट क्र.3/19 वर बांधकाम करण्यात काही अडचणी निर्माण झाल्यामुळे पर्यायी जागा टीपी2 फा.प्लॉ.80 मड्डी वस्ती या मनपाच्या जागेत सदनिका बांधणेस दिनांक 31.12.2012 नुसार आयुक्तांनी मान्यता दिली असल्याबाबत खुलासा केलेला आहे. तसेच खुलाशासोबत जोडेलेल्या दस्तऐवजातील नगर सचिव, सोलापुर मनपा यांचे पत्रानुसार मड्डी वस्ती,तुळजापुर नाका या भागामध्ये डिपॉझीट कॉन्ट्रीब्युशन पध्दतीने मिनी गाळे बांधण्यासाठी स्थायी समिती ठराव क्रमांक 1059 दिनांक 4.12.2010 नुसार ठराव करण्यात आलेला आहे. त्यानुसार टी.पी.2 फा.प्लॉ.न.80 पैकी सदरची जागा सोलापुर म्युनिसिपाल्टी वॉटर सप्लाय वर्क्सकरीता उपलब्ध करुन त्यास मान्यता देणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम 37 नुसार आवश्यक ते फेरफार करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यावरुन सदर जागेवर गाळे बांधणेसाठी पुर्वी करण्यात आलेले आरक्षण रद्द् न करता सदर जागेवर सदनिका बांधणेबाबत ठराव करण्यात आलेला आहे.

2. 2008-09 या वर्षात सदर योजनेसाठी 2008 पर्यत सेवानिवृत्त झालेले 111 व 2008 ते 2013 पर्यत सेवानिवृत्त होणारे 68 असे एकूण 179 लाभार्थी निश्चीत करुन एका सदनिकेसाठी रु. 1,53,073/- किंमत

निश्चित करुन रु. 2,74,00,067/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. शासन निर्णय दिनांक 15.11.2008 मधील अ.क्र.4 नुसार मनपाचा 5 टक्के हिस्सा रक्कम रु. 13,70,003/- तरतूद करुन वजा जाता रक्कम रु. 2,60,30,064/- चा शासन हिस्सा मिळणेबाबत मनपा पत्र दिनांक 19.1.2009 ला जिल्हाधिकारी,सोलापुर यांना कळविण्यात आलेले आहे. 2009-10 वर्षात 71 लाभार्थ्यांसाठी प्रति सदनिका रक्कम रु. 2,02,293/- नुसार (2008-09 च्या डीएसआर प्रमाणे) एकूण रक्कम रु. 1,43,62,803/- चे अंदाजपत्रक तयार करुन मनपा हिस्सा रु. 14,36,280/- ची तरतूद करुन उर्वरित रक्कम रु. 129.26 लाख मिळणेबाबत शासनास प्रस्तावित केलेले आहे. 2012-13 या वर्षात 31.3.2010 पर्यंत सेवानिवृत्त झालेले 18 व 1.4.2010 ते 31.3.2015 पर्यंत सेवानिवृत्त होणारे 53 असे एकूण 71 लाभार्थ्यांसाठी प्रति सदनिका रक्कम रु. 263500/- प्रमाणे 1,87,08,500/- चे अंदाज केलेले आहे. त्यानुसार मनपा 10 टक्के हिस्सा रु. 18.70 लाख वगळता उर्वरित रक्कम रु. 168.37 लाख शासन अनुदानासाठी शासनांस प्रस्तावित केलेले आहे.

वरील प्रमाणे 2008-09 व 2009-10, 2012-13 या वर्षात लाभार्थी संख्या अनुक्रमे 179,71,71 विचारात घेवून प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. तसेच अनुदान प्राप्त् करुन घेणेबाबत वेळीच कार्यवाही न केल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकीय किंमतीत वाढ झालेली आहे. याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार शासन पत्र दिनांक 25.10.2011 नुसार देण्यात आलेल्या तांत्रिक प्रमाणानुसार कामाच्या अंदाजपत्रकात बदल करण्यात आल्याने कामाच्या किंमतीत प्रती सदनिका 72 टक्के वाढ झाली आहे. सदर खुलाशाबाबत जोडलेल्या शासन नगर विकास विभाग पत्र क्रमांक सकानि.2007 / प्र.क्र.120 / 11 / नवि.6 दिनांक 25.10.2011 नुसार सदर कामांबाबत सन 2010-11 मध्ये शासनाने अनुदान उपलब्ध करुन न दिल्यामुळे पत्रासोबत जोडलेल्या तांत्रिक प्रमाणानुसार प्रस्तावाची फेरखात्री करुन जागा मनपाच्या मालकीबाबतचा पुरावा, जागेवर रहीवाशी वापर अनुज्ञेय असल्याबाबत ADTP/TP यांचे प्रमाणपत्र, जागेचा नकाशा,पात्र लाभार्थ्यांनी यापुर्वी शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबत सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र या कागदपत्रांसह प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार शासनांस सादर केलेल्या प्रस्तावाबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत. तसेच सदर प्रस्तावात उत्तर बझार येथे सदनिका बांधणेबाबत शासनांस प्रस्तावित केले आहे. तसेच शासनाने मान्यता दिल्यानंतर सदर जागेवर सदनिका बांधणेस अडचणी निर्माण झाल्याने टी.पी.2 फा.प्लॉ.क्र.80 मड्डी वस्ती येथे बांधकाम करणेस दिनांक 31.12.2012 नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. सदर सदनिका बांधण्याच्या जागा उत्तर बझार येथे असतांना शासनाची मान्यते शिवाय जागेत बदल करुन झाल्याने टी.पी.2 फा.प्लॉ.क्र.80 मड्डी वस्ती येथे सदनिका बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर जागेतील बदल व लाभार्थी संख्या बदलाबाबत कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही.

3. नस्तीतील टिप्पनी पृ/8 नुसार सदर कामासाठी 2009-10 वर्षासाठी बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेतंर्गत घरकुल बांधण्यासाठी रु. 1.60 लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. कामाच्या पुर्वगणनापत्रक क्र.5 नुसार शासन हिस्सा रु. 129.26 लाख मिळणेबाबत जिल्हाधिकारी,जिल्हा नियोजन समिती,सोलापुर यांना दिनांक 29.10.2010 नुसार प्रस्ताव पाठविण्यात आल्याबाबत नमुद आहे. तसेच दिनांक 29.10.2010 नुसार सदर कामाचा प्रकल्प प्रस्ताव (DPR) शासनांस मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. यावरुन सादर कामाच्या प्रकल्प प्रस्तावास शासन मान्यता नसतांना 2009-10 या वित्तीय वर्षात बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य या लेखाशिर्षात रु. 1.60 लाखाची अनावश्यक तरतूद करण्यात आलेली आहे.सदर मुद्दयाबाबत केलेल्या खुलाशानुसार 2009-10च्या अंदाजपत्रकात रु.1.60 लाख तरतुद केली असल्याची बाब मान्य केली असून सदर तरतुद 2009-10 या वित्तीय वर्षात इतर लोकपयोगी योजनासाठी

खर्च न करता विनावापर पडुन राहीली आहे..
4.शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. संकीर्ण.2012/प्र.क्र.31/नवि.06 दिनांक 31 मार्च 2012 नुसार 25 वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झालेले सफाईगार तसेच सेवेत असतांना मयत झालेल्या सफाई कामगारांच्या वारसांना 269 चौ.फुटाची सदनिका मालकी तत्त्वावर देणेसाठी शासनांस सादर केलेल्या प्रस्तावानुसार 71 सदनिका बांधण्यासाठी शासनाचा 90 टक्के हिस्सा रु. 1,68,37,350/- मनपास वितरीत करण्यात आलेला आहे. सदर निधीतून 2012-13 या वित्तीय वर्षात रक्कम रु. 96000/- खर्च करण्यात आलेला असून त्याबाबतचे मुळ प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत मौखिकरित्या मागणी करुन देखील उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.खुलाशानुसार रु.96000/- चे प्रमाणक जोडल्याबाबत खुलासा केलेला असुन असे कोणतेही प्रमाणक खुलाशासोबत उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे रक्कम रु. 96000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. तसेच उर्वरित रक्कम रु. 1,67,41,350/-दिर्घकालावधी पासुन विनावापर मनपाच्या खात्यावर पडुन आहे.

वरील प्रमाणे मुद्दयांबाबत अनुपालन होईपर्यंत रक्कम रु. 96000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

TDCNSDM6601 (Ref No : 1, Hmm No : 20)

## *11 शहरी गरीबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घटकाखाली केलेला रुपये 838000 खर्चाचे आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*केंद्रशासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 838000.00/-

***शहरी गरीबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घटकांतर्गत झालेल्या रुपये 838000/- खर्चाचे लेखापरीक्षणासाठी आवश्यक अभिलेख उपलब्ध न झाल्याने सदरहु खर्चाबाबत लेखापरीक्षणात भाष्य करता आलेले नाही.***

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत शहरी गरीबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी दारिद्रय रेषेखालील सहा कुटुंबापैकी एक लाभार्थी प्रशिक्षणासाठी उपलब्ध होईल असे गृहित धरुन सोलापूर महानगरपालिकेस 6675 इतके भौतिक उद्दिष्ट नगर परिषद प्रशासन संचालनालय यां चे पत्र् क्र.सुजयो/उददीष्ट धोरण/2011/का-16, दिनांक 29-08-2011 अन्वये देण्यात आले होते.

महानगरपालिकेला सदर घटकाखाली वित्तीय वर्ष 2012-2013 मध्ये रु.6657000/- इतका निधी प्राप्त झाला असून त्यामधून रु.8,38,000/- इतका खर्च झाला आहे. कैंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार या घटकातून

द्यावयाच्या प्रशिक्षणासाठी राज्य स्तरावर संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई या लिड एजन्सीची निवड करण्यात आली आहे.

महानगरपालिकेस जिल्हा स्तरावर निवड होणा-या नोडल एजन्सीकरीता प्रति प्रशिक्षणार्थी रु.2800/- प्रमाणे निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. प्रशिक्षण घटकाची प्रभावी अंमलबजावणी होणेकरीता नोडल एजन्सीची जिल्हा प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत नियुक्ती करण्यात आली किंवा कसे याबाबत अभिलेख सादर न केल्याने खात्री करता आली नाही.

सदर घटकासाठी दिलेला निधी नगर विकास शासन निर्णय क्रमांक सुजयो-2010/प्रक्र.02/नवि-16, दिनांक 25/01/2010 व संचालनालयाकडून निर्गमित केलेल्या सुचनांप्रमाणे खर्च करावयाचा आहे. परंतु अर्धसमासाव्दारे मागणी करुनही प्रस्तुत सुचनांचे पत्र् लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

वित्तीय वर्षात किती लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले त्यासाठी नोडल एजन्सीला किती मानधन दिले याबाबतच्या खर्चाच्या तपासणीसाठी अर्धसमास ज्ञापन क्र.118 दिनांक 28.07.2015 अन्वये अभिलेख मागविला होता. दिनांक 19/08/2015 रोजी याबाबत सादर केलेल्या उत्तरामध्ये लेखापरीक्षणासाठी मागणी केलेले दप्तर ज्या व्यक्तीच्या ताब्यात होते त्यांचे कपाटास सील असुन सदर व्यक्ती निलंबीत असुन त्यांचेवर गुन्हा दाखल केल्याने बाब न्यायप्रविष्ठ असल्याचे कळविण्यांत आले आहे.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम-4 अन्वये लेखापरीक्षेसाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असून ती पार पाडलेली नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-1949 चे अनुसूचि “ड” प्रकरण 3 मधील नियम 6(1)(2) अन्वये लेखापरीक्षणास सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झालेले नाही.

रक्कम रु.8,38,000/- खर्च अनुषंगाने आवश्यक अभिलेख संबंधित विभागाने उपलब्ध केले नसल्याने सदर रक्कम रु.8,38,000/-आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATRKJM5901 (Ref No : 51, Hmm No : 118)

## *12 सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनांतर्गत सामाजिक संरचनेमध्ये समाजविकास संस्थाना केंद्र शासनाने दिलेल्या अनुदानातुन केलेल्या रुपये 930225/- खर्चापृष्ठयर्थचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेबाबत*

**सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

Solapur (M Corp.)

आक्षेपाधीन रक्कम रु. 930225.00/-

***सामजिक संरचना या घटकामध्ये समाज विकास संस्थेस पहिल्या वर्षी दिलेले अनुदान तसेच जुन्या संस्थांना (पुढील वर्षात) दिलेल्या अनुदानाचा विनियोग समूह संघटकांनी कशा पध्दतीने केलेला आहे. याबाबतच्या खर्चापृष्ठयर्थचे अभिलेख लेखापरिक्षणासाठी मागणी करुनही उपलब्ध न झाल्याने रकमेचा विनियोग शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणेच झाल्याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.***

नगर परिषद प्रशासन संचालनालय यांचे परिपत्रक क्रमांक सुजयो-102003/प्र.क्र.83/03/13, दिनांक 10/01/2013 प्रमाणे दारिद्रय रेषेखालील जास्तीत जास्त दोन हजार कुटुंबाची मिळून एका वस्तीमध्ये समाजविकास संस्था बनविण्यात येते. या संस्थेचे नियंत्रण वस्तीतील लाभार्थीच करतात. या संस्थांची धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी करावी लागते. संस्थेतर्फे लाभार्थी निवडून त्यांचे अर्ज भरुन घेतले जातात. लाभार्थींना योजनेअंतर्गत मिळालेल्या कर्जाच्या परतफेडीवर नियंत्रण ठेवले जाते. समाजविकास संस्थेमार्फत योजनेतील विविध घटकांची माहिती वस्तीतील सर्व लाभार्थ्यांना देण्यात येते. तसेच इतर शासकिय योजनांची माहितीसुध्दा करुन दिली जाते. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांसाठी व्यक्तीगत आरोग्य, शिक्षण, सामाजिक न्याय, कायदेविषयक माहिती,प्रौढ साक्षरता, रोजगार निगडीत प्रबोधन कार्यक्रम घेता येतात. महिलांसाठी विविध सामाजिक कार्यक्रम राबविता येतात. वस्तीतील स्थानिक साधने आणि गरजा यांचा तपशील नोंदवून त्यांची शहरी रोजगार कार्यक्रमाशी सांगड घातली जाते.

सामाजिक संरचना (शहरी समाज विकास नेटवर्क/UCDN) घटकासाठी वित्तीय वर्ष 2012-2013 मध्ये रु 22,03,000/- इतकानिधी शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यापैकी रु 9,30,225/- इतका निधी तीन जुन्या व सहा नविन संस्थांना उपलब्ध करुन दिलेला आहे.

वित्तीय वर्षात 6 नवीन संस्थांची स्थापना करण्यात आली असून समाज विकास संस्थांचे पंजीकरणासाठी रु 2,000/- तसेच समाज उपयोगी उपक्रमासाठी रु 1,500/- त्यांना देण्यात आले आहेत.

स्थापनेचे पहिले वर्ष असल्याने प्रतिसदस्य रु 100/- प्रमाणे रक्कम रु 4,86,600/- तसेच त्यापुर्वीच्या जुन्या तीन संस्थांना प्रतिसदस्य रु 75/- प्रमाणे रक्कम रु 4,43,625/- ( एकूण रु 9,30,225/-) निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. संस्थानिहाय व बाबनिहाय वितरीत रकमेचा तपशील खालील प्रमाणे

| अ.क्र. | समाजविकास संस्थेचे नांवच् | सदस्य संख्या | अनुज्ञेय निधी रुपये (प्रत्येकी) | वितरीत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1) जुन्या संस्था | | | |
| 1 | समाजविकास संस्था, शास्त्री नगर | 2615 | 75/- | 196125/- |
| 2 | राणी लक्ष्मीबाई सामा. विकास संस्था, विजापुर रोड | 1800 | 75/- | 135000/- |
| 3 | समाजविकास संस्था, कुमठे. | 1500 | 75/- | 112500/- |
| | एकुण ( अ ) | | | **443625/-** |
| | ब) नविन संस्था | | | |
| 1 | सुप्रिया महिला शेजार समूह समिती, भगवान नगर. | 245 | 100/- | 24500/- |
| 2 | बनशंकरी महिला शेजार समूह समिती, कलावती -नगर. | 900 | 100/- | 90000/- |
| 3 | अहिल्या-देवी महिला शेजार समूह समिती, साठेशिंदेवस्ती | 364 | 100/- | 36400/- |
| 4 | बाळेश्वर महिला शेजार समूह समिती, बाळे | 860 | 100/- | 86000/- |
| 5 | समाजविकास संस्था, निराळे वस्ती | 1765 | 100/- | 176500/- |
| 6 | श्रमिक महिला शेजार | 732 | 100/- | 73200/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | समूह समिती, संगमेश्वर | | | |
| | एकुण ( ब ) | | | **486600/-** |
| | एकुण (अ + ब ) | | | **930225/-** |

जुन्या समाज विकास संस्थेने सदस्यांच्या प्रमाणात (प्रति सदस्य रक्कम रु 75/-) अतिरिक्त निधीची ठरावाद्वारे मागणी करणे आवश्यक असून प्रस्तुत ठरावात हा निधी कोणत्या कामासाठी खर्च करावयाचा आहे याचा ढोबळ मानाने प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. समाज विकास संस्थेच्या प्रस्तावाची छाननी व आधीच्या खर्चाची पडताळणी करुन त्यानंतरच अनुज्ञेय निधी वितरीत करणे अर्थात समाज विकास संस्थेच्या बँकेमधील खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे.

वित्तीय वर्षातील जमा व खर्चाची पडताळणी करण्यासाठी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 117 दिनांक 28/7/2015 अन्वये निधी उपलब्धतेबाबत शासनाचा पत्रव्यवहार व खर्चानुषंगाने अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव, त्याबाबतचा ठराव यासारखा अभिलेख मागविलेला होता. परंतु विहीत वेळेत अभिलेख सादर केलेला नाही.

मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 4 अन्वये लेखापरिक्षेसाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असून ती पार पाडलेली नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - 1949 चे अनूसूचि 'ड' प्रकरण 3 मधील नियम 6 ( 1) ( 2) अन्वये लेखापरिक्षणास सर्व कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झालेले नाही.

रक्कम रु **22,03,000/-** जमा पृष्ठयर्थचा निधी उपलब्ध करुन दिलेबाबतचा शासनस्तरावरील पत्रव्यवहार तसेच रक्कम रु 9,30,225/- च्या वितरण अनुषंगाने समाज विकास संस्थांची बँक पासबुक व विनियोग/खर्चानुषंगाने आवश्यक अभिलेख व अपेक्षित खर्चासाठी तयार केलेला प्रस्ताव तसेच त्याबाबत केलेला ठराव व अनुषंगिक कागदपत्रांची मागणी करुनही संबंधित विभागाने उपलब्ध केली नसल्याने जमा व खर्चाचे लेखापरिक्षण करता आले नाही. त्यामुळे वित्तीय वर्षात मनपा स्तरावर झालेल्या खर्चाची रक्कम रु 9,30,225/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATRKJM5901 (Ref No : 55, Hmm No : 117)

## *13 महानगरपालिकेकडील स्थानिक संस्था कर प्रणाली अंतर्गत आढळून आलेल्या त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 47224601.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 47224601.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 29 (2) अन्वये वार्षिक उलाढालीचे विवरणपत्रे विहीत मुदतीत 15 एप्रिल पर्यंत सादर केली नाहीत. अशा प्रकरणी स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 48(6) अन्वये संबंधित व्यापाऱ्यांकडून रक्कम रु.5000/- शास्तीपोटी वसूल केलेली नाही. स्थानिक संस्था कराची रक्कम विहीत मुदतीत भरणा न केल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 48(3) नुसार प्रतीमहा 2 टक्के रक्कम वसूल केलेले नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 33 अन्वये स्थानिक संस्था कराबाबतचे 2011-2012 पासून निर्धारण केलेले नाही.***

सोलापुर महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था नोंदणी कर अभियान अंतर्गत 13600 व्यापारी असून व्हॅटखाली नोंदणीकृत व्यापा-यांची संख्या 7752 आहे. असे एकूण 21352 व्यापारी कार्यरत आहेत. त्यापैकी स्थानिक संस्था कर प्रणाली अंतर्गत नोंदणीकृत व्यापा-यांची संख्या 18894 अशी आहे. सन 2012-13 साठी स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्कापोटी अपेक्षित जमा रु.160 कोटी आहे व प्रत्यक्ष जमा रक्कम रु.102.77 कोटी इतकी आहे. स्थानिक संस्था कर विभागाचे लेखापरिक्षणात पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.141, दिनांक 31.07.2015 निर्गमित करण्यात आले असता विभागाकडून अनुपालन अप्राप्त आहे.

1. उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे 2012-13 आर्थिक वर्षाची स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्कापोटी अपेक्षित जमा रु.160 कोटी असताना प्रत्यक्ष जमा मात्र रक्कम रु.102.77कोटी इतकी आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 33 अन्वये निर्धारण न झाल्यामुळे अपेक्षित जमेपेक्षा प्रत्यक्ष जमा रक्कम रु.58.23 कोटीने कमी आहे. याबाबतची साधार स्पष्टता लेखापरिक्षणास झाली नाही.

2. मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 29(2) अन्वये प्रत्येक नोंदणीकृत व्यापा-यांने नमुना “ड-एक” अथवा “ड-दोन” मधील विवरणपत्र ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या अखेरीपासून पंधरा दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक आहे. मात्र बहुतांशी व्यापा-यांनी सदरची विवरणपत्रे विहित मुदतीत सादर केलेली नाहीत. याबाबतची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्रं. | व्यापा-याचे नांव | नोंदणी क्रमांक | वार्षिक विवरण पत्राचा कालावधी | वार्षिक विवरण सादर केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | साई टेलिकॉम | 1/1774 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 29.12.2013 |
| 2 | लिबर्टी शर्टिंग | 2/0154 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 24.12.2013 |
| 3 | महाराजा पेपर्स | 1/1255 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 28.11.2013 |
| 4 | वैशाली वाईन मार्ट | 1/0706 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 29.05.2014 |
| 5 | श्री साईनाथ ऑईल अँड केरोसीन डिलर्स | 1/0822 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 23.10.2012 |
| 6 | कायझन मोटर्स | 1/0478 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 09.09.2012 |
| 7 | हॉटेल पिनॅक | 1/0729 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 20.11.2014 |
| 8 | आनंद हॉटेल | 1/3223 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 25.11.2013 |
| 9 | आनंद बियर शॉपी | 1/7418 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 05.11.2014 |
| 10 | ओझस बियर शॉपी | 2/0214 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 28.10.2013 |
| 11 | रोहीत रजनीकांत आरकाल | 1/7191 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 06.05.2014 |
| 12 | हुमा गॅलरी | 1/2522 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 10.09.2012 |
| 13 | निता एजन्सीज | 1/3346 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 17.12.2012 |
| 14 | युनायटेड जनरल एजन्सी | 1/3402 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 30.06.2015 |
| 15 | अव्हेन्यु सुपर मार्केट | 1/7726 | 1.4.2011 ते 31.3.2012 | 01.08.2012 |

विहित नमुन्यातील विवरणपत्रे, विहित मुदतीत सादर केलेल्या व्यापा-यांची संख्या व स्थानिक संस्था करापोटी भरणा केलेली रक्कम याबाबतचा तपशिल उपलब्ध करणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.91, दिनांक 17.07.2015 अन्वये कळविण्यात आले असता, विभागाने जावक क्र.342, दिनांक 29.07.2015 अन्वये सादर केलेल्या अनुपालनाप्रमाणे नोंदणीकृत व्यापारी व वर्षनिहाय विवरणपत्र सादर केलेले व्यापारी यांच्या नोंदी संगणकात घेण्याचे काम अदयापी पूर्ण झाले नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे याबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.ज्या व्यापा-यांनी वार्षिक उलाढालीबाबतचे विवरणपत्र सादर केले नाही अशा व्यापा-यांकडून स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 48(6) अन्वये रक्कम रु. 5000/- प्रमाणे शास्तीपोटीची रक्कम वसुलात आणुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

3. मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 40(2) अन्वये ज्या नोंदणीकृत व्यापा-यास नियम 29 च्या पोटनियम (2) च्या खंड (ख) नुसार वर्षाच्या पहिल्या सहामाहीसाठी नमुना “ड-एक” मध्ये सहामाही विवरणपत्र व “ड-दोन” मध्ये वार्षिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे, अशा व्यापा-यांनी संबंधित वर्षातील प्रत्येक महिन्याची स्थानिक संस्था कराची रक्कम पुढील महिन्याच्या 10 तारखेला किंवा त्यापूर्वी भरणे आवश्यक आहे. विलंबाने स्थानिक संस्था कराचा भरणा केलेल्या व्यापा-यांची संख्या व रक्कम याबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. विभागाने सादर केलेल्या अनुपालनाप्रमाणे नियम 40(2) अन्वये स्थानिक संस्था कर विहीत मुदतीत न भरणा-या व्यापा-यांचे निर्धारण करताना, त्या-त्या वर्षातील जमा रक्कमेच्या नोंदीनुसार प्रदेय व्याज आकारणी

करुन ती वसूल केली जाईल असे कळविले आहे. विलंबाने भरणा केलेल्या व्यापा-यावर नियम 48(3) नुसार प्रती महा 2 टक्क्याप्रमाणे व्याजाची आकारणी करुन रक्कम वसुलात आणावी.

4. मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 33 अन्वये स्थानिक संस्था कराची रक्कम देण्यास पात्र असलेल्या नोंदणीकृत व्यापा-याकडून देय असलेल्या रकमेचे प्रत्येक कालावधीसाठी वेगवेगळे निर्धारण करणे आवश्यक आहे. मात्र महापालिकेकडून अशाप्रकारे अदयापी निर्धारण करण्यात आलेले नाही. सदरची बाब गंभीर असून महानगरपालिकेच्या आर्थिक हितावर परीणाम करणारी आहे. नियमानुसार निर्धारण न होण्याबाबतची साधार स्पष्टता झाली नाही. त्यामुळे 2012-2013 या आर्थिक वर्षातील स्थानिक संस्था कर कार्यालयाच्या आस्थापनेवर झालेला खर्च रक्कम रु.47224601/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPGDM5901 (Ref No : 9, Hmm No : 141)

## *14 अनोंदणीकृत व्यापा-याकडून स्थानिक संस्था कराची वसूली न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 48 (2) (क) अन्वये अनोंदणीकृत व्यापा- याकडून स्थानिक संस्था कराची वसूली केली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 48(2)(क) अन्वये नोंदणीकरीता अर्ज करण्यात कसूर केली असून या अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करुन व्यवसायाची नोंदणी न करताच व्यवसाय चालवित असेल तर अशा व्यापा-यावर शास्ती व व्याजाची आकारणी करणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.91, दिनांक 17.07.2015 निर्गमित केले असता महापालिकेने सादर केलेल्या अनुपालनाप्रमाणे महापालिका क्षेत्रात एकूण 21352 व्यापारी असून त्यापैकी नोंदणीकृत व्यापा-यांची संख्या 18894 आहे. याचाच अर्थ 2458 व्यापारी नोंदणी न करताच व्यापार करीत आहेत. मात्र उपरोक्त नियमान्वये सदर प्रकरणी महापालिकेने अदयापही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अनुपालनावरुन स्पष्ट होते. याबाबतचे उदाहरण पुढीलप्रमाणे आहे.

व्यापा-याचे नांव :- भिमा रिध्दी डिजीटल सर्व्हिसेस.

नोंदणी क्रंमाक :- 2/1289

व्यावसायाचे स्वरुप :- केबल नेटवर्क,सेट टॉप बॉक्स् विक्री.

याबाबतची नस्ती तपासता, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अंतर्गत सदर व्यापा-यांने दिनांक 16.01.2007 रोजी नोंदणी केली असून नमुना “ड” मधील अनुज्ञाप्तीप्रमाणे सदरचा व्यवसाय दिनांक 01.01.2007 पासून सुरु करण्यात आला आहे. सदर व्यापा-यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 9(4) अन्वये दिनांक 13.08.2013 रोजी नोंदणी केले आहे. मात्र वार्षिक उलाढालीबाबतचे विवरणपत्र सन 2012-2013 पासूनचे सादर केले आहे. स्थानिक संस्था कर प्रणाली दिनांक 01.04.2011 पासून लागू असून व्यवसाय दिनांक 01.01.2007 पासून सुरु करण्यात आला असल्यामुळे 2011-2012 या आर्थिक वर्षासाठी सदर व्यापा-यावर स्थानिक संस्था कराची आकारणी करणे आवश्यक होते. महानगरपालिकेकडून अशी आकारणी न केल्यामुळे नियम 48(2)(क) अन्वये कार्यवाही करावी. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.141, दिनांक 31.07.2015 निर्गमित केला असून अनुपालन अप्राप्त आहे.

महानगरपालिकेने संपूर्ण शहराचे सर्वेक्षण करुन अनोंदणीकृत व्यापा-याची शोध मोहिम घेऊन नियमानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DATPGDM5901 (Ref No : 10, Hmm No : 141)

## *15 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मल:निस्सारण व्यवस्था सुधारणे कामाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : म.सुवर्ण जयंती नगरोत शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 81380248.00/-

***महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मल: निस्सारण व्यवस्था सुधारणे कामाचे अंदाजपत्रके, निविदा नस्ती व मोजमाप पुस्तके इ. रु.8,13,80,248/- खर्चाची अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.***

सोलापूर महानगरपालिके अंतर्गत असणारे मल:नित्सारण विभागाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मल:निस्सारण व्यवस्था सुधारणे कामाचे पत्रव्यवहार व मोजमापे लेखा परिक्षणास सादर करणेत आली. परंतु कामाचे अंदाजपत्रके व निविदा नस्ती लेखा परिक्षणास सादर केली नसल्याने मोजमाप पुस्तकामध्ये दर्शविणेत आलेले दराची तपासणी करता येत नाही. सदर कामाचे अंदाजपत्रके व निविदा

नस्ती त्वरित लेखा परिक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र. 41 दि.27/04/2015 अन्वये कळविले असता खात्याने याबाबत अनुपालन केलेले नाही. त्यामुळे 2012-13 मध्ये सदर कामावर खाली नमूद केलेनुसार रु.8,13,80,248/- खर्च करणेत आलेली रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम कलम 4.7 नुसार लेखापरीक्षणास मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध केली नाहीत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|
| 1. | 93/7.1.2013 | 2,62,34,671/- |
| 2. | 137/1.3.2013 | 2,14,22,151/- |
| 3. | 138/31.3.2013 | 3,37,23,426/- |
| | एकूण | 8,13,80,248/- |

DGPKVSM6101 (Ref No : 28, Hmm No : 41)

## *16 पोस्ट बेसिक शाळा नेहरुनगर येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 5**

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2808242.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 65912.00/-

***सदर कामाचा शासकिय विमा रु.32,956/- व कामगार कल्याण उपकर रु.32,956/- असे एकूण रु.65912/- वसुल करणेत आले नाही. कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी अनुक्रमे 5 टक्के व 100 टक्के मोजमापे तपासणी केली नाहीत. पाईपवरील एक्साईज डयुटी माफ करुन घेणेत आली नसल्याने रु.194543/- जादा खर्च करण्यात आला आहे. अंदाजपत्रकानुसार 1050 मी लांबीचे पाईप बसवून काम पूर्ण करणेचे असताना 783.50 मी. लांबीचे पाईप बसविणेत आले आहेत. 266.50 मी. लांबीचे पाईप न बसवता काम अंतिम करण्यात आली आहे.***

पोस्ट बेसिक शाळा नेहरुनगर येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1)लेखाशिर्ष - महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना.

2) अंदाजपत्रकिय किंमत - रु.29,57,500/-

3) प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील आदेश क्र.सावि/9/नपा/आरआर/4357 दि.01/12/2011.

4) तांत्रिक मान्यता - क्र.52 दि.30/08/2012.

5) वृत्तपत्राचे नांव - दै. सुराज्य दि.04/04/2012.

6) निविदा कालावधी - 04/04/2012 ते 16/04/2012.

7) निविदा किंमत - रु.27,34,628/-

8) कार्यारंभ आदेश - क्र.1062 दि.01/09/2012 (28 टक्के जादा)

9) ठेकेदाराचे नांव - मे.सेठ ॲण्ड सुरा इंजिनिअर्स् प्रा.लि. पुणे.

10) कामाचा कालावधी - 4 महिने (01/08/2012 ते 31/12/2012)

11) निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र. 108 दि.08/08/2012.

12) खर्च रु.28,08,242/- (प्रमाणक क्र. 97 दि.07/01/2013)

13) मोजमाप पुस्तक क्र.229 पान नं.68

सदर कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.56 दि.22/05/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.339 दि.12/06/2015 अन्वये सादर केलेले अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)विमा संचनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2दि.12/09/2005 अन्वये कामाचा विमा शासनाकडे उतरविणे आवश्यक आहे. ठेकेदाराने कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्यास कामाच्या किंमतीच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासन निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्याने कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी शासन विम्यापोटी कामाच्या किंमतीच्या 1 टक्के रक्कम रु.32,956/- इतकी संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

2) उद्योग उर्जा व कामगार विभग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्रक्र108/ कामगार 7 अ दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1 टक्के वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे किंमतीच्या 1 टक्का उपकर रु.32,956/- वसुल केला नसल्याने संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावा.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील नियमानुसार कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या किंमतीच्या 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी मोजमापे तपासल्याचे स्वाक्षरी करण्यात आली नाही.

4) केंद्र शासनाकडील नोटीफिकेशन क्र.6/2007-Central Excise दि.01/03/2007 नुसार 200 मि.मी. व्यासाचे पुढील पाईप पिण्याच्या पाण्यासाठी वापरल्यास त्या पाईपचे दरामध्ये एक्साईज डयुटी माफ करणेत आली आहे. असे असताना सदर कामासाठी खालीप्रमाणे नमूद केलेल्या पाईप पाईप वापरणेत आले असून त्याचे दर हे एक्साईज डयुटीसह देणेत आल्याने सदर कामावर रक्कम रु.1,94,543/- जादा खर्च करण्यात आला आहे.

| पाईपची साईज मि.मी. | रनिंग मीटर | With E.D. दर रु. | किंमत रु. | Without E.D. दर रु. | किंमत रु. | फरक रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 300 | 400 | 2719.50 | 1087800 | 2517.9 | 1007160 | 80640 |
| 250 | 450 | 2150.4 | 967680 | 1991.85 | 896333 | 74347 |
| एकूण | | | 2055480 | | 1903493 | 151987 |
| 28 टक्के जादा | | | | | | 42556 |
| एकूणात | | | | | | 194543 |

केंद्र शासनाकडील नोटीफिकेशननुसार एक्साईज ड्युटी माफ करुन घेवून तद्नंतर मक्तेदाराकडून मटेरियलसाठी ऑर्डर देवून जागेवर काम करणे करीता बराच कालवधी लागणार असल्याने मंजूर मक्तेदाराकडून 300 मि.मी.,250 मि.मी.असे सगळे पाईप एक्साईज डयुटी माफ न करता मागवून जागेवर काम पूर्ण करण्यात आलेले आहे असे खात्याने कळविले आहे. खात्याने केलेला खुलासा समर्पक नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

5) सदर काम 300mm व्यासाचे 400 मी., 250mm व्यासाचे 450 मी. व 100mm व्यासाचे 200 मी. असे एकूण 1050 मी. लांबीचे करण्याचे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात अनुक्रमे 309मी., 324.50मी.,150मी. असे एकूण 783.50 मी. लांबीचे पाईप बसविण्याचे काम करून काम अंतिम करण्यात आले आहे. म्हणजेच 266.50 मी.लांबीचे पाईप टाकण्याचे काम अपूर्ण ठेवून काम अंतिम करण्यात आल्याचे दिसून येत आहे. काम अपूर्ण असताना काम अंतिम करणेत आले आहे. 266.50 मी. लांबीचे पाईप बसविण्याचे काम करणे बाकी असल्याने सदर कामावर करण्यात आलेला खर्च रु.28,08,242/- इतकी रक्कम गुंतुन पडली आहे.

सदरचे काम मक्तेदारास 28 टक्के जादा दराने देणेत आले आहे. पाईपच्या लांबीमध्ये कमी करुन काम पूर्ण करण्यात आले आहे. नागरिकांना अत्यावश्यक सेवेशी निगडीत किमान गरजेपुरते

Solapur (M Corp.)

पिण्याकरीता पाणी मिळणेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलेले असून आता त्या ठिकाणी नागरिकांची पाण्याबाबत कोणतीच तक्रारी राहिलेल्या नाहीत. असे खात्याने कळविले आहे.

खात्याने मुळ अंदाजपत्रकानुसार काम न करता मक्तेदारास 28 टक्के जादा दराने निविदा मंजूर केली असल्याने अंदाजपत्रकिय रकमेच्या मर्यादित काम केले आहे. आवश्यकतेपेक्षा कमी काम करुन काम अंतिम करण्यात आले आहे. 266.50 मी. लांबीचे पाईप बसविले नसलेबाबत खुलासा करणेत आलेला नाही. त्यामुळे सदर कामावर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.28,08,242/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 31, Hmm No : 56)

## *17 उजणी/पाकणी पंपहाउस येथील देखभाल दुरुस्ती कामाचे मजुरीसह 3 वर्षासाठी चालविण्यास देणे कामामधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 9783186.00/-

***ठेकेदाराने स्वतः सेवकाची नेमणूक केलेली नाही. मार्च 2012 ते डिसेंबर 2012 या कालावधीचे हजेरी पत्रक सादर केले नाही. ठेकेदाराने सेवकाची नेमणूक न करता सेवक पुरवठाकामी पोटमक्ता नेमण्यात आला आहे. कुल मुखत्यारपत्र (Power of Attorny) मुदत दि.31/03/2012 रोजी संपली असून त्यापुढील मुदत घेणेत आली नाही.***

उजणी/पाकणी पंपहाउस येथील देखभाल दुरुस्ती कामाचे मजुरीसह 3 वर्षासाठी चालविण्यास देणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1. प्रशासकिय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्र.300 दि.24/11/2010.
2. अंदाजपत्रकिय रक्कम - रु.4,12,68,749/-
3. जाहिर निविदा प्रसिध्दी - दै.लोकमत,नागपूर व पुणे दि.30/12/2010.
   दै.सकाळ, सोलापूर दि. 30/12/2010.
4. प्राप्त निविदा संख्या - तीन.
5. पात्र निविदा संख्या - दोन.

6. निविदा कालावधी - 01/01/2011 ते 14/01/2011.
7. निविदा मंजूरी - स्थायी समिती ठराव क्र.1426 दि.28/02/2011.
8. ठेकेदाराचे नाव - व्ही.ए.टेक वेबॅग, अलवार पेट, चेन्नई. तर्फे सुरेंद्र ताकवले.
9. कार्यारंभ आदेश क्र. साआअ/पाकणी-05 दि.11/04/2011.
10. मोजमाप पुस्तक क्र. 42 पान क्र.39.

सदर कामाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 75 दि.09/07/2015 अन्वये खात्यास विचारणा करण्यात आली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.164 दि. 29/07/2015 अन्वये अनुपालन सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)करारनामामधील अट क्र.6 नुसार ठेकेदाराने 57 कुशल व अकुशल सेवकांची नेमणूक करण्याचे आहे. ठेकेदाराने त्यांचेकडील पत्र दि. 07/07/2011 नुसार करारानुसार 57 सेवकाची नेमणुक करुन त्याचे सविस्तर माहिती देणेत आली आहे. परंतु करारनाम्यातील अटीनुसार ठेकेदाराने स्वत: सेवकांची नेमणूक केलेबाबतचे कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाहीत. ठेकेदाराने सेवक नेमणूकीबाबत इतर संस्थेकडून सेवकांची नेमणूक केली आहे. सेवकांचे नेमणूक केलेले कागदपत्रे सोबत सादर केले आहे असे खात्याने कळविले आहे.

करारनाम्यातील अटीनुसार ठेकेदाराने स्वत: सेवकांची नेमणूक आवश्यक होते. तसे न करता ठेकेदाराने श्रावणी सर्व्हीसेस या कंपनीकडील सेवकांची नेमणूक केल्याचे पत्र देणेत आल्याने खात्याचा खुलासा मान्य करता येत नाही.

2) करारनामा अट क्र.9 नुसार पाकणी जलशुध्दीकरण केंद्रातून दररोज 80 एमएलडी शुध्द पाण्याचा पुरवठा करणेचा असून त्याचे बील हे त्या दिवशी प्रत्यक्षात होणारा शुध्द पाण्याचा पुरवठा व सेवक संख्या याची खात्री करुन टक्केवारीनुसार मनपा कडून देयक प्रदान करण्यात येईल अशी तरतूद आहे. माहे. मार्च 2013 मध्ये प्रदान केलेले देयक रु.97,83,186/- ची तपासणी केली असता माहे मार्च 2012 ते डिसेंबर 2012 या कालावधीमध्ये ठेकेदाराने किती सेवकाकरवी काम करुन घेणेत आले आहे त्यांचे हजेरीपत्रक लेखा परिक्षणास सादर केलेले नाही. तसेच ठेकेदाराने किती शुध्द जलपुरवठा केला याचा अहवाल लेखा परिक्षणास सादर केला नाही. त्यामुळे ठेकेदारास अदा करण्यात आलेली रक्कम रु.97,83,186/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

माहे.मार्च 2012 ते डिसेंबर 2012 या कालावधीमध्ये ठेकेदाराने किती सेवकाकरवी काम करुन घेणेत आले आहे त्यांचे हजेरीपत्रक लेखा परिक्षणास सादर करणेत येणार आहे असे खत्याने कळविले आहे. परंतु प्रत्यक्ष हजेरीपत्रक सादर केले नाही. त्यामुळे अनुपालन मान्य करता येत नाही.

3) करारनामा अट क्र.13 नुसार सदर कामाचा पोटमक्ता देण्याचा नाही अशी तरतूद आहे. ठेकेदाराने मजुरांचे ESI व EPF, व्यवसाय कर चलनाची तपासणी केली असता सदर चलनावर श्रावणी सर्व्हीसेस, लोणीकाळभोर असे मालकाचे नांव नमूद करण्यात आले आहे. यावरुन असे दिसून येते की,

ठेकेदाराने सेवकाची नेमणूक न करता सेवक पुरवठाकामी पोटमक्ता नेमण्यात आला आहे. त्यामुळे करारनामा मधील अट क्र.13 चे उल्लंघन झाले आहे.

सदरबाबतीत व्ही ए टेक वॅबॅग लि. यांना अटीप्रमाणे काम करणेबाबत पत्र दिलेले होते. परंतु म.न.पा.कडे सेवकवर्गाची कमतरता असल्याने मा.आयुक्त यांनी दि. 20/10/2011 रोजी मक्ता नियमाप्रमाणे कारवाई करुन बिल दि.5/11/11 पर्यंत सादर करणेस सांगितले. असे खात्याने कळविले आहे. खात्याने केलेला खुलासा समर्पक नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

4) सेवकांचे वेतन हे बॅंकेमार्फत करण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत. तरी ठेकेदाराने नेमण्यात आलेल्या सेवकांचे वेतन हे बॅंकेमार्फत केले जाते किंवा कसे याबाबत कागदपत्रे लेखा परिक्षणास सादर केली नाहीत. बॅंकेमार्फत सेवकांचे वेतन अदा केलेले कागदपत्रांची प्रत सादर केले आहे. असे खात्याने अनुपालन केले आहे. खात्याने सादर केलेली कागदपत्रे पहाता मुळ ठेकेदाराने नेमणूक केले नसल्याने त्यांनी पोटठेकेदाराची नेमणूक करुन त्यांचेमार्फत सेवकांचे वेतन अदा केलेले दिसून येत आहे. त्यामुळे अनुपालन मान्य करता येत नाही.

5) कुल मुखत्यारपत्र (Power of Attorny) मुदत दि.31/03/2012 रोजी संपली असून त्यापुढील मुदत घेणेत आली नाही. कुल मुखत्यारपत्राची मुदत 29/02/2016 पर्यंतचे पत्र सोबत सादर केले आहे असे खात्याने कळविले आहे. दि.01/04/2012 ते दि.23/02/2015 पर्यंत सदर कामाबाबत श्री.सुरेंद्र संभाजी ताकवले यांना अधिकार नसताना केलेले व्यवहार केले आहेत.

आक्षेपानंतर कुलमुखत्यार पत्र दि 24/02/2015 रोजी करार करण्यात आला आहे. आक्षेपानुसार दि 1/04/2012 नंतर कुलमुखत्यार पत्राची मुदत वाढवून घेतलेले नाही. त्यामुळे अनुपालन मान्य करता येत नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 75, Hmm No : 75)

## *18 अनुसूचित जाती / नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करतांना झालेली अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : अ.जाती/नवबौद्ध घटका शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***लाभार्थी सर्वेक्षणासाठी सेवाभावी संस्था म्हणून नोंदणी व सदर कामाचा नुभव आवश्यक असतांना सदर बाबीची***

Solapur (M Corp.)

***पूर्तता न करणाऱ्या बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन या संस्थेची निवड करण्यात आली.***

शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गातील लोकांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2008/प्र.क्र.36/मावक-2, दिनांक 15 नोव्हेंबर 2008 अन्वये घरकुल योजना जाहीर करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेत सदर योजनेची अंमबजावणी करतांना खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

1. शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/प्र.क्र-159/मावक-2, दिनांक 09 मार्च, 2010 अन्वये शासनाने योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मार्गदर्शक तत्वे निश्चित करून दिली आहेत. दिनांक 15/11/2008 मधील मुद्दा क्रमांक 7 मध्ये लाभार्थ्यांच्या निवडीची कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यानुसार सदर योजनेची स्थानिक वृत्तपत्रात व्यापक प्रसिद्धी देवून प्रसिद्धीनंतर शासन निर्णयातील परिशिष्ट-क मध्ये जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज मागवावेत. अर्ज स्वीकारतांना कार्यालयात नोंदवही ठेवून सदरचे अर्ज नोंदवहीत नोंदवून अर्जावर अनुक्रमांक नमूद करावेत. मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची छाननी करून निकष पूर्ण करणाऱ्या पात्र लाभार्थ्यांची यादी करावी. निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी मंजुरीसाठी शासनाकडे सादर करून शासनाची अंतिम मंजुरी मिळवावी असे निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतु अशा प्रकारची कार्यवाही न करता सोलापूर महानगरपालिकेने 31/05/2011 रोजी लोकमत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविणे संदर्भात सर्वेक्षण करून लाभार्थ्यांची निवड करणे करिता अशासकीय संस्थाकडून अर्ज मागविले आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.24 दि.31/03/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील दि.16/04/15 चे अनुपालनात आयुक्त यांचे मान्यतेने लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याचे काम निविदा मागवून देण्यात आले आहे. व शासन निर्णयातील परिच्छेद क्र.15 नुसार लाभार्थी निवडीचे संपूर्ण अधिकार घरकुल निर्माण समितीस आहेत. परंतु महानगरपालिकेने लाभार्थ्यांची निवड करतांना शासन निर्णय दिनांक 15/11/2008 मधील मुद्दा क्रमांक 7 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2. शासन निर्णय दिनांक 9 मार्च 2010 मधील मुद्दा क्र.11 नुसार निवड झालेल्या लाभार्थ्यांचे प्रकरण तयार करणे, जुन्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे, नवीन घराचा आराखडा तयार करणे इ.कामे सेवाभावी संस्थेकडून करून घेण्याबाबत निर्देश आहेत. परंतु शासन निर्णयातील तरतुदीनुसार लाभार्थ्यांचे विहित नमुन्यात अर्ज मागवून निवड करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असताना सदरचे कामासाठी दरपत्रके मागविली आहेत. याबाबत विभागाने त्यांचेकडील दि.16/04/15 चे पत्रान्वये पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने सदरचे काम खाजगी एजन्सीला दिले असल्याचे नमूद केले आहे. परंतु शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक असतांना मनपाने लाभार्थी निवडीची जबाबदारी निविदा मागवून खाजगी संस्थेवर सोपविलेली आहे. त्यामुळे शासन निर्णयातील तरतुदींचे पालन झाले नाही.

3. निविदेतील अटी व शर्ती नुसार निविदाधारक संस्था (NGO) नोंदणीकृत असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेल्या निविदामध्ये खालील संस्थांनी संस्था नोंदणीकृत

असल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे

| संस्थेचे नाव | नोंदणी प्रमाणपत्राचा तपशील |
|---|---|
| 1.नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण (रजि.) | सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र |
| 2.अक्षय मागासवर्गीय बहुउद्देशीय स्वयंरोज ार सेवा सहकारी संस्था | सहाय्यक संस्था निबंधक यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र |
| 3.समता शक्ती महिला प्रतिष्ठाण | सहाय्यक संस्था निबंधक यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र |
| 4.संस्कृती फाउंडेशन | सहाय्यक संस्था निबंधक यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कडील नोंदणी प्रमाणपत्र |
| 5.बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन | व्यापारी संस्था असल्याबाबत दि.30/12/10 चे निरीक्षक दुकाने अधिनियम 1948 नुसार दिलेला दाखला. |

वरील प्राप्त निविधारकापैकी बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन यांचेकडे संस्था (NGO) असल्याबाबत सहाय्यक संस्था निबंधक यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र नसतांना वरील कामासाठी त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आली. याबाबत विभागाने त्यांचेकडील दि.16/04/15 चे पत्रान्वये बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन या संस्थेची सिस्टर कन्सर्न संस्था बहुजन हितकारिणी संस्था असून या संस्थेची सेवाभावी संस्था म्हणून नोंदणी झाल्याचे नमूद केले आहे. परंतु शासन निर्णयातील अट क्र.11 नुसार लाभार्थी सर्वेक्षणाचे काम सेवाभावी संस्थेकडून करून घेणे आवश्यक होते. तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदाधारक संस्था (NGO) नोंदणीकृत असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक होते. बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन हि संस्था आवश्यक पात्रता पूर्ण करीत नसतांना दि.12/07/11 रोजी च्या मंजूर टिपणी व्दारे सदरचे काम देण्यात आले व त्यानंतर बहुजन हितकारिणी संस्थेकडून नाहरकत पत्र घेण्यात आले. त्यामुळे विभागाचे उत्तर मान्य करता येत नाही.

4.निविदा अट क्र.2 नुसार यापूर्वी निरनिराळ्या ठिकाणी अशा प्रकारची कामे व्यवस्थितरित्या केले असल्याबाबतच संबंधित विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याचा दाखला जोडणे आवश्यक होते. परंतु बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन यांनी अशा प्रकारची कामे केलेबाबतचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले नाही. याबाबत विभागाने त्यांचेकडील दि.16/04/15 चे पत्रान्वये बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन या संस्थेने दैनिक संचार व निवडणूक कामासाठी, टाटा मोटर्स कंपनीच्या वाहनांसाठी सर्वेक्षण केल्याचे कळविले आहे. तथापि, सदर संस्थेस सामाजिक, आर्थिक सर्वेक्षण, तसेच लाभार्थी निवडीसाठी सर्वेक्षण केल्याचा अनुभव नसतांना घरकुल योजने अंतर्गत सर्वेक्षण करण्याचे काम देण्यात आले.

5. बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन हे निविदा धारक निविदेतील अट क्रमांक 1 व 2 नुसार पात्र नसतांना वरील कामासाठी त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आली. त्यामुळे लाभार्थ्यांची झालेली निवड शासन निर्णयातील

निकषांप्रमाणे झाल्याची खात्री देता येत नाही. विभागाने त्यांचेकडील दि.16/04/15 चे पत्रान्वये बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन या संस्थेची निवड आयुक्त यांचे मान्यते नुसार करण्यात आली. तथापि, वरील मुद्दा क्रमांक 3 व 4 नुसार बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन हि संस्था धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत नसतांना व घरकुल योजनेच्या लाभार्थी सर्वेक्षणाचा अनुभव नसतांना सदरचे काम बँन्डविस्टा मास कम्युनिकेशन या संस्थेस देण्यात आले.

DATVCSM6501 (Ref No : 34, Hmm No : 24)

## *19 अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजने मध्ये झालेली अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष : अ.जाती/नवबौद्ध घटका शासन निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 32877.00/-

***लाभार्थ्यांची नावे जागा मालकी हक्काचा पुरावा नसतांना लाभ मंजूर करण्यात आला. निवड करण्यात आलेले लाभार्थी दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र उपलब्ध करून न घेताच योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला. लाभार्थी संरक्षित झोपडीदार असल्याबाबत पुरावा न घेताच लाभ देण्यात आला. बांधकामाच्या दर्जाबाबत समाजकल्याण कार्यालयाकडून तपासणी करून न घेता लाभ मंजूर करण्यात आले.प्रथम हप्त्याचे विनियोग प्रमाणपत्र न घेता पुढील हप्त्याची रक्कम देण्यात आली. बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेता अंतिम हप्त्याची रक्कम अदा केली. मनपा अधिकाऱ्याकडून बांधकामाची 100 टक्के पाहणी न करता आर्थिक लाभ मंजूर करण्यात आला.***

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2, दिनांक 9 मार्च 2010 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेची अंमबजावणी करण्याकरिता शासनाने मान्यता दिली आहे. सदर योजनेची सोलापूर शहरात अंमबजावणी करण्यासाठी विशेष समाज कल्याण अधिकारी सोलापूर यांचे पत्र क्र.विजीसकअ-सो-घरकुल/उद्दिष्ट्ये/11-12/2332 दिनांक 29/07/2011 नुसार 3690 घरकुलांचे उद्दिष्ट्ये देण्यात आली होती. अनुसूचित जाती नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजने अंतर्गत स्थापित केलेल्या महानगरपालिका क्षेत्र घरकुल निर्माण समितीच्या दिनांक 4/11/2011 च्या बैठकीच्या इतीवृत्तानुसार मे.बॅन्डव्हिस्टा मास कम्युनिकेशन

कनेक्टीव्हिटी सोलापूर या संस्थेने केलेल्या लाभार्थी सर्वेक्षण अहवालानुसार नगर अभियंता यांनी निवड समितीसमोर सादर केलेल्या 1131 दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी प्रस्तावास मंजुरी दिली आहे. त्यापैकी शासन निर्णय दिनांक 15/11/2008 मधील परि.6 व शासन निर्णय दिनांक 9/03/2010 मधील परि.9 मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राधान्य क्षेत्रातील एकूण 154 लाभार्थी आणि दारिद्र्य रेषेखालील एकूण 556 अश्या एकूण 710 लाभार्थ्यांना प्रत्येकी रु.2.00 लाख व शासन निर्णयामधील कलम 11 अन्वये घरकुल आराखडे तयार करण्याच्या प्रशासकीय कामाकरिता 5% प्रमाणे एकूण रु.1496 लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले होते.

या योजने अंतर्गत आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये एकूण 157 लाभार्थ्यांना आर्थिक लाभ दिला असून जानेवारी-13 ते मार्च-13 या कालावधीतील एकूण 62 लाभार्थ्यांची प्रकरणे तपासली असता, आढळून आलेल्या अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये दिलेल्या उत्तराचा विचार करून लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2, दिनांक 09 मार्च,2010 मधील परि.क्र.4 (ब) नुसार लाभार्थ्यांनी अर्जासोबत जागेचा मालकी हक्क असल्याबाबत 7/12 चा उतारा, मालमत्ता नोंद पत्र यापैकी कोणताही एक पुरावा सादर करणे आवश्यक असतांना सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-2 मधील** एकूण 62 लाभार्थ्यांपैकी कोणत्याही लाभार्थ्यांकडून जागेच्या मालकी हक्क बाबतचे पुरावे प्राप्त करून न घेताच लाभ देण्यात आला आहे. याबाबत दिनांक 18/08/2011 रोजी स.11.00 वा.आयुक्त सोलापूर, मनपा व अध्यक्ष घरकुल निर्माण समिती तथा सोलापूर सदस्य घरकुल निर्माण समिती व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी सोलापूर यांचे सयुंक्त बैठकीत ठरल्यानुसार शासन निर्णय दिनांक 9/03/2010 कलम 4 (ब) अनुसार पात्र लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. परंतु कोणत्याही लाभार्थ्यांकडून वरील कागदपत्रांची पूर्तता करून न घेताच लाभ दिलेला आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये शासनाच्या धोरणानुसार अनुसरून घरकुल निर्माण समितीने सदर लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ दिलेला आहे असे नमूद केले आहे. परंतु लाभार्थ्यांकडून जागेच्या मालकी हक्काची कोणतीही कागदपत्रे प्राप्त करून न घेताच लाभार्थ्यांना आर्थिक लाभ दिलेला आहे. विभागाने दिलेले अनुपालन संयुक्तिक नसून आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2. शासन निर्णय क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2, दिनांक 09 मार्च,2010 मधील परि.क्र.4 (ब)(2) नुसार लाभार्थ्यांकडून घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बिल या कागदपत्रांपैकी एक पुरावा घेणे आवश्यक असतांना लेखापरीक्षणा मध्ये पडताळणी केलेल्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट-2 मधील एकूण 62 प्रकरणांपैकी 09 प्रकरणामध्ये लाभार्थ्याकडून वरील पैकी एकाही कागदत्राची पूर्तता करून न घेता लाभ दिलेला आहे. तसेच परिशिष्टामधील अ.क्र.9,15,21,22,24,27,28,55,57,59 व 62 च्या लाभार्थ्यांचे अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे सदर लाभार्थ्यांचे नावाने नसून इतर व्यक्तींच्या नावे आहेत. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये वरील नमूद लाभार्थी हे एकत्र कुटुंब पद्धतीत राहत असल्याने त्यांनी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे ग्राहय धरून लाभ

दिलेला आहे. परंतु अ.क्र.9 मधील लाभार्थी नामदेव परशुराम रणदिवे यांनी परशराम वेताळ या नावाने घरपट्टी बिल जोडले आहे. अ.क्र.15 वरील लाभार्थी रवींद्र विठ्ठल गायगवळी या लाभार्थ्याने सीताबाई नामदेव गायगवळी या नावाने घरपट्टीचे बिल जोडले आहे. लाभार्थ्यांचे नावाने जागेचा पुरावा उपलब्ध नसतांना आर्थिक लाभ दिला आहे.

3. शासन निर्णय क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2, दिनांक 09 मार्च,2010 मधील परि.क्र.4 (ब)(3) अन्वये लाभार्थी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असल्याबाबत लाभार्थ्याकडून सक्षम प्राधीकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत घेणे आवश्यक असतांना परिशिष्ट-2 मधील अ.क्र.7 रजनीकांत रमेश ढावरे, अ.क्र.20 रंदा हरिश्चंद्र खरात, अ.क्र.39 शिताबाई खंडू गवळी या लाभार्थ्यांचे प्रकरणा सोबत जातीचे प्रमाणपत्राची प्रत आढळून आली नाही. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये अ.क्र.20 वरील नंदा हरिश्चंद्र खरात यांच्या पतीचे जात प्रमाणपत्र जोडले आहे तसेच अ.क्र.39 वरील सीताबाई खंडू गवळी या लाभार्थ्याच्या जातीचे प्रमाणपत्र जोडले आहे. परंतु अ.क्र.7 वरील रजनीकांत रमेश ढावरे यांचे जात प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे अ.क्र.20 व 39 वगळता उर्वरील अ.क्र.7 वरील लाभार्थ्याचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

4. शासन निर्णय क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2, दिनांक 09 मार्च,2010 मधील परि.क्र.4 (ब) (4) नुसार सदर योजनेच्या लाभास पात्र ठरविण्यासाठी लाभार्थ्याकडून सक्षम प्राधीकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला घेणे आवश्यक आहे. परंतु सोबतच्या परिशिष्ट-2 मधील अ. क्र. 5, 16, 18, 19 21, 25, 39, 40, 50, 52, 53, 58, 59 वगळता इतर कोणत्याही लाभार्थ्याकडून उत्पन्नाचा दाखला न घेताच पात्र ठरविण्यात आले. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये सदरचे लाभार्थी दारिद्र्य रेषेखाली येत असल्याने लाभ दिल्याचे कळविले आहे. परंतु त्याबाबत सक्षम अधिकाऱ्याकडील पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

5. सदर योजने अंतर्गत पात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थ्याकडून शासन निर्णयातील परि.क्र.10 नुसार घराच्या बांधकामाच्या खर्चामध्ये 10% लाभार्थी हिस्सा जमा करून घेण्याबाबत तरतूद आहे. परि.10(1) नुसार नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबाला लाभार्थी हिस्सा भरण्याची आवश्यकता नाही. परंतु सोबतच्या परिशिष्ट-2 मधील अ.क्र.3, 4, 7, 9, 11, 12, 13, 14 16, 18, 19, 21, 22, 24, 27, 29, 30, 32. 33, 34, 36, 37, 39, 40, 41, 44, 51, 53, 57, 61 अशा एकुण 30 लाभार्थ्याकडून पुरावे न घेताच लाभ दिलेला आहे, शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर लाभार्थ्याकडून 10% लाभार्थी हिस्सा वसूल केल्यानंतर लाभ देणे आवश्यक होते. परंतु 10 % लाभार्थी हिस्सा वसूल न करताच पूर्ण रक्कम लाभार्थ्याच्या खात्यात जमा केली आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये सदरचे लाभार्थी दारिद्र्य रेषेखाली येत असल्याने लाभार्थी हिस्सा भरण्याची आवश्यकता नाही असे नमूद केले आहे. परंतु त्याबाबत सक्षम अधिकाऱ्याकडील दारिद्‍य रेषेखाली येत असल्याचे प्रमाणपत्र जोडण्यात आले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

6.शासन निर्णयातील परि.4 अ(4) नुसार 1.1.1995 या दिनांकास वास्तव्यास असलेले व त्यांना संरक्षित

झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त झालेल्या झोपडपट्टी धारकांना या योजने अंतर्गत लाभ देण्याबाबत तरतूद आहे. परंतु सोबतच्या परिशिष्ट-2 मधील कोणत्याही लाभार्थ्यांकडून संरक्षित झोपडीदार असल्याचा पुरावा न घेताच आर्थिक लाभ दिला आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये मनपाकडून फक्त संरक्षण असलेल्या झोपडपट्ट्यामध्येच लाभार्थी सर्वेक्षणाचे काम करण्यात आलेले आहे, असे नमूद केले आहे. परंतु कोणत्याही लाभार्थ्यांचा संरक्षित झोपडीदार असल्याचा पुरावा जोडला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

7. शासन निर्णय दिनांक 9 मार्च 2010 मधील परि.7 नुसार शासन निर्णया सोबत जोडण्यात आलेल्या घराच्या आराखड्याप्रमाणे /नकाशाप्रमाणे बांधकाम करणे आवश्यक असतांना कोणत्याही लाभार्थ्याच्या घराचे बांधकाम नकाशा प्रमाणे झाल्याची खात्री करण्यात आलेली नाही, तसेच लाभार्थ्यास प्रथम लाभ मंजूर करण्यापूर्वी घराचा आराखडा/नकाशा तयार केलेला नाही. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये लाभार्थ्याच्या जागेच्या उपलब्धते नुसार जागेच्या आराखड्यात बदल करण्यात आलेला आहे असे नमूद केले आहे. परंतु कोणत्याही लाभार्थ्याच्या उपलब्ध जागेनुसार मंजूर केलेले बांधकामाचे आराखडे व नकाशे जोडले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

8.शासन निर्णयातील परि.24 नुसार लाभार्थ्याचे घराचे बांधकाम सुरु झाल्यानंतर बांधकाम व्यवस्थित सुरु आहे काय, लाभार्थ्याचे घराचे बांधकाम सुरु आहे याकडे लक्ष आहे काय, बांधकामाचा दर्जा चांगला आहे काय या बाबींची तपासणी करण्यासाठी संचालक, समाज कल्याण, पुणे यांनी जिल्हा निहाय पथक तयार करून एका जिल्ह्यातील पथकाकडून दुसऱ्या जिल्ह्यातील बांधकामाची पाहणी करावी व संचालक स्तरावर काही प्रकरणांची तपासणी करावी असे नमूद केले आहे, परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही, याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये बांधकामाचा दर्जा तपासण्यासाठी समाजकल्याण अधिकारी यांना कळविण्यात आले होते परंतु संबंधित कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही. शासन निर्णयातील परिच्छेद क्र.24 मधील अटींची पूर्तता न झाल्यामुळे विभागाकडील उत्तर मान्य करता येत नाही.

9.शासन निर्णयातील परि.19 नुसार गृहनिर्माण समिती, अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व लाभार्थ्याच्या नावाने सुरु करण्यात आलेल्या बँकेच्या खात्यात रक्कम जमा करावी, असे असतांना संयुक्त खात्यात रक्कम जमा न करता थेट लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे. घराचे बांधकाम सुरु करतांना 50 टक्के रक्कम जमा करणे आवश्यक असतांना बांधकाम सुरु असल्याची खात्री न करताच लाभार्थ्याचे नावे अनुदानाची 50% रक्कम जमा केली आहे.तसेच उर्वरील 40 टक्के रक्कमेचे प्रदान करण्यापूर्वी लाभार्थ्याकडून पूर्वी दिलेल्या 50% रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर 40 टक्के रक्कम अदा करणे आवश्यक असतांना कोणत्याही लाभार्थ्याकडून 50% टक्के रक्कम खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र न घेताच दुसरा लाभ दिलेला आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये शासन

निर्णय दि.14 मार्च 2011 च्या परिच्छेद क्र.5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानाच्या धनादेशावर विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या स्वाक्षरीची आवश्यकता नाही, तथापि, शासन निर्णय दिनांक 9/03/2010 मधील तरतुदीनुसार गृहनिर्माण समिती, अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व लाभार्थ्याच्या नावाने सुरु करण्यात आलेल्या बँकेच्या खात्यात रक्कम जमा करण्याबाबत नमूद असतांना थेट लाभार्थ्याचे नावे धनादेशाव्दारे रक्कम अदा केली आहे.त्यामुळे शासन निर्णयातील तरतुदीचे उल्लंघन झाले आहे. तसेच प्रथम हप्त्याचे विनियोग प्रमाणपत्र प्राप्त करून न घेताच दुसऱ्या हप्त्याची 40 % रक्कम अदा केली आहे.

10. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए/2011/प्र.क्र.35/मावक-2, दिनांक 14/03/2011 नुसार लाभार्थ्यास शेवटचा धनादेश देण्यापूर्वी लाभार्थ्याच्या घराच्या बांधकामाचा पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतरच शेवटचा हप्ता देण्यात यावा, अशी तरतूद असताना सक्षम प्राधीकाऱ्याकडील पूर्णत्वाचा दाखला न घेताच शेवटचा हप्ता देण्यात आला आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये घरकुलाचे काम 100 % पूर्ण झाले असल्याने सहा,अभियंता व नगर अभियंता यांचे मान्यतेने लाभार्थ्यांना शेवटचा हप्ता देण्यात आला आहे. तथापि, शासन निर्णयातील परिच्छेद क्र.5 मध्ये नमूद केल्यानुसार शेवटचा धनादेश देण्यापूर्वी पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतरच शेवटचा हप्ता देण्यात यावा अशी तरतूद आहे. मनपाने उर्वरील 10% रक्कम अदा करण्यापूर्वी सदर पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करून न घेताच लाभार्थ्याचे नावे शेवटच्या हप्त्याची रक्कम जमा केली आहे.

11.कांचन मोहन मसलखांब वार्ड क्रमांक 85, ह्या कुटुंबप्रमुख असल्याबाबत रेशनकार्डात नाव समाविष्ट नाही,पाणीपट्टी कराचे बिल लाभार्थ्याचे नावे नाही, असे असतांना लाभ मंजूर करण्यात आला आहे तसेच बांधकाम अहवालावर लायसंसी अभियंता यांची स्वाक्षरी नसतांना त्यांचे नावे रु.180000 जमा केले आहेत. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये सदर योजने अंतर्गत लाभार्थी कांचन मोहन मसलखांब ह्या कुटुंब प्रमुख नाहीत परंतु कुटुंब प्रमुख मोहन कृष्णा मसलखांब हे व्यसनी असल्याने त्यांचे मुलीचे नावाने लाभ मंजूर करण्यात आला आहे. शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या व्यक्तीच्या नावे जागा मालकी हक्काचे पुरावे आहेत अशाच व्यक्तीची लाभार्थी म्हणून निवड करून लाभ मंजूर करणे आवश्यक आहे.

12. मनपाने सदर योजने अंतर्गत लायसन्स इंजिनियर/आर्किटेक्ट यांना सल्लागार फी प्रती लाभार्थी रु.2700 प्रमाणे तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे, लाभार्थ्यांनी केलेल्या बांधकामाची मोजमापे घेवून लायसन्स इंजिनियर यांनी स्वाक्षरी केली आहे, परंतु मनपाच्या कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्याने बांधकामाची पाहणी केल्याबाबत स्वाक्षरी नाही. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये सदर योजनेची व्याप्ती पाहता प्रत्येक घरकुलाची पाहणी करणे शक्य नसलेने मनपाच्या सक्षम अधिकाऱ्यामार्फत काही घरकुलांची प्रत्यक्ष तपासणी केली आहे. असे नमूद केले आहे. अनुपालनासोबत जोडलेल्या दि.4.6.12 च्या टिपणी वर उप अभियंता यांनी

एकूण 62 लाभार्थ्यांपैकी केवळ 10 लाभार्थ्यांचे तपासणी केल्याचा शेरा नमूद केला आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम केल्याची पाहणी न करताच प्रदान केले आहे.

13. सदर कामासाठी नेमणूक केलेल्या लायसन्स इंजिनियर/ आर्किटेक्ट यांना 2012-13 मध्ये खालीलप्रमाणे सल्लागार फी अदा केली आहे. आयकर अधिनियमातील कलम 194 जे नुसार त्यांना अदा केलेल्या रक्कमेतून 10% आयकर वसूल करणे आवश्यक असतांना 2% आयकर वसूल केला आहे.

| अ.क्र. | आर्किटेक्ट/इंजिनियर चे नाव | अदा केलेली सल्लागार फी | वसूल पात्र आयकर फरकाची रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | राजकिरण वडनाल | 226800 | 1814 |
| 2. | विशाल भट्टड | 65880 | 5270 |
| 3. | लक्ष्मीनारायण उयाला | 143370 | 1147 |
| 4 | अभिजित कुलकर्णी | 20250 | 1620 |
| 5 | रमेश कोमटी | 83700 | 6696 |
| | | | 32877 |

वरीलप्रमाणे कमी वसूल केलेली आयकराची रक्कम रु 32877 वसूल करून शासन जमा करावी.

याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.34 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये सल्लागार फी मधून 2 % आयकर कपात केला असून यापुढे आयकर अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल असे नमूद केले आहे. तरी कमी कपात केलेली आयकराची रक्कम रु.32877 वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.32877

DATVCSM6501 (Ref No : 35, Hmm No : 34)

## *20 गलिच्छ वस्ती सुधारणा योजना विभागाकडील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधारणा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***वित्तीय वर्ष 2012-13 या कालावधीमध्ये सेवा कर व इतर करांचे वसुली करीता वापरण्यात आलेल्या पावतीपुस्तक क्रमांक 35 ते 143 पैकी परिशिष्ठ क्र. मध्ये नमूद असलेली 55 पावतीपुस्तके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये वसुल करण्यात आलेल्या सेवा कर व इतर कर वसुलीचे***

***भागनिहाय वसुली कर्मचा-यांकडील दैनंदिन वसुली किर्द, विभागाकडे ठेवण्यात आलेली एकत्रीत वसुली किर्द भरणा चलन पुस्तके, बॅक स्टेटमेंन्ट इ.अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. सोलापूर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये श्री.कोरबू अकबर उमर यांचे अफरातफरीचे प्रकरण असून ते गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली) या विभागाचे असून त्यांची खातेनिहाय चौकशी चालू असल्याचे नमूद केले आहे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणासाठी मागणी करण्यात आलेले अभीलेखे, कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेची आहे परंतु गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली) या विभागाकडे लेखा परीक्षणास अभिलेखे प्रत्यक्ष मागणी करूनही उपलब्ध झाले नाही तसेच अर्धसमास पत्र क्र. 111 दि.24/07/2015 अन्वये मागणी करूनही वरील आवश्यक अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेकडील गलिच्छ वस्ती सुधारणा योजना विभागाचे वित्तीय वर्ष 2012-13 च्या लेखापरीक्षणासाठी खालील प्रमाणे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 111 दि.24/07/2015 अन्वये अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले होते परंतु सदर अर्धसमास पत्राचे अनुपालन सादर केले नाही व सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही .

अ) 2012-13 या कालावधीमध्ये सेवा कर व इतर कर यांची वसुली रु.1436821/- झाल्याचे मुख्य लेखापाल कार्यालयाकडील अभिलेख्यावरून आढळून आले.सदर सेवा कर व इतर कर यांची वसुली 2012-13 मध्ये वापरण्यात आलेल्या पावतीपुस्तक क्रमांक 35 ते 143 अशा एकूण 109 पुस्तकांपैकी 55 पावतीपुस्तके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

ब) वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये वसुल करण्यात आलेल्या सेवा कर व इतर कर वसुलीचे भागनिहाय वसुली कर्मचा-यांकडील दैनंदिन वसुली किर्द, विभागाकडे ठेवण्यात आलेली एकत्रीत वसुली किर्द भरणा चलन पुस्तके, बॅक स्टेटमेंन्ट इ.अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

क) गलिच्छ वस्ती सुधारणा योजना विभागाकडील 2012-13 या कालावधीचे सेवा कर व इतर करांची मागणी नोंदवही, वसुली नोंदवही, इ. लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

ड) 2012-13 या कालावधीमध्ये ज्या मिळकतीवर गलिच्छ वस्ती सुधारणा योजना अंतर्गत नव्याने आकारणी करण्यात आलेली प्रकरणे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

इ) अर्धसमास पत्र क्र.9 दि.26/02/2015 अन्वये महानगरपालिकेकडील 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये हानी, चोरी व नुकसान तसेच अफरातफरीची प्रकरणे इ.बाबत माहिती मागविण्यात आली होती त्यानुसार सहायक आयुक्त ( स ) सोलापूर महानगरपालिका यांचे कडील पत्र क्र.सआस/काअ/12 सामान्य प्रशासन विभाग सोलापूर दि.11/05/2015 अन्वये 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये सोलापूर महानगर पालिकेतील गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली )व्यतिरिक्त खर्च खाते / शाखा तसेच विभागीय कार्यालय क्र. 1 ते 8 कार्यालयाकडे हानी, चोरी व नुकसान तसेच अफरातफरीची कोणतीही प्रकरणे घडलेली नसून सदरच्या विभागाकडील माहिती निरंक

असल्याचे नमूद केले आहे
तसेच सदर पत्रान्वये सोलापूर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये श्री.कोरबू अकबर उमर यांचे अफरातफरीचे प्रकरण असून ते गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली ) या विभागाचे असून त्यांची खातेनिहाय चौकशी चालू असल्याचे नमूद केले आहे

परंतु गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली ) या विभागाकडे लेखा परीक्षणास अभिलेखे प्रत्यक्ष मागणी करूनही उपलब्ध झाले नाही तसेच अर्धसमास पत्र क्र. 111 दि.24/07/2015 अन्वये मागणी करूनही वरील आवश्यक अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1)महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधीनियम 2011 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणासाठी मागणी करण्यात आलेले अभीलेखे, कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेची असुन यामध्ये कसुर झाल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम 2011 मधील कलम 7 नुसार अभीलेखे, कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेची असुन यामध्ये कसुर झाल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम 2011 मधील कलम 8 अन्वये रु. 25000/- पर्यंतची दंडाची तरतुद आहे.

2) स्थानिक निधी लेखा विभागाच्या वित्तीय वर्ष 2011-12 लेखा परीक्षण अहवालामध्ये सदर रकमेबाबत सविस्तर आक्षेप नोंदविला आहे परंतु 2012-13 या वित्तीय वर्षाचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने अपहारित रकमेबाबत सविस्तर लेखा परीक्षण करता आले नाही त्यामुळे सदर विभागाचे जमा रक्कम लेखा परीक्षणास प्रमाणित करता येत नाही. अपहारित रक्कम किती होती ,ती संबंधित अथवा जबाबदार व्यक्तीकडून वसूल करण्यात आली किंवा कसे तसेच संबंधितावरील विभागीय चौकशी अहवाल . संबंधितावर काय कारवाई करण्यात आले याची माहिती लेखा परीक्षणास सादर करण्यात आली नाही

3) राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावली 2005 मधील परिछेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपद्धतीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिनाअखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या नोंदीबरोबर बँक पासबुक / विवरणपत्र नोंदीची तुलना करून महिनाअखेरीस शिलकेचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. परंतु ताळमेळ घेतलेला नाही त्यामुळे अपहार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATRNDM7201 (Ref No : 108, Hmm No : 111)

## *21 आरोग्य विभागाकडील रु. 2495532 ची औषध खरेदीची अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झाल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :आरोग्य    मनपा निधी*

*अनियमितता कलम   : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2495532.00/-

***आरोग्य विभागाकडील ओषध खरेदी व जंतुनाशक खरेदी रु. 2495532 ची अभिलेखे लेखापरीक्षणा उपलब्ध करून देण्याबाबत अर्ध समास पत्र क्रमांक 64 दि:25/06/15 अन्वये कळविले असता,लेखापरीक्षणा चे अंतिम दिनांकापर्यंत सदरची अभिलेखे उपलब्ध झाली नाहीत.***

लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेल्या आरोग्य विभागाच्या (औषधी भांडारचे ) बिल नोंदवही नुसार 2012-13 मध्ये खालील बाबीवर रु. 2495532 खर्च केलेला आहे. सदर खर्चाची प्रमाणके, नोंदवह्या, खरेदी नस्ती, निविदा प्रकरणे व अनुषंगिक अभिलेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत अर्ध समास पत्र क्रमांक 64 दि.25/06/15 अन्वये कळविले असता, आरोग्य विभागाने त्यांचेकडील पत्र क्रमांक 212, दि.14/08/2015 अन्वये खालील तक्त्यातील अ.क्र.1,2,3,7,9,10,13,15 ची अभिलेखे उपलब्ध असून अ.क्र 4, 5, 6,8,11,12,13,14,17,18 च्या खरेदी प्रकरणांच्या अभिलेख्याचा वाजवी शोध घेवून देखील अद्याप प्राप्त झाले नसल्याचे कळविले आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 कलम 4 अन्वये लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 3 मधील नियम 6 (1)(2) अन्वये लेखापरीक्षणासाठी सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करून देण्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झाले नाही.

| अ.क्र. | खर्चाची बाब | मक्तेदार/पुरवठादाराचे नांव | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| 1. | सफाई कर्मचाऱ्याना साबण देणे | समर्थ इंटरप्राईजेस | 74368 |
| 2. | डी.एस.विभागाकरिता हर्बोडस्ट पावडर खरेदी | एस.आर.बी.इंडस्ट्रीज | 51450 |
| 3. | हॉस्पिटल करिता सलाईन खरेदी | हॅलो सर्जिकल | 138418 |
| 4. | डी.एस.विभागाकरिता सुपर मॅक्स फिनेल खरेदी | गुरु महाराज इंटरप्राईजेस | 117600 |
| 5. | दवाखाने व प्रसूतीगृहे करिता ॲसिड खरेदी | गुरु महाराज इंटरप्राईजेस | 44500 |
| 6. | डी.एस.विभागाकरिता बलॅक फिनेल खरेदी | गुरु महाराज इंटरप्राईजेस | 268800 |
| 7. | डी.एस.विभागाकरिता सुपर मॅक्स जंतूनाशक खरेदी | गुरु महाराज इंटरप्राईजेस | 588000 |
| 8. | तातडीने औषधी खरेदी | गुरु महाराज इंटरप्राईजेस | 136958 |
| 9. | डी.एस.विभागाकरिता जंतूनाशक खरेदी | समर्थ ऑरगॅनिक | 361985 |
| 10 | आरोग्य प्रयोगशाळेकरिता मॅकेन्टो खरेदी | यश ट्रेडर्स | 23373 |
| 11. | सॅनिक्लोर खरेदी | ओरियन्टल केमिकल्स | 245000 |
| 12. | सफाई अधीक्षक वाहन साहित्य खरेदी | नॅशनल सेल्स | 15300 |
| 13. | सफाई अधीक्षक (वाहन) येथे सेफ्टीक्लिनिक | जय महाराष्ट्र ट्रेडर्स | 22500 |

| | | | |
|---|---|---|---|
| | केमिकल खरेदी | | |
| 14. | मशीनव्दारे जंतुनाशक फवारणी करणे | स्वामी समर्थ पेस्ट कंट्रोल | 305600 |
| 15 | ओषध भांडार फिनेल खरेदी | नॅशनल सेल्स कॉर्पोरेशन | 14065 |
| 16. | सफाई कर्मचारी पुनर्वसन खर्च | आरोग्य खरेदी | 25000 |
| 17. | आरोग्य प्रयोगशाळा पाणी तपसणी करिता रसायने खरेदी | श्री यश ट्रेडर्स | 29600 |
| 18. | हॉस्पिटल करिता इन्वरटर/विद्युतविषयक कामे | रोशनी इलेक्ट्रिक | 33015 |
| | | | 2495532 |

वरील अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.64, दि.25-6-15 अन्वये आरोग्य विभागास कळविले असता, लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे वरील बाबीचे लेखापरीक्षण करता आले नाही. तरी सदरील बाबीवरील खर्चाची रक्कम रु.2495532 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVCSM6501 (Ref No : 47, Hmm No : 64)

## *22 महिला व बालकल्याण समितीने राबविलेल्या योजना वरील खर्चानुषगाने आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6869252.00/-

***महिला व बालकल्याण समितीने राबविलेल्या योजनांवरील खर्चानुषंगाने आवश्यक अभिलेख सातत्याने मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केला नाही. तरतूद व खर्चाची आकडेवारी पाहता 38.57% इतकेच उद्दिष्ट साध्य झाले आहे.***

वित्तीय वर्ष 2012-13 करिता महिला व बालकल्याण विभागासाठी रक्कम रु 2 कोटी इतकी तरतूद उपलब्ध केलेली होती. त्यामधून विभागाने प्रत्यक्षात रु. 7814552/- इतका खर्च केलेला आहे. सदर खर्चाचे लेखापरिक्षण करण्यासाठी मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 कलम 6 प्रमाणे अभिलेखाची मागणी

करण्यात आली होती. प्राप्त अभिलेखाचे लेखापरीक्षणाअंती खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक, संकीर्ण-10/२०००/११६२/प्रक्र२७८/नवि-२७दिनांक ८/१२/२००० अन्वये प्रत्येक वर्षी वार्षिक महसूल उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रकमेच्या ५% रक्कमेची महिला व बालकल्याण योजनांवरील खर्चासाठी अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने महिला व बालकल्याण विभागासाठी 2012-2013 मध्ये तरतूद केलेली रक्कम 2 कोटी ही वरील शासन निर्णयाप्रमाणे योग्य असल्याची खात्री करण्यासाठी संबंधीतांकडे आवश्यक कागदपत्रांची मागणी केलेली होती, परंतु कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत.

2. महानगरपालिकेने आर्थिक वर्ष 2012-2013 करिता रु 2 कोटी इतकी तरतूद केली असताना प्रत्यक्ष खर्च रु 7814552/- इतका झाला आहे. त्यावरुन फक्त 38.57% इतकेच उद्दिष्ट साध्य झाल्याचे निदर्शनास येते. तसेच प्रस्तुत योजनांचे फलनिष्पत्ती अहवाल लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत. तसेच तरतूद करुनही खर्च न केल्याने रक्कम रु 12185448/- व्यपगत झाल्याचे दिसते. यावरुन महिला व बालकल्याण समिती आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील गरजू मुली व महिलांच्या कल्याणासाठी राबवित असलेल्या धोरणांची अंमलबजावणी प्रभावीपणे करीत नसल्याचे दिसून येते.

3.महिला व बालकल्याण विभागाच्या लेखापरिक्षणात खालील बाबीवर झालेल्या रु **6869252**/- खर्चाचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात न आल्याने त्याबाबत लेखापरिक्षणाअंती भाष्य करता आले नाही. तपशील खालीलप्रमाणे

| अक्र. | विषय | खर्चाची रक्कम | आक्षेपाधीन खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | शासन निर्देशित कार्यक्रम<br>तरतूद रु 145.80 लाख<br>विद्यार्थिनी व महिलांसाठी<br>छंद वर्ग<br>बालमेळावा<br>महिला लोकप्रतिनिधी अभ्यास दौरा | <br><br><br>62729<br>9030<br>55063 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 10 वी, 12 वी व CET मेरीट<br>मुलींचा गौरव | 22533 | | |
| | स्पर्धा व व्याख्याने | 42691 | | |
| | महिला दिन | 10407 | | |
| | आरोग्य तपासणी | 76000 | | |
| | वाचनालय | 3145 | | |
| | मोफत बस योजना | 6000000 | | |
| | राजमाता जिजाऊ / सवित्रीबाई फुले/ अहिल्याबाई होळकर /मातोश्री रमाबाई आंबडेकर/ इंदिरा गांधी पुण्यतिथी/ जयंती निमित्त विविध कार्यक्रम | 45262 | | |
| | सभापती ऐच्छिक खर्च | 25026 | | |
| | एकूण | -------------<br>6351886 | 6351886 | |
| 2 | महिला व बालकल्याण समिती संकीर्ण<br>तरतूद 15.70 लाख | | | |
| | वृत्तपत्र खरेदी | | | |
| | दोन वाहनांसाठी विमा | | | |
| | इंधन,तेल व दुरुस्ती (दोनवाहनांसाठी) | 6455 | | |
| | वाहन स्वच्छता, सुटेभाग, टायर | 25701 | | |
| | संकीर्ण साहित्य, फर्निचर (खरेदी) | 459001 | | |
| | | 12270 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **एकूण** | 13939<br>-------------<br>**517366** | **517366**<br>**6869252** | |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम – 1949 चे अनुसुची 'ड' प्रकरण ३ मधील नियम 6(1) (2) प्रमाणे लेखापरिक्षणास सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करुन देणे हे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झालेले नाही.

अंदाजपत्रकात तरतूद करुनही खर्च न करणे किंवा केलेल्या तरतूदीपेक्षा कमी खर्च करणे तसेच 5% तरतुदीच्या निश्चीती बाबत अर्धसमास ज्ञापन क्र 116 दिनांक 28/07/15 अन्वये खुलासा व अभिलेख मागविला होता परंतु विहीत वेळेत माहिती अभिलेख (दि. 31/07/15) प्राप्त न झाल्याने रक्कम
रु 6869252/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATRKJM5901 (Ref No : 53, Hmm No : 116)

## *23 अवैध बांधकामाना लावलेल्या शास्तीबाबतची कर निर्धारण प्रकरणे व शास्ती वसुली बाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9अ*

***कर आकारणी व कर संकलन (शहर) विभागाने 2012-13 या आर्थिक वर्षात अवैध बांधकामाना लावलेल्या शास्तीबाबतची कर निर्धारण प्रकरणे व शास्ती वसुली बाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे सदर कर निर्धारण प्रकरणांचे लेखापरीक्षण करता आले नाही.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध

समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे. महाराष्ट्र शासनाकडील दिनांक 04.01.2008 चे राजपत्रातील महाराष्ट्र अधिनियम क्रं.2 अन्वये दिनांक 04.01.2008 या तारखेस व त्या तारखेनंतर होणाऱ्या अवैध बांधकाम व पून:बांधकाम केले जाईल त्यांच्या बाबतीत शास्तीची तरतूद लागू करण्यात आली आहे. 2012-13 या आर्थिक वर्षात कर आकारणी करतांना शास्ती लावलेली कर निर्धारण प्रकरणे व शास्ती लावलेल्या मिळकतींची खालील नमुन्यातील माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यासाठी अर्धसमास पत्र क्रमांक 84, दि.9/07/15 अन्वये कर आकारणी (शहर) विभागास कळविले असता, लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत कर आकारणी (शहर) विभागाने अभिलेखे व माहिती उपलब्ध करून दिली नाही.

| अ.क्र. | मिळकत क्र.व मिळकत धारकाचे नाव | मिळकतीचा वापर | वार्षिक करयोग्य मुल्य रक्कम | करपात्र रक्कम | शास्तीची रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

वरील माहिती व प्रकरणे उपलब्ध न झाल्याने अवैध बांधकामांना शास्ती लावलेल्या प्रकरणांचे लेखापरीक्षण करता आले नाही. त्यामुळे 2012-13 मध्ये किती अवैध बांधकामांना शास्ती लावण्यात आली व लावलेली शास्ती योग्य असल्याची खात्री करता आली नाही. याबाबत अर्ध समास पत्र क्रमांक 84, दि.9/07/2015 अन्वये विभागास 2012-13 मधील शास्तीची प्रकरणे व वरील नमुन्यातील माहिती उपलब्ध करून देण्याबाबत विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील खुलाशामध्ये एका आर्थिक वर्षात 10000 ते 11000 इतक्या दप्तरी हुकुम नोंदी होतात त्यामुळे शास्तीची प्रकरणे शोधून काढणे जिकीरीचे आहे. विभागाने दिलेले उत्तर पाहता अवैध बांधकाम निश्चित करून सदर बांधकामावर शास्तीची कारवाई करण्याची दक्षता महापालिकेकडून घेतली जात नाही, असे दिसून येते.

DATVCSM6501 (Ref No : 61, Hmm No : 84)

## *24 मोठ्या निवासी इमारतीवरील कर ( फ्लोरेज टॅक्स ) निर्धारण प्रकरणे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून न दिल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9अ*

***मोठ्या निवासी इमारतीवरील कर ( फ्लोरेज टॅक्स) निर्धारण प्रकरणे व 2012-13 मध्ये सदर करापोटी वसूल***

***केलेल्या रक्कमे बाबतची माहिती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही.***

महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या ) इमारतीवरील अधिनियम 1979 कलम 3 (1) (ब) नुसार महानगपालिका क्षेत्रातील 150 चौ.मीटर पेक्षा अधिक  चटई क्षेत्र असलेल्या इमारतीवर /जागेवर करयोग्य मुल्याच्या 10% रक्कमे एव्हढा कर लावणे आवश्यक आहे. तसेच सदरचा कर वसूल करून शासनास जमा करणे बंधनकारक आहे.  महानगरपालिकेतील कर आकारणी विभागाने 2012-13 मध्ये कर आकारणी करतांना ज्या निवासी ईमारती 150 चौ.मिटर पेक्षा जास्त आहेत अशा इमारतींना अधिनियमातील तरतुदीनुसार करयोग्य मुल्यावर लावलेल्या 10% फ्लोरेज टॅक्स (मोठा निवासी कर ) ची करनिर्धारण प्रकरणे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 85, दि.9/7/15 अन्वये कळविले असता, लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत कर आकारणी (शहर) विभागाने अभिलेखे व माहिती उपलब्ध करून उपलब्ध करून दिली नाही.  विभागाने त्यांचेकडील खुलाशामध्ये कार्यालयाकडील सेवकांची कमतरता असलेने निवासी कराचे कामकाज राहून गेलेले आहे. तसेच सेवकांच्या कमतरतेमुळे सोलापूर महानगरपालिकेचे जनरल रीव्हीजनचे कामकाज सन 2008-09 पासून अदयापही झालेले नाही. विभागाने दिलेले उत्तर संयुक्तिक नाही, कारण, मालमत्ता कराचे निर्धारण करताना उक्त शासन निर्णयातील तरतुदीच्या अनुषंगाने ज्या ईमारती 150 चौ.मिटर पेक्षा जास्त आहेत अशा इमारतींना अधिनियमातील तरतुदीनुसार करयोग्य मुल्यावर 10% फ्लोरेज टॅक्स (मोठा निवासी कर ) लावणे बंधनकारक आहे.

वरील माहिती व प्रकरणे उपलब्ध न झाल्याने मोठ्या ईमारतीवरील मोठा निवासी कर निर्धारण प्रकरणांचे लेखापरीक्षण करता आले नाही.

DATVCSM6501 (Ref No : 62, Hmm No : 85)

## *25 मोठ्या निवासी इमारतीवर निवासी कर न लावता कर निर्धारण केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील अधिनियम 1979 कलम 3 (1) (ब) नुसार***

***महानगरपालिका क्षेत्रातील 150 चौ.मीटर पेक्षा अधिक चटई क्षेत्र असलेल्या इमारतीवर/जागेवर करयोग्य मूल्याच्या 10% रक्कमे एवढा फ्लोरेज टॅकस (मोठा निवासी कर) न लावता कर निर्धारण केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर शासन महसुलाचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील अधिनियम 1979 कलम 3 (1) (ब) नुसार महानगरपालिका क्षेत्रातील 150 चौ.मीटर पेक्षा अधिक चटई क्षेत्र असलेल्या इमारतीवर/जागेवर करयोग्य मूल्याच्या 10% रक्कमे एवढा कर लावणे आवश्यक आहे. तसेच सदरचा कर वसूल करून शासनास जमा करणे बंधनकारक आहे. महानगरपालिकेतील बांधकाम परवानगी विभागाने 2012-13 या आर्थिक वर्षात 150 चौ.मीटर पेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या 110 मिळकतींना वापर परवाना दिला आहे. 2012-13 मध्ये सदर मिळकतीवर मालमत्ता कराची आकारणी करतांना अधिनियमातील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यावर 10% फ्लोरेज टॅक्स (मोठा निवासी कर) न लावता कर निर्धारण केले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.

सोलापूर शहरातील मिळकतींची विभागणी शहर विभाग इ हद्दवाढ विभागामध्ये झालेली आहे. लेखापरीक्षण कालावधी पर्यंत शहर विभागामध्ये एकूण 90690 मिळकती असून त्यापैकी केवळ 286 मिळकतींना (0.31%) फ्लोरेज टॅकस (मोठा निवासी कर) लावलेला आहे. 2012-13 मध्ये रु.87077 मोठा निवासी कर वसूल केलेला आहे. तथापि सदरची वसुली ही 2012-13 पुर्वीच्या मिळकतीवरील कराची असून 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये फ्लोरेज टॅक्स पात्र असलेल्या मिळकतीचा तपशील मनपाने ठेवलेला नाही. यावरून असे दिसून येते कि, निवासी करास पात्र असलेल्या मिळकतीपैकी अत्यंत कमी मिळकतींचा समावेश मोठ्या निवासी करासाठी केला जातो.

महानगरपालिका क्षेत्रातील शहर व हद्दवाढ विभागा अंतर्गत येणाऱ्या सर्व मिळकतींचा आढावा घेऊन 150 चौ.मी.पेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या निवासी मिळकतींना मोठा निवासी कर लावण्यात यावा. व सदर मिळकतींच्या मूळ करनिर्धारण तारखेपासून वसूल करून शासन सदरी भरणा करावा. या बाबत अर्ध समास पत्र क्रमांक 136, दि.31/07/2015 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने सेवकांच्या कमतरते मुळे सोलापूर महानगरपालिकेचे जनरल रिव्हिजनचे काम 2008-09 पासून अद्यापही झालेले नसल्याने सदरची कार्यवाही केली नाही असे अनुपालन सादर केले आहे. विभागाने दिलेले उत्तर संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATDSAM7301 (Ref No : 67, Hmm No : 136)

## ***26 महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) शासनाकडे उशिराने जमा केले बाबत.***

Solapur (M Corp.)

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2012 -13 मध्ये शहर विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर रु.3,71,82,867/- व नौकर शाश्वती कर रू. 5276372/- वसुल केला आहे. व हद्दवाढ विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षण कर रु.2,20,14,954/- व नौकर शाश्वती कर रु.24,51,831/ वसुल केला आहे. परंतु त्याचा भरणा शासन तिजोरीत सहा महिने ते एक वर्ष विलंबाने केला आहे.***

महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2012 -13 मध्ये शहर विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर रु.3,71,82,867/- व नौकर शाश्वती कर रू. 5276372/- वसुल केला आहे. व हद्दवाढ विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षण कर रु.2,20,14,954/- व नौकर शाश्वेती कर रु.24,51,831/ वसुल केला आहे. परंतु त्याचा भरणा शासन तिजोरीत खालील प्रमाणे विलंबाने केला असल्याचे आढळून आले

| कराचे नाव | कर संकलन विभाग | कालावधी | वसुल केलेली रक्कम रु. | 2% रिबेट वजा करुन शासनकडे भरणा केलेली रक्कम रु. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र शिक्षणकर | शहर | एप्रिल 12 ते जुन 12 | 1454836 | 1425739 | 02/03/2013 |
| | | जुलै 12 ते सप्टें 12 | 14694497 | 14400803 | 13/08/2013 |
| | | ऑक्टो 12 ते जाने 13 | 1003619 | 9838827 | 7/02/2014 |
| | | जाने 13 ते मार्च 13 | 10993915 | 10774037 | 27/03/2014 |
| | | एकूण | 37182867 | 36439406 | |
| | हद्दवाढ | एप्रिल 12 ते ऑगस्ट 12 | 4879637 | 4782044 | 23/03/2013 |
| | | सप्टे 12 ते | 9498455 | 9308486 | 7/05/2014 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नोव्हें12 | | | |
| | | डिसे 12 ते मार्च 13 | 7636862 | 7484125 | 03/06/2014 |
| | | एकूण | 22014954 | 21574655 | |
| नौकर शाश्वती कर(रोजगार हमी कर) | शहर | एप्रिल 12 ते मे 13 | 5276372 | 5170845 | 15/05/2014 |
| | | एकूण | 5276372 | 5170845 | |
| | हद्दवाढ | एप्रिल 12 ते ऑगस्ट 12 | 574437 | 574437 | 23/03/2013 |
| | | सप्टें 12 ते नोव्हें 1 2 | 1303320 | 1277254 | 07/05/2014 |
| | | डिसें 12 ते मार्च 13 | 594074 | 562593 | 03/06/2014 |
| | | एकूण | 2451831 | 2514284 | |

याबाबत अर्धसमास पत्र क्र. 94 दि. 20/07/2015 अन्वये कळविण्यात आले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 30/07/2015 रोजी सादर केले असुन सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

**1)** शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम 1962, महाराष्ट्र शासन,महसुल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक-ईडिसी-1097/प्र.क्र.205/ल-5,मंत्रालय दि.3 एप्रिल 1998 नुसार जमिनी व इमारती यावरील कराच्या रक्कमा ज्या आठवड्यात वसुल केल्या जातात अशा रकमांचा शासकीय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत भरणा करावयाचा आहे. जी नगरपालिका शासकीय कोषागारापासुन आठ कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर असेल अशा नगरपालिकेने वसुल रकमा नगरपालिकेचे खाते असेल अशा बँकेत भरुन पुढील महिन्याच्या 7 तारखेच्या आत शासकीय कोषागारात भरणा करणे आवश्यक असताना वरील प्रमाणे उशिराने जमा केले असल्याचे आढळुन आले.

2) संगणक विभागानुसार व करविभाग यांचे कडील वसुल रक्कमेत खालील प्रमाणे तफावत आहे .

| कराचे नांव | विभाग | संगणक विभागाची जमा रक्कम रू | कर संकलन विभागाची जमा रू | तफावत रक्कम रू |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र शिक्षण कर | शहर | 37137493 | 37183067 | (+) 45574 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | हद्दवाढ | 21996686 | 22014954 | (+) 18268 |
| नौकर शाश्वती कर | शहर | 5263694 | 5276372 | (+) 12678 |
| | हद्दवाढ | 2453649 | 2451831 | (-) 1818 |

मनपा कडील कर संकलन विभाग व संगणक विभागानुसार महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) यांचे वार्षिक वसुली रक्कम मध्ये वरील प्रमाणे तफावत असल्याचे आढळून आले. कर संकलन विभागानुसार शहर विभागाकडील महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर व हद्दवाढ विभागाकडील महाराष्ट्र शिक्षण कर यांची रक्कम संगणक विभागानुसार जमा रक्कम यापेक्षा जास्त असल्याने सदर रकमेची वसुलीची नोंद संगणक विभागाकडे झाली नसल्याचे दिसून येते. तसेच हद्दवाढ विभागाकडील नौकर शाश्वती कर या कराची संगणक विभागानुसार जमा रक्कम कर संकलन विभागानुसार जमा रक्कम यापेक्षा जास्त असल्याने व त्यामुळे पुढील वर्षीची थकबाकी मागणी कमी झाल्याने मनपाचे नुकसान झाले आहे. तरी सदर फाजील वसुली रक्कम संगणक विभागामधून कमी करून सदरची रकमेच्या वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये महाराष्ट्र शिक्षणकर व रोजगार कर यांचा भरणा विहीत मुदतीत करण्याची कार्यवाही वित्तीय वर्ष 2014-15 पासून सुरु केल्याचे नमुद केले आहे.

DATRNDM7201 (Ref No : 104, Hmm No : 94)

## *27 बांधकाम परवानाबाबत लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9अ*

***बांधकाम परवाना विभागाकडील बांधकामाचे परवानगी देणेत आलेले 11 नस्ती मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी सादर केल्या नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे बांधकाम परवाना विभागाकडील खाली

नमूद केलेले अभिलेखे लेखा परिक्षणासाठी मागणी केले असता सादर केले नाही. तरी सदरचे अभिलेखे लेखा परिक्षणास त्वरीत सादर करणेत यावे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.72 दि.06/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.न.अ./बां.प/1075 दि.13.8.2015 अन्वये अ.क्र.1,7,10,11 मधील प्रकरणे सादर करणेत येत आहे व उर्वरित रेकॉर्ड रुममध्ये शोधणेची कार्यवाही चालू आहे असे कळविले आहे. खात्याने लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत खालील अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. त्यामुळे सदरचे अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.

| अ.क्र | बांधकाम वापर परवाना क्र. व दि. | विकासकाचे नाव व पत्ता | बांधकाम क्षेत्रेफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| 1. | 60/21-6-2012 | सृष्टी डेव्हलपर्स्, न्युपच्छा पेठ, सोलापूर. | 937.79 |
| 2. | 70/11-7-2012 | युनिक कन्स्ट्रक्शन, न्युपच्छा पेठ, सोलापूर. | 1534.06 |
| 3. | 84/30-7-2012 | श्री जयेशभाई रमेशभा पाटील किसान कन्स्ट्रक्शन अक्कलकोट रोड, सोलापूर. | 1225.68 |
| 4. | 85/30-7-2012 | श्री जयेशभाई रमेशभा पाटील किसान कन्स्ट्रक्शन अक्कलकोट रोड, सोलापूर. | 769.40 |
| 5. | 117/6-9-2012 | चतुर प्रॉप्रटीज प्रा. लि. लक्ष्मीपेठ, सोलापूर | 279.6 |
| 6. | 120/6-9-2012 | चतुर प्रॉप्रटीज प्रा. लि. लक्ष्मीपेठ, सोलापूर | 1315.86 |
| 7. | 147/23-10-2012 | त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शन, लक्ष्मीपेठ, सोलापूर. | 5081.57 |
| 8. | 151/29-10-2012 | मे.प्राईम डेव्हलपर्स्, मजरेवाडी, सोलापूर. | -- |
| 9. | 156/6-12-2012 | प्रकाश दमोदरर रानकर सोलापूर. | 1532.52 |
| 10. | 192/4-1-2013 | श्री. डॉ.प्रभाकर शंकरन सोलापूर. | -- |
| 11. | 242/16-3-2013 | सोनी सोमानी इन्फ्रा. लक्ष्मीपेठ, सोलापूर. | 4935.52 |

## *28 विकास हक्क प्रमाणपत्राबाबत लेखा परिक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत.(विकास हक्क प्रमाणपत्र (डी.आर.सी.)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9अ*

***विकास हक्क प्रमाणपत्राबाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे बांधकाम परवाना विभागाकडील खाली नमूद केलेले अभिलेखे लेखा परिक्षणासाठी मागणी केले असता सादर केले नाही. सदरचे अभिलेखे लेखा परिक्षणास त्वरीत सादर करणेत यावे याबाबत अर्धसमास पत्र क्र. 73 दि. 06/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

महापालिकेच्या विकास आराखडयानुसार आरक्षणाने बाधीत जागेच्या मोबदल्यात संबंधीत जागा मालकास विकास हक्क प्रमाणपत्र (डी.आर.सी.) देण्यात येतात. सदर विकास हक्क प्रमाणपत्र हे ज्या झोनमधील जागेचे मोबदल्यात देण्यात आले आहे त्या झोनमध्ये अथवा त्यापुढील झोनमध्ये मंजूर एफएसआय पेक्षा जादा बांधकामासाठी वापरू शकतात. सदरची प्रमाणपत्रे ही सबरजिस्टार यांचे कार्यालयात नोंद करुन विक्री करण्यात येतात.

महापालिकेने जागा कधी आरक्षित केल्या व आरक्षित जागा कधी ताब्यात घेण्यात आल्या व संबंधीत जागा मालकास विकास प्रमाणपत्रे देणेत आली आहे त्याची साठा नोंदवही, विक्री करणेत आलेल्या नस्ती इ. अभिलेखे लेखा परिक्षणास मागणी करुन उपलब्ध करुन देणेत आली नाहीत.

DGPKVSM6101 (Ref No : 74, Hmm No : 73)

## *29 बाजार गाळे बाजारभावापेक्षा कमी दराने भाड्याने दिल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 3**

*अनियमितता कलम : 9अ*

***सोलापूर मनपाच्या मालकिच्या एकूण 1386 गाळयापैकी 604 मेजर गाळयांचे भाडयांची वसुली ही शिघ्र शिध्दगणकानुसार येणा-या भाडयाप्रमाणे करणेत येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 79(ड) नुसार किमान चालू बाजारभावानुसार भाडे वसुल करणे आवश्यक आहे. चालू बाजारभावानुसार असणारे भाडे हे शिघ्र शिध्दगणकानुसार येणा-या भाडयापेक्षा जास्त असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. करारनाम्या अट क्र.11 नुसार गाळाधारकास गाळा पोटभाडयाने देता येत नसताना एकूण गाळे 1386 पैकी 342 गाळेधारकाने पोटभाडेकरु नेमण्यात आल्याचे कार्यालयीन टिपणी दि.28/11/2014 मध्ये नमूद करण्यात आला आहे. कराराची मुदत संपल्यानंतर अधिनियमातील तरतूदीनुसार चालू बाजारभावानुसार भाडे आकारणी करणे आवश्यक आहे. परंतु मनापाने तशी भाडे आकारणी केली नसल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मेजर व मिनी शॉपींग सेंटर मधील गाळेधारकाचे नोंदीची तपासणी केली असता अनियमतता आढळुन आल्या. याबाबत अर्धसमास पत्र क्र.152 दि. 31/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/भूवमा/609 दि.6.8.2015 अन्वये अनुपालन सादर केले आहे. आक्षेपानुसार मनपाने कार्यवाही केली असता पदाधिका-यांनी विरोधात ठराव पारीत करण्यात आला आहे. त्यानुसार ठराव विखंडीत करणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासन आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे खात्याने कळविले आहे. तसेच नुकसानीची रक्कम तात्काळ गाळेधारकांना नोटीस बजावून वसुल करणेत येईल असे खात्याने कळविले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 मधील उपकलम (क) नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल,विकता येईल,भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल. उपकलम (ड) नुसार जो मोबदला घेऊन मालमत्ता विकता येईल, पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये. सदरच्या नियमावलीस मान्यता मिळाल्यानंतर भाडयाने दिलेले गाळे, मोकळया जागा यांची भाडे कराराची मुदत संपल्यानंतर मुदतवाढ देताना अशा जागेसाठी, आकारण्यात येणा-या भाडयाची रक्कम करार संपताना असणा-या या मिळकतीच्या नियमावलीतील तरतुदीनुसार येणारे मुल्य अथवा बाजार भावानुसार असणारे भाडे अथवा जाहीर निविदा मागविल्यानंतर येणा-या रकम यापैकी जे जास्त आहे त्या दरानुसार भाडे आकारणे आवश्यक आहे. परंतु मनपाने तशी कार्यवाही केली नाही.

सोलापूर मनपा हद्दीत असणारे एकूण 1386 गाळेपैकी 19 मेजर शॉपींग सेंटर इमारतीमधील 604 गाळेधारकाकडून भाडे वसुली ही शिघ्र शिध्दगणकानुसार येणा-या भाडयाप्रमाणे वसुली करणेत येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 79(ड) नुसार किमान चालू बाजारभावानुसार भाडे आकारण्यात

यावे अशी तरतूद आहे. चालू बाजारभावानुसार असणारे भाडे हे शिघ्र शिध्दगणका- नुसार येणा-या भाडयापेक्षा जास्त आहे. खात्याने दिलेल्या माहितीनुसार सदर एकूण गाळयापैकी 604 गाळयांचे भाडे शिघ्र शिध्दगणकानुसार रु.21,34,813/- प्रमाणे वसुली करण्यात येत आहे. सदर गाळयांचे भाडे चालू बाजारभावानुसार वसुली न केल्याने मनपास दरमहा रु.1,35,88,075/- चे नुकसान झाले आहे.
2) सोलापूर मनपाचे मालकीच्या जागेवर बांधण्यात आलेले मेजर शॉपींग सेंटरच्या 25 इमारती व मिनी शॉपींग सेंटरच्या 43 इमारती अशी एकूण 68 मेजर व मिनी शॉपींग सेंटर आहेत. सदर शॉपींग सेंटर मध्ये एकूण 1386 गाळे आहेत. भूमि व मालमत्ता विभागाकडील टिपणी दि.28/11/2014 मध्ये नमूद केलेनुसार वसुली सेवक यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे सदर एकूण 1386 गाळयापैकी 342 गाळेधारकाने पोटभाडेकरु नेमण्यात आल्याचे अहवाल देण्यात आला आहे. करारनाम्यातील अट क्र.11 नुसार गाळाधारकास गाळा पोटभाडयाने देता येणार नाही अथवा गहाण, दान, बक्षीस, अन्य रितीने महापालिकेच्या परवानगीशिवाय तबदील करता येणार नाही. अन्यथा वरीलपैकी कोणतीही परिस्थिती आढळून आल्यास गाळाधारकाचा असलेला हक्क रद्द केला जाईल व महापालिकेकडे भरलेली डिपॉझिटची रक्कम जप्त करण्यात येईल अशी तरतूद आहे. 342 गाळेधारकाने पोटभाडयाने गाळे दिले असताना मनपाने वेळीच कार्यवाही केली नाही. तरी याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम 81-ब नुसार महानगरपालिकेच्या जागेतून व्यक्तींना काढून टाकण्याच्या अधिकारानुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.
3) स्थायी समिती ठराव क्र.885 दि.09/08/2001 नुसार सदर गाळे हे दि.01/04/2000 पासून 9 वर्षे व 11 महिने मुदतीपर्यंत भाडयाने देणेस मान्यता देण्यात आली आहे. सदर गाळयांची भाडे कराराची मुदत ही दि.28/02/2010 रोजी संपत आहे. करारनामा अट क्र.14 नुसार भाडे कराराची मुदत संपल्यानंतर सदर गाळे मनपाचे ताब्यात घेणे आवश्यक होते. अन्यथा त्यावेळच्या परिस्थितीनुसार बाजारभावानुसार महापालिका जे भाडे ठरवील त्या भाडयाने देणे आवश्यक होते. कराराची मुदत संपल्यानंतर अधिनियमातील तरतूदीनुसार किमान चालू बाजारभावानुसार भाडे आकारणी करणे आवश्यक होते. परंतु मनापाने तशी भाडे आकारणी केली नसल्याचे दिसून आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 81-ब नुसार कार्यवाही करुन गाळे ताब्यात घेणेत आले नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 88, Hmm No : 152)

## *30 सोलापूर मनपा हद्दीत वृक्षसंवर्धन व जतन अधिनियम 1975 ची अंमलबजावणी न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 5**

*अनियमितता कलम : 9अ*

***पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 प्रमाणे शहरात प्रति व्यक्ती झाडांचे प्रमाण 1:4 असावे हे प्रमाण आदर्श आहे. 2011 च्या जनगणनेनुसार सोलापूर महानगरपालिकेची लोकसंख्या 951118 एवढी असून त्याचे प्रमाणात 3804472 झाडे असणे आवश्यक आहे. 2013 मध्ये झांडांच्या वृक्षगणना करणेत आलेली नाही. वृक्ष लागवड केली असल्यास त्यापैकी किती वृक्ष जिवंत आहेत याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही. वृक्ष प्राधिकरणाने 2008 ते 2013 या कालावधीची वृक्ष गणना केलेली नाही. 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये वृक्ष प्राधिकरणाने समिती स्थापन केल्याचे आढळुन आले नाही. वृक्ष प्राधिकरणाचे नांवे स्वतंत्र खाते ठेवलेले नाही. वृक्ष प्राधिकरण निधीत जमा झालेला महसुल व खर्च याची माहिती उपलब्ध झाली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उदयान विभागातील वृक्ष प्राधिकरण विभागाने लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली माहिती व अभिलेख्यांचे लेखापरिक्षण केले असता अनियमितता निदर्शनास आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 155 दि. 31/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.3अ/644 दि.13.8.2015 अन्वये आक्षेपात नमूद केले नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे सरंक्षण व जतन अधिनियम 1975 मधील कलम 7 व नियम 2009 चे नियम 8 अनुसूची 1 मध्ये महापालिकेने दरवर्षी कोठे व किती झाडे लावावी याची मानके निश्चित केली आहेत. पर्यावरण सरंक्षण अधिनियम 1986 प्रमाणे शहरात प्रति व्यक्ती झाडांचे प्रमाण 1:4 असावे हे प्रमाण आदर्श आहे. 2011 च्या जनगणनेनुसार सोलापूर महानगरपालिकेची लोकसंख्या 951118 एवढी असून त्याचे प्रमाणात 3804472 झाडे असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र ( नागरी क्षेत्र) झाडांचे सरंक्षण व जतन अधिनियम 1975 मधील नियम क्र.7(ख) नुसार प्रत्येक पाच वर्षातून एकदा विद्‌यमान झाडांची गणना करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपाने 2013 पूर्वी व नंतरही झाडांची वृक्षगणना करणेत आलेली नाही. त्यामुळे वृक्षाचे प्रमाण आदर्श प्रमाणाशी सुसंगत आहे किंवा कसे याची खात्री करता आली नाही. महाराष्ट्र ( नागरी क्षेत्र) झाडांचे सरंक्षण व जतन अधिनियम 1975 व नियम 2009 मधील दिलेल्या मानकाप्रमाणे झाडे लावणे व जतन करणे आवश्यक आहे.

2. वृक्ष प्राधिकरणाने 2007-08 ते 2012-13 या पाच वर्षामध्ये किती झाडे लागवड केली आहेत याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. वृक्ष लागवड केली असल्यास त्यापैकी किती वृक्ष जिवंत आहेत याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे लागवडीपैकी जिवंत असलेल्या वृक्षांची खात्री करणे गरजेचे असतांना अशी खात्री केली जात नसल्याचे दिसून येते.

3. अधिनियमातील कलम 7 (ख) अन्वयें वृक्ष प्राधिकरणाने डिसेंबर 1996 पूर्वी एकदा आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षातून एकदा अधिकार क्षेत्रातील सर्व जमिनीवरील विदयमान झांडांची गणना करणे व त्याची माहिती कलम 7 (बी) प्रपत्र- ए मध्ये ठेवावयाची आहे. तथापि, मनपा सोलापूर येथील वृक्ष

प्राधिकरणाने 2008 ते 2013 या कालावधीची वृक्ष गणना केलेली नाही. 1996 नंतरच्या वृक्ष गणनेबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

4. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम, 1975 मधील तरतूदीनुसार वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन करणे आवश्यक होते. परंतु सोलापूर महानगरपालिकेने 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये अशी समिती स्थापन केल्याचे आढळुन आले नाही.

5. अधिनियमातील कलम 15 अन्वये प्राधिकरणाचा विशेष निधी असेल त्यास (वृक्ष प्राधिकरण निधी) असे संबोधण्यात येईल. सदर निधीमध्ये स्थानिक प्राधिकरणाने बसविलेला कर व प्राधिकरणाने वसुल केलेल्या रकमांचा समावेश असेल. सदर निधी राष्ट्रीयकृत बँकेतील स्वतंत्र खात्यात ठेवणे आवश्यक आहे. परंतु सोलापूर महानगरपालिकेने वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन केली नसल्याने नियमानुसार कार्यवाही केली नाही. सोलापूर महानगरपालिकेतील वृक्ष प्राधिकरणाचे नांवे स्वतंत्र खाते ठेवलेले नाही. त्यामुळे वृक्ष प्राधिकरण निधीत जमा झालेला महसुल व खर्च याची माहिती उपलब्ध झाली नाही. तरी नियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये प्राधिकरणाकडे जमा झालेल्या ठेवी व इतर महसुलाच्या रक्कमा जमा करणे आवश्यक आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 91, Hmm No : 155)

## *31 यांत्रिक विभागाकडील अभिलेख्यातील अनियमततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 9**

*अनियमितता कलम : 9अ*

***लॉग बुकातील प्रत्येक नोंदीसमोर खातेप्रमुखाची स्वाक्षरी नाही. लॉग बुकमध्ये कि.मी. नमूद केले नाही. सरासरी धावसंख्या काढणेत आली नाही. वाहन बंद असल्याचेही नोंदी करण्यात आल्या नाहीत. वाहनाच्या इतिवृत नोंदवहीमध्ये दुरुस्तीच्या पूर्ण नोंदी करण्यात आल्या नाहीत. वाहनावर खर्च करण्यात आलेल्या देयके व नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत. पावसाळयामध्ये मैदान ओले असताना पीच दबाई कशी करण्यात आली व त्यासाठी इंधनावर खर्च करण्यात आला आहे हे लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. इंधन मागणीबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत असणारे यांत्रिक विभागाने 2012-13 या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणास

सादर केलेल्या नोंदवह्याची तपासणी करण्यात आली.

यांत्रिक विभागाकडे 8 टीपर, 1 ट्रक, 2 टेम्पो 4 रोलर इत्यादी वाहने आहेत. सदर वाहनाच्या लॉग बुकातील नोंदीची तपासणी केली असता आढळलेल्या अनियमिताबाबत अर्धसमास पत्र क्र. 156 दि.31/07/2015 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र दि.12.8.2015 अन्वये अनियमिततेबाबत कार्यवाही करण्याची दक्षता घेणेत येत आहे असे कळविले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)लॉग बुकातील प्रत्येक नोंदीसमोर खातेप्रमुखाची स्वाक्षरी नाही.

2) वाहनाच्या लॉग बुकमध्ये कि.मी. नमूद केले नाही.

3) महिन्यात वापरलेले इंधन व एकूण धाव संख्या याचा महिना अखेरीस गोषवारा काढून वाहनाची सरासरी धावसंख्या काढणेत आली नाही.

4) वाहन क्र.एमडब्ल्युसी 6115 हे दि.1/11/2011 ते 31/10/2012 या कालावधीत इंधनाच्या नोंदी लॉग बुकमध्ये केल्या नाहीत. सदर कालावधीमध्ये वाहन बंद असल्याचीही नोंदी करण्यात आली नाही.

5) वाहनाच्या इतिवृत नोंदवहीमध्ये दुरुस्तीच्या पूर्ण नोंदी करण्यात आलेल्या नाहीत. उदा. वाहन क्र.एमएच 13 आर 1758 ची दुरुस्ती रक्कम रु.23929/-, रु.22040/-, रु.27350/-, रु.74708/-, रु.36886/- इ.

6) वाहन क्र.एमएच 13 आर 3550 चे लॉग बुकमध्ये इंधन भरल्याच्या नोंदी करण्यात आल्या नाहीत.

7) मार्च 2013 मध्ये वाहनावर करण्यात आलेल्या खर्चाची देयके व नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

8) पार्क मैदानात असणारे रोलरने रोज 2 तास पीच दबाई करणे आवश्यक आहे याबाबत क्रिडा अधिका-याने प्रमाणित करण्यात आलेले नाही. त्यामुळे रोज 2 लि.डिझेलचा खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. तसेच पावसाळयामध्ये मैदान ओले असताना पीच दबाई कशी करण्यात आली व त्यासाठी इंधनावर खर्च करण्यात आला आहे हे लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

9) इंधन मागणीबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाही. त्यामुळे वाहनाच्या लॉगबुकातील इंधनाच्या नोंदी बरोबर असल्याची खात्री करता आली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 92, Hmm No : 156)

## *32 महानगरपालिका सेवकांना लागू करण्यात आलेल्या 6 व्या वेतन आयोगानुसारच्या सुधारित वेतनश्रेणीस शासनाची मान्यता घेण्यात आली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***सोलापूर महानगरपालिकेने आपल्या सेवकांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 दिनांक 01/02/2011 पासुन लागू केला आहे. मा.आयुक्त यांचे 06/06/2009 चे टिपणी ने व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 740, दिनांक 07/08/2009 चे शिफारसी नुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र 93 दिनांक 18/08/2009 नुसार मान्यता देण्यात आली होती. परंतु मुंबई प्रातिंक महानगरपलिका अधिनियम 1949 चे कलम 51 (4) नुसार सदर सुधारित वेतन श्रेणीस महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी असे सर्व साधारण सभेच्या ठरावात स्पष्ट नमुद केले आहे. परंतु अशी शासन मान्यता अद्याप पर्यंत मिळाली नसल्याचे लेखा परीक्षणास आढळुन आले.*** |

सोलापूर महानगरपालिकेने आपल्या सेवकांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 दिनांक 01/02/2011 पासुन लागू केला आहे. मा.आयुक्त यांचे 06/06/2009 चे टिपणी ने व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 740, दिनांक 07/08/2009 चे शिफारसी नुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र 93 दिनांक 18/08/2009 नुसार मान्यता देण्यात आली होती. परंतु मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51 (4) नुसार सदर सुधारित वेतन श्रेणीस महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी असे सर्व साधारण सभेच्या ठरावात स्पष्ट नमुद केले आहे. परंतु अशी शासन मान्यता अद्याप पर्यंत मिळाली नसल्याचे लेखा परीक्षणास आढळुन आले. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 120 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 01/08/2015 रोजी सादर केले आहे. त्यामध्ये सुधारीत वेतन श्रेणीस शासनाची मान्यता घेण्यासाठी पत्र क्र. नआ/वै/555 दि. 31/01/2011 अन्वये नगरविकास विभागास प्रस्ताव पाठविला आहे. परंतु त्यास अद्याप मान्यता मिळाली नसल्याचे नमुद केले आहे.

मनपा कडील एकूण 5699 पदांना लागू करण्यात आलेल्या 6 व्या वेतन आयोगानुसारच्या सुधारित वेतनश्रेणीस प्रयत्न करुन शासन मान्यता घेणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 111, Hmm No : 120)

## *33 महानगरपालिका मुख्य लेखापरिक्षकांचे कामकाजाबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : लेखापरीक्षण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***2011-2012 ते 2014-2015 या आर्थिक वर्षाच्या लेख्यावरील अहवाल स्थायी समितीस सादर करणे प्रलंबित आहे. 2009-2010 आर्थिक वर्षानंतरचे बहुतांशी विभागांचे लेखापरिक्षण प्रलंबित आहे. 2012-13 आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे साप्ताहिक तपासणीचे अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 105(1) प्रमाणे मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्याची साप्ताहिक तपासणी व लेखापरिक्षा करुन त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 99 दिनांक 22/07/2015 अन्वये साप्ताहिक तपासणीचा अहवाल व लेखापरिक्षेबाबतची माहिती (अभिलेख) मागविली होती. त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या माहितीची तपासणी करुन खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 106(3) प्रमाणे प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीला सादर करणे आवश्यक आहे. तथापि लेखापरिक्षणात असे आढळले की, मुख्य लेखापरिक्षकांनी वित्तीय वर्ष 2011-2012 ते 2014-2015 या वर्षाचे लेख्यावरील अहवाल स्थायी समितीस सादर केलेले नाहीत. महानगरपालिकेचे अंतर्गत लेखापरिक्षण मुख्य लेखापरिक्षकामार्फत करण्यात येते. त्यामध्ये जमा रक्कमांचे तसेच खर्चाचे लेखापरिक्षण केले जाते. मुख्य लेखापरिक्षकांनी 2010-2011 आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल जाक्र मुलेप 103 दिनांक 16/04/2012 अन्वये स्थायी समिती समोर सादर केला आहे. त्यामध्ये बहुतांशी विभागांमधील अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नसल्याचे आढळते उदाहरणा दाखल काही विभागांचा तपशील खालीलप्रमाणे आहे .

आयातकर अधिक्षक

| अ.नं | लेखापरिक्षणाचा तपशील | लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | एस्कॉर्ट | 2007-08 ते 2008-09, 2009-10 |
| २ | पोस्ट पार्सल व सोने चांदी | 2005-06 ते 2008-09, 2009-10 |
| ३ | करंट अकौंट | 1989-90 ते 1994-05, 1996-97 ते 2008-09, 2009-10 |
| ४ | जकात पावती पुस्तके | 2008-09, 2009-10 |

| | | |
|---|---|---|
| ५ | फ्री पास | 2006-07 ते 2008-09, 2009-10 |
| ६ | किरकोळ जमा | 2007-08 ते 2008-09, 2009-10 |

आरोग्याधिकारी

| अ.नं | लेखापरिक्षणाचा तपशील | लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | लेडी डफरीन प्रसुति गृह | 84-85 ते 86-87, 88-89, 99-2001, 2004 ते 2007, 2009-10 |
| २ | मदर तेरेसा | 1992 ते 1997-98, 1999-2000 |
| ३ | बालरुग्ण विभाग | 2002-03 ते 2008-09, 2009-10 |
| ४ | जिजामाता प्रसुति गृह | 1994-95, 1995-96, 2003-04 ते 2008-09, 2009-10 |
| ५ | रा .हि . प्रसुती गृह | 1991-92 ते 2000, 2003-04 ते 2008-09,<br>2009-10 |
| ६ | रामवाडी प्रसुती गृह | 1983-84, 1991-92 ते 1999-2000, 2002-03 ते 2008-09, 2009-10 |
| ७ | दमाणी प्रसुती गृह | 1992-93 ते 1999-2000, 2002-03 ते 2003-04, 2009-10 |
| ८ | भावनाऋषी पेठ प्रसुती गृह | 2008-09, 2009-10 |
| ९ | दाराशा प्रसुती गृह | 1993-94 ते 1996-97, 1998-99 ते 2000, 2004-05 ते 2007-08, 2009-10 |
| १० | साबळे प्रसुती गृह | 1998-99 ते 1999-2000, 2001-02 ते 2008-09, 2009-10 |

| | | |
|---|---|---|
| ११ | चाकोते प्रसुती गृह | 1993-94 ते 1999-2000, 2002-03 ते 2008-09, 2009-10 |
| १२ | बॉईस प्रसुती गृह | 1987-88 ते 1979-80, 1989-90 ते 1999-2000, 2002-03 ते 2003-04 व 2005-06 ते 2008-09, 2009-10 |
| १३ | साखर पेठ दवाखाना | 1998-99 ते 1999-2000, 2007 ते 2009, 2009-10 |
| १४ | जोडभावी पेठ दवाखाना | 2006-07 ते 2008-09, 2009-10 |
| १५ | दाराशा दवाखाना | 1998-99 ते 1999-2000 ते 2008-09, 2009-10 |
| १६ | शहर दवाखाना | 1993-94 ते 1999-2000 ते 2007-08, 2009-10 |
| १७ | बागले वस्ती दवाखाना | 1991-92 ते 2003-04, 2009-10 |
| १८ | टागोर दवाखाना | 1995-96 ते 1999-2000, 2008-09, 2009-10 |
| १९ | आयुर्वेद दवाखाना | 1991-92 ते 1999-2000, 2004-05 ते 2008-09, 2009-10 |
| २० | हुडको व राष्ट्रीय उद्यान | 1984-85 ते 1999-2000 |
| २१ | हनुमान नगर दवाखाना | 1997-98 ते 1999-2000 व 2007-08, 2008-09, 2009-10 |
| २२ | शास्त्रीनगर दवाखाना | 2009-10 |
| २३ | थोबडे वस्ती दवाखाना | 2008-09, 2009-10 |
| २४ | बोरामणी नाका दवाखाना | 1998-99, 1999-2000 व 2007-08, 2008-09, 2009-10 |
| २५ | धूत दवाखाना | 2007-08, 2008-09, 2009-10 |

| | | |
|---|---|---|
| २६ | उंब्रजकर वस्ती दवाखाना | 2007-08 ते 2008-09, 2009-10 |
| २७ | डोणगांव दवाखाना | 2009-10 |
| २८ | फक्रोद्दिन दवाखाना | 2002-03 ते 2006-07, 2009-10 |
| २९ | मड्डी वस्ती दवाखाना | 1995-96 ते 1997-98, 2004-05 ते 2008-09, 2009-10 |
| ३० | शेळगी दवाखाना (हद्दवाढ ) | 1991-92 पासून 2000-01, 2002-03 ते 2008-09 |
| ३१ | आयडी हॉस्पीटल | 2002-03 ते 2006-07, 2009-10 |
| ३२ | रुग्णवाहिका /शववाहिका | 1992-93 ते 1996-97 व 2003-04 ते 2008-09, 2009-10 |
| ३३ | आरोग्य मुख्यकार्यालय भरणा कीर्द व चलन | 2002-03 ते 2007-08, 2009-10 |
| ३४ | आर.सी .एच .बाळे | 2008-09, 2009-10 |
| ३५ | अन्न व परवाना | 1992-93 ते 1999-2000, 2002-03 ते 2006-07 ते 2009, 2009-10 |
| ३६ | खत विक्री | 1981-82 ते 1999-2000, 2006-07, 2009 |
| ३७ | आर.सी .एच .सोरेगाव | 2007-08 ते 2008-09, 2009-10 |
| ३८ | आर.सी .एच . मजरेवाडी | 2004-05 ते 2008-09, 2009-10 |
| ३९ | आर.सी .एच . विडी घरकुल | 2004-05 ते 2008-09 |
| ४० | आर.सी .एच .नई जिंदगी | 2004-05 ते 2008-09, 2009-10 |

अधिक्षक भूमी व मालमत्ता कार्यालय

| अ.नं | लेखापरिक्षणाचा तपशील | लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | झाल्याचा कालावधी |
| १ | मेजर गाळे पावती पुस्तक | 1993-94 ते 1997-98, 2005-06, 2007 ते 2009, 2009-10 |
| २ | मिनी गाळे पावती पुस्तके | 1993-94 ते 1997-98, 2005-06, 2007 ते 2009 |
| ३ | मेजर गाळे डिमांड | 1993-94 ते 1999-2000, 2005-06, 2007 ते 2009, 2009-10 |
| ४ | मिनी गाळे डिमांड | 1993-94 ते 1999-2000, 2005-06, 2004-05, 2007 ते 2009, 2009-10, 2010-11 |
| ५ | अधिकृत खोके भाडे अनधिकृत खोके दंड | 2005-06, 2007-08 ते 2008-09 , 2009-10 |
| ६ | रविवार पेठ , इमारतीचे २५६ गाळे डिमांड | 1978-79 ते 2000-01 ,2002-03 ते 2008-09, 2009-10 |
| ७ | मेजर गाळे शॉपिग सेंटर गाळे वाटप व हस्तांतरणमिनी गाळे शॉपिंग सेंटर वाटप व हस्तांतरण | 2005-06, 2007 ते 2009 , 2005-06, 2007 ते 2009, 2009-10 |
| ८ | खुला जागा भाडे वसुली | 1978-79 ते 2000-01, 2002-03, 2003-04, 2005-06 व 2007 ते 2009, 2009-10 |

## मुख्य लेखापाल कार्यालय

| अ.नं | लेखापरिक्षणाचा तपशील | लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | अॅडव्हान्स रजिस्टर तपासणी | 1976-77 ते 2000, 2001-02 ते 2003-04, 2006-07 ते 2008-09, |

| | | |
|---|---|---|
| | | 2009-10 |
| २ | डिपॉझिट रजिस्टर तपासणी | 1977-78 ते 1999-2000, 2002-03 ते 2003-04, 2006-07 ते 2008-09, 2009-10 |
| ३ | खास निधी , कर्ज ,विमा अनपेड पगार बिले जमा | 1966-76 ते 1999-2001 व 2002-03 ते 2009-10 , 2002-03 ते 2006-07 ते 2009-10 |
| ४ | गुंतवणूक | 1976-77 ते 1999-2000 व 2001-02 ते 2009-10 |
| ५ | अनुदान देणग्या व प्रा . फंड प्रा . फंड कर्ज वसुली | 1985-86, 1988-89 ते 1992-93, 1998-99 ते 2009-10, 2004-05 ते 2008-09, 2009-10 |
| ६ | डे बुक -जमा व खर्च बाजू घरबांधणी , वाहन कर्ज ,सायकल अँडव्हान्स टेंडर फॉर्म विक्रीबाबत ४ | 2002-03, 2006-07 ते 2007-08, 2008-09, 2009-10 |

मुख्य लेखापरिक्षक खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण केले जाते व जमेचे पश्चात लेखापरिक्षण केले जाते.

1. वर्ष 2010-2011 अखेर अंतर्गत लेखापरिक्षणच्या प्रलंबित आक्षेपांची संख्या 4033 इतकी आहे. अंतर्गत लेखापरिक्षण हे महानगरपालिकेच्या अंतर्गत कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे प्रभावी व महत्वपूर्ण साधन आहे.परंतु संबंधित खाती/कार्यालये कमालीची उदासिनता दाखवीत आहेत.

2. . बहुतांशी विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण प्रलंबित असल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या प्रलंबित लेखापरिक्षणामुळे कामकाजामधील त्रुटी/उणीवा वेळीचे निदर्शनास येत नाहीत. सदरहू त्रुटी/उणीवा तशाच पुढे राहून मोठया प्रमाणात अनियमितता होण्याचा संभव नाकारता येत नाही. त्यामुळे दरवर्षी सर्व विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण होणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 105(1) प्रमाणे नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी करुन त्यानंतर स्थायी समितीकडे अहवल सादर करणे आवश्यक आहे परंतु सदर बाबत मुख्यलेखापाल कार्यालय कडून जमा खर्चाचे साप्ताहिक लेखे तयार करून

मुख्य लेखापरीक्षकांकडे तपासणीसाठी दिलेले नसल्याने त्यांची तपासणी मुख्य लेखापरीक्षकांना करता आली नसल्याचे सन 2010-2011 चे अहवालावरुन दिसते. अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण केलेल्या वित्तीय वर्ष 2009-2010 पर्यंत पंचवीस विभागांची माहिती खालीलप्रमाणे आहें.

**लेखापरिक्षणाचा तपशील**

| खात्याचे /क्षेत्रीय कार्यालयाचे नाव | ले .प.पूर्ण झालेले वर्ष |
|---|---|
| करआकारणी व करसंकलन | 2009-2010 |
| आयात कर | 2009-2010 |
| आरोग्य खाते | 2009-2010 |
| भूमि व मालमत्ता | 2009-10 |
| गलिच्छ वस्ती सुधारणा | 2009-10 |
| मुख्यलेखापाल | 2009-10 |
| हद्दवाढ विभाग | 2009-10 |
| क्रिडा विभाग | 2009-10 |
| उद्यान विभाग | 2009-10 |
| मंडई विभाग | 2009-10 |
| सार्व आरोग्य अभियंता (पा .पु व म.नि ) | 2009-10 |
| विभागीय कार्यालय १ | 2009-10 |
| विभागीय कार्यालय २ | 2009-2010 |
| विभागीय कार्यालय ३ | 2009-2010 |
| विभागीय कार्यालय ४ | 2009-2010 |
| विभागीय कार्यालय ५ | 2009-2010 |

| | |
|---|---|
| विभागीय कार्यालय ६ | 2009-2010 |
| नगरअभियंता | 2009-2010 |
| अतिक्रमण | 2008-09 |
| सामान्य प्रशासन | 2009-2010 |
| अभिलेखापाल | 2009-2010 |
| कामगार कल्याण व जनतासंपर्क | 2009-2010 |
| युसीडी | 2009-2010 |
| हुतात्मा स्मृती मंदिर | 2009-2010 |
| परिवहन | 2009-2010 |

त्यापुढील लेखापरिक्षण प्रलंबित आहे .

DATRKJM5901 (Ref No : 134, Hmm No : 99)

## *34 आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधील खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 25 तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.704/अस दिनांक 23/09/2009 नुसार अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी आग सुरक्षा निधी (Fire Protection Fund) निर्माण करणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक असतांना स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येवून त्याचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे अग्निशमन विभागाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता अनियमितते बाबत अर्धसमास क्रमांक 103, दि.23/07/15 अन्वये विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने त्यांचेकडील दि.28/07/15 रोजी दिलेल्या उत्तराचा विचार करता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 25 तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. 704/अस दिनांक 23/09/2009 नुसार अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी **आग सुरक्षा निधी** (Fire Protection Fund) निर्माण करणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक आहे. त्याचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात यावे व त्यामध्ये हा निधी जमा करण्यात यावा. अशाप्रकारे आग सुरक्षा निधीमध्ये जमा होणा-या रकमेचा जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर असा सहामाही अहवाल प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलैमध्ये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार यांना पत्राव्दारे पाठवावा असे कळविण्यात आले आहे. परंतु सोलापूर मनपाने अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) सदर निधीमधून प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 च्या कलम 25(3) नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यात यावीत. काही प्रमाणात अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर खर्च भागविण्यासाठी वापरण्यात यावी. अशी तरतूद करण्यात आली आहे.सदर निधी स्वतंत्र लेखाशिर्षामध्ये ठेवला नसल्यामुळे हा निधी वरील प्रयोजानासाठीच खर्च केल्याची पडताळणी करता आली नाही.

DATDSAM7301 (Ref No : 140, Hmm No : 103)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता,
निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक
निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *35 आयकराच्या रक्कमा विलंबाने भरणा केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 343001.00/-

***आयकराची रक्कम रु.5345525 चा 1 महिना ते 15 महिने इतकी विलंबाने भरणा केल्यामुळे दंडाची रक्कम रु.343001 वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे.***

आयकर अधिनियम 1961 कलमनुसार (A) (1) 201 वसूल केलेली रक्कम पुढील महिन्याच्या 07 तारखेपर्यंत आयकर विभागाकडे भरणा करणे आवश्यक आहे .विलंबाने भरणा केलेल्या रक्कमेवर प्रतिमाह दिड टक्के दराप्रमाणे दंडाची तरतूद आहे .सोलापूर महानगरपालिकेच्या लेखा विभागाने वसूल केलेल्या आयकराचा आयकर विभागास भरणा केलेल्या नोंदवहीची पडताळणी केली असता ,खालील रक्कमा 1 महिना ते 15 महिने इतक्या विलंबाने आयकर विभागास भरणा केल्याचे दिसून आले आहे.

| वसुलीचा महिना | वसूल केलेली आयकराची रक्कम (.रु) | भरणा केल्याचा दिनांक | विलंबाचा कालावधी | दंडाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| एप्रिल2012- | 9941 | 2013/08/1 | 15 महिने | 2237 |
| मे2012- | 750603 | 2012/08/7 | महिने 02 | 22518 |
| जून2012- | 361755 | 2012/08/7 | महिना 01 | 5426 |
| जुलै2012- | 15312 | 2013/03/30 | महिने 07 | 1608 |
| | 66000 | 2013/09/18 | महिने 13 | 12870 |
| ऑगस्ट2012- | 322755 | 2013/03/07 | महिने 06 | 29048 |
| | 127351 | 2013/08/01 | महिने 11 | 21013 |
| | 6526 | 2013/09/21 | महिने 12 | 1175 |
| | 11877 | 2013/09/18 | महिने 12 | 2138 |
| | 20584 | 2013/09/01 | महिने 11 | 3396 |
| सप्टेंबर2012- | 271786 | 2013/08/01 | महिने 10 | 40768 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1117 | 2013/09/18 | महिने 11 | 1931 |
| ऑक्टोबर2012- | 605897 | 2013/01/18 | महिने 02 | 18177 |
| | 390167 | 2013/02/15 | महिने 04 | 23410 |
| | 35628 | 2013/08/01 | महिने 09 | 4810 |
| | 18406 | 2013/09/18 | महिने 10 | 2761 |
| | 5112 | 2013/09/01 | महिने 09 | 690 |
| नोव्हेबर2012- | 38481 | 2013/08/01 | महिने 08 | 468 |
| | 5385 | 2013/09/21 | महिने 08 | 646 |
| डिसेंबर2012- | 99348 | 2013/09/18 | महिने 08 | 11922 |
| जानेवारी2013- | 6663 | 2013/09/21 | महिने 08 | 799 |
| | 6093 | 2013/09/01 | महिने 08 | 731 |
| फेब्रुवारी2013- | 11316 | 2013/08/01 | महिने 04 | 679 |
| मार्च2013- | 952967 | 2013/06/27 | महिने 02 | 28589 |
| | 363 36 | 2013/07/18 | महिने 03 | 16368 |
| | 510500 | 2013/08/14 | महिने 04 | 30630 |
| | 342861 | 2013/09/18 | महिने 05 | 25715 |
| | 314758 | 2013/10/08 | 06महिने | 28328 |
| एकूण | | | | 343001 |

वरीलप्रमाणे विलंबाने भरणा केलेल्या आयकर रक्कमेवर दंडाची रक्कम वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे. याबाबत अर्ध समास क्र.5 दि.26/02/2015 अन्वये विचारणा केली असता सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने व आयकर रक्कम भरण्यास रोख निधी उपलब्ध नसल्याने आयकर रक्कम भरण्यास विलंब झाला. परंतु आयकर अधिनियमातील कलम 201(1A) नुसार आयकरापोटी वसूल केलेल्या रक्कमा रक्कम प्रदान झाल्यापासून 7 दिवसाचे आत आयकर विभागाकडे चलनाव्दारे भरणे आवश्यक आहे. त्यामुळे विभागाचे उत्तर संयुक्तिक नाही. तरी सदर दंडाची रक्कम रु.343001/-चलनाने आयकर विभागाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रु.343001/-

DATVCSM6501 (Ref No : 3, Hmm No : 05)

### *36 भविष्य निर्वाह निधीमधील मुदत ठेवीवर व्याजाची रक्कम कमी मिळालेलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

Solapur (M Corp.)

**No. of Irregularities: 3**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 44389.00/-

***सोलापूर मनपाने कर्मचा-यांचे भ.नि.नि.ची रक्कम मुदत ठेव स्वरुपात देना बँकेमध्ये ठेवण्यात आले असून त्यावर रक्कम रु.44389/- कमी व्याज मिळाले आहे. डे बुकमध्ये जमा व खर्च रकमा नमूद केल्या नाहीत. खर्चाच्या रकमांची बेरीज करुन शिल्लक काढणेत आली नाही. डे बुकमध्ये मुदत ठेव पावत्याची रक्कम नोंदविण्यात आली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेचे कर्मचारी/अधिकारी यांचे भविष्य निर्वाह निधी रकमेचे डेबुक व मुदत ठेव पावती पुस्तकातील 2012-13 आर्थिक वर्षाचे नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.12 दि.26/02/2015 अन्वये खात्यास विचारणा केली असता खात्याने कार्यवाही करणेत येत आहे असे कळविले आहे. त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.सोलापूर महानगरपालिकेने कर्मचारी/अधिकारी यांचे वेतनातून कपात केलेली भ.नि.निधीची रक्कम आय.सी.आय.सी.आय. रेल्वे लाईन रोड,सोलापूर शाखेतील खाते क्र.019905850008 मध्ये जमा केली जाते. सदर खात्यातील शिल्लक रकमेपैकी 2012-13 आर्थिक वर्षात रक्कम रु.20,95,31,998.78 इतकी रक्कम निरनिराळया बँकेमध्ये 21 मुदत ठेव पावती स्वरुपात गुंतवणूक करण्यात आली आहे. त्यापैकी खाली नमूद केलेल्या देना बँकेतील मुदत ठेवीच्या रकमेवर बँकेने कमी व्याज दिलेले आहे.

| मुदतठेव पावती क्र. | गुंतवलेली रक्कम | मुदत | व्याज दर टक्के | बँकेने द्यावयाचे व्याज | प्रत्यक्ष दिलेली रक्कम (व्याज) | कमी व्याज मिळलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1761023973 | 6500000 | 1 वर्ष 7 दिवस | 9.15 | 606156 | 585000 | 21156 |
| 1761023974 | 7138243 | 1 वर्ष 7 दिवस | 9.15 | 665675 | 642442 | 23233 |
| एकूण | | | | | | 44389 |

2. दररोज जमा व खर्च होणारी रक्कम डे बुकमध्ये नोंदवून अखेरीची शिल्लक काढणे आवश्यक आहे. परंतु सदर डे बुकमध्ये जमेच्या रकमांच्या नोंदी करण्यात आल्या नाहीत. तसेच खर्चाच्या रकमांची बेरीज करण्यात आली नाही. डे बुकमध्ये अखेरची शिल्लक काढणेत आली नसल्याने शिल्लकेनुसार खर्च करणेत आले असल्याची खात्री करता आली नाही.

3. मुदत ठेवीने गुंतवलेली रक्कम व मुदतीनंतर जमा रक्कम डे बुकामध्ये दर्शविणे आवश्यक आहे. परंतु डे बुकमध्ये खात्याने मुदत ठेवपावतीची रक्कम गुंतवतेवळी खर्चाचे बाजूस व मुदत संपल्यानंतर जमेच्या बाजूस दर्शविणेत आली नाही. त्यामुळे गुंतविलेल्या व गुंतवणूक नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या सर्व मुदत ठेवीच्या पावत्यांची नोंद झाली असल्याची खात्री करता येत नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 15, Hmm No : 12)

## *37 निवृतीवेतन निधीमधील रक्कम कमी व्याज दराने गुंतवणूक केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 10000.00/-

***निवृत्तीवेतन निधीमधील रक्कमेची पुनर्गुंतवणूक करतांना प्राप्त दरपत्रकातील व्याज दरापेक्षा कमी व्याजदराने गुंतवणूक केल्यामुळे मनपाचे व्याजापोटी रु,10000 चे नुकसान झाले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेतील पेन्शन विभागात ठेवण्यात आलेल्या गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता, खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

1. निवृत्ती वेतन निधीमधील गुंतवण्यात आलेली रक्कम रु.4000027 दिनांक 29/04/2012 रोजी उपलब्ध होणार असल्याने सदर रक्कमेची पुनर्गुंतवणूक करण्यासाठी विविध बँकांची व्याज दराची दरपत्रके मागवून जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या कार्पोरेशन बँकेत 9.75% दराने गुंतवणूक करण्यास मा.आयुक्त यांनी दिनांक 24/04/2012 रोजी मंजुरी दिली आहे. परंतु विभागाने दिनांक 2/05/2012 रोजी इंडियन बँकेत 9.5 % दराने गुंतवणूक केली आहे. विभागाने दिनांक 29/04/2012 रोजी कार्पोरेशन बँकेत गुंतवणूक न केल्याने 0.25% दराप्रमाणे मनपाचा रु.10,000 फायदा होवू शकला नाही, परंतु कमी व्याज दराने गुंतवणूक केल्याने मनपाचे

रु.10,000 व्याजापोटी नुकसान झाले आहे.तसेच मंजुरीप्रमाणे गुंतवणूक केलेली नाही.

या बाबत अर्धसमास पत्र क्र.02 दि.26/02/15 अन्वये विचारणा केली असता, कॉर्पोरेशन बँकेमेध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवीची मुदत 29/04/12 रोजी संपुष्टात येणार असल्याने पुनश्च व्याजदर मागविण्यात आले व कॉर्पोरेशन बँकेने दिनांक 02/05/12 रोजी व्याजदर 9.25% प्रमाणे नमूद केले आहे. त्यामुळे जास्त व्याजदर देणाऱ्या इंडिअन बँकेमध्ये गुंतवणूक केली असल्याचे नमूद केले आहे. विभागाचे अनुपालन संयुक्तिक नसून, 24/04/12 रोजी आयुक्तांनी मंजुरी दिलेल्या व्याजदरानुसार कॉर्पोरेशन बँकेत 9.75% दराप्रमाणे दि.29/04/15 पासून पुनर्गुंतवणूक करणे आवश्यक होते. तथापि, मुदत संपल्यानंतर 02 दिवस विलंबाने दि. 2/5/12 रोजी पुनश्चः व्याजदर मागविण्यात आले. व प्राप्त व्याज दरानुसार गुंतवणूक केल्याने महानगरपालिकेचे रु.10000 च्या महसुलाचे नुकसान झाले आहे.

वसूलपात्र रु10000.

DATVCSM6501 (Ref No : 16, Hmm No : 02)

## *38 मक्तेदारांच्या देयकातून कमी दराने व्हॅट वसूल केल्याने झालेल्या रु.5129050 इतक्या रक्कमेच्या आर्थिक नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 5129050.00/-

***मक्तेदाराचे देयकातून मूल्यवर्धित कराची रक्कम कमी दराने वसूल केल्याने शासनाचे रु5129050 इतक्या रक्कमेचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील अधिसूचना दिनांक 4 एप्रिल 2012 नुसार दिनांक 1/04/2012 पासून अनोंदीत मक्तेदाराकडून व्हॅट ची रक्कम 4% ऐवजी 5% वसूल करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेतील लेखा विभागात ठेवण्यात आलेल्या व्हॅट वसुली व भरणा नोंद्वहीची तपासणी केली असता, 2012-13 मध्ये अनोंदीत मक्तेदारांना दिलेल्या प्रदानातून 5% ऐवजी 4% प्रमाणे व्हॅट वसूल करून शासन भरणा केला आहे. त्यामुळे शासनाचे महसुलाचे खालील प्रमाणे नुकसान झाले आहे.

| महिना | एकूण झालेले | वसूल करावयाची | वसूल केलेली | कमी वसूल |
|---|---|---|---|---|

Solapur (M Corp.)

| | प्रदान (रु.) | रक्कम (5%) (रु.) | व्हॅटची रक्कम (4%) रु. | केलेली रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| एप्रि-2012 | 52466 | 2623 | 2099 | 524 |
| मे-2012 | 7143250 | 35186 | 285749 | 71437 |
| जून -2012 | 3106525 | 155326 | 124261 | 31065 |
| जुलै -2012 | 9069921 | 453496 | 362797 | 90699 |
| ऑगस्ट- 2012 | 15137300 | 756865 | 605492 | 151373 |
| सप्टेंबर- 2012 | 26838625 | 1341931 | 1073545 | 268386 |
| ऑक्टो- 2012 | 412861573 | 20643079 | 16514463 | 4128616 |
| नोहेंबर- 2012 | 974345 | 8717 | 38974 | 9743 |
| डिसेंबर- 2012 | 5214350 | 260717 | 208574 | 52143 |
| मार्च- 2013 | 32506400 | 1625320 | 1300256 | 325064 |
| एकूण | | | | 5129050 |

वरील प्रमाणे कमी वसूल केलेली व्हॅटची रक्कम रु 5129050.वसूल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे.याबाबत अर्धसमास पत्र क्र.05 दि,26/02/2015 अन्वये कळविले असता लेखा विभागाने त्यांचे अनुपालनात मक्तेदाराकडून दि.1/04/2012 पासून व्हॅट कराची रक्कम 4% ऐवजी 5% प्रमाणे वसूल करण्यात येईल असे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात वसुली बाकी आहे. वरील आक्षेप कायम करण्यात येत असून कमी वसूल केलेली रक्कम रु.5129050 वसूलपात्र असल्याने सबब सदरची रक्कम वसूल करून शासनास चलना व्दारे भरणा करणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रु.5129050

DATVCSM6501 (Ref No : 18, Hmm No : 05)

## *39 कर्मचारी/अधिकारी यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यातील नोंदीच्या त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*अनियमितता कलम : 9ब*

***कर्मचा-याचे भ.नि.नि.ची वसुलीच्या तक्त्यामध्ये मूळ वेतन नमूद केले नसल्या वितलब्धीच्या किमान 6 टक्के***

***वर्गणी वसुल केल्याची खात्री करता आला नाही. खात्याकडील वसुली तक्ता नसताना कर्मचा-याच्या भ.नि.नि.च्या खात्यामध्ये नोंद करण्यात आल्या आहेत. वजाती किर्द नोंदवहीतील रकमा व खात्याने वसुली तक्त्यातील रकमा यामध्ये रु.4500/- तफावत असल्याचे दिसून आले.***

सोलापूर महानगरपालिकेचे कर्मचारी/अधिकारी यांचे भ.नि.निधीचे खात्यातील माहे मार्च 2013 मधील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.15 दि.09/03/2015 अन्वये खात्यास विचारणा केली होती. त्यानुसार खात्याने अर्धसमास पत्रावर केलेले अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)खात्याने देयकाबरोबर सादर केलेल्या भ.नि.निधी वसुली तक्त्यामध्ये कर्मचा-यांचे मुळ वेतन व ग्रेड पे नमूद केला नसल्याने त्याचे किमान 6 टक्के वर्गणी वसुल केली असल्याची खात्री करता येत नाही. तसेच अग्रीम वसुलीबाबत वसुलीचा हप्ता क्रमांक नमूद करण्यात आलेला नाही.

भ.नि.नि. वर्गणीबाबत सूचना करण्यात आल्या असून सूचना पत्र सोबत सादर केले आहे असे नमूद केले आहे.

खात्याने सूचना पत्राची प्रत सोबत सादर केली नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2. 2012-13 आर्थिक वर्षाचे कपातीची किर्द नोंदवहीतील नोंदीशी पडताळणी केली असता माहे फेब्रुवारी पेड इन मार्च 2013 मध्ये वेतनातुन भ.नि.नि.ची वसुली तक्ता संबंधीत खात्याकडून लेखा शाखेस प्राप्त झाले नसताना संबंधीत कर्मचा-याच्या खात्यामध्ये रक्कम जमा करण्यात आली आहे. खाली नमूद केलेल्या कर्मचा-यांची रक्कम संबंधीत खात्याकडून वसुली तक्ता प्राप्त करुन घेवून संबंधीत कर्मचा-याच्या खात्यामध्ये रक्कम जमा दाखविणेत आली आहे. तरी भ.नि.नि. ची रक्कम त्यांचे वेतनातून वसुल करुन ती वसुली 2012-13 या आर्थिक वर्षामध्येच वसुल करणेत आली आहे याची खात्री पटवावी.

सदरच्या नोंदी अनावधानाने राहून गेलेल्या असून त्या नोंदी घेण्यात आल्याचे खात्याने कळविले आहे.

सदरचे अनुपालन लेखा परीक्षणास दाखविण्यात आले नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | कर्मचा-याचे नांव | वर्गणी रक्कम | अग्रीमाची रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | विदयुत विभाग | 1.एस.एच. गायकवाड | 600 | -- | 600 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2. पी. बी. ठगे | 500 | -- | 500 |
| | | 3. आर. एम. परदेशी | 3000 | 3000 | 6000 |
| | | 4. एस. एस. आळकुंटे | 1000 | -- | 1000 |
| | | 5. एन. एम. कंदीकटली | 800 | -- | 800 |
| | | 6. बी. एस. बाबरेक | 700 | -- | 700 |
| | | 7. एस. डी. कालेकर | 500 | 600 | 1100 |
| | | 8. इ. एम. सुरवसे | 600 | -- | 600 |
| | | 9. एल. जी. सगर | 500 | -- | 500 |
| 2. | ड्रेनेज विभाग | 1.के. एस. पाटील | 500 | -- | 500 |
| | एकूण | | 8800 | 3600 | 12400 |

3. माहे फेब्रुवारी 2013 पेड इन मार्च 2013 चे वेतन देयकातील वजातीच्या रकमांची नोंद ही वजातीच्या किर्द नोंदवहीमध्ये करणेत येत आहे. किर्द नोंदवहीतील रक्कम व खात्याकडून प्राप्त झालेल्या कर्मचा-या निहाय तक्त्यामधील एकूण रक्कम याचा ताळमेळ घेणेत येत नाही. किर्द नोंदवहीतील रक्कम व खात्याकडून प्राप्त झालेला वजाती तक्त्यामधील रक्कम यामध्ये रु.4500/- ची तफावत आढळुन आली. तफावतीबाबत स्पष्टीकरण देणेत यावे.

सदरच्या वजाती ह्या संबंधीत खात्याकडील माहे फेब्रुवारी 2013 चे वेतन देयकावरुन पडताळणी करण्यात आली असल्याचे कळविले आहे.

वजातीच्या रक्कमा पडताळणी केले असल्याबाबतचे संबंधीत खात्याकडून वजातीचे खाते प्रमुखाच्या सही शिक्यासह वजातीचे तक्ते घेणेत आलेले नाहीत. विभागाने दिलेल्या वसुली तक्त्यापेक्षा कमी जास्त रक्कमा संबंधीत कर्मचा-याच्या खात्यामध्ये जमा करणेत आले आहेत. वसुली तक्त्यामधील एकूण रक्कम पहाता रु.4500/- वसुलपेक्षा जादा रक्कम जमा करण्यात आलेचे दिसून येत आहे.

उदा. खालीलप्रमाणे असे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | वसुल तक्त्यनुसार असणारी रक्कम | | किर्दमध्ये नमूद केलेली रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | वर्गणी | अग्रीमाचा | वर्गणी | अग्रीमाचा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हप्ता | | हप्ता |
| 1. | झोन नं. 7 | 15500 | 3250 | 15100 | 3250 |
| 2. | झोन नं. 8 | 12300 | 8500 | 17800 | 8500 |
| 3. | मदर तेरेसा दवाखाना | 8400 | 1500 | 7700 | 1500 |
| 4. | पंडित नेहरु | 1200 | -- | 600 | 600 |
| 5. | शास्त्री दवाखाना | 7200 | 1000 | 7200 | 1100 |
| 6. | टागोर दवाखाना | 3000 | -- | 1200 | 1800 |
| 7. | डी. एस. | 7400 | 6600 | 8100 | 5900 |
| | एकूण | 55000 | 20850 | 57700 | 22650 |

DGPKVSM6101 (Ref No : 20, Hmm No : 15)

## *40 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील त्रुटीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9ब*

***दि.01/11/2005 नंतर नेमणूक केलेल्या सेवकाचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केलेले नाही व त्यांचे अंशदान खाते उघडणेत आलेले नाही.***

सोलापूर महानगरपालिका कर्मचा-यांचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे लेखा परिक्षणात आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 16 दि.09/03/2015 अन्वये विचारणा केली होती. त्यानुसार प्राप्त अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.
1.शासन निर्णय क्र.अनियो/1005/126/सेवा-4 दि. 31/10/2005 नुसार 01/11/2005 रोजी किंवा

त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेने सदरची योजना लागू केली आहे. मनपाने दि.01/11/2005 रोजी व नंतर किती कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली आहे व त्यानंतर किती कर्मचा-याचे खाते उघडणेत आली आहे. तसेच ज्या कर्मचा-यांची खाती उघडणेत आली आहेत त्यांची नेमणूकीच्या तारखेपासून कोणत्या दराने वर्गणी वसुल केली आहे याची माहिती देण्यात यावी.

दि. 01/11/2005 नंतर मनपाने 5 सेवक सेवेत समाविष्ट (वेतनश्रेणीत नेमणूक झालेले) केल्याचे खात्याने कळविले आहे.

सेवकाची कोणत्या आदेशान्वये व कशाप्रकारे सेवा समाविष्ट करण्यात आली आहे याचा तपशील देण्यात आला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 21, Hmm No : 16)

## *41 अग्रीम नोंदवहीतील त्रुटीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 7**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 503738805.00/-

***पुर्वीचा अग्रीम समायोजित झालेशिवाय पुढील अग्रीम देण्यात येवू नये असे असताना मागील अग्रीमांचे समायोजन प्रलंबित असताना खात्यास अनेक अग्रीम मंजूर करुन अदा करणेत आले आहेत. नोंदणीकृत ठेकेदाराची त्यांच्या वर्गवारीनुसार तेवढया रकमेपर्यंत काम करण्याची क्षमता असताना ठेकेदारास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर काम करण्यासाठी खात्यामार्फत सर्रास अग्रीम देणेत आला आहे. अग्रीम नोंदवहीतील नोंदी हया प्रत्यक्ष अग्रीम कोणत्या प्रमाणकाव्दारे अदा करणेत आली आहे ते प्रमाणक क्रमांक नमूद न करता अग्रीम मंजूर केलेल्या आदेश क्रमांकानुसार नोंदी केल्या आहेत. त्यामुळे डेबुकानुसार प्रत्यक्ष अदा करणेत आलेली अग्रीमे व अग्रीम नोंदवहीतील नोंदी यामध्ये रु. 86,77,673/- ची तफावत दिसून येते. नोंदवहीमध्ये मागील प्रलंबित अग्रीमाच्या नोंदी केल्या जात नाहीत. नोंदवहीच्या शेवटी नोंदवहीत किती पाने समाविष्ट आहेत याबाबत दाखला देणेत आलेला नाही. नोंदवहीतील पान नं.58 व 59 आढळुन आले नाहीत. नगर अभियंतास माहे मार्च 2013 मध्ये देणेत आलेल्या अग्रीमाच्या नोंदवहीमध्ये नोंदी नाहीत.***

सोलापूर महानगरपालिका लेखा विभागामार्फत ठेवण्यात आलेल्या अग्रीम नोंदवहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.18 दि.11/03/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) पूर्वीचे अग्रीम समायोजन झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देवू नये असे मनपाने दि.24/04/2015 अन्वये परिपत्रक काढले आहे. पुर्वीचा अग्रीम समायोजित झालेशिवाय पुढील अग्रीम देण्यात येवू नये असे असताना लेखा विभागाने मागील अग्रीमाचे समायोजन बाकी असताना एकाचवेळ अनेक अग्रीमे खालीलप्रमाणे मंजूर करुन अदा करणेत आले आहेत.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दि. | खात्याचे नाव | तपशील | अग्रीमाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | 2031/9.3.2013 | नगर अभियंता | होटगी रोड व पगॅली रस्ता सुधारणा | 22300 |
| | 2032/9.3.2013 | नगर अभियंता | आयुक्त बंगला दुरुस्ती | 13700 |
| | 2044/11.3.2013 | नगर अभियंता | ऑईल खरेदी | 21962 |
| | 2045/11.3.2013 | नगर अभियंता | ऑईल खरेदी | 22618 |
| | 2046/11.3.2013 | नगर अभियंता | ऑईल खरेदी | 22552 |
| | 2047/11.3.2013 | नगर अभियंता | वाहन दुरुस्ती | 16461 |
| | 2048/11.3.2013 | नगर अभियंता | ऑईल खरेदी | 23240 |
| | 2049/11.3.2013 | नगर अभियंता | ऑईल खरेदी | 22456 |
| | 2100/11.3.2013 | नगर अभियंता | रस्ता दिवे साहित्य खरेदी | 2078262 |
| | 2661/25.3.2013 | नगर अभियंता | गटर, चेंबर दुरुस्ती | 22200 |
| | 2662/25.3.2013 | नगर अभियंता | गटर, चेंबर दुरुस्ती | 22100 |
| | 2663/25.3.2013 | नगर अभियंता | गटर, चेंबर दुरुस्ती | 22000 |
| 2. | 2372 ते 2428/19.3.2013 | सार्व. आरोग्य अधिकारी | वाहन दुरुस्ती | 1060279 |
| | 2557 ते 2560/21.3.2013 | सार्व. आरोग्य अधिकारी | वाहन दुरुस्ती | 30162 |
| 3. | 2444/19.3.2013 | विभागीय अधिकारी क्र. 8 | प्र.क्र.36 ड्रेनेज लाईन घालणे | 99838 |
| | 2445/19.3.2013 | | प्र.क्र.36 ड्रेनेज लाईन घालणे | 99838 |
| 4. | 2687/25.3.2013 | विभागीय अधिकारी क्र.6 | टेबल खरेदी | 13800 |
| | 2688/25.3.2013 | | कपाट खरेदी | 20760 |
| | 2689/25.3.2013 | | खुर्च्या खरेदी | 9600 |
| 5 | 2692/25.3.2013 | विभागीय | शिव जयंती स्पर्धा | 9600 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिकारी क्र.1 | | |
| | 2693/25.3.2013 | | मेघडंबरी मांडव घालणे | 32000 |
| | 2694/25.3.2013 | | पुतळयास रंग देणे | 15000 |
| 6 | 2335/19.3.2013 | अग्नीशामक दल | वाहन दुरुस्ती | 23635 |
| | 2336/19.3.2013 | | वाहन दुरुस्ती | 26777 |
| | 2498/21.3.2013 | | वाहन दुरुस्ती | 22662 |
| | 2499/21.3.2013 | | वाहन दुरुस्ती | 22187 |

2. नोंदणीकृत ठेकेदाराची त्यांच्या नोंदणीकृत वर्गवारीनुसार तेवढया रकमेपर्यंत काम करण्याची क्षमता असताना ठेकेदारास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर काम करण्यासाठी खात्यामार्फत सर्रास अग्रीम देणेत आला आहे हे नियमबाहय आहे. माहे मार्च 2013 मध्ये खाली नमूद केलेल्या खात्यास अग्रीमे देणेत आली आहेत.

उदा. नगर अभियंता - रस्ता खड्डे दुरुस्ती, गटार, चेंबर दुरुस्ती.

विभागीय कार्यालय - ड्रेनेज लाईन घालणे, पुतळे सुशोभिकरण करणे.

महापालिकेतील काही सेवा अत्यावश्यक असल्याने क्वचित प्रसंगी अग्रीम देणेत आले आह असे खात्याने कळविले आहे.

खात्याने दिलेला खुलासा हा मोघम स्वरुपाचा असल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

3.अग्रीम नोंदवहीतील नोंदी हया प्रत्यक्ष अग्रीम कोणत्या प्रमाणकाव्दारे अदा करणेत आली आहे ते प्रमाणक क्रमांक नमूद न करता अग्रीम मंजूर केलेल्या आदेश क्रमांकानुसार नोंदी केल्या आहेत. आदेशानुसार प्रत्यक्ष अग्रीम संबंधीताना दिले किंवा कसे याची खात्री केली जात नाही. त्यामुळे अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेले अग्रीमे व डे बुकानुसार अदा करण्यात आलेली अग्रीमे या रकमेमध्ये तफावत आढळुन येत आहे. माहे मार्च 2013 मध्ये डे बुकानुसार रु.1,74,49,792/- इतकी रक्कम अदा केली असता अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदवण्यात आलेली रक्कम रु.99,06,775/- इतकी आहे. त्यामुळे रु.86,77,673/- इतके रकमेची तफावत दिसून येत आहे. म्हणजेच डे बुकानुसार खर्च करण्यात आलेली रक्कम ही लेखाशिर्षा- निहाय मासिक लेखे जुळविण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. अग्रीम नोंदवहीमध्ये प्रत्यक्ष अदा केलेल्या अग्रीमाच्या नोंदी होत नसल्याचे दिसून येते.

अग्रीम दिल्यानंतर अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदी करण्याची दक्षता घेणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे.

आक्षेपानुसार खात्याने याबाबत अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

4. अग्रीम नोंदवहीमध्ये अग्रीमे नोंदविण्यापुर्वी प्रथम त्या खात्याकडे पुर्वीचे वर्षनिहाय किती अग्रीमे प्रलंबित आहेत याच्या नोंदी करुन चालू वर्षात मंजूर केलेली अग्रीम नोंदविणे आवश्यक आहे. परंतु तसे न करता प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली असून त्यामध्ये त्याच आर्थिक वर्षामध्ये

मंजूर केलेली अग्रीमाची नोंद करण्यात येत आहे. आर्थिक वर्ष संपल्यानंतर संबंधीत खात्याने किती अग्रीमे समायोजित केली आहेत व किती अग्रीमे प्रलंबित आहेत याचा गोषवारा काढला जात नाही. तसेच मागील प्रलंबित अग्रीमाबाबत समायोजित करण्यासाठी पाठपुरावा केला जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मनपा स्थापन झालेपासून मार्च 2013 अखेर वर्षनिहाय मंजूर अग्रीम, अग्रीमाचे प्रयोजन, समायोजित अग्रीम व प्रलंबित अग्रीम समायोजन मागितली असता 2003-04 पासुन पुढील कालावधीची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली.

खात्याने दिलेला प्रलंबित अग्रीमाची माहिती ही कोणत्या वर्षा अखेरची आहे याचा उल्लेख केलेला नाही. प्रलंबित अग्रीमे ही सन 2003-04 पासुनची देण्यात आली आहेत.

खात्याने दिलेल्या  माहितीनुसार सन 2003-04 ते 2012-13 अखेर एकूण रक्कम रु.50,37,38,805/- इतके प्रलंबित अग्रीमे आहेत. सदरची अग्रीमे ही प्रदीर्घकाळ प्रलंबित असल्याने व ती पुढील नोंदवहीमध्ये मागील प्रलंबित नोंदी घेतलेल्या नाहीत. तरी सदरच्या रकमा व्याजासहीत वसुल करुन समायोजन करण्यात यावे व सदर लेखा अद्यावत करावा. सन 2003-04 पूर्वीची अग्रीमे प्रलंबित नसल्याचा उल्लेख करण्यात आला नाही. तसेच आक्षेपानुसार नोंदवहीतील नोंदीबाबत अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5. सन 2012-13 चे अग्रीम नोंदवहीमध्ये एकूण किती पाने आहेत याबाबत शेवटच्या पानावर दाखला देणेत आलेला नाही. तसेच प्रत्येक पानावर मनपाचा मोहोर उमटविण्यात आला नाही.

6. सन 2012-13 चे अग्रीम नोंदवहीमधील पान क्र. 58,59 ही पाने काढण्यात आली आहेत. त्यावरील नोंदीची तपासणी करता आली नाही. नोंदवहीतील पाने इतरत्र असल्याने ती नोंदवहीत डकवणेत आली आहेत असे खात्याने कळविले आहे.

सदरची पाने लेखापरीक्षणास दाखविणेत आली नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

7. नगर अभियंता यांना माहे मार्च 2013 मध्ये मंजूर केलेल्या खाली नमूद केलेल्या अग्रीमाच्या नोंदी अग्रीम नोंदवहीमध्ये नमूद केल्याचे दिसून येत नाही.

| अ.क्र. | आज्ञापत्र क्र. | दिनांक | रक्कम रु. | अग्रीम मंजूर केल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| 1. | 1834 | 01/03/2013 | 16,461/- | वाहन क्र.एमएच13-आर 6115 ऑईल टॉपअप करणे |
| 2. | 1835 | 1) - | 22,552/- | जेसीबी याची दुरुस्ती करणे. |
| 3. | 1836 | 3) - | 22,618/- | वाहन क्र.एमएच13-आर6560 ऑईल खरेदी करणे |
| 4. | 1837 | 4) - | 21,962/- | वाहन क्र.एमएच13-एएच7272,6115 यांना ऑईल खरेदी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | 1838 | 5) - | 22,456/- | वाहन क्र.एमएच13 आर6115 ऑईल खरेदी. |
| 6. | 1839 | 6) - | 23,240/- | वाहनासाठी ऑईल खरेदी करणे. |
| 7. | 1844 | 05/03/2013 | | 3 डी जेसीबी संपूर्ण इंजिन दुरुस्ती करणे |
| 8. | 1845 | 7) - | | 16 एमटी लूज डांबर खरेदी करणे. |

DGPKVSM6101 (Ref No : 22, Hmm No : 18)

## *42 भविष्य निर्वाह निधीमध्ये शिल्लक कमी असल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 3**

*अनियमितता कलम : 9ब*

***सेवकाच्या भ.नि.नि.च्या शिल्लक रक्कमेबाबत त्यांना वार्षिक शिल्केचे विवरणपत्र (Slip) देण्यात आले नाही. सेवकाच्या वेतनातून वसुल करण्यात आलेली वसुलीच्या तक्त्यानुसार व दरमहा ब्रॉड शीटवर नोंदी घेण्यात आल्या नाहीत. भनिनि खात्यामध्ये देणेपेक्षा रक्कम रु.37721432/- कमी आहे.***

सोलापूर महानगरपालिका लेखा विभागामार्फत ठेवण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधीचे डे बुकातील शिल्लक व कर्मचा-यांचे भ.नि.नि.खात्यामधील शिल्लक रकमेची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.19 दि.11/03/2015 अन्वये विचारणा केली असता आक्षेपानुसार कार्यवाही केल्याचे नमूद केले आहे. परंतु त्याबाबतचे कागदपत्रे सादर केली नाहीत. तसेच तफावतीबाबत खुलासा समर्पक करण्यात आला नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)आर्थिक वर्ष संपल्यानंतर सेवकाच्या भ.नि.नि. खात्यामधील जमा रक्कम व त्याच्यावरील व्याजाच्या शिल्लकेचे वार्षिक विवरणपत्र (Slip) देणे आवश्यक आहे. परंतु 2012-13 या आर्थिक वर्ष संपल्यानंतर सेवकास भ.नि.नि.मधील शिल्लक रकमेची स्लीप दिली नसल्याचे आढळून आले आहे.

सेवकास भनिनिमध्ये शिल्लक रकमेबाबत वार्षिक स्लीप दिली नसून पासबुक भरुन देणेत

आल्याचे कळविण्यात आले आहे.

खुलाशानुसार लेखापरीक्षणास पासबुके दाखविण्यात आलेली नाहीत.

2. सेवकाच्या वेतनातून वसुल करण्यात आलेली वसुलीच्या तक्त्यानुसार व दरमहा ब्रॉड शीटवर नोंदी घेणे आवश्यक आहे. अशी सोलापूर मनपामध्ये सेवकांचे ब्रॉड शीट ठेवलेले नाही.

सन 2012-13 चे ब्रॉडशीट ठेवण्यात आल्याचे खात्याने कळविले आहे. परंतु खुलासानुसार अनुपालन लेखापरीक्षणास दाखविणेत आलेले नाही.

3. भविष्य निर्वाह निधीचे आयसीआयसीआय बँकेमध्ये स्वतंत्र बँक खाते क्र.019905850008 असून सदर खात्यामध्ये बँक स्टेटमेंटनुसार दि.31/03/2013 रोजी रक्कम रु.4,93,869.73 आहे. व भविष्य निर्वाह निधीमधून मुदत ठेव स्वरुपात सन 2012-13 मध्ये रक्कम रु.20,95,31,998.78 इतकी गुंतवणुक करण्यात आली असून असे एकूण रक्कम रु.21,00,25,868.51 इतकी भ.नि.नि. चे खात्यामध्ये शिल्लक आहे. सोलापूर मनपाचे कर्मच्या-याची भ.नि.नि. खाते नोंदवहीतील नोंदीप्रमाणे वर्गणीदाराच्या खात्यातील शिल्लक रक्कम रु.24,77,47,299/- इतकी आहे. भ.नि.नि. खात्यामध्ये कर्मचा-याना देय रकमेपेक्षा रु.3,77,21,432/-- इतकी रक्कम कमी शिल्लक आहे व त्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही.

मनपाची आर्थीकस्थिती बिकट असल्याने सेवकाच्या वेतनातून कपात केलेल्या रकमा उशीराने देण्यात आलेले आहेत असे खात्याने कळविले आहे.

खात्याच्या अनुपालनानुसार रकमा कधी जमा केल्या आहेत याबाबत सविस्तर तपशील देणेत आला नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 23, Hmm No : 19)

## *43 UIDSSMT निधीचे रोखवहीशी बँक खाते पासबुकाचा ताळमेळ घेतला नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***UIDSSMT निधीचे रोखवहीत मार्च 2013 अखेर शिल्लक काढली नसून रोखवहीनुसार शिल्लक व बँक पासबुकनुसार शिल्लक याचा ताळमेळ घेण्यात 2012-13 मध्ये घेण्यात आला नाही.***

सोलापूर महानगरपालिकेकडील UIDSSMT या निधीच्या रोखवही व बँक खात्याची तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमिततााबाबत अर्धसमास पत्र क्र. 26 दि. 31/03/2015 अन्वये कळविण्यात आले होते विभागाने त्याचे अनुपालन दिनांक 01/04/2015 रोजी सादर केले आहे सदर निधीसाठी स्वतंत्र बँक खाते सिंडीकेट बँक शाखा सोलापूर येथे फ्लेक्सी स्वरुपातील असुन त्याचा क्रमांक 54301130000010 आहे. सदर निधीचे स्वतंत्र डे बुक ठेवण्यात आले आहे. परंतु ते विहीत नमुन्यात नसुन ते `चेकचे नोंदबुक` या नोंदवहीत लिहिले आहे. सदर नोंदवहीत खर्चाचे व्यवहार नोंदविले आहेत. परंतु जमा रकमेचे व्यवहार नोंदविले नाहीत. दैनंदिन जमा व खर्चाचे व्यवहार नोंदवून शिल्लक रक्कम काढली नाही. सदर रोखवहीत सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या नाहीत व सदरची रोखवही प्रमाणित केली नाही. तसेच सदर नोंदवहीत काही कोरी पाने सोडली आहेत.नोंदवहीत रोजचे रोज अखेर शिल्लक काढली नसून नोंदवहीनुसार शिल्लक व बँक पासबुकानुसारशिल्लक याचा ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे शिल्लक रकमेच्या अचूकतेबाबत परीक्षणास खात्री करता आली नाही.

राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावली 2005 मधील परिछेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपद्धतीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिनाअखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या नोंदीबरोबर बँक पासबुक / विवरणपत्र नोंदीशी तुलना करून महिनाअखेरीचे शिलकेचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 93, Hmm No : 26)

## *44 म.न.पा.निधी (जनरल फंड ) च्या रोखवही ( किर्द ) मधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***राष्ट्रीय लेखा संहिता नियमावली 2005 मधील परिच्छेद क्र. 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या नोंदीबरोबर बँक पासबुक / विवरणपत्र नोंदीची तुलना करुन ताळमेळ घेणे आवश्यक आहे परंतु महानगरपालिकेकडील जनरल फंडाच्या रोख वही (डे बुक) मध्ये दैनंदिन आरंभी शिल्लक नमूद केली नसून दिवसअखेर शिल्लक काढली नाही. व बँक पासबुकानुसार शिल्लक रकमेशी दरमहा ताळमेळ घेतलेला नाही. डे बुकास दिवस अखेरची शिल्लक काढली नसल्याने सदर निधी मधील शिल्लक बाबत लेखा परीक्षणास खात्री***

***करता आली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेकडील वित्तीय वर्ष 2012 -13 चे लेखापरीक्षणा मध्ये माहे मार्च 2013 या महिन्याची म.न.पा. निधी (जनरल फंड) च्या रोकडवहीची तपासणी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या याबाबत अर्धसमास पत्र क्र. 8 दि. 26/02/2015 अन्वये कळविण्यात आले होते. विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये रोखवही दि.01/04/2014 पासून विहित नमुन्यात ठेवण्यात आली असून सूचनेप्रमाणे कार्यवाहीत सुधारणा झाली आहे असे नमूद केले आहे.सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.सदरची रोखवही (डे बुक) राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता नियमावली नुसार विहित नमुन्यात ठेवण्यात आली नाही.

2.सदर डे बुकास जमा बाजूची नोंद रोजचे रोज घेतली नसून मासिक गोषवाऱ्यामध्ये एकदम जमा दाखविली आहे.

3.डे बुक मध्ये दैनंदिन आरंभी शिल्लक नमूद केली नसून दिवस अखेर शिल्लक काढली नाही. डे बुकास शिल्लक काढली जात नसल्याने सदर निधी मधील शिल्लक बाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.

4.डे बुक मध्ये जमा खर्चाचे व्यवहार ज्या बँकेमध्ये केले जातात त्या बँक खात्यातील शिल्लक रकमेशी दरमहा ताळमेळ घेतलेला नाही. राष्ट्रीय लेखा संहिता नियमावली 2005 मधील परिच्छेद क्र. 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता सन 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोखवहीतील जमा व खर्चाच्या नोंदीबरोबर बँक पासबुक / विवरणपत्र नोंदीची तुलना करुन ताळमेळ घेणे आवश्यक आहे

5.वेतन व भत्याचा खर्च स्वतंत्र नोंदवहीत नोंदविला जातो व त्यांची एकूण रक्कम डे बुक मध्ये त्या दिनांकाच्या शेवटी नोंदविली आहे.

6.डे बुक मध्ये प्रमाणक क्रमांक चुकीचे नोंदविले आहेत. माहे डिसेंबर 12 मध्ये प्रमाणक क्र.9999 नंतर पुढील प्रमाणक क्र.10000 ऐवजी 1000 नमूद केला आहे. जानेवारी 13 मध्ये प्रमाणक क्रमांक 1 पासून नोंदविले आहेत. दि.01/02/2013 रोजी प्रमाणक क्र. 909 नंतर पुढील प्रमाणक क्र.910 ऐवजी 1000 नोंदविला आहे. मार्च 2013 मध्ये प्रमाणक क्र.2172 नंतर पुढील प्रमाणक क्र.2173 ऐवजी 2174 नोंदविला आहे. व प्रमाणक क्र.2352 नंतर पुढील प्रमाणक क्र.2353 ऐवजी 2354 नोंदविला आहे.

7.डे बुक मध्ये जुन 2012 नंतर जुलै 2012 च्या नोंदी लिहीण्या ऐवजी जानेवारी 2013 च्या नोंदी लिहील्या आहेत. जुलै 2012 ते डिसेंबर 2012 व फेब्रुवारी 2013 ते मार्च 2013 या कालावधीचे डे बुक रजिस्टर स्वतंत्र आहेत. परंतु सदर डे बुकास अनुक्रमांक देण्यात आलेले नाही.

8.डे बुक मध्ये मासिक गोषवारे आहेत परंतु त्यावर सक्षम अधिका-यांचे सही शिक्के आढळून आले नाहीत.

9. डे बुकामध्ये प्रत्येक दिवशीच्या व्यवहारानंतर शिल्लक काढली नसून सक्षम अधिका-यांच्या सह्या आढळुन आल्या नाहीत.

10.डे बुक मध्ये पृष्ठांकन प्रमाणपत्र आढळुन आले नाही.
11.डे बुक मध्ये प्रत्येक दिवशीच्या व्यवहारानंतर मोठया प्रमाणात कोरी पाने सोडल्याचे आढळुन आले आहे.
12. मुख्य लेखापाल यांचेकडील आज्ञापत्र क्रमांक 6/1597, दिनांक 1/1/2013 अन्वये रु.50000/- अग्रीम म्हणून मंजूर करण्यात आले. व त्याची रक्कम महिला व बाल कल्याण अधिकारी यांच्या नावे धनादेश क्रमांक 435078 दि.1/1/2013 अन्वये आदा करणेत आली. परंतु सदर खर्चाची नोंद डे-बूक मध्ये दिनांक 01/01/2013 रोजी न घेता उशिराने दिनांक 30/03/2013 रोजी डे-बूक पान क्रमांक 132 वर घेण्यात आल्याचे आढळून आले. यावरुन डे-बूक मधील खर्चाच्या नोंदी रोजच्या रोज नोंदविल्या जात नसल्याचे दिसून येते.

DATRNDM7201 (Ref No : 95, Hmm No : 08)

## *45 धनादेश साठा नोंदवही ठेवण्यात आली नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***महानगरपालिकेने वापरलेल्या विविध बँक खात्याचे धनादेश साठा नोंदवहीची मागणी केली असता सदरच्या धनादेश साठा नोंदवहया ठेवण्यात आल्या नसल्याचे आढळून आले. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 46 अन्वये धनादेश पुस्तकाचा हिशोब नमुना क्र 1 मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे, परंतु धनादेशांचा हिशोब ठेवला नाही.***

सोलापूर महानगरपालिका यांचे वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये वापरलेल्या विविध बँक खात्याचे धनादेश साठा नोंदवहीची मागणी केली असता सदरच्या धनादेश साठा नोंदवहया ठेवण्यात आल्या नसल्याने लेखा परीक्षणास कोणत्या बँकेकडुन कोणत्यां खात्याची किती धनादेश पुस्तके प्राप्त झाली व त्यातील किती धनादेश वापरले याची खात्री लेखा परीक्षणास करता आली नाही. बँकेकडून प्राप्त झालेले धनादेश पुस्तके तपासुन सर्व धनादेश व्यवस्थित क्रमवार असुन धनादेश पुस्तकातील संख्या योग्य असल्याचे प्रमाणपत्र देवुन विहीत नमुन्यातील धनादेश साठा नोंदवहीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. महाराष्ट नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 46 अन्वये धनादेश पुस्तकाचा हिशोब नमुना क्र 1 मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे. परंतू अशी कार्यवाही सोलापूर महानगरपालिकेने केली नसलेचे आढळून आले याबाबत अर्धसमास पत्रक्रमांक 27 दि. 31/03/2015 अन्वये कळविण्यात आले होते. विभागाने दि. 07/05/2015 रोजी अनुपालन सादर केले असून

त्यामध्ये वरील प्रमाणे धनादेश साठा नोंद वही 2014-15 या वित्तीय वर्षापासून ठेवण्यात आल्याचे नमूद केले आहे.परंतु 2012-13 आर्थिक वर्षात बँक खात्यांच्या धनादेश साठा नोंदवह्या ठेवलेल्या नाहीत.

DATRNDM7201 (Ref No : 96, Hmm No : 27)

## *46 अश्वासित प्रगती योजनेची (पहिला लाभ) चुकीच्या पध्दतीने अंमलबजावणी केली जात असल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेनतश्रेणी देय ठरविली असल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळवण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहित केलेली अर्हता, पात्रता,जेष्ठता अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबींची पुर्तता करणे तसेच पदोन्नतीच्या कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील. असे असताना मनपाकडे अशी पध्दत राबविली जात नसल्याचे आढळुन आले. सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना ची मंजुरी सामान्य प्रशासन विभागाकडून घेतली जात नाही. सदर कर्मचारी/अधिकारी पदोन्नतीस पात्र आहे किंवा नाही याची वरीलप्रमाणे शहानिशा न करता मुख्य लेखापाल कार्यालयाकडून कर्मचा-यांची सेवा विचारात न घेता फक्त एका वेतन श्रेणी मध्ये 12 वर्ष पुर्ण झालेल्या दिनांकापासून संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर केली जाते व त्यास फक्त सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेतली जाते व त्यानंतर संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना त्याप्रमाणे वेतन व भत्ते आदा केले जात असल्याचे लेखा परीक्षणास आढळुन आले. सदरची पध्दत चुकीचे आहे. सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करताना पदोन्नतीस पात्र कर्मचा-याला संबंधित पदावरील 12 वर्षाची नियमीत सेवा केल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या मंजूरीने देय असताना मुख्य लेखापाल कार्यालयाकडील आदेशान्वये सदर योजनेचा लाभ मंजूर करण्यात आल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगर पालिकेच्या वर्ग 4 ते वर्ग 1 च्या कर्मचा-यांना व अधिका-यांना महानगरपालिकेने आश्वासित प्रगती योजनेचा (पहिला) लाभ महाराष्ट्र शासन (वित्त विभाग) चे शा.नि.क्र. वेतन/1999/5क 2/99/सेवा-3, दिनांक 20/07/2001 अन्वये मंजूर करुन वरिष्ठ वेतन श्रेणी मध्ये/ग्रेड वेतन मध्ये वेतन निश्चीती केली

असल्याचे आढळुन आले.

पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालवणे साठी शासनाने दि.8 जुन 1995 अन्वये गट क व ड या कर्मचा-यांसाठी कालबध्द पदोन्नती दि.01/10/1994 पासुन अंमलात आणली होती नंतर दिनांक 20/07/2001 च्या शा.नि.प्रमाणे 8000-1350 व त्याहून कमी वेतन श्रेणीत वेतन घेणा-या अधिकारी कर्मचारी यांना सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली त्यामध्ये सेवेत दोनपेक्षा कमी वेळा पदोन्नती मिळालेल्या व संबंधित पदावरील 12 वर्षाची नियमीत सेवा पुर्ण करणा-या व 5 वे वेतन आयोगातील 8000-13500 व त्याहून कमी वेतन श्रेणीमध्ये वेतन घेणा-या अधिकारी कर्मचारी यांना सदरची योजना अटी व शर्तीच्या अधिन मंजुर करण्यात आली.

सदरची योजना मनपा कर्मचारी अधिकारी यांना लागू करण्यात आली असल्याचे आढळून आले. परंतु निवडक सेवापुस्तके यांची लेखा परिक्षणामध्ये तपासणी केली व आढळुन आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 93 दि. 20/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 30/07/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळवण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहित केलेली अर्हता,पात्रता,जेष्ठता अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबींची पुर्तता करणे तसेच पदोन्नतीच्या कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील. असे असताना मनपाकडे अशी पध्दत राबविली नसल्याचे आढळुन आले. सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाच्या सर्व प्रकरणांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून मंजुरी घेतली नाही. सदर कर्मचारी/अधिकारी पदोन्नतीस पात्र आहे किंवा नाही याची वरीलप्रमाणे शहानिशा न करता मुख्य लेखापाल कार्यालयाकडून कर्मचा-यांची सेवा विचारात न घेता फक्त एका वेतन श्रेणी मध्ये 12 वर्ष पुर्ण झालेल्या दिनांकापासून संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर केली आहे व त्यास फक्त सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेतली आहे व त्यानंतर संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना त्याप्रमाणे वेतन व भत्ते आदा केले असल्याचे लेखा परीक्षणास आढळुन आले. सदरची पध्दत चुकीची आहे. सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करताना पदोन्नतीस पात्र कर्मचा-याला संबंधित पदावरील 12 वर्षाची नियमीत सेवा केल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या मंजूरीने देय असताना मुख्य लेखापाल कार्यालयाकउील आदेशान्वये सदर योजनेचा लाभ मंजूर करण्यात आल्याचे आढळुन आले. विभागाने सादर केलेल्या अनुपालनामध्ये महानगरपालिकेतील सेवकांना जा.क्र. 184 दि. 10/05/2005 च्या परीपत्रकामध्ये दि. 01/08/2001 पासून आश्वासीत प्रगती योजना लागु करण्यात आली आहे. परंतु स्थायी समिती ठराव क्र. 141 दि. 14/01/2000 अन्वये अर्हता, पात्रता व परिक्षेबाबतची अट न ठेवता मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी घेण्यात येवून वेतन निश्चीतीचा लाभ देण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. परंतु सदरची बाब नियमबाहय असून उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे सेवाअंतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागु करण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2) सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय

नसताना सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या खालील नमूद कर्मचारी / अधिकारी यांना सदर योजनेचा लाभ मंजूर केल्याचे आढळून आले. तसेच या योजनेचा लाभ संबंधित पदावरील 12 वर्षाच्या नियमीत सेवेनंतर अनुज्ञेय असताना सहाय्यक अभियंता व उपअभियंता या पदाची 5 वे वेतन आयोगातील वेतनश्रेणी (8000-2375-13500) व 6 वे वेतन आयोगानुसारचे ग्रेड वेतन (5400) एकच असल्यामुळे खालील अभियंता यांची उपअभियंता पदावरील सेवा 12 वर्षाची झाली नसताना व त्यांना सहाय्यक अभियंता पदाचे उपअभियंता पदाचे वेतनश्रेणी एकच असल्यामुळे त्यामध्ये 12 वर्षानंतर सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजना मंजूर करुन लाभ दिल्याने त्यांना वेतन व भत्त्याचे अतिप्रदान होत असल्याचे आढळुन आले. विभागाने दिलेल्या अनुपालन मध्ये शासन निर्णय दि. 01/11/1995 मधील मुददा क्र. 11 नुसार कार्यवाही करण्यात आल्याचे नमुद केले आहे. परंतु सदरील मुददा हा एकाच पदाच्या वेतन श्रेणीत झालेल्या बदलाबाबतचा असुन खालील कर्मचा-यांच्या पदामध्ये बदल झाल्याने व दुसरे पद हे पदोन्नतीचे असल्याने सदर शासन निर्णयतील मुददा त्यांना लागु होत नाही.

| अक्र. | उपअभियंताचे नाव | सहा. अभियंता पदावरील पदोन्नती दिनांक | उपअभियंता पदावरील पदोन्नती दिनांक | सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजना लाभ दिनांक | सेवेतील यापुर्वी मिळालेल्या पदोन्नतीची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. लक्ष्मण चलवादी | 14/12/1999 | 15/05/2005 | 14/12/2011 | दोन |
| 2 | श्री. मोहन सिद्राम कांबळे | 01/07/1996 | 14/07/1999 | 01/07/2008 | दोन |
| 3 | श्री. एम. जी. दुलंगे | 08/07/1995 | 07/06/1997 | 08/07/2007 | दोन |

तरी वरील अभियंता यांना उपअभियंता पदावर 12 वर्ष नियमीत सेवा पुर्ण नसताना तसेच त्यांना यापूर्वी दोन कार्यात्मक पदोन्नती दिल्या असताना सदर सेवा अंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ सामान्य प्रशासन विभागाच्या मंजूरी शिवाय व पदोन्नती पदासाठी पात्र असल्याची खात्री न करता मुख्य लेखापाल कार्यालयाने दिल्याने महानगरपालिकेतील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा-यांना मोठया प्रमाणात वेतन व भत्याचे अतिप्रदान होत असुन आता सर्वांची पुनर्वेतन निश्चीती करुन अतिप्रदान रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 105, Hmm No : 93)

## *47 आवेक्षक चौबे यांचे पदोन्नती व पदावनीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

Solapur (M Corp.)

**No. of Irregularities: 2**

*अनियमितता कलम : 9ब*

***श्री.चौबे यांची आवेक्षक पदावरील नेमणूक दि.06/08/1996 अशी असल्याने त्यांना दि.06/08/2008 पासून सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ् देवून वेतन निश्चिती केली व ग्रेड वेतन 5400 मंजूर करण्यात आले परंतु जात पडताळणी नसल्याने त्यांना जा.क्र.89, दि.06/07/2010 चे आदेशान्वये आवेक्षक पदी पदावनत करण्यात आल्याचे सेवा पुस्तकामध्ये नमूद आहे. परंतु आवेक्षक पदाचे ग्रेड वेतन रु.4400 मधील त्यांची फेर वेतन निश्चिती सेवापुस्तकामध्ये आढळून आली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेकडील आवेक्षक श्री.व्यंकटेश बन्सीप्रसाद चौबे यांचे सेवापुस्तक तपासणी लेखापरीक्षणाचे वेळी केली व आढळुन आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्र. 127 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 14/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. श्री.चौबे यांची आवेक्षक पदावरील नेमणूक दि.06/08/1996 अशी असल्याने त्यांना दि.06/08/2008 पासून सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ् देवून वेतन निश्चिती केली व ग्रेड वेतन 5400 मंजूर करण्यात आले परंतु जात पडताळणी नसल्याने त्यांना जा.क्र.89, दि.06/07/2010 चे आदेशान्वये आवेक्षक पदी पदावनत करण्यात आल्याचे सेवा पुस्तकामध्ये नमूद आहे. परंतु त्यांची आवेक्षक पदाचे ग्रेड वेतन रु.4400 मधील फेर वेतन निश्चिती सेवापुस्तकामध्ये आढळून आली नाही. शासनाने दि.20/07/2011 च्या शासन निर्णयान्वये शासन निर्णय दि.08/06/1995 अन्वये मंजूर करण्यात आलेली कालबध्द पदोन्नती ही योजना बंद करुन त्याऐवजी सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजना दि.01/08/2001 पासून अंमलात आणली आहे. त्यामुळे श्री.चौबे यांना दि.08/08/2008 पासून मंजूर केलेली कालबध्द पदोन्नती ही सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय मधील मार्गदर्शक 2 (5) नुसार या योजनेअंतर्गत पदोन्नतीचे पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, पात्रता, जेष्ठता पाहून दिली पाहिजे. सहाय्यक आयुक्त (स) यांचेकडील दि.31/10/2012 चे आदेशामध्ये संबंधित कर्मचा-याने जात पडताळणी समितीकडील वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे नमूद आहे.परंतु त्यानंतर त्यांना पुन्हा सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिल्याचे आदेश नमूद नाहीत. त्यामुळे त्यांना पदावनत केल्यानंतरची पदावनतीची वेतन निश्चिती सेवापुस्तकात नमूद करुन त्याप्रमाणे त्यांना वेतन आदा करणे व अतिप्रदान रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2. त्यांना पुन्हा सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर करून त्या आदेशानुसार फेर वेतन

निश्चिती करणे आवश्यक आहे.



## *48 कर्ज निवारण निधी (सिंकींग फंड) बाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : लेखा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेकडे कर्ज निवारण निधीची रोखवही ठेवण्यात आली नसल्याचे आढळून आले. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 142 प्रमाणे नमुना नं.1 मध्ये सदर बाबतची रोखवही ठेवणे आवश्यक असुनही व स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागाच्या लेखापरीक्षण अहवाल मध्ये याबाबत वेळोवेळी आक्षेप नोंदवून ही अशा प्रकारची रोखवही 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये ठेवली नाही. कर्जाची मुद्दल रक्कम 32,43,22,377/- व रक्कम 4,12,08,708/- थकित असताना महापालिकेकडे कर्ज निवारण खात्यामध्ये फक्त 3,96,43,554.21/- एवढीच रक्कम शिल्लक असल्याचे आढळून आले.तसेच कर्जाची मुद्दल रक्कम वेळीच न फेडल्याने महानगरपालिकेस रक्कम रु 41208708/- एवढ्या मोठया प्रमाणात व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे आढळून आले.वरील कर्जाची परतफेड करण्यासाठी मनपाने पुरेसा कर्ज निवारण निधी उभा केला नसल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेकडील कर्ज निवारण निधी ( सिकींग फंड) ची 2012-13 करीता तपासणी केली व आढळुन आलेल्या अनियमिततावाबत अर्धसमास पत्र क्र. 148 दि. 31/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 14/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) सोलापूर महानगरपालिकेकडे कर्ज निवारण निधीची रोखवही ठेवण्यात आली नसल्याचे आढळून आले. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 142 प्रमाणे नमुना नं.1 मध्ये सदर बाबतची रोखवही ठेवणे आवश्यक असुनही व स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागाच्या लेखापरीक्षण अहवाल मध्ये याबाबत वेळोवेळी आक्षेप नोंदवून ही अशा प्रकारची रोखवही 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये ठेवली नाही.

2) महानगरपालिकेने विविध शहर विकास कामासाठी, पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व खुल्या बाजारातून (वित्तीय संस्थाकडुन) घेतलेल्या कर्जाची व व्याजाची मार्च 2013 अखेर खालील

प्रमाणे थकबाकी असल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | कर्जबाब | कर्ज रक्कम | सन 2012/13 मधील परतफेड | | सन 2012/13 अखेर थकबाकी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुद्दल रु. | व्याज रु. | मुद्दल रु. | व्याज रु. |
| 1 | राज्य शासन कर्जे | 50600000/- | 0 | 0 | 0 | 31848857/- |
| 2 | अग्निशामक दल सुधारणा | 2050000/- | 0 | 0 | 513340/- | 628541/- |
| 3 | म.जी.प्रा. आयुर्विमा महामंडळ | 10317000/- | 937910/- | 1706992/- | 4689540/- | 8731310/- |
| 4 | म.जी.प्रा. मुंबई, सोलापूर | 185900000/- | 17500000/- | 0 | 168400000/- | 0 |
| 5 | आयुर्विमा महामंडळ कर्जावरील ग्यारंटी फी | 776085/- | 776085/- | 303875/- | 0 | 0 |
| 5 | महाराष्ट्र शासन हुडको | 128500000/- | 0 | 0 | 128500000/- | 0 |
| 6 | जिल्हास्तरीय विकास योजना | 22219497/- | 0 | 0 | 22219497/- | 0 |
| | **एकूण** | **400362582/-** | **19213995/-** | **2010869/-** | **324322377/-** | **41208708/-** |

वरील कर्ज रक्कमेपैकी कर्जाची मुद्दल रक्कम 32,43,22,377/- व व्याजाची रक्कम 4,12,08,708/- थकित असताना महापालिकेकडे कर्ज निवारण खात्यामध्ये फक्त 3,96,43,554.21/- एवढीच रक्कम शिल्लक असल्याचे आढळून आले.महाराष्ट्र महानगरपालिका अहिनियाम 1949 (प्रकरण 10 ) कलम 112 (1) प्रमाणे चक्रवाढ व्याजाच्या संचित रकमांसह जी रक्कम मान्य केलेल्या कालावधीत कर्ज चुकते करण्यासाठी पुरेशी होईल अशी रक्कम अशा निधीत भरली पाहिजे परंतु अशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही

तसेच कर्जाची मुद्दल रक्कम वेळीच न फेडल्याने महानगरपालिकेस रक्कम रु 41208708/- मोठया प्रमाणात व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे आढळून आले. वरील कर्जाची परतफेड करण्यासाठी

मनपाने पुरेसा कर्ज निवारण निधी उभा केला नसल्याचे आढळुन आले.

3) सदर कर्ज निवारण निधीचे खाते देना बँकेत असुन त्याचा खाते क्रमांक 041410001082 असुन बँकेकडील दि.23/07/2015 चे शिल्लक प्रमाणपत्रानुसार सदर खात्यामध्ये दि.31/03/2013 अखेर रु.3,96,43,554.21 शिल्लक असल्याचे आढळुन आले. त्यापैकी र.रु.28,554.21 बँक खात्यामध्ये सेव्हिंग खात्यावर व उर्वरीत रक्कम रु.39615000/- ही फ्लेक्सी गुंतवणुक स्वरुपात असल्याचे आढळून आले.परंतु सदर निधीची रोखवही व गुंतवणुक नोंदवही ठेवण्यात आली नसल्याने शिल्लक रकमेचा मेळ लेखापरीक्षणास घेता आला नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 188 (3) प्रमाणे कर्ज निवारण निधी बाबतची वेगळी रोखवही/रोजकिर्द ठेवणे आवश्यक आहे. अशी वेगळी रोखवही/रोजकिर्द महानगरपालिकेकडे ठेवली नसल्याचे आढळून आले.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 188 (2) नुसार स्वतंत्ररित्या कर्ज निवारण निधीबाबतची खतावणी ठेवणे आवश्यक असताना अशी खतावणी ठेवली नसल्याचे आढळून आले.

5) मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियमातील नियम 126 (2) प्रमाणे कर्ज निवारण निधीची वार्षिक विवरण पत्रे मा.आयुक्त यांनी दरवर्षी महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही सन 2012-13 आर्थिक वर्षामध्ये झाली नसल्याचे आढळुन आले.

6) कर्ज निवारण निधीचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग सोलापूर यांनी 2010-11 पर्यंत केले होते. सदर विभागाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद खालील प्रमाणे प्रलंबित असल्याचे आढळुन आले.

| कालावधी | प्रलंबित परिच्छेद क्र . | प्रलंबित परिच्छेदची एकूण संख्या |
|---|---|---|
| 1972-73 ते 94-95 | ---- | माहिती उपलब्ध नाही |
| 1995-96 ते 98-99 | ---- | एकूण 9 |
| 1999 ते 2001-02 | 3 ते 8 | 6 |
| 2002 ते 2003 | 1 ते 13 | 13 |
| 2003-04 ते 2004-05 | 3 ते 21 | 19 |
| 2005-06 ते 2010-11 | 1 ते 16 | 16 |

परंतु महानगरपालिकेने 1972-73 ते 2010-11 पर्यंतच्या लेखापरीक्षण अहवालातील एकाही परिच्छेदाचे अनुपालन सादर केलेले नसुन सर्व परिच्छेद प्रलंबित असल्याचे आढळुन आले.

DATRNDM7201 (Ref No : 118, Hmm No : 148)

## *49 माहे फेब्रुवारी 2013 मध्ये म.न.पा. च्या विविध विभागासाठी घेतलेल्या डिझेल बिलाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : अग्रिम मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 2538669.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1780449.00/-

***प्रमाण क 2269, दि.8/03/203 च्या लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने म.न.पा.च्या सर्व विभागांना त्यांचे कडील वाहनांची लॉगबुके, डिझेल रजिस्टर, इ. अभिलेख्यांची मागणी मुख्यलेखापाल कार्यालयाकडील पत्रक मुले-6/ अंदाजपत्रक 251, दि.10/08/205 अन्वये करण्यात आली होती. परंतु मागणी करुनही सार्वजनिक आरोग्य अभियंता, (स्टोअर, ड्रेनेज,जलनिवारण) सर्व झोन (1 ते 8) पाणी टँकर व आरोग्य खाते MOH (आय डी एच, मलेरिया, कुटुंब कल्याण, 5238 डीझेल्स 7062) कर आकारणी मंडई (5129,5120), हद्दवाढ सामान्य प्रशासन यांचेकडील वाहनांची लॉगबुक, डिझेल रजिस्टर उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे सदर विभागांना वरील प्रमाणाचे नमुद असले प्रमाणे माहे फेब्रुवारी 2013 मध्ये घेतलेल्या 34694 लिटर डिझेल पैकी 24332 लिटर डिझेल र.17,80,449/- चे लेखापरीक्षण करता आले नाही.***

सोलापूर महनगरपालिका आपल्या विविध विभागाकडील वाहनांसाठी परिवहन उपक्रमाकडून डिझेल खरेदी करते. परिवहन उपक्रम विभागाच्या वाहनांना पुरवठा केलेल्या डिझेलची विभागनिहाय बीले तयार करुन मनपाच्या संबंधित विभागांना पाठवते व त्याचे एकत्रित बिलाची मागणी मनपाच्या लेखा विभागास करते. माहे फेब्रुवारी 2013 मध्ये मनपाच्या विविध 56 विभागाच्या वाहनांना 34694 इतके लि. डिझेल ची र.रु.25,38,669/- ची मागणी परिवहन विभागाने म.न.पा.च्या मुख्य लेखापाल कार्यालयाकडे दि.6/03/2013 च्या पत्रान्वये केली होती. त्यामध्ये त्यांनी माहे फेब्रुवारी 13 मध्ये डिझेलचा पुरवठा म.न.पा. च्या विविध विभागाकडील वाहनांना केला असल्याने रक्कम रु.25,38,669/- एकवटरित्या ॲडव्हांन्स म्हणुन मागणी केली होती. त्यानुसार मुख्यलेखापाल कार्यालयाने दि.08/03/2013 रोजीचे टिप्पणीप्रमाणे वरील डिझेल बीलाची रक्कम रु.25,34,669/- इतका ॲडव्हांन्स मा.परिवहन व्यवस्थापक यांचे नावे देण्यास माननीयांची मान्यता मिळणेस विनंती केली होती. मा.आयुक्त यांनी मान्यता दिल्यानंतर दिनांक 13/03/2013 चे आज्ञापत्रानुसार परिवहन व्यवस्थापक यांना सदर बीलाची रक्कम रु.25,38,669/- ॲडव्हांन्स (अग्रिम) म्हणून मंजूर करण्यात आली.

सदर देयकाची तपासणी केली व आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 157 दि. 24/08/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 05/09/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. प्रमाणक क्र.2269, दि.8/03/2013 च्या लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने म.न.पा.च्या सर्व विभागांना त्यांचे कडील वाहनांची लॉगबुके, डिझेल रजिस्टर, इ. अभिलेख्यांची मागणी मुख्यलेखापाल कार्यालयाकडील पत्रक मुले-6/ अंदाजपत्रक 251, दि.10/08/205 अन्वये करण्यात आली होती. परंतु जकात, नगर अभियंता अग्निशामक महिला बाल कल्याण, नगर सचिव, यांचेकडील वाहनांची लॉगबुके, डिझेल रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झाले. व सॅनिटेशन विभागाकडील फक्त डिझेल रजिस्टर उपलब्ध झाले त्यांचे कडील वाहनांची लॉगबुके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. तसेच वरील पत्रान्वये मागणी करुन ही सार्वजनिक आरोग्य अभियंता, (स्टोअर, ड्रेनेज,जलनिवारण) सर्व झोन (1 ते 8) पाणी टँकर व आरोग्य खाते MOH (आय डी एच, मलेरिया, कुटुंब कल्याण, 5238 डीझेल्स 7062) कर आकारणी मंडई (5129,5120), हद्दवाढ सामान्य प्रशासन यांचेकडील वाहनांची लॉगबुक, डिझेल रजिस्टर उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे सदर विभागांना वरील प्रमाणाचे नमुद असले प्रमाणे माहे फेब्रुवारी 2013 मध्ये घेतलेल्या 34694 लिटर डिझेल पैकी 24332 लिटर डिझेल र.17,80,449/- चे लेखापरीक्षण करता आले नाही.

2. परिवहन उपक्रमाकडून मनपाच्या विविध विभागाकडील वाहनांना घेतलेल्या डिझेलची बिले परिवहन उपक्रमाकडून संबंधित विभागांना दिल्यानंतर संबंधित विभागांनी बिलानुसार देयके तयार करुन संबंधित लेखाशिर्षाखाली खर्च नोंदवुन रक्कम परिवहन विभागस देणे योग्य असताना तसे न करता त्याचे बिलापोटी मुख्य लेखापाल कार्यालयाकडून परिवहन विभागास अग्रिम म्हणुन रक्कम देण्याचे प्रयोजन लेखा परीक्षणास स्पष्ट झाले नाही.

3. परिवहन विभागास देण्यात आलेले डिझेल बिलापोटीचे अग्रिम नोंदवहीस नोंदवले आहे. समायोजन रक्कम विविध विभागाकडील असल्याने त्याची एकत्रित बेरीज करणे आवश्यक आहे. परंतु अशा रकमांची एकत्रित बेरीज अग्रिम नोंदवहीत केली नसल्याने समायोजन पुर्ण झाले किंवा कसे तसेच किती अग्रिमाचे समायोजन बाकी आहे याची खात्री करता आली नाही.

4. विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये सॅनिटेशन विभागाकडील वाहने ही फारच जुनी असल्याने व वाहने कचरा वाहतुकीचे काम करीत असल्याने कचरा व धुळ इत्यादिमुळे वायरींग व रिडींग स्पीडोमिटर बंद पडली असल्याने लॉगबुकमध्ये नोंद न घेता वाहन चालकास डायरी दिली असून त्यामध्ये सुरुवातीची वेळ, घेतलेले डिझेल प्रत्येक खेपेस उचलण्यात येणारे कचरा ठिकाणाची नोंद घेण्यात येते. व त्यावर संबंधीत प्रभागाचे आरोग्य निरिक्षकाची स्वाक्षरी घेतली जाते. असे नमुद केले आहे. परंतु अशा डाय-या लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने खात्री करता आली नाही.

DATRNDM7201 (Ref No : 125, Hmm No : 157)

## *50 डिझेल बिलापोटी परिवहन विभागास देण्यात आलेल्या अग्रिमाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : अग्रिम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 26031094.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12403987.00/-

***डिझेलची बीले संबंधित विभागांना दिल्यानंतर संबंधित विभागांनी त्यानुसार उपलब्ध तरतुदीनुसार देयके तयार करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली खर्च नोंदवून रक्कम परिवहन विभागास देणे आवश्यक असताना मुख्य लेखापाल कार्यालय परिवहन विभागच्या मागणीनुसार त्यांचे नावे अग्रिम रक्कम मंजूर करुन घेवून रक्कम अदा केली जाते.***

सोलापूर मनपाच्या विविध खात्याकडील वाहनांसाठी डिझेल म.न.पा. च्या परिवहन उपक्रमाकडून खरेदी केले जाते .त्यानंतर परिवहन उपक्रमाकडून महिन्यामध्ये मनपाच्या विभागांना दिलेल्या डिझेलचे बील विभागनिहाय तयार करुन संबंधित विभागास पाठविते. व सर्व विभागाच्या एकत्रित डिझेलच्या रकमेची मागणी मुख्य लेखापाल कार्यालयास केली जाते. मुख्य लेखापाल कार्यालयाकडून बीलाची एकत्रित रक्कम परिवहन विभागास अदा केली जात असल्याचे लेखापरीक्षास आढळून आले.

याबाबत लेखा परीक्षणास आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 158 दि. 24/08/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 31/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) डिझेलची बीले संबंधित विभागांना दिल्यानंतर संबंधित विभागांनी त्यानुसार उपलब्ध तरतुदीनुसार देयके तयार करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली खर्च नोंदवून रक्कम परिवहन विभागास देणे आवश्यक असताना मुख्य लेखापाल कार्यालय परिवहन विभागाच्या मागणीनुसार त्यांचे नावे अग्रिम रक्कम मंजूर करुन घेवून रक्कम अदा केली जाते. याबाबतचा आधार लेखापरीक्षणास आढळुन आला नाही.

2) सदर अग्रिमाची नोंद अग्रिम नोंवहीस परिवहन विभागाच्या नावे घेतली जाते. परंतु त्याचे समायोजन परिवहन विभाग करत नसुन मनपाचे संबंधित विभाग जमाखर्ची देयकाव्दारे वर्ष अखेरीस करत असल्याचे आढळुन आले.

3) अग्रिम नोंदवहीत समायोजीत रक्कमेची एकूण रक्कम काढली नसल्याने किती रकमेचे समायोजन झाले कोणत्या विभागाकडील किती रक्कम असमायोजीत आहे. याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

4) अशा प्रकारे डिझेल परिवहन विभागाचे नावे सन 2012/13 मध्ये 2.56 कोटी अग्रिम देण्यात आले. परंतु त्याचे समायोजन पुर्ण झाले नसल्याचे आढळुन आले. एकत्रित बेरजा नसल्याने व गोषवारा काढला नसल्याने असमायोजीन रक्कम परिगणित करता आली नाही.

विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मनपाच्या विविध विभागास डिझेल पुरवठा करण्यासाठी परिवहन विभागास अग्रीम देण्यात येते. व त्याचे समायोजन मनपाचे संबंधीत विभागाकडून केले जाते. 2012-13 मध्ये अशाप्रकारे परिवहन विभागास दिलेल्या अग्रीम रक्कम रु. 26031094/- पैकी 12403987/-

रकमेचे समायोजन झाले नसल्याचे अनुपालनासोबतच्या विवरणपत्रावरुन दिसून येते. परतू मुख्य लेखापाल यांचे कार्यालयाकडील अग्रिम नोंदवही अपूर्ण असल्याने याबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.
तरी शिल्लक अग्रीमाचे समायोजन त्वरीत करणे आवश्यक असून परिवहन विभागाकडून घेतलेल्या डिझेलची रक्कम अग्रीम स्वरुपात न देता विभागांकडील डिझेलची बीले संबंधित विभागांना दिल्यानंतर संबंधित विभागांनी त्यानुसार उपलब्ध तरतुदीनुसार देयके तयार करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली खर्च नोंदवून रक्कम परिवहन विभागास देणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 127, Hmm No : 158)

## *51 स्थानिक संस्था कराची कमी आकारणी केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 99619.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 99619.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 29(2) अन्वये वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र विहीत मुदतीत सादर केलेले नाही.स्थानिक संस्था कर आकारणीसाठी खरेदीची रक्कम कमी घेतल्यामुळे स्थानिक संस्था करापोटी रक्कम रु.40686/- वसूलपात्र ठरते. देय स्थानिक संस्था कराची परिगणना चुकीची केल्यामुळे स्थानिक संस्था कराची रक्कम रु.58933/- वसूलपात्र ठरते.***

व्यापा-याचे नांव :- निता एजन्सिज
नोंदणी क्रमाक :- 1/3346
व्यावसायाचे स्वरुप :- खोबरेल तेल विक्री.

सदर व्यापा-यांने नमुना “ड-दोन “मधील 2011-12 चे वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र दिनांक 17.12.2012 रोजी सादर केले आहे. त्यानुसार खरेदीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | तपशिल | खरेदीची रक्कम रु. |
|---|---|---|
| 1 | विवरणपत्र “ड-दोन” प्रमाणे | 61084303.00 |
| 2 | आयकर विवरणपत्राप्रमाणे | 63344628.00 |
| 3 | नफा/तोटा विवरणपत्राप्रमाणे | 61286302.00 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमांक 1 च्या खरेदीवर 1.80 टक्क्याप्रमाणे स्थानिक संस्था कराचे रक्कम

रुपये 1099517/- देय आहेत. विवरणपत्र "ड-दोन" मध्ये सदरची आकारणी रक्कम रुपये 1040584/- अशी चुकीची दर्शविली आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रं.141, दिनांक 31.07.2015 निर्गमित केला असून अनुपालन अप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणी पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र विहीत मुदतीत सादर केलेले नाही. त्यामुळे विलंबाबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत नियम 29(3) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2.उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे खरेदी रक्कमेत तफावत आहे. विवरणपत्र "ड-दोन" प्रमाणेच खरेदीची रक्कम असल्याबाबतचे प्रमाणित अभिलेखे उपलब्ध् न झाल्यामुळे आयकर विवरणपत्रनुसार खरेदी रक्कमेवर स्थानिक संस्था कराची आकारणी करावी. सबब तफावतीचे रक्कम रु.2260325/- वर (63344628 - 61084303) 1.80 टक्क्याप्रमाणे रक्कम रु.40686/- स्थानिक संस्था कर वसुलपात्र ठरतो.

3. विवरणपत्र "ड-दोन" प्रमाणे देय स्थानिक संस्था कर रक्कम रु.1099517/- ऐवजी रक्कम रु.1040584/- दर्शविल्यामुळे स्थानिक संस्था कराची कमी दर्शविलेली रक्कम रु.58933/- वसूलपात्र ठरते.

4. स्थानिक संस्था कराची रक्कम रुपये 1040584/- निता एजन्सिज यांनी भरणा केल्याबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्याअभावी कराच्या रक्कमा विहीत मुदतीत भरणा केल्याबाबतची पडताळणी करता आली नाही. जर कराच्या रक्कमा विलंबाने भरणा केला असल्यास नियम 48(3) अन्वये दंडनिय व्याजाची आकारणी करावी.

DATPGDM5901 (Ref No : 11, Hmm No : 141)

## *52 युनायटेड जनरल एजन्सी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत व्यवसायाची नोंदणी न करता व्यवसाय केल्यामुळे नियम 48 (2) (क) व (3) नुसार कार्यवाही करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3366312.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3366312.00/-

***खरेदीतून वजावट केलेल्या रुपये 28123304/- रक्कमेबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.तसेच युनायटेड जनरल एजन्सी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर नियम 2010 अंतर्गत व्यवसायाची नोंदणी न करता व्यवसाय केल्यामुळे नियम 48 (2) अन्वये प्रदेय स्थानिक कराच्या दहापट रक्कम रु.3360760/- वसूलपात्र ठरते. स्थानिक संस्था कर मुदतीत न भरल्यामुळे नियम 48(3) नुसार***

***दरमहा 2 टक्केप्रमाणे व्याजाची आकारणी केलेली नाही. वार्षिक उलाढालीबाबतचे विवरणप सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार रक्कम रु.5000/- दंड वसूलपात्र आहे. युनायटेड जनरल एजन्सी यांचे लक्ष्मीविलास बँकेतील खाते क्रं. 2721 गोठविण्यात आल्याबाबतची खातरजमा करता आली नाही.***

व्यापा-याचे नांव :- युनायटेड जनरल एजन्सी
नोंदणी क्रंमाक :- 1/3402
व्यावसायाचे स्वरुप :- औषध विक्री.

युनायटेड जनरल एजन्सी यांनी 2011-12या आर्थिक वर्षाचे संदर्भात नमुना " ड-दोन " मधील वार्षिक उलाढालीबाबतचे विवरणपत्र दिनांक 30.06.2015 रोजी सादर केले आहे याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| 1 | खरेदी | 44927139.00 |
| 2 | वजावट<br>स्थानिक खरेदी - रु. 1073794.00<br>कलम 152 (थ) अन्वये मिळालेली सूट - रु. 429896.00<br>स्थानिक संस्था कर नियमाच्या कलम 28 अन्वये मिळालेली सूट - रु. 26619614.00 | 28123304.00 |
| 3 | स्थानिक संस्था करासाठी पात्र मूल्य | 16803835.00 |
| 4 | पात्र मूल्यावर 2 % स्थानिक संस्था कर | 336076.00 |

याबाबत व्हॅट ऑडिट रिपोर्ट पडताळता उक्त खरेदीची रक्कम रु. 44954746/- अशी आहे. स्थानिक संस्था कर भरणा न केल्यामुळे सदर व्यापा-यावर जा.क्रं.1128, दिनांक 16.08.2012 अन्वये सुनावणीसाठी नोटिस बजावण्यात आली आहे. दिनांक 22.08.2012 च्या सुनावणीप्रमाणे व्यापा-याने प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांचे लक्ष्मीविलास बँकेतील खाते क्रं. 2721 गोठविण्याबाबतचा निर्णय घेऊन तसे बँकेला दिनांक 23.08.2012 रोजी नियम 43 नुसार महसूल रक्षणासाठी खात्यातील रक्कम तात्पुरती जप्त करण्याबाबत कळविण्यात आले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रं.141, दिनांक 31.07.2015 निर्गमित केला असता अनुपालन अप्राप्त आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. 2011-12 आर्थिक वर्षाचे वार्षिक उलाढालीबाबतचे विवरणपत्राप्रमाणे खरेदी रक्कम रु.44927139/- आहे तर व्हॅट ऑडिट रिपोर्टप्रमाणे खरेदी रक्कम रुपये 44954746/- अशी आहे.व्हॅट ऑडिट रिपोर्टप्रमाणे खरेदीची जादा रक्कम रु. 27607/- वर 2 टक्क्याप्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम रु.552/- वसूलपात्र ठरते.
2. एकूण खरेदीतून वजावटीपोटी दर्शविलेल्या रक्कम रु.28123304/- बाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
3. दिनांक 16.08.2012 रोजी बजावलेल्या नोटिसीप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र न घेता धंदा करणे यासाठी नियम 48(2)(क) नुसार प्रदेय स्थानिक संस्था कराच्या दहापट रक्कम देय असल्याचे नमूद आहे. त्यामुळे प्रदत्त स्थानिक संस्था कर रुपये 336076/- च्या दहापट रक्कम रु.3360760/- वसूलपात्र

ठरते.

4. मुदतीत स्थानिक संस्था कर भरणा न केल्यामुळे नियम 48(3) नुसार यथास्थिती द.म.2 टक्क्याप्रमाणे व्याजाच्या आकारणीस पात्र ठरते.

5. वार्षिक उलाढालीबाबतचे विवरणपत्र सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार रक्कम रु.5000/- दंड वसूलपात्र आहे.

6. उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे युनायटेड जनरल एजन्सी यांचे लक्ष्मीविलास बँकेतील खाते क्रं.2721 गोठविण्यात आले अथवा कसे व त्यानंतर सदर व्यापा-यावर स्थानिक संस्था कर / शास्ती व व्याज वसुलीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे रक्कम रु.3366312/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

DATPGDM5901 (Ref No : 12, Hmm No : 141)

## *53 ईचगेरीमठ ते व्दारकानगरी ते मशाळवस्तीपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : म.सवुर्ण जयंती नगरोत शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 63462.00/-

***काम पूर्ण करणेस ठेकेदारास दंडनीय मुदतवाढ देण्यात आली आहे. दंडाची रक्कम रु.13088/- कमी वसुल करण्यात आली आहे. कामाचा विमा व उपकराची रक्कम रु.50374/- वसुल करण्यात आली नाही.***

ईचगेरीमठ ते व्दारकानगरी ते मशाळवस्तीपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे हे कामाची माहिति खालीलप्रमाणे आहे.

1)लेखाशिर्ष - महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना.

2) अंदाजपत्रकिय किंमत - रु.23,70,133/-

3) प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील आदेश क्र.सावि/9/नपा/आरआर/4357 दि.01/12/2011.

4) तांत्रिक मान्यता - क्र. 23 दि.27/07/2011.

5) वृत्तपत्राचे नांव - दै. सुराज्य दि.05/04/2012.

6) निविदा कालावधी - 05/04/2012 ते 18/04/2012.

7) निविदा किंमत - रु.25,18,719/-

8) कार्यारंभ आदेश - क्र.906 दि.02/08/2012 ( 14.93 टक्के जादा)

9) ठेकेदाराचे नांव - एस.आर. सोनी.

10) कामाचा कालावधी - 4 महिने (02/08/2012 ते 01/12/2012)

11) निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र. 188 दि.15/09/2012.

12) खर्च रु.9,28,279/- (प्रमाणक क्र. 98 दि.10/01/2013)

सदर कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.37 दि.27/04/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.315 दि.09/06/2015 अन्वये अनुपालन सादर करण्यात आले आहे. खात्याने सादर केलेले अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)ठेकेदाराने मुळ मुदतीत काम पूर्ण केले नसल्याने ठेकेदारास 8 महिने कालावधीसाठी ठेक्याच्या रकमेवर प्रतिमहिना 0.50 टक्के दंड करण्यात आला आहे. मक्त्याची रक्कम रु.25,18,719/- इतकी ठरली असताना दंड कामाचे मुळ किंमतीवर म्हणजे रु.21,91,524/- इतक्या रकमेवर आकारणेत आला आहे. मक्त्याचे रकमेवर दरमहा 0.50 टक्के रु.12594/- प्रमाणे आठ महिन्याची रक्कम रु.1,00,752/- इतकी होत आहे. परंतु खात्याने संबंधीत ठेकेदाराकडून रु.87,664/- इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यात आली आहे. तरी उर्वरित रक्कम रु.13,088/- इतकी सबंधीताकडून वसुलपात्र आहे.

मुळ मक्तावर म्हणजे रु.21,91,524/- वर दंड आकारण्यात आला असून तो योग्य आहे असे खात्याने कळविले आहे.

कामाची मुळ अंदाजपत्रकिय (Work Portion) किंमत रु.21,91,524/- इतकी आहे. सदर कामाचा मक्ता 14.93 टक्के जादा दराने निश्चीत करुन रु.25,18,719/- इतके रकमेवर मक्ता ठरविण्यात आला आहे. मुदतवाढ मंजूर टिपणीनुसार मक्त्याचे रकमेवर प्रतिमहा 0.50 टक्के दंड आकारणेत यावा अशी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे खात्याने दिलेला खुलासा समर्पक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2दि.12/09/2005 अन्वये कामाचा विमा शासनाकडे उतरविणे आवश्यक आहे. ठेकेदाराने कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्यास कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम कामाचे देयकाचे प्रदान करताना वसुल करुन शासन निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा शासनाकडे उतरविला असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी शासन विम्यापोटी कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम रु.25,187/- इतकी संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

कामाचा विमा कामाचे मूळ किंमतीनुसार वसुल करण्याची कार्यवाही करणेत येईल असे खात्याने कळविले आहे.

कामाचा विमा कामाच्या किंमतीनुसार वसुल करावयाचा असल्याने खात्याने दिलेला खुलासा मान्य करता येत नाही. तरी आक्षेपात नमुद केलेनुसार विम्याची रक्कम वसुल करण्यात यावी.

3) उद्योग उर्जा व कामगार विभग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्रक्र108/कामगार 7 अ दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1 टक्का वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे किंमतीच्या 1 टक्का रु.25,187/- वसुल केली नसल्याने ती संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

कामावरील उपकराची रक्कम कामाचे मूळ किंमतीनुसार वसुल करण्याची कार्यवाही करणेत येईल असे खात्याने कळविले आहे.

कामावरील उपकराची रक्कम कामाच्या किंमतीनुसार वसुल करावयाची असल्याने खात्याने दिलेला खुलासा मान्य करता येत नाही. तरी आक्षेपात नमुद केलेनुसार उपकराची रक्कम वसुल करण्यात यावी.

DGPKVSM6101 (Ref No : 24, Hmm No : 37)

## *54 पिण्याच्या पाण्याचे पाईप खरेदीचे साठा नोंदवही ठेवले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 5**

*अनियमितता कलम : 9ब*

***साठानोंदवही विहित नमुन्यात न ठेव साध्या वहीत नोंदी घेणेत आल्या आहे. सदर नोंदीखाली खातेप्रमखची स्वक्षरी नाही. मागील वर्षाचे पाईप किती शिल्लक होते याबाबत नोंदी घेण्यात आल्या नाहीत. UIDSSMT योजनेसाठी खरेदी करण्यात आली आहेत. सदरचे पाईप हे मनपाचे गोडावूनमध्ये न साठवता मनपा शहरामध्ये इतरत्र पुरवठादाराकडून उतरवून घेणेत आले आहेत. वाटप करण्यात आलेले पाईप हे कोणाच्या ताब्यात देणेत आले आहेत त्याची पोहोच पावती व सदर पाईप त्याच कामासाठी वापरणेत आले आहेत याची माहिती न दिल्याने लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे पाणी पुरवठा विभागामार्फत सोलापूर शहरामध्ये व हद्दवाढ भागामध्ये पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यासाठी UIDSSMT योजनेतून सन 2012-13 मध्ये खाली नमूद केलेले पाईप खरेदी करण्यात आलेले आहेत. पाईप खरेदीच्या नोंदी ह्या साठा

नोंदवही ठेवले नसलेबाबत आढळुन आले. त्याबाबत अर्धसमास पत्र क्र.38 दि. 27/04/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होती. खात्याकडून अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पाईपचा डायमीटर (एमएम) | पाईपची लांबी (रनींग मीटर) |
|---|---|---|
| 1. | 700 | 4158.00 |
| 2. | 600 | 13023.00 |
| 3. | 500 | 5683.00 |
| 4. | 450 | 9684.00 |
| 5. | 400 | 15975.00 |
| 6. | 350 | 7201.50 |
| 7. | 300 | 12425.00 |
| 8. | 250 | 13371.50 |
| 9. | 200 | 24292.00 |
| 10. | 150 | 22743.00 |
| 11. | 100 | 40345.00 |

1) पाईप खरेदी ही खात्यामार्फत केल्याने त्याची महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखासंहितामधील नियम क्र.9.2.32 नुसार विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवून त्यामध्ये खरेदी, वाटप व शिल्लक पाईपच्या नोंदी घेणे आवश्यक होते. परंतु खात्याने विहित नमुना न वापरता साधी नोंदवही ठेवली असून त्यामध्ये पाईपच्या नोंदी घेणेत आलेले आहेत.

2) खात्यास प्राप्त झालेल्या पाईपच्या नोंदीखाली खातेप्रमुखाची सही व शिक्का उमटविणेत आलेला नाही.

3) सदर नोंदवहीमध्ये सन 2012-13 मध्ये खरेदी करण्यात आलेल्या पाईपच्याच नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. दि.01/04/2012 रोजी मागील शिल्लकेच्या नोंदी घेणेत आलेल्या नाहीत. त्यामुळे मागील शिल्लक किती होती याची तपासणी करता आली नाही.

Solapur (M Corp.)

4) पाईप हे फक्त UIDSSMT योजनेतून घेण्यात आलेल्या कामासाठीच खरेदी करण्यात आलेले आहेत. प्राप्त झालेले पाईप हे मनपाच्या गोडाऊनमध्ये न उतरविता सोलापूर शहरामध्ये ठिकठिकाणी उतरविणेत आले आहेत. त्यामुळे सदरचे पाईप हे कोणत्या कामासाठी किती वापरणेत आले आहेत याची माहिती लेखा परिक्षणास सादर करण्यात यावी.

5) वाटप करण्यात आलेले पाईप हे कोणाच्या ताब्यात देणेत आले आहेत त्याची पोहोच पावती व ती त्याच कामासाठी वापरणेत आले आहेत याची माहिती कागदपत्रासह देणेत यावी.

DGPKVSM6101 (Ref No : 25, Hmm No : 38)

## *55 कस्तुरबा टाकीजवळ 2.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे कामाचे अनियममिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 36000.00/-

***सदरचे काम पूर्ण करण्यास ठेकेदारास मुळ मुदत दि:30/06/2008 ते 29/12/2009 इतकी देण्यात आली होती. परंतु सदर मुदतीत काम पूर्ण न केल्याने खात्याने त्यास दि:30/12/2009 ते 03/04/2010 पर्यंत विनादंडाने मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतीत काम पूर्ण केले नसल्याने दि:4/52010 ते 28/2/2011 पर्यंत प्रतिदिन रु.500/- प्रमाणे दंडाने मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. खात्याने ठेकेदाराकडून दंडनीय रक्कम रु.36000/- कमी दंड वसुल करण्यात आला आहे. बांधकामास वापरणेत आलेल्या साहित्याची चाचणी अहवाल सादर केला नाही. बांधकामाचे मोजमाप पुस्तकातील मोजमापासमोर कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांची तारखेसह तपासणी केल्याचे स्वाक्षरी करणेत आली नाही.***

सोलापूर मनपाने UIDSSMT योजनेतून कस्तुरबा टाकीजवळ 2.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील टाकी बांधणे काम घेणेत आलेले आहे. कामाची अंदाजपत्रकिय किंमत रु.89,44,036/- इतकी असून त्याची जाहिर प्रसिध्दी देवून कामाची निविदा निश्चित करण्यात आली आहे. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची मे.असोसिएटेड इंजिनिअर्स, सोलापूर यांची 36 टक्के जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदर निविदेस स्थायी समिती ठराव क्र.325 दि.31/05/2008 अन्वये मंजुरी देवून कार्यारंभ आदेश क्र.310 दि.30/06/2008 अन्वये 18 महिने मुदतीसाठी देणेत आले आहे. मुळ

मुदतीत काम पूर्ण झाले नसल्याने ठेकेदारास दि.30/12/2009 ते 03/04/2010 पर्यंत विनादंडाने मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतीत काम पूर्ण केले नसल्याने दि.4/52010 ते 28/2/2011 पर्यंत प्रतिदिन रु.500/- प्रमाणे दंडाने मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार ठेकेदाराने दि.28/02/2011 रोजी काम पूर्ण केलेले आहे. सदर कामाच्या नस्तीचे सन 2012-13 चे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियममितततेबाबत अर्धसमास पत्र क्र.39 दि.27/04/2015 अन्वये खात्यास विचारणा केली असता त्यांनी त्यांचेकडील पत्र क्र.296 दि.05/06/2015 अन्वये अनुपालन सादर केले आहे.

1) प्रस्तुत काम ठेकेदाराने मुळ मुदतीत काम पूर्ण केले नसल्याने त्यास आयुक्त यांचेकडील मान्य टिपणी दि.16/11/2010 अन्वये दि.04/05/2010 ते 28/02/2011 या कालावधीसाठी रु.500/- प्रतिदिन दंडाने मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. दंडनीय मुदतवाढीच्या कालावधीची परिगणना केली असता 301 दिवस येत असून दंड रु.1,50,500/- इतका होत आहे. परंतु खात्याने सदर कालावधीची परिगणना 229 दिवस इतकी करुन रु.1,14,500/- इतका दंड संबंधीताकडून वसुल करण्यात आला आहे. दंडनीय कालावधीची परिगणना चुकीची केल्याने दंडाची रक्कम रु.36,000/- संबंधीताकडून कमी वसुल करण्यात आली आहे. तरी संबंधीताकडून रु.36,000/- वसुल करुन मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावी.

याबाबत खात्याने वसुलीबाबत दक्षता घेणेत येत असल्याचे कळविल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2) स्पेशिफिकेशननुसार कामासाठी वापरणेत येत असलेल्या साहित्याची चाचणी अहवाल देणे बंधनकारक आहे. सदर कामासाठी वापरणेत आलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी अहवाल नस्तीमध्ये आढळुन येत नाही असे विचारले असता नस्तीमध्ये चाचणी अहवाल समाविष्ट केल्याचे अनुपालनामध्ये नमूद केले आहे. परंतु अनुपालनासोबत चाचणी अहवालाची प्रत सादर केली नसल्याने खात्याने दिलेला खुलासा मान्य करता येत नाही.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील नियमानुसार कामाचे किंमतीच्या कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये मोजमापे तपासल्याचे तारखेसह स्वाक्षरी करण्यात आली नाही. याबाबत कार्यवाही येथूनपुढे करण्यात येईल असे खात्याने कळविले आहे. खात्याने आक्षेपानुसार अनुपालन केले नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 26, Hmm No : 39)

## ***56 पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाची निविदा जादा दराने निश्चीत केलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9ब*

***मनपाने साहित्याच्या किंमतीवर स्थानिक संस्था कर 3 टक्के वाढीव दर देवून कामाची निविदा निश्चीत करण्यात आली आहे. कामास वापरणेत आलेल्या साहित्यावरील 3 टक्के स्थानिक संस्था कर वसुल न करता कामाच्या एकूण किंमतीचे 0.25 टक्के स्थानिक संस्था कर म्हणून वसुल करण्यात आली. त्यामुळे उर्वरित रक्कम रु. 508402/- संबंधीत ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कम वसुलपात्र आहे.***

सोलापूर महानगरपालिकेने खाली नमूद केलेल्या पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे कामांची निविदा निश्चीत करणेकामी जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदा भरताना ठेकेदाराने मुळ अंदाजपत्रकिय किंमतीपेक्षा जादा दराने निविदा सादर केले आहेत. कामाच्या प्राप्त झालेल्या निविदापैकी लघुत्तम निविदा मंजुर करताना ठेकेदारास वाटाघाटीनंतर दर निश्चीत करण्यात आले आहेत. वाटघाटी करण्यापुर्वी खात्याने सदर कामाची किंमत ही चालू दरसुचीनुसार येणा-या किंमतीशी तुलना करण्यात आली आहे. तसेच कामास लागणारे पाईप, स्पेशल्स व स्लूसव्हाल्व याच्या किंमतीवर 3 टक्के स्थानिक संस्था कर आणि वाढीव 2 टक्के एक्साईज डयुटी, 1 टक्का विमा असे एकूण 6 टक्के वाढीव दर देवून निविदा निश्चीत करण्यात आले आहेत.

काम केल्यानंतर ठेकेदारास कामाची देयके देताना स्थानिक संस्था कराची रक्कम 3 टक्के वसुल न करता एकूण कामाच्या किंमतीवर 0.25 टक्के वसुल करण्यात आली आहे. वास्तविक पहाता निविदा निश्चीत करतेवेळी ठेकेदारास 0.25 टक्के स्थानिक संस्था कर म्हणून देणे आवश्यक होते. तसे न करता निविदा निश्चीतेचेवेळी 3 स्थानिक संस्था कर देवून निविदा करण्यात आली आहे. त्यामुळे ठेकेदारास साहित्याच्या रकमेवर 2.75 टक्के जादा रक्कम अदा झाली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराने नाव | कामाचे नाव | साहित्याची किंमत रु. | 3 टक्के स्थानिक संस्था कर रु. | स्थानिक संस्था कर प्रत्यक्ष वसुल रुपये | जादा प्रदान झालेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | एस. आर. सोनी | ईचगेरीमठ ते व्दारकानगरी ते मशाळवस्ती | 2135458 | 64064 | 5479 | 58585 |
| 2. | श्री.अमरनाथ बी. बसवंती | एन.जी.मिल सोसायटी | 750173 | 22505 | -- | 22505 |
| 3. | एम.आर. चौधरी | कुमठे चांभार गल्ली ते रोहिदारनगर गट क्र.43/2 | 1398636 | 41959 | 3579 | 38380 |
| 4. | एस. आर. सोनी | प्रतापनगर | 2207690 | 66231 | 6005 | 60226 |
| 5. | मयुर कन्स्ट्रक्शन | आसरा सोसायटी | 1928375 | 57851 | -- | 57851 |
| 6. | एस.आर.सोनी | सैफुल चौक ते नाथ होम्स ते डायमंड शाळा | 2864495 | 85935 | 6521 | 79414 |
| 7. | मयुरा कन्स्ट्रक्शन | आदित्यनगर ते नविन डोणगांव नाका | 3148422 | 94453 | 6923 | 87530 |
| 8. | श्री.अमरनाथ बी. बसवंती | वार्ड क्र.98 महाराणाप्रतापनगर | 764413 | 22932 | -- | 22932 |
| 9. | सेठ ॲण्ड इंजिनिअर्स् प्रा.लि. | पोस्ट बेसिकशाळा नेहरुनगर | 2927210 | 87816 | 6837 | 80979 |
| | एकूण | | 18124872 | 543746 | 35344 | 508402 |

तरी वरिलप्रमाणे नमूद केलेनुसार जादा प्रदान झालेली रक्कम रु.508402/- संबंधीताकडून वसुल करण्यात यावी. याबाबत खात्यास अर्धसमास पत्र क्र.40 दि.27/04/2015 अन्वये विचारणा करण्यात आले आहे. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र. 517 दि.13/07/2015 अन्वये अनुपालन सादर केले आहे. वरील कामाची किंमत ही जिल्हा दरसूचीमधील दरानुसार करण्यात आली आहे. सदर दरामध्ये स्थानिक संस्था कराचा समावेश नसल्याने 3 टक्के स्थानिक संस्था कराची रक्कम समाविष्ट करुन दर वाढवून निविदा निश्चीत करण्यात आले आहे असे खात्याने अनुपालन देण्यात आले आहे.

सदर कामासाठी वापरणेत आलेले साहित्याचे दरामध्ये 3 टक्के स्थानिक संस्था कर वाढवून दिला आहे. मनपाने वाढवून दिलेला दर हा संबंधीत ठेकेदाराकडून साहित्या किंमतीवरील स्थानिक संस्था कर वसुल करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही न करता कामाच्या एकूण किंमतीच्या 0.25 टक्के इतकी वसुली करण्यात आली आहे. त्यामुळे खात्याने दिलेला खुलासा समर्पक नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 27, Hmm No : 40)

## *57 आदित्यनगर ते नवीन डोणगांवनाका येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :13 वित्त आयोग शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 68334.00/-

***कामाच्या जाहिर निविदेतील अटी व शर्तीनुसार मे.मयुर कन्स्ट्रक्शन यांची निविदा पात्र नसताना त्यांची निविदा उघडणेत येवून त्यांना काम देणेत आले आहे. कामाचा विमा रु.34,167/- व उपकर रु.34,167/- असे एकूण रु.68,334/- वसुल करण्यात आली नाही. कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी अनुक्रमे 5 टक्के व 100 टक्के मोजमापाची तपासणी केलेली नाही. सदर कामासाठी वापरणेत आलेले पाईपवरील एक्साईज डयुटी माफ करुन घेतली नसल्याने रु.1,84,243/- इतका जादा खर्च करण्यात आला आहे. कामाची प्रशाकिय मान्यता आदेश नाही.***

आदित्यनगर ते नवीन डोणगांवनाका येथे पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) लेखाशिर्ष - 13 वा वित्त आयोग.

2) अंदाजपत्रकिय किंमत - रु.29,94,720/-

3) प्रशासकिय मान्यता - नाही.

4) तांत्रिक मान्यता - क्र.101/2012-13 दि.29/12/2012.

5) वृत्तपत्राचे नांव - दै. सुराज्य दि.30/03/2012.

6) निविदा कालावधी - 30/03/2012 ते 17/04/2012.

7) निविदा किंमत - रु.34,16,682/-

8) कार्यारंभ आदेश - क्र.15 दि.04/01/2013 (27 टक्के जादा)

9) ठेकेदाराचे नांव - मे. मयुर कन्स्ट्रक्शन, सोलापूर.

10) कामाचा कालावधी - 4 महिने (04/01/2013 ते 03/05/2013)

11) निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र.359 दि.19/12/2012.

12) खर्च रु.15,70,330/- (प्रमाणक क्र.104 दि.17/01/2013)

13) मोजमाप पुस्तक क्र.229 पान नं.74

सदर कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.49 दि.11/05/2015 अन्वये खात्यास विचारणा करण्यात आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.341 दि.12/06/2015 अन्वये अनुपालन सादर करण्यात आले आहे त्यानुसार खालीलप्रमाणे आक्षेप घेणेत येत आहे.

1)सदर कामाचे जाहिरातीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे नोंदणीकृत असणा-या पात्र ठेकेदारानी निविदा भरावी असे नमूद करण्यात आले आहे. जाहिर निविदेमध्ये कामाची किंमत रु.27,69,041/- इतकी आहे. सदर कामासाठी मे.मयुर कन्स्ट्रक्शन, सोलापूर यांनी सादर केलेले नोंदणी प्रमाणपत्र पहाता त्यांचे वर्ग - 7 मधील असून ते रु.7.00 लाख किंमतीचे टेंडर घेऊ शकतात असे नमूद केले आहे. तथापि कामाची किंमत ही रु.7.00 लाखापेक्षा जास्त असल्याने मे. मयुर कन्स्ट्रक्शन, सोलापूर हे सदर कामाची निविदा भरणेस पात्र नाहीत. तरी मे. मयुर कन्स्ट्रक्शन, सोलापूर हे सदर कामाचे निविदा भरणेस पात्र नसताना त्यांची निविदा पात्र ठरविली असून त्यांची निविदा उघडून त्यांनी भरणेत आलेले दराची तुलना करण्यात आली आहे. मे. मयुर कन्स्ट्रक्शन, सोलापूर यांची सर्वात कमी दराची असल्याने त्यांची निविदा मंजूर करुन त्यांना काम पूर्ण करण्यासाठी आदेश देणेत आले आहे. हे नियमबाहृय आहे.

मयुर कन्स्ट्रक्शन यांनी ब वर्गामध्ये महानगरपालिकेकडे नोंदणी केली व त्याची काम करण्याची मर्यादा रु.50.00 लाख आहे. त्यामुळे सदरचे काम त्यांना देणेत आले आहे असे खात्याने नमूद केलेले आहे.

जाहिरातीमध्ये नमूद केलेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे नोंदणीकृत व मनपाकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येईल असे नमूद केले आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडील पात्र नोंदणी प्रमाणपत्र पाहणे आवश्यक होते. मयुर कन्स्ट्रक्शन यांची निविदा पात्र नसताना त्यांची निविदा उघडणेत आली आहे. त्यामुळे खात्याने दिलेला खुलासा मान्य करता येत नाही.

2) विमा संचनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2दि.12/09/2005 अन्वये कामाचा विमा शासनाकडे उतरविणे आवश्यक आहे. ठेकेदाराने कामाचा विमा शासनाकडे

उतरविला नसल्यास कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम कामाचे देयकाचे प्रदान करताना वसुल करुन शासन निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा शासनाकडे उतरविला असल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी शासन विम्यापोटी कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम रु.34,167/- इतकी संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

आक्षेपानुसार ठेकेदाराकडून वसुलची कार्यवाही करणेत येईल असे कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्रक्र108/कामगार 7 अ दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1 टक्के वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे किंमतीच्या 1 टक्का रु.34,167/- वसुल केली नसल्याने ती संबंधीताकडून वसुलपात्र असल्याने वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

आक्षेपानुसार ठेकेदाराकडून वसुलची कार्यवाही करणेत येईल असे कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील नियमानुसार कामाचे किंमतीच्या कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाची मोजमाप पुस्तकामध्ये मोजमापे कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी तपासल्याची तारखेसह स्वाक्षरी करण्यात आली नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार तपासणीची कार्यवाही करणेत येईल असे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) केंद्र शासनाकडील नोटीफिकेशन क्र.6/2007-Central Excise दि.01/03/2007 नुसार 200 मि.मी. पुढील व्यासाचे पाईप पिण्याच्या पाण्यासाठी वापरलेस त्या पाईपचे दरामध्ये एक्साईज डयुटी माफ करणेत आली आहे. असे असताना सदर कामासाठी 250 mm. व्यासाचे 915 मीटर पाईप बसविणेची अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आली असून त्याप्रमाणे सदर कामासाठी 250 mm. व्यासाचे पाईप वापरणेत आले आहेत. सदर पाईपचे दर एक्साईज डयुटीसह रु.2150.40 प्रमाणे किंमत रु.19,67,616/- इतकी होत आहे व एक्साईज डयुटी वगळुन दर रु.1991.85 प्रति मीटर प्रमाणे किंमती रु.18,22,543/- इतकी येत आहे. वास्तविक पहाता पाईपचा दर हा एक्साईज डयुटी वगळून घेणे आवश्यक होते. पाईपची एक्साईज डयुटीसह येणारी किंमत व एक्साईज डयुटी वगळून येणारी किंमत यातील फरक रु.1,45,073/- असून त्या रक्कमेवर निविदा मंजूरनुसार 27 टक्के जादा दर रु.39,170/- असे एकूण रु.1,84,243/- ची बचत झाली नाही.

सदरचे काम करण्यासाठी कालपाव्यव टाळणेसाठी व अनुदान वेळेत खर्ची करणे आवश्यक असल्याने तसेच काम हे पाणी पुरवठयाशी संबंधीत असल्याने पाईपवरील एक्साईज डयूटी माफ न

करता काम करण्यात आले आहे असे खात्याने कळविले आहे.

खात्याने केलेला खुलासा समर्पक नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

6) सदर कामास प्रशासकिय मान्यता मिळाल्याचे आदेशाची प्रत खात्याने अनूपालनासोबत सादर केली नाही. कामास प्रशासकिय मान्यता नसताना कामाची निविदा काढून काम करण्यात आले आहे. हे नियमबाह्य आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 29, Hmm No : 49)

## *58 सैफुल चौक ते नाथ होम्स ते डायमंडशाळेपर्यंत पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : म.सुवर्ण जयंती नगरोत शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 117010.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 64762.00/-

***सदर कामाचा करारनामा मुद्रांक रक्कम रु.600/- चे कमी रकमेच्या मुद्रांक शुल्क पेपरवर करण्यात आला आहे. कामाचा विमा व उपकर रक्कम रु.64162/- वसुल करण्यात आला नाही. कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी अनुक्रमे 5 टक्के व 100 टक्के मोजमापाची तपासणी केलेली नाही. सदर कामासाठी वापरणेत आलेले पाईपवरील एक्साईज डयुटी माफ करुन घेतली नसल्याने रु.1,17,010/- इतका जादा खर्च करण्यात आला आहे.***

सैफुल चौक ते नाथ होम्स ते डायमंडशाळेपर्यंत पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन टाकणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) लेखाशिर्ष - महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना.

2) अंदाजपत्रकिय किंमत - रु.28,20,787/-

3) प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील आदेश क्र.सावि/9/नपा/आरआर/4357 दि.01/12/2011.

4) वृत्तपत्राचे नांव - दै. सकाळ दि.12/05/2012.

5) निविदा कालावधी - 04/05/2012 ते 15/05/2012.

6) निविदा किंमत - रु.32,08,108/-

7) कार्यारंभ आदेश - क्र.साआअ/शाह-15878)अ) दि.10/12/2012 (23 टक्के जादा)

8) ठेकेदाराचे नांव - मे. एस. आर. सोनी.

9) कामाचा कालावधी - 120 दिवस (10/12/2012 ते 08/04/2013)

10) निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र.221 दि.01/10/2012.

11) खर्च रु.4,28,489/- (प्रमाणक क्र.99 दि.10/01/2013)

12) मोजमाप पुस्तक क्र.942 पान नं.54

सदर कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.50 दि.11/05/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.316 दि.09/06/2015 अन्वये अनुपालन सादर केलेनुसार लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1) विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2दि.12/09/2005 अन्वये कामाचा विमा शासनाकडे उतरविणे आवश्यक आहे. ठेकेदाराने कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्यास कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम कामाचे प्रदान करताना वसुल करुन शासन निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्याने कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी शासन विम्यापोटी कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम रु.32,081/- इतकी संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

खात्याने कामाच्या मुळ किंमतीवर कामाचा विमा वसुल करण्यात येईल असे कळविले आहे. वास्तविक पहाता कामाच्या किंमतीवर विमा रक्कम वसुल करण्यात यावी असे शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे. सदर कामाची किंमत ही निविदा निश्चीत केल्यानंतर त्याच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने आक्षेपात नमूद केल्यानुसार रक्कम रु.32081/- विम्याची रक्कम वसुल करण्यात यावी.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्रक्र108/कामगार7 अ दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1 टक्के वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे किंमतीच्या 1 टक्का रु.32,081/- वसुल केली नसल्याने ती संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

खात्याने कामाच्या मुळ किंमतीवर कामाचा उपकर वसुल करण्यात येईल असे कळविले आहे. वास्तविक पहाता कामाच्या किंमतीवर उपकर रक्कम वसुल करण्यात यावी असे शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे. सदर कामाची किंमत ही निविदा निश्चीत केल्यानंतर त्याच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने आक्षेपात नमूद केल्यानुसार रक्कम रु.32081/- कामगार कल्याण उपकराची रक्कम वसुल करण्यात यावी.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट-24, नियम 11 नुसार कामाचे किंमतीच्या

कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये मोजमापे तपासल्याचे कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी तारखेसह स्वाक्षरी करण्यात आली नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार तपासणी करण्यात येईल असे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) केंद्र शासनाकडील नोटीफिकेशन क्र.6/2007-Central Excise दि.01/03/2007 नुसार 200 मि.मी.व्यासाचे पुढील पाईप पिण्याच्या पाण्यासाठी वापरणेत येत असल्यास त्याचे पाईपचे दरामध्ये एक्साईज डयुटी माफ करणेत आली आहे. सदर कामासाठी 250 mm. व्यासाचे 600 मीटर लांबीचे पाईप बसविणेची अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आली असून त्याप्रमाणे सदर कामामध्ये वापरणेत आले आहेत. 250mm व्यासाचे 600 मी. लांबीचे पाईपची एक्साईज डयुटीसह दर रु.2150.40 प्रति मीटरप्रमाणे किंमत रु.12,90,240/- इतकी होत आहे व एक्साईज डयुटी वगळुन दर रु.1991.85 प्रति मीटर प्रमाणे किंमत रु.11,95,110/- इतकी येत आहे. वास्तविक पहाता पाईपची किंमत ही एक्साईज डयुटी वगळून दर घेणे आवश्यक होते. सदर पाईपची एक्साईज डयुटीसह येणारी किंमत व एक्साईज डयुटी वगळूण येणारी किंमत यामधील फरक रु.95,130/- इतकी येत आहे. फरकाचे रकमेवर निविदा दर 23 टक्के जादा दर रु.21,880/- अशी एकूण रक्कम रु.1,17,010/- इतका जादा खर्च झाला आहे. त्यामुळे सदरची जादा खर्च रु.1,17,01/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 30, Hmm No : 50)

## *59 देगांव येथे 1.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1763633.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 833000.00/-

| ***ठेकेदारांने सादर केलेल्या निविदा दराची चालू मंजूर जिल्हा दरसूची म्हणजे 2007-08 चे दराशी तुलना करणे*** |
|---|

***आवश्यक होते. परंतु मनपाने बाजारभावानुसार आलेल्या दराशी तुलना करण्यात आली आहे. त्यामुळे सदरची निविदा ही खूपच जादा दराने म्हणजे 48 टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे. ठेकेदाराने उशीरा काम केल्याने दंडनीय कार्यवाही केली नाही. काम पूर्णत्वाचा दाखला सादर केला नाही. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उप अभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणेत आली नाही. रायल्टी शासनास जमा केल्याची खात्री न करता कामाची देयके अदा करण्यात आली आहे.***

देगांव येथे 1.00 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.58.78 लाख.

2.प्रशासकिय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्र.254 दि.01/12/2007.

3.निविदा किंमत रु. 49,40,793/-

4.निविदा कालावधी - दि.15/04/2008 ते 30/04/2008

5.कार्यारंभ आदेश क्र. 810 दि.04/12/2008

6.कामाचा कालावधी - 18 महिने (04/12/2008 ते 03/06/2010)

7.ठेकेदाराचे नांव - मे. असोसिएट इंजिनिअर्स, सोलापूर

8.सन 2012-13 अखेर कामावर खर्च रु. 17,63,633/-

9.मोजमाप पुस्तक क्र. 143 पान नं.80.

सदर कामाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.32 दि.31/03/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.25 दि.27/04/2015 अन्वये अनुपालन सादर केलेनुसार खालीलप्रमाणे आक्षेप घेणेत येत आहे.

1)सदर कामाचे अंदाजपत्रक 2006-07 चे मंजूर जिल्हा दरसुचीतील दरानुसार करण्यात येवून त्याची निविदा किंमत रु.49,40,793/- इतकी आली आहे. सदर कामाची निविदा माहे एप्रिल 2008 मध्ये जाहिरात मागवून माहे मे 2008 मध्ये लघुत्तम दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. निविदा मंजूर करतेवेळी चालू मंजूर जिल्हा दरसूची म्हणजे 2007-08 चे दरानुसार येणारी कामाची किंमत व ठेकेदाराने सादर केलेले दरानुसार येणारी कामाची किंमत याची तुलना करणे आवश्यक होते. खात्याने कामाची किंमत बाजारभावातील दरानुसार काढून ठेकेदाराने सादर केलेल्या लघुत्तम दरानुसार येणा-या किंमतीशी तुलना करुन निविदा मंजूर केली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087 /सीआर 196/इमारत दि.04/05/1988 चे केंद्रीय सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका भाग -2 मधील तरतूदीनुसार निविदा स्विकृत करताना त्या अंदाजपत्रकिय खर्चाच्या 5 टक्केपेक्षा जादा दराने स्वीकारणेत येवू नयेत अशी तरतूद आहे. तथापि ठेकेदाराने सादर केलेली

कामाचे किंमतीच्या 48 टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदर कामाची निविदा ही खुपच जादा दराने आल्याने त्याची फेर निविदा काढणे आवश्यक होते.

सदर कामाचे निविदेतील दर हे बाजारभावानुसार तुलना करुन निविदा मंजूर करण्यात आली आहे असे खात्याने कळविले आहे. वास्तविक पहाता निविदाधारकांनी सादर केलेले दराशी मंजूर चालू दरसूचीशी तुलना करुन निविदा मंजूर करणे आवश्यक होते. त्यामुळे खात्याने सादर केलेले अनुपालन मान्य करता येत नाही.

2) सदरचे काम हे सर्वे नं.54 मध्ये जमिनीपासून 9 मीटर उंचीवर टाकी बांधणे काम करावयाचे असे गृहीत धरुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यानुसार जाहिर निविदा मागवून काम करण्यासाठी ठेकेदारास दि.04/12/2008 रोजी 18 महिने मुदतीसाठी काम देणेत आले होते. परंतु सदर कामाचे ठिकाणी उच्चदाब विद्युत वाहिनी असल्याने काम करता येत नाही असे ठेकेदाराने दि.6.8.2009 अन्वये ठेकेदाराने खात्यास कळविले आहे. पाण्याची टाकी बांधणेचे ठिकाणी उच्चदाब विद्युत वाहिनी असताना अशा ठिकाणी टाकी बांधता येत नाही असे असताना त्यास तांत्रिक मान्यता दिली हे चुकीचे आहे. तद्नंतर खात्याने दि.5.11.2009 रोजी नविन ठिकाणी 9 मी. उंचीऐवजी 15 मी. उंचीवर टाकी बांधणेबाबत ठेकेदारास कळविले. त्यामुळे ठेकेदाराने टाकीची उंची वाढल्याने त्याप्रमाणे टाकीचे नविन डिझाईन करुन वालचंद इनस्टुट ऑफ टेक्नोलॉजी, सांगली यांची मंजुरी घेणेबाबत दि.7.4.2010 चे पत्रान्वये संबंधीत ठेकेदारास कळविले. त्यानुसार संबंधीत ठेकेदाराने टाकीचे नविन डिझाईन मंजुरी दि.16.9.2010 अन्वये खात्यास कळविण्यात आले आहे. नविन ठिकाणी टाकी बांधणेकामी करावे लागणारे डिझाईन व त्यास मंजुरी देणे हा विलंबाचा कालावधी टाळता आला असता. नविन ठिकाणी मंजुर डिझाईननुसार काम सुरु होणे आवश्यक होते. करारनामामधील अट क्र.10 नुसार ठेकेदाराने मुदतीत काम पूर्ण न केल्यास प्रतिदिन किमान रु.100/- व कमाल रु.5000/- दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल अशी तरतूद आहे. त्यानुसार खात्याने दि.23.9.2010 चे पत्रान्वये काम सुरु केले नसल्याने रु.1000/- प्रतिदिनप्रमाणे दंडात्मक कार्यवाही चालू असल्याचे संबंधीत ठेकेदारास कळविण्यात आले आहे. परंतु सदरचे काम हे दि. 3.1.2013 रोजी काम चालू केल्याचे मोजमाप पुस्तकातील नोंदीवरुन दिसून येत आहे. ठेकेदाराने काम उशिरा काम चालू केले असल्याने दि.23.9.2010 ते 3.1.2013 पर्यंत 833 दिवसाचे रु.1000/- प्रतिदिनप्रमाणे रु.8,33,000/- दंडाची वसुली करणे आवश्यक आहे. तरी दंडाची रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

मुळ नियोजित ठिकाणी उच्चदाब विद्युत वाहिनी असल्याने पशु दवाखान्याशेजारी या नविन ठिकाणी टाकी बांधणेचे ठरविणेत आले. तद्नंतर दवाखान्याच्या अधिका-याकडून होत असलेल्या हस्तक्षेपामुळे कामास अडथळा निर्माण होऊ लागल्याने परत टाकीचे बांधकामाचे ठिकाण बदलण्यात आले. बदलेल्या ठिकाणी काळी माती असल्याने तेथे ट्रायलपीट घेऊन तेथे राफ्ट फाउंडेशन करणे

गरजेचे आहे. सदरची बाब मुळ अंदाजपत्रकामध्ये नसल्याने ठेकेदाराने जादा बाबी देण्याबाबत मंजुरी असल्याशिवाय काम करणार नसल्याचे कळविले. तद्नंतर खात्याने सदर जादा बाबीस दि.11/09/2012 रोजी स्थायी समितीची मान्यता घेणेत आल्यानंतर ठेकेदाराने दि.03/01/2013 रोजी कामास सुरुवात केले आहे. सदरचे काम माहे जुन 2014 अखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. सदर मुदतीनंतर करारानुसार प्रतिदिनी दंडाची कार्यवाही हाती घेण्यात येईल असे खात्याने कळविले आहे.

कामाचे जागेच्या अडचणी दूर करणे व नविन ठिकाणी करावयाचे कामाचे डिझाईन करणे व त्यास मंजुरी इत्यादी कार्यवाही ही दि.23/09/2010 पूर्वी झाली होती. तद्नंतर ठेकेदाराने काम चालू करणे आवश्यक होते. ठेकेदाराने दि.03/01/2013 रोजी प्रत्यक्ष काम चालू केले आहे. त्यामुळे ठेकेदाराने वेळेत कामास सुरुवात केली नसल्याने कामास विलंब झाल्याने निविदा अटी शर्तीनुसार दंडाची आकारणी करणे आवश्यक होते. त्यामुळे खात्याने सादर केलेला खुलासा समर्पक नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

3) सदरचे काम पूर्ण करण्यासाठी 18 महिने मुदतीसाठी दि.4.12.2008 रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. जागेच्या अडचणीमुळे व टाकीचे डिझाईनमध्ये बदल झाल्याने त्याचे मंजुरी मिळणेस विलंब झाला आहे. कामातील अडचणी व मंजूरी मिळाल्यानंतर ठेकेदाराने कामास सुरुवात केली असती तर काम माहे जून 2014 पर्यंत काम होणे अपेक्षित होते. तरी सदरचे काम हे लेखापरिक्षणाचे कालावधीपर्यंत पूर्ण झाले नसल्याने लाभार्थी सदर लाभापासून आज अखेर वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे सन 2012-13 अखेर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.17,63,633/- अक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सदर टाकी व टाकीचे नेटवर्क मार्च 2015 अखेर पाणी पुरवठा चालू करण्यात आले असून नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा चालू आहे असे खात्याने कळविले आहे.

काम पूर्ण होवून पाणी पुरवठा चालू असल्याबाबत खात्याने अनुपालनासोबत काम पूर्णत्वाचा दाखला सादर केला नाही. तसेच स्पेशिफिकेशननुसार काम पूर्ण झाले असलेबाबत सविस्तर खुलासा करण्यात आला नसल्याने काम पूर्ण होवून पाणी पुरवठा सुरळीत चालू झाल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

4) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील नियमानुसार कामाचे किंमतीच्या कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये मोजमापे तपासल्याचे स्वाक्षरी करण्यात आली नाही.

मनपाचे कामकाज स्वरुप पहाता तांत्रीक अधिका-यांना सर्वे करणे इस्टीमेट करणे दैनंदिन मेन्टेनन्स ही सर्व कामे करावी लागतात व तांत्रीक अधिका-यांची कमतरता पाहता कार्यकारी अभियंता

व उपअभियंता यांना प्रत्यक्षात मोजमापे तपासणी व मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे अडचणीचे आहे असे खात्याने कळविले आहे.

खात्याचा खुलासा समर्पक नसल्याने मान्य करता येत नाही.

5) निविदा अटी शर्त क्र.21 मध्ये सदर कामाचा Defect Liability कालावधी नमूद करण्यात आला नाही.

Defect Liability नमूद केला नसला तरी सदर कामाचे हाड्रोलीक टेस्ट करुन सदर कामाचे अंतिम बील झाल्याशिवाय कामाची बयाणा व सुरक्षा अनामत रक्कम अदा केली जात नाही असे खात्याने कळविले आहे.

Defect Liability हे काम पूर्ण झाल्यानंतर चालू होत आहे. Defect liability कालावधी निविदेत नमूद केला नसल्याने सदरचे अनुपालन मान्य करता येत नाही.

6) सदर कामासाठी वापरणेत आलेले वाळु, खडी याची रायल्टी शासनास भरले असल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. रायल्टी शासनास जमा केल्याची खात्री न करता कामाची देयके अदा करण्यात आली आहे.

सदरबाबत खात्यास सुस्पष्ट आदेश प्राप्त नसल्याने व ठेकेदार किती रॉयल्टी भरतात याबाबत पावती उपलब्ध होत नाही असे खात्याने कळविले आहे.

रायल्टीबाबत आदेश खात्यास प्राप्त नाहीत असे म्हणणे समर्पक नाही. त्यामुळे खात्याचे अनुपालन समर्पक नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 68, Hmm No : 32)

## *60 बसवेश्वरनगर येथे 0.60 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाचे अनियममिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3831957.00 /-

Solapur (M Corp.)

वसूलपात्र रक्कम रु. 14100.00/-

***ठेकेदाराने सादर केलेले दराची चालू मंजूर दरसूचीतील दराशी तुलना करण्यात आली नाही. कामाचा करारनामा कमी रक्कमेच्या बाँड पेपरवर करण्यात आला आहे. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. कामाची Defect Liability कालावधी नमूद करण्यात आली नाही. रायल्टी शासनास जमा केल्याची खात्री न करता कामाची देयके अदा करण्यात आली आहे.***

बसवेश्वरनगर येथे 0.60 द.ल.लिटर क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.कामाची निविदा किंमत रु.1,06,53,651/-

2. वृत्तपत्राचे नांव - दै. लोकमत दि.12/04/2008.

3. निविदा कालवधी - दि.15/04/2008 ते 30/04/2008.

4. प्राप्त निविदा - दोन.

5. ठेकेदाराचे नांव - मे. असोसिएटेड इंजिनिअर्स्, सोलापूर.

6. कामाचा आदेश - क्र. 250 दि.10/07/2009.( 50 टक्के जादा दराने )

7. कामाचा कालावधी - 18 महिने (दि.10/07/2009 ते 09/01/2011)

8. कामाचा मुदतवाढ -दि.31/03/2012 ( मान्य टिपणी दि.23/12/2011)

9. दि.31/03/2013 अखेर खर्च - रु.38,31,957/-

10. लेखाशिर्ष - UIDSSMT.

11. मोजमाप पुस्तक क्र. 143 पान क्र.75.

12. निविदा किंमतरु.1,59,80,477/-

सदर कामाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.33 दि.31/03/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.26 दि.27/04/2015 अन्वये अनुपालन सादर केलेनुसार खालीलप्रमाणे आक्षेप घेणेत येत आहे. काम पूर्ण केल्याचा दाखला सादर केला नाही.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक 2006-07 चे जिल्हा दरसुचीनुसार करण्यात येवून त्याची निविदा माहे एप्रिल 2008 मध्ये जाहिर निविदा मागवून माहे जुलै 2008 मध्ये लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन कामाचे आदेश देणेत आली आहे. खात्याने बाजारभावानुसार येणा-या किंमतीशी ठेकेदाराने सादर केलेल्या घुत्तम दरानुसार येणा-या किंमतीशी तुलना करुन निविदा मंजूर करण्यात आली आहे. वास्तविक पहाता निविदा मंजूर करतेवेळी चालू मंजूर जिल्हा दरसूची म्हणजे 2007-08 चे दरानुसार कामाची येणारी किंमत व ठेकेदाराने सादर केलेले दरानुसार येणारी कामाची किंमत याची तुलना करणे आवश्यक होते. परंतु मनपाने सदर कामाची किंमत ही बाजारभावानुसार येणा-या किंमतीनुसार दराची

तुलना करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087 /सीआर 196/इमारत दि.04/05/1988 चे केद्रीय सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका भाग -2 मधील तरतूदीनुसार निविदा स्विकृत करताना त्या अंदाजपत्रकिय खर्चाच्या 5 टक्केपेक्षा जादा दराने स्वीकारणेत येवू नयेत अशी तरतूद आहे. तथापि ठेकेदाराने सादर केलेली कामाचे किंमतीचे 50 टक्के जादा दराची मंजूर करण्यात आली आहे. सदरची निविदा ही खूपच जादा दराने म्हणजे 50 टक्के जादा दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदर कामाची निविदा ही जादा दराने आल्याने त्याची फेर निविदा काढणे आवश्यक होते.

आक्षेपाबाबत खात्याने कळविले की, सदरच्या कामाचे दर निचीत करताना तत्कालीन बाजार भावानुसार येणा-या किंमतीनुसार व मुळ अंदाजपत्रकातील दराशी तुलना करता सदर कामाचे दर जादा दराने ठरविण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे. सदर कामासाठी ठरविण्यात आलेल्या बाजारभावाच्या दराबाबतची कागदपत्र ही मुळप्रकरणात आढळत नसल्याने तत्कालीन सहा.अभियंता व उपअभियंता यांचेकडून बाजारभावाच्या दराची माहिती घेवुन आम्ही तुम्हास उलट टपाली कळवु असे खात्याने कळविले आहे.

ठेकेदाराने सादर केलेले दराची चालू मंजूर दरसूचीतील दराशी तुलना करणे आवश्यक असताना बाजारभावाचे दरांशी तुलना केली असल्याने खात्याने केलेला खुलासा समर्पक नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र मुद्रांक शुल्क नियमानुसार कामाचा करारनामा हा पहिल्या 10.00 लाखास रु.100/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रु.100/- प्रमाणे बाँड पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचा करारनामा हा रु.100/- चे बाँड पेपरवर करण्यात आला आहे. तरी सदर कामाचा करारनामा करतेवेळी त्याची किंमत रु.15980476/- इतकी असल्याने रु.14200/- चे बाँड पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचा करारनामा हा रु.100/- चे बाँड पेपरवर करण्यात आला असल्याने रु.14100/- इतके शासनाचे आर्थिक नुकसान झाले असल्याने सदरची रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

3) सदर काम पूर्ण करण्यासाठी दि.9/01/2011 पर्यंत मुदत देण्यात आली होती. तद्नंतर दि.31/03/2012 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असूनही काम लेखापरिक्षणाचे कालावधीपर्यंत पूर्ण करण्यात आलेले नाही. त्यामुळे दि.31/03/2013 अखेर रु.38,31,957/- खर्च करण्यात आलेली रक्कम गुंतुन पडलेली आहे.

सदर टाकी व टाकीचे नेटवर्क दि.12/08/2013 ला पाणी पुरवठा चालू करण्यात आले असून नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा चालू आहे असे खात्याने कळविले आहे.

काम पूर्ण होवून पाणी पुरवठा चालू असल्याबाबत खात्याने अनुपालनासोबत काम पूर्णत्वाचा

दाखला सादर केला नाही. तसेच स्पेशिफिकेशननुसार काम पूर्ण झाले असलेबाबत सविस्तर अहवाल सादर केला नसल्याने खात्याचे अनुपालन मान्य करता येत नाही.

4) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील नियमानुसार कामाचे किंमतीच्या कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के प्रत्यक्ष मोजमापे तपासून मोजमाप पुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये मोजमापे तपासल्याचे स्वाक्षरी करण्यात आली नाही.

मनपाचे कामकाज स्वरुप पहाता तांत्रीक अधिका-यांना सर्वे करणे, इस्टीमेट करणे, दैनंदिन मेन्टेनन्स ही सर्व कामे करावी लागतात व तांत्रीक अधिका-यांची कमतरता पाहता कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांना प्रत्यक्षात मोजमापे तपासणी व मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे अडचणीचे आहे असे खात्याने कळविले आहे. खात्याचा खुलासा समर्पक नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

5) निविदा अटी शर्त क्र.21 मध्ये सदर कामाचा Defect Liability कालावधी नमूद करण्यात आली नाही.

Defect Liability नमूद केला नसला तरी सदर कामाचे हाड्रोलीक टेस्ट करुन घेतल्यानंतर व सदर कामाचे अंतिम बील झाल्याशिवाय कामाची बयाणा व सुरक्षा अनामत रक्कम अदा केली जात नाही असे खात्याने कळविले आहे.

परंतु Defect Liability कालावधी निविदेत नमूद केला नसल्याने सदरचे अनुपालन मान्य करता येत नाही.

6) सदर कामासाठी वापरणेत आलेले वाळु, खडी याची रायल्टी शासनास भरले असल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. रायल्टी शासनास जमा केल्याची खात्री न करता कामाची देयके अदा करण्यात आली आहे.

सदरबाबत खात्यास सुस्पष्ट आदेश प्राप्त नसल्याने व ठेकेदार किती रॉयल्टी भरतात याबाबत पावती उपलब्ध होत नाही असे खात्याने कळविले आहे. त्यामुळे खात्याचे अनुपालन समर्पक नसल्याने आक्षेप मान्य करता येत नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 69, Hmm No : 33)

## *61 छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालय येथे 300 mm व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 7**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 40582.00/-

***सदर कामासाठी प्राप्त झालेल्या दोनच निविदाधारकामध्ये दराची तुलना करुन निविदा निश्चीत करण्यात आली आहे. त्यामुळे मनपास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही. प्राप्त झालेल्या निविदापैकी एस.डी. कलंकुटगी यांनी सोलापूर मनपाकडे नोंदणी केलेचे प्रमाणपत्र सादर केले नसल्याने त्यांची निविदा अपात्र ठरत असताना त्यांची निविदा उघडणेत आली आहे. मोजमाप पुस्तकामध्ये मागील तारखा नमूद करुन मोजमापांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. कामासाठी वापरणेत आलेले पाईप व बसविण्याची जादा अदा करणेत आलेली रक्कम रु.7169/- संबंधीताकडून वसुल करण्यात यावी. भरावाची रक्कम रु.3221/- , कामाचा विमा रु.15096/- व कामगार कल्याण उपकर रु.15096/- अशी एकूण रक्कम रु. 40582/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.***

छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालय येथे 300 mm व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1)लेखाशिर्ष - अनामत काम (सार्वजनिक बांधकाम सोलापूर यांनी पूर्ण अनुदान दिले आहे.)

2) अंदाजपत्रकिय रक्कम रु. 16,00,608/-

3) प्रशासकिय मान्यता -सर्वसाधारण सभा ठराव क्र.258 दि. 20/11/2010.

4) जाहिरात - दै. लोकमत दि.15/02/2011.

5) निविदा कालावधी - दि.17/02/2011 ते 03/03/2011.

6) प्राप्त निविदा - 2.

7) निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.173 दि.28/05/2011.

8) ठेकेदाराचे नांव - मे. शेट्टी कन्स्ट्रक्शन, सोलापूर.

9) कार्यारंभ आदेश क्र. 477 दि.08/07/2011 ( 2 टक्के जादा दराने)

10) कामाची निविदा किंमत रु.15,09,589/-

11) कामाची मुदत - 120 दिवस (08/07/2011 ते 04/11/2011)

12) खर्च रु. 10,60,331/- ( प्रमाणक क्र. 120 दि.28/03/2013)

13) मोजमाप पुस्तक क्र. 143 पान नं. 95.

सदर कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 61 दि. 23/06/2015 अन्वये खात्यास विचारणा करण्यात आली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.सा.आ.अ/ज.नी. 637 दि. 20/08/15 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)कामाची निविदा निश्चीत करताना किमान तीन निविदाधारकाच्या दराची तुलना करणे आवश्यक आहे. जाहिर निविदा दिल्यानंतर निविदा कालावधीमध्ये किमान तीन निविदा प्राप्त झाल्या नसल्यास निविदेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सदर कामाच्या पहिल्यांदा दिलेल्या जाहिर निविदेच्या कालावधीमध्ये फक्त दोनच निविदाधारकांनी निविदा सादर केली आहे. तुलनात्मक दरासाठी किमान तीन निविदा आवश्यक असल्याने निविदेचा कालावधी वाढविणे आवश्यक होते. परंतु मनपाने निविदा कालावधी न वाढविता पहिल्या निविदेचे कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या निविदाधारकांची निविदा उघडून निविदा निश्चीत करण्यात आली आहे. त्यामुळे मनपास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

मनपाच्या प्रचलित असलेल्या कार्यालयीन पध्दतीनुसार प्रकरणी वाटाघाटी अंती निविदा निश्चीत करण्यात आली आहे. आक्षेपानुसार अनुपालन केले नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

2) कामाची निविदा जाहिरातीमध्ये निविदाधारक हे मनपा सोलापूरकडील नोंदणीकृत असणे अशी अट नमूद करण्यात आली आहे. सदर कामासाठी प्राप्त झालेले निविदापैकी एस.डी. कलंकुटगी यांनी सोलापूर मनपाकडे नोंदणी केलेचे प्रमाणपत्र सादर केले नसल्याने त्यांची निविदा अपात्र ठरत असताना त्यांची निविदा उघडून दराची तुलना केली आहे. हे नियमबाहय आहे.

ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

3) मोजमाप पुस्तकातील नोंदीच्या तारखा पहाता त्या सलग नोंदण्यात आल्याचे दिसून येत नाही. सदर कामाचे मोजमापे मोजमाप पुस्तकामध्ये पान क्र.91 व 92 वर नोंदी घेण्यात आल्या असून त्याची तारीख 25/08/2011 ते 25/09/2011 अशी नमूद केली आहे. त्याच मोजमाप पुस्तकामध्ये पान क्र. 86 वर इतर कामाची मोजमापे नोंदल्याची तारीख 2/07/2012 नमूद केली आहे. पान क्र.86 वरील मोजमापांची तारीख 02/07/2012 असेल तर त्यापुढील नोंदी ह्या त्याच तारखेस अथवा त्यापुढील तारखेस घेतली जाणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिशिष्ट क्र. 24 नुसार मोजमाप पुस्तकातील नोंदी ह्या प्रत्यक्ष केलेल्या तारखेनुसार कोरी पृष्ठे न सोडता नोंदी करण्यात यावे. परंतु तसे न करता मागील तारखा नमूद करुन मोजमापांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. हे नियमबाहय आहे.

ड्रेनेज विभागाकडील करण्यात येणा-या कामांची मोजमापे एकाच मेझरमेंट पुस्तकात नोंदविलेली आहेत. त्यामुळे ज्या तारखेस काम झालेले आहे त्याप्रमाणे सदर रनिंग बीलावर तारीख नमुद केलेली

आहे. यापुढे स्वतंत्र मोजमाप पुस्तकामध्ये नोंद घेणेची कार्यवाही ठेवीत आहोत असे खात्याने कळविले आहे.

खात्याने केलेल्या खुलाशानुसार मोजमाप पुस्तकात केलेल्या कामानुसार मोजमापे नोंदविली जात नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

4) ड्रेनेजचे पाईप टाकणेसाठी मोजमाप पुस्तकातील नोंदीवरुन एकूण 329.70 मी. लांब खोदाई करण्यात आली आहे. त्यामधुन प्रति चेंबरची लांबी 1.20 मी. पैकी 0.74 मी. प्रमाणे 14 चेंबरची लांबी 10.36 मी. वजा करुन 319.34 मी. पाईप टाकल्याने तेवढयाच लांबीचे पाईपची किंमत प्रदान करणे आवश्यक होते. परंतु खात्याने खोदाईच्या लांबीमध्ये चेंबरमध्ये बसणारे पाईपची लांबी प्रति चेंबर 0.46 मी.प्रमाणे 12 चेंबरमधील 5.52 मी. अधिक करुन 335.22 मी. पाईप पुरवल्याचे नमूद करुन प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे ठेकेदारास 15.88 मी. पाईपचे प्रति मी.दर रु.307.65 प्रमाणे रु.4885/- चे जादा प्रदान झाले आहे. तसेच त्यासाठी पाईप बसविणेची किंमत रु.143.85 प्रति मी. प्रमाणे रु.2284/- चे जादा प्रदान झाले आहे. असे एकूण वसुलपात्र रक्कम रु.7169/- संबंधीताकडून वसुल करण्यात यावी.

मोजमाप पुस्तिकेत ड्रेनेज लाईन टाकणेकरिता दिलेले मोजमाप हे चेंबरच्या बाहेर बाहेरचे मोजमाप असुन त्यामध्ये चेंबरच्या दोन भिंतीमधील 0.46 मी. जादा लांबी असे मिळुन मोजमाप दिलेले आहे. त्यामुळे ठेकेदारास जादा प्रदान झाले नाही असे खात्याने कळविले आहे.

एकूण खोदाईचे लांबीनुसार पाईपचे प्रदान करण्यात आले आहे. खोदाईच्या लांबीमधून चेंबरमधील पोकळी वजा करणे आवश्यक होते. त्यामुळे खात्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

5) ड्रेनेजचे पाईप टाकणेसाठी एकूण 905.68 घन मी. खोदाई करण्यात आली आहे. खोदाईमध्ये पाईप टाकून चेंबर बांधलेनंतर भराव करण्यात आला आहे. भरावाचे कामाची मोजमाप पुस्तकातील मापांची तपासणी केली असता एकूण खोदाईमधून पाईपचे आकारमान 22.58 घन मी. व चेंबरचे आकारमान 102.26 घन मी. असे एकूण 124.84 घन मी. वजा करुन प्रदान करणे आवश्यक होते. परंतु खात्याने फक्त् एकूण खोदाईमधून पाईपची आकारमान 22.58 घन मी. वजा करुन 883.10 घन मी. भराव केल्याचे नमूद करुन त्याप्रमाणे देयक प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे ठेकेदारास भरावाचे कामापोटी 102.26 घन मी.ची रु.31.50 प्रति घन मी. प्रमाणे रु.3221/- चे जादा प्रदान झाले आहे. तरी भरावापोटी जादा प्रदान झालेली रक्कम संबंधीताकडून वसुल करण्यात यावी.

खात्याने आक्षेपानुसार अनुपालन केलेले नाही.

6) विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2दि.12/09/2005 अन्वये कामाचा विमा शासनाकडे उतरविणे आवश्यक आहे. ठेकेदाराने कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्यास कामाच्या किंमतीच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासन निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्याने कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी शासन विम्यापोटी कामाच्या किंमतीच्या 1 टक्के रक्कम रु.15,096/- इतकी

संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

आक्षेपानुसार वसुलीची कार्यवाही करणेत येईल असे खात्याने कळविले आहे.

7) उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्रक्र108/कामगार 7अ दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1 टक्के वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे किंमतीच्या 1 टक्का रु.15,096/- वसुल केली नसल्याने ती संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

आक्षेपानुसार वसुलीची कार्यवाही करणेत येईल असे खात्याने कळविले आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 71, Hmm No : 61)

## *62 होटगीरोड कंबर तलाव लगतची ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष : शासन विशेष अनुदान शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 307380.00/-

***कामाचा विमा रक्कम रु. 1,53,690/- व कामगार कल्याण उपकर रक्कम रु.1,53,690/- अशी एकूण रक्कम रु.3,07,380/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात आली नाही.***

होटगीरोड कंबर तलाव लगतची ड्रेनेज लाईन टाकणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1)लेखाशिर्ष - शासन विशेष अनूदान.

2) अंदाजपत्रकिय रक्कम रु. 1,86,04,078/-

3) जाहिरात - दै. लोकमत दि.08/05/2010.

4) निविदा कालावधी - दि.10/05/2010 ते 26/05/2010.

5) प्राप्त निविदा - 3.

6) निविदा मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.394 दि.02/07/2010.

7) ठेकेदाराचे नांव - श्री. एम. एस. मुधोळकर, सोलापूर.

8) कार्यारंभ आदेश क्र. 640 दि.24/11/2010 (अंदाजपत्रकदराने)

9) कामाची निविदा किंमत रु.1,53,69,052/-

10) कामाची मुदत - 12 महिने

11) खर्च रु. 19,42,458/- ( प्रमाणक क्र. 1 दि.19/04/2012)

12) मोजमाप पुस्तक क्र. 143 पान नं. 84.

सदर कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 62 दि.23/06/2015 अन्वये खात्यास विचारणा करण्यात आली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. प्रविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2दि.12/09/2005 अन्वये कामाचा विमा शासनाकडे उतरविणे आवश्यक आहे. कामाचा विमा उतरविला नसल्यास कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम त्यांचे देयकातून वसुल करुन शासन निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा शासनाकडे उतरविला असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी विम्यापोटी कामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम रु.1,53,690/- इतकी संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

2) उद्योग उर्जा व कामगार विभग, महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्रक्र108/कामगार 7 अ दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर कामाच्या किंमतीचे 1 टक्का वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाचे किंमतीच्या 1 टक्का रु.1,53,690/- वसुल केली नसल्याने ती संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

वसुलपात्र रक्कम रु.307380/-

DGPKVSM6101 (Ref No : 72, Hmm No : 62)

## *63 सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये पाणी पुरवठा सुधारणा करणेसाठी इलेक्ट्रो मॅग्नेटिक मिटर व बल्क वॉटर मिटर बसविणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा (UIDSSMT केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 9749009.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9749009.00/-

***सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये पाणी पुरवठा सुधारणा करणेसाठी इलेक्ट्रो मॅग्नेटिक मिटर व बल्क वॉटर मिटर बसविणे. या कामासाठी वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये एकूण रक्कम रु.97,49,009/- एवढा खर्च करण्यात आला. करारपत्रातील अट क्र 1 नुसार सदरचे काम म्हणजे इलेक्ट्रो मॅग्नेटीक मीटर व बल्क वॉटर मीटर पुरविणे व बसविणे हे काम पुरवठा आदेशापासुन 12 महिन्या मध्ये पुर्ण करणे आवश्यक असताना लेखा परीक्षण***

***कालावधीत सदरचे मीटर फक्त पुरविण्यत आले असुन बसविण्याचे काम लेखापरीक्षण कालावधीत झाले नाही. सदरचे मीटरचा पुरवठा झाल्या नंतर मक्तेदारास मीटरच्या किंमतीच्या 90% रक्कम दिनांक 13/8/2012 रोजी देण्यात आली आहे. परंतु त्यानंतर मार्च 2013 पर्यंत मीटर बसविण्याचे काम झाले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये पाणी पुरवठा सुधारणा करणेसाठी इलेक्ट्रो मॅग्नेटिक मिटर व बल्क वॉटर मिटर बसविणे. या कामासाठी वित्तय वर्ष 2012-13 मध्ये प्रमाणक क्र. 09 दि.13/08/2012 अन्वये रक्कम रु.7022729/- व प्रमाणक क्र.10 दि.13/08/2012 अन्वये रक्कम रु.2726280/- असे एकूण रक्कम रु.97,49,009/- एवढा खर्च करण्यात आला. सदर देयकांची व निविदा नस्तीची तपासणी केली व आढळून आलेल्या त्रुटी बाबत अर्धसमास पत्र क्र. 28 दि. 31/03/2015 अन्वये कळविले. विभागाने त्याचे अनुपालन दि. 02/06/2015 रोजी सादर केले. सदरचे अनुपालन संयुक्तीक नाही,त्यामुळे लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर कामाची अंदाजित रक्कीम रु.12221000/- होती प्राप्त निविदा मधील कमी दराची निविदा बडगुजर ॲन्ड कंपनी, नाशिक यांची 7.26% जादा दरांची प्राप्त झाली होती व वाटाघाटी नुसार रक्कम रु.11699720 + 6.50% जादा दर स्थायी समिती ठराव क्र 1124 दि.23/12/2010 ने मंजूर करण्यात आली व त्यांना जा.क्र.936 दि.17/2/2011 अन्वये कामाचे आदेश देण्यात आले. करारपत्रातील अट क्र 1 नुसार सदरचे काम म्हणजे इलेक्ट्रो मॅग्नेटीक मीटर व बल्क वॉटर मीटर पुरविणे व बसविणे हे काम पुरवठा आदेशापासुन 12 महिन्या मध्ये पुर्ण करणे आवश्यक असताना लेखा परीक्षण कालावधीपर्यंत सदरचे मीटर फक्त पुरविण्यत आले असुन बसविण्याचे काम लेखापरीक्षण कालावधीत झाले नाही. सदरचे मीटरचा पुरवठा झाल्या नंतर मक्तेदारास मीटरच्या किंमतीच्या 90% रक्कम दिनांक 13/8/2012 रोजी देण्यात आली आहे. परंतु त्यानंतर मार्च 2013 पर्यंत मीटर बसविण्याचे काम झाले नाही.

2) इलेक्ट्रोमॅग्नेटिक मीटर पुरवठा केल्याबद्दल धनादेश क्रमांक 187509 दि.13/8/2012 अन्वये रक्कम रु.6601364/- बडगुजर ॲन्ड कंपनी यांना देण्यात आली व धनादेश क्र 187510 अन्वये र.रु.4,21,365/- आयकर, व्हॅट व सुरक्षित रक्कम इत्यादी कपातीची रक्कम वर्ग करण्यात आली. सदरचे देयकाची तपासणी केली असता सदरचे मीटर 350mm ते 900 mm आकाराचे एकूण 16 नग पुरवठा केल्याबद्दल रक्कम रु.73,26,791 + 6.5% जादा 476241 असे एकूण 78,03,032/- चे 90% रक्कम रु.70,22,729/- मंजुर करण्यात आली. प्रत्यक्षात संबंधितांना मंजूर करण्यात आलेले दर हे निविदा मधील बाब क्रमांक 1 मधील दरानुसार मंजुर करण्यात आले. परंतु सदरची बाब ही मीटर पुरवठा करणे, बसविणे व टेस्टींग देणे इत्यादी साठी असल्याने फक्त मीटर पुरवठा केल्यावर व ते न बसविता मक्तेदारास सदर बाबीच्या दराचे 90% रक्कम मंजूर करुन अदा करण्यात आली. प्रीबीड मिटींग मध्ये मुद्दा क्र.12 साहित्य पुरवठा झाल्या नंतर प्राप्त साहित्य रकमेच्या 80% रक्कम अदा करण्यात येईल असे नमुद होते. परंतु मक्तेदारास केवळ साहित्य पुरवठा पोटी 90% रक्कम दिल्याने रु.780303/- इतकी जादा रक्कम अदा झाली आहे.

3) तसेच सदर मक्तेदारास बल्क वॉटर मीटर व स्टेनर पुरवठयाबद्दल रक्कम रु.2726280/- मंजुर करुन धनादेश

क्र 187511 दि.13/8/12 अन्वये रु.2210237/- संबंधित मक्तेदारास आदा करण्यात आले. व धनादेश क्र 187512 दि.13/8/12 अन्व ये रु.56043/- आयकर, वॅट व सुरक्षित रक्कमेपोटी वर्ग करण्यात आल्या. सदरचे देयक लेखापरीक्षणास उपलब्ध  झाले नाही. वरील बिलाव्दारे मक्तेदारास त्याने पुरवठा केलेल्या. बल्क वॉटर मीटर व स्टेनर च्याबाबत निविदा मधील बाब क्र.1 व 2 च्या दराचे 90% दराने रक्कम मंजूर करुन अदा करण्यात आली. प्रत्यक्षात निविदा मधील बाब क्रमांक 1 व 2 मध्ये बल्क मीटर पुरवठा बसविणे व टेस्टींग करुन देणे इ. कामाकरीता दर आहेत परंतु मक्तेदाराने केवळ साहित्य पुरवठा केला आहे. सदरचे साहित्य बसविले नसतांना ही 90% रक्कम देण्यात आली असल्याचे आढळून आले.

4) सदरचे साहित्य साईटवर प्राप्त झाल्यानंतर त्यांची नोंद साठानोंदवहीस घेणे आवश्यक आहे. परंतु अशी साठा नोंदवही लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाही.

5) मोजमाप पुस्तक मध्ये उपरोक्त दोन बिलाच्या नोंदी घेतल्या आहेत परंतु सदरचे बील अदा झाल्या  नंतर त्या कर्णरेषेने अधोरेखित केल्या नाहीत. उदा.(MB No.186 पृष्ठ क्र 67 ते 70)

6) सदरचा खर्च केंद्र शासन अनुदान रु.32.39 कोटी मधुन करण्यात आला आहे. परंतु त्यामध्ये राज्य शासन व मनपा हिस्सा जमा केल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले नाही.

7) निविदा 6.50% जादा दराने मंजूर झाल्याने सदरचा जादा खर्च रु.794365/- मनपा निधीतून खर्च करणे आवश्यक आहे. परंतु सदरची रक्कम शासन निधीतून खर्च  केल्याने आता सदरची रक्कम मनपा निधीतून शासन निधीत  जमा करणे आवश्यक आहे.

8) मक्तेदार मे बडगुजर आणि कंपनी नाशिक यांनी एन्डरेस + हॉसेर या कंपनीचे इलेक्ट्रोमॅग्नेटिक प्रो मीटर व बल्क वॉटर मीटर पुरविले आहेत. जाहिरात निविदा प्रसिध्दी व निविदातील बाब क्र 1 नुसार सदरचे मीटरचा पुरवठा उत्पादित कंपनी अथवा त्यांचे अधिकृत विक्रेते यांचे कडून निविदा मागविल्या होत्या निविदेमध्ये मे. बडगुजर ॲन्ड कंपनी हे एन्डरेस + हॉसेर या कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत. निविदेनुसार मक्तेदार हे सदर मीटरचे उत्पादित कंपनी / अधिकृत विक्रेते असणे आवश्यक असताना त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे निविदे बरोबर नाहीत.

9) अटी व शर्ती मधील अट क्रमांक 8 व 10 नुसार सदरचे मीटर ISI स्टॅंडर्डचे पुरविणेचे आहे असे असताना पुरविण्यात आलेल्या मीटरचे ISI मानांकन लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाहीत व संबंधित उत्पादित कंपनी एन्डरेस + हॉसेर यांना ISI मानांकन ऐवजी ISO 9001 मानांकन प्राप्त असल्याचे आढळुन आले.

10) सदरचे काम हे कामाचे आदेश दि.17/2/2011 पासुन 12 महिन्यात म्हणजें 17/2/2012 पुर्वी पूर्ण होणे गरजेचे होते तथापी लेखा परीक्षण कालावधी पर्यंत म्हणजेच मार्च 2015 पर्यंत सदर मक्तेदारास वारंवार पत्राव्दारे व नोटीसीव्दारे सदरचे काम पुर्ण करणे बाबत कळविले आहे. सदर पत्र/नोटीसीमध्ये् मक्तेदाराने मीटरचा पुरवठा केलेला आहे. परंतु फक्त  4 ठिकाणी मीटर बसविण्याचे काम केले आहे. उर्वरीत ठिकाणी म्हणजे (16 – 4 = 12) 12 ठिकाणी मीटर अदयाप बसविले नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सदरचे काम विहीत मुदतीनंतर म्हणजे दि.17/2/2012 नंतर लेखा परीक्षण कालावधीपर्यंत संबंधित कामास मुदतवाढ नाही. तसेच सदरचे काम पूर्ण नाही तरी करारनामा अटी व शर्ती मधील तसेच निविदेमधील अट क्र 14 प्रमाणे दंडाची

आकारणी करुन अट क्र 7 प्रमाणे संबंधित मक्तेदाराची बयाणा रक्कम, सुरक्षित रक्कमेपोटीची बँक गॅरंटी रक्कम रु.3,75,000/- जप्त करुन मक्तेदारास काळया यादीमध्ये टाकण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे,परंतु सदर कार्यवाही केलेली नाही.

11) सदर मीटरचा पुरवठा दिनांक 2012-13 मध्ये झाला असून त्यांची रक्कम मक्तेरदारास दि.13/8/12 रोजी अदा केली आहे.त्यामुळे सदर बाबीवरील जकात रक्कम वसुल करणे आवश्यक होते. परंतु अशी जकातीची रक्कम वसूल केल्याची कागदपत्रे लेखा परीक्षणास आढळून आली नाहीत.

12) बँक गॅरंटी दि.15/1/2012 पर्यंत वैध होती त्यापुढील कालावधी करिता सदरची बँक गॅरंटी नुतनीकरण केल्याचे लेखा परीक्षणास नस्तीस पहावयास मिळाले नाही.

DATRNDM7201 (Ref No : 97, Hmm No : 28)

## *64 बाळेगाव येथे 2.0 द.ल.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा (UIDSSMT केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4122647.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4122647.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 858145.00/-

***पाईप पुरवठा मनपाने करणे ही बाब विचारात घेऊन अंदाजित रक्कम रु.10234352/- पुनर्गनित केल्यावर L.1 असलेले मक्तेदार L.K. कन्स्ट्रक्शन यांचेशी वाटाघाटी न करता L2 मक्तेदार मे.असोसिएटेड इंजिनिअर्स यांच्याशी वाटाघाटी केल्याचे आढळून आले. केंद्रीय दक्षता आयोग यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार सर्क्युलर क्र.4/3/07, दि.3/3/2007 मधील मुद्दा क्र. V नुसार वाटाघाटी करावयाचे झाल्यास फक्त L1 बरोबर वाटाघाटी करणे आवश्यक आहे. परंतु कसल्याही परिस्थितीत L2 बरोबर L3 बरोबर वाटाघाटी करु नये व अशा परिस्थीतीत L1 काम करण्यास तयार नसतील तर फेर निविदा मागविणे आवश्यक असताना L2 बरोबर म्हणजे मे.असोसिएटेड इंजिनिअर्स बरोबर वाटाघाटी करुन त्यांना कामाचे आदेश देण्यात आले.***

सोलापूर शहर हद्दवाढ भाग मधील बाळेगाव येथे 2.0 द.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे व पाईप लाईन घालणे. या कामाकरिता जाहिर निविदा दि.12.4.2008 रोजी प्रसिध्द करुन दि.30/4/2008 पर्यंत निविदा प्राप्त् झाल्या सदर निविदा नस्तीची तपासणी केली व आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र. 29 दि. 31/03/2015 अन्वये कळविले. विभागाने त्याचे अनुपालन दि. 02/06/2015 रोजी सादर केले. सदरचे

अनुपालन संयुक्तीक नाही, त्यामुळे लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर निविदा दि.7/5/2008 रोजी उघडण्यात आल्या. प्राप्तक निविदा पैकी L.K. कन्स्ट्रक्शन यांची 72% जादा दराची व असो. इंजि. यांची 78% जादा दराची निविदा प्राप्त झाली. त्या नंतर मा.आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार मक्तेदार L.K. कन्स्ट्रक्शन यांनी त्यांचेकडील दिनांक 9/7/2008 चे पत्रानुसार सदरचे काम 50% जादा दराने करण्यास तयार असल्याचे कळविले. त्यास स्थायी समिती ठराव क्र 776 दि.22/8/2008 ने मान्यता देण्यात आली. व मनपाने दि.11/11/2008 रोजीचे सुचना आदेशानुसार मक्तेदार L.K. कन्स्ट्रक्शन यांना त्यांचे टेंडर 50% जादा दरानी मंजूर झाल्याचे व टेंडर शर्ती प्रमाणे रु.3,37,430/- सुरक्षित रक्कम भरुन 7 दिवसात करारपत्र करुन घेण्यास कळविले होते. परंतु त्यानंतर L.K. कन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे दि.17/11/2008 चे पत्रानुसार वाटाघाटी नंतर बाजारात पाईपचे स्पेशल्स लेबर, डिझेल यामध्ये वाढ झाल्याने सदरचे काम 72% इतक्या जादा दराने करण्यास तयार असल्याचे कळविले. त्यानंतर म.न.पा. ने दि.1/12/2008 चे पत्रानुसार दुसरे निविदाधारक मे.असो.इंजि. यांना आयुक्तांचे दि.24/10/2008 चे आदेशनुसार सदरचे काम करण्यास तयार आहे किंवा कसे याबाबत 24 तासात कळवावे अशी विचारणा केली. सदर कामासाठी लागणारे पाईपची खरेदी मनपा कडून करणे हि बाब विचारात घेवून पाईपची किंमत वगळुन तुलना करुन ॲनॅलेसिस सादर करणेबाबत मा.आयुक्त यांचे समक्ष निर्णय झाल्यामुळे तसेच मक्तेदार L.K. कन्स्ट्रक्शन यांचा व्हॅलिडिटी पिरीयड संपुष्टात आल्यामुळे नंबर दोनचे निविदा धारक मक्तेदार मे.असोसिएट इंजिनियर्स यांचेशी वाटघाटी होऊन D.I. k9 पाईपचा पुरवठा म.न.पा.ने करण्याच्या अटीवर सदर मक्त्याची रक्कम रु.1,02,34,352/-करण्यात आली. त्यानुसार मक्तेदाराने सदरचे काम 29% जादा दराने करण्यास तयार असल्याचे कळविले व त्यानुसार मक्तेदार मे.असोसिएट इंजिनियर्स यांचेकडून काम करुन घेण्यास मुंबई प्रांतिक अधिनियम, 1949 चे कलम 73 क अन्वये स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी विनंती केली. त्यास आयुक्त यांनी दि.31/1/2009 रोजी मान्यता दिल्याचे आढळुन आले व त्यास स्थायी ठराव क्र 1740 दि.13/2/2009 नुसार मान्यता देण्यात आली. व त्यानुसार दि.1/6/2009 रोजी करारपत्र करण्यात आला.

परंतु दुसरे निविदाधारक मे.असोसिएटेड इंजि.यांची रजिस्ट्रेशनची मुदत दि.5/2/2009 पर्यतच होती त्यामुळे त्यांना कामाचे आदेश का देण्यात आले याचा खुलासा लेखापरीक्षणास केला नाही. तसेच पाईप पुरवठा मनपाने करणे ही बाब विचारात घेऊन अंदाजित रक्कम रु.10234352/- पुनर्गनित केल्यावर L.1 असलेले मक्तेदार L.K. कन्स्ट्रक्शन यांचेशी वाटाघाटी न करता L2 मक्तेदार मे.असोसिएटेड इंजिनिअर्स यांच्याशी वाटाघाटी केल्याचे आढळून आले. कैंद्रीय दक्षता आयोग यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार सर्क्युलर क्र.4/3/07, दि.3/3/2007 मधील मुद्दा क्र. V नुसार वाटाघाटी करावयाचे झाल्यास फक्त L1 बरोबर वाटाघाटी करणे आवश्यक आहे. परंतु कसल्या ही परिस्थितीत L2 बरोबर L3 बरोबर वाटाघाटी करु नये व अशा परिस्थीतीत L1 काम करण्यास तयार नसतील तर फेर निविदा मागविणे आवश्यक असताना L2 बरोबर म्हणजे मे.असोसिएटेड इंजिनिअर्स बरोबर वाटाघाटी करुन त्यांना कामाचे आदेश देण्यात आले.

सदर कामाची मुदत दि.26/6/2009 पासुन 18 महिने म्हणजे दि.11/12/2010 पर्यंत होती सदरचे काम मुदतीत प्रगतीकारक झाले नसल्याने मा.आयुक्त यांनी दि.27/7/2011 रोजी मक्तेदारास दि.1/11/2011 पासुन

प्रतिदिन रु.500/- दंड आकारण्यास मान्यता दिली. परंतु पुन्हा मा.आयुक्त यांचे दालनात दि.28/8/2012 रोजी सदरचे काम मार्च 13 पर्यंत पुर्ण करण्यात येईल असे ठरले असल्याचे नस्तीतील करारापत्रावरुन दिसुन येते. परंतु संबंधितांना मार्च 13 पर्यंत मुदतवाढ दिल्याची कागदपत्रे नस्तीस उपलब्ध नाहीत. सदरचे काम मार्च 2013 पर्यंत पुर्ण झाले नाही. त्यामुळे रु.200/- प्रतिदिन प्रमाणे व दि.17/11/2014 रोजीचे आदेशानुसार मा.आयुक्त यांनी प्रतिदिन 1224/- प्रमाणे दंड आकारणीस मान्यता दिली. व त्या प्रमाणे 7 वे धावते देयक ते 12 वे धावते देयक मधून दंडाची आकारणी करुन वसुली केली आहे. 12 वे धावते देयक दि.25/9/2014 पर्यंतचे आदा केले असुन सदर कामावर रु.9792,287/- एवढा खर्च झाला आहे.

२) हायड्रोलिक टेस्टींग दि.25/9/2014 पुर्वी केली आहे. परंतु लेखा परीक्षण कालावधीतपर्यंत सदरचे काम पुर्ण झाले असल्याची कागदपत्रे नस्तीस नाहीत.

3) निविदेबरोबर कागदपत्रानुसार मे.असो.इंजि.यांचे रजिस्ट्रेशनची मुदत दि.5/2/2009 पर्यंत होती. त्यापुढील मुदतवाढीचे कागदपत्रे नस्तीस आढळून आली नाहीत.

4) करारनामा 100 रु. च्या मुद्रांकावर केला होता. रु.12,300/- या मुद्रांक शुल्क कमी होते. ती रक्कम 8 वे धावते देयकातून वसुल केली आहे,परंतु ती शासनास भरणा करणे आवश्यक असताना शासनास भरणा केली नाही.

5) मक्तेदाराने जनता बँकेची क्र 86 र.रु.2,04,690/- ची बँक गॅरन्टी दि.12/3/2009 रोजीची दिली होती. सदर बँक गॅरन्टी मुदत दि.11/3/2011 रोजी संपली होती. परंतु सदरचे काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पूर्ण झाले नाही. दि.4/5/2011 च्या पत्रान्वये मक्तेदारास कळवुन सुध्दा सुधारीत बँक गॅरन्टी घेतली नसल्याचे लेखा परिक्षणास आढळुन आले. अनुपालनामध्ये सदरचे काम दि. 25/09/2014 पर्यंत हायड्रोलिक टेस्टींगसह पुर्ण केल्याने मक्तेदाराची बँक गॅरंटी परत केल्याचे नमुद केले आहे. परंतु काम पूर्णत्वाचा दाखला लेखा परीक्षणास पहावयास मिळाला नाही. तसेच बँक गॅरंटी परत करण्याचे आदेश नस्तीस आढळून आले नाहीत.

6) मक्तेदाराने सदर कामासाठी म.न.पा.हद्दीत आणलेल्या साहित्या वरील जकात आणि एल बी टी वसुल केल्याचे कागदपत्रे लेखा परीक्षणास नस्तीस आढळून आली नाहीत.

7) तसेच मक्तेदाराने सदर कामासाठी वापरलेल्या. गौण खनिजाबाबतची रॉयल्टी रक्कम महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग आधी दि. 15/12/2006 नुसार प्रती घन मिटर रु. 35.67 प्रमाणे शासनास भरणा करणे आवश्यक असताना ती शासनास भरली नाही.

8) सदर कामाची निविदा 29% जादा दराची असल्याने सदर कामावर मार्च 2013 अखेर झालेला खर्च रक्कम रु. 4122647/- च्या 29% प्रमाणे रक्कम रु. 858145/- चा खर्च मनपा निधीतून करणे आवश्यक असताना शासन निधीतुन केला आहे.

DATRNDM7201 (Ref No : 98, Hmm No : 29)

## *65 सोलापूर महानगरपालिका हद्दीतील केगांव भागात 0.8 द.ल.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा (UIDSSMT केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4143624.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4143624.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2071812.00/-

***सदर कामाची मुदत कामाचे आदेशापासुन 18 महिने होती. जागा उपलब्ध न झाल्याने व टाकीची उंची 11 मीटर ऐवजी 15 मीटर पर्यंत वाढविल्याने RCC डिझाइन बदलले मुळे दि.23/11/2010 चे मान्यतेनुसार दि.31/3/2011 अखेर मुदतवाढ मान्य करण्यात आली. परंतु पुढे कामामध्ये प्रगति झाली नसल्याने दि.31/3/2011 रोजी च्या मा.आयुक्त यांचे मान्यतेनुसार दि.1/2/2011 पासुन प्रतिदिन 500/- रु. दंड आकारणी करणेस मान्यता दिली. पुन्हा दि.25/11/2011 रोजीच्या मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार एकवट दंड रु.10,000/- आकारणी करणेस मान्यता पुन्हा दि.30/10/2012 च्या मान्यतेनुसार डिसेंबर 12 पर्यंत मुदतवाढ दिली. दि.13/7/2013 च्या बैठकीमध्ये मा.आयुक्त यांनी सदरचे काम जुलै 2013 पर्यंत पुर्ण करावे, अन्यथा दंडाची आकारणी करण्यात येईल असे सांगितले. परंतु सदरचे काम लेखा परीक्षण कालावधी पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील केगांव भागात 0.8 या द.ल.लि. क्षमतेची उंच पाणी टाकी बांधणे या करीता दि.12/4/08 रोजी जाहिर निविदा प्रसिध्द केली होती. सदर कामासाठी दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदा नस्तीची तपासणी केली व आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 30 दि. 31/03/2015 अन्वये कळविले. विभागाने त्याचे अनुपालन दि. 02/06/2015 रोजी सादर केले. सदरचे अनुपालन संयुक्तीक नाही.त्यामुळे लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) L.K. कन्स्ट्रक्शन यांची निविदा 78% जादा दराची व मे असोसिएटेड.इंजिनिअर्स. यांची 69% जादा दराची होती. त्यानंतरची दि.30/6/2008 रोजी मा.आयुक्त यांचे बरोबर झालेल्या चर्चेनुसार DI पाईप वरील शुल्क माफी मनपाने मक्तेदारास मिळवून देणेचे अटीवर सदर काम 50% जादा दराने करण्यास तयार असल्याचे दि. 18/7/2008 च्या पत्रान्वये मक्तेदाराने कळविले. दिनांक 13/10/2008 च्या सुचना आदेशाप्रमाणे दि.30/11/2008 रोजी करारपत्र करण्यात आले. सदर कामाची मुदत कामाचे आदेशापासुन 18 महिने होती. जागा उपलब्ध न झाल्याने व टाकीची उंची 11 मीटर ऐवजी 15 मीटर पर्यंत वाढविल्याने RCC डिझाइन बदलले मुळे दि.23/11/2010 चे मान्यतेनुसार दि.31/3/2011 अखेर मुदतवाढ मान्य करण्यात आली. परंतु पुढे कामामध्ये प्रगति झाली नसल्याने दि.31/3/2011 रोजी च्या मा.आयुक्त यांचे मान्यतेनुसार दि.1/2/2011 पासुन प्रतिदिन 500/- रु. दंड आकारणी करणेस मान्यता दिली. पुन्हा दि.25/11/2011 रोजीच्या मा.आयुक्त यांच्या

मान्यतेनुसार एकवट दंड रु.10,000/- आकारणी करणेस मान्यता पुन्हा  दि.30/10/2012 च्या मान्यतेनुसार डिसेंबर 12 पर्यंत मुदतवाढ दिली. दि.13/7/2013 च्या बैठकीमध्ये मा.आयुक्त  यांनी सदरचे काम जुलै 2013 पर्यंत पुर्ण करावे, अन्यथा दंडाची आकारणी करण्यात येईल असे सांगितले. परंतु सदरचे काम लेखा परीक्षण कालावधी पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे आढळुन आले.त्यामुळे जुलै 2013 नंतरच्या कालावधीसाठी मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार दंडाची आकारणी करणे आवश्यक होते परंतु तशी दंडाची आकारणी केली नसल्याचे आढळून आले .

2) पुरवणी करारनामा Rs.6700/-च्या स्टँम्प पेपरवर करण्यात आला आहे. परंतु सदर करारनाम्यामध्ये दिनांक नमुद नाही व त्यावर सार्वजनिक आरोग्य अभियंत्याची सही नाही.

3) मक्तेदाराने दि.23/10/2004 रोजी रु.102436/- या बँक गॅरन्टी दिल्याचे करारनाम्यामध्ये नमुद आहे. परंतु सदरची बँक गॅरन्टी कागदपत्रे लेखा परीक्षणास पहावयास मिळाली नाही. त्यामुळे त्याची मुदत केव्हा पर्यंत होती व त्यापुढील कालावधीकरीता सदर बँक गॅरटीचे नुतनीकरण योग्य त्या मुदतीपर्यंत केल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही. अनुपालनामध्ये सदरचे काम दि. 27/11/2013 पर्यंत हायड्रॉलिक टेस्टिंग पुर्ण केल्याने मक्तेदाराची बँक गॅरंटी परत केल्याचे नमुद केले आहे. परंतु काम पूर्णत्वाचा दाखला लेखा परीक्षणास पहावयास मिळाला नाही. तसेच बँक गॅरंटी परत करण्याचे आदेश नस्तीस आढळून आले नाहीत.

4) मक्तेदाराने सदर कामासाठी म.न.पा.हद्दीत आणलेल्या साहित्या वरील जकात / एल बी टी वसुल करणे आवश्यक होते परंतु सदरची रक्कम वसूल केल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही.

5) तसेच मक्तेदाराने सदर कामासाठी वापरलेल्या. गौण खनिजाबाबतची रॉयल्टी रक्कम महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग आधी दि. 15/12/2006 नुसार प्रती घन मिटर रु. 35.67 प्रमाणे शासनास भरणा करणे आवश्यक आहे. परंतु सदरची रक्कम वसूल करून शासनास भरणा केल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही.

6) सदर कामाची निविदा 50% जादा दराची असल्याने सदर कामावर मार्च 2013 अखेर झालेला खर्च रक्कम रु. 4143624/- च्या 50% प्रमाणे रक्कम रु. 2071812/- चा खर्च मनपा निधीतून करणे आवश्यक असताना शासन निधीतुन केला आहे त्यामुळे सदरची रक्कम मनपा निधीतुन शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 99, Hmm No : 30)

## *66 मजरेवाडी 2+2 द.ल.लि., सोरेगाव 1 द.ल.लि. प्रतापनगर 0.5 द.ल.लि.क्षमतेची उंच टाकी बांधणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा (UIDSSMT केंद्र व राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 12693069.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12693069.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 528488.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 6981188.00/-

***सदर कामाची मुदत कार्यादेशापासुन म्हणजे दि.24/8/2009 पासुन 20 महिने हाती. परंतु सदर कामापैकी सोरेगाव व प्रतापनगर येथील टाकीचे कामाची सुरुवात जागेच्या वादामुळे लेखापरीक्षण कालावधी पर्यंत म्हणजे मार्च 2015 पर्यंत झाली नसल्याचे आढळुन आले. जागा निश्चीत नसताना सदर कामाची जाहिर निविदा काढण्यात आली असल्याचे आढळुन आले. मक्तेदारास दि.26/8/2011 रोजी दिलेल्या 13,00,000/- रु ॲडव्हॉन्स पैकी रु.8,03,712/- चे समायोजन लेखापरीक्षण कालावधी पर्यंत म्हणजे मार्च 2015 पर्यंत झाले आहे परंतु उर्वरीत रक्कम रु.4,96,288/- ची वसुली / समायोजन झाले नाही. तरी शिल्लक अग्रिम रक्कम रु.4,96,288/-ची वसुली / समायोजन सत्वर करणे आवश्यक आहे.***

सोलापूर शहर हद्दवाढ भागातील मजरेवाडी (शांतीनगर) व म्हाडा कॉलनी जुळे सोलापूर येथे प्रत्येकी 2 द.ल.लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे, सोरेगांव येथे 1 द.ल.लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे व प्रतापनगर येथे 0.5 द.ल.लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे या कामासाठी दिनांक 17/7/2009 रोजी जाहिर प्रसिध्दीव्दारे निविदा मागविल्या होत्या. या कामासाठी 3 निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदा नस्तीची तपासणी केली. व आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 31 दि. 31/03/2015 अन्वये कळविले. विभागाने त्याचे अनुपालन दि. 02/06/2015 रोजी सादर केले. सदरचे अनुपालन संयुक्तीक नाही,त्यामुळे लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मे. दास ऑफशेअर यांची 55% जादा दराची निविदा सर्वात कमी होती. मा.आयुक्त यांचे समवेत झालेल्या वाटाघाटी नुसार सळई सिमेंट व्हाल्वे सेटरिंग सामान यावर जकात माफी देणे व DI पाईप ऐवजी CI पाईप वापरणे या बाबीमुळे निविदाधारक मे. दास ऑफशेअर यांनी 30% जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले. त्यास स्थायी समिती ठराव क्र 944 दि.21/8/2009 ने मान्यता दिली आहे. त्यानुसार जा.क्र./साआअ/425/ दि.24/8/2009 यांचे नुसार कामाचे आदेश दिले असुन सदर मक्तेदार यांनी दि.22/8/2009 रोजी करारनामा 100 रु. स्टॅम्प/पेपरवर केला आहे. सदर कामाची मुदत कार्यादेशापासुन म्हणजे दि.24/8/2009 पासुन 20 महिने हाती. परंतु सदर कामापैकी सोरेगाव व प्रतापनगर येथील टाकीचे कामाची सुरुवात जागेच्या वादामुळे लेखापरीक्षण कालावधी पर्यंत झाली नसल्याचे आढळुन आले. जागा निश्चीत नसताना सदर कामाची जाहिर निविदा काढण्यात आली असल्याचे आढळुन आले.

2) मोजमाप नोंदवही नुसार 2012-13 मध्ये प्रमाणक क्र 7. दि.13/08/2012 अन्वये रक्कम रु.232704/- प्रमाणक क्र 25 दि.20/10/2012 अन्वये रक्कम रु.1418712/- प्रमाणक क्र 33 दि.27/11/2012 अन्वये रक्कम रु.407192/- असे एकूण रु.2118608/- खर्च करण्यात आला आहे व उपरोक्त चारही कामावर मार्च 2013 पर्यंत एकूण रु.12693069/- खर्च झाला आहे परंतु सदरचे काम मार्च 2013 अखेर पुर्ण झाले नसल्याचे आढळुन आले.

3) सदर मक्तेकदारास मार्च 2013 पर्यंत विनादंड मुदतवाढ दिली होती परंतु त्यापुढील काम पूर्ण होईपर्यन्तच्या

कालावधीकरीता दंडाची आकारणी केल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले नाही

4) मोजमाप नोंदवहीनुसार सोरेगांव व प्रतापनगर येथील कामावर अनुक्रमे रक्कम रु. 915,820/- व रु. 529,506/- खर्च झाल्याचे आढळुन आले परंतु सदरचा खर्च कोणत्या बाबींवर करण्यात आला त्याबाबतची कागदपत्रे नस्तस आढळुन आली नाही त्यामुळे सदरचा खर्च लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही.

5) मक्तेकदारास खालीलप्रमाणे स्टील (सळई) पुरवठा पोटी अग्रिम देण्यात आले आहे. परंतु सदर अग्रिम रक्कमेचे समायोजन झाले नसल्याचे आढळुन आले.

| अ.क्र | दिनांक | ॲडव्हॉन्स रक्क्म रु | वसुल रक्कम रु | शिल्लक रु | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 26/8/2011 | 1300000 | 803712 | 496288 | धावते देय क्र. 7ते10 मध्ये 803712 रु वसुल |

सदर मक्तेदारास दि.26/8/2011 रोजी दिलेल्या 13,00,000/- रु ॲडव्हॉन्स पैकी रु.8,03,712/- चे समायोजन लेखापरीक्षण कालावधी पर्यंत म्हणजे मार्च 2015 पर्यंत झाले आहे परंतु उर्वरीत रक्कम रु.4,96,288/- ची वसुली / समायोजन झाले नाही. तरी शिल्लक अग्रिम रक्कम रु.4,96,288/-ची वसुली / समायोजन सत्वर करणे आवश्यक आहे.

6) सदर मक्तेदाराची निविदा रक्कम रु. 33106177 असल्याने मुद्रांक शुल्क मुंबई मुद्रांक अधिनियम 1954 चे नियम 63 नुसार दि.2/5/2006 च्या दरानुसार रु.32400/- चे स्टँम्प पेपर करारनामा करणे आवश्यक असताना 100/- रु. च्या स्टँम्प पेपरवर केला असल्याने उर्वरीत रक्कम रु.32,200/- वसुल करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

7) मक्तेदाराने सदर कामासाठी म.न.पा.हद्दीत आणलेल्या साहित्या वरील जकात / एल बी टी वसुल करणे आवश्यक असताना तशी रक्कम वसूल केल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले नाही.

8) मक्तेदाराने सदर कामासाठी वापरलेल्या. गौण खनिजाबाबतची रॉयल्टी रक्कम महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग आधी दि. 15/12/2006 नुसार प्रती घन मिटर रु. 35.67 प्रमाणे शासनास भरणा करणे आवश्यक असताना तशी रक्कम वसूल करून शासनास भरणा केल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले नाही.

10) सदर कामाची निविदा 55% जादा दराची असल्याने सदर कामावर मार्च 2013 अखेर झालेला खर्च रक्कम रु. 1,26,93,069/- च्या 55% प्रमाणे रक्कम रु. 6981188/- चा खर्च मनपा निधीतून करणे आवश्यक असताना शासन निधीतुन केला आहे त्यामुळे सदरची रक्कम मनपा निधीतुन शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 100, Hmm No : 31)

## ***67 उजनी,पाकणी,टाकळी,भवानी पेठ व MBR जुळे सोलापूर, जलशुध्दीकरण केंद्राचे पंपीग स्टेशनवर APFC पॅनल व कॅपॅसिटर बसविणे.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3999872.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3999872.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9937.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 398876.00/-

***मक्तेदारास दि.3/1/2012 रोजी कार्यादेश दिल्यानंतर मक्तेदाराने दि.9/1/2012 रोजी ड्रॉईंग मंजूरीसाठी महापालिकेकडे सादर केले परंतु महानगरपालिकेने सदरचे ड्रॉईंग दि.3/3/2012 रोजी इतक्या उशिराने मंजूर केले. कामाची मुदत तीन महिने असताना महानगरपालिकेने ड्रॉईंग मंजूरीसाठी जवळ जवळ दोन महिने घेतले आहेत. तसेच मक्तेदारास पाकणी, टाकळी व MBR जुळे सोलापूर येथील काम करणेसाठी अटी व शर्ती प्रमाणे मनपाने केबल पुरवठा न केल्याने सदर ठिकाणच्या पॅनल व कपॅसिटर जोडणीचे काम पूर्ण झाले नाही व त्यामुळे सदर ठिकाणच्या वीज बिलामध्ये माहे मे 2012 पासून 1.00 पॉवर फॅक्टर न मिळाल्याने महावितरण कंपनीकडून वीज बिलामध्ये 7.00% इंन्सेटिव्ह मिळाला नाही. सदरचे काम तीन महिन्यात म्हणजे दि.3/4/2012 पुर्वी करणे आवश्यक असताना सदर सदरचे काम चार महिने उशिराने झाल्याने महानगरपालिकेचे पाकणी केद्राचे लाईटबील मध्ये माहे सप्टेम्बर 2012 पासून पॉवर फॅक्टर 1.00 मिळाला परंतु माहे एप्रिल 2012 ते ऑगस्ट 2012 या कालावधीत आल्याने पॉवर फॅक्टर 1.00 मिळाला नसल्याने 7% पेक्षा कमी इंन्सेटिव्ह मिळाल्याने मनपाचे रक्कम रु 398876/- चे नुकसान झालेले आहे.***

सोलापूर महानगरपालिका आपल्या विविध ठिकाणच्या पंपींग हाऊस व जलशुध्दीकरण केंद्र ठिकाणी वापरलेल्या विजेसाठी वीज मंडळास दरमहा सुमारे एक कोटी रुपये वीजबील देते. अशा ठिकाणी जर पावर फॅक्टर 1.00 मिळाला तर महावितरण कंपनी कडून 7.00% इंन्सेटिव्ह दिला जातो. व जर पॉवर फॅक्टर 0.90 पेक्षा कमी मिळाला तर दंडाची आकारणी केली जाते त्यामुळे दंड आकारणी टाळणेसाठी व इंन्सेटिव्ह मिळविणेसाठी मनपाने सर्व पंपींग हाऊस व जलशुध्दीकरण केंद्र ठिकाणी APFC पॅनल व कॅपसिटर बसविणे हे काम करुन घेणेसाठी स्थायी समितीने ठराव क्रमांक 1018 दि.28/12/2011 अन्वये सदरचे काम निविदा पध्दतीने करुन घेण्यास मान्यता दिली. त्याप्रमाणे जाहीर प्रसिध्दी केल्याप्रमाणे मुदतीत तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा संकल्प इलेक्ट्रिकल्स सांगली. यांची मंजूर करण्यात आली. या कामासाठी संकल्प इलेक्ट्रिकल्स सांगली यांना वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये प्रमाणक क्र.2 दि.22/08/2012 अन्वये रक्कम.रु.39,99,872/- प्रदान केले आहेत. सदर कामाची प्रमाणके, निविदा नस्ती, मोजमाप नोंदवही इ. अभिलेखासह तपासणी केली व आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र. 58 दि. 15/06/2015

अन्वये कळविले. विभागाने त्याचे अनुपालन दि. 02/06/2015 रोजी सादर केले. सदरचे अनुपालन संयुक्तीक नाही. तरी लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत

1) संकल्प इलेक्ट्रिकल्स सांगली. यांना कामाचे आदेश दि.3/1/2012 रोजी देण्यात आले होते. व त्यानुसार सदरचे काम तीन महिन्यात म्हणजे दि.3/4/2012 पुर्वी करणे आवश्यक असताना सदर कामापैकी उजनी व भवानी पेठ येथील काम दि.28/04/2012 रोजी व उर्वरीत ठिकाणचे काम ऑगस्ट 2012 मध्ये पूर्ण केले आहे. मक्तेदारास दि.9/8/2012 रोजी काम पुर्णत्वाचा दाखला देण्यात आला आहे. कामाची विहित मुदत तीन महिने असताना काम 4 महिने उशिराने पूर्ण केल्याचे आढळुन आले.सदरचे काम विलंबाने होण्यास खालील प्रमाणे प्रशासकीय कार्यवाही जबाबदार असल्याचे आढळून आले.

2) मक्तेदारास दि.3/1/2012 रोजी कार्यादेश दिल्यानंतर मक्तेदाराने दि.9/1/2012 रोजी ड्रॉईंग मंजूरीसाठी महापालिकेकडे सादर केले परंतु महानगरपालिकेने सदरचे ड्रॉईंग दि.3/3/2012 रोजी इतक्या उशिराने मंजूर केले. कामाची मुदत तीन महिने असताना महानगरपालिकेने ड्रॉईंग मंजूरीसाठी जवळ जवळ दोन महिने घेतले आहेत. त्यामुळे मक्तेदाराने 20/03/2012 चे पत्राने दोन महिने मुदतवाड ची मागणी केली होती.

3) मक्तेदाराने मंजूर ड्रॉईंग प्रमाणे पॅनल व कपॅसिटर बनविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर थर्ड पार्टी इन्सपेक्शन साठी महानगरपालिकेस दि.11/04/2012 रोजी पत्र दिले होते, परंतु मनपाने दि.21/4/2012 रोजी संबंधितास सदर कामाचे इन्सपेक्शन करणा-स यांना कळविले आहे. थर्ड पार्टी इन्सपेक्शन रिपोर्ट दि.25/04/2012 रोजी प्राप्त झाला त्यनुसार  मक्तेदाराने दि.26/04/2012 रोजी पॅनल व कपॅसिटर मटेरिअल कामाचे ठिकाणी आणले व उजनी पंप हाउस व  भवानी पेठ पंप हाउस  येथे दि.27/04/2012 रोजी कमिशनिंग करुन दि.28/04/2012 रोजी पॅनल व कपॅसिटर जोडणीचे काम पूर्ण केले आहे. त्यामुळे सदर ठिकाणच्या वीज बिलामध्ये  माहे मे 2012 पासून 1.00 पॉवर फॅक्टर मिळाल्याने महावितरण कंपनीकडून वीज बिलामध्ये  7.00% इंन्सेटिव्ह मिळाला आहे. परंतु मक्तेदारास पाकणी, टाकळी व MBR जुळे सोलापूर येथील काम करणेसाठी अटी व शर्ती प्रमाणे मनपाने केबल पुरवठा न केल्याने सदर ठिकाणच्या  पॅनल व कपॅसिटर जोडणीचे काम पूर्ण झाले नाही  व त्यामुळे सदर ठिकाणच्या वीज बिलामध्ये  माहे मे 2012 पासून 1.00 पॉवर फॅक्टर न मिळाल्याने महावितरण कंपनीकडून वीज बिलामध्ये  7.00% इंन्सेटिव्ह मिळाला नाही.

4) मक्तेदाराने LT APFC पॅनल व कॅपॅसिटर पुरविणे व मनपाने केबल वायर्स पुरवठा करणे या अटीवर सदर कामाचा मक्ता देण्यात आला होता.त्याप्रमाणे मक्तेदाराने दि 19/01/2012 रोजी केबलची मागणी केली होती परंतु सोरेगाव येथील शिल्लक केबल सदर कामासाठी मक्तेदारास देण्यास तेथील उपअभियंता श्री.गायकवाड यांनी विरोध दर्शविला. मक्तेदाराने पाकणी, टाकळी व MBR जुळे सोलापूर येथील कामासाठी केबलची मागणी दि.23/05/2012 रोजी केली त्याप्रमाणे मनपाकडून पाकणी, टाकळी व MBR जुळे सोलापूर येथील कामासाठी निविदा प्रक्रियेव्दारे नवीन केबल खरेदी करण्याचे ठरविले  व त्याप्रमाणे निविदा प्रक्रियेव्दारे नवीन केबल खरेदी करून  मक्तेदारास ऑगस्ट 2012 मध्ये केबल पुरवठा केल्याने  मक्तेदाराने दि.8/8/2012 रोजी पाकणी, टाकळी व MBR जुळे सोलापू ठिकाणचे पॅनल जोडणीची कामे पूर्ण केले आहे.     सदरचे काम तीन महिन्यात म्हणजे दि.3/4/2012 पुर्वी करणे आवश्यक असताना सदर सदरचे काम चार महिने उशिराने झाल्याने महानगरपालिकेचे

पाकणी केद्राचे लाईटबील मध्ये माहे सप्टेम्बर 2012 पासून पॉवर फॅक्टर 1.00 मिळाला परंतु माहे एप्रिल 2012 ते ऑगस्ट 2012 या कालावधीत आल्याने पॉवर फॅक्टर 1.00 मिळाला नसल्याने 7% पेक्षा कमी इंन्सेटिव्ह मिळाल्याने मनपाचे खालीलप्रमाणे रक्कम रु 398876/-चे नुकसान झालेले आहे.

| अक्र. | कालावधी | वीजबिल रक्कम रु. | पॉवर फॅक्टर | मिळालेली इन्सेन्टीव्ह रक्कम रु. | 7% प्रमाणे इन्सेन्टीव्ह रक्कम रु. | फरक रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एप्रिल 2012 | 1975466 | 0.960 | 19754 (1%) | 138282 | 118528 |
| 2 | मे 2012 | 1804860 | 0.980 | 54145 (3%) | 126340 | 72194 |
| 3 | जुलै 2012 | 1914578 | 0.960 | 19145(1%) | 134020 | 114875 |
| 4 | ऑगस्ट 2012 | 2331976 | 0.984 | 69959 (3%) | 163238 | 93279 |
| | | | | | एकूण रु. | 398876/- |

5) MBR जुळे सोलापूर येथील काम दि.8/8/2012 रोजी पूर्ण झाले तरी तेथील एप्रिल 2012 ते मार्च 13 या कालावधीच्या वीज बिलांची तपासणी केली असता. ऑक्टोबर 2012, जानेवारी 2013, फेब्रुवारी 2013 या कालावधीत पॉवर फॅक्टर 1.00 न आल्याने 7% इंन्सेटिव्ह मिळाला नाही. करारनामा अटी व शर्ती मधील अट क्र.16 प्रमाणे काम पूर्ण झाल्याने तीन वर्ष मेंटेंनन्स मक्तेदाराकडे असुन या कालावधीत पॉवर फॅक्टर 1.00 न आल्यास महानगरपालिकेचे इंन्सेटिव्ह न मिळाल्याने होणारे नुकसानाची मक्तेदाराने भरपाई करावयाची आहे. त्यामुळे माहे ऑक्टोबर 2012, जानेवारी 2013 व फेब्रुवारी 2013 मध्ये पॉवर फॅक्टर 1.00 न आल्याने मपनाचे इंन्सेटीव्ह मध्ये झालेले नुकसानीची रक्कम रु.9937/- मक्तेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.परंतु ते वसूल केले नाहीत.

| अक्र. | कालावधी | वीजबिल रक्कम रु. | मिळालेली इन्सेन्टीव्ह रक्कम रु. | 7% प्रमाणे इन्सेन्टीव्ह रक्कम रु. | फरक रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑक्टोबर 2012 | 127200 | 5535 | 8904 | 3374 |
| 2 | जानेवारी 2013 | 124308 | 5405 | 8702 | 3297 |
| 3 | फेब्रुवारी 2013 | 123141 | 5354 | 8620 | 3266 |
| | | | | एकुण | 9937 |

## ***68 वडकबाळ ते होनमुर्गी फाटा पर्यंत 1200 mm व्यासाची M.S. पाण्याची पाईप लाईन घालणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा केंद्र व राज्य शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 32483846.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1225571.00/-

***सदर कामाचे आदेश दि.7/04/2011 रोजी देण्यात आले होते व सदर कामाची मुदत कार्यादेश तारखेपासून 6 महिने होती म्हणजे सदरचे काम दि.07/10/2011 पूर्वी पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु सदरचे काम मार्च 2013 अखेर पर्यंत तसेच लेखा परीक्षण कालावधीपर्यंत म्हणजे जुन 2015 पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेकडील टाकळी ते सोलापूर या पिण्याच्या पाईपलाईन मधील वडकबाळ ते होनमुर्गी या वारंवार गळती होणा-या व जुनी पाईपलाईन खराब झालेल्या 1.6 कि.मी. पाईपलाईनला समांतर 1200 मीमी व्यासाची नवीन MS पाईप लाईन घालणे हे काम करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात आल्या. सदर काम करण्यासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 306, दिनांक 27/12/2010 अन्वये मान्यता देण्यात आली होती. सदर कामाचे पुर्वगणनपत्रक रक्कम रु.4,66,22,755/- चे होते. सदरचे काम पार्ट A म्हणजे समांतर पाईप लाईन टाकणे व त्यातुन पाणी पुरवठा सुरु झाल्यानंतर पार्ट B जुनी पाईप लाईन काढुन त्याची विक्री करणे असे होते. याबाबत दोन राज्यस्तरीय वृत्तपत्रामध्ये निविदा जाहिर प्रसिध्द करण्यात आली. व त्यानुसार 8 निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी 7 निविदा धारकांच्या निविदा उघडण्यात आल्या. त्यामध्ये सुरेंद्र इंजिनियरींग, मुंबई यांची एस्टिमेट दाराच्या 8.1 % कमी ही निविदा सर्वात कमी दराची असलेने ती मान्य करण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्रमांक 1456, दि.28/02/2011 अन्वये मान्यता देण्यात आली. व त्यानुसार दि.02/04/2011 रोजी करारपत्र करुन घेऊन जा.क्र./साआअ/जनि/18, दिनांक 07/04/2011 अन्वये कामाचे आदेश देण्यात आले व सदर काम पूर्ण करण्याची मुदत 180 दिवस देण्यात आली.

सदर कामावर 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खालील प्रमाणकाव्दारे रक्कम रु.3,24,83,846/- एवढा खर्च करण्यात आला असल्याचे आढळुन आले.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रु. | धावते देयक क्र. |
|---|---|---|---|---|
| 01 | 03 | 26/04/2012 | 6889169/- | 2 |
| 02 | 459 | 22/08/2012 | 7890106/- | 3 |
| 03 | 481 | 21/09/2012 | 6041151/- | 4 |
| 04 | 488 | 30/11/2012 | 4000000/- | 5 (पार्ट पेमेंट) |

Solapur (M Corp.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 05 | 492 | 01/01/2013 | 3585771/- | 5 (उर्वरित रक्कम ) |
| 06 | 512 | 30/03/2013 | 4077649/- | 6 |
| | | | **3,24,83,846/-** | |

सदर खर्चाची प्रमाणके,प्राकलन,दरसुची मोजमाप नोंदवही इ.सह तपासणी केली व आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 147 दि.31/07/215 अन्वये कळविले होते विभागाने त्याचे अनुपालन सादर केले नाही.याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) सदर कामाचे आदेश दि.7/04/2011 रोजी देण्यात आले होते व सदर कामाची मुदत कार्यादेश तारखेपासून 6 महिने होती म्हणजे सदरचे काम दि.07/10/2011 पूर्वी पुर्ण होणे आवश्यक होते. परंतु सदरचे काम मार्च 2013 अखेर पर्यंत तसेच लेखा परीक्षण कालावधीपर्यंत म्हणजे जुन 2015 पर्यंत पूर्ण झाले नसल्याचे आढळुन आले.त्यामुळे ठेकेदाराकडुन अटी व शर्तीप्रमाणे अट क्र. 5 अन्वये मा.आयुक्त यांचे मान्यतेने दंडांची आकारणी करणे आवश्यक असताना तशी दंडाची आकारणी मार्च 13 अखेर म्हणजे 6 वे धावते देयकापर्यंत केली नसल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.

2) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तक क्र.2 मध्ये नोंदविली आहेत. सन 2012-13 मध्ये दुसरे धावते देयक ते सहावे धावते देयक पर्यंतच्या मोजमाप बिलांच्या नोंदीची तपासणी केली असता मोजमाप नोंदवहीमध्ये क्रमवार दिनांकानुसार नोंदी केल्या नसल्याचे आढळुन आले. (म्हणजे पृष्ठक्रमांक 21 वर ऑगस्ट 2011 मधील नोंदी आहेत तर पष्ठ क्र 22 वर जुलै 2011 मधील नोंदी आहेत. तसेच पृष्ठ क्र.31 वर ऑगस्ट मधील नोंदी आहेत. पृष्ठ क्र.32 वर सप्टेंबर 2011 मधील नोंदी आहेत. तर पृष्ठ क्रमांक 39 व 40 वर ऑगस्ट, जुलै, सप्टेंबर मधील नोंदी असल्याचे आढळुन आले.

3) प्रीबीड मिटींग मध्ये पाईपचा पुरवठा कामाचे ठिकाणी केल्यावर त्यांचे किंमतीच्या 80 % रक्कम अदा करण्यात येईल असे नमुद असताना तिसरे धावते देयक मध्ये पाईप पुरवठा बद्दल चे कामाचे 100 % रक्कम अदा केली आहे. त्यामुळे मक्तेदारास तिसरे धावते देयकात रक्कम रु.7,10,424/- जादा अदा झाली आहे.सदरची जादा अदा रक्कम रु.7,10,424/- पाचवे धावते देयकामध्ये सदर बाबीवर 80% प्रमाणे आकारणी करुन समायोजीत केली असल्याचे आढळुन आले. त्यामुळे मक्तेदारास दि. 22/08/2012 ते 01/01/2013 या कालावधी रक्कम रु.7,10,424/- चे अतिप्रदान झाले होते.

4) वेल्डींग एम.एस.प्लेट अंडर पाईप याचा रु 330/- प्रती चौ.मी. ही बाब एस्टीमेट मध्ये नाही त्यामुळे ते बरोबर असल्याचे रेट ॲनालिसीस लेखापरीक्षणास आढळुन आले नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग कडील दि . 8 मे 1986 नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकातील परिछेद 227 ते 232 मधील तरतुदीनुसार स्विकृत निविदामध्ये अंतर्भूत न केलेली कामाची बाब करवून घेण्याचा प्रसंग आल्यास त्याकरिता अतिरिक्त बाबींची वेगळी दरसूची मंजूर करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता /अधीक्षक अभियंता यांना देण्यात आलेले आहेत त्यासाठी अतिरिक्त बाबींच्याकरीता करावयाच्या प्रक्रियेचे पूर्ण विश्लेषन करून मगच दर निश्चित करावा लागतो. परंतु अशी कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले. या बाबींवर एकूण रु.3,88,311/- खर्च झाला आहे. तरी आवश्यक अभिलेख्यासह सदरची रक्कम योग्य असल्याचे लेखापरिक्षणाची खात्री करता

आली नसल्याने सदरची रक्कम लेखा परीक्षणास अक्षेपाधीन  करण्यात येत आहे.

5) एस.एस.प्लेट (10 mm जाड) या बाबीचे मोजमाप  2 रे धावते देयकापासून 5 वे धावते देयकापर्यंत 18.586 M.T. होते. 6 वे धावते देयक मध्ये सदरची बाब मोजमाप नोंदवली पृष्ठ क्र 43 वर अपडेट मेझरमेंट असे नमुद करुन ते 14.183 असे केले आहे. सदर बाबींचा दर 60,000/- असल्याने याबाबीवर जादा नोंदवले मोजमाप 4.403 MT बाबत 2 रे धावते देयकापासून 5 वे धावते देयकापर्यंत रु.2,64,180/- आदा केले होते ते सहावे धावते देयकामध्ये जादा आदा रक्कम  समायोजीत केले आहेत. त्यामुळे मक्तेदारास दि. 26/04/2012 ते 30/03/2013 या कालावधी रक्कम रु.2,64,180/- चे अतिप्रदान झाले होते.

6) सहावे धावते देयक मध्ये 11 जादा बाबीचे रु.448948.50 रक्कम अदा केली आहे. परंतु सदर जादा बाबीसाठी आकारण्यात आलेले दर बाबतचे रेट ॲनालॅसिस लेखापरीक्षणास आढळुन आले नाही. . तरी आवश्यक अभिलेख्यासह सदरची रक्कम योग्य असल्याचे लेखापरिक्षणाची खात्री पटविणे आवश्यक आहे.

7) सहावे धावते देयकामध्ये 546 मीटर पाईप लाईनचे हायड्रॉलिक टेस्टींग दिल्यामुळे पाईपचे उर्वरीत 20% रक्कम रु.1795794/- आदा केले आहे. परंतु प्रीबीड मिटींग मधील मुद्दा क्रमांक 3 नुसार हायड्रोलिक टेस्टींग नंतर 95% रक्कम देय असताना 100% आदा केली आहे. त्यामुळे मक्तेदारास अंतिम देयाकापर्यंतच्या कालावधीसाठी रक्कम रु.448948/- चे अतिप्रदान झाले आहे.

8) नगर विकास विभाग चे दि.3/11/2003 चे पत्रानुसार व विमा संचालनालय चे दि.12/09/2005 चे पत्रानुसार व शासन निर्णय दि.17/10/2010 चे नुसार कत्रांटी कामाचे ठेकेदारास कामाचे प्रदान करण्यापूर्वी कामगार विमा काढला नसल्यास कामाचे एस्टीमेंट रक्कमचे 1% रक्कम एवढी शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झाल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही.

9) सदर कामाचा मक्ता हा 8.1% कमी असल्याने सुरक्षा ठेव रक्कम 3% ऐवजी 2% प्रमाणे घेतली आहे. तसेच सदर कामासाठी 5% रकमेची बँक गॅरंन्टी घेणे आवश्यक होते परंतु  ती 4% रकमेची घेतली असल्याचे आढळून आले.

10) सदर कामातील 6 वे धावते देयक पर्यंत 8% ETP चे 4764230/- कपात करुन घेण्यात आले होते. सदर 8% ETP कोणत्या प्राधिकाराने शासकीय अनुदानातुन कपात करण्यात आले तो प्राधिकार लेखापरीक्षणास आढळुन आला नाही.

11) सदर कामाची मुदत 6 महिने होती सदर कामासाठी मक्तेदाराने इंडियन ओवरसीज बँकेची रक्कम रु 2104000/- ची बँक गॅरंन्टी सादर केली होती त्यांची वैधता दि.01/10/2013 पर्यंत होती परंतु सदरचे काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत म्हणजे जुलै 2015 पर्यत काम पुर्ण झाले नाही.त्यामुळे   गॅरंन्टीचे पुढील कालावधीकरिता नुतनीकरण करणे आवश्यक आहे परंतु नुतनीकरण केलेली बँक गॅरंन्टी लेखापरीक्षणास नस्तीस आढळून आली नाही.

## *69 ट्रान्समिशन पाईप लाईन टाकणे स्पेशल्स व व्हॉल्व्ह बसविणे कामाचा मजुरीसह मक्ता देणे कामाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 02**

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***कामाचा करारनामा रु.67700/- इतक्या रक्कमेच्या कमी मुद्रांकावर केला आहे. कामाचे मोजमाप पुस्तक उपलब्ध करुन दिले नाही.*** |

ट्रान्समिशन पाईप लाईन टाकणे स्पेशल्स व व्हॉल्व्ह बसविणे कामाचा मजुरीसह मक्ता देणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1)लेखाशिर्ष - UIDSSMT.

2) निविदा किंमत - रु.6,11,42,429/-

3) कार्यारंभ आदेश क्र. 161 दि.15/12/2009 ( 12.95 टक्के जादा दराने)

4) ठेकेदाराचे नांव - मे. असोसिएटेड इंजिनिअर्स, सोलापूर.

5) कामाची मुदत - 20 महिने.

6) कामावरील खर्च - 6162935/- (2012-13 मधील)

सदर कामाच्या नस्तीमधील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमितते बाबत अर्ध समास पत्र क्रमांक 51 दि11/05/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने दि.11/06/15 रोजी सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहे.

1) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-2009/सं.क्र.1794/नवि-20 दि.07/12/2009 अन्वये कामाचा करार करताना हे रु.10.00 लाखापेक्षा अधिक असेल त्याबाबतीत रु.100/- अधिक, रु.10 लाखावरील प्रत्येक रु.1.00 लाखासाठी किंवा त्याच्या भागासाठी रु.100/- मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.690.60 लाख असल्याने कामाचा करारनामा रु.68,200/- चे मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक होते. परंतु खात्याने रु.500/- चे किंमतीच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केल्याने रु.67,700/- कमी रकमेचे मुद्रांक शुल्क भरणा केले आहे. आहे. तरी संबंधीताकडून रु.67,700/- वसुल करुन शासनाकडे जमा करणेत यावे.

2) सदर कामाचे मोजमाप पुस्तक लेखा परिक्षणास सादर केले नसल्याने त्याची तपासणी करता आली नाही.

DATDSAM7301 (Ref No : 143, Hmm No : 51)

## *70 UIDSSMT योजनेअंतर्गत जुळे सोलापूर ते डी.एस.पी. बंगल्यापर्यंत 1016 मी.मी. व्यासाची लोखंडी पाईपलाईन घालणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 4**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2748650.00/-

***कामाचा व कामावरील कामगारांचा विमा नस्तीसोबत आढळून आला नाही.एकाच बाबीसाठी दोन वेळा प्रदान झाले आहे. चुकीच्या दराने प्रदान झाले आहे.***

UIDSSMT योजनेअंतर्गत जुळे सोलापूर ते डी .एस.पी. बंगल्यापर्यंत 1016 मिमी व्यासाची लोखंडी पाईपलाईन घालणे या कामासाठी मे.सेठ अॅन्ड सुरा यांची 4.9% जादा दराची निविदा सर्वात कमी दराची असल्यामुळे स्विकृत करण्यात आली. अकराव्या व अंतिम देयकाअखेर कामावर रु.4,48,00,134 इतका खर्च झाला असून या कामाचे लेखापरीक्षण केले असता अनियमितताबाबत अर्धसमास क्र.25 दि.31.03.2015 चे अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, परिपत्रक क्र. ईएम/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि.3/11/2003 अन्वये कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. तथापि सदर कामाचा विमा नस्ती सोबत आढळून आला नाही. त्यामुळे 1% दराने रु.4,29,613 वसूल करुन शासकीय विमा निधी कडे भरणा होणे आवश्यक आहे.

2) अंदाजपत्रकावरील भाग B) LABOUR मध्ये बाब क्र 6 व 7 हा एकच (पाईपची वाहतूक व पाईप टाकणे) असून त्याचे दुबार प्रदान झाले आहे. त्यामुळे बाब क्र 6 वर झालेला खर्च रु.9,56,124 ची वसुली करणे आवश्यक आहे.

3) जिल्हा दरसूची मधील दरापेक्षा जास्त दराने खालील बाबीसांठी प्रदान झाल्याने रक्कम रु. 1362913 चे अतिप्रदान झाले आहे.त्याची वसूली आवश्यक आहे.

| बाब क्र | बाब | दर सुचितील दर रु./घ.मी. | दिलेला दर प्रती घ.मी | फरक | परिणाम | फरक x परिणाम | 4.97%Above 5 % मनपा क्षेत्र (9.9%) | अतिप्रदान रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B) 2 | मऊ खडकातील खोदाई | 170 | 300 | 130 | 3984.54 | 517990 | 51281 | 5,69,271 |
| B) 3 | कठीण खडकातील खोदाई | 300 | 435 | 135 | 5349.25 | 722149 | 71493 | 7,93,642 |
| | | | | | | **एकूण** | | **1362913** |

4) या कामामधील पाईप लाईनचा काही भाग रेल्वे लाईन खालून टाकावयाचा असल्यारमुळे मनपाने रेल्वे विभागाकडे परवानगीची मागणी केली असता, रेल्वेने त्या कामाचे अंदाजपत्रक करुन दि.24.11.2010 रोजी रु.46,46,898 भरण्यास कळविले. परंतु मनपाने रक्कम दि.26.03.2013 रोजी 2 वर्ष 4 महिने विलंबाने भरली. दरम्यान कामाच्या अंदाजपत्रक रकमेत रु. 19,31,795 ने वाढ होऊन रु.65,78,693 इतकी झाली. त्यामुळे मनपाला 19,31,795 इतकी रक्कम ज्यादा भरावी लागली. तसेच कामाची मुदत डिसेंबर 13 अखेर असूनही काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पूर्ण झालेले नाही.

**<u>एकूण वसूलपात्र रक्कम</u>**

विमा रु. 4,29,613

दुबार प्रदान रु. 9,56,124

ज्यादा दराचे प्रदान रु. 13,62,913

-----------------------------------------

एकूण वसूलपात्र रक्कम रु. 274865

DATDSAM7301 (Ref No : 144, Hmm No : 25)

## *71 केंद्र शासन पुरस्कृत राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपट्ट्यातून सर्वेक्षण करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : राजीव आवास योजना शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 329378.00/-

***झोपडपट्ट्यातून सर्वेक्षण करणे या कामासाठी निविदेतील अटीं व शर्तींची पूर्तता न करणाऱ्या निविदाकाराची कन्सल्टन्ट म्हणून नेमणूक केली आहे. बाजारभाव दराप्रमाणे भाडे निश्चित न करताच नाममात्र भाडे दराने मनपाचे 500 चौ.फुटाचे कार्यालय भाड्याने दिले आहे. आयकराची रक्कम कमी दराने वसूल केली आहे.***

केंद शासनाच्या गृहनिर्माण व शहरी गरिबी निर्मुलन मंत्रालयाने झोपडपट्टी मुक्त शहरे हि संकल्पना साकारण्यासाठी राजीव आवास योजना घोषित केली. केंद्र शासन पुरस्कृत राजीव आवास योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथमत झोपडपट्ट्यातून प्राथमिक सर्वेक्षण करण्यासाठी सोलापूर शहरातील एकूण 220 झोपडपट्ट्याचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करणे, झोपडपट्ट्या मध्ये राहणाऱ्या नागरिकांची माहिती गोळा करणे, कार्यशाळा घेणे, शहराचा व झोपडपट्टी दर्शविणारा नकाशा तयार करणे, झोपडपट्टी मुक्त शहराचे नियोजन करणे, शहर तांत्रिक कक्षाची निर्मिती करणे, संगणक प्रणाली हार्डवेअर, जीआयएस मॅपिंग करणे, जीआयएस एमआयएस यांचे एकत्रीकरण करणे प्रकल्प अहवाल तयार करणे इत्यादी कामाकरिता रु.176.26 लाख खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, यांची मंजुरी घेण्यात आली. सदर कामासाठी सल्लागार एजन्सी नियुक्त करण्यासाठी रु.162.15 लाख एवढया रक्कमेची निविदा दिनांक 16/03/11 रोजी प्रसिद्ध केली परंतु सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा दि.12/05/11 रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार प्राप्त झालेल्या तीन निविदांपैकी न्यूनतम दर दिलेले कन्सल्टन्ट मे.स्टक्टॉन  यांची प्रती कुटुंब रु.207 प्रमाणे सर्वेक्षण करण्यासाठी निवड करण्यात येवून त्यास स्थायी समिती ठराव क्रमांक  853 दिनांक 19/11/2011 अन्वये मंजुरी घेण्यात आली. सदर ठेकेदारास दिनांक 02/01/2012 रोजी कार्यादेश देण्यात आले.  सदर योजना लागू करण्यासाठी गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्रमांक राआयो-2010/प्र.क्र.240/गृनिधो-2 सेल, दिनांक 15/02/2011 नुसार सोलापूर महानगरपालिकेस प्रथम टप्प्यात रु.65.00 लाख निधी प्राप्त झाला. त्यापैकी  2012-13 मध्ये 41,17,230 इतका खर्च झाला आहे. सदर कामाचे निविदा नस्ती व इतर अनुषंगिक अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

1. निविदेतील अटी व शर्ती नुसार निविदाकाराने महानगरपालिकेच्या हद्दी मध्ये 500 चौ.फुटाचे कार्यालय स्वखर्चाने स्थापित करणे आवश्यक आहे. स्ट्रक्टॉन  प्रोजेक्ट  कन्स्लटन्ट  प्रा.ली. यांनी महापालिकेच्या मालकीच्या इमारतीमध्ये सदर कामासाठी 500 चौ. फुटाचे कार्यालय 2012 पासून स्थापित करण्यात आले आहे. ठेकेदाराने त्यांच्या स्वखर्चाने महापालिकेच्या हद्दीत कार्यालय स्थापन करणे बाबत अट असतांना महापालिकेच्या इमारती मध्ये कार्यालय सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे जागेच्या क्षेत्रफळा नुसार नगररचना विभागाकडून भाडे निश्चित करून सदरची भाडे रक्कम संबंधित ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक होते. परंतु भाडे रक्कम व विजबिलाची रक्कम वसूल केली नाही. तरी नगर रचना विभागाकडून भाडे रक्कम निश्चित करून जानेवारी 2012 पासून भाडे रक्कम व वीज बिलाची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करावी. याबाबत विभागाने 11 महिन्याचे एकत्रित भाड्याची रक्कम रु 1100 व त्यावरील सेवाकर रु 136 वसूल केल्याची पावती क्रमांक 147399 अनुपालना सोबत सादर केली आहे. परंतु 500 चौ.मी.क्षेत्रफळ असलेल्या जागेचे भाडे निश्चिती

बाबत नगर रचना विभागाकडील आदेश प्राप्त करून न घेताच नाममात्र भाडे वसूल केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 79 (ड) नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही मालमतेचे भाडे चालू बाजारभाव किमतीपेक्षा कमी असता कामा नये असे असतांना बाजारभावाशी तुलना न करता रु.100 प्रती महिना प्रमाणे भाडे वसूल केले आहे. मक्तेदारासोबत केलेल्या भाडेकराराची प्रत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे विभागाचे उत्तर मान्य करता येत नाही. तसेच संबंधित मक्तेदाराकडून वापर केलेल्या विद्युत बिलाची रक्कम वसूल केली नाही. तत्कालीन  बाजारमूल्य दराने भाडे व विज वापरापोटी विद्युत बिलाची आकारणी करून 20/12/11 पासून रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

2. प्रोजेक्ट  कन्सलटन्ट सोबत दिनांक 20/12/11 रोजी केलेल्या करारनाम्या मधील अट क्रमांक 7 नुसार मनपा कडून कार्यादेश मिळाल्या पासून ठेकेदाराने सदर कामा अंतर्गत प्रतीमहा शहरातील किमान 8000 झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करणे बंधनकारक राहील. परंतु दरमहा 8000 झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण पूर्ण केल्याचे अभिलेखे नस्ती सोबत उपलब्ध झाले नाही. याबाबत विभागाने सदर अहवाल मूळ नस्तीत उपलब्ध असल्याचे कळविले आहे. परंतु लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेल्या नस्तीमध्ये सदरचा अहवाल दिसून आला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

3. 2012-13 या आर्थिक वर्षात सदर कामापोटी स्ट्रक्टॉन  प्रोजेक्ट  कन्स्लटन्ट  प्रा.ली. यांना रक्कम रु.4117230 अदा करण्यात आले असून देयकातून 2% आयकर वसूल केला आहे. आयकर अधिनियम 1961 कलम 194 (जे) नुसार कन्स्लटन्ट एजन्सी कडून 10% आयकर वसूल करणे आवश्यक आहे.वसूल केलेला आयकर रक्कम रु.82345 वजा जाता उर्वरित आयकराची रक्कम रु.329378 व त्यावरील दरमहा दीड टक्का प्रमाणे होणारी दंडाची रक्कम वसूल करून आयकर विभागाकडे भरणा करावी. या बाबत कमी वसूल केलेली आयकराची रक्कम कन्स्लटन्ट एजन्सी च्या देयकातून वसूल करण्यात येईल असे अर्धसमास क्र.22 दि.31/03/15 च्या उत्तरात कळविले आहे. आक्षेप कायम करण्यात येत असून कमी वसूल केलेली रक्कम रु. 329378 व त्यावरील दंडात्मक व्याजाची रक्कम परीगणित करून वसूल होणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रु.329378

DATVCSM6501 (Ref No : 32, Hmm No : 22)

## *72 एकात्मिक झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत भगवाननगर येथे घरकुल बांधणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : एकात्मिक झोपडपट्टी व केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 31851744.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 23251579.00/-

***शासनाने मान्यता दिलेल्या पूर्व अर्हता प्राप्त मक्तेदाराना शासनाने निश्चित केलेल्या दराने कार्यादेश न देता निविदा प्रसिद्ध करून कार्यादेश दिल्यामुळे प्रती घरकुले रु.68646 प्रमाणे 464 घरकुलांची रक्कम रु. 31851744 अतिरिक्त प्रदान करावे लागले. शासनाकडून मनपाकडे हस्तांतरित न केलेली जागा घरकुलासाठी निवडण्यात आली. लाभार्थी हिस्स्याची रक्कम लाभार्थ्यांकडून वसूल न करता महानगरपालिकेने भरणा केली. अर्धवट सोडलेल्या कामाची रक्कम मक्तेदाराकडून वसूल केली नाही.***

केंद्रशासन व राज्यशासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुले बांधणे व परिसर सुधारणा करणे या योजने अंतर्गत सोलापूर शहरातील 04 झोपडपट्ट्यामधून 1289 घरकुले बांधणे व परिसर सुधारणा करणे या कामास केंद्र शासनाने 1163.04 लक्ष खर्चाच्या प्रस्तावास दिनांक 22/12/2006 च्या पत्रान्वये मंजुरी दिली. या योजने अंतर्गत वित्तीय आकृतीबंध केंद्र शासन, राज्य शासन व लाभार्थी हिस्सा 80:10:10 असा निश्चित करण्यात आला.

सदर योजने अंतर्गत भगवान नगर झोपडपट्टी मधील 371 घरकुलांचे बांधकामाची निविदा नस्ती व इतर अनुषंगिक अभिलेख्यांचे लेखा परीक्षण केले असता, खालील अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

1.महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण मुंबई यांचे सोलापूर महानगरपालिकेस उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक उमअ/जेएनएनयुआरएम/37/09, दिनांक 6/09/2009 नुसार दिनांक 31/12/2008 रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीचा संदर्भ देवून मंजूर योजनांची कामे त्वरित सुरु करून भौतिक व आर्थिक उद्दिष्ट साध्य करणे शक्य व्हावे म्हणून वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अतर्गत प्रस्तावित असलेल्या घरकुलाच्या बांधकामासाठी शासनाने मान्यता दिलेल्या कंत्राटदारांची पूर्व अर्हता यादी दिली आहे. यादीतील कंत्राटदार अशासकीय सेवाभावी संस्था यांना IHSDP योजनेतील कामाचे वाटप केंद्र शासनाने अनुदानाकरिता निश्चित केलेल्या किमतीत थेट पद्धतीने देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. पत्रासोबत जोडलेल्या यादीतील अनुक्रमांक 12 वर स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई या संस्थेचा समावेश होता. महाराष्ट्र शासन गृह निर्माण विभाग शासन निर्णय क्रमांक जनेयो-2008/प्र.क्र.188/गृहनियो-2, दिनांक 03/02/2009 नुसार घरकुलांची कमाल मर्यादा रु.80000 वरून 135000 करण्यात आली आहे. शासनाने घरांची कमाल मर्यादा निश्चित करून दिली असतांना सोलापूर महानगरपालिकेने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण मुंबई यांचे दि. 6/09/2009 चे पत्रानुसार घरकुलाच्या बांधकामासाठी शासनाने मान्यता दिलेल्या पूर्व अर्हता यादीतील कंत्राटदारास थेट पद्धतीने काम न देता, निविदा मागवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराच्या 7.74% जादा दराने स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई यांना दिले आले. त्यामुळे प्रती युनिट घरकुलाच्या किमतीपोटी रु 68646 जास्त रक्कम अदा करावी लागली. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.35 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.82, दि.7/05/15 अन्वये, शासनाने मान्यता दिलेल्या पूर्व अर्हता प्राप्त मक्तेदार निविदेमध्ये सहभाग घेण्यास पात्र राहतील अशी अट घालून

निविदा दर मागविण्यात आले आहेत. परंतु शासनाने घरकुलाची किमत व मक्तेदार निश्चित करून दिले असतांना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमतीत थेट पद्धतीने घरकुलाचे काम यादीतील मक्तेदाराना देणे आवश्यक होते. परंतु महानगरपालिकेने निविदा प्रसिद्ध करून दर मागविले. त्यामुळे मनपास प्रती घरकुल रु 68646 प्रमाणे न्यू जगजीवनराम झोपडपट्टी मधील एकूण 93 व भगवाननगर झोपडपट्टीमधील एकूण 371 घरकुले अशी एकूण 464 घरकुलांचे बांधकामापोटी रु 31851744 इतक्या रक्कमेचा जादा खर्चाचा भार सोसावा लागला. त्यामुळे सदरची रक्कम रु.31851744 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2.भगवान नगर झोपडपट्टीची जागा शासकीय मालकीची असून, अद्याप पर्यंत सदर जागेचे हस्तांतरण मनपाकडे झालेले नसताना सदर जागेवर गृह प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आलेले आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.35 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.82, दि.7/05/15 अन्वये, जिल्हाधिकारी यांचे दि.6/08/2010 चे पत्रान्वये नाहरकत पत्र प्राप्त करून घेण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. तथापि, जिल्हाधिकारी यांनी शासनाचे मंजुरीचे आदेशास अधीन राहून तसेच शासनाने मंजुरी फेटाळल्यास आहे त्या स्थितीत जागा परत करण्याचे अटीवर नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. शासनाची मंजुरी नसतांना जागेची निवड केल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

3.केंद्रशासन व राज्य शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुले बांधणे व परिसर सुधारणा करणे या योजने अंतर्गत सोलापूर शहरातील 04 झोपडपट्ट्या मधून 1289 घरकुले बांधणे व परिसर सुधारणा करणे या कामास केंद्र शासनाने रु.1163.04 लाख खर्चाच्या प्रकल्प अहवालास दिनांक 22/12/2006 अन्वये मंजुरी दिली आहे.या योजने अंतर्गत वित्तीय आकृतिबंध निश्चित करून दिलेला असून केंद्र शासन हिस्सा रु. 930.432 लाख, राज्य शासन 129.488 लाख व लाभार्थी हिस्सा 103.12 असा निश्चित करून दिलेला असतांना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक 283 दिनांक 20.03.2007 नुसार लाभार्थी हिस्स्याची 10% रक्कम तूर्तास वसूल न करता मनपाने भरावी व घराचा ताबा देण्यापूर्वी लाभार्थ्याकडून वसूल करावी. असे ठरविण्यात आले. त्यामुळे हिस्स्यापोटी मनपावर अतिरिक्त दायित्व निर्माण झाले. शासन निर्णय क्रमांक जनेयो-2006/प्र.क्र.46, दिनांक 25/06/07 मधील अट क्र.12(2) नुसार लाभार्थी अंशदान घेणे बंधनकारक असतांना 371 घरकुलाचे कामापोटी लाभार्थ्याकडून रु.8000 प्रमाणे रु.296000 हिस्सा महानगरपालिकेने भरणा केला आहे. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.35 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.82 , दि.7/05/15 अन्वये प्रत्यक्षात घरकुलाचा ताबा देतेवेळी त्यांचेकडून अंशदान वसूल करण्यात येईल असे नमूद केले आहे. परंतु शासन निर्णयातील तरतुदीनुसार लाभार्थ्यांकडून 10 टक्के रक्कम वसूल करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे मनपावर आर्थिक भार पडला.

4.भगवान नगर झोपडपट्टी मधील घरकुलाचे कामासाठी दिनांक 7/08/2010 रोजी निविदा मागवून सदरचे काम मे. स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई या संस्थेस अंदाजपत्रकीय दराच्या 7.74% जास्त दराने देण्यात आले होते. त्यास स्थायी समितीने ठराव क्रमांक 1035 दिनांक 4.12.2010 नुसार मान्यता दिली होती. परंतु मंजूर ठेकेदार स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई यांनी काम अर्धवट सोडल्याने त्यांचेकडील मक्ता स्थायी समिती ठराव क्रमांक 25 दिनांक 19.05.2012 अन्वये रद्द करण्यात आला. स्थायी समिती ठराव दिनांक 1905/2012 अन्वये सदर

कामासाठी फेर निविदा काढणेस व फेर निविदेमधील दर पूर्वीच्या दरापेक्षा जास्त असल्यास सदरचे दर स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई यांचेकडून वसूल करण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दिनांक 10/07/2012 रोजी वर्तमानपत्रात फेर निविदा प्रसिद्ध करून न्यूनतम दर असलेले ठेकेदार मे.एसं.बी.खाकाळ यांचे सोबत वाटाघाटी करून 2011-12 चे दर सूचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय दराच्या 19.75% जास्त दराने निविदा मंजूर करण्यात आली. त्यास स्थायी समिती ठराव क्रमाक 274 दिनांक 12/11/2012 नुसार मान्यता दिली आहे. स्थायी समिती ठराव क्रमांक 25 दिनांक 19.05.12 ने पारित केल्यानुसार या कामाकरिता या पूर्वीचे रद्द करण्यात आलेले मंजूर मक्तेदार  स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई यांचे मंजूर दर 2008-09 चे दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाज पत्रकाच्या 7.74% जास्त होते. परंतु नवीन प्राप्त झालेले दर हे 2011-12 चे दरसूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 19.75% जास्त असल्याने स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई यांची जप्त केलेली बयाना रक्कम, सुरक्षा ठेव व दुसऱ्या धावत्या बिलाची रक्कम, बँक गॅरनटी अशी एकून रक्कम रु 73.74 लाख जप्त करण्यात आली परंतु खालील प्रमाणे अद्यापही रक्कम वसूल करणे बाकी आहे.

| घरकुल संख्या | मक्तेदाराचे नांव | निविदा रक्कम (रु.) | मंजूर दर (रु.) | एकूण रक्कम (रु.) | प्रती घरकुल येणारी किमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1190 | स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई | 168722358 | 4.84% जास्त | 176888520 | 148646 |
| 371 | एसं.बी.खाकाळ | 72309387 | 19.75% | 86590491 | 233398 |
| | | | प्रती घरकुल फरकाची रक्कम | | 84752 |
| रु.84752 X 371 घरकुलाची अतिरिक्त द्यावी लागणारी रक्कम | | | | | 31442992 |

उपरोक्त तक्त्यानुसार भगवान नगर येथील घरकुलाचे कामाकरिता जास्त होणारी रक्कम रु.31442992 इतकी होत असून सदरची रक्कम निविदा शर्ती व अटीनुसार, करारपत्रातील अट क्रमांक 23 नुसार व स्थायी समिती ठरावानुसार स्ट्रेसकिट इंडिया लिमिटेड मुंबई यांचेकडून वसूल करणे आवश्यक आहे. त्यापैकी मनपाने रु.8191413 वसूल केलेले असून उर्वरित रु 23251579 अद्यापही वसूल केलेले नाही. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.35 दि.15/04/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.96, दि.7/05/15 अन्वये मक्तेदाराकडून वसुलीची कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत असून संबंधित मक्तेदाराकडून रु. 23251579 वसूल करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु. 23251579

आक्षेपाधीन रक्कम रु. 31851744

DATVCSM6501 (Ref No : 36, Hmm No : 35)

## *73 अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा पुरविणे या कार्यक्रमांतर्गत वार्ड क्रमांक 63 मधील जन्नत ए फिरदोस मुस्लीम कब्रस्ताण येथे रस्ता तयार करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : नागरी सुविधा शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 17913.00/-

***कामाचे बाब निहाय अंदाजपत्रक तयार करताना कामगार कल्याण उपकर व विमा रक्कम समाविष्ट करून तयार केले आहे. मात्र कामाचे देयक अदा करताना पुनश्चः कामगार कल्याण उपकर व विमा रक्कमेचा समावेश करून अदा केले आहे. त्यामुळे मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. गौण खनिज रक्कम शासन जमा केल्याचे चलन उपलब्ध झाले नाही.***

अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या अनुदानातून सोलापूर महानगरपालिकेतील वार्ड क्रमांक 63 मधील जन्नत ए फिरदोस मुस्लीम कब्रस्ताण येथे रस्ता तयार करणे या कामावरील रु.9.98 लाख खर्चास जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे पत्र क्र.सावि/1/नपा/3442/11 दिनांक 25/10/2011 अन्वये प्रशासकीय मंजुरी दिली आहे. सदर कामासाठी नगर अभियंता (बांधकाम ) विभागाकडून दिनांक 04/04/2012 ते 12/04/2012 या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या. स्वीकृत निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | रु. 997621 |
| ठेकेदाराचे नांव | मे.सेमी कन्स्ट्रक्शन |
| कार्यादेश क्रमांक | नअ/गवसु/ता/413 दिनांक 28/06/2012 |
| दर | अंदाजपत्रकीय दराच्या 10% जास्त दराने |
| कालावधी | 04 महिने |

वरील कामाच्या निविदा नस्ती व देयकाचे लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत वि अर्धसंमास पत्र क्र.23 दि.31/03/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.23 दिनांक 7.4.15 अन्वये सादर केलेल्या उत्तराचा विचार करून लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

1. अंदाजपत्रक करतांना कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या दराचे पृथ:करणामध्ये साहित्याच्या मूळ

दरावर 1% कामगार कल्याण उपकराची आकारणी करून साहित्याचा दर निश्चित केला आहे. तसेच ठेकेदाराने निविदेमध्ये दिलेले दर निश्चित केलेल्या दरापेक्षा 10% जास्त असुन सदरचे दर सर्व करासहित आहेत. असे असतांना ठेकेदारास कामाचे देयक प्रदान करतेवेळी 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.8870 अदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास रु.8870 चे अतिप्रदान झाले आहे. याबाबत विभागास अर्धसंमास पत्र क्र.23 दि.31/03/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.23 दिनांक 7.4.15 अन्वये सादर केलेल्या अनुपालनामध्ये नमूद केले आहे कि, अंदाजपत्रक तयार करतांना सदर कामावर 1 टक्का कामगार कल्याण उपकर गृहीत धरून पूर्वगणनपत्रक तयार केले आहे. परंतु निविदा 1 टक्का कामगार कल्याण उपकर वगळून मागविण्यात आल्या आहे, विभागाचे उत्तर संयुक्तिक नसून सदर कामासाठी वापरलेल्या साहित्याचे दर पृथ:करण करतेवेळी 1 टक्का उपकर, विमा इ.ची आकारणी करूनच साहित्याची किमत ठरविण्यात आली आहे. व सदर दराने निविदा मागविण्यात आल्या आहेत. विभागाने पूर्वगणनपत्रकामध्ये नमूद केलेल्या दरापेक्षा 10 टक्के जास्त दराने निविदा मंजूर केली आहे. साहित्याचे दरामध्ये उपकर समाविष्ट असतांना कामाचे देयक प्रदान करतेवेळी पुनश्चः एकत्रित बिलाचे रक्कमेमध्ये 1 टक्का रक्कम समाविष्ट केली आहे. त्यामुळे 1 टक्का अतिप्रदानाची रक्कम रु.8870 संबंधित ठेकेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

2. मक्तेदाराने सदर कामाचा विमा काढलेला नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरसूची 2010-11 मधील मुद्दा क्र.0.12 नुसार मक्तेदाराने काढलेल्या विम्याची कागदपत्रे सादर केल्यानंतर विमा रक्कम मक्तेदारास देय आहे. सदर कामामध्ये कामाचा व कामावरील कामगारांचा विमा उतरविलेला नसतांना मक्तेदारास विमा रक्कम रु.9043 अदा केली आहे. याबाबत विभागास अर्धसंमास पत्र क्र.23 दि.31/03/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. 23, दिनांक 7.4.15 अन्वये सादर केलेल्या अनुपालनामध्ये नमूद केले आहे कि, अंदाजपत्रक तयार करतांना सदर कामावर 1 टक्का विमा रक्कम गृहीत धरून पूर्वगणनपत्रक तयार केले आहे परंतु निविदा 1 टक्का विमा रक्कम वगळून मागविण्यात आल्या आहेत. दरसूचीतील वरील मुद्द्यानुसार मक्तेदाराने विम्याची कागदपत्रे सादर केल्यानंतर 1 टक्का रक्कम अदा करावी असे असतांना मक्तेदराने सदर कामाचा व कामगारांचा विमा उतरविल्याबाबत ची कोणतेही कागदपत्रे सादर न करताच देयकाचे प्रदान करतांना एकत्रीत बिलामध्ये 1 टक्का विमा रक्कम समाविष्ट करून अदायगी केली आहे. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत विम्यापोटी ठेकेदारास झालेल्या अतिप्रदानाची रक्कम रु.9043 वसूल होणे आवश्यक आहे.

3.मक्तेदाराचे देयकातून गौण खानिजापोटी रु.107739 वसूल करण्यात आले आहेत, परंतु सदरची रक्कम शासन जमा केल्याचे चलन लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. गौण खनिजापोटी वसूल केलेली रक्कम शासन जमा केल्याचे चलन मुख्यलेखापालाकडून उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागाने त्यांचेकडील उत्तरामध्ये नमूद केले आहे. परंतु लेखापरीक्षणाचे अंतिम दिनांका पर्यंत रक्कम शासन जमा केल्याची पावती उपलब्ध झाली नाही.

वसूलपात्र रक्कम रु. 8870+9043 =17913

DATVCSM6501 (Ref No : 33, Hmm No : 23)

## *74 13 व्या वित्त आयोगा अंतर्गत एम्पलॉयमेंट चौक ते कुमार चौक व रामलाल चौक,महापौर बंगला ते राष्ट्रीय महामार्ग पर्यंत रस्ता विकसित करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :13 वा वित्त आयोग शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 317558.00/-

***कामाच्या संपूर्ण कालावधीचा विमा उतरविला नाही. कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल केली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेस 13 व्या वित्त आयोगा अंतर्गत 2011-12 मध्ये प्राप्त झालेल्या अनुदानातून एम्पलॉयमेंट चौक ते कुमार चौक व रामलाल चौक,महापौर बंगला ते राष्ट्रीय महामार्ग पर्यंत रस्ता विकसित करण्यासाठी दिनांक 18/05/2011 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. प्राप्त निविदेतून न्यूनतम दर नमूद केलेल्या ठेकेदारास सदरचे काम देण्यात आले. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| मक्तेदाराचे नाव | मे.पाटील अॅन्ड कंपनी, सोलापूर |
| निविदा दर | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 7.25% कमी दराने |
| निविदा मान्यता | स्थायी समिती ठराव क्र.891, दि.29/11/2011 |
| कार्यादेश दिनांक | 31/12/2011 |
| लेखाशीर्ष | 13 व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त अनुदान |
| कामाची मुदत | 120 दिवस |

वरील नमूद कामाची निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका व इतर अनुषंगिक अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करून आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 42, दि.27/04/15 अन्वये खुलासा मागितला असता, नगर अभियंता (बांधकाम) विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.626, दि.15/06/15 अन्वये केला आहे. सदर खुलासा विचारात घेऊन लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

1.सदर कामाचा विमा दि न्यू इंडिया इन्शुरन्स यांचेकडील विमा पॉलिसी दिनांक 9/07/2012 ते 08/01/2013 या कालावधीची आहे. कामाचा कालावधी दिनांक 31/12/2011 ते 31/03/2013 पर्यंत आहे. नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 दिनांक 3/11/2003 व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक प्रीविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार कंत्राटी कामाचा विमा कामाच्या संपूर्ण कालावधीचा असणे आवश्यक आहे. ठेकेदारास कंत्राटी कामाचे प्रदान

करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमानिधीकडे उतरवून त्या संबंधीचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.वरील कामाचा विमा कामाच्या संपूर्ण कालावधीचा नसल्याने ठेकेदाराकडून कामावरील खर्चाच्या 1 टक्का रक्कम रु.2,12,963 वसूल करून शासकिय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. या संदर्भात अर्धसमास क्रमांक 42, दि.27/04/15 अन्वये खुलासा मागितला असता, नगर अभियंता (बांधकाम) विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.626, दि.15/06/15 अन्वये विम्याची रक्कम रु.212963 मक्तेदाराचे सुरक्षा ठेव रक्कमेमधून कपात करणेत येईल असे कळविले आहे. परंतु रक्कम वसूल न झाल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2.उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7-अ, दिनांक 17 जून, 2010 नुसार मक्तेदाराचे देयकातून कामगार कल्याण उपकरापोटी 1 टक्का रक्कम वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे, परंतु जुना एम्पलॉयमेंट चौक ते कुमार चौक रस्ता चौपदरीकरण करणे या कामाचे प्रथम धावते बिल रक्कम रु.5752855 अदा करण्यापूर्वी कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.57529 वसूल न करताच बिलाची अदायगी केली आहे. त्यामुळे सदर रक्कम रु.57529 वसूल होणे आवश्यक आहे. या बाबत विभागाने त्याचेकडील अनुपालनामध्ये मक्तेदाराचे सुरक्षा ठेव रक्कमेमधून 1% उपकराची रक्कम वसूल करणेत येईल असे कळविले आहे.

3.महाराष्ट्र शासन, महसूल आणि वन विभाग शासन क्रमांक गौणखनिज-10/2006/पी.के-57/के.एच(1) दिनांक 15/06/2006 व शासन निर्णय क्रमांक .गौण खनिज-10/1009/पी.के.309/ख (3) दिनांक 11/02/2010 अन्वये ठेकेदाराने कामावर वापरलेल्या गौण खनिजापोटी 70.67 प्रती घनमीटर प्रमाणे गौण खनिजावरील स्वामित्वधनाची रक्कम शासन सदरी भरणा केल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जुना एम्पलॉयमेंट चौक ते कुमार चौक रस्ता चौपदरीकरण करणे या कामातील खालील बाबींची स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा केल्याची खात्री न करताच ठेकेदारास प्रदान केले आहे. त्यामुळे ठेकेदाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे रक्कम वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्र | गौणखनिजाचा तपशील | एकूण परिमाण (घ.मी.) | स्वामित्वधन वसुली दर प्रती घ .मी. (रु ) | रक्कम ((रु. ) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 134/163 | कठीण मुरूम | 210 | 70.67 | 14840 |
| 2. | 34/42 | कठीण मुरूम | 276 | 70.67 | 19505 |
| 3. | 34/46 | कठीण मुरूम | 180 | 70.67 | 12721 |
| एकूण रक्कम | | | | | 47066 |

या बाबत विभागाने त्याचेकडील अनुपालनामध्ये मक्तेदाराचे सुरक्षा ठेव रक्कमेमधून 1% उपकराची रक्कम रु.47066 वसूल करणेत येईल असे कळविले आहे. परंतु प्रत्यक्षात रक्कम वसूल न झाल्याने सदरचा आक्षेप कायम करण्यात येत आहे.

4. शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार बांधकाम साहित्य वापरण्यापूर्वी सदर साहित्याबाबत प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

तथापि,कामावर वापरलेल्या साहित्याच्या तपासणी अहवालाची प्रत मूळ नस्ती सोबत आढळून आली नाही. त्यामुळे वापरलेल्या साहित्याच्या दर्जाबाबत खात्री करता आली नाही.

वसूलपात्र –रु. 212963+57529+47066 =317558

DATVCSM6501 (Ref No : 37, Hmm No : 42)

## *75 सर्व साधारण रस्ते अनुदानातून केलेल्या रस्त्याच्या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : रस्ते अनुदान शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 25329.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 289517.00/-

***स्थानिक संस्थाकराची रक्कम 0.25% प्रमाणे अनुज्ञेय असताना कामाचे पूर्वगणनपत्रक तयार करताना साहित्याच्या मूळ दरामध्ये 4% जकात कराची रक्कम समाविष्ट करून मक्तेदारास प्रदान केले आहे. मोजमापपुस्तिकेमध्ये मोजमापाची लांबी, रुंदी, उंची इ.तपशीलवार मोजमापे नोंदविली नाहीत.***

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक जीईएन-2011 / प्र. क्र. 147 /नवी-16, दिनांक 15/09/2011 नुसार सोलापूर महानगरपालिकेस 2011-12 करिता प्राप्त झालेल्या रु.2.00 कोटी इतक्या सर्वसाधारण रस्ते अनुदानातून 2012-13 मध्ये खालील कामे करण्यात आली. सदर कामासाठी दिलेल्या मक्त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| मक्तेदाराचे नाव | मे.संजय बिल्डर्स, सोलापूर |
| मक्त्याचा दर | अ.प.दराच्या 10% कमी दराने |
| निविदा मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.144 / 29.8.12 |
| कार्यादेश दिनांक | 25/09/2012 |
| कामाची मुदत | 04 महिने मुदतवाढ 31.12.13 पर्यंत |

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीचे लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या उणीवा बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 43, दि.27/04/15 अन्वये नगर अभियंता (बांधकाम) विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.626, दि.15/06/15 अन्वये सादर केलेले अनुपालन

विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. सदर निविदेव्दारे 2012-13 मध्ये पूर्ण केलेल्या कामाचे अंदाजपत्रक करतांना अनुसूची -बी मधील बाबीच्या मूळ किमतीमध्ये 4% जकातीचा समावेश करून पृथ:करण करण्यात आले आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना दिनांक 6/08/2012 मधील नियम 5 नुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा व्यक्तिला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर त्याच्या कंत्राटी मूल्याच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर वसूल करावा.असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार कंत्राटदाराच्या देयकातून स्थानिक संस्थाकरापोटी 0.25% दराप्रमाणे वसुली केली आहे. परंतु दर पृथ:करण करतेवेळी 4% जकात कर वाढवून दर मंजूर केल्यामुळे खालील प्रमाणे अति प्रदान झाले आहे.

| मोजमाप पुस्तक क्र.व पृष्ठ क्रमांक | अंदाजपत्रकीय रक्कम रू. | दर पृथ:करणामध्ये 4% जकातकर समाविष्ट केलेल्या बाबींची एकूण रक्कम रू. | कंत्राटदारास अदा केलेली 4% रक्कम रु. | कंत्राटदाराकडून वसूल केल्या स्थानिक संस्था कराची रक्कम रु. | अतिरिक्त प्रदानाची रक्कम रु |
|---|---|---|---|---|---|
| कामाचे नाव -चांदतारा मस्जिद ते जयभवानी मंडळ ते गायकवाड दवाखाना रस्ता डांबरीकरण करणे | | | | | |
| 33/12 | 1600000 | 1297300 | 51892 | 4000 | 47892 |
| कामाचे नांव -786 पिठाची गिरणी, माधवनगर-कुन्दरामनगर रस्ता डांबरीकरण करणे | | | | | |
| 33/20 | 1344820 | 1114840 | 44594 | 3362 | 41232 |
| कामाचे नांव-मुंताजनगर ते नागनाथमंदिर रस्ता डांबरी करण करणे | | | | | |
| 33/40 | 2812345 | 2278214 | 91129 | 7030 | 84098 |
| कामाचे नाव -भीमराव जाधव प्रशाला ते निर्मिती विहार रस्ता डांबरी करण करणे | | | | | |
| 33/52 | 4209050 | 3170456 | 126818 | 10520 | 116295 |
| | | एकूण रक्कम | | | 289517 |

मक्तेदारास अतिरिक्त प्रदान रु.289517 बाबत अर्धसमास पत्र क्र.43, दि.27/04/15 अन्वये नगर अभियंता (बांधकाम) विभागास कळविले असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.626, दि.15/06/15 अन्वये मक्तेदारास अतिरिक्त प्रदान केलेली एल.बी.टी (स्थानिक संस्था कर) रक्कम मक्तेदाराचे सुरक्षा अनामत रक्कमेमधून वसूल करण्यात येईल असे अनुपालन सादर केले आहे.तरी अतिरिक्त प्रदान रक्कम रु.289517 वसूलपात्र आहे.

2.चांदतारा मस्जिद ते जय भवानी नगर या कामाच्या डांबरीकरणाच्या कामाचे मोजमाप पुस्तक क्रमांक 33 मधील पृष्ठ क्रमांक 8 वर बाब क्रमांक 1- खोदकाम करणे 36 घ.मी व बाब क्र. 2- वाहतूक करणे 36 घ.मी.करिता ठेकेदारास रु.6332 अदा केले आहेत. परंतु मोजमाप पुस्तिकेमध्ये खोदकामाची लांबी, रुंदी, उंची इत्यादीची सविस्तर मोजमापे नोंदविलेली नाहीत. त्यामुळे खोदकाम कोठून- कोठपर्यंत झाले एकूण किती खोदकाम झाले हि बाब स्पष्ट होत नसल्याने सदरील बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम रु.6332 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबत नगर अभियंता (बांधकाम) विभागाने त्यांचेकडील अनुपालनात, जमिनीचा पृष्ठभाग चढ-उताराचा असलेने त्याची मोजमापे लांबी, रुंदी व उंची घेता येत नसलेने खोदकामा नंतर निघालेली 36 घ.मी. माती खोदाई कामाचे बिल ठेकेदारास दिले असल्याचे कळविले आहे. विभागाचे उत्तर संयुक्तिक नसून, सदरचा

आक्षेप कायम करण्यात येत आहे.

3. 786 पिठाची गिरणी, माधवनगर-कुन्दरामनगर रस्ता डांबरीकरण करणे - कामाचे मोजमाप पुस्तक क्रमांक 33 मधील पृष्ठ क्रमांक 22 वर बाब क्रमांक 1- खोदकाम करणे 108 घ.मी व बाब क्र. 2- वाहतूक करणे 108 घ.मी.करिता ठेकेदारास 18997 अदा केले आहेत. परंतु मोजमाप पुस्तिकेमध्ये खोदकामाची लांबी, रुंदी, उंची इत्यादीची सविस्तर मोजमापे नोंदविलेली नाहीत. त्यामुळे खोदकाम कोठून- कोठपर्यंत झाले एकूण किती खोदकाम झाले हि बाब स्पष्ट होत नसल्याने सदरील बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. याबाबत नगर अभियंता (बांधकाम) विभागाने त्यांचेकडील अनुपालनात, जमिनीचा पृष्ठभाग चढ-उतारचा असलेने त्याची मोजमापे लांबी, रुंदी व उंची घेता येत नसलेने खोदकामा नंतर निघालेली 108 घ.मी. माती खोदाई कामाचे बिल ठेकेदारास दिले असल्याचे कळविले आहे. विभागाचे उत्तर संयुक्तिक नसून, सदरचा आक्षेप कायम करण्यात येत आहे.

वसूलपात्र – जकातकरासाठी अदा केलेली रक्कम रु.289517

आक्षेपाधीन- वाहतुकी पोटी केलेले प्रदान रु. 6332+ खोदकामासाठी केलेले प्रदान रु.18997=25329

DATVCSM6501 (Ref No : 38, Hmm No : 43)

## *76 नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत कामाच्या देयकातून मूल्यवर्धित कर, कामगार कल्याण उपकर व विमा रक्कम वसूल न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : नागरी दलित वस्ती योज शासन अनुदान निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 77085.00/-

***मक्तेदाराचे देयकातून विमा रक्कम, कामगार कल्याण उपकर वसूल केला नाही. मूल्यवर्धित कराची रक्कम कमी वसूल केली.***

सोलापूर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या अनुदानातून जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांचे प्रशासकीय मंजुरी आदेश क्रमांक सावि/1/मपा/आरआर/2797, दिनांक 20/09/2011 नुसार दलित वस्ती अंतर्गत खालील कामे करण्यात आली आहेत. सदर कामाचे देयकातून खालील प्रमाणे मूल्यवर्धित कर, कामगार कल्याण उपकर व विमा वसूल न करता प्रदान केले आहे.

Solapur (M Corp.)

| अ.क्र. | कामाचे नाव | मक्तेदाराचे नाव | देयकाची एकूण रक्कम (रु.) | कामगार कल्याण उपकराची रक्कम (रु.) | विमा रक्कम (रु.) | मूल्यवर्धित कराची कमी वसूल केलेली रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | वार्ड क्र.69 कोवाड कुंभार वस्ती येथे दलित वस्ती अंतर्गत ठिकठिकाणी रस्ते तयार करणे | शेट्टी कन्स्ट्रक्शन | 1301795 | 13017 | 13017 | -- |
| 2. | वार्ड क्र.21 मुकुंदनगर व राजीव गांधीनगर येथील नागरी दलित वस्ती अंतर्गत ॲप्रोच रस्ता तयार करणे | एन.एम. मंठाळकर | 2015850 | 20158 | 20158 | 10735 |

1. नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 दिनांक 3/11/2003 व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक प्रीविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार कंत्राटी कामाचा विमा कामाच्या संपूर्ण कालावधीचा असणे आवश्यक आहे. ठेकेदारास कंत्राटी कामाचे प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमानिधीकडे उतरवून त्या संबंधीचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे अन्यथा ठेकेदाराकडून कामावरील खर्चाच्या 1 टक्का वसूल करून शासकिय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक असतांना वरील कामाच्या देयकाचे प्रदान करतांना विम्याचे रु.33175 वसूल केले नाही. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.47, दि.11/05/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत उत्तर दिले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2. उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009 / प्र. क्र. 108 / कामगार-7-अ, दिनांक 17 जून, 2010 नुसार मक्तेदाराचे देयकातून कामगार कल्याण उपकरापोटी 1 टक्का रक्कम वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे, तथापि, देयकाचे प्रदान करतांना रु.33175 वसूल केले नाही. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.47, दि.11/05/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत उत्तर दिले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

3. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील अधिसूचना दिनांक 4 एप्रिल 2012 नुसार दिनांक 1/04/2012 पासून अनोंदीत मक्तेदाराकडून व्हॅट ची रक्कम 4% ऐवजी 5% वसूल करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. वरील अनु.क्र.2 चे कामाचे मक्तेदार श्री.एन.एम.मंठाळकर यांचे देयकातून 5% ऐवजी 4% प्रमाणे व्हॅट वसूली केली आहे. तरी कमी वसूल केलेली रक्कम रु.10735 वसूलपात्र आहे. याबाबत विभागास

अर्धसमास पत्र क्र.47, दि.11/05/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्रमांक 347, दि.13.08.15 अन्वये वरील रक्कमा संबंधित ठेकेदाराकडून वसूल करून शासनाच्या संबंधित विभागाकडे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल असे कळविले आहे. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.
वसूलपात्र रु. 33175+33175+10735 = 77085

DATVCSM6501 (Ref No : 40, Hmm No : 47)

## *77 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजनेतर्गत रस्ते अनुदानातून केलेल्या रस्त्याच्या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्ण जय शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 409376.00/-

***कामाचे अंदाजपत्रक करतांना अनुसूची –बी मधील बाबीच्या मूळ किमतीमध्ये 4% जकातीचा समावेश करून पृथ: करण करण्यात आले आहे. परंतु 0.25% या दराने स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल केली. त्यामुळे मक्तेदारास अंदाजपत्रकातील किमतीपेक्षा 3.75% प्रमाणे रु.409376 इतके अतिरिक्त प्रदान झाले.***

सोलापूर महानगरपालिकेस 2011-12 मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजनेतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून खालील कामे करण्यात आली.सोलापूर मनपाने प्रस्तावित केलेल्या कामास जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांचे आदेश क्रमांक सावि / 1 / मपा / आर आर/3444/11, दिनांक 20/10/2011 अन्वये सदर कामास प्रशासकीय मंजुरी दिली आहे. सदर कामासाठी दिलेल्या मक्त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| मक्तेदाराचे नाव | मे. एन.एम.मंठाळकर, सोलापूर |
| मक्त्याचा दर | अंदाजपत्रकीय दराच्या 8.90% कमी दराने |
| निविदा मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.144 / 29.8.12 |
| कार्यादेश दिनांक | 25/09/2012 |

| | |
|---|---|
| कामाची मुदत | 04 महिने मुदतवाढ 31.12.13 पर्यंत |

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीचे लेखापरीक्षण केले असता, आढळून आलेल्या उणीवा बाबत अर्ध समास पत्र क्रमांक 48,दि.11/05/15 अन्वये विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने त्यांचेकडील पत्र.626, दि.15/06/15 अन्वये सादर केलेला खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. सदर निविदेव्दारे 2012-13 मध्ये पूर्ण केलेल्या कामाचे अंदाजपत्रक करतांना अनुसूची –बी मधील बाबीच्या मूळ किमतीमध्ये 4% जकातीचा समावेश करून पृथ:करण करण्यात आले आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना दिनांक 6/08/2012 मधील नियम 5 नुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा व्यक्तिला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर त्याच्या कंत्राटी मूल्याच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर वसूल करावा, असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार कंत्राटदाराच्या देयकातून स्थनिक संस्थाकरापोटी 0.25% दराप्रमाणे वसुली केली आहे. परंतु दर पृथकरण करतेवेळी 4% जकात कर वाढवून दर मंजूर केल्यामुळे खालील प्रमाणे अति प्रदान झाले आहे.

| अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम रू. | दर पृथःकरणामध्ये 4% जकातकर समाविष्ट केलेल्या बाबींची एकूण रक्कम रू. | कंत्राटदारास अदा केलेली 4% रक्कम रु. | कंत्राटदाराकडून वसूल केल्या स्थानिक संस्था कराची रक्कम रु. | अतिरिक्त प्रदानाची रक्कम रु |
|---|---|---|---|---|---|
| 1.कामाचे नाव – पंचकटा ते विजापूर वेस रस्ता तयार करणे. | | | | | |
| | 2017178 | 1795665 | 71827 | 4489 | 67337 |
| 2.कामाचे नांव – चौपाड सिटी पोस्ट ऑफिस ते पंजाब तालीम ते मल्लीकार्जुन मंदिर बाळीवेस पर्यन्तचा रस्ता तयार करणे. | | | | | |
| | 3196172 | 2725751 | 109030 | 6814 | 102216 |
| 3.कामाचे नांव-कमरूनिस्सा शाळा ते निलगार इस्टेट पर्यंत रस्ता तयार करणे | | | | | |
| | 2117772 | 1929290 | 77171 | 4823 | 72348 |
| 4.कामाचे नाव –वुडप्लाझा ते सह्याद्री शॉपिंग सेंटर पर्यन्तचा रस्ता तयार करणे | | | | | |
| | 2198716 | 2029126 | 81165 | 5072 | 76093 |
| 5.कामाचे नांव –एस.एस.उर्दू स्कूल ते अशपाक उल्ला समाज मंदिर ते पोटफाडी चौक रस्ता तयार करणे. | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 2851123 | 2436852 | 97474 | 6092 | 91382 |
| एकूण रक्कम रु.409376 | | | | | |

वरील प्रमाणे ठेकेदारास अदा केलेली अतिप्रदानाची रक्कम रु.409376 वसूल होणे आवश्यक आहे. याबाबत अर्थसमास क्र.48,दि.11/05/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र.626, दि.15/06/15 अन्वये ठेकेदारास अदा केलेली स्थानिक संस्था कराची रक्कम रु.4,09,376 वसूल करण्यात येईल असे कळविले आहे. त्यामुळे सदरचा आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2. सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ट-24, नियम 11 नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के कामाची तपासणी केल्याचे प्रमाणपत्र मोजमाप पुस्तकामध्ये तारखेसह स्वाक्षरी करुन नोंदविलेले नाही.

वसूलपात्र रक्कम रु. 409376

DATVCSM6501 (Ref No : 41, Hmm No : 48)

## *78 जिल्हा वार्षिक योजना 2011-12 अंतर्गत रस्ते विकसित करण्यासाठी प्राप्त अनुदानातून केलेल्या खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : वार्षिक योजना शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 385639.00/-

***कामाचे अंदाजपत्रक करतांना अनुसूची –बी मधील बाबीच्या मूळ किमतीमध्ये 4% जकातीचा समावेश करून पृथः करण करण्यात आले आहे. परंतु 0.25% या दराने स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल केली. त्यामुळे मक्तेदारास 3.75% अतिरिक्त प्रदान झाले. कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल केली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेस 2011-12 मध्ये सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून रस्ते विकसित करण्यासाठी प्राप्त झालेल्या अनुदानातून कामे करण्यात आली. सोलापूर मनपाने प्रस्तावित केलेल्या कामास सहाय्यक संचालक, नगररचना सोलापूर यांचे क्रमांक आस /कर्ज /2011-12/संसनर-सो/743, दिनांक 30/03/12 अन्वये सदर कामास प्रशासकीय मंजुरी दिली आहे. सदर अनुदानातून 2012-13 मध्ये खालील प्रमाणे खर्च

करण्यात आला आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1. | अक्कलकोट रोड नितीननगर नदाफनगर ते एम. आय. डी. सी.महेक टेक्स्टाईल पर्यन्तचा रस्ता तयार करणे. | 3337639 |
| 2. | नगर ते बसवेश्वर हॉल ते सिद्राम नगर ताटी टेक्स्टाईल पर्यन्तचा रस्ता तयार करणे. | 2770030 |
| 3. | अक्कलकोट रोड चंद्रकांत कोल्हापुरे घर ते नितीन नगर दक्षिणोत्तर पर्यन्तचा रस्ता तयार करणे. | 2676137 |
| | एकूण | **8783806** |

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीचे लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या उणीवा बाबत अर्ध समास पत्र क्रमांक 52,दि.12/05/15 अन्वये विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने त्यांचेकडील पत्र.626, दि.15/06/15 अन्वये सादर केलेला खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. सदर योजने अंतर्गत केलेल्या कामाचे अंदाजपत्रक करतांना अनुसूची –बी मधील बाबीच्या मूळ किमतीमध्ये 4% जकातीचा समावेश करून पृथ:करण करण्यात आले आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना दिनांक 6/08/2012 मधील नियम 5 नुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा व्यक्तिला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर त्याच्या कंत्राटी मूल्याच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर वसूल करावा.असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार कंत्राटदाराच्या देयकातून स्थानिक संस्थाकरापोटी 0.25% दराप्रमाणे वसुली केली आहे. परंतु दर पृथ:करण करतेवेळी 4% जकात कर वाढवून दर मंजूर केल्यामुळे खालील प्रमाणे अति प्रदान झाले आहे.

| मक्तेदाराचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रू. | दर पृथःकरणामध्ये 4% जकातकर समाविष्ट केलेल्या बाबींची एकूण रक्कम रू. | कंत्राटदारास अदा केलेली 4% रक्कम रु. | कंत्राटदारा कडून वसूल केल्या स्थानिक संस्था कराची रक्कम रु. | अतिरिक्त प्रदानाची रक्कम रु |
|---|---|---|---|---|---|
| 1.कामाचे नाव – अक्कलकोट रोड नितीननगर नदाफनगर ते एम. आय. डी. सी.महेक टेक्स्टाईल पर्यन्तचा रस्ता तयार करणे. . | | | | | |
| एस.एन.क्षेत्रीय | 4915572 | 3720632 | 148825 | 11172 | 137653 |
| 2.कामाचे नांव – कलावती नगर ते बसवेश्वर हॉल ते सिद्राम नगर ताटी टेक्स्टाईल पर्यन्तचा रस्ता तयार करणे. | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एस.एन.क्षेत्रीय | 4586030 | 3188636 | 127545 | 6925 | 120620 |
| 3.कामाचे नांव – अक्कलकोट रोड चंद्रकांत कोल्हापुरे घर ते नितीन नगर दक्षिणोत्तर पर्यन्तचा रस्ता तयार करणे. | | | | | |
| एस.एन.अवताडे | 3677739 | 2573714 | 102948 | 8958 | 93990 |
| एकूण रक्कम रु.352263 | | | | | |

वरील प्रमाणे ठेकेदारास अदा केलेली अतिप्रदानाची रक्कम रु.352263 वसूल होणे आवश्यक आहे. याबाबत अर्थसमास क्र.52, दि.12/05/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र.626, दि.15/06/15 अन्वये ठेकेदारास अदा केलेली स्थानिक संस्था कराची रक्कम रु. 352263 वसूल करण्यात येईल असे कळविले आहे. त्यामुळे सदरचा आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2. अक्कलकोट रोड नितीननगर नदाफनगर ते एम. आय. डी. सी.महेक टेक्स्टाईल पर्यन्तचा रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना कार्यान्वयित करावयाच्या बाबींचे दरसूचीमधील मूळ दर घेऊन त्यामध्ये बाबनिहाय कामगार कल्याण उपकरापोटी 1% रक्कमेचा समावेश केला आहे. तसेच मक्तेदारास देयकाचे अंतिम प्रदानाचे वेळी एकूण बिलाचे रक्कमेमध्ये कामगार कल्याण उपकरपोटी 1% रक्कमेचा समावेश करून मक्तेदारास रक्कम अदा केली आहे. त्यामुळे ठेकेदारास 2% कामगार कल्याण उपकर अदा केला असून प्रत्यक्षात 1% उपकर वसूल केला आहे. परिणामी ठेकेदारास देयकाची रक्कम रु.3337639 वर 1% उपकर रु.33376 अतिरिक्त प्रदान झाली आहे. सदरची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. याबाबत अर्थसमास क्र.52, दि.12/05/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र.626, दि.15/06/15 नुसार, शासन निर्णय दि.17/06/2010 मधील तरतुदीप्रमाणे 1% कामगार उपकराची रक्कम अदा केली आहे. व तेवढीच रक्कम वसूल करण्यात आली आहे. परंतु कामाचे बाबनिहाय अंदाजपत्रक तयार करताना त्यामध्ये कामगार कल्याण उपकर 1% रक्कम समाविष्ट केली असतांना पुनश्च एकत्रित बिलाची अदायगी करताना 1% उपकर समाविष्ट केला आहे. त्यामुळे मक्तेदारास कामगार कल्याण उपकरापोटी 2 % प्रदान झाले असून 1% प्रमाणे वसुली करण्यात आली आहे. तरी अतिरिक्त प्रदानाची रक्कम रु.33376 वसूलपात्र आहे.

3.सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ट-24, नियम 11 नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के कामाची तपासणी केल्याचे प्रमाणपत्र मोजमाप पुस्तकामध्ये तारखेसह स्वाक्षरी करुन नोंदविलेले नाही.

वसूलपात्र रु. 352263+33376= 385639

DATVCSM6501 (Ref No : 42, Hmm No : 52)

## *79 वार्ड क्रमांक 29 विडी घरकुल येथे पिरॅमिड मेडीटेशन हॉल बांधणे या कामावरील खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : मेडिटेशन हॉल बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 152090.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 78930.00/-

***मक्तेदाराचे देयकातून विमा, कामगार कल्याण उपकर रक्कम वसूल केली नाही. कामावर वापरण्यात आलेल्या स्टीलचे टेस्ट रिपोर्ट प्राप्त करून न घेताच वापर करण्यात आला आहे. कामासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारास देयकाचे प्रदान करतांना आयकर रक्कम कमी वसूल केली.***

मनपा अनुदानातून वार्ड क्रमांक 29 मधील विडी घरकुल येथे पिरॅमिड मेडीटेशन हॉल बांधण्याकरिता रु.3530673 खर्चाचे पूर्व गणनपत्रक तयार करून स्थायी समिती ठराव क्रमांक 124 दि.22/12/2010 नुसार मान्यता घेण्यात आली. सदर कामाकरिता दिनांक 20/06/11 ते 28/06/11 या कालावधीत निविदा अर्ज विक्री करून दिनांक 4/07/2011 रोजी निविदा स्विकृत करण्यात आल्या. प्राप्त झालेल्या निविदांपैकी एन.एम.मंठाळकर यांची निविदा रक्कमेपेक्षा 8% जास्त दराची निविदा मान्य करण्यात येवून त्यांना जा.क्र.नअ/393 दिनांक 23/12/11 नुसार कामाचे आदेश देण्यात आले.सदर कामाची निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका व इतर अनुषंगिक अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता आढळून आल्या आहेत.

1.नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 दिनांक 3/11/2003 व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक प्रीविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार कंत्राटी कामाचा विमा कामाच्या संपूर्ण कालावधीचा असणे आवश्यक आहे. ठेकेदारास कंत्राटी कामाचे प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमानिधीकडे उतरवून त्या संबंधीचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे अन्यथा ठेकेदाराकडून कामावरील खर्चाच्या 1 टक्का वसूल करून शासकिय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. वरील कामाचा विमा दिनांक 18/02/13 ते 17/11/13 या कालावधीचा उतरविण्यात आला आहे. सदरचे कामाचे आदेश 23/12/11 रोजी देण्यात आले असून कामची मुदत दिनांक 22/06/12 पर्यंत होती. त्यामुळे ठेकेदाराचे देयकातून 1% विमा रक्कम रु.35307 वसूल करून विमा संचालनालयाकडे जमा करणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.53 दि.12/05/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.596, दि.10/06/15अन्वये सादर केलेल्या अनुपालनामध्ये मक्तेदारास मुदतवाढ देण्यात आली असून त्यांचे अंतिम बिलाच्या रक्कमेतून 1% विमा रक्कम कपात

करण्याची दक्षता घेत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदरची विमा रक्कम रु.35307 वसूल करून शासकीय विमा निधीकडे जमा करणे आवश्यक आहे.

2. उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7-अ, दिनांक 17 जून, 2010 नुसार मक्तेदाराचे देयकातून कामगार कल्याण उपकरापोटी 1 टक्का रक्कम वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे, तथापि, देयकाचे प्रदान करतांना रु.35306 वसूल केले नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.53 दि.12/05/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, नगर अभियंता विभागाने त्यांचे कडील पत्र क्र.596, दि 10/06/15 अन्वये सदर कामाचे पूर्वगणनपत्रकास आयुक्त यांनी दि.4/12/2010 रोजी मान्यता दिलेली आहे. पूर्वगणनपत्रक मंजुरीचे तारखेस कामगार कल्याण उपकर रक्कम कपात करण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे सदर वस्तुस्थितीस अनुसरून 1% कामगार कल्याण उपकर वसूल केला नाही असे नमूद केले आहे. विभागाकडील उत्तर संयुक्तिक नाही, कारण शासन निर्णय दि.17 जून, 2010 मधील परिच्छेद 6 मधील तरतुदी नुसार ज्या कामाचे करार दि.1 जुलै 2010 वा तद्नंतर करण्यात येईल अशा सर्व बांधकाम कंत्राटदारांकडून दि.1.7.2010 पासून 1% रक्कम वसूल करण्याबाबत तरतूद आहे. सदरचे कामास 1/07/2010 नंतर मंजुरी दिली असल्याने शासन निर्णयातील तरतुदीनुसार 1% कामगार कल्याण उपकर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

3.सदर कामावर वापरलेल्या स्टीलची रक्कम रु.152090 इतके ठेकेदारास प्रदान केले आहे. परंतु नस्ती सोबत स्टील वजनाची पावती, टेस्ट रिपोर्ट आढळून आला नाही. याबाबत विभागाने सदर कामावर वापर करण्यात आलेल्या स्टीलच्या वजनाची पावती, टेस्ट रिपोर्ट मक्तेदाराकडून घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे असे कळविले आहे. तथापि, कामाचे देयक प्रदान करण्यापूर्वीच सदर बाबींची पूर्तता करून घेणे आवश्यक असताना स्टील वजनाची पावती, व टेस्ट रिपोर्ट न घेताच मक्तेदारास देयकाची रक्कम अदा केल्याचे दिसून येते. कामावर वापरण्यात आलेल्या स्टीलचे टेस्ट रिपोर्ट न घेता वापर करण्यात आल्यामुळे पूर्ण करण्यात आलेले काम योग्य दर्जाचे झाल्याची खात्री करता येत नाही. त्यामुळे सदर बाबीवरील खर्च रक्कम रु.152090 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4.सदर कामासाठी नियुक्त केलेले सल्लागार आर्किटेक्ट श्री.संतोष कीर्तने यांना धावते बिल क्रमांक 1 ते 5 बिलापोटी रु.103970 अदा केले आहे. आयकर अधिनियमातील कलम 194 जे नुसार 10% आयकर वसूल करणे आवश्यक असतांना 2% आयकर वसूल केला आहे. त्यामुळे कमी असूल केलेल्या आयकराची रक्कम रु 8317 वसूल होणे आवश्यक आहे. या बाबत विभागाने त्या वेळच्या प्रचलित पद्धतीनुसार सल्लागारास अदा केलेल्या देयकातून 2% आयकर कपात केलेला असल्याचे नमूद केले आहे. विभागाचे उत्तर संयुक्तिक नसून, आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 जे नुसार 10% आयकर कपात करण्याबाबत तरतूद असताना 2% आयकर कपात केला आहे. तरी आयकराची कमी कपात केलेली रक्कम रु.8317 वसूल करून आयकर विभागाकडे जमा होणे आवश्यक आहे.

एकूण वसूलपात्र रु. 35307+35306+8317=78930

Solapur (M Corp.)

आक्षेपाधीन रक्कम रु. 152090

DATVCSM6501 (Ref No : 43, Hmm No : 53)

## *80 महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे मास्टर प्लॅन अंतर्गत स्नेक एन्क्लोजर या कामाचा विमा न उतरविल्यामुळे मक्तेदाराकडून विमा रक्कम वसूल करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : प्राणी संग्रहालय मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 183013.00/-

***कंत्राटी कामाचा विमा न उतरविल्यामुळे मक्तेदाराचे देयकातून कामाच्या अंदाजपत्रकिय रक्कमेच्या एक टक्का विमा रक्कम रु.183013 वसूल करून विमा निधीकडे जमा केली नाही.***

महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या महात्मा गांधी संग्रहालय येथे मास्टर प्लॅन अंतर्गत एन्क्लोजर, एनट्रन्स गेट, ऑफिस बिल्डिंग, या कामाकरिता जाहीर निविदा प्रसिद्ध करून, निविदा दर मागविण्यात आले. स्थायी समिती ठराव क्रमांक 481 दि.12/02/13 अन्वये निविदेस मान्यता देण्यात येवून श्री.महेश जाधव यांची निविदा अंतिम करण्यात आली व कार्यादेश क्रमांक 1987 दि.22/02/2013 अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदर कामाच्या नस्तीची तपासणी केली असता, खालील अनियमितता आढळून आल्या आहेत.

1. नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 दिनांक 3/11/2003 व विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक प्रीविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दिनांक 12.09.2005 नुसार कंत्राटी कामाचा विमा कामाच्या संपूर्ण कालावधीचा असणे आवश्यक आहे. ठेकेदारास कंत्राटी कामाचे प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमानिधीकडे उतरवून त्या संबंधीचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे अन्यथा ठेकेदाराकडून कामावरील खर्चाच्या 1 टक्का वसूल करून शासकिय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. वरील कामाचा विमा दिनांक 30/07/13 ते 29/07/14 या कालावधीचा उतरविण्यात आला आहे. सदरचे कामाचे आदेश 22/02/13 रोजी देण्यात आले असून कामाचा करारनामा दि.21/02/13 रोजी केला आहे. त्यामुळे ठेकेदाराचे देयकातून कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.18301345 वर 1% विमा रक्कम रु.183013 वसूल करून विमा संचालनालयाकडे जमा करणे आवश्यक आहे. या बाबत अर्धसमास पत्र क्र.55, दि.13/05/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने त्यांचेकडील

पत्र क्र.618, दि.11/06/2015 नुसार कळविलेल्या अनुपालनामध्ये सदर कामापोटी कंत्राटी कामाचा विमा कामाचे प्रत्येक बिलातून 1% वसूल करणेत आली असल्याचे कळविले आहे. अनुपालनासोबत जोडलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या छायांकित प्रतीवरील मक्तेदारास अदा केलेल्या बिलाच्या नोंदीवरून असे दिसून येते कि, मक्तेदारास दिलेल्या बिलामध्ये कामगार विमा रक्कम समाविष्ट करून बिलातून कपात केली आहे. शासन निर्णयातील तरतुदी नुसार मक्तेदाराने कामाचा व कामावरील कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक होते. परंतु मक्तेदाराने कामाचा विमा उतरविला नसल्याने शासन निर्णयातील तरतुदी नुसार मक्तेदाराचे देयकातून 1% रक्कम रु.183013 वसूल करणे आवश्यक आहे .

वसूलपात्र रु.183013

DATVCSM6501 (Ref No : 44, Hmm No : 55)

## *81 नगर अभियंता यांचे अधिनस्त असलेले भांडार व हॉटमिक्स प्लॅन्ट च्या लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 153216.00/-

***खडीची साठा नोंदवही व वापर नोंदवहीचा ताळमेळ घेतला असता, 55 घ.मी खडी साठा कमी असल्याचे आढळून आले, त्यामुळे रु.550 प्रती घ.मी या दराप्रमाणे 55 घ.मी खडीची किंमत रु.30,250 वसूलपात्र आहे. साठा नोंदवहीमध्ये महिना अखेरीस गोषवारा लिहिला जात नाही. मक्तेदाराने रॉयल्टी रक्कम भरणा केल्याची खात्री न करता खाडीच्या रकमेचे प्रदान केले आहे.त्यामुळे रु.1,22,966 शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या नगरअभियंता यांचे अधिनस्त असलेल्या भांडार व हॉटमिक्स प्लॅन्ट चे लेखापरीक्षण केले असता, आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 137 दि.31.07.15 अन्वये विचारणा केली असता, लेखा परीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.भांडार विभागाने आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये खरेदी केलेले एकूण डांबर 62.14 टन हॉटमिक्स प्लॅन्ट वर प्रीमिक्स तयार करण्यासाठी वापरण्यात आले आहे. वर्षामध्ये 1695 घनमीटर इतके प्रीमिक्स तयार झाल्याचे हॉटमिक्स प्लॅन्ट वर ठेवण्यात आलेल्या नोंदवही वरून दिसून येते. Morth स्पेशिफिकेशन नुसार SDBC (Semi

Dense Bitumens Concrete ) तयार करण्यासाठी 5.5% इतके डांबराचे प्रमाण आवश्यक आहे.
1695 घ.मी.खडी वापरून तयार केलेल्या प्रीमिक्सचे वजन खालीलप्रमाणे आहे.
1695 x 1600 kg./घ.मी.(खडीची घनता) = 2712 टन (खडीचे वजन)
+ डांबराचे वजन = 62.14 टन
एकूण प्रीमिक्सचे वजन = 2774.14 टन
डांबर व प्रीमिक्सचे वजनाचा विचार करता, डांबराचे प्रमाण केवळ 2.24% इतके येते. ते Morth स्पेशिफिकेशन नुसार आवश्यक 5.5%पेक्षा कमी असल्यामुळे तयार करण्यात आलेले प्रीमिक्स योग्य दर्जाचे नव्हते. परिणामी या प्रीमिक्सचा वापर करून वर्षभरात करण्यात आलेली रस्त्याची कामे योग्य दर्जाची झाली नाहीत, असे दिसून येते.
2. हॉटमिक्स प्लॅन्ट वरील खडीचा साठा व वापर नोंदवही तपासली असता, 1/04/2012 रोजी खडीचा साठा 38 घ.मी.होता. एप्रिल-12 ते मार्च-13 या कालावधीत एकूण 1740 घ.मी खडी प्राप्त झाली. त्यामधून 1695 घ.मी खडी प्रीमिक्स साठी वापरण्यात आली. म्हणजेच 31/03/2013 अखेर 83 घ,मी खडी शिल्लक असणे आवश्यक होते. तथापि, साठा नोंदवहीतील नोंदी नुसार 28 घ.मी खडी शिल्लक असल्याचे दिसून येते. म्हणजेच 55 घ.मी खडी साठा कमी आहे. त्यामुळे रु.550 प्रती घ.मी या दराप्रमाणे 55 घ.मी खडीची किंमत रु.30,250 वसूलपात्र आहे.

3.साठा नोंदवहीमध्ये महिना अखेरीस गोषवारा लिहिला जात नाही. साठा नोंदवहीतील नोंदी कोणत्याही जबाबदार अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून तपासून प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत.
4.विभागाने खरेदी केलेल्या खडीचे पुरवठादाराकडील डिलिव्हरी चलन लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाही. त्यामुळे साठा नोंदवही मध्ये नमूद केलेल्या व त्यापोटी मक्तेदारास प्रदान केलेल्या रक्कमेच्या योग्यतेची खात्री करता आली नाही.
5. महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौण खनीज/10/1009/सी.आर. 309/ख, दि.11/02/2010 नुसार खरेदी करण्यात आलेल्या खडी च्या परिमाणावर रु.70.67 घनमीटर दराने रॉयल्टी रक्कम "0853 गौणखनीज" या शासन सदरी भरणा केल्याची खात्री करणे आवश्यक होते. परंतु नगर अभियंता विभागाने 2012-13 मध्ये प्रीमिक्स साठी खरेदी केलेल्या 1740 घ.मी.खडीचे प्रदान करतांना मक्तेदाराने रॉयल्टी भरल्याची खात्री न करता प्रदान केले आहे.रक्कम रु.1,22,966 शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

DATDSAM7301 (Ref No : 66, Hmm No : 137)

## *82 केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेंतर्गत मनपा क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तीक शौचालय बांधकामाच्या खर्चातील अनियमितता*

Solapur (M Corp.)

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 23**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 166761000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 140924837.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6575855.00/-

***1. निवीदा प्रक्रीयेत नसलेल्या संस्थांना नियमबाहयपणे लाभार्थी निवडीबाबतचे काम दिलेले आहे.2. लाभार्थी निवडीबाबत काम केलेल्या संस्थांना प्रदान केलेल्या रक्कम रु. 65,09,700/- ची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध् करुन दिलेली नाहीत. 3. शासन निर्णय दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 मधील अ.क्र.2 नुसार शासनाने विहीत केलेल्या भाग.1 व भाग.2 मध्ये लाथार्थ्यांचे Bio-Matric Card ठेवणे आवश्यक आहे.त्यानुसार सदर कामासाठी निवड केलेल्या लाभार्थ्यांचे Bio-Matric Card लेखापरीक्षणास उपलब्ध् करुन दिलेले नाही.4. शासन निर्णय दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 मधील अ.क्र.3 नुसार या कार्यक्रमांतर्गत दोन खड्डयांची (TWO PIT POUR FLUSH) अथवा स्थानिक भौगोलिक परिस्थितीस अनुरुप पध्दतीने शौचालय बांधणेबाबत शासन निर्देश आहेत. त्यानुसार दोन खड्डयांची व स्थानिक भौगौलिक परिस्थितीस अनुरुप पध्दतीने बांधलेल्या शौचालयांबाबतची माहीती उपलब्ध् करुन दिलेली नाही.5. प्रकल्प खर्चात नियमबाहयपणे व शासनमान्यते शिवाय रक्कम रु.4,33,69,068/- इतकी वाढ करण्यात आलेली आहे. 6.. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 10 सप्टेंबर 2008 व दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 नुसार अशासकीय संस्थानी लाभार्थी निवडीच्या वेळी लाभार्थ्यांनी करावयाच्या खर्चाची रक्कम जमा करुन मनपा कडे जमा करणेबाबत आहेत.सदर शासन आदेशाचे उल्लंघन करुन मक्तेदाराने परस्प्र रक्कम जमा केलेली आहे. 7. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 10 सप्टेंबर 2008 व दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 नुसार मनपा कार्यक्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना शौचालये बांधुन देणेबाबत योजना असतांना शासन आदेशाचे उल्लंघन करुन लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय बांधण्याच्या अटीवर 4786 लाभार्थ्यांना रक्कम रु.9000/- नुसार 4,30,74,000/- चे प्रदान केलेले आहे. 8. उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रमांक बीसीए.2009/प्र.क्र.108/कामगार.6 दिनांक 17.6.2000 नुसार 1 टक्के प्रमाणे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.4,57,483/- तसेच कंत्राटदाराकडुन मुल्यवर्धीत कराची 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 9,14,966/- अशी एकुण रक्कम रु. 13,72,449/- रक्कमेची वसुली करण्यात आलेली नाही.9. 4786 लाभार्थ्यांस रु 9000/- प्रमाणे थेट लाभ दिल्याने आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 सी नुसार सदर रक्कमेवरील 2 टक्के प्रमाणे रक्कम रु.8,61,480/- चे आयकर रक्कमेचे शासनाचे नुकसान झालेले आहे. 10. धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी केलेल्या सामाजिक संस्थाना तसेच बांधकामाबाबतचे अनुभव नसलेल्या संस्थांकडुन नियमबाहयपणे काम करुन घेण्यात आलेले आहे.11. फेज-4 साठी केलेल्या निवीदा प्रक्रीयेबाबतची नस्ती व आवश्यक दस्त्ऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही.***

शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक कखयो.2008/ प्र.क्र.100 / वै.शौ. /पापु.21 दिनांक 10 सप्टेंबर 2008 नुसार राज्याच्या नागरी भागातील (महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्र) आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांकरीता वैयक्तीक शौचालय नसलेल्या प्रत्येक घरांमध्ये वैयक्तीक शौचालयाची उपलब्धता व्हावी यासाठी केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता अभियानांतर्गत सुधारीत मार्गदर्शक तत्वानुसार वैयक्तीक शौचालय बांधकाम कार्यक्रमांतर्गत मनपा,सोलापुर कार्यक्षेत्रात 14466 वैयक्तीक शौचालयाची योजना राबविण्यात आलेली आहे. वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी प्रति कुटूंब उत्पन्नाची मर्यादा रक्कम रु.3300/- प्रतिमहा इतकी विहीत केलेली आहे. केंद्रशासनाच्या निर्देशानुसार प्रती शौचालय बांधकाम खच्र रु.10000/- निश्चित केलेला असून प्रती कुटूंब वित्तीय सहाय्याचा आकृतीबंधानुसार केंद्रशासनाचे (75%) रु. 7500/-,राज्यशासनाचे (15%) रु.1500/- व लाभार्थी हिस्सा (10%) रु.1000/- रक्कम निश्चित केलेली आहे.त्यानुसार 14466 लाथार्थ्यांसाठी केंद्रशासनाचे 75% हिस्सा रक्कम रु.10,84,95,000/-,राज्य शासन हिस्सा 15% रक्कम रु. 2,16,99,000/- व लाभार्थी हिस्सा 10% रक्कम रु. 1,44,66,000/- असा एकूण रक्कम रु. 14,46,60,000/- खर्च अपेक्षित होता. मनपा,सोलापुर यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 2008-09 चे दरसुचीतील दर (अधिक मनपाचे 5%सह) याप्रमाणे एका शोचालयाची रक्कम रु. 11472/- निश्चित केली आहे. शासन अनुदाना व्यतिरिक्त जादाची रक्कम रु. 1472/- लाभार्थ्याकडुन घेणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रती लाभार्थी रु. 1472/- नुसार 14466 लाभार्थ्यांकडुन रक्कम रु. 2,12,93,952/- इतकी रक्कम होते. तसेच मनपा,सोलापुर यांनी 14466 लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय साठी 1667.61 लाख रक्कमेच्या प्रस्तावास केंद्रशासनाने दिनांक 4.5.2011 नुसार मंजूरी दिल्यानंतर 2011-12 च्या डीएसआर नुसार शौचालयाची अंदाजित किंमत रु. 14470/- ठरविण्यात आलेली आहे.

शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.कखयो.2008/प्र.क्र133 /वै.शौ./पापु21 दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 नुसार लाभार्थी निवड करणेसाठी Bio-Matric Card नमुना प्रपत्र -अ(भाग.1 व भाग.2) नुसार अचूक भरुन वैयक्तीक शौचालय बांधकामाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठविणेबाबत, शौचालयाचे बांधकाम (Two Pit Pour Flush) अथवा स्थानिक भौगोलिक परिस्थितीस अनुरुप अशा पध्दतीने बांधणे, तसेच प्रस्ताव सादर करतांना वैयक्तीक शौचालयाचा प्रकार प्रस्तावात नमुद करणे, स्थानिक परिस्थिदतीनुसार आवश्यकतेनुसार रु.10000/- पेक्षा अधिक खर्च झाल्यास तो संबधित लाभार्थ्याकडुन वसुल करणे, केंद्रशासनाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार लाभार्थी हिस्सा रु.1000/- रोख रककमेव्दारे अदा करणे शक्य नसल्यास लाभार्थी तेवढया रक्कमेचे श्रमदान करुन त्यांचा हिस्सा श्रमदानाव्दारे अदा करुन शकतील.भरलेल्या हिश्श्याचे मूल्य रु.1000/- पेक्षा कमी असणार नाही याबाबत यथायोग्य दक्षता घेवून त्याचा हिशोब आवश्यक लेख नोंदवहीत ठेवणे बाबत निर्देश दिलेले आहेत. प्रत्येक शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तीचा सर्व्हे करुन लाभार्थी संख्या निश्चीत करणे, लाभार्थ्यांची Bio-Metri पध्दतीने ओळखपत्रे तयार करणे, चर्चासत्रे,प्रशिक्षण,लाभार्थी हिस्स्याची रक्कम गोळा करुन नागरी संस्थाकडे जमा करणे या कामासाठी नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या अशासकीय संस्थाची निवड करण्याची जबाबदारी संबधित नागरी संस्थाकडे सोपविण्यात आली आहे. तसेच निवड करण्यात आलेल्या अशासकीय संस्थाना (NGOs) त्यांचा कामाचा मोबदला एकूण प्रकल्प खर्चाच्या व्यतिरिक्त 15 टक्के मर्यादेपर्यंत उपलब्ध निधीतून करणेबाबत निर्देश आहेत. तसेच केंद्रशासनाच्या व राज्य हिश्श्याच्या अनुदानाचे संकलन व वितरण करुन त्याचे स्वतंत्र लेखे ठेवणेबाबत,कामाचा त्रैमासिक अहवाल शासनास सादर करणे, उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्यासाठी वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई यांची समन्वय

यंत्रणा म्हणून घोषित केलेले आहे. प्रकल्प प्रस्ताव केंद्र शासनाकडुन मान्य होवुन केंद्र व राज्य शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यानंतर नागरी संस्थांनी त्यांचे क्षेत्रातील वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम,देखभाल,दुरुस्तीचे कामाकरीता त्यांचे स्तरावर संस्थाची निवड करणेबाबत निर्देश आहेत.

त्यानुसार सोलापूर मनपा क्षेत्रातील वैयक्तीक शौचालय लाभार्थी निवडीसाठी अशासकीय संस्था निवडीसाठी सर्वसाधारण ठराव क्रमांक 203 दिनांक 21.11.2008 नुसार ठराव केलेला असून दिनांक 18.11.2008 च्या दै.लोकमत वृत्तपत्रातील जाहीरातीनुसार निवड प्रक्रीया राबवुन 1. अक्षय मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था,सोलापूर 2. समता शक्ती महीला प्रतिष्ठाण,सोलापूर, 3. महाराष्ट्र टेक्नि कल एज्युकेशन ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट सोसायटी,मंगळसेढा,4. संस्कृती फाऊडेशन,पुणे, यांचेकडुन सदर योजनेच्या लाभार्थी निवडीसाठी प्रती लाभार्थी रु. 450/- नुसार काम करुन घेणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला असून स्थायी ठराव क्र. 1567 दिनांक 9.1.2009 नुसार मान्यता देणेत आली आहे. तसेच त्यानंतर 1.ओंकार महीला बहुउद्देशीय विकास मंडळ,2. विजयकृष्ण महीला बहुउद्देशीय संस्था यांची नांव समाविष्ट करण्यात आलेली असून त्यास स्थायी ठराव क्र.1683 दिनांक 3.2.2009 नुसार मान्यता घेण्यात आली आहे. तद्नंतर 1.शेल्टर संस्था,पुणे व नवभारत सामाजिक संस्था,मुंबई यांची नांवे ठरावात समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

लाभार्थी निवडीसाठी अशासकीय संस्थाच्या निवडीनुसार सदर कामाचे सहा फेज करुन खालील प्रमाणे 14466/- लाभार्थ्यांची निवड केलेली आहे.

| अ. क्र. | फेज क्रमांक व एकुण लाभार्थी संख्या | वॉर्ड क्रमांक | अशासकीय संस्थेचे नांव | प्रकल्प किंमत (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| 1 | I / 5000 | 71,72,79,81,91,92,93,94,95,96,97,98,10 | नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण,मुंबई | 596.10 |
| 2 | II / 1548 | 1 त 8,10,11,13,14,15 | समताशक्ती महीला प्रतिष्ठाण,सोलापुर | 184.55 |
| 3 | III / 3511 | 48,12,18,19,20,36,40,44,46,53,68,69 | संस्कृती फौंऊडेशन पुणे | 371.59 |
| 4 | IV / 2000 | 33,34,36,27,75,76,78,80,29,30,31 | ओंकार महीला बहु.संस्था,सोलापुर | 249.00 |
| 5 | V / 1095 | 24,25,26,37,38,59,73,74,55,56,57,58,32 | विजयकृष्णा महीला बहु.संस्था,सोलापुर | 122.63 |
| 6 | VI / 1312 | 17,47,49,85,86,87,88,89,62,63,64,65,69 | अक्षय मागासवर्गीय | 143.74 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | बहु.संस्था,सोलापुर | |
| एकुण- 14466 लाभार्थी | | | | 1667.61 |

सदर कामासाठी मक्तेदार निश्चिकत करण्यासाठी दिनांक 18.7.2011 रोजी दोन स्थानिक व 1 राज्यस्तरीय वृत्तपत्रातुन निवीदा जाहीरात प्रसिध्द केली असून सदर जाहीरातील पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने दिनांक 24.8.2011 रोजी फेर निवीदा प्रसिध्द केली आहे. त्यानुसार 6 मक्तेदारांनी रु. 11501 ते 18550/- दर दिलेले असून आयुक्तांनी सदर मक्तेदारांना मनपाकडुन रु. 9000/- इतकेच बिलापोटी देण्यात येतील उर्वरीत जादा रक्कम संबधित लाभार्थ्यांच्या संमतीने मक्तेदाराने परस्पर घेणेबाबत मक्तेदारांना आदेश दिलेले असून सदर खर्चास स्थायी समितीने दिनांक 2.1.2012 रोजी मान्यता दिलेली आहे.

तसेच ज्या लाभार्थ्यांना स्वत:हून वैयक्तिक शोचालय बांधवयाचे असेल त्यांना महानगरपालिकेकडुन या योजनेस रु.9000/- प्रती लाभार्थी अनुदान वितरीत करणेबाबत दिनांक 25.7.2011 च्या स्थानिक वृत्तपत्रातुन जाहीर प्रसिध्दीकरण करणेत आलेले आहे.

सदर 14466 वैयक्तीक शौचालयाचे बांधकामासाठी 1667.61 लाख निधीनुसार केंद्रशासनाचा रु. 1250.71 लाख, राज्य शासनाचा रु. 250.14 व लाभार्थी हिस्सा रु.166.76 होतो. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक 15.7.2011 रोजी रु. 110.13 लाख, दिनांक 19.10.2011 नुसार रु. 248.79 लाख, व दिनांक निरंक नुसार रु.26 लाख असे एकुण रु.384.92 लाख राज्य शासनाचा हिस्सा तसेच केंद्रशासनाचे पत्र क्र.74 दिनांक 8.6.2011 नुसार रु.132.00 लाख, पत्र क्र.97 दिनांक 17.11.2012 नुसार रु. 100.00 लाख, पत्र क्र. 108 दिनांक 17.11.2012 नुसार 1091.51 लाख असे एकुण रक्कम रु. 1323.63 लाख निधी केंद्रशासनाकडुन प्राप्त झालेला आहे.त्यानुसार 2012-13 या वित्तीय वर्षात वैयक्तीक लाभार्थी यांना रक्कम रु. 1,60,33,500/- , भारत कन्ट्रक्शन यांना रक्कम रु. 1,07,78,040/- ,नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण,मुंबई यांना रक्कम रु.1,63,26,065/-,श्री.गांगजी यांना रक्कम रु. 10,93,680/- व श्री.भिवरे यांना रक्कम रु. 15,17,040/- असे एकुण रक्कम रु. 4,57,48,325/- इतका खर्च झालेला आहे. त्याबाबत विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नस्त्या व मोजमाप पुस्तकांचे परीक्षणानुसार आढळुन आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 65 दिनांक 25.6.2012 बाबत विभागाचा खुलासा अप्राप्त् असुन त्याबाबत खालील प्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देणेत येत आहेत.

1. सदर कामाच्या लाभार्थी निवडीसाठी नेमलेल्या अशासकीय संस्थाची निवड करतांना स्थायी ठराव क्रमांक 1567 दिनांक 9.1.2009 नुसार 1. अक्षय मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था, 2. समता शक्ती महीला प्रतिष्ठाण,सोलापुर, 3. महाराष्ट्र एज्युकेशन ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट सोसायटी,मंगळवेढा, 4. संस्कृती फौंऊडेशन,पुणे यांची निवड केलेली असतांना पुन:श्च स्थायी ठराव क्रमांक 1683 दिनांक 3.2.2009 नुसार 1.ओंकार महीला बहुउद्देशीय महीला विकास मंडळ, 2. विजयकृष्ण महीला बहुउद्देशीय संस्था,3.शेल्टर संस्था,पुणे, नवभारत सामाजिक संस्था,मुंबई यां 4 संस्थांची नांवे समावेश करुन ठरावात दुरुस्ती करण्यात आलेली आहे. लाभार्थी निवडीचे काम 6 फेज मध्ये 1.नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण,मुंबई, 2.समताशक्ती महीला प्रतिष्ठाण सोलापुर, 3.संस्कृती फौऊडेंशन,पुणे, 4.ओंकार महीला बहुउद्देशीय संस्था,सोलापुर, 5.विजयकृष्ण महीला बहुउद्देशीय संस्था,सोलापुर,6.अक्षय मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था,सोलापुर यांचेकडुन करण्यात आलेले आहे.यावरुन सदर कामासाठी निवड प्रक्रिोया राबवितांना ठराव क्रमांक 1567 दिनाक 9.1.2009 नुसार निवड केलेले महाराष्ट्र एज्युकेशन ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट सोसायटी,मंगळवेढा ही संस्था पात्र

असतांना सदर संस्थेस काम देण्यात आलेले नाही.तसेच ठराव क्रमांक 1683 दिनांक 3.2.2009 नुसार निवड केलेली शेल्टर,पुणे या संस्थेची निवड करुन देखील सदर संस्थेस काम देण्यात आलेले नाही.

तसेच ठराव क्रमांक 1683 दिनांक 3.2.2009 नुसार निवड केलेल्या 1.औंकार महीला बहुउद्देशीय महीला विकास मंडळ, 2. विजयकृष्ण महीला बहुउद्देशीय संस्था,3.शेल्टर संस्था,पुणे, नवभारत सामाजिक संस्था,मुंबई या संस्थांनी निविदेमध्ये सहभाग घेतला नसतांना लाभार्थी निवडीसाठी नेमणूक केल्याचे दिसून येते, हि बाब नियमबाह्य आहे.

2. सदर कामासाठी 6 फेज मध्ये 14466 लाभार्थ्यांची निवड करतांना प्रती लाभार्थी रु.450/-1.नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण,मुंबई यांना 5000 लाभार्थीसाठी रु. 22,50,000/-, 2.समताशक्ती महीला प्रतिष्ठाण सोलापुर,यांना 1548 लाथार्थ्यांसाठी रु. 6,96,600/- 3.संस्कृती फौऊडेंशन,पुणे, यांना 3511 लाथार्थ्यांसाठी रु. 15,97,950/- 4.औंकार महीला बहुउद्देशीय संस्था, सोलापुर, यांना 2000 लाभार्थ्यासाठी रु. 9,00,000 5.विजयकृष्ण महीला बहुउद्देशीय संस्था,सोलापुर, यांना 1095 लाथार्थ्यांसाठी रु. 4,92,750/- व 6.अक्षय मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था,सोलापुर यांना 1312 लाथार्थ्यांसाठी रु. 5,90,400/- असे एकुण रक्कम रु.65.09.700/- प्रदानाबाबतची देयके लेखा परीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाहीत. तरी शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक कखयो.2008/प्र.क्र.133/वै.शौ/पापु.21 दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 मधील अ.क्र.5 नुसार प्रकल्प खर्चाच्या व्यतिरिक्त 15 टक्के रक्कम अशासकीय संस्थांना त्यांचा कामाचा मोबदला म्हणुन देणेबाबत निर्देश आहे. त्यानुसार अशासकीय संस्थाना त्यांच्या कामाच्या मोबदल्यापोटी अदा केलेल्या रक्कमेचा तपशिल उपलब्ध न झाल्यामुळे सदर खर्च शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणात झाल्याची खात्री करता आली नाही.सदर रक्कम रु. 65,09,700/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. शासन निर्णय दिनांक 23 ऑक्टोबर 2008 मधील अ.क्र.2 नुसार शासनाने विहीत केलेल्या भाग.1 व भाग.2 मध्ये लाथार्थ्यांचे Bio-Matric Card ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार 14466 लाभार्थ्यांचे कार्ड ठेवण्यात आलेबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.त्यामुळे लाथार्थी निवड उचित मार्गाने केल्याबाबत खात्री करता आली नाही.

4. शासन निर्णय दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 मधील अ.क्र.3 नुसार या कार्यक्रमांतर्गत दोन खड्डयांची (TWO PIT POUR FLUSH) अथवा स्थानिक भौगोलिक परिस्थि तीस अनुरुप पध्दतीने शौचालय बांधणेबाबत शासन निर्देश आहेत. त्यानुसार दोन खड्डयांची व स्थानिक भौगौलिक परिस्थिअतीस अनुरुप पध्दतीने किती शौचालयांचे बांधकाम करण्यात आले याचा तपशिल उपलब्ध झाला नाही.

5. सदर कामासाठी अंदाजपत्रक तयार करतांना सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार रु.10064/- अधिक 5 टक्के मनपा चार्जेस रु.1408/- असे एकुण रु. 11472/- चे अंदाज करण्यात आले असून त्यानुसार प्रस्ताव तयार करुन शासनांस सादर करण्यात आलेला आहे. केंद्रशासनाने सदर प्रस्तावास दिनांक 4.5.2011 नुसार 14466 वैयक्तीक शौचालयाच्या रु.1667.61 लाखाच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. असे असतांना पुन:श्च 2011-12 च्या दरसूचीनुसार प्रती शौचालय रु.14470/- चे अंदाज केलेले आहे. त्यामुळे रक्कम रु.2998/- प्रमाणे प्रकल्प खर्चात रक्कम रु.4,33,69,068/- इतकी वाढ शासन मान्यते शिवाय झालेली आहे.सदर रक्कम रु.4,33,69,068/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

6. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 10 सप्टेंबर 2008 व दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 नुसार अशासकीय संस्थानी लाभार्थी निवडीच्या वेळी लाभार्थ्यांनी करावयाच्या खर्चाची रक्कम गोळा करुन ती मनपा कडे जमा करणेबाबत आहेत. त्यानुसार कार्यवाही न करता दिनांक 2.1.2012 रोजी च्या स्थायी समितीच्या मान्यतेनुसार मक्तेदाराने लाभार्थी हिस्स्याची रक्कम लाभार्थ्यांकडुन परस्पर घेणेबाबत मान्यता

दिलेली आहे. त्यामुळे मक्तेदांनी लाथार्थ्यांकडुन किती रक्कम गोळा केली याबाबत खात्री करता आली नाही. तसेच शासनाचे आदेशाचे पालन न करता लाभार्थ्यांच्या हिस्स्याची रक्कम अशासकीय संस्थानी परस्पर घेण्याबाबत परवानगी दिली आहे. त्यामुळे शासन निर्णयातील तरतुदींचे उल्लंघन झाले आहे.

7. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 10 सप्टेंबर 2008 व दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 नुसार मनपा कार्यक्षेत्रातील आर्थि क दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना शौचालये बांधुन देणेबाबत योजना असतांना मनपा,सोलापुर यांनी दिनांक 25.7.2007 च्या स्थानिक वृत्तपत्रातुन ज्या लाभार्थ्यांना स्वत:हुन वैयक्तीक शौचालय बांधावयाचे असेल त्यांना मनपा कडुन या योजनेचे रु.9000/- प्रती लाभार्थी अनुदान वितरीत करणेबाबत जाहीर प्रसिध्दीकरण देण्यात आलेले आहेत. उपलब्ध दस्तऐवजांनुसार 2012-13 अखेर 4786 लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय बांधण्यापोटी रु.9000/- प्रमाणे रक्कम रु. 4,30,74,000/- अदा केली आहे. सदर मुद्दयाबाबत खुलासा होईपर्यंत रक्कम रु. 4,30,74,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

8. मक्तेदारास 2012-13 मध्ये रक्कम रु.4,57,48,325/- इतके प्रदान केले आहे. सदर प्रदानाची प्रमाणके पडताळणी केली असता उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रमांक बीसीए.2009/प्र.क्र.108/कामगार.6 दिनांक 17.6.2000 नुसार 1 टक्के प्रमाणे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.4,57,483/- तसेच कंत्राटदाराकडुन मुल्यवर्धीत कराची 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 9,14,966/- ची वसुली करण्यात आलेली नाही. सदर रक्कम रु. 13,72,449/- वसुलपात्र आहे.

9. निवीदा अटी व शर्तीनुसार मक्तेदाराच्या बिलातुन 2 टक्के प्रमाणे सुरक्षा अनामत कपात करणे आवश्यक असतांना रक्कम रु.9,14,966/- ची वसुली करण्यात आलेली नाही. सदर रक्कम रु. 9,14,966/- वसुलपात्र आहे.

10. 2012-13 अखेर 4786 लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय बांधणेसाठी रु.9000/- प्रमाणे 4,30,74,000/- चे प्रदान करण्यात आलेले आहे. सदर कामासाठी मक्तेदाराची निवड केलेली असतांना लाभार्थ्यांस रु 9000/- प्रमाणे थेट लाभ दिल्याने आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 सी नुसार सदर रक्कमेवरील 2 टक्के प्रमाणे रक्कम रु.8,61,480/- चे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर रक्कम रु. 8,61,480/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

11. मक्तेदाराचे बिल प्रदानापुर्वी विभागीय अधिकारी व सहाय्यक अभियंता यांनी कामाची 20 टक्के तांत्रिक तपासणी करणेबाबत आदेश असतांना त्याचे पालन न करता 2012-13 मध्ये मक्तेदारांना रक्कम रु.4,57,48,325/- चे नियमबाहय प्रदान करण्यात आलेले आहे.सदर रक्कम रु. 4,57,48,328//- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

12. निवीदेतील मक्तेदाराच्या सर्वसाधारण अटी व शर्ती मधील अट क्र.24 नुसार कामाचे थर्डपार्टी ऑडीट मक्तेदाराने स्वखर्चाने करणे आवश्यक होते. परंतु फेज 1 ते 6 मधील मक्तेदारांनी कामाचे थर्ड पार्टी ऑडीट केल्याबाबतचे दस्त्ऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

13. फेज 1 ते 6 साठी दिनांक 18.7.2011 दै.सकाळ, दै.लोकमत(सोलापुर आवृत्ती) व एक राज्यस्तरीय वर्तमानपत्रातुन जाहीरात दिल्याबाबत नमुद आहे. त्यानुसार निवीदा स्विकृती कालावधी दिनांक 3.8.2011 पर्यंत (17 दिवस) ठेवण्यात आलेला आहे. तसेच सदर निवीदेस अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे पुन:श्च दै.लोकमत या वृत्त्पत्रातून दिनांक 24.8.2011 रोजी जाहीरात दिलेली असून निवीदा स्विकृती दिनांक 3.9.2011 आहे. सदर कामासाठी 11 दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक सीएटी.10/2006/प्र.क्र.133/इमारती.2 दिनांक 2 नोव्हेंबर 2006 नुसार 50 लाखा पेक्षा जास्त किंमतींच्या कामांच्या निवींदासाठी प्रथम सूचना 25 दिवस व व्दितीय सूचना 15 दिवस कालावधी

ठेवणेबाबत आदेश आहेत. सदर नियमांचे पालन न करता निवीदा कालावधी कमी केल्याने स्पर्धात्म्क निवीदांचा लाभ मनपास झाला नाही. तसेच प्रथम सूचनेवेळी किती मक्तेदारांच्या निवीदा प्राप्त झाल्या, तसेच सदर निवीदा व्दितीय सूचनेच्या वेळी विचारात घेतल्या किंवा कसे याबाबतचे दस्त्ऐवज नस्तीत उपलब्ध झाले नाही.

14. फेज 2 साठी मे.दिपक जे.भिवरे व मे.बी.आर.सुकळे या दोन मक्तेदारांच्या निवीदा प्राप्त् झालेल्या आहेत. त्याबाबत मक्तेदारांनी निवीदेसोबत सादर केलेले दस्त्ऐवजाची पडताळणी करता खालील अपूर्तता आढळून आल्यात.

अ) मे.दिपक जे.भिवरे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे 20 कोटी पर्यंतचे कामाबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र नसतांना मे.भिवरे यांना पात्र ठरविण्यात आलेले आहे.

ब) मे.दिपक जे.भिवरे यांनी निवीदेसोबत जोडलेले मुंबई दुकाने व संस्था यांचेकडील संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र दिनांक 31.3.2011 पर्यंतचे वैध आहे. निवीदा कालावधी दिनांक 24.8.2011 असल्यामुळे त्यांचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र अवैध असतांना त्यांना पात्र ठरविण्यात आलेले आहे.

क) निवीदा जाहीरातीनुसार अशा स्वरुपाचे करण्यात आलेल्या कामाचा अनुभव दाखला जोडणेबाबत अट आहे. मे.दिपक जे.भिवरे यांनी पाणीपुरवठा विभागाकडील कामे केल्याबाबत अनुभवाचा दाखला जोडला आहे. त्यांचेकडे शौचालये बांधकामाबाबत अनुभवाचा दाखला नसतांना पात्र ठरविले आहे.

ड) निवीदेतील अटी व शर्तीनुसार मक्तेदार मे.दिपक जे भिवरे यांनी रक्कम रु. 312000/- सुरक्षा अनामत भरली असून उर्वरित सुरक्षा अनामत प्रदान करण्यांत येणा-या धावते देयकातुन 2 टक्के प्रमाणे वसुल करणे आवश्यक होते. सदर कामाचे मोजमाप पुस्तकात कामाच्या नोंदी न घेतल्यामुळे तसेच लाभार्थ्यांचे रु.9000/- प्रति शौचालय प्रमाणे प्रदान मक्तेदारास केले आहे. रक्कम रु. 3,11,400/-इतक्या सुरक्षा अनामत रक्कमेची वसुली मक्तेदाराकडुन करण्यात आलेली नाही. सदर रक्कम रु. 3,11,400/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

इ) कार्यादेश क्र.नअ/गवसु.183 दिनांक 15.5.2012 नुसार मक्तेदार मे.दिपक जे.भिवरे यांना कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मक्तेदाराने फेज 2 मधील 1548 शौचालये दिनांक 14.8.2012 पर्यंत (90 दिवसांत) पुर्ण करणे आवश्यक होते. सदर कामाबाबतचे मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार मक्तेदाराने विहीत कालावधीत किती शौचालयाचे काम केले तसेच विलंबाने केलेल्या कामाबाबत 2 टक्के दराने दंडाची वसुली केल्याबाबत दस्तऐवज नस्तीत आढळुन आले नाही.

15. फेज 5 साठी हर्षल सामाजिक सेवा संस्था,मुंबई व नवभारत सामाजिक प्रतिष्ठान या दोन मक्तेदारांच्या निवीदा प्राप्त् झाल्या असून त्याबाबतचे दस्तऐवज पडताळणी करता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आल्या आहेत.

अ) हर्षल सामाजिक संस्था यांची नोंदणी धर्मदाय आयुक्त यांचेकडे केलेली असुन संस्थेचे संस्थापन समयलेख नुसार संस्थेचे कामकाज सामाजिक स्वरुपाचे आहे. तसेच संस्थेने अनुभवाबाबत जोडलेले दस्त्ऐवज पडताळणी करता संस्थेने इतर संस्थाना कामगारांचा पुरवठा केलेबाबत अनुभवाचे दस्तऐवज जोडलेले आहे. निवीदा जाहीरातीनुसार अशा स्वरुपाचे करण्यात आलेल्या कामाचा अनुभव दाखला जोडणेबाबत अट असतांना सदर संस्थेकडे बांधकामाबाबत कोणताही अनुभव नसतांना दर निश्चितीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

ब) नवभारत सामाजिक संस्था यांची नोंदणी देखील धर्मदाय आयुक्त यांचेकडे केलेली असून त्यांचे कामकाज सामाजिक स्वरुपाचे आहे. संस्थेने अनुभवाबाबत सोलापुर मनपा व इतर मनपा,नगरपरीषदां मध्ये वैयक्तीक

शौचालय अंतर्गत लाभार्थी निवडीचे काम केलेबाबत अनुभवाचे दस्त्ऐवज जोडले आहे. सदर संस्था मक्तेदार म्हणून शासन नोंदणीकृत नाही. त्यामुळे त्यांच्या कामाच्या क्षमते बाबत आढावा घेता येत नाही, परंतु मनपाच्या टेंडर बुकलेट मधील पृष्ठ क्रमांक 1 वरील अट क्रमांक 1 नुसार सदर संस्थेस कामाचा अनुभव नसल्याने त्यांचेकडून 20% इतकी सॉल्व्हन्सी घेवून सदर योजनेतील काम देणे आवश्यक होते. फेज 1 व 5 मधील एकूण रक्कम रु.615.67 लक्ष कामाच्या 20% रक्कम रु.1,23,13,400 चे सॉल्व्हन्सी सर्टीफिकेट न घेताच कामाचे आदेश देण्यात आले आहे.

क) निवीदेतील अटी व शर्तीनुसार मक्तेदार नवभारत सामाजिक प्रतिष्ठान यांनी रक्कम रु. 222000/- सुरक्षा अनामत भरली असून उर्वरित सुरक्षा अनामत प्रदान करण्यांत येणा-या धावते देयकातुन 2 टक्के प्रमाणे वसुल करणे आवश्यक होते. सदर कामाचे मोजमाप पुस्तकात कामाच्या नोंदी न घेतल्यामुळे तसेच लाभार्थ्यांचे रु.9000/- प्रति शौचालय प्रमाणे प्रदान मक्तेदारास केले आहे. त्यामुळे रक्कम रु. 2,20,340/-इतक्या सुरक्षा अनामत रक्कमेची वसुली मक्तेदाराकडुन करण्यात आलेली नाही. सदर रक्कम रु. 2,20,340/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

ड) कार्यादेश क्र.नअ/गवसु.961 दिनांक 24.2.2012 नुसार मक्तेदार नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण यांना कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मक्तेदाराने फेज 5 मधील 1095 शौचालये दिनांक 23.5.2012 पर्यंत (90 दिवसांत) पुर्ण करणे आवश्यक होते. सदर कामाबाबतचे मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार मक्तेदाराने विहीत कालावधीत किती शौचालयाचे काम केले तसेच विलंबाने केलेल्या कामाबाबत 2 टक्के दराने दंडाची वसुली केल्याबाबत दस्त्ऐवज नस्तीत आढळुन आले नाही..

इ) मक्तेदारास दिलेल्या कार्यादेश क्र.नअ/गवसु.961 दिनांक 24.2.2012 नुसार फेज 6 मधील 1095 शौचालये बांधणेबाबतच्या सुचना टप्प्या-टप्प्याने देण्यात येईल असे नमुद आहे. त्यानुसार मक्तेदारास दिलेल्या आदेशाच्या प्रती नस्तीत उपलब्ध झाल्या नाहीत.

फ) दिनांक 31.3.2013 अखेर फेज-5 मधील 1095 शौचालयांपैकी किती वैयक्तीक शौचालये मक्तेदारामार्फत बांधण्यात आली व किती शौचालये लाभार्थ्यांनी स्वत: बांधल्यामुळे त्यांना रु.9000/- चे अनुदान दिले व किती शौचालयाचे काम अपुर्ण आहे याबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेला नाही.

16. फेज 3 साठी अथर्व एन्टरप्रायजेस, आर्या एन्टरप्रायजेस व अजय कन्स्ट्रक्शन या तीन मक्तेदारांच्या निवीदा प्राप्त् झाल्या असुन अथर्व एन्टरप्रायजेस यांनी निवीदा अपात्र ठरवुन उर्वरित आर्या एन्टरप्रायजेस व अजय कन्स्ट्रक्शन या मक्तेदारांच्या निवीदा मान्य् करण्यात आलेल्या आहे. त्याबाबत मक्तेदारांनी निवीदेसोबत जोडलेल्या दस्तऐवजाची पडताळणी करता खालील प्रमाणे अपुर्तता आढळुन आल्या आहेत.

अ) अथर्व एन्टरप्रायजेस यांनी निवीदा जाहीरातीनुसार संस्था नोंदणी प्रमाणपत्र,अनुभवाचे प्रमाणपत्र, कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचा दाखला, व्हॅट व विक्रीकर प्रमाणपत्र, आयकर भरणेबाबत चे दस्त्ऐवज निवीदे सोबत जोडलेले नाहीत.

ब) सदर काम आर्या एन्टरप्रायजेस व अजय कन्स्ट्रक्शन या दोन मक्तेदारांना विभागुन देण्यात आलेले आहे.

क) अजय कन्स्ट्रक्शन यांनी विहीत मुदतीत काम सुरु न केल्यामुळे त्यांचे कार्यादेश क्र. नअ/गवसु/821 दिनांक 3.1.2012 हे दिनांक 17.12.2012 च्या टिप्पणीनुसार रद्द करुन मक्तेदारास काळया यादीत टाकणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच श्री.मनिष गांगजी,सोलापुर या मक्तेदारास कार्यादेश क्र. नअ/गवसु1062 दिनांक 2.1.2013 नुसार प्रभाग 28 साठीचे वैयक्तीक शौचालय बांधणेबाबतचे काम देण्यात आलेले आहे. परंतु त्याबाबत श्री.मनिष गांगजी यांचेशी कामाचा करारनामा करण्यात आलेला नाही.

ड) सदर कामाचा करारनामा  दिनांक 3.1.2012 नुसार आर्या एन्टरप्रायजेस यांचेशी रक्कम रु. 12000/-  च्या मुद्रांकपेपरवर तसेच दिनांक 2.1.2012 नुसार अजय कन्स्ट्रक्शन यांचेशी रु. 17000/-  च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आलेला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 नुसार कामाच्या किंमती नुसार रक्कम रु. 34200/-  च्या मुद्रांक पेपरवर करारनामा न करता दोन्ही मक्तेदारांशी रु. 29000/-  च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केलेला आहे. तसेच अजय कन्स्ट्रक्शन यांनी विहीत वेळेत काम न सुरु केल्यामुळे त्यांचा करारनाम अवैध झाला असुन नवीन मक्तेदार श्री.मनिष गांगजी यांचेशी कोणताही करारनामा न करता त्यांना कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहे.  करारनामा न केल्याने मुद्रांक शुल्कापोटी  रक्कम रु. 22200/-  इतक्या रक्कमेचे शासनाचे नुकसान झाले आहे.सदर रक्कम रु. 22,200/-  वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.
इ) अजय कन्स्ट्रक्शन यांनी निवीदा जाहीरातीतील अटी नुसार समान कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र,  व्हॅट व विक्रीकर नोंदणीप्रमाणपत्र,  निवीदेच्या दिनांकापर्यंत व्हॅट,विक्रीकर व आयकर भरणाबाबत दस्त्ऐवज निवीदेसोबत जोडलेले नसतांना त्यांना पात्र ठरवुन कार्यादेश देण्यात आलेले आहेत.
फ) सदर कामाचे दोन भाग पाडुन आर्या एन्टरप्रायजेस व अजय कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात आलेले असून त्यांचेकडुन प्रत्येकी रक्कम रु. 704000/-  सुरक्षा अनामत घेण्यात आलेली आहे. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार धावत्या देयकांतुन 2 टक्के प्रमाणे रक्कम रु. 703640/-  ची वसुली करण्यात आलेली नाही. सदर रक्कम रु. 7,03,640/-  वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.
ग) कार्यादेश क्र.नअ/गवसु.821 दिनांक 3.1.2012 नुसार मक्तेदार अजय कन्स्ट्रशन व आर्या एन्टरप्रायजेस यांना कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मक्तेदाराने फेज 3 मधील 3511 शौचालये दिनांक 2.4.2012 पर्यंत (90 दिवसांत) पुर्ण करणे आवश्यक होते. सदर कामाबाबतचे मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार मक्तेदाराने विहीत कालावधीत किती शौचालयाचे काम केले तसेच विलंबाने केलेल्या कामाबाबत  2 टक्के दराने दंडाची वसुली केल्याबाबत दस्त्ऐवज नस्तीत उपलब्ध झाले नाही..

17. फेज 6 साठी श्रध्दा कन्स्ट्रक्शन व तिरुपती कन्स्ट्रक्शन या दोन मक्तेदारांच्या निवीदा प्राप्त झाल्या असुन निवीदे सोबतच्या दस्त्ऐवजाचे परीक्षण करता खालील अनियमितता झाल्याचे आढळून आहे.
अ) तिरुपती कन्स्ट्रक्शन यांनी निवीदा जाहीरातीनुसार समान कामाच्या अनुभवाबाबतचे दस्तऐवज जोडलेले नाहीत.
ब) श्रध्दा कन्स्ट्रक्शन यांनी मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1841 नुसार संस्थेचा नोंदणी दाखला जोडलेला असुन तो दिनांक 31.3.2011 पर्यत वैध आहे. निवीदा कालावधी ऑगष्ट 2011 साठी सदर दाखला अवैध असतांना त्यांना पात्र ठरविण्यात आलेले आहे.
क) सदर कामाबाबत श्रध्दा कन्सट्रक्शन यांचेशी केलेला करारनामा व कार्यादेश नस्तीत उपलब्ध झाले नाही.
ड) निवीदेतील अटी व शर्तीनुसार मक्तेदार श्रध्दा कन्सट्रक्शन यांनी रक्कम रु. 264000-  सुरक्षा अनामत भरली असून उर्वरित सुरक्षा अनामत प्रदान करण्यांत येणा-या धावते देयकातुन 2 टक्के प्रमाणे वसुल करणे आवश्य्क होते. सदर कामाचे मोजमाप पुस्तकात कामाच्या नोंदी न घेतल्यामुळे तसेच लाभार्थ्यांचे रु.9000/- प्रति शौचालय प्रमाणे प्रदान मक्तेदारास केले आहे. त्यामुळे रक्कम रु. 2,63,580  /-इतक्या सुरक्षा अनामत रक्कमेची वसुली मक्तेदाराकडुन करण्यात आलेली नाही.सदर रक्कम रु. 2,63,580/-  वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

18. फेज-1 साठी नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण यांची एकमेव निवीदा प्राप्त् असुन त्याचीं निवीदा मान्य् करण्यात आलेली आहे. त्याबाबत निवीदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता झाल्याचे

आढळून आहे.

अ) सदर संस्थेची नोंदणी धर्मदाय आयुक्त् यांचेकडे सामाजिक संस्था म्हणून करण्यात आलेली असून त्यांचेकडे बांधकामाबाबतचे कोणतेही लायसन्स नसुन बांधमाकासाठी कोणतेही तांत्रिक/अतांत्रिक मनुष्यबळ असल्याचा पुरावा नस्ती सोबत उपलब्ध झाला नाही.

ब) निवीदा जाहीरात अटीनुसार संस्थेने सदर कामासाठी शौचालय बांधणेबाबत कामाच्या पुर्व अनुभवाच्या अटीचे पालन करण्यात आलेले नाही.

क) निवीदेतील अटी व शर्तीनुसार मक्तेदार नवजीवन सामाजिक प्रतिष्ठान यांनी रक्कम रु. 1012000/- सुरक्षा अनामत भरली असून उर्वरित सुरक्षा अनामत प्रदान करण्यांत येणा-या धावते देयकातुन 2 टक्के प्रमाणे वसुल करणे आवश्यक होते. सदर कामाचे मोजमाप पुस्तकात कामाच्या नोंदी न घेतल्यामुळे तसेच लाभार्थ्यांचे रु.9000/- प्रति शौचालय प्रमाणे प्रदान मक्तेदारास केले आहे. त्यामुळे रक्कम रु. 10,11,000/-इतक्या सुरक्षा अनामत रक्कमेची वसुली मक्तेदाराकडुन करण्यात आलेली नाही. सदर रक्कम रु. 10,11,000/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

ड) मक्तेदारास दिलेल्या कार्यादेश क्र.नअ/गवसु.960 दिनांक 24.2.2012 नुसार फेज 6 मधील 5000 शौचालये बांधणेबाबतच्या सुचना टप्प्या-टप्प्याने देण्यात येईल असे नमुद आहे. त्यानुसार मक्तेदारास दिलेल्या आदेशाच्या प्रती नस्तीत उपलब्ध झाल्या नाहीत.

इ) सदर कामाचा करारनामा दिनांक 3.1.2012 नुसार नवभारत सामाजिक प्रतिष्ठाण यांचेशी रक्कम रु. 20000/- च्या मुद्रांकपेपरवर करण्यात आलेला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 नुसार कामाच्या किंमती नुसार रक्कम रु. 49700/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा न केल्यामुळे रक्कम रु. 29700/- इतके शासनाचे नुकसान झालेले आहे. सदर रक्कम रु. 29700/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

19) फेज-4 साठी केलेल्या निवीदा प्रक्रीयेबाबतची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही.

20) नवजीवन सामाजिक प्रतिष्ठाण यांनी लाभार्थी निवडबाबतचा DPR व मोजमाप पुस्तक क्रमांक 66 व 24 लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले आहे. त्याची पडताळणी करता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

अ) निवीदेतील सर्वसाधारण अटी व शर्ती मधील अट क्र. 7 नुसार कामाची मोजमापे पी.डब्यु.डी.हँडबुकमध्ये उल्लेख केलेल्या किंवा सरकारी बी.ॲन्ड सी खात्यात ज्या पध्दती आहेत त्याप्रमाणे घेतली जातील. त्यानुसार प्रत्येक कामाच्या नोंदी या मोजमाप पुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु लेखापरीक्षणास नवजीवन सामाजिक प्रतिष्ठान यांचे कडील मोजमाप पुस्तक क्र.24 व 66 लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले असून सदर मोजमाप पुस्तकात लाभार्थ्यांच्या बांधलेल्या वैयक्तीक शौचालय बांधकामाच्या नोंदी न घेता लाभार्थ्यांसाठी बांधलेल्या शौचालयापोटी रक्कम रु.9000/- प्रती लाभार्थी प्रदान केल्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. तसेच अट क्रमांक 19 नुसार मक्तेदाराने निवीदेतील स्पेसिफिकेशन नुसार शौचालयाचे बांधकाम केले किंवा नाही, त्यासाठी आलेल्या खर्चाची पडताळणी करता आली नाही.

ब) संस्थेच्या DPR ची पडताळणी करता सोबत जोडलेल्या परिशिष्ट - 3(ए) प्रमाणे 26 लाभार्थ्यापैकी अ.क्र.23 वरील लाभार्थी वगळता 25 लाभार्थ्यांची नांवे सलग दोन क्रमांकावर तसेच अ.क्र.23 वरील लाभार्थ्यांचे तीन ठिकाणी नोंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य प्रकारे न करता डीपीआर तयार करण्यात आलेला असून त्यामुळे चुकीच्या लाभार्थ्याची संख्या दर्शवुन त्यास केंद्रशासनाची मान्यता घेण्यात आलेली आहे. तरी 1 ते 6 फेज मधील दुबार लाभार्थ्यांच्या नांवाबाबत सखोल तपासणी करुन त्यांना दुबार लाभ दिला असल्यास रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे.

क) फेज 1 मधील मोजमाप पुस्तकातील लाभार्थ्यांना रक्कम अदा केल्याबाबतच्या नोंदीची तपासणी केली असता सोबतच्या परिशिष्ट - 3(बी) नुसार 17 लाभार्थ्याच्या नांवाने मक्तेदारास दुबार प्रदान करण्यात आलेले आहे. सदरच्या अतिप्रदानाची रक्कम रु.153000/- मक्तेदाराकडुन वसुल होणे आवश्यक आहे. तसेच फेज 1 ते 6 मधील सर्व लाभार्थ्यांचे नांवाने मक्तेदारास प्रदान करतांना दुबार प्रदान झाले नसल्याची पडताळणी होणे आवश्यक आहे.सदर रक्कम रु. 153000/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

ड) सोबतच्या परिशिष्ट - 3(सी) नुसार नवजीवन सामाजिक प्रतिष्ठान,मुंबई यांनी मोजमाप पुस्तक क्र.24 5 लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय बांधलेबाबत नवजीवन सामाजिक प्रतिष्ठान यांना रक्कम रु. 45000/- चे प्रदान करण्यात आलेले असून लाभार्थ्यांना देखील त्यांनी स्वत: शौचालय बांधलेबाबत पुरावे दिल्यानुसार मनपाकडुन सदर लाभार्थ्यांना रक्कम रु.9000/- प्रमाणे रु.45000/- चे दुबार प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे अतिरिक्त प्रदानाची रक्कम रु.45000/- संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे. तसेच फेज 1 ते 6 मधील सर्व लाभार्थ्यांचे नांवाने मक्तेदारास प्रदान व लाभार्थ्यास वैयक्तीक प्रदान अशा दोन्ही पध्दतीने झालेबाबत सखोल तपासणी करणे आवश्यक आहे.सदर रक्कम रु. 45000/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

इ) लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नवजीवन सामाजिक प्रतिष्ठान यांचे मोजमाप पुस्तक क्र.66 व 24 व डीपीआरची पडताळणी करता सोबतच्या परिशिष्ट - 3(डी) नुसार 54 लाभार्थ्याचे डीपीआर मधील नांव व मोजमाप पुस्तकातील प्रदानानुसार नांव यामध्ये तफावत आढळुन आली. यावरुन मुळ डीपीआर नुसार मंजूर असलेल्या लाभार्थ्यास वैयक्तीक शौचालयाचा लाभ न देता त्या लाभार्थ्याचा डीपीआर क्रमांक वापरुन दुस-या लाभार्थ्यास लाभ देण्यात आल्याचे दिसून येते. सदर अनियमिततेबाबत तसेच फेज 1 ते 6 मधील मक्तेदारांना लाभार्थ्यासाठी बांधलेल्या वैयक्तीक शौचालयापोटी प्रदान केल्यानुसार सर्व लाभार्थ्यांना डीपीआर नुसारच लाभ देण्यात आलेला आहे याबाबत सखोल तपासणी होणे आवश्यक आहे.

फ) लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेल्या नवजीवन सामाजिक प्रतिष्ठान यांनी बांधलेल्या शौचालयाबाबतचे मोजमाप पुस्तक क्रमांक 66 व 24 मध्ये परिशिष्ट - 3(ई) प्रमाणे इतर मक्तेदारांनी बांधलेल्या शौचालयाबाबतचे प्रदान करण्यात आलेले आहे. यावरुन इतर मक्तेदारांनी वैयक्तीक शौचालय बांधलेले असुन नवजीवन प्रतिष्ठान यांना त्यांचे कामाव्यतिरिक्त प्रदान करण्यात आलेले आहेत.

सोबतच्या परिशिष्ट - 3(ई) प्रमाणे 240 लाभार्थ्यांचे वैयक्तीक शौचालयाचे काम फेज 2 मधील असुन सदर कामाच्या प्रदानाबाबतच्या नोंदी नवजीवन सामाजिक प्रतिष्ठान यांनी फेज 1 मधील मोजमाप पुस्तक क्र. 66 मध्ये घेतलेल्या आहेत. नवभारत सामाजिक संस्था यांना केवळ फेज 1 व फेज 5 मधील लाभार्थ्यांचे शौचालय बांधून देण्याचे आदेश असतांना फेज क्र.2 मधील कामे करण्याचे आदेश नसतांना नियमबाहयपणे प्रदान केले आहे.

21. शासन परिपत्रक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक कखयो2008/ प्र.क्र.133/वै.शौ./पापु.21 दिनांक 23 ऑक्टोंबर 2008 नुसार लाभार्थ्यांची निवड करुन मनपाने लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालये बांधुन देणेबाबत शासनाचे आदेश आहेत. दिनांक 25.7.2011 रोजी स्थानिक वृत्तपत्रातुन ज्या लाभार्थ्यांना स्वतःहुन वैयक्तीक शौचालये बांधायचे असेल त्यांनी महानगर पालिकेकडुन या योजनेचे रु. 9000/- प्रति लाभार्थी अनुदान वितरीत करणेबाबत जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात आलेले आहेत. त्यानुसार एकुण 14466 लाभार्थ्यांपैकी लेखापरीक्षण कालावधी पर्यंत 4786 लाभार्थ्यांनी वैयक्तीक शौचालय बांधण्यापोटी रु. 9000/- अदा करण्यात आलेले आहेत. सदर रक्कम अदा करण्यापुर्वी महानगरपालिकेच्या आरोग्य निरिक्षकांमार्फत लाभार्थ्यांनी बांधलेल्या शौचालयाचे फोटो व अर्ज याबाबत तपासणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार 98 वार्डांपैकी 20 वार्डातील आरोग्य निरिक्षकांनी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले तपासणी अर्ज व वैयक्तीक

शौचालय बांधकामाबाबतचे फोटो व इतर दस्तऐवजाची पडताळणी करता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

अ) वार्ड क्रमांक 34,35,36,71,97,98,77,78,,49,63,64,94,17,47,48,85,86,80,81,92 या 20 वार्डाचे वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबतचे तपासणी अर्ज,फोटो व दस्त्ऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले असून उर्वरीत 1,2,3,4,5,6,7,8,10,11,12,13,14,15,18,19,20,36,40,44,46,53,68, 69, 33,27,75,76,29,30,31,24,25,26,37,38,59,73,74,55,56,57,58,32,87,88,89,62,64,65,69,72,79, 81,91,93,95 या 56 वार्डातील दस्त्ऐवजांची मागणी करुन देखील रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

ब) लाभार्थ्यांनी वैयक्तीक शौचालय स्वत: बांधणेबाबत उपलब्ध करुन दिलेल्या तपासणी अर्ज,फोटो व दस्त्ऐवजाची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अपुर्तता आढळुन आलेल्या आहेत.

सोबतच्या परिशिष्ट् - 3(एफ) नुसार 82 लाभार्थ्यांना शौचालयाचे कामे अपुर्ण असतांना वा दस्तऐवजाची पुर्तता केलेली नसतांना रक्कम रु.9000/- प्रमाणे लाभ देण्यात आलेला आहे. तरी 82 लाभार्थ्यांना प्रदान केलेली रक्कम रु. 7,38,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

22) 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खालील मक्तेदारांना खालील प्रमाणे प्रदान केले आहे. देयकाचे रक्कमेतून 5% व्हॅट वसूल करणे आवश्यक असतांना सदरची रक्कम वसूल न करता प्रदान केले आहे.

| अ. क्र. | मक्तेदाराचे नांव | प्रदानाची एकूण रक्कम रुपये | वसूल न करण्यात आलेली व्हॅटची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | दिपक भिवरे | 1517040 | 75852 |
| 2 | मनिष गांगजी | 1093680 | 54684 |
| 3 | नवभारत सामाजिक प्रतिष्ठान | 16326065 | 816303 |
| 4 | भारत कन्स्ट्रकशन | 10778040 | 538902 |
| एकूण रक्कम | | | 1485741 |

सदरची रक्कम रु. 14,85,741/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. .

23. सोलापुर मनपाचे 2011-12 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणात वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबत घेतलेले आक्षेप कायम असून 2012-13 आर्थिक वर्षातील उपलब्ध करुन दिलेल्या नस्त्या व दस्तऐवजांचे लेखापरीक्षणानुसार वरील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

वरील प्रमाणे 1 ते 22 मुद्दयांबाबत रक्कम रु.14,09,24,837/- आक्षेपाधीन व रक्कम रु.65,75,855/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे..

वसुलपात्र रक्कम :-

मुल्यवर्धित कर रक्कम रु. 13,72,449/-

आयकर रक्कम रु. 8,61,480/-

मुद्रांक शुल्क् रक्कम रु. 51,900/-

सुरक्षा अनामत रक्कम रु. 34,24,926/-

अतिप्रदान रक्कम रु. 1,98,000/-

--------------------------------------------

एकुण रक्कम रु.65,75,855/-

## *83 मनपा परिसरातील कचरा गोळा करून त्याची वाहतूक करणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : कचरा वाहतूक शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 38500.00/-

***कचरा गोळा करणे, वाहतूक करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदामध्ये निविदाधारकांनी तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची पूर्तता केली नसताना दराचा लिफाफा उघडण्यात आला. मक्तेदाराकडून कमी अनामत घेण्यात आली. मक्तेदारासोबत कामाचा करारनामा करतांना कमी मुद्रांक शुल्क रक्कमेवर करारनामा केला.***

सोलापूर महानगरपालिका परिसरात उत्पन्न होणाऱ्या एकून कचऱ्याची विल्हेवाट करणेसाठी कचरा गोळा करून सदर कचऱ्याची डम्पिंग डेपो पर्यंत वाहतूक करणेबाबत प्राप्त करून दिलेल्या निविदा नस्तीचे लेखा परीक्षण केले असता, लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या खालील अनियमितता बाबत आरोग्य विभागास अर्धसमास पत्र क्र.70 दि.1/07/2015 अन्वये कळविले असता, विभागाने लेखापरीक्षणाचे अंतिम दिनांकापर्यंत उत्तर दिले नाही, त्यामुळे खालील आक्षेप अंतिम करण्यात येत आहेत.

1. आरोग्य विभागाने कचरा वाहतुकीसाठी प्रथम दि.11/12/2010 रोजी जाहीर प्रसिद्धीकरण केले. तसेच सदर जाहिरातीस प्रतिसाद मिळाला नसल्याने दि. 20/01/2011 रोजी प्रसिद्ध पुन्हा निविदा जाहिरात देण्यात आली तथापि त्याही निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दि. 8/04/2011 रोजी तिसऱ्या वेळेस निविदा प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार मे.ॲन्थोनी वेस्ट व मे.रॅमकी या दोन निविदाधारकांनी निविदा सादर केल्या. त्यामध्ये निविदाधारकांनी निविदे सोबत दिलेल्या अनुभवाच्या दाखल्यामध्ये प्रती दिन प्रती टन नेमका किती कचरा उचलला व त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली याबाबत उल्लेख नसल्याने तसेच मे.रॅमकी यांचे Tangiable networth दीड कोटी व Net Cash Accruals प्रती वर्षी रु.40 लाखाचा असल्याबाबत संबंधित सनदी लेखापालाचा दाखला जोडला नसल्याने सदर बाबीची दिनांक 28/02/11 पर्यंत पूर्तता करण्यासाठी निविदाधारकांना दिनांक 18/08/2011 चे पत्रान्वये सूचित केले. परंतु तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे अपूर्ण असतांना दिनांक 18/02/2011 रोजी दराचा लिफाफा उघडण्यात आल्याचे लिफाफ्यावरील नोंदीवरून आढळून आले. निविदाधारकांनी उक्त कागदपत्रांची विहित मुदतीत पूर्तता न केल्याने दिनांक 8/04/2011 रोजी फेरटेंडर

काढण्यास मान्यता दिली.

निविदा कार्यपध्तीच्या नियमानुसार निविदाधारकाने निविदेतील सर्व अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतरच दराचा लिफाफा उघडणे आवश्यक आहे. परंतु वरीलप्रमाणे निविदा धारकांनी विहित कागदपत्रांची पूर्तता केली नसताना दराचा लिफाफा उघडण्यात आला. त्यामुळे निविदा कार्यपद्धतीचे उल्लंघन झाले आहे. दराचा लिफाफा उघडल्यामुळे निविदा धारकांनी दिलेले दर जाहीर झाले, त्यामुळे 4 थे वेळेस प्रसिद्ध केलेल्या निविदा जाहिरातीच्या अनुषंगाने निविदाधारकाकडून त्यानुसार प्रती टन दर प्राप्त झाले . प्रथमतः प्राप्त झालेले निविदादराचे पाकीट उघडल्यामुळे निविदा कार्यपद्धतीचे उल्लंघन झाले.

2. निविदेतील अटीनुसार मक्तेदाराकडून निविदा किमतीच्या 2% रु.2.28 कोटी सुरक्षा ठेव (अनामत) घेणे आवश्यक असतांना रु.57000 अनामत घेतली आहे. म्हणजेच 22743000 कमी अनामत घेण्यात आली आहे.

3. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची 1 मधील तरतुदीनुसार करारनामा करतांना 10 लाखापर्यंतचे कामासाठी रु.100 व त्यापुढील प्रत्येक लाखासाठी रु.100 याप्रमाणे कमाल रु.5 लाख मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. मक्तेदारासोबत रु.114,30,39,315 इतक्या रक्कमेच्या कामाचा करारनामा रु.115000 चे मुद्रांकावर केला आहे. वरील नियमाप्रमाणे मुद्रांकाची रक्कम रु 1142139 होत असून रु.5 लाखाचे मुदांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु रु.115000 चे रक्कमेवर करारनामा केला आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे रु 385000 चे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी सदरची मुद्रांक शुल्काची रक्कम वसूल करून शासन जमा होणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.38500

DATVCSM6501 (Ref No : 45, Hmm No : 70)

## *84 आरोग्य विभागांतर्गत अँटीरॅबीज इंजेक्शन खरेदीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :ओषध खरेदी मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 649129.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 219271.00/-

***अँटीरॅबीज इंजेक्शन खरेदी बाबत शासन दरकरार केले असताना निविदा प्रसिध्द करून निविदेव्दारे खरेदी केली. त्यामुळे प्रती इंजेक्शन पोटी पुरवठादारास रु.101 प्रमाणे जादा दराने खरेदी रक्कम अदा करावी लागली. पुरवठादाराकडील डिलिव्हरी चलने, उपलब्ध झाली नाहीत. तसेच 2171 इंजेक्शनखरेदीची नोंद साठा नोंदवहीत***

***घेण्यात आली नाही.***

आरोग्य विभागांतर्गत औषधी भांडार विभागाने लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करून दिलेल्या 2012-13 मधील अँटीरॅबीज इंजेक्शन खरेदीची नस्ती तपासली असता, लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमितता बाबत आरोग्य विभागास अर्धसमास पत्र क्र.71, दि.1/07/2015 अन्वये कळविले असता, विभागाने त्यांचेकडील दि.14/08/15 रोजी दिलेला खुलासा विचारात घेता, लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.2011-12 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडील दर करार क्रमांक DMER/DPC/D&M/inj.anti-rabies/4483-4495/10, दि.30/12/2010 नुसार **दिनांक 28/12/2010 ते 28/12/2012** या कालावधीकरिता शासनाने भारत बायोरिक इंटरनॅशनल लिमिटेड कंपनी यांचे सोबत अँटीरॅबीज इंजेक्शन रु.198/-प्रति (Vial) प्रमाणे खरेदी बाबत दर करार केलेला असतांना व सदर दरकरार अस्तित्वात असताना आरोग्य अधिकारी महानगरपालिका सोलापूर यांनी अँटीरॅबीज इंजेक्शन खरेदी करिता दैनिक तरुण भारत मध्ये जाहिरात प्रसिद्ध करून निविदा दर मागविले. तीन निविदाधारकाकडून निविदा प्राप्त झाल्या. त्यामधील मे.विशाल एंटरप्राईजेस कोल्हापूर यांनी दिलेला दर रु.299/- प्रति (Vial) प्रमाणे मान्य करून मक्तेदारा सोबत दिनांक 21/12/2011 रोजी करारनामा केला. त्यानुसार 2012-13 आर्थिक वर्षामध्ये 24/10/2012 पर्यंत रु.299/-प्रमाणे 2171 Vial खरेदी केल्या आहेत. त्यानंतर आरोग्य अधिकारी यांचे दिनांक 14/12/12 रोजी मंजूर केलेल्या टिपण्णी नुसार मे.विशाल इंटरप्राईजेस कोल्हापूर यांचे दर जास्त असून गांधी मेडिकल बार्शी हे महाराष्ट्र शासनाचे भारत बायोरेक इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीसोबत केलेल्या अँटीरॅबीज इंजेक्शन रु.198/- प्रति व्हायल प्रमाणे पुरवठा करण्यास तयार असल्यामुळे मे. गांधी मेडिकल बार्शी यांचे कडून खरेदीस मान्यता दिली आहे.

शासनाचे दर करार अस्तित्वात असतांना एकाच कंपनीचे अँटीरॅबीज इंजेक्शन रु.299/- प्रति व्हायल या जास्त दराने खरेदी केल्यामुळे, 2171 व्हायल खरेदीपोटी रु.101 प्रती व्हायल प्रमाणे रु 219271/- चे महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे. सदरची रक्कम संबंधिताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

2.2012-13 या आर्थिक वर्षात खरेदी करण्यात आलेली अँटीरॅबीज इंजेक्शन एकूण 2171 Vial साठा नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच पुरवठादाराकडील डिलिव्हरी चलन, उत्पादक कंपनी कडील टेस्ट रिपोर्ट नस्ती सोबत आढळून आला नाही. त्यामुळे पुरवठादाराने पुरवठा केलेली अँटीरॅबीज इंजेक्शन मनपाला प्राप्त झाल्याची तसेच योग्य दर्जाची असल्याची खात्री देता येत नाही. त्यामुळे वरील 2171 अँटीरॅबीज इंजेक्शन खरेदीची रक्कम रु.649129 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. अँटीरॅबीज इंजेक्शन पुरवठा करणे करिता श्वानदंश प्रथमोपचार केंद्राकडील मागणीपत्र व औषधी भंडाराकडील चलन तपासणी करिता उपलब्ध झाले नाही. त्यामुळे मागणीपत्राप्रमाणे पुरवठा झाला किंवा कसे

Solapur (M Corp.)

याबाबत तपासणी करता आली नाही.

वसूलपात्र रु, 219271

आक्षेपाधीन रु.649129

DATVCSM6501 (Ref No : 46, Hmm No : 71)

## *85 आरोग्य विभागाकडील वाहनाच्या देखभाल/दुरुस्तीवर केलेल्या खर्चातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : वाहन सुटेभाग खरेदी मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3980543.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3980543.00/-

***उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखसे-1013/2635/उदयोग/6, दि.16/07/1993 नुसार रु. 1000/- ते 50,000/- वरील खर्च निविदा मागवून वार्षिक दरकरार करुन करणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाकडील वाहनांवरील विविध प्रकारच्या 46 वाहनांचे देखभाल दुरुस्तीकरीता 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये रु.39,80,543/- खर्च करण्यात आला असल्याने जाहीर दरकरार करुन खर्च करणे आवश्यक असताना असा दरकरार न करता खाजगी व्यावसायकाकडून सुटे भागाची खरेदी केल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील विविध प्रकारच्या 46 वाहनांचे देखभाल दुरुस्तीकरीता 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये रु.39,80,543/- खर्च करण्यात आला असल्याचे आढळुन आले.सदर बाबीचे निवडक लेखापरीक्षणामध्ये खालील प्रमाणे आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 159 दि. 24/08/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 05/09/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सर्व वाहनांच्या दुरुस्तीसाठी सुटे भागाची खरेदी खाजगी व्यावसायिकाकडून निविदा किंवा दरपत्रके न मागविता केल्याचे आढळुन आले. उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखसे-1013/2635/उदयोग/6, दि.16/07/1993 नुसार रु. 1000/- ते 50,000/- वरील खर्च निविदा मागवून वार्षिक दरकरार करुन करणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाकडील वाहनांचे देखभाल दुरुस्तीकरीता वार्षिक खर्च रु.39,80,543/- असल्याने वार्षिक दरकरार करुन खर्च करणे आवश्यक असताना असा दरकरार न करता खाजगी व्यावसायकाकडून सुटे

भागाची खरेदी केल्याचे आढळुन आले. शा.नि.भाखंस-1088/2512/उदयोग/6, दि.2/1/1992 मधील परि 8.3 (ई) नुसार वर्षभर आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करणेसाठी दरवर्षी संख्या आकारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशा पध्दतीचा अवलंब न करता बाजारभावाप्रमाणे नियमबाहय खरेदी केल्याचे आढळुन आले.
2) वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये खरेदी करण्यात आलेल्या रु.3980,543/-चे सूटेभागाची खरेदी खाजगी व्यावसायीकांकडून केली असून त्या खाजगी व्यवसायकनिहाय खरेदी रक्कमेची माहिती लेखापरीक्षण नोंदवहीत आढळून आली नाही.
3) प्रत्येक वाहनाची हिस्ट्री शीट नोंदवही स्वतंत्र विहीत नमुन्यात ठेवणे आवश्यक असताना तशा स्वतंत्र हिस्ट्रीशीट नोंदवहया न ठेवता एकाच नोंदवहीत सर्व वाहनांची नोंद घेतली असल्याचे आढळुन आले.
4) वाहनांचे लॉगबुक ठेवले नसल्याचे लेखा परीक्षणास सांगण्यात आले. लॉगबुक नसल्याने वाहन दुरुस्ती वेळी वाहन केव्हापासून बंद होते दुरुस्तीनंतर केंव्हा चालू केले याची लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.

DATRNDM7201 (Ref No : 126, Hmm No : 159)

## *86 आरोग्य विभागाकडील वाहनांच्या इंधनावर व देखभाल दुरुस्तीवर मर्यादेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :आरोग्य मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***मनपाकडील आरोग्य विभागाच्या अधिकारातील वाहनांचे डिझेल रजिस्टर व हिस्ट्रीशीट नोंदवही याची तपासणी केली असता अनियमितता आढळुन आल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महानगरपालिकांच्या वाहन देखभाल दुरुस्ती वरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत शा.नि.क संकीर्ण 2007/वाहन खरेदी/ प्र.क्र.27/2008, नवि.26, दि.18/2/2008. अन्वये वाहने सुरक्षित ठेवणे आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासांठी रु.30,000/- खर्च करण्याची मर्यादा विहित केली आहे. सदर खर्चामध्ये टायर ट्यूब व बॅटरी वरील खर्च समाविष्ठ आहे. आरोग्य विभागाकडील अनेक वाहनांवर विहित मर्यादेपेक्षा खुप जादा खर्च झाल्याचे आढळुन आले.***

मनपाकडील आरोग्य विभागाच्या अधिकारातील वाहनांचे डिझेल रजिस्टर व हिस्ट्रीशीट नोंदवही याची तपासणी केली असता अनियमितता आढळुन आल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने

महानगरपालिकांच्या वाहन देखभाल दुरुस्ती वरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत शा.नि.क संकीर्ण 2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008, नवि.26,दि.18/2/2008. अन्वये वाहने सुरक्षित ठेवणे आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी डिझेलवर चालणा-या प्रत्येक वाहनासांठी रु.30,000/- खर्च करण्याची मर्यादा विहित केली आहे. सदर खर्चामध्ये टायर ट्यूब व बॅटरी वरील खर्च समाविष्ठ आहे. आरोग्य विभागाकडील वाहनांवर 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये देखभाल दुरुस्तीवर आरोग्य विभागाकडील 46 वाहनांवर 3980543/- खर्च करण्यात आला आहे प्रत्येक वाहनावर विहित मर्यादेपेक्षा खुप जादा खर्च झाल्याचे आढळुन आले. (निवडक उदाहरणे खालील प्रमाणे आहेत.)

| अ.क्र. | वाहन क्रमांक | रक्कम रु. |
|---|---|---|
| 1 | MH.13 R 3374 | 201057 |
| 2 | MH.13 R 0290 | 181115 |
| 3 | MH.13 R 3356 | 175730 |
| 4 | MH.13 R 0286 | 156152 |
| 5 | MH.13 R 0289 | 153915 |
| 6 | MH.13 R 6214 | 166428 |
| 7 | MH.13 R 1796 | 141302 |
| 8 | MH.13 R 0287 | 259189 |

वरील खर्च हा सुटेभाग, ऑईल खरेदी चा आहे. महानगरपालिकेकडील वाहनांची दुरुस्ती मनपाच्या परिवहन विभागाच्या कार्यशाळेतुन केली जाते. व सदर दुरुस्तीसाठी लागणारे सुटेभाग, ऑईल ,पंक्चर साहित्य ,वेल्डींग साहित्य, खाजगी व्यावसायीकाकडून खरेदी केली जाते.

वाहनांची दुरुस्ती परिवहन विभागाच्या कार्यशाळेतून केल्याबाबत मनपा कडुन परिवहन विभागास कर्मशाळेच्या कर्मचा-यांचे वेतनाच्या 66% रक्कम अनुदान म्हणुन दिली जाते व सदरचा खर्च वाहनांचे दुरुस्ती खर्चात समाविष्ट होत नाही. तरीही वाहनावरील दुरुस्ती खर्च मर्यादेपेक्षा खुप जादा होत असल्याचे आढळुन आले. 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये म.न.पा. कडुन परिवहन विभागास सदर 66% अनुदानापोटी रक्कम रु.1,40,93,902/- एवढी रक्कम देण्यात आली. सदरचा खर्च मनपाच्या सर्व विभागाकडील वाहनांच्या देखभाल दुरुस्ती खर्चामध्ये समाविष्ट केल्यास देखभाल दुरुस्ती खर्च शासनाने घालून दिलेल्या रु.30,000/- या विहित मर्यादेपेक्षा खुप मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसुन येते.

2) आरोग्य् विभागाकडील वाहनांच्या सुटया भागाच्या् खरेदीसाठी अर्थसंकल्पामध्ये रु.30,00,000/- तरतूद असताना 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये रु.3980543/- चा खर्च करण्यात आला आहे.

3) दरपत्रके न मागवता किंवा निविदा मागवून वार्षिक दरकरार न करता खाजगी व्यावसायिकांकडून रक्कम रु 3980543/- चे वाहनांचे सूटेभाग खरेदी केल्याचे आढळुन आले.

4) शा.निर्णय दिनांक 18/2/2008 मधील अ.क्र.2 नुसार ज्या वाहनांवर मोठया प्रमाणात दुरुस्ती करावी लागते किंवा जी वाहने निरोपयोगी आहेत त्यांचे बाबतीत शासकीय परिवहन सेवा किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून वाहन दुरुस्ती करताना यापुढे उपयोगात आणणे आर्थिक दृष्ट्या किफायतीशीर राहणार नाही असे प्रमाणपत्र घेवून सदरचे वाहन निलंबित करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये केली नसल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले.

5) सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियमपुस्तिकेतील नियम क्र.415 नुसार दरवर्षी 15% निधी घसारा निधी म्हणून अर्थसंकल्पात तरतुद करुन घसारा निधी उभा करणे आवश्यक आहे. परंतु अशी तरतुद केली नसल्याचे व घसारा निधी उभारला नसल्या चे आढळून आले.

6) आरोग्य विभागाकडील सर्व वाहनांचे हिस्ट्रीशीट एकाच नोंदवही मध्ये नोंदविले आहे. त्यामध्ये सक्षम अधिका-यांचे पानाच्या शेवटी सहया असल्याचे आढळुन आले. वाहनाचे प्रत्येक दुरुस्तीबाबत स्वा-क्षरी असणे आवश्यक आहे. परंतु तशा स्वाक्ष-या लेखा परीक्षणास आढळुन आल्या नाहीत.

DATRNDM7201 (Ref No : 128, Hmm No : 167)

## *87 इंद्रभुवन बिल्डिंग मधील मेन इलेक्ट्रिक पॅनेल पासून केबल घालणे स्वीच बसविणे याकामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : विद्युत मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 8325.00/-

***निविदाधारकाने निविदेसोबत विद्युत अनुज्ञप्ती प्रमाणपत्र सादर केले नसतांना निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरवून कामाचे आदेश दिले आहे. मक्तेदाराचे देयकातून मूल्यवर्धित कराची रक्कम वसूल केली नाही.***

महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत इंद्रभुवन बिल्डिंग मधील मेन इलेक्ट्रिक पॅनेल पासून केबल घालणे स्वीच बसविणे या कामाचे रु.199804 चे अंदाजपत्रक तयार करून निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त तीन निविदाधारकांपैकी श्री दत्त इलेक्ट्रिक वर्क्स यांची 10 टक्के कमी दराची निविदा मान्य करून दिनांक 14/03/13 रोजी कार्यादेश देण्यात आले. सदर कामाची निविदा नस्ती व मोजमाप पुस्तिका तपासणी अंती आढळून आलेल्या अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 90, दि.17/07/15 अन्वये विद्युत विभागास

विचारणा केली असता, विद्युत विभागाकडील दिनांक 13/08/15 चे अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. निविदा अटी नुसार निविदाधारकाने विद्युत ठेकेदारी अनुज्ञप्ती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना प्राप्त झालेल्या तीनही निविदाधारकांनी सदरचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केल्याचे आढळून येत नाही. मक्तेदाराकडे स्वत:चे नावे विद्युत ठेकेदाराचा कामाचा परवाना आवश्यक असतांना सदर बाबीची पूर्तता न करणाऱ्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविण्यात येवून कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

2. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र.विकअ/1998/प्र.क्र.43/कराधान. दिनांक 1 मे 1999, कार्यकंत्राट कायदयाचे कलम 6 (ब)(1) तसेच मुल्यवर्धित कर कायदा 2005 प्रमाणे कार्यकंत्राटदाराने विक्रीकर खात्याकडून नोंदणी दाखला घेणे बंधनकारक असून निविदा सोबतच्या सहपत्रात दाखला सादर केला असल्यास अशा कंत्राटदाराकडून 2 टक्के दराने कर कपात करणे आवश्यक आहे. दाखला सादर न केल्यास 5 टक्के कर कपात करणे आवश्यक आहे. उपरोक्त कामाचे ठेकेदार श्री दत्त इलेक्ट्रिकल्स यांचे निविदे सोबत विक्रीकर नोंदणी दाखला सादर न केल्याने त्यांना अदा केलेले देयक रक्कम रु.166504 मधून 5% रक्कम रु.8325 वसूल करणे आवश्यक होते. परंतु सदरची रक्कम वसूल न करताच प्रदान केले आहे.
वसूलपात्र रक्कम रु. 8325

DATVCSM6501 (Ref No : 48, Hmm No : 90)

## *88 सोलापूर शहरातून जाणाऱ्या शिवाजी चौक ते भैया चौक ते पत्रकार भवन- कंबर तलाव ते सोरेगाव रस्ता दरम्यान रस्त्याचे मध्यभागी पोल उभारून लाईट व्यवस्था करणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : विद्युत मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
आक्षेपाधीन रक्कम रु. 3106731.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 261440.00/-

***मक्तेदारास 13200 मीटर केबलची रक्कम अदा केली आहे. त्यापैकी 6280 मि.केबल वापराची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये घेण्यात आलेली आहे. उर्वरित 6920 मि.केबल वापराची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये नाही. मक्तेदाराने 11000 मीटर DWC पाईप पुरवठा केल्याबद्दल प्रती मीटर रु.162 प्रमाणे प्रदान केल्याची नोंद घेण्यात आली आहे. त्यापैकी मक्तेदाराने 177 पोल करिता 6195 मिटर पाईप वापरल्याची नोंद आहे. उर्वरित***

***4805 मीटर पाईप कोणत्या कामासाठी वापरला याबाबत नोंद घेण्यात आली नाही. ठेकेदारास अदा केलेल्या पोल्सच्या किमतीपैकी 45 पोल उभे केल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये घेतलेली नाही.***

सोलापूर शहरातून जाणाऱ्या शिवाजी चौक ते भैया चौक ते पत्रकार भवन-कंबर तलाव ते सोरेगाव रस्ता दरम्यान रस्त्याचे मध्यभागी पोल उभारून लाईट व्यवस्था करणे या कामाचा मक्ता निविदा प्रसिद्ध करूनमे. एन.एस.जैन पुणे यांना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 30.5% कमी दराने स्थायी समिती ठराव क्रमांक 372 दि.07/05/2010 अन्वये मंजूर करण्यात आला. सदर कामाची नस्ती व मोजमाप पुस्तिका तपासली असता लेखापरिक्षणात आढळलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 88, दि.17/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे पत्र क्र.832, दि.30/07/15 अन्वये सादर केलेल्या खुलाशाचा विचार करता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. मोजमाप पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक 20 वर नोंदविण्यात आलेले धावते बिल क्रमांक 1 ची पडताळणी केली असता, 25x4 कोअर A1 केबल 13200 मिटर पुरवठा केल्याची नोंद घेण्यात आली आहे. त्यापैकी 6280 मिटर केबलचा वापर केल्याची नोंद घेण्यात आली आहे. ठेकेदारास 13200 मीटर केबल ची रक्कम प्रती मीटर रु.219 प्रमाणे अदा करण्यात आली आहे. परंतु उर्वरित 6920 मीटर केबलचा सदर कामावर वापर केल्याबाबतची नोंद नसतांना प्रदान केले आहे. याबाबत विद्युत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 88, दि.17/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे पत्र क्र.832, दि.30/07/15 अन्वये कळविलेल्या अनुपालनामध्ये उर्वरित 6920 मी.केबलचा वापर सदरच्या कामामधील उर्वरित कामाकरिता करण्यात आला असून, त्याची नोंद साठा नोंदवही मध्ये घेण्यात आल्याचे कळविले आहे. अनुपालनासोबत जोडलेल्या साठा नोंदवहीतील पृष्ठ क्र.167 व 241 च्या झेरॉक्स प्रतीवरील नोंदीचे अवलोकन केले असता, मक्तेदारास दि.5/4/11 ते 22/12/12 या कालावधीत 2238 मि.केबल दिल्याची नोंद आहे. परंतु सदरची केबल कोणत्या कामासाठी वापरली याबाबतची नोंद मोजमाप पुस्तिकेमध्ये घेण्यात आलेली नाही. तसेच पृष्ठ क्र.167 वर 1678 मी. केबल शिल्लक असल्याचे दिसून येते. मक्तेदारास वितरीत केलेली केबल व साठा नोंदवहीत शिल्लक केबल 2238 मी.+1678 मी = एकूण 3916 मि.केबल वजा जाता उर्वरित 6920 मी.केबल पैकी 3004 मीटर केबल वापराची नोंद नाही. त्यामुळे 3004 मि.केबल पोटी रु.219 प्रती मिटर प्रमाणे मक्तेदारास अदा केलेली रक्कम रु.657876 व साठा नोंदवहीमध्ये शिल्लक दर्शविण्यात आलेल्या 1678 मीटर केबलचा वापर कोणत्या प्रयोजनासाठी केला याबाबत खात्याने कोणताही खुलासा न केल्यामुळे प्रती मीटर रु.219 प्रमाणे रु.367482 अशी एकूण रक्कम रु.1025358 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2.मक्तेदाराने 11000 मीटर DWC पाईप पुरवठा केल्याबद्दल प्रती मीटर रु.162 प्रमाणे प्रदान केल्याची नोंद मोजमाप पुस्तकात घेण्यात आली आहे. त्यापैकी मक्तेदाराने 177 पोल करिता 6195 मिटर पाईप वापरल्याची नोंद आहे. उर्वरित 4805 मीटर पाईप कोणत्या कामासाठी वापरला याबाबत नोंद घेण्यात आली नाही. याबाबत विद्युत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 88, दि.17/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे पत्र

क्र.832, दि.30/07/15 अन्वये कळविलेल्या अनुपालनामध्ये उर्वरित पाईपचा वापर सदरच्या कामामधील उर्वरित कामाकरिता करण्यात आला असून, त्याची नोंद साठा नोंदवही मध्ये घेण्यात आली असून त्याची झेरॉक्स प्रत सोबत जोडत असल्याचे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात झेरॉक्स प्रत जोडलेली नाही. तसेच पाईप वापरल्याची नोंद कामाच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये घेण्यात आलेली नाही. त्यामुळे पाईप त्याच कामासाठी वापर केल्याची खात्री करता येत नाही. तरी 4805 मीटर पाईप साठी रु.162 प्रती मिटर प्रमाणे पुरवठादारास अदा केलेली रक्कम रु.778410 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. मक्तेदारास दि.20/05/10 रोजी 10 मीटर उंचीचे 308 नग पोल प्रती पोल रु.37121 प्रमाणे प्रदान केले आहे. त्यापैकी ठेकेदाराने 20/05/10 रोजी 177 पोलचे फौंडेशन करून आर्थिंग केले आहे. तसेच दिनांक 18/09/11 रोजी 86 पोल्स फौंडेशन करून 108 पोल आर्थिंग केल्याची नोंद घेण्यात आली आहे. म्हणजेच दि.20/5/11 ते 17/09/11 या कालावधीत फौंडेशन न केलेल्या 131 पोल्सची रक्कम दि 20/05/10 रोजी अदा केली आहे. प्रत्यक्षात 177+86=263 पोल उभे केल्याची नोंद मोजमाप पुस्तकात घेण्यात आली आहे. उर्वरील 45 पोल बसविल्याची नोंद घेण्यात आली नाही. याबाबत विद्युत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 88, दि.17/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे पत्र क्र.832, दि.30/07/15 अन्वये कळविलेल्या अनुपालनामध्ये उर्वरित 45 पोल जागा उपलब्ध झाल्यानंतर नोंद घेण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. परंतु त्याबाबतच्या मोजमाप पुस्तिकेतील नोंदीची झेरॉक्स प्रत अनुपालनासोबत जोडली नाही. त्यामुळे 45 पोल्स बसविल्याची खात्री करता येत नाही. तरी 45 पोल्स ची रक्कम रु.1670445 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4.मक्तेदाराने सदरचे पोल खरेदीपोटी 3.20 % दराप्रमाणे मनपा ची जकात भरल्याची पावती नस्ती सोबत आढळून आली नाही. याबाबत विद्युत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 88, दि.17/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे पत्र क्र.832, दि.30/07/15 अन्वये कळविलेल्या अनुपालनामध्ये मक्तेदाराने सदर पोल खरेदीपोटी जकात भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत जोडली असल्याचे नमूद केले आहे. अनुपालनासोबात जोडलेल्या जकात पावतीच्या झेरॉक्स प्रतीवरील तपशीलाचे अवलोकन करता खालील प्रमाणे जकात भरल्याची नोंद आहे.

| अ.क्र. | जकात पावती क्रमांक व दिनांक | एकूण नग | मालाचे वर्णन | मूळ बिलाप्रमाणे किमत (रु.) | जकातीची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 639075/ 17-7-2010 | 06 नग | 20 मि.पोल | 318240 | 10184 |
| 2. | 639077/ 17-7-2010 | 12नग | 20 मी.पोल | 326196 | 10438 |
| 3. | 700913/ 19/8/2010 | 100 नग | लोखंडी स्ट्रीट लाईट पोल | 999600 | 29988 |
| 4. | 693209/ 1/9/2010 | - | लोखंडी स्ट्रीट लाईट पोल | 1074568 | 24596 |

वरील तपशील पाहता मक्तेदाराने 2718604 एव्हढ्या रक्कमेच्या पोल खरेदीवर 75206 जकात भरली आहे. तथापि ठेकेदारास एकूण 308 पोल्स ची रक्कम रु.11433268 प्रदान केली आहे. म्हणजेच मक्तेदाराने रु 8714664 किमतीच्या पोल खरेदीवर जकात भरली नसल्याचे दिसून येते. तरी रु.8714664 रक्कमेवर 3%

प्रमाणे होणारी जकातीची रक्कम रु 261440 वसूल होणे आवश्यक आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु 657876 + 778410 +1670445 = 3106731

वसूलपात्र रक्कम रु.261440

DATVCSM6501 (Ref No : 60, Hmm No : 88)

### *89 नगरसेवक - पदाधिकारी यांचे दूरध्वनी, लेखनसामुग्री व लेटरपॅड छपाईवर करण्यात आलेल्या खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1097008.00/-

***महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2009/प्रक्र 148/नवि-26 दिनांक 22/1/2010 नुसार नगरसेवकांना मानधनापोटी दरमहा रु 7,500/- प्रमाणे 2012-13 या आर्थिक वर्षात रक्कम रु.6310160/- अदा करण्यात आली असून मानधनासोबत दरमहा रु 4,000/- प्रमाणे दूरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबींवरील खर्चाकरिता देण्यात येतात. मानधनासोबत विहित दराने दूरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबीवरील खर्चासाठी प्रदान केले असतांना सदर बाबींवरील खर्चासाठी स्वतंत्रपणे रुपये 1097008/- मनपा निधीतुन खर्च केलेला आहे.***

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2004/468/प्रक्र. 84/04/नवि-20 दिनांक 25/1/2005 नुसार नगरसेवकांना मानधनासोबत रक्कम रु. 4,000/- दूरध्वनी, लेखन सामुग्री व टपाल या बाबीवरील खर्चासाठी वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रक्कम रुपये 6310160/- इतकी रक्कम खर्ची पडली असतांना त्याच बाबींसाठी स्वतंत्रपणे रक्कम रुपये 1097008/- इतका खर्च केलेला आहे.

2012-13 या वित्तीय वर्षात नगरसेवक,पदाधिकारी यांचे दूरध्वनी, लेखनसामुग्री व लेटरपॅड छपाईवर करण्यात आलेल्या खर्चाची माहिती अर्धसमास ज्ञापन क्रमांक 134 दिनांक 30/7/2015 अन्वये मागविली असता नगरसचिव कार्यालयाने जाक्र. नस/183अ/470 दिनांक

31/7/2015 अन्वये खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

| वित्तीय वर्ष | दूरध्वनी वरील खर्च रुपये | लेखनसामुग्री वरील खर्च रुपये | छपाई खर्च रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| 2012-2013 | 200390 | 671768 | 224850 | 1097008 |

नगरसेवक, पदाधिका-यांना दरमहा मानधनासोबत दूरध्वनी, लेखनसामुग्री व टपाल या बाबींवरील खर्चाकरिता स्वतंत्र रक्कम रु 4,000/- प्रदान केलेली असतांनाही सदर बाबींवरील खर्चासाठी नियमबाहयरीत्या स्वतंत्रपणे एकुण खर्च रक्कम रु 10,97,008/- केला असल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे.

वसूलपात्र रक्कम रु 10,97,008/-

DATRKJM5901 (Ref No : 54, Hmm No : 134)

## *90 करसंकलन (शहर) विभागाने केलेल्या करनिर्धारणातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 08**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 88945.00/-

***बांधकाम परवानगी न घेतलेल्या, घेण्यात आलेल्या बांधकाम परवानगीला मुदत वाढ न घेता केलेल्या अवैध बांधकामास शास्ती न लावता कर आकारणी करण्यात आली. महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील अधिनियम 1979 कलम 3 (1) (ब) नुसार महानगपालिका क्षेत्रातील 150 चौ.मीटर पेक्षा अधिक चटई क्षेत्र असलेल्या इमारतीवर/जागेवर करयोग्य मुल्याच्या 10% रक्कमे एव्हढा कर लावणे आवश्यक असतांना मोठा निवासी कर न लावता कर आकरणी करण्यात आली.कर आकारणी प्रकरणा सोबत***

***बांधकामाच्या मंजूर नकाशाची प्रत जोडली नसल्यामुळे कर निर्धारणामध्ये नमूद केलेली मोजमापे व त्यानुसार लावण्यात आलेला कर योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.***

महानगरपालिकेच्या कर संकलन (शहर) विभागाने लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेल्या करनिर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता तपासणी अंती आढळून आलेल्या उणीवासंबधी कर संकलन व कर आकरणी (शहर) विभागास अर्धसमास पत्र क्र.130, दि.29/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे दि.13/08/15 चे पत्रान्वये दिलेला खुलासा विचारात घेता, लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.होटगी रोड येथील सप्तगिरी हाउसिंग सोसायटी मधील सौ.अन्नपूर्णा मडीवालप्पा हत्ती यांचे मालकीची मिळकत न.291081 या मिळकतीस महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाकडून पत्र क्र.873 दि.1/02/2008 अन्वये परवानगी दिली होती. परवानगी पत्रातील अट क्र.13 मधील तरतुदी नुसार सदरची परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना कायदा 1966 कलम 48 मध्ये नमूद केल्यानुसार एक वर्षापर्यंत अस्तित्वात राहील व पुढे सदरची परवानगी आपोआप रद्द झाली असे समजण्यात येईल. सदरचे बांधकाम एक वर्षा नंतर करणे असल्यास पुन्हा मुदतीत अर्ज करून परवानगीची मुदत वाढवून घेणे आवश्यक आहे. तथापि, मुदत वाढवून घेतल्याचे अभिलेख्यावरून दिसून येत नाही. पूर्वी दिलेली परवानगी परवानगी पत्रातील अटीनुसार रद्द झाली असल्याने सदरचे बांधकाम अवैध झाले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कमे इतकी शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे . महाराष्ट्र शासनाकडील दिनांक 04.01.2008 चे राजपत्रातील महाराष्ट्र अधिनियम क्रं.2 अन्वये दिनांक 04.01.2008 या तारखेस व त्या तारखेनंतर होणाऱ्या अवैध बांधकाम व पूर्नबांधकाम केले जाईल त्यांच्या बाबतीत शास्तीची तरतूद लागू करण्यात आली आहे. वरील नमूद मिळकतीचे करनिर्धारण दप्तरी हुकुम नं.41/16.08.12 नुसार केले असून करयोग्यमूल्य रक्कम रु.16252 वर करपात्र रक्कम रु.7638 निश्चित केली आहे.

वरील तरतुदीनुसार सदर मिळकतीवर कराच्या दुप्पट शास्ती लावणे आवश्यक असतांना शास्ती न लावता करनिर्धारण केले आहे. त्यामुळे करपात्र रक्कम रु.7638 च्या दुप्पट रक्कम रु.**15276** प्रमाणे 1/04/2011 पासून वसूल करणे आवश्यक आहे.

2) मिळकत नं.303534, मिळकत धारक श्री.अनिल ज्ञानेश्वर सगर, मिळकतीचे क्षेत्रफळ 255 चौ.मी. करपात्र रक्कम रु.36534. महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या ) इमारतीवरील अधिनियम 1979 कलम 3 (1) (ब) नुसार महानगपालिका क्षेत्रातील 150 चौ.मीटर पेक्षा अधिक चटई क्षेत्र असलेल्या इमारतीवर /जागेवर करयोग्य मुल्याच्या 10% रक्कमे एव्हढा कर लावणे आवश्यक आहे. तसेच सदरचा कर वसूल करून शासनास जमा करणे बंधनकारक आहे. उपरोक्त मिळकत 150 चौ.मी.पेक्षा जास्त असल्याने करयोग्य रक्कमेवर 10% मोठा निवासी कर लावणे आवश्यक आहे. सदर मिळकतीचे सुधारित करनिर्धारण करून मोठ्या निवासी कराची

रक्कम रु.3653 प्रती वर्ष प्रमाणे 1.7.2012 पासून वसूल करणे आवश्यक आहे.

3) मिळकत नं.302655 मिळकतधारक श्री.रमेश रंगनाथ कुलकर्णी, दप्तरी हुकुम नं.76/27.7.2012 सदर मिळकतीवर केलेल्या बांधकामास परवानगी घेतल्याचे दिसून येत नाही. मिळकतीवर आकारणी केलेल्या कराची रक्कम रु.926 इतकी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्प्ट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे. त्यामुळे कराची आकारणी करतांना मूळ कर रक्कमेच्या दुप्पट रक्कम रु.1852 शास्ती लावणे आवश्यक होते. परंतु शास्ती न लावता कर आकारणी केली असल्याने रु.1852 प्रती वर्षी प्रमाणे 1.7.2012 पासून शास्तीची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

4.मिळकत नं.300182 दप्तरी हुकुम नं.107/16.8.2012 मिळकत धारक श्री.वामन पांडुरंग वनपाल यांनी एकूण 914 चौ.फुट क्षेत्रफळ बांधकामास बांधकाम परवानगी विभागाकडील दिनांक 2.6.2010 चे पत्रान्वये परवानगी घेतली आहे. परवानगी पत्रातील अटीनुसार सदरची परवानगी एक वर्ष कालावधी नंतर रद्द होत असल्याने मुदतवाढ घेणे आवश्यक होते. परंतु मुदतवाढ घेतलेली दिसून येत नाही. बांधकामास दिलेली मूळ परवानगी रद्द झाल्याने सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्प्ट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे. त्यामुळे सदर मिळकतीवर आकारणी केलेल्या कराच्या दुप्पट रक्कम रु.10124 प्रमाणे दि.1.6.2011 पासून वसूल करणे आवश्यक आहे.

5)मिळकत नं.303670 दप्तरी हुकुम नं.139/5/9/2012, मिळकतधारक श्रीमती मीना बाळासाहेब अलकुंटे यांनी एकूण 759 चौ.फुट क्षेत्रफळ बांधकामास बांधकाम परवानगी विभागाकडील दिनांक 24.5.2006 चे पत्रान्वये परवानगी घेतली आहे. परवानगी पत्रातील अटीनुसार सदरची परवानगी एक वर्ष कालावधी नंतर रद्द होत असल्याने मुदतवाढ घेणे आवश्यक होते. परंतु मुदतवाढ घेतलेली दिसून येत नाही. बांधकामास दिलेली मूळ परवानगी रद्द झाल्याने सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्प्ट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे. सदर मिळकतीवर दि.1.4.2010 पासून नियमित आकारणी केली आहे.उक्त नियमा नुसार मिळकतीवर आकारणी केलेल्या कराच्या दुप्पट रक्कम रु.9288 दि.1.4.2010 पासून वसूल करणे आवश्यक आहे.

6)मिळकत नं.30317 मिळकत धारक सौ.सुमित्रा मल्लिनाथ कुंभार बांधकाम क्षेत्रफळ 1432 चौ.फुट कर आकारणी दि.1/10/2012 सदर बांधकामास बांधकाम परवानगी विभागाकडील पत्र क्र.102/12/5/2009 नुसार परवानगी घेण्यात आली आहे. परवानगी पत्रातील अटीनुसार सदरची परवानगी एक वर्ष कालावधी नंतर रद्द होत असल्याने मुदतवाढ घेणे आवश्यक होते. परंतु मुदतवाढ घेतलेली दिसून येत नाही. बांधकामास दिलेली मूळ

परवानगी रद्द झाल्याने सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्प्ट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे. सदर मिळकतीवर दि.1/10/2012 पासून नियमित आकारणी केली आहे. उक्त नियमानुसार मिळकतीवर आकारणी केलेल्या कराच्या दुप्पट शास्ती लावून दि.1/10/2012 पासून रु.17880 प्रमाणे वसूल करणे आवश्यक आहे.

7)निधी जॉईन्ट केअर सेंटर पंखा बावडी परिसर येथील मिळकतधारक डॉ.आनंद राजगोपाल करवा यांनी 730 चौ.फुटाचे बांधकाम केले असून सदर मिळकतीवर दि.12/01/2009 पासून बिगर घरगुती दराने कराची आकारणी केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्प्ट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे. सदर मिळकतीवर आकारणी केलेल्या कराची वार्षिक रक्कम रु.15436 असून, दुप्पट शास्तीची रक्कम रु.30872 आकारणी करून 12/01/2009 पासून  वसूल करणे आवश्यक आहे.

8) कर आकारणी प्रकरणा सोबत बांधकामाच्या मंजूर नकाशाची प्रत जोडली नसल्यामुळे कर निर्धारणामध्ये नमूद केलेली मोजमापे व त्यानुसार लावण्यात आलेला कर योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

वसूलपात्र रु. 15276+3653+1852+10124+9288+17880+30872=88945

DATVCSM6501 (Ref No : 63, Hmm No : 130)

## *91 बांधकाम परवानगी न घेतलेल्या बांधकामावर शास्ती आकारून वसूल न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 08**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 111080.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 19449 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्प्ट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद असतांना कर आकरणी व कर संकलन (शहर) विभागाने दुप्पट दराने शास्ती आकारून वसूल केली नाही.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267 अ नुसार परवानगी न घेता, परवानगी सोबत असलेल्या कोणत्याही अटींचे उल्लंघन करुन कोणत्याही इमारतीचे बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अवैध समजण्यात येवून सदरच्या इमारतीवर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावण्याबाबत तरतुद आहे. महाराष्ट्र शासनाकडील दिनांक 4.01.2008 चे राजपत्रातील महाराष्ट्र अधिनियम क्रं.2 अन्वये दिनांक 4.01.2008 या तारखेस व त्या तारखेनंतर होणाऱ्या अवैध बांधकाम व पुनर्बांधकाम केले जाईल त्यांच्या बाबतीत शास्तीची तरतूद लागू करण्यात आली आहे. कोणार्क नगर विजापूर रोड,येथील मिळकतींचे कर निर्धारण दि.14/06/2012 रोजी दप्तरी हुकुम नं.23 ते 30 अन्वये नियमित दराने केले असून खालील नमूद केलेल्या मिळकतीस बांधकाम विभागाकडून परवानगी घेतल्याचे अभिलेख करनिर्धारण प्रकरणासोबत आढळून आले नाही. या बाबत करसंकलन व कर आकरणी (शहर) विभागास अर्धसमास पत्र क्र.131, दि.29/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे दि.13/08/15 चे पत्रान्वये दिलेला खुलासा विचारात घेता, खालील मिळकती कराच्या दुप्पट रक्कमे इतकी शास्ती लावणेस पात्र आहेत.

| अ.क्र. | मिळकतधारकाचे नाव | मिळकतीचे क्षेत्रफळ चौ.फुट | वार्षिक कर मुल्य रक्कम (रु.) | करपात्र रक्कम (रु.) | शास्तीची रक्कम (रु.) | अंमलबजावणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | डॉ,विठ्ठल कृष्णा | 1293.85 | 15989 | 7515 | 15030 | 17.1.12 |
| 2. | सूर्यप्रकाश जगदेवप्पा करंडे | 1255.00 | 15545 | 7306 | 14612 | 02.02.12 |
| 3. | किसनदेव हरिबा ध्वोये | 1154.37 | 13792 | 6206 | 12412 | 26.03.12 |
| 4. | डॉ.नंदकुमार मधुकर देशपांडे | 1229.91 | 15174 | 7132 | 14264 | 24.04.12 |
| 5. | डॉ.नीलिमा विजय निशानदार | 1359.00 | 16532 | 7770 | 15540 | 24.04.12 |
| 6. | डॉ.संतोष सुभास गुजरे | 1228.00 | 14856 | 6635 | 13720 | 02.03.12 |
| 7. | डॉ.अभिजित हनुमंत जगताप | 1091.00 | 13502 | 6076 | 12152 | 25.04.12 |
| 8. | श्री.अशोक गुरना कलशेट्टी | 1179.00 | 14833 | 6675 | 13350 | 17.01.12 |
| | एकूण शास्ती रक्कम | | | | 111080 | |

वरील मिळकतींचे बांधकाम अवैध असल्याने वरीलप्रमाणे मिळकत कराच्या दुप्पट शास्तीची रक्कम रु.111080 वसूल करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.111080

DATVCSM6501 (Ref No : 64, Hmm No : 131)

## *92 मोबाईल टॉवर वरील थकीत कराबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 5721496.00/-

***महापालिका हद्दीतील वेगवेगळ्या 09 कंपन्याच्या टॉवर मालकांकडे मार्च-13 अखेर रु.5721496 इतकी रक्कम थकीत आहे.***

सोलापूर महानगरपालिकेतील कर संकलन विभागाचे लेखापरिक्षण मध्ये विभागाने सादर केलेल्या मोबाईल टॉवरच्या थकबाकी दर्शविणाऱ्या विवरणपत्रावरून असे निदर्शनास आले कि, महापालिका हद्दीत असलेल्या खालील वेगवेगळ्या 09 कंपन्याच्या टॉवर मालकांकडे मार्च-13 अखेर रु.5721496 इतकी रक्कम थकीत आहे.

| अ.क्र. | टॉवर संख्या | मोबाईल कंपनीचे नाव | मागील बाकी रु | चालू मागणी 2012-13 रु | एकूण रु | 2012-13 मधील वसुली रु. | थकबाकी रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 22 | बी.एस.एन.एल. | 1649927 | 702711 | 2352638 | 26391 | 2326247 |
| 2. | 23 | एअरटेल | 850607 | 1074750 | 1925357 | 1695574 | 229783 |
| 3 | 07 | इंडस टॉवर | 187020 | 518420 | 75440 | 454416 | 251024 |
| 4. | 03 | ओडा फोन | 148067 | 240875 | 388942 | 387301 | 1641 |
| 5. | 10 | हचसन एस आर | 329602 | 587016 | 916618 | 891746 | 24872 |
| 6. | 3 | टाटा टेली सर्व्हिस | 53019 | 149128 | 202147 | 89092 | 113055 |
| 7. | 2 | विन्पो टॉवर | 271943 | 117382 | 389325 | 108073 | 281252 |
| 8. | 8 | जी टी एल | 1530029 | 840005 | 2370034 | - | 2370034 |
| 9. | 1 | टॉवर व्हिजन इंडिया | 90768 | 32820 | 123588 | -- | 123588 |
| | | एकूण बेरीज | | | | | 5721496 |

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 138, दि.31/07/15 अन्वये विचारणा केली असता, कर संकलन विभागाने त्यांचे दि.14/08/15 चे पत्रानुसार सन 2012-13 ची थकीत रक्कम वसूल झाली असून वसुलीचे रजिस्टर उपलब्ध असल्याचे कळविले आहे. परंतु अनुपालनासोबत वसुलीबाबतचे अभिलेखे सादर केले नसल्यामुळे अनुपालन मान्य करता येत नाही.

DATDSAM7301 (Ref No : 65, Hmm No : 138)

## *93 अवैध मालमत्ता करावर दुप्पट शास्ती आकारणी करुन वसुली केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 38005.00/-

***सोलापूर महानगरपालिकेमधील हद्दवाढ भागातील सन 2012-13 मध्ये कर निर्धारण प्रकरणांपैकी 25 अवैध बांधकामांना कर अधिक कराच्या दुप्पट रक्कमेची शास्ती अशी आकारणी न करता फक्त कराचे दुप्पट दराने कराची आकारणी करणेत आली आहे. सदर बांधकामाचे मिळकतदाराकडून रु.76023/- इतकी दुप्पट दराने कर आकारणी करण्यात आली आहे. वास्तविक पहाता त्यांचेकडून कराची रक्कम रु. 38005/- व शास्तीची रककम रु.76010/- अशी एकूण रु.114028/- कर आकारणी करणे आवश्यक होते. तरी संबंधीताकडून रक्कम रु.38005/- वसुलपात्र आहे.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे कर संकलन विभागाचे सन 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.109 दि. 24/07/2015 अन्वये विचारणा केली असता त्याने त्यांचेकडील पत्र क्र.विकास/हवा/ 198 दि.12.8.2015 अन्वये संबंधीत मिळकतदारांना पुरवणी बीले बजावून शास्तीची रक्कम वसुल करण्यात येईल असे खात्याने कळविले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) 2012-13 मधील नवीन कर निर्धारण आकारणाची प्रकरणांची तपासणी केली असता जी बांधकामे अवैध आहेत अशा बांधकामावर मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्तीची आकारणी करण्यात आली आहे. मात्र कराची आकारणी केलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267(अ) नुसार जी बांधकामे अवैध आहेत अशा बांधकामाना कर व कराचे दुप्पट शास्ती अशी कर आकारणी करणेत यावी अशी तरतूद आहे. शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेल्या मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतूदीअन्वये निर्धारित करण्यात येवून ती गोळा करण्यात यावी. अशी अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीचे रकमेसह कराची वसुल करण्यात यावी अशी तरतूद आहे. सोलापूर महानगरपालिकेमध्ये 2012-13 मधील कर निर्धारण प्रकरणांपैकी 25 अवैध बांधकामांना फक्त दुप्पट दराने शास्तीची आकारणी करणेत आली आहे. सदर बांधकामाचे मिळकतदाराकडून रु.76023/- इतका दुप्पट दराने कर आकारणी करण्यात आली आहे. वास्तविक पहाता त्यांचेकडून कराची रक्कम रु. 38005/- व शास्तीची रक्कम रु.76010/- अशी एकूण रु.114028/- कर आकारणी करुन वसुल करणे आवश्यक होते. त्यापैकी रु.76010 वसूल करण्यात आले असून रु.38010 वसूलपात्र आहेत. सोबत **परिशिष्ट क्र 4** जोडण्यात

आले आहे. तरी संबंधीताकडून कर व शास्ती अशी एकूण रक्कमेवर अधिनियमान्वये वसुलपात्र आहे. सदरची बांधकामे जोपर्यंत अवैध राहतील तोपर्यंतच्या कालावधीपर्यंत कर व शास्ती असे एकूण रक्कमेवर अधिनियमान्वये परिगणना करुन वसुल करण्यात यावी

DGPKVSM6101 (Ref No : 84, Hmm No : 109)

### *94 मिळकत कर कमी आकारणीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 28510.00/-

***मिळकतदाराकडून वाणिज्य मिळकतीस 9 टक्के दराने वार्षिक भाडे आकारणी करणे आवश्यक असताना 6 टक्के दराने आकारणी करण्यात आली आहे. श्री.मोहन शिवाजी चव्हाण, मजरेवाडी, सिध्देश्वरनगर यांनी बांधकाम परवाना घेवून बांधकाम केले आहे. परंतु बांधकाम वापर परवाना पत्र न घेता बांधकामाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे बांधकाम परवान्यानुसार देणेत आलेल्या क्षेत्रफळानुसार बांधकाम केले किंवा कसे व त्यानुसार कर आकारणी करण्यात आली किंवा कसे याची खात्री करता आली नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे मिळकत कर विभागाचे सन 2012-13 चे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्या. याबाबत अर्धसमास पत्र क्र.110 दि. 24/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.विकास/हवा/ 198 दि.12.8.2015 अन्वये संबंधीत मिळकतदारांना आक्षेपात नमूद केलेनुसार फेर आकारणीची नोटीस देण्यात आली आहे असे खात्याने कळविले आहे. तरी सदर अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)सोलापूर महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्र.32 दिनांक 20/06/2009 नुसार हद्दवाढ भागामध्ये मिळकत कराची आकारणी ही वार्षिक भाडे रहिवासी मिळकतीसाठी मिळकतीच्या कर योग्य मुल्याच्या 6 टक्के दराने व वाणिज्य मिळकतीसाठी 9 टक्के दराने कर आकारणी करणेत यावे असे ठरविण्यात आले आहे. परंतु खाली नमुद केलेल्या मिळकतदाराकडून वाणिज्य मिळकतीस मिळकतीच्या कर योग्य मुल्याच्या 9 टक्के दराने वार्षिक भाडे आकारणी करणे आवश्यक असताना 6 टक्के दराने आकारणी करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधीतास 3 टक्के कमी मिळकत कर आकारणी केली असल्याने रु.28510/- संबंधीताकडून वसुल करुन

मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | मिळकतचे क्षेत्रफळ चौ.फुट | आकारावयाचे कराची रक्कम रु. | प्रत्यक्ष आकारणी केलेला कर रु. | वसुल करावयाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सौ.सरुबाई नागनाथ घोडके, पेठ क्र.62 | अनाधिकृत बांधकाम मंगल कार्यालय तळ मजला | 1632 | 48393/- | 21507/- | 26886/- |
| 2. | श्री.अमोल सिद्रामप्पा माळगे, दहिटणे | व्यापारी व रहिवासी इमारत | 838 | 4872/- | 3248/- | 1624/- |
| | एकूण | | | 53265/- | 24755/- | 28510/- |

2) श्री.मोहन शिवाजी चव्हाण, मजरेवाडी, सिध्देश्वरनगर यांनी बांधकाम परवाना घेवून बांधकाम करण्यात आलेले आहे. परंतु बांधकाम वापर परवाना पत्र न घेता बांधकामाचा वापर करण्यात आला आहे. बांधकाम परवाना पत्रामध्ये किती चौ.फुटास बांधकाम परवाना दिला आहे याचा उल्लेख करण्यात आला नाही. त्यामुळे त्यांनी बांधकाम परवान्यानुसार देणेत आलेल्या क्षेत्रफळानुसार बांधकाम केले किंवा कसे व त्यानुसार कर आकारणी करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 85, Hmm No : 110)

## *95 श्री.मारुती निवृत्ती नवले अध्यक्ष तथा सचिव सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केगाव यांना मालमत्ता कर कमी आकारणी केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 807719.00/-

***श्री.मारुती निवृत्ती नवले अध्यक्ष तथा सचिव सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केगाव यांचे 2012-13 आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता कर निर्धारण तक्त्यानुसार जुनी इमारत व नविन इमारतीचे एकूण बांधकामावर कर आकारणी करणे आवश्यक असताना जुन्या इमारतीचे बांधकामावरच कर आकारणी करण्यात आली आहे. तसेच जुनी व नविन इमारती हया ज्या दिनांकपासून वापरात आहेत त्या दिनांकापासून कराची आकारणी करणेत आली नाही. तसेच संबंधीताकडून कमी आकारणेत आलेली कराची रक्कम रु. 807719/- वसुल केली नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे कर संकलन हद्दवाढ विभागातील सन 2012-13 या आर्थिक वर्षातील कर निर्धारण प्रकरणाची तपासणी केली असता खाली नमूद केलेनुसार मालमत्ता कर कमी आकारल्याचे आढळुन आले. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 112 दि.24/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.विकास/हवा/188 दि.10.8.2015 अन्वये आक्षेपात नमूद केलेनुसार फरकाचे बील संबंधीत संस्थेस बजावणेत आले आहे असे खात्याने कळविले आहे. आक्षेपाची पूर्तता झाली नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

श्री.मारुती निवृत्ती नवले अध्यक्ष तथा सचिव सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केगाव यांचे मालमत्ता कर आकारणी ही वार्षिक भाडयानुसार करणे आवश्यक आहे. कर निर्धारण तक्त्यामध्ये बांधकामानुसार कर आकारणेसाठी वार्षिक भाडयाच्या रकमेची परिगणना बरोबर करण्यात आली आहे. परंतु दप्तरी हुकूमाची नोंदवहीमध्ये वार्षिक भाडयाची रक्कम ही जुनी वार्षिक भाडयाची रक्कम नमूद करुन त्याप्रमाणे कर आकारणी करण्यात आली आहे. त्यामुळे कर निर्धारणा तक्त्यानुसार 2012-13 आर्थिक वर्षामध्ये नविन मालमत्तांची वार्षिक भाडयानुसार कर आकारणी करण्यात आली नाही. जुनी इमारत व नविन इमारतीचे बांधकाम असे एकूण बांधकामावर 2012-13 आर्थिक वर्षामध्ये कर आकारणी करणे आवश्यक होते. तसेच जुनी व नविन इमारती हया ज्या दिनांकपासून वापरात आहेत त्या दिनांकापासून कराची थकबाकी संबंधीताकडून कर आकारणी करणे आवश्यक होते. परंतु संबंधीताकडून कराची आकारणी कमी करण्यात आली. याबाबत सविस्तर तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मिळकत क्र. | वार्षिक भाडे | वार्षिक कर 64 टक्के | बांधकाम वापर कालावधी | कर वसुल करावयाची रक्कम रु. | मागणी केलेली कराची रक्कम रु. | फरक रककम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 551303 | 292039 | 186905 | 1/2011 ते 3/2013 (27 महिने) | 420535 | 420535 | -- |
| | | 508209 | 325254 | 11/2011 ते 3/2013 (17 महिने) | 460780 | 52997 | 407783 |
| 2 | 551304 | 288038 | 184344 | 1/2011 ते 3/2013 (27 महिने) | 414774 | 414774 | -- |
| | | 495191 | 316922 | 11/2011 ते 3/2013 (17 महिने) | 448973 | 49037 | 399936 |
| | एकूण | | 1013425 | | 1745062 | 937343 | 807719 |

तरी वरीलप्रमाण्र संबंधीत संस्थेस सदर मिळकतीवर रु.1013425/- प्रमाणे कर आकारणी अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात यावी. तसेच कमी आकारणेत आलेली रक्कम रु.807719/- वसुल करुन मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावी.

DGPKVSM6101 (Ref No : 86, Hmm No : 112)

## *96 पाणीपट्टी थकबाकी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 245000.00/-

***आर्थिक वर्ष 2010-11 ते 2012-13 मध्ये पाणीपट्टी थकबाकीमध्ये 114284921/- एवढी वाढ झाली आहे. पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन व भत्त्यावर, लाईट बील, मेंटेनन्स, पाणीपुरवठा योजना, कर्जे त्यांचे व्याज, परतावा यामुळे महानगरपालिकेवर मोठया प्रमाणात आर्थिक ताण पडत असताना पाणीपट्टी वसुली ही 30% पेक्षा कमी असल्याने महराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 10 नियम क्र.12 (1)***

***(अ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले. आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये पाणीपुरवठा विभागाचा प्रत्यक्ष खर्च र.रु.33,50,94,592/- इतका झालेला व प्रत्यक्ष जमा र.रु.29,26,88,091/- इतकी आहे. त्यामुळे पाणी पुरवठा विभागामध्ये वित्तीय वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये रु.4,24,06,501/- तुट झाल्याचे दिसुन येते. नगरविकास मंत्रालय शा.नि.क्र. Misc-2009/CR 207/01 UD-20 दि. 02/08/2010 अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचेमार्फत राबविण्यात येत असलेली पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणे आवश्यक आहे. परंतु मनपास वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.4,24,06,501/- तोटा झाल्याचे दिसुन येते. यावरुन पाणीपुरवठा विभाग स्वयंपूर्ण नसल्याचे स्पष्ट होते.***

सोलापूर महानगरपालिकचे शहर व हद्दवाढ भागामधील पाणीपट्टी मागणी, वसुली व थकबाकी यांचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आल्या. याबाबत अर्धसामास ज्ञापन क्रमांक 63 दि. 26/06/2015 अन्वये कळविण्यात आले होते. त्याचे अनुपालन विभागाने सादर केले नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) आर्थिक वर्ष 2010-11 ते 2012-13 या कालावधीमध्ये पाणीपट्टीची थकबाकी रक्कमेमध्ये खालीलप्रमाणे वाढ झाल्याचे आढळून आले. आर्थिक वर्ष 2010-11 अखेर थकबाकी रु.33,50,30,858/- एवढी होती, ती 2012-13 अखेर रु.44,93,15,779/- झाल्याने थकबाकीमध्ये 114284921/-एवढी वाढ झाली आहे.

2) पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन व भत्त्यावर, लाईट बील, मेटेंनन्स, पाणीपुरवठा योजना, कर्जे त्यांचे व्याज, परतावा यांमुळे महानगरपालिकेवर मोठया प्रमाणात आर्थिक ताण पडत असताना पाणीपट्टी वसुली ही 30% पेक्षा कमी असल्याने पाणी पुरवठा योजना मोठया प्रमाणावर तोटयात असल्याचे स्पष्ट होते.

3) वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये पाणीपट्टी वसुली 30% पेक्षा कमी असल्याने वसुलीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 10 नियम क्र.12 (1) (अ) नुसार पाणीपट्टीचा कोणताही हप्ता मागणीची नोटीस योग्य रीतीने बजावण्यात आल्यानंतर एक महिन्याच्या आत देण्यात कसूर करण्यात आली तर याबाबतीत ज्या जागेस महानगरपालिकेकडून खासगी पाणीपुरवठा करण्यात येत असेल अशी कोणतीही जागा यामधील जोडणारा नळ तोडून टाकण्याची किंवा पाणी बंद करण्याची कार्यवाही करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले.

4) आर्थिक वर्ष 2010-11 अखेर थकबाकी व आर्थिक वर्ष 2011-12 आरंभीची थकबाकी यामध्ये रु.45492251/- तर सन 2011-12 अखेर थकबाकी 2012-13 आरंभीची थकबाकी यामध्ये रु.16749031/- तफावत असल्याचे संगणकीय तक्त्यावरुन दिसुन येते परंतु सदर तफावतीचा मेळ घेतलेला नाही.

5) 1 इंच पेक्षा जास्त नळ आकाराच्या बाबतीतील पाणपट्टी मागणी वसुली थकबाकी तसेच सदर 1 इंचापेक्षा जादा आकारमान मीटर संख्या,वापर प्रकार,बंद मीटर चालु मीटर संख्या इ. माहिती लेखा परीक्षणास सादर केली होती. त्यावरून 1 इंच आकारमानापेक्षा जादा आकारमानाच्या उपभोक्त्याकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी

असल्याचे आढळून आले व 72 मीटर बंद असल्याचे आढळून आले परंतु त्यांच्याकडून मनपा ठराव क्र.400 दि.31/03/2012 नुसार दंडनिय दुप्पट दराने आकारणी केली नसल्याने मनपाचे नुकसान झाले आहे.

6) मुख्यलेखापाल कार्यालयाने सादर केलेल्या वित्तीय वर्ष 2012-13 चे हिशोब व शिल्लक रक्कमांचे नुतनीकरण याबाबतच्या सादर केलेल्या टिप्पणीवरुन पाणीपुरवठा विभागाचा प्रत्यक्ष खर्च र.रु.33,50,94,592/- इतका झालेला व प्रत्यक्ष जमा र.रु.29,26,88,091/- इतकी आहे. त्यामुळे पाणी पुरवठा विभागामध्ये वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.4,24,06,501/- तुट झाल्याचे दिसुन येते. नगरविकास मंत्रालय शा.नि.क्र. Misc-2009/CR 207/01 UD-20 दि. 02/08/2010 अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचेमार्फत राबविण्यात येत असलेली पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणे आवश्यक आहे. परंतु मनापास वित्तीय वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये रु.4,24,06,501/- तोटा झाल्याचे दिसुन येते. यावरुन पाणीपुरवठा विभाग स्वयंपूर्ण नसल्याचे स्पष्ट होते.

7) पाणी पुरवठा विभागाचे वित्तीय वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षाचे पाणी लेखापरीक्षण (वॉटर ऑडीट) करण्यात आले होते किंवा कसे याची माहिती अर्धसामास ज्ञापन क्रमांक 63 दि. 26/06/2015 अन्वये मागणी करूनही सदर माहिती लेखापरिक्षणास प्राप्त झालेली नाही.

DATDSAM7301 (Ref No : 106, Hmm No : 63)

## *97 मालमत्ता कर थकबाकी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***वित्तीय वर्ष 2010-11 ते 2012-13 मध्ये थकबाकीमध्ये र.रु.36,37,85,562/- एवढी वाढ झाली आहे. वित्तीय वर्ष 2010-11 अखेर मालमत्ता कराची थकबाकी र.रु.52,89,02,527/- एवढी होती ती वित्तीय वर्ष 2012-13 अखेर रु.89,26,88,089/- एवढी झाली असल्याचे आढळुन आले. महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी यांना फेब्रुवारी 2011 पासुन 6 वे वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते अदा करण्यात येत असल्याने व जकात बंद झाल्याने महानगरपालिकेचे मालमत्ता कर हे प्रमुख उत्पन्नाचे स्त्रोत आहे परंतु या कराची थकबाकी मोठया प्रमाणात राहिल्याने महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमजोर झाली असल्याचे आढळुन आले. थकबाकीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 नियम 42 नुसार कर न भरणाऱ्या कसूरदाराची जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करून मालमत्ता कराची थकबाकी***

***वसूल करणे आवश्यक आहे परंतु महानगरपालिकेने सन 2012-13 मध्ये अशी कार्यवाही केली नाही***

1) सोलापूर महानगरपालिकेकडील शहर व हद्दवाढ या भागातील मालमत्ता करांची मागणी, वसुली व थकबाकी यांचा वित्तीय वर्ष 2010-11, 2011-12 व 2012/13 या कालावधीचा आढावा घेतला असता या सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये नमुद असलेप्रमाणे मालमत्ता कराची थकबाकी मोठया प्रमाणात असुन वसुली टक्केवारी कमी असल्याचे आढळुन आले. त्यामुळे वित्तीय वर्ष 2010-11 ते 2012-13 मध्ये थकबाकीमध्ये र.रु.36,37,85,562/- एवढी वाढ झाली आहे. वित्तीय वर्ष 2010-11 अखेर मालमत्ता कराची थकबाकी र.रु.52,89,02,527/- एवढी होती ती वित्तीय वर्ष 2012-13 अखेर रु.89,26,88,089/- एवढी झाली असल्याचे आढळुन आले.
2) महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी यांना फेब्रुवारी 2011 पासुन 6 वे वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते अदा करण्यात येत असल्याने व जकात बंद झाल्याने महानगरपालिकेचे मालमत्ता कर हे प्रमुख उत्पन्नाचे स्त्रोत आहे परंतु या कराची थकबाकी मोठया प्रमाणात राहिल्याने महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमजोर झाली असल्याचे आढळुन आले. थकबाकीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 8 नियम 42 नुसार कर न भरणाऱ्या कसूरदाराची जंगम मालमत्तेची अटकावणी व विक्री करून मालमत्ता कराची थकबाकी वसूल करणे आवश्यक आहे परंतु महानगरपालिकेने सन 2012-13 मध्ये अशी कार्यवाही केली नाही त्यामुळे थकबाकीमध्ये वाढ झली आहे.
3) संगणकीय विवरण पत्रामध्ये नमुद असले प्रमाणे वित्तीय वर्ष 2010-11 अखेर थकबाकी र.रु.52,89,02,527/- असताना वित्तीय वर्ष 2011-12 मध्ये आरंभी थकबाकी र.रु.60,73,37,781/- दाखविली आहे. तरी यामध्ये रक्कम रु.7,84,35,254/- ची तफावत आहे. तसेच वित्तीय वर्ष 2011-12 अखेर थकबाकी रु.71,81,45,133/- असताना ती वर्ष 2012-13 मध्ये आरंभी थकबाकी रु.84,86,32,784/- दाखविली आहे. त्यामध्ये रु.12,98,87,651/- ची तफावत आहे. परंतु सदर तफावतीचा मेळ घेतलेला नाही. तरी तफावतीचा मेळ घेणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 107, Hmm No : 119)

## *98 कर संकलन रक्कम जमा करण्यात येत असलेल्या बँक खात्याचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारन व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेच्या शहर व हद्दवाढ भागाकडून वसूल करण्यात आलेल्या विविध करांच्या रकमा मुख्य लेखापाल कार्यालयात जमा न करता त्या विभागाकडून बँकामध्ये परस्पर जमा केल्या जातात. परंतु सदर बॅक खात्यातून खर्च करण्यात आलेल्या रक्कमांची नोंद रोखवहीत घेतली जात नाही. तसेच सदर बँक खात्यातील शिल्लक रक्कमेचा ताळमेळ वित्तीय वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये घेण्यात आल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या शहर व हद्दवाढ भागाकडून वसूल करण्यात आलेल्या विविध करांच्या रकमा मुख्य लेखापाल कार्यालयात जमा न करता त्या विभागाकडून खालील बँकामध्ये परस्पर जमा केल्या आहेत.

| अ.क्र. | भागाचे नाव | कराचे नांव | बँकेचे नाव | खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | शहर विभाग | मनपा कर | आयसीआयसीआय | 019905850013 |
| 2 | शहर विभाग | सरकारी कर | आयसीआयसीआय | 019905850060 |
| 3 | शहर विभाग | निवासी कर | आयसीआयसीआय | 019905850067 |
| 4 | शहर विभाग | युजर चार्जेस | सिंडीकेंट बँक | 5430214/13 |
| 5 | हद्दवाढ विभाग | सर्व कर एकभत्रित | आयएनजी वैश्य | 526010000093 |

परंतु वरील बँक खात्याची खातेनिहाय स्वतंत्र रोखवही ठेवण्यात आली नसून मुख्य लेखापाल कार्यालयात ठेवण्यात आलेल्या जमा किर्दीस सदर करांच्या जमा रक्कमांची नोंद घेतली जाते. परंतु सदर बॅक खात्यातून खर्च करण्यात आलेल्या रक्कमांची नोंद रोखवहीत घेतली जात नाही. तसेच सदर बँक खात्यातील शिल्लक रक्कमेचा ताळमेळ वित्तीय वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये घेण्यात आल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले नाही.  याबाबत अर्धसमास पत्र क्र. 124 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 13/08/2015 रोजी सादर केले असुन वरील बँक खात्यातील शिल्लक रकमेशी ताळमेळ घेण्याची कार्यवाही मुख्यलेखापाल कार्यालयाच्या मार्फत करण्याची दक्षता घेत असल्याचे नमुद केले आहे.

राष्ट्रीय लेखा संहिता नियमावली 2005 मधील परिच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार दरमहा रोखही, बँक पासबुक / बँक विवरणपत्र याचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. परंतु विभागांनी किंवा मुख्य लेखापाल कार्यालयाने वरील बँक खात्यातील शिल्लकेबाबत ताळमेळ घेतला नाही.

DATRNDM7201 (Ref No : 115, Hmm No : 124)

## *99 बांधकाम वापर परवानाधारकाकडून कामगार कल्याण उपकर वसुल न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 3**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2364393.00/-

***माहे मार्च 2013 मध्ये बांधकाम वापर परवाना देणेत आलेल्या मिळकतधारकाकडून बांधकामाच्या किंमतीच्या 1 टक्का रक्कम रु. 2364393/- वसुल केलेली नाही. तसेच सन 2012-13 मध्ये मार्च 2013 मध्ये देणेत आलेले बांधकाम वापर परवाना वगळुन इतर मिळकतधारकाकडून उपकर वसुल करण्यात यावा. शासन निर्णयानुसार उपकर रक्कमेवर प्रतिमहा 2 टक्के व्याजाची वसुल करण्यात यावा.***

सोलापूर महानगरपालिका बांधकाम परवाना विभागाकडील बांधकाम वापर परवान्याची नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 81 दि. 09/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/बां.प./1096 दि.14.08.2015 अन्वये सदर बाब इकडील कार्यालयास ज्ञात नव्हती त्यामुळे उपकर वसुली झालेली नाही. प्रलंबित प्रकरणाची वसुली करण्यात येत आहे असे खात्याने कळविले आहे. आक्षेपाची पूर्तता झाली नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)सोलापूर महानगरपालिकेने जी बांधकामे पूर्ण झाली आहेत व ती वापरण्यास योग्य आहेत त्यांना 2012-13 मध्ये एकूण 250 आर.आर.सी. बांधकाम वापर परवाना देणेत आले आहेत. त्यापैकी माहे मार्च 2013 मध्ये 23 वापर परवाना देण्यात आले असून त्याचे क्षेत्रफळ 24,518.78 चौ.मी. आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दि. 17/06/2010 नुसार बांधकामाचे मुल्यावर 1 टक्का उपकर वसुल करावयाचा आहे. परंतु सोलापूर मनपाने बांधकाम वापर परवानाधारकाकडून बांधकामाच्या मुल्याच्या 1 टक्का उपकर वसुल केलेला नाही. बांधकामाचे किंमत ही महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या दरानुसार खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | वापर परवानाची संख्या | दर प्रति चौ.मी. रु. | क्षेत्रफळ चौ.मी. | बांधकामाची किंमत रु. | वसुल करवयाची 1टक्के उपकर रु. |
|---|---|---|---|---|---|---|

Solapur (M Corp.)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2011 | 6 | 8500/- | 6003.11 | 51026435/- | 510264/- |
| 2. | 2012 | 15 | 10000/- | 18259.51 | 182595100/- | 1825951/- |
| 3. | 2013 | 2 | 11000/- | 256.16 | 2817760/- | 28178/- |
| | एकूण | 23 | | 24518.78 | 236439295/- | 2364393/- |

वरील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कामगार कल्याण उपकर रक्कम रु.2364393/- संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

2) 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये माहे मार्च 2013 वगळुन इतर बांधकाम वापर परवाना देण्यात आलेल्या बांधकाम परवान्याच्या वर्षानुसार कामाची किंमत काढून बांधकाम किंमतीची परिगणना करुन त्याचेवर 1 टक्का रक्कम उपकर संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

3) उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकराची रक्कम न भरल्यास असे मालक उपकराच्या रक्कमेवर प्रतिमहा किंवा ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत अशा तारखेपासून 2 टक्के व्याजाची रक्कम वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी.

DGPKVSM6101 (Ref No : 79, Hmm No : 81)

## *100 मोकळया जागेतील ले आऊट मंजूरीतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 4**

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***श्री नाकोडा इरेक्टर्स् चे भागीदार शंकरलाल मेहता, कसबे सोलापूर स.नं.173/2/2 अंतिम ले आऊट प्लॉटींगमधील ड्रेनेजचे अंदाजपत्रकिय किंमत किती होती त्याची रक्कम संबंधीताने मनपाकडे जमा केल्याची माहिती लेखापरिक्षणास दाखविण्यात आली नाही. श्री नाकोडा इरेक्टर्स् चे भागीदार शंकरलाल मेहता यांनी एकूण प्लॉटचे क्षेत्रफळाचे 10 टक्के मोकळया जागा दोन ठिकाणी सोडण्यात आली असून त्या मोकळया जागेची लांबी ही रुंदीच्या 2.5 पट असणे आवश्यक असताना मोकळया जागेची लांबी ही रुंदीच्या 8.28 व 5.63 पट सोडण्यात आली आहे हे नियमबाहय आहे. श्री.दिलिपकुमार हरिभाऊ व इतर तीन, सोरेगांव व श्री सुनिल उत्तमराव कुर्डे मौजे शेळगे स.नं.80/4 यांचे ले आऊट मंजूर करताना सोलापूर मनपा विकास नियमावलीमधील*** |

***नियम क्र.22.1 नुसार मोकळया जागेच्या 10 टक्के 420 चौ.मी. जागा सोडून प्लॉटींग करणे आवश्यक असताना 312.53 चौ.मी. जागा सोडल्याने 107.47 चौ.मी. जादा प्लॉटींग करण्यात आले आहे. मे.सरस्वती रिअल इस्टेट तर्फे श्री.सुहास सु. जोशी व अभिजित प्र. बनसोडे, सोरेगांव स.नं. 151/2 अंतिम लेआऊट मंजूर करताना प्लॉटींगमधील 300 मीटरपेक्षा जास्त रस्त्याची लांबी असल्यास सदर रस्ता हा 12 मी.रुंदिचा करणे आवश्यक असताना 9 मी रुंदिचा रस्ता तयार केला आहे.***

सोलापूर महानगरपालिके अंतर्गत असणारे नगर रचना विभागामार्फत माहे मार्च 2013 मध्ये मोकळया जागेतील ले आऊट नस्तींची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आल्या. याबाबत खात्यास अर्धसमास पत्र क्र.82 दि. 09/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) श्री नाकोडा इरेक्टर्स् चे भागीदार शंकरलाल मेहता, कसबे सोलापूर स.नं.173/2/2 अंतिम ले आऊट आदेश क्र.250 दि.21/12/2012 ची नस्तीची तपासणी करण्यात आली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आल्या.

अ) सदर प्लॉटींगमधील ड्रेनेजचे अंदाजपत्रकिय किंमतीचे प्रथम हप्ता रक्कम रु.3,11,221/- पावती क्र.0166176 दि.09/10/2012 अन्वये कोठे जमा केली आहे. उर्वरित हप्त्याची रक्कम जमा केल्याची पावती नस्तीमध्ये अढळ होत नाही. तसेच ड्रेनेजची अंदाजपत्रकिय रक्कम किती होती याचा उल्लेख करण्यात आला नाही. तरी अंदाजपत्रकिय रक्कम व उर्वरित रक्कम संबंधीताने मनपाकडे जमा केल्याची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

ब) सोलापूर मनपा विकास नियमावलीमधील नियम क्र.22.1(c) नुसार एकूण प्लॉटचे 10 टक्के मोकळया जागेची लांबी ही रुंदीच्या 2.5 पट असणे आवश्यक आहे. परंतु सदर प्लॉटमध्ये दोन ठिकाणी मोकळी जागा सोडण्यात आली आहे. एका मोकळया जागेची लांबी ही 89.68 मी. असून दोन रुंदीची मापे ही एका बाजूस 13.62 मी. व दुस-या बाजूस 8.05 मी. असून सरासरी रुंदी 10.84 मी. इतकी आहे. सरासरी रंदीच्या 2.5 पट 27.08 मी. इतकी लांबी असणे आवश्यक होती. परंतु प्रत्यक्षात सरासरी रुंदीच्या लांबी 8.28 पट लांबी घेण्यात आली आहे. दुस-या मोकळया जागेची लांबी ही 87.25 मी. असून त्याचे दोन रुंदीची मापे ही एका बाजूस 20.20 मी. व दुस-या बाजूस 10.80 मी. असून सरासरी रुंदि 15.50 मी. इतकी आहे. सरासरी रंदीच्या 2.5 पट 38.75 मी. इतकी लांबी असणे आवश्यक होती. परंतु प्रत्यक्षात सरासरी रुंदीच्या लांबी 5.63 पट सोडण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.

2) श्री.दिलिपकुमार हरिभाऊ व इतर तीन, सोरेगांव यांचे अंतिम ले आऊट मंजूर क्र.215 दि.20.11.2012 नुसार ले आऊट मंजूर करण्यात आला आहे. ले आऊट नकाशामधील एकूण जागेचे क्षेत्रफळ 4200 चौ.मी. इतके आहे. सोलापूर मनपा विकास नियमावलीमधील नियम क्र.22.1 नुसार एकूण जागेच्या क्षेत्रफळाचे 10 टक्के जागा मोकळी सोडून इतर जागेमध्ये प्लॉटींग करणे आवश्यक आहे. अंतिम ले आऊट नकाशातील प्लॉटींग व मोकळया जागेचे मोजमापांची तपासणी केली असता सदर प्लॉटचे 10 टक्के जागा 420 चौ.मी.

मोकळी जागा सोडणे आवश्यक होते. परंतु मिळकतदाराने सदर जागेमध्ये 312.53 चौ.मी. इतकी मोकळी जागा सोडून इतर जागेमध्ये प्लॉटींग करण्यात आले आहे. त्यामुळे 107.47 चौ.मी. चे जादा प्लॉटींग करण्यात आले आहे. हे नियमबाह्य आहे.

3) मे.सरस्वती रिअल इस्टेट तर्फे श्री.सुहास सु. जोशी व अभिजित प्र. बनसोडे, सोरेगांव यांचे स.नं. 151/2 मधील अंतिम ले आऊट मंजूर क्र.242/12.12.2012 ची नस्तीची तपासणी करण्यात आली. अंतिम ले आऊट नकाशातील प्लॉटला लागून 502.76 मी. लांबीचा रस्ता असून त्याची रुंदी 9 मी. इतकी आहे. सोलापूर मनपा विकास नियमावतील टेबल क्र.6 नुसार प्लॉटींगमधील 300 मीटरपेक्षा जास्त रस्त्याची लांबी असल्यास सदर रस्त्याची रंदी 12 मी. असणे आवश्यक आहे. परंतु सदर प्लॉटमध्ये 300 मी. पेक्षा जास्त लांबीचा रस्ता हा 9 मी रुंदीचा तयार केला असल्याने तो नियमबाह्य आहे.

4) श्री सुनिल उत्तमराव कुर्डे मौजे शेळगे स.नं.80/4 यांचे अंतिम लेआऊट नकाशा एकूण क्षेत्रफळ 14,100 चौ.मी. आहे. सोलापूर मनपा विकास नियमावलीमधील नियम क्र.22.1 नुसार एकूण जागेच्या 10 टक्के जागा मोकळी सोडून इतर भागामध्ये प्लॉटींग करणे आवश्यक आहे. अंतिम ले आऊट नकाशातील प्लॉटींग व मोकळया जागेचे मोजमापांची तपासणी केली असता सदर प्लॉटचे 10 टक्के जागा 1410 चौ.मी. जागा मोकळी सोडणे आवश्यक होते. परंतु सदर एकूण क्षेत्रफळामध्ये 1360.80 चौ.मी. जागा मोकळी सोडण्यात येवून इतर जागेमध्ये प्लॉटींग करण्यात आले आहे. म्हणजेच 49.20 चौ.मी. चे जादा प्लॉटींग करण्यात आले आहे हे नियमबाह्य आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 80, Hmm No : 82)

## *101 बांधकाम परवाना मिळकतदाराकडून बांधकाम विकास शुल्क वसुल न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1120958.00/-

***बांधकाम विकासकाकडून विकास आकार निवासी बांधकामासाठी मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरानुसार येणा-या मुल्यावर 2 टक्के व वाणिज्यिक बांधकामासाठी 4 टक्के रक्कम वसुल करणे आवश्यक होते. बांधकामासाठी विकास आकार ही मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरानुसार येणा-या 2 टक्के व 4 टक्के रक्कमेपेक्षा कमी आकारण्यात आली आहे. माहे मार्च 2013 मध्ये बांधकाम परवाना देणे आलेल्या विकासकाकडून विकास आकार रक्कम रु.11,20,958/-***

***वसुल करण्यात यावी. सन 2012-13 मध्ये देण्यात आलेल्या मार्च 2013 वगळता उर्वरित बांधकाम परवानावर मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरानुसार बांधकामाच्या मुल्यावर निवासी इमारतीसाठी 2 टक्के व वाणिज्यिक इमारतीसाठी 4 टक्के विकास आकाराची परिगणना करुन वसुल करण्यात यावी.***

सोलापूर महानगरपालिका बांधकाम परवाना विभागातील माहे मार्च 2013 मधील बांधकाम परवाना नस्तीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र. 106 दि. 24/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/बां.प./1263 दि.14.8.2015 अन्वये विकास शुल्क आकारणेत बदल करणेत आलेले आहे ही बाब इकडील कार्यालयास अवगत नसल्याने आकारणी करण्यात आलेली नाही. आता सुधारित तरतुदीनुसार निर्धारित दराने विकास शुल्क आकारणी करणेची कार्यवाही सुरु आहे असे खात्याने कळविले आहे. आक्षेपात नमुद केलेनुसार संबंधीताकडून विकास शुल्क वसुलीची कार्यवाही केली नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 मधील नियम क्र.124ई नुसार ज्यासाठी परवानगी आवश्यक आहे अशा कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा विकास करण्याची अथवा वापर करण्यास सुरुवात करण्याची अथवा त्या वापरात बदल करण्याची इच्छा असणारी कोणतीही व्यक्ती, मग तिने अशा परवानगीसाठी अर्ज केलेला असो अथवा नसो किंवा जिने विकासाच्या अशा कामास प्रारंभ केलेला आहे किंवा त्यात बदल केलेला आहे, ती व्यक्ती अशा विकासाच्या संबंधात देय असलेल्या विकास आकाराची रक्कम देणेस पात्र ठरेल. विकास आकारणी ही मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरांच्या निवासी इमारतीवर 2 टक्के, औद्योगिक इमारतीवर 3 टक्के व वाणिज्यिक इमारतीवर 4 टक्के प्रमाणे करणेत यावी अशी तरतूद आहे.

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणा-या बांधकाम परवाना विभागामार्फत माहे मार्च 2013 मध्ये 62 बांधकाम परवाने देण्यात आलेल्या नस्तीची तपासणी केली असता मनपाने रु.44/- प्रति चौ.मी. प्रमाणे विकास शुल्क आकारणी करुन वसुल केली आहे. वास्तविक पहाता निवासी बांधकामासाठी मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरानुसार येणा-या मुल्यावर 2 टक्के व वाणिज्यिक बांधकामासाठी 4 टक्के रक्कम वसुल करणे आवश्यक होते. बांधकामासाठी विकास आकार ही मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरानुसार येणा-या 2 टक्के व 4 टक्के रक्कमेपेक्षा कमी आकारण्यात आली आहे. सोबत जोडलेल्या **परिशिष्ट क्र.5 नुसार** माहे मार्च 2013 मधील बांधकाम परवानाधारकाकडून रक्कम रु.11,20,958/- कमी वसुल करण्यात आली आहे.

2) सन 2012-13 मध्ये देण्यात आलेल्या उर्वरित बांधकाम परवान्यावर मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरानुसार बांधकामाच्या मुल्यावर निवासी इमारतीसाठी 2 टक्के व वाणिज्यिक इमारतीसाठी 4 टक्के विकास आकाराची परिगणना करुन वसुल करणे आवश्यक आहे.

## *102 बांधकाम परवाना धारकाकडून उपकर व त्यावरील व्याज वसुल केले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 59763896.00/-

***बांधकाम परवानाधारकाकडून बांधकाम मुल्याचे 1 टक्के उपकराची रक्कम रु.3,62,94,559/- वसुल करुन शासनास जमा करण्यात आली नाही. शासन मार्गदर्शक तत्वानुसार उपकराची रक्कम जमा केली नसल्यास प्रतिमहा 2 टक्के व्याज आकारण्याची तरतूद असल्याने बांधकाम परवाना ज्या तारखेस देण्यात आले आहे त्यापुढील महिन्यापासून 2 टक्के प्रतिमहाप्रमाणे लेखा परिक्षणाचे तारखेपर्यंतचे व्याज रककम रु.2,34,69,337/- इतके होत आहे. तरी संबंधीताकडून उपकराची व व्याजाची रक्कम वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी***

सोलापूर महानगरपालिके अंतर्गत असणारे बांधकाम परवाना विभागाचे 2012-13 या आर्थिक वर्षातील बांधकाम परवाना नस्तीची तपासणी केली असता परवानाधारकाकडून उपकर व व्याजाची वसुली करण्यात आली नसल्याचे दिसून आले. याबाबत अर्धसमास पत्र क्र.107 दि. 24/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/बां.प./1264 दि.13.8.2015 अन्वये प्रलंबित प्रकरणांची कामगार कल्याण उपकर वसुल करण्यात येत आहे असे खात्याने कळविले आहे. आक्षेपाची पूर्तता झाली नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र. 108/कामगार 7-अ दिनांक -17 जून,2010 मधील मार्गदर्शक तत्वे क्र.5 नुसार उपकर नियमाच्या नियम, 4(4) अनुसार जेथे बांधकामाकरीता स्थानिक संस्थेची मंजूरी आवश्यक आहे. तेथे अशा मंजूरीकरीता प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जा सोबत मंडळाच्या नांवे उपकरासंबंधीची बांधकामाच्या मुल्याच्या 1 टक्का उपकराची रक्कम संस्थेकडे जमा करणे आवश्यक आहे. उपकराची रक्कम न भरल्यास उपकराच्या रक्कमेवर प्रतिमहा 2 टक्के व्याज भरावे लागेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

सोलापूर महानगरपालिकेमध्ये सन 2012-13 वर्षामध्ये बांधकाम परवाना विभागामार्फत सोबत जोडण्यात आलेल्या **परिशिष्ट क्र. 6 नुसार** एकूण 1793 इतके बांधकाम परवाने देण्यात आली आहेत. सदर बांधकाम

परवानाधारकांचे सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार एकूण क्षेत्रफळ 355395.62 चौ.मी. असून त्याचे शिघ्र गणक पत्रकानुसार त्याचे मुल्य रु.362,94,56,050/- इतके होत आहे. बांधकाम मुल्याचे 1 टक्का उपकराची रक्कम रु.3,62,94,559/- येत असून ती संबंधीताकडून वसुल करुन शासनास जमा करण्यात आली नाही. शासन मार्गदर्शक तत्वानुसार उपकराची रक्कम जमा केली नसल्यास प्रतिमहा 2 टक्के व्याज आकरण्याची तरतूद असल्याने बांधकाम परवाना ज्या तारखेस देण्यात आले आहे त्यापुढील महिन्यापासून 2 टक्के प्रतिमहाप्रमाणे लेखा परिक्षणाचे तारखेपर्यंतचे व्याज रककम रु.2,34,69,337/- इतकी होत आहे. तरी संबंधीताकडून उपकराची व व्याजाची रक्कम रु.5,97,63,896/- वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी अथवा ज्या तारखेस संबंधीत रक्कम जमा करतील त्या तारखेपर्यंत व्याजाची परिगणना करुन रक्कम जमा करण्यात यावी.

DGPKVSM6101 (Ref No : 83, Hmm No : 107)

## *103 डॉ.अंत्रोळीकर मेजर शॉपींग सेंटरमधील भाडयाने दिलेल्या गाळेधारकाकडून भाडे व व्याज वसुल न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 860857.00/-

***गाळे धारकाशी मनपाने केलेल्या करारनाम्यातील अट क्र.5 नुसार गाळेधारकाने भाडे वेळेत भरले नाही तर त्यांचेकडून द.सा.द.शे.15 टक्के प्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात येईल. सदर अटीनुसार डॉ. अंत्रोळीकर मेजर शॉपींग सेंटरमधील गाळेधारकाकडून थकित भाडे रु.57,39,040/- व त्यावरील 2012-13 या आर्थिक वर्षाचे व्याज रु.8,60,857/- वसुल करण्यात आले नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे भूमि व मालमत्ता विभागाने डॉ.अंत्रोळीकर मेजर शॉपींग सेंटरमधील गाळेधारकाशी करारनामा करुन गाळे भाडयाने देणेत आलेले आहेत. गाळेधारकाकडील थकित भाडयाचे अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.113 दि. 24/07/2015 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/भुवमा/609 दि.6.8.2015 अन्वये आक्षेपात नमुद केल्यानुसार संबंधीताना नोटीस देवून थकित भाडे व त्यावरील व्याजाची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करणेत येत आहे असे कळविले आहे. आक्षेपाची पूर्तता केली नसल्याने

लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) डॉ. अंत्रोळीकर मेजर शॉपींग सेंटरमधील गाळे करारनामा करुन भाडयाने देण्यात आलेले आहेत. खालील नमूद केलेले गाळेधारकाकडे दि. 01/04/2012 रोजी भाडयाची रक्कम थकित असून ती दि.31/03/2013 पर्यंत तशीच थकित होती. मनपाच्या मालकीचे गाळयाचे भाडे करारनाम्यातील अट क्र.4 नुसार गाळेधारकाने दरमहाचे भाडे दरमहा 10 तारखेचे आत आगाऊ भरण्याचे आहे. अन्यथा करारनाम्यातील अट क्र.5 नुसार गाळेधारकाने भाडे वेळेत भरले नाही तर त्यांचेकडून द.सा.द.शे.15 टक्के प्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात येईल अशी तरतूद आहे. गाळेधारकांने वेळेत भाडे भरले नसल्याने रक्कम थकित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 81(क)(1) नुसार गाळेधारकास भाडे देण्याबाबत आदेश देऊ शकतात. परंतु अशी कार्यवाही मनपाने केल्याचे दिसून आले नाही. तरी करारनाम्यातील अटीनुसार संबंधीत गाळेधारकाकडून मनपाने व्याजाची आकारणी करुन थकित भाडे रु.57,39,040/- व त्यावरील 2012-13 या आर्थिक वर्षाचे व्याज रु.8,60,857/- वसुल करण्यात आले नाही. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम क्र.81-क नुसार सबंधीताकडून थकित भाडे व व्याजाची रक्कम वसुल करुन मनपाचे निधीमध्ये जमा करण्यात यावी.

| अ.क्र. | गाळेधारकाचे नाव | गाळा क्र. | दि.1/4/2012 ची थकबाकी रक्कम रु. | सन 2012-13 ची 15 टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | सौ.रेश्मा अनिलकुमार आहुजा | 02 | 98413 | 14762 |
| 2. | श्री.कन्हैयालाल रुपचंद आहुजा | 03 | 94519 | 14178 |
| 3. | श्री. ताराचंद रुपचंद आहुजा | 04 | 42130 | 6320 |
| 4. | श्री. ताराचंद रुपचंद आहुजा | 05 | 303267 | 45490 |
| 5. | श्री. सुरेश शंकर वाघमोडे | 06 | 103042 | 15456 |
| 6. | श्री. गोवर्धन चुनीलाल मर्दा | 07 | 65547 | 9832 |
| 7. | श्री.भालचंद अर्जुनदास आहुजा | 08 | 726 9 | 10903 |
| 8. | सौ.कौसल्या गोविंद होलानी | 09 | 79906 | 11985 |
| 9. | श्री. गजानन कमलाकर गवई | 10 | 121013 | 18152 |
| 10. | श्री. अनिल लालचंद वाधवानी | 11 | 106266 | 15940 |
| 11. | श्री. नरेश मनोहर हिंदुजा | 12 | 121829 | 18274 |
| 12. | श्री. सुनिल मनोहर हिंदुजा | 13 | 137035 | 20555 |
| 13. | श्री. सर्वज्ञ विद्यानंद शहा | 14 | 53769 | 8065 |
| 14. | श्री. अनिल रामचंद्र अण्णे | 15 | 81357 | 12204 |
| 15. | श्री. राजेश केशवदास कुकरोजा | 16 | 47508 | 7126 |
| 16. | श्री.तुळशीदास केशवदास कुकरेजा | 17 | 82538 | 12381 |
| 17. | सौ.निर्मला नंदकुमार औरंगाबादकर | 18 | 92445 | 13867 |
| 18. | श्री. केशवलाल असानंद पमनानी | 9 | 95050 | 14258 |
| 19. | श्री. आशपाक म.रफीक बागवाना | 20 | 75905 | 11386 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 20. | श्री. गशेश गुलाबचंद बारड | 21 | 282831 | 42425 |
| 21. | श्री. जगदीश ज्ञानदेव बारड | 22 | 85076 | 12761 |
| 22. | श्री. शंकर ईरण्णा बतुल | 24 | 92461 | 13869 |
| 23. | श्री. रवि रामनाथसा बाकळे | 25 | 148630 | 22295 |
| 24. | सौ. रेश्मा अनिलकुमार आहुजा | 26 | 124666 | 18700 |
| 25. | श्री. ताराचंद रुपचंद आहुजा | 27 | 132518 | 19878 |
| 26. | श्री. ताराचंद रुपचंद आहुजा | 28 | 129088 | 19363 |
| 27. | श्री. ताराचंद रुपचंद आहुजा | 29 | 164572 | 24686 |
| 28. | श्री. अमीत अंकुशराव गायकवाड | 30 | 106986 | 16048 |
| 29. | श्री. रमेश महादेव मोहिते | 31 | 100912 | 15137 |
| 30. | मे. कॅनब्रो डिस्ट्रब्युटर्स् | 32 | 106232 | 15935 |
| 31. | मे. कॅनब्रो डिस्ट्रब्युटर्स् | 33 | 140813 | 21122 |
| 32. | समर्थ सहा. बँक लि. | 34 | 105725 | 15859 |
| 33. | समर्थ सहा. बँक लि. | 35 | 120945 | 18142 |
| 34. | समर्थ सहा. बँक लि. | 36 | 123319 | 18498 |
| 35. | समर्थ सहा. बँक लि. | 37 | 129291 | 19394 |
| 36. | समर्थ सहा. बँक लि. | 38 | 127594 | 19139 |
| 37. | समर्थ सहा. बँक लि. | 39 | 132758 | 19913 |
| 38. | श्री. रवि नागनाथसा बाकळे | 40 | 151047 | 22657 |
| 39. | सौ. रेश्मा अनिलकुमार आहुजा | 41 | 96414 | 14462 |
| 40. | श्री. माराचंद रुपचंद आहुजा | 42 | 122334 | 18350 |
| 41. | श्री. माराचंद रुपचंद आहुजा | 43 | 120254 | 18038 |
| 42. | श्री. माराचंद रुपचंद आहुजा | 44 | 125300 | 18795 |
| 43. | श्री. प्रविण मधुकर जैन | 47 | 114951 | 17243 |
| 44. | श्री. अमोल हिरालाल कोठारी | 48 | 49638 | 7445 |
| 45. | श्री. पराग अरुणकुमार कोठारी | 49 | 89538 | 13431 |
| 46. | श्री. पराग अरुणकुमार कोठारी | 50 | 41798 | 21270 |
| 47. | श्री. चंद्रशेखर नागनाथ दासरी | 51 | 77452 | 11618 |
| 48. | श्री. उपेंद्र नागनाथ दासरी | 52 | 56870 | 8531 |
| 49. | श्री. विनायक कृष्णराव बेऊर | 53 | 52161 | 7824 |
| 50. | श्री. जगदीश ज्ञानदेव वारद | 54 | 97024 | 14553 |
| 51 | समर्थ सहा. बँक लि. | 55 | 215614 | 32342 |
| | एकूण | | 5739040 | 8 0857 |

2) तसेच इतर शॉपींग सेंटरमधील देणेत आलेले गाळयांचे थकित भाडयाची माहिती उपलब्ध झाली नसल्याने थकित भाडयावर करारनाम्यातील अटीनुसार व्याजाची आकारणी करुन थकित भाडे व

त्यावरील व्याजाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 87, Hmm No : 113)

## *104 बाजार गाळे भाडयाने देणेत आलेल्या नोंदवहीतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 6**

*अनियमितता कलम : 9ब*

***दि.31.3.2012 अखेर येणे असलेले थकित भाडयाची रक्कम ही सन 2012-13 मध्ये मागील थकबाकीच्या नोंदी करताना दर्शविण्यात रक्कमा यामध्ये तफावत आहे. नोंदवहीमध्ये मागील थकबाकीच्या रकमा शिसपेन्सीलने नमूद करण्यात आल्या आहेत.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे भूमि व मालमत्ता विभगात सन 2012-13 साठी ठेवण्यात आलेल्या मेजर बाजार गाळे नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या अनियमितते बाबत अर्धसमास क्रमांक 108, दि.24/07/15 अन्वये विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने त्यांचेकडील दि.6/08/15 रोजी दिलेल्या उत्तराचा विचार करता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) दि.31.3.2012 अखेर येणे असलेली थकित भाडयाची रक्कम ही सन 2012-13 मध्ये मागील थकबाकीच्या नोंदी करताना रक्कमा कमी/ जास्त नोंदविण्यात आली आहे.

| अ.क्र. | शॉपींग सेंटरचे नाव | गाळा क्र. | गाळाधारकाचे नाव | 2011-12 च्या मागणी नोंदवहीनुसार 31.03.2012 ची थकीत रक्कम रु. | 2012-13 च्या मागणी नोंदवही नुसार नोंदविण्यात आलेली मागील थकबाकीची रक्कम रु. | कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | लालबहादुर | 6 | म. मो. राजनी | 18498 | 28074 | (+)9576 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 13अ | कुमार ग्यामलानी | 4974 | -- | (-) 4974 |
| | | 47 | प्र.म.ठाकूर | 3144 | 5970 | (+)2826 |
| | | 48 | प्र.म.ठाकूर | 3840 | 6660 | (+) 2820 |
| | | 51 | पा.सु.जैन | -- | 7898 | (+) 7898 |
| | | 52 | म.मो. राजनी | -- | 21033 | (+) 21033 |
| 2. | आंत्रोलीकर | 13 | सु.म. हिंदुजा | 48348 | 64348 | (+) 16000 |
| | | 46 | समर्थ बँक | 36258 | 3625 | (-) 32633 |
| 3. | सह्याद्री | 64 | मु.सं.वाले | 101667 | 19692 | (-) 81975 |
| | | | सौ.अनिता पलंगे | 1296 | -- | सदरचे नाव सन 2012-13 मध्ये नोंदवहीत नोंदविण्यात आले नाही. |
| 4. | सुंदरमनगर | 7 | प्रशासन अधिकारी प्राथमिक शिक्षण मं. | 500304 | -- | (-)500304 |
| 5. | नविन सुंदरमनगर | 55 | विक्रांत अ. शहा | 1656 | -- | (-) 1656 |
| | | 56 | म.मो.व्हटकर | 14032 | -- | (-) 14032 |
| | | 57 | गि.वा.किणीकर | 670 | -- | (-) 670 |
| | | 58 | मु.इ.खान | 2328 | -- | (-) 2328 |
| | | 60 | शौ. क. महमद | 1946 | -- | (-) 1946 |
| | | 61 | अ.प्र.दोशी | 5700 | -- | (-) 5700 |
| | | 62 | योगेश नंदलाल | 2484 | -- | (-) 2484 |
| | | 64 | शु.म. जैन | 6706 | -- | (-) 6706 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 65 | तिलोकचंद बोथरा | 6000 | -- | (-) 6000 |
| | | 66. | सौ.ज.सि.कोकुर | 17063 | -- | (-) 17063 |
| | | 72. | गौतमचंद जैन | 1687 | -- | (-) 1687 |
| | | 73. | अ.शं.नाडकर्णी | 722 | -- | (-) 722 |
| | | 74. | बा.अ. शेख | 14351 | -- | (-) 14351 |
| | | 75. | कि.ते.चोरडिया | 36288 | -- | (-) 36288 |
| | | 77. | आर. बी. इंडी | 2892 | -- | (-) 2892 |
| | | 79.<br>80.<br>81 | मल्लम्माबाई वल्याळ चरिटेबल ट्रस्ट. | 41987 | -- | (-) 41987 |

2) नोंदवहीमध्ये मागील थकबाकीच्या रकमा शिसपेन्सीलने नमूद करण्यात आल्या आहेत.

3) नोंदवहीतील नोंदीखाली कार्यालय प्रमुखाची सही नसून कार्यालयाचा शिक्का उमटवणेत आला नाही.

4) नोंदवहीतील पाने सिल करण्यात आली नसून शेवटच्या पानावर कार्यालय प्रमुखाचे स्वाक्षरीने नोंदवहीमध्ये किती पाने आहेत याबाबत प्रमाणपत्र देणेत आलेले नाही.

5) नोंदवहीमध्ये थकबाकी, चालू मागणी व अखेरची थकबाकी याबाबत गोषवारा काढणेत आला नाही. त्यामुळे वर्षा अखेरीस एकूण चालू मागणीसह थकबाकीची रक्कम किती होती याबाबत खात्री करता आली नाही.

6) 2011-12 मधील पाने फाटलेली असल्याने त्या पानावरील नमूद केलेल्या गाळेधारकांची अखेरीची थकबाकी किती होती व ती थकबाकी सन 2012-13 चे नोंदवहीमध्ये बरोबर घेण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

DATDSAM7301 (Ref No : 142, Hmm No : 108)

## *105 मंडई विभागामार्फत भाडयाने देणेत आलेल्या गाळयाची भाडे वसुली न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1054469.00/-

| |
|---|
| ***मनपाचे मालकिचे गाळे मंडई विभागाने ठराविक मुदतीसाठी करार करुन भाडे तत्वावर देण्यात आले आहेत. सदर कराराची मुदत दि.28/02/2009 रोजी संपलेली आहे. भाडे तत्वावर देण्यात आलेले गाळे ताब्यात घेवून त्याचे चालू बाजारभाव दरानुसार नविन भाडे करार करणे आवश्यक होते. परंतु मनपाने तशी कार्यवाही केलेली नाही. गाळे व ओटेधारकाकडून थकित भाडे रु.70,29,790/- व सदर रकमेवर दरसाल दर शे.15 टक्के प्रमाणे रु.10,54,469/- व्याजाची रक्कम वसुल केली नाही. एकूण गाळयापैकी ओटयापैकी अनुक्रमे 11 गाळे व 688 ओटे भाडयाविना पडून आहेत.*** |

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणा-या मंडई विभागाचे 2012-13 आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता अनियमतता आढळून आल्याबाबत अर्धसमास पत्र क्र.153 दि.31/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मंडई/13/283 दि.5.8.2015 अन्वये अनुपालन सादर केले आहे. अनुपालनाचा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.स्थायी समिती ठराव क्र.2412 दि.28/02/2001 नुसार दि.01/04/1999 पासून प्रति चौरस फुटाप्रमाणे वेगवेगळया ठिकाणचे बाजार गाळयासाठी दर मंजूर करण्यात आले आहेत. सदर भाडयाचा कालावधी हा दि.01/04/1999 पासून 9 वर्षे 11 महिने असा मंजूर करण्यात आला आहे. ठरावात नमुद केल्यानुसार सदर गाळयांचे भाडे कराराचा कालावधी दि.28/02/2009 रोजी संपला आहे. मंडई विभागाने दिलेल्या माहितीनुसार एकूण 380 गाळयापैकी 337 गाळेधारकांशी नविन करार करण्यात आला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम क्र.79 नुसार भाडयाने देण्यात आलेल्या कराराची मुदत संपल्यानंतर मनपाने ते गाळे ताब्यात घेवून त्याचे बाजारभावानुसार नविन करार करणे आवश्यक आहे. मनपाने तसे न करता ते गाळे लेखापरीक्षण कालावधीपर्यंत त्या गाळेधारकाच्या ताब्यात ठेवण्यात आले आहेत. तसेच सदर गाळेधारकाकडून कराराची मुदत संपल्याचे तारखेपासून आजअखेर किमान चालू बाजारभाव दरानुसार भाडयाची रक्कम वसुल करणे आवश्यक होते. परंतु मनपाने तशी कार्यवाही न करता जुन्याच दराने भाडे वसुलीची कार्यवाही केली आहे.

जुन्या कराराची मुदत संपली असता काही गाळेधारकांनी नवीन करारपत्र करुन घेतलेले नाही. 2011-12 आर्थिक वर्षामध्ये स्थायी समिती ठराव क्र.645 दि.13.9.2011 नुसार मंडईतील सर्व गाळेधारकास प्रचलित दरानुसार गाळे भाडेवाढ करण्यात आलेली आहे व त्यानुसारच गाळे भाडे वसुल करण्यात येत आहे असे खात्याने कळविले आहे. खात्याने कोणत्या दराने भाडे वसुली करण्यात येत आहे याबाबत स्पष्ट खुलासा करण्यात आला नाही. त्यामुळे खात्याचे अनुपालन मान्य करता येत नाही.

2. मनपा मंडई विभागाने दिलेल्या माहितीनुसार 2012-13 या आर्थिक वर्षाअखेर मनपाने भाडयाने देण्यात आलेल्या गाळे व ओटेधारकाकडे रक्कम रु.70,29,790/- इतके भाडे थकित आहे. भाडेधारकाशी केलेल्या करारमधील अट क्र.4 नुसार भाडे दरमहाचे 10 तारखेस आगाऊ भरणे आवश्यक आहे. अन्यथा अट क्र.5 नुसार

गाळे व ओटेधारकाने मुदतीत भाडे न भरल्यास सदरच्या भाडयाची रक्कमेवर रक्कम भरणा केल्याचे तारखेपर्यंत द.सा.द.शे. 15 टक्के प्रमाणे व्याजाची आकारणी करणेत येईल अशी तरतूद आहे. त्यानुसार गाळे व ओटेधारकाकडे 2012-13 अखेर थकित भाडे रु.70,29,790/- इतके असून सदर रकमेवर 2012-13 वर्षाचे दरसाल दर 15 टक्के प्रमाणे रु.10,54,469/- व्याजाची रक्कम होत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम क्र.81-क नुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु मनपाने अधिनियमानुसार कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. तरी संबंधीत गाळे व ओटेधारकाकडून भाडे व त्यावरील व्याजाची रक्कम ते भरणा केल्याचे तारखेपर्यंत परिगणना करुन वसुल करुन मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावी.
3. मंडई विभागाने दिलेल्या माहितीनुसार एकूण 1985 ओटयापैकी 688 ओटे व 391 गाळयापैकी 11 गाळे हे 2012-13 अखेर भाडयाविना पडून आहेत. त्यामुळे ओटे व गाळे भाडयाने न दिल्याने चालू बाजारभावानुसार मनपाचे नुकसान होत आहे.

ओटे नादुरुस्त असून ती दुरुस्त करुन भाडयाने देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गाळेही भाडयाने देण्याची कार्यवाही करणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 89, Hmm No : 153)

## *106 उद्यान विभागामार्फत लोखंडी बाकडे खरेदीतील अनियमततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 6**

*अनियमितता कलम : 9ब*
आक्षेपाधीन रक्कम रु. 3950375.00/-

***मनपाने खरेदी करण्यात आलेले 2873 लोखंडी बाकडे वितरीत केल्याचे व बसविल्याचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. पुरवठा आदेश देणेपूर्वीच 1357 बाकडे पुरवठा केले आहेत. 2873 बाकडे खरेदीबाबत मनपाची प्रशासकिय मान्यता घेणेत आल्याचे दिसून येत नाही. जाहिर निविदा पहाता जाहिरातीमध्ये बाकडयाचा तपशील देण्यात आलेला नाही. निविदाधारकाने व्यवसाय नोंदणी केलेली प्रमाणपत्रे निविदा नस्तीमध्ये अढळ होत नाही. 727 वाढीव लोखंडी बाकडे पुरवठा आदेशाची प्रत नस्तीमध्ये अढळ होत नाही***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणा-या उद्यान विभागाचे 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खरेदी करण्यात आलेल्या लोखंडी बाकडे खरेदीबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

लोखंडी बाकडे खरेदीसाठी मनपाने दै.नालींदा या वृत्तपत्रामध्ये दि.29/08/2012 रोजी जाहिर निविदा

मागविण्यात आले होती. निविदा सादर करण्याचा कालावधी दि.29/08/2012 ते 11/09/2012 असा होता. जाहिर निविदानुसार 5 मक्तेदाराने निविदा सादर केल्या असून त्यापैकी 3 निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविण्यात आल्या आहेत. पात्र निविदाधारकाने दिलेल्या दराची तुलना करुन लघुत्तम दराचे निविदाधारक मे.एशियन एजन्सीज, सोलापूर यांचेशी वाटाघाटी करुन दर रु.1375/- प्रति नग प्रमाणे निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदरची निविदा स्थायी समिती ठराव क्र.386 दि.31/12/2012 अन्वये मंजूर करुन त्यांना आदेश क्र.उद्यान/1196 दि.19/01/2013 अन्वये लोखंडी बाकडे पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत. उद्यान विभागामार्फत लोखंडी बाकडे खरेदी कामाची नस्ती व साठानोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.154 दि.31/07/2015 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.ब/338/643 दि.13.8.2015 अन्वये अनुपालन सादर केला आहे. खात्याने सादर केलेले अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मक्तेदाराने पुरवठा केलेले 789 लोखंडी बाकडे प्राप्त झाल्याची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आली नाही. तसेच बाकडे बसविल्याबाबतचा अहवाल नस्तीमध्ये अढळ होत नाही. त्यामुळे खरेदीवर रु.1375/- प्रतिनग प्रमाणे रु.10,84,875/- खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

नगरसेवकाचे मागणीनुसार वार्डात बाकडे बसविण्यात आले आहेत व त्यांची पोहोच घेण्यात आल्याचे खात्याने कळविले आहे. अनुपालनासोबत अभिलेखे सादर केले नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

2) मनपाने पुन्हा त्याच मक्तेदाराकडून 727 व 1357 असे एकूण 2084 लोखंडी बाकडे खरेदी केले आहेत. सदर बाकडयाच्या नोंदी हया साठानोंदवही पान क्र.174 वर घेण्यात आल्या आहेत. परंतु सदर बाकडे वितरीत केल्याच्या नोंदी घेण्यात आल्या नाहीत. तसेच सदरचे बाकडे बसविल्याचा अहवाल नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी वाढीव लोखंडी बाकडयावर रु.1375/- प्रतिनगप्रमाणे केलेला खर्च रु.28,65,500/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) पुनर्प्रत्यायी आदेश क्र.1551 दि.28/03/2013 अन्वये 1357 बाकडे पुरवठा करणेबाबत मक्तेदारास आदेश देण्यात आले आहेत. मक्तेदाराकडील डीलीव्हरी चलनाची तपासणी केली असता त्यांनी सदर बाकडे दि.26/03/2013 रोजी पुरवठा केल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर बाकडयाची नोंदवहीमध्ये दि.26/03/2013 रोजी प्राप्त झाल्याचे नोंद करण्यात आली आहे. यावरुन मक्तेदारास बाकडे पुरवठा आदेश देणेपूर्वीच बाकडे पुरवठा केले आहेत. हे नियमबाहय आहे.

4) 2873 बाकडे खरेदीबाबत मनपाची प्रशासकिय मान्यता घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. तरी प्रशाकिय मान्यता घेतल्याचे लेखापरीक्षणास दाखविण्यात यावी.

5) सदर कामाची जाहिर निविदा पहाता जाहिरातीमध्ये बाकडयाचा तपशील देण्यात आलेला नाही. उदा.बाकडयाची साईज, पत्र्याचा गेज, बसवून देण्याची कार्यवाही, आवश्यक नग, कोणी निविदा सादर करावी, कामाची अंदाजे किंमत इ.तपशील. मक्तेदाराकडून कामाच्या किंमतीचे 1 टक्के बयाणा रक्कम घेणे आवश्यक होते. परंतु मनपाने सदरची निविदा ही मनपास बाकडे पुरवठयाबाबत मोघम स्वरुपात जाहीरात देवून अंदाजे बयाणा रक्कम रु.8000/- भरण्यात यावी अशी जाहिरात देण्यात आली आहे.

Solapur (M Corp.)

6) मक्तेदारास 727 बाकडे पुरवठा आदेश दिल्याचे आदेशाची प्रत नस्तीमध्ये अढळुन आली नसून लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 90, Hmm No : 154)

## *107 आवेक्षक पदावरील 5 वर्षाच्या सेवेनंतर केलेल्या वेतन निश्चितीबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेकडील ज्या आवेक्षकांची 5 वर्षे सेवा सन 2006 नंतर पूर्ण झाली आहे अशा आवेक्षकांना 6 व्या वेतन आयोगामध्ये दि.01/01/2006 रोजी रु.4300 ग्रेड वेतन मंजूर केले आहे व त्यानंतर 5 वर्षे पूर्ण झालेल्या दिनांकास रु.4400/- ग्रेड वेतन मंजूर केले आहे व एक वेतनवाढ देवून वेतन निश्चिती केल्याचे आढळून आले. परंतु अशा आवेक्षकांची अशी 5 वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर पदामध्ये व जबाबदारीमध्ये बदल होत नसल्याने व हि पदोन्नती नसल्याने 6 व्या वेतन आयोगामध्ये फक्त पुढील ग्रेड वेतन देणे आवश्यक असताना पुढील ग्रेड वेतन व एक वेतनवाढ जादा दिल्याने खालील आवेक्षकांना जादा वेतन व भत्त्याचे प्रदान होत असल्याचे आढळून आले.***

सोलापूर महानगरपालिकेकडील आवेक्षकाना 5 वे वेतन आयोगानुसार रु.5500-175-9000 ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. सदर आवेक्षक यांची 5 वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर त्यांना 5 वे वेतन आयोगानुसार रु.6500-200-10500 ही वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सदर वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती करताना महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन) नियम 1981 चे नियम 11 (2) प्रमाणे वेतनवाढ न देता रु.6500-200-10500 या वेतनश्रेणीतील पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती केली आहे व ती बरोबर आहे. परंतु ज्या आवेक्षकांची अशी 5 वर्षे सेवा सन 2006 नंतर पूर्ण झाली आहे अशा आवेक्षकांना 6 व्या वेतन आयोगामध्ये दि.01/01/2006 रोजी रु.4300 ग्रेड वेतन मंजूर केले आहे व त्यानंतर 5 वर्षे पूर्ण झालेल्या दिनांकास रु.4400/- ग्रेड वेतन मंजूर केले आहे व एक वेतनवाढ देवून वेतन निश्चिती केल्याचे आढळून आले. परंतु अशा आवेक्षकांची अशी 5 वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर पदामध्ये व जबाबदारीमध्ये बदल होत नसल्याने व हि पदोन्नती नसल्याने 6 व्या वेतन आयोगामध्ये फक्त पुढील ग्रेड वेतन देणे आवश्यक असताना पुढील गेड वेतन व एक वेतनवाढ जादा दिल्याने खालील आवेक्षकांना जादा वेतन व भत्त्याचे प्रदान होत असल्याचे आढळून आले. (मनपा कडील कर्मचा-यांना 6

वे वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते ची आकारणी दि.01/02/2011 पासून केली आहे परंतु दि.01/01/2006 ते 31/01/2011 पर्यतच्या फरकांची रक्कम आदा करण्यात आली नाही. त्यामुळे दि.01/02/2011 पासून वेतन व भात्याचे अतिप्रदान झाले आहे.) याबाबत अर्धसमास पत्र क्र. 126 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 01/08/2015 रोजी केले असुन संबंधीत सेवकांचे फेर वेतननिश्चीती करुन घेत असल्याचे नमुद केले आहे. तरी सदर कर्मचा-याची फेरवेतननिश्चीती करुन अतिप्रदान रक्कम वसुल करणे आवश्यक आहे

| अक्र. | आवेक्षकाचे नाव | 5 वर्षे पूर्ण दिनांक | एक वेतनवाढ जादा दिलेला दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | श्री.अशोक रामचंद्र डाके | 01/04/2007 | 01/07/2007 |
| 2 | श्री.बाबनगरे एस.व्ही | 01/04/2006 | 01/07/2006 |
| 3 | श्री.नंदकुमार जगधनी | 1/04/2006 | 01/07/2006 |

वरील उदाहरणे ही चाचणी लेखापरीक्षणात आढळुन आली आहेत. अशा प्रकारच्या उदाहरणांचा शोध घेवून त्याबाबतची अतिप्रदान वसुली करणे आवश्यक आहे.

2) श्री. जगधनी यांची नेमणुक दि.17/04/2000 रोजीची असल्याने त्यांची 5 वर्षे दि.16/04/2005 रोजी पूर्ण होत असल्याने 5 वे वेतन आयोगा मध्ये त्यांना वरिष्ठ श्रेणी रु.6500-200-10500 ही दिनांक 17/04/2005 रोजी देय असताना दि.01/04/2006 रोजी मंजूर केली आहे व दि.01/04/2006 रोजी त्यांचे वेतनश्रेणीमध्ये रु.5500-175-9000 या मध्ये वेतन रु.6550 असल्याने पुढील वेतनश्रेणी रु.6500-200-10500 मध्ये म.ना.से. (वेतन) नियम 1981 चे नियम 11 (2) प्रमाणे त्यांचे वेतन रु.6700/- निश्चीत करणे आवश्यक असताना रु.6500/- निश्चित केल्याचे आढळून आले.

3) आवेक्षक यांना 5 वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठश्रेणी मंजूर करण्याबाबतचे शासन निर्णयाची प्रत, मनपा ठराव प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नाही.

DATRNDM7201 (Ref No : 112, Hmm No : 126)

## ***108 स्त्री सेवक कर्मचा-यासाठी गणवेश खरेदीबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम  रु. 958880.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 958880.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 43382.00/-

***खरेदी करण्यात आलेल्या  साडया व ब्लॉऊज पीस यांचे साठा नोंदवहीस वाटपानंतर खालील प्रमाणे साडया व ब्लॉऊज पीस शिल्लक असल्याचे आढळुन आले. यावरून कार्यरत सेविकांच्या संख्येनुसारच खरेदी करणे आवश्यक असताना जादा खरेदी केल्याने मनपाचे रु. 43382/-  चे नुकसान झाले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या स्त्री सेवक कर्मचा-यांसाठी 2009/10 व 2010/11 या कालावधी चा गणवेश (साडी व ब्लॉऊज) 2011/12 मध्ये खरेदी करण्यात आला होता. यासाठीची रक्कम पुरवठा धारकांना खालीलप्रमाणे 2012/13 मध्ये अदा करणेत आली असल्याचे आढळून आली.

| अ.क्र. | पुरवठाधारकांचे नाव | रक्कम रु. | प्रमाणक क्र. व  दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | माहेश्वरी साडी सेंटर,इटकल | 790000/- | 208 दि.11/01/2013 |
| 2 | एस गोवर्धनदास ॲन्ड कंपनी | 1,16,880/- | 8482 दि.20/10/2012 |
| 3 | धनलक्ष्मी एंटरप्रायझेस | 52000/- | 8484 दि.20/10/2012 |

याबाबत जाहिर प्रसिध्दी करुन निविदा मागवून खरेदी करण्यात आली. सदर खरेदी नस्ती व साठा नोंदवहीची तपासणी केली व आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 163 दि. 24/08/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 29/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) शा.नि.भाखंस-1088/2512/उदयोग/6, दि.2/1/1992 मधील परि 7 नुसार गणवेश कापड महाराष्ट्र वस्त्रोद्योग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना जाहीर निविदा मागवून खाजगी पुरवठा धारकाकडून खरेदी करण्यात आले आहे.

2) जाहीर निविदा मधील कमी दराच्या निविदाकाराकडून साडया व ब्लॉऊज यांची खरेदी न करता गणवेश समितीने पसंद केलेल्या साडया व ब्लॉऊज पीस सोबत साडया व ब्लॉऊज पीसचे नमुने सादर केलेल्या निविदाकाराकडून निविदेतील दराने खरेदी करण्यात आल्या.

3) खरेदी करण्यात आलेल्या  साडया व ब्लॉऊज पीस यांचे साठा नोंदवहीस वाटपानंतर खालील प्रमाणे साडया व ब्लॉऊज पीस शिल्लक असल्याचे आढळुन आले. यावरून कार्यरत सेविकांच्या संख्येनुसारच खरेदी करणे आवश्यक असताना जादा खरेदी केल्याने मनपाचे रु. 43382/- चे नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | तपशिल़ | प्राप्त संख्या | वाटप संख्या | शिल्लक संख्या | दर रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पांढ-या पॉलीस्टर साडया | 200 | 118 | 82 | 395/- | 32390/- |
| 2 | पांढरे सुती साडया | 160 | 138 | 22 | 320/- | 7040/- |

Solapur (M Corp.)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | रंगीन सुती साडया | 2000 | 2000 | -- | --- | -- |
| 4 | पांढरा सुती ब्लॉऊज | 360 | 256 | 104 | 38/- | 3952/- |
| 5 | रंगीन सुती ब्लॉऊज | 2000 | 2000 | -- | --- | --- |
| | | | | | एकूण | 43382/- |

विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे मुल्य निविदा मागवून खरेदी केल्याने. तसेच प्रत्येकवेळी 10% अपेक्षीत वाढ घालून खरेदी करण्यात आल्याने व सेविकांच्या बदल्या, सेवानिवृत्ती, मयत यामुळे साडया व ब्लॉऊज पीस शिल्लक राहिल्याचे नमुद केले आहे.

DATRNDM7201 (Ref No : 122, Hmm No : 163)

## *109 पुरुष सेवकांसाठी गणवेश कापड खरेदीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1644368.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1644368.00/-

***2008-09 ते 2009-10 करीता घेतलेल्या गणवेशाचे व 2009-10 करीता घेतलेल्या गणवेशाचे कापड पैकी 1) किरमाजी 2340 मीटर 2) पांढरा 661 मीटर 3) मनिला टेरिकॉट 28.50 मीटर 4) निळा शर्टींग 92.50 मीटर व खाकी 1064 मीटर हे गणवेश कापड शिल्लक असल्याचे नमुद केले आहे परंतु सदर शिल्लक कापड विचारात न घेता पुन्हा नव्याने कापड खरेदी करण्यात आले. त्याचे ही वाटप तपासले असता त्यामध्ये ही मार्च 2012 अखेर खालीलप्रमाणे कापड शिल्लक असल्याचे आढळून आले.***

सोलापूर महानगरपालिकेकडील पात्र पुरुष गणवेश कर्मचा-यांसाठी सन 2009-2010 व 2010-11 या कालावधीचे गणवेश 2011-12 मध्ये निविदा पध्दतीने खरेदी करण्यात आले. याबाबत पुरवठा धारक संपतकुमार सोमाणी यांना प्रमाणक क्र.8481 दि. 20 /12/2012 अन्वये रक्कम रु.12,18,665/- व धनलक्ष्मी एंटरप्रायझेस यांना प्रमाणक क्र.8483 दि. 20/12/2012 अन्वये रक्कम रु.4,25,703/- वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये आदा करण्यात आली या खरेदी नस्तीची तपासणी केली व आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 163 दि. 24/08/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 29/08/2015 रोजी सादर केले आहे सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) शा.नि.भाखंस-1088/2512/उदयोग/6, दि.2/1/1992 मधील परि 7 नुसार गणवेश कापड महाराष्ट्र वस्त्रोद्योग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना जाहीर निविदा मागवून खाजगी पुरवठा धारकाकडून खरेदी करण्यात आले आहे.

2) निविदा मागविल्या असतानाही कमी दराची निविदा मंजूर करून त्या मक्तेदाराकडून गणवेश कापड खरेदी न करता गणवेश समितीने निविदाधाराकानी निविदेसोबत सादर केलेल्या गणवेश कापड नमुन्यामधून गणवेषाचे कापड पसंद करून त्याप्रमाणे गणवेश कापड खरेदी केले आहे.

3) सन 2008-09 ते 2009-10 करीता खरेदी करण्यात आलेले रु.8,33397/- चे कापड शिल्लक असल्याने तो साठा वजा करुन उर्वरीत कापडाच्या रक्कम .रु.9,50,000/- या खरेदीस मा.आयुक्त यांनी दि.15/04/2011 रोजी मान्यता दिली होती. परंतु त्या प्रमाणे खरेदी न करता शिल्लक कापड साठा विचारात न घेता रक्कम रु.12,47,600/- च्या खरेदीस दि.06/05/2011 रोजी मान्यता घेवून त्याप्रमाणे गणवेश कापड खरेदी केले आहे.

4) 2008-09 ते 2009-10 करीता घेतलेल्या गणवेशाचे व 2009-10 करीता घेतलेल्या गणवेशाचे कापड पैकी 1)किरमाजी 2340 मीटर 2) पांढरा 661 मीटर 3) मनिला टेरिकॉट 28.50 मीटर 4) निळा शर्टींग 92.50 मीटर व खाकी 1064 मीटर हे गणवेश कापड शिल्लक असल्याचे नमुद केले आहे परंतु सदर शिल्लक कापड विचारात न घेता पुन्हा नव्याने कापड खरेदी करण्यात आले. त्याचे ही वाटप तपासले असता त्यामध्ये ही मार्च 2012 अखेर खालीलप्रमाणे कापड शिल्लक असल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | कापड तपशिल | प्राप्त नग (मीटर) | वाटप नग (मीटर) | शिल्लक नग (मीटर) |
|---|---|---|---|---|
| 1 | खाकी 7.5मीटर | 170X7.5 | 148X7.5 | 22X7.5 |
| 2 | खाकी 6 मीटर | 40X6 | 36X6 | 4X6 |
| 3 | किरमाजी 4 मीटर | 1530X4 | 814X4 | 716X4 |
| 4 | किरमाजी 5 मीटर | 387X5 | 266X5 | 121X5 |
| 5 | पांढरा टेरिकोट 5 मीटर | 145X5 | 89X5 | 56X5 |

सदर मार्च 2012 अखेरील शिल्लक कापड 2012-13 अखेर वाटप केले नसल्याचे आढळून आले.

5) विभागाने दिलेल्या अनुपालनामध्ये जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे मुल्य निविदा मागवून खरेदी केल्याने वस्त्रउद्योग विकास महामंडळ यांचेकडून खरेदी केल्याचे नमुद केले आहे. तसेच प्रत्येकवेळी 10% अपेक्षीत वाढ धरून खरेदी करण्यात आल्याने व सेवकांच्या बदल्या, सेवानिवृत्ती, मयत यामुळे कापड शिल्लक राहिल्याचे नमुद केले आहे. परंतु शिल्लक कापड विचारात घेवून कार्यरत सेविकांच्या संख्ये नुसारच पुढील गणवेषाचे कापड खरेदी करणे आवश्यक आहे.

6) 2012 -13 या वित्तीय वर्षाची गणवेश साठा नोंदवही सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

## *110 अग्निशामक सेवकांसाठी गमबुट खरेदी मधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 50652.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 50652.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5628.00/-

***डकबॅक कंपनीचे विक्रेते वर्ल्डक्लास फुटवेअर पार्कस्टेडीयम, सोलापूर. व पटेल ट्रेडिंग कार्पोरेशन, बार्शी या दोन विक्रेत्यांकडील दरपत्रके मागवून त्यापैकी कमी दराचे दरपत्रक रु.640 + 5% व्हॅट पटेल ट्रेडिंग कंपनी यांचे असल्याने त्यांचे दरपत्रक मंजूर करताना स्थायी समिती ठराव क्र.388, दि.8/07/201 अन्वये खरेदीस मान्यता देण्यात आली. परंतु सदर ठरावामध्ये खरेदी प्रस्तावित दराने अथवा प्रत्यक्ष खरेदी वेळी झालेल्या किंमतीतील बदलानुसार खरेदी करण्यास व याकामी जाहीर प्रसिध्दीकरणाची अट शिथील करण्यास मान्यता देण्यात येत असल्याचे नमुद आहे. यावरुन पुरवठाधारकास किमतीमध्ये वाढ करण्याची संधी देण्यात आल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या अग्नीशामक विभागाकडील सेवकांसाठी 67 जोडी गमबुट 2011-12 मध्ये खरेदी करण्यात आले होते. याबाबतची रक्कम पुरवठा धारक पटेल ट्रेडिंग कार्पोरेशन बार्शी यांना प्रमाणक क्र. 5061 दि. 03/08/2012 अन्वये रु.50,652/- वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये अदा केली.

सदर खरेदी नस्तीचे लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. 161 दि. 24/08/2015 अन्वये कळविण्यात आले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि.29/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदरची खरेदी निविदा पध्दतीने करणेसाठी जाहीर प्रसिद्धीव्दारे प्रथम दि.12/05/2010 रोजी निविदा मागविल्या होत्या परंतु पहिल्या निविदेमध्ये विशिष्ट गमबूट कंपनीचे नाव नमुद नसल्याचे व निविदाधारकांनी नमुना सादर न केल्याने फेरनिविदा मागविण्यात आली. त्यामुळे मनपास फेर जाहीर प्रसिध्दी करण्याचा नाहक भुर्दंड सोसावा लागला. असल्याचे आढळुन आले. तसेच निविदा व फेरनिविदा मागवूनही पुन्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आल्याचे आढळुन आले.

2) . शा.नि.भाखंस-1088/2512/उदयोग/6, दि.2/1/1992 मधील परि 6 नुसार खरेदी पूर्वी संत रोहिदास चर्मोदयोग व चर्मकार महामंडळ यांचेकडील सदर गमबुट पुरवठयाबाबत विचारणा करणे आवश्यक होते. परंतु तशी विचारणा केली नाही.

3) डकबॅक कंपनीचे विक्रेते वर्ल्डक्लास फुटवेअर पार्कस्टेडीयम, सोलापूर. व पटेल ट्रेडिंग कार्पोरेशन, बार्शी या

दोन विक्रेत्यांकडील दरपत्रके मागवून त्यापैकी कमी दराचे दरपत्रक रु.640 + 5% व्हॅट पटेल ट्रेडिंग कंपनी यांचे असल्याने त्यांचे दरपत्रक मंजूर करताना स्थायी समिती ठराव क्र.388, दि.8/07/201 अन्वये खरेदीस मान्यता देण्यात आली. परंतु सदर ठरावामध्ये खरेदी प्रस्तावित दराने अथवा प्रत्यक्ष खरेदी वेळी झालेल्या किंमतीतील बदलानुसार खरेदी करण्यास व याकामी मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) नुसार जाहीर प्रसिध्दीकरणाची अट शिथील करण्यास मान्यता देण्यात येत असल्याचे नमुद आहे. यावरुन पुरवठाधारकास किमतीमध्ये वाढ करण्याची संधी देण्यात आल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.

4) त्यानंतर पुरवठाधारक पटेल ट्रेडिंग कार्पोरेशन, बार्शी यांनी त्यांचे कडील दि.16/07/2011 चे पत्रामध्ये आजच्या गमबुटाच्या रबरचे किंमतीमध्ये वाढ झाल्याकारणाने आम्हांस दरपत्रकानुसाराच्या दरात पुरवठा करता येणार नाही. त्यामुळे तीन कंपनीचे ब्रॅन्डच्या किंमतीचे दर नमुद करुन नवीन दराने वर्क ऑर्डर मिळण्यास विनंती केली. त्याप्रमाणे नवीन दरानुसार खरेदी करण्यास मा.आयुक्त यांनी दि.12/08/2011 रोजी मान्यता दिली. व दिनांक 22/08/2011 रोजी करारपत्र करुन पुरवठा धारकास जा.क्र.साप्र-1/618, दि.30/08/2011 अन्वये तीस दिवसात नवीन दरानुसार 720 + 5% व्हॅट नग डकबॅक कंपनीचे वॉटर प्रुफ गमबुट पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. परंतु नवीन दर मंजूर करणे पुर्वी दरपत्रक मागविण्यात आलेले दुसरे विक्रेते वर्ल्डक्लास फूटवेअर, पार्क स्टेडियम, सोलापूर यांचे दरपत्रक 660 + 5% व्हॅट असे होते. त्यामुळे त्यांचेकडे दराबाबत पुन्हा चौकशी करणे आवश्यक असताना तशी केली नसल्याचे आढळुन आले. तरी मंजुर दरपत्रकापेक्षा जादा दराने खरेदी करण्यात आल्याने रक्कम रु. 5628/- संबंधीत अथवा जबाबदार व्यक्तीकडून वसूल करणे आवश्यक आहे.

5) साठा नोंदवहीस सदरचे 67 नग पुरवठाधारकाकडून प्राप्त झाले परंतु प्राप्त दिनांक नमुद नाही.त्यातील 66 नगाचे वाटप केल्याचे नमुद करुन 1 नग शिल्लक असल्याचे नमुद आहे. त्यांचे वाटप 2012-13 व लेखापरीक्षण कालावधीपर्यंत केल्याचे साठा नोंदवहीत नमुद नाही. तरी सदर शिल्लक गमबूटाचे वाटप त्वरित करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 124, Hmm No : 161)

## *111 स्टेशनरी साहित्य खरेदी मधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 621880.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 621880.00/-

***उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. भाखंस-10/3/2635/उद्योग-6 दि. 16/07/1993 नुसार वार्षीक खरेदी ही रु. 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. भाखंस/1088/2512/उद्योग-6/दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3)ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशी पध्दत न राबविता एकूण रु 621880/- खरेदीचे रु.3000/- चे आत असे 293 तुकडे पाडून संगणक साहित्य व स्टेशनरी साहित्य खरेदी केली आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या स्टेशनरी साहित्य संगणक फॅक्स, झेरॉक्स मशीन, प्रिंटर, टोनर इ. ची दुरुस्ती सुटेभाग या बाबीवर 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये 293 प्रमानाकाव्दारे रक्कम रु. 6,21,880/- खर्च करण्यात आला असल्याचे आढळुन आले सदर खर्चाचे लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.168 दि. 24/08/2015 अन्वये कळविण्यात आले होते, विभागाने त्याचे अनुपालन दि. 29/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) स्टेशनरी खरेदी बिल, संगणक प्रिंटर, सुटेभाग खरेदी बीले व नोंदवहया तपासल्या असता रु. 3000/- या रकमेच्या आत असे 293 तुकडे पाडून खरेदी केल्याचे आढळुन आले. आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये अशा प्रकारे रु. 6,21,880/- खरेदी करण्यात आली असल्याचे आढळुन आले.

2) उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. भाखंस-10/3/2635/उद्योग-6 दि. 16/07/1993 नुसार वार्षीक खरेदी ही रु. 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. भाखंस/1088/2512/उद्योग-6/दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3)ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना अशी पध्दत न राबविता एकूण रु 621880/- खरेदीचे रु.3000/- चे आत असे 293 तुकडे पाडून संगणक साहित्य व स्टेशनरी साहित्य खरेदी केली आहे.

DATRNDM7201 (Ref No : 132, Hmm No : 168)

## *112 ट्रक माऊंटेड, सक्शन कम जेटिंग मशिन खरेदीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : जलनि:सारण शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6062625.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 270000.00/-

***उद्योग उर्जा कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस/1094/2079/उदयोग-6, दिनांक 30/03/1994 मधील परिच्छेद 1.9 नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर 3 ग्राहय निविदा असणे आवश्यक आहे परंतु 1 ग्राह्रय निविदा असताना ती नियमबाह्यरीत्या स्वीकारण्यात आली असून त्यांना मशिन पुरवठा आदेश देण्यात आला. सदर मशिनचा पुरवठा 30 दिवस या विहित मुदतीत करणे आवश्यक असताना साधरण 1 वर्ष उशिराने केला आहे.***

सोलापूर महानगरपालिकेने ड्रेनेज व्यवस्था सुरळीत करण्यासाठी सहा नग ट्रक माऊंटेड सक्शन कम जेटिंग मशिन पुरवठा करणे यासाठी जाहिर प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविल्या होत्या. मुदतीत 3 निविदा प्राप्त न झाल्याने अल्पमुदतीत जाहीर प्रसिध्दीकरण केले त्यामध्ये 3 निविदा प्राप्त झाल्या परंतु दोन निविदा धारक मागील 3 वर्षात अशा प्रकारच्या 15 जेटिंग मशिनचा पुरवठा केल्याचा अनुभव ही अट पुर्ण करुन शकत नसल्याने त्यांच्या तांत्रिक निविदा अमान्य करुन त्यांच्या व्यापारी निविदा उघडण्यात आल्या नाहीत व कॅम ॲव्हिदो यांनी तांत्रिक निविदामध्ये 54 मशिनचा पुरवठा केल्याची कागदपत्रे जोडल्याने त्यांची तांत्रिक निविदा ग्राहय धरुन त्यांची व्यापारी निविदा उघडण्यात आली व त्यास स्थायी समिती ठराव क्रमांक 201, दि.10/06/2011 ने मान्यता देण्यात आली. त्यानुसार करारनामा दि.27/09/2011 रोजी करण्यात आला व दिनांक 28/09/2011 रोजी कार्यादेश देण्यात आला त्यामध्ये सदर मशिन पुरवठ्याची मुदत 30 दिवस होती म्हणजे मक्तेदाराने दि.28/10/2011 पुर्वी मशिनचा पुरवठा करणे आवश्यक होते. परंतु सदरच्या 6 मशिनपैकी 3 मशिन जुन 2012 मध्ये 2 मशिन सप्टेंबर 2012 मध्ये व 1 मशिन ऑक्टोबर 2012 मध्ये पुरवठा केल्याचे आढळुन आले. सदर मक्तेदारास म्हणजे कॅम ॲव्हिदा इनव्हायरो इंजि.प्रा.लि. यांना दि.06/03/2012 रोजी देण्यात आलेल्या अग्रिम रक्कम रु.51,59,292/- वजा जाता उर्वरीत रक्कम रु.60,62,625/- दिनांक मार्च 2013 मध्ये प्रमाणक क्र.5 दि. 07/03/2013 अन्वये दिल्याचे आढळुन आले. सदर नस्ती चे लेखापरीक्षण केले व आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 147 दि.31/07/215 अन्वये कळविले होते विभागाने त्याचे अनुपालन दि.20/08/2015 रोजी सादर केले आहे. सदरचे अनुपालन संयुक्तीक नाही. तरी लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) उद्योग उर्जा कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस/1094/2079/उदयोग-6, दिनांक 30/03/1994 मधील परिच्छेद 1.9 नुसार तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर 3 ग्राहय निविदा असणे आवश्यक आहे व नसल्यास फेरनिविदा मागविणे आवश्यक आहे परंतु 1 ग्राह्रय निविदा असताना ती नियमबाह्यरीत्या स्वीकारण्यात आली आहे. व त्यांना मशिन पुरवठा आदेश देण्यात आला.पात्र निविदाधारक एकच असल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस झाला नाही.

2) सदर मशिनचा पुरवठा 30 दिवस या विहित मुदतीत करणे आवश्यक असताना जवळजवळ 9 महिने ते 1 वर्ष उशिराने केला आहे. करारनामा अटी व शर्ती मधील अट क्र.4 नुसार मुदतीत मशिनचा पुरवठा न केल्यास मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रतिदिन रु 1000/-पर्यंतच्या दंडाची तरतुद असल्याने पुरवठादाराकडून रु.270000/-

दंड वसूल करणे आवश्यक असताना तो वसूल केला नाही.

3) कॅम अॅव्हिदो यांनी तांत्रिक लिफाफ्यात नमुद केलेली 56 मशिन पुरवठा अनुभव प्रमाणपत्रे पाहिली असता बेरीज 35 होत असल्याचे आढळुन आले. कॅम अॅव्हिदो यांचे तांत्रिक लिफाफ्या मधील अनुभव प्रमाणपत्राची खात्री करुन घेणे आवश्यक होते. तशी खात्री केली नसल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.

4) मशिन पुरवठ्यासाठी अग्रिम देण्याची कोणतीही बाब निविदेमध्ये तसेच करारनामा अटी व शर्तीमध्ये नसताना पुरवठादारास रु.5159292/- नियमबाह्य अग्रीम दिला आहे.

5) सदर मशिन्सपैकी जुन 2012 मध्ये 3, सप्टेंबर 2012 मध्ये 2 व ऑक्टोबर 2012 मध्ये एक याप्रमाणे पुरवठा केला असल्याचे मोजमाप नोंदवही प्र.क्र.90,पृष्ठ क्र.143 वरुन आढळुन आले. परंतु सदर मशिन्स मनपाच्या प्रभागाना वाटप केल्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास आढळुन आली नाहीत. अनुपालनामध्ये सोबत कागदपत्रे जोडल्याचे नमुद आहे. पंरतु अशी कागदपत्रे लेखापरिक्षणास अनुपालनासोबत आढळून आली नाही.

6) पुरवठादाराने दिलेली दि.23/08/2011 रोजीची बँक गॅरंटी 1 वर्ष या विहीत मुदतीनंतर म्हणजे 22/08/2012 नंतर आक्टोबर 2012 पर्यंत पुनर्जीवीत केली नसल्याचे आढळून आले.

7) सदर मशिन्सचा शासकीय विमा उतरविणे आवश्यक आहे, परंतु त्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाही. अनुपालनामध्ये सोबत कागदपत्रे जोडल्याचे नमुद आहे. पंरतु अशी कागदपत्रे लेखापरिक्षणास अनुपालनासोबत आढळून आली नाही.

DATRNDM7201 (Ref No : 121, Hmm No : 150)

## *113 इ.1ली ते 10 वी पर्यतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेतील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : मुलींना मोफत बस प्रव मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6000000.00/-

***आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये 2128 मुलींना पास दिल्याचे परिवहन उपक्रमाचे बिलासोबतच्या पत्रामध्ये नमुद आहे. परंतु सदरची संख्या एप्रिल 12 ते मार्च 13 या कालावधीत महिना निहाय म्हणजे ज्या महिन्याचे बील आहे. त्या महिन्याची प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या मुलीची संख्या असणे आवश्यक असताना प्रति विद्यार्थीची फी प्रवास रक्कम रु.350/- गृहीत धरुन आकारणी केल्याचे परिवहन विभागाने नमुद केले आहे. परंतु प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या मुलीची संख्या नुसार रुटनिहाय व त्याचे मासिक पास रक्कम निहाय रकमेची आकारणी करुन त्याची***

***रक्कम देय असताना सरसकट 5 लाख प्रतिमाह रक्कम देणे योग्य नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकडील बसेस मधुन इ.1 ली ते 10 वी पर्यंतच्या मुलींना घरापासून शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत बसप्रवास दिला जातो. त्यापोटी महानगरपालिका परिवहन विभागास दरमहा 5 लाख प्रमाणे वार्षिक 60 लाख रु.रक्कम देते. सर्वसाधारण ठराव क्र.380 दि.31/3/2011 अन्वये इ.1ली ते 10 वी मुली सन 2012/13 मध्ये परिवहन विभागास इ.1 ली ते 10 वी पर्यंतच्या मुलींना मोफत बस प्रवास यासाठी रु.6000000/- दिल्याचे आढळुन आले. त्यापैकी माहे मार्च 2013 मध्ये देण्यात आलेल्या रु.500000/- या रकमेच्या देयकाचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे आढळुन आलेल्या अनियमितताबाबत. अर्धसमास पत्र क्र. 165 दि. 24/08/2015 अन्वये कळविण्यात आले होते. त्याचे अनुपालन विभागाने दि. 29/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये 2128 मुलींना पास दिल्याचे परिवहन उपक्रमाचे बिलासोबतच्या पत्रामध्ये नमुद आहे. परंतु सदरची संख्या एप्रिल 12 ते मार्च 13 या कालावधीत महिना निहाय म्हणजे ज्या महिन्याचे बील आहे. त्या महिन्याची प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या मुलीची संख्या असणे आवश्यक असताना प्रति विद्यार्थीची फी प्रवास रक्कम रु.350/- गृहीत धरुन आकारणी केल्याचे परिवहन विभागाने नमुद केले आहे. परंतु प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या मुलीची संख्या नुसार रुटनिहाय व त्याचे मासिक पास रक्कम निहाय रकमेची आकारणी करुन त्याची रक्कम देय असताना सरसकट 5 लाख प्रतिमाह रक्कम दिल्याचे आढळून आले..त्यामुळे प्रतिपूर्तीची रक्कम योग्य असल्याची लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.

2. परिवहन उपक्रमाकडून प्रति विद्यार्थींनी मासिक प्रवास रक्कम रु.350/- गृहीत धरुन रकमेची मागणी महानगरपालिकेस बिलासोबतच्या पत्रामध्ये केली जाते. परिवहन विभागाकडील पत्रामध्ये शहर नाक्यापर्यंत जास्त प्रवासाचा होणारा आकार रु. 14 प्रमाणे 25 दिवसाचे भाडे प्रमाणे 350 रुपयेची आकारणी केल्याचे नमुद केले आहे. परंतु रुटनिहाय व त्याचे मासिक पास रक्कम निहाय रकमेची आकारणी करुन त्याची रक्कम देय असताना सरसकट 5 लाख प्रतिमाह रक्कम दिल्याचे आढळून आले.

3. सदरची योजना ही मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरिता मुलींना घरापासून शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत बसप्रवास यासाठी असल्याने शाळेच्या दीर्घ सुट्टीच्या वेळी सदरची रक्कम परिवहन उपक्रमास देय नसताना सरसकट 5 लाख रु. प्रतिमाह प्रमाणे 2012-13 चे 60 लाख देण्यात आल्याचे आढळुन आले. त्यामुळे दिर्घ सुटटी कालावधीतील जादा अदा रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. व यापुढे दिर्घ सुटटी कालावधीत सदरची रक्कम देणे योग्य नाही.

4. महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकडील बसेस मधुन इ.1 ली ते 10 वी पर्यंतच्या मुलींना घरापासून शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत बसप्रवास यासाठीचा सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 380 दि.31/03/2011 ची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

Solapur (M Corp.)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

-------------------- निरंक -------------------

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *114 शिल्लक रक्कमेची गुंतवणूक व गुंतवणूक नोंदवही मधील त्रुटी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 06**

*अनियमितता कलम : 9ड*

***गुंतणूक नोंदवही विहित नमुन्यात ठेवली नाही. बँकेतील ठेवी व नोंदवहीतील ठेवी यांचा ताळमेळ घेतला जात नाही. स्थायी समितीची पूर्व मंजुरी न घेता रु.151173000 ची गुंतवणूक केली आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या लेखा विभागाने आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये शिल्लक रक्कमेच्या गुंतवणुका वगवेगळ्या बँकामध्ये केलेल्या आहेत. सदर गुंतवणूक नस्ती व गुंतवणूक नोंदवहीची तपासणी करून लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्र.17 दि/09/03/2015 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. विभागाने सादर केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 92 नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त मनपाच्या वतीने शिल्लक रक्कमेची गुंतवणूक करील व आयुक्तास स्थायी समितीच्या मंजुरीने बँकांमध्ये ठेवलेल्या ठेवी कोणत्याही वेळेस काढून घेता येतील अशी तरतूद असताना सोलापूर महानगरपालिकेतील लेखा विभागाने शिल्लक असलेल्या रक्कमेची गुंतवणूक करतांना तसेच ठेवण्यात आलेली गुंतवणूक मुदतपूर्व काढून घेतांना स्थायी समितीची पूर्व मंजुरी घेतलेली नाही.

2.गुंतवणूक नोंदवही राष्ट्रीय लेखा संहिता नियम 20.30 मधील नमुना IN-1 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना विहित नमुन्यात नोंदवही ठेवलेली नाही.

3.निधीची गुंतवणूक करतांना प्रत्येक निधीप्रमाणे स्वतंत्र नोंदवही ठेवून प्रत्येक गुंतवणूक स्वतंत्र पानावर नोंदविणे आवश्यक असताना सर्व निधीची एकत्रित नोंदवही ठेवली नाही.

4 राष्ट्रीय लेखा संहिता नियम 20.3 (B) नुसार लेखा विभाग प्रमुख किंवा त्यांच्या वतीने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने प्रत्येक महिना अखेरीस गुंतवणूक खात्यामधील शिल्लक रक्कमा गुंतवणूक नोंदवही बरोबर ताळमेळ घेवून नोंदवहीतील नोंदी प्रमाणित करणे आवश्यक असतांना 2012-13 मध्ये कोणत्याही महिन्यात ताळमेळ घेतलेला नाही.

5. राष्ट्रीय लेखा संहिता नियम 20.30 (d) नुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अखेरीस लेखा विभाग प्रमुखाने

गुंतवणुकीची प्रत्यक्ष पडताळणी करून गुंतवणुकीचे प्रमाणपत्र (Fixed Diposit Recipt) नोंदवही बरोबर पडताळून नोंदवहीतील नोंदीप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करून प्रमाणित करणे आवश्यक असताना लेखा विभाग प्रमुखाने आर्थिक वर्ष 2012-13 अखेर गुंतवणुकीची पडताळणी करून प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.
6.लेखा विभाग प्रमुखाने गुंतवणुकीच्या मुदती अखेर प्राप्त झालेले व्याज गुंतवणुकीच्या अटी व शर्ती प्रमाणे बरोबर असल्याची खात्री करून नोंद प्रमाणित करणे आवश्यक असतांना नोंदवहीमधील कोणतीही नोंद प्रमाणित केलेली नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.17 दि/09/03/2015 नुसार कळविले असता, विभागाने त्यांचेकडील अनुपालनात "गुंतवणूक नोंदवही दि/1/04/14 पासून ठेवण्यात आली आहे" असे कळविले आहे. तथापि, लेखापरीक्षणाचे अंतिम दिनांकापर्यंत विहित नमुन्यातील नोंदवही तपासणीकरिता उपलब्ध झाली नाही.

DATVCSM6501 (Ref No : 19, Hmm No : 17)

## *115 अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेस दिलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*अनियमितता कलम : 9ड*

***शासनाने अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी रु.36,16,000/- मंजूर केले आहे. सदरचे कर्ज हे ज्या कारणासाठी मंजूर केले आहे त्या कारणासाठी वापरणेत असल्याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. सदरचे कर्ज व्याजासहित शासनास परतफेड केली नसल्यास कर्ज थकित असल्याची माहिती उपलब्ध झाली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेस अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी खाली नमूद केलेप्रमाणे शासनाकडून कर्ज मंजूर करण्यात आले होते. शासनाने महानगरपालिकेस नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.नपप्रसं/2011/अग्निकर्जपरतफेड/ प्र.क्र.33/का.8 दिनांक 18/11/2011 अन्वये सदरचे कर्ज व्याजासहित परत केले नसल्याचे कळविण्यात आले आहे.

| अ.क्र. | कर्ज मंजूर केलेले वर्ष | कर्ज मंजूर केलेली रक्कम रु. |
|---|---|---|
| 1. | 1984-85 | 6,00,000/- |
| 2. | 1985-86 | 9,66,000/- |

Solapur (M Corp.)

| | | |
|---|---|---|
| 3. | 1987-88 | 4,00,000/- |
| 4. | 1988-89 | 11,50,000/- |
| 5. | 1997-98 | 5,00,000/- |
| | एकूण | 36,16,000/- |

याबाबत अर्धसमास पत्र क्र.104 दि. 23/07/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होते. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदरचे कर्ज शासनाने अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी मंजूर केले आहे. सदरचे कर्ज हे ज्या कारणासाठी मंजूर केले आहे त्या कारणासाठी वापरणेत आल्याची माहिती महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम कलम 4(7) नुसार लेखापरीक्षणास मागणी करुनही सादर केली नसल्याने लेखापरीक्षण करता आले नाही. त्यामुळे कर्जाचा विनियोग हा अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठीच करण्यात आल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) सदरचे कर्ज व्याजासहित शासनास परतफेड केल्याचा तपशील लेखापरीक्षणास सादर केला नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 81, Hmm No : 104)

## *116 अनुसूचित जाती / नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविणे लाभार्थ्यांचा बायोमेट्रीक सर्व्हे करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 154500.00/-

| |
|---|
| ***प्रथम मक्तेदाराने काम करण्यास नकार दिल्यामुळे दुसरा न्युनतम दर धारक मक्तेदाराशी वाटाघाटी न करता त्याने निवीदेत दिलेल्या दरांनुसार काम दिल्यामुळे 44500/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच मक्तेदारास समान कामाबाबत शासकीय/अशासकीय संस्थांकडील समान कामाच्या अनुभवाच्या अटींची पुर्तता होत नसतांना मक्तेदारास काम देण्यात आलेले आहे.*** |

शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच.2009/प्र.क्र.159/मावक.2 दिनांक 9 मार्च 2010 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविणेबाबत सोलापुर मनपा यांनी निवड केलेल्या लाभार्थ्यांचे बायोमेट्रीक सर्व्हे करणेबाबत विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीचे

परीक्षणानुसार अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 21 दिनांक 31.3.2015 बाबत विभागाने दिनांक 17.4.2015 नुसार दिलेला खुलासा तपासून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. दिनांक 9.11.2012 रोजी अ.जा./नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना मनपा क्षेत्र घरकुल निर्माण समितीच्या बैठकीतील मुद्दा क्र.4 नुसार सदर योजनेसाठी निवड केलेल्या लाभार्थ्यांचे ई-गर्व्हर्नस पध्दतीने डाटा एन्ट्री करण्यास, लाभार्थ्यांचे फॉर्म,कागदपत्रे स्कॅनींग करणे, कामाचे वेबबेस सॉप्टवेअर तयार करणे,थम्ब स्कॅनर इ.साठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाबाबत अंदाजपत्रक तयार न करता दरपत्रके मागविण्यात आलेली आहेत. याबाबत केलेल्या खुलाशानुसार डाटा एन्ट्रीचे काम हे वेगळया स्वरुपाचे असल्याने व सदर कामाचे डी.एस.आर.दराप्रमाणे निश्चित दर उपलब्ध होत नसल्यामुळे निश्चित रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करता येत नाही असा खुलासा केला आहे. फॉर्म,कागदपत्रे स्कॅनींग करणे, कामाचे वेबबेस सॉप्टवेअर तयार करणे,थम्ब स्कॅनर याबाबीसाठी बाजारभावानुसार अंदाजपत्रक तयार करणेबाबत कार्यवाही केली नसल्याने विभागाने वरील प्रमाणे केलेला खुलासा मान्य करण्या योग्य नाही.

2. उद्योंग संचालनालयाचे परिपत्रक क्र. उसं/शा.निम.शा.व.ख./परिपत्रक/2009/बी.15279 दिनांक 3 जुन 2009 नुसार एकूण रु.50000/- पर्यंतच्या खरेदी/कामासाठी दरपत्रके मागविणेबाबत तरतूद आहे. संगणक विभागाचे पत्र दिनांक 5.5.2012 नुसार सदर कामाचे दरपत्रके मागविण्यासाठी मनपाच्या वेबसाईट वर प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. त्यानुसार 5 दरपत्रकधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली असून स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांचे रु. 154500/- चे दरपत्रक मान्य करण्यात आलेले आहे.त्याबाबत प्राप्त दरपत्रकधारकांचे दस्तऐवजाची पडताळणी करता मायक्रोलिंक इन्फो. प्रा.लि. यांचे दरपत्रक रु. 110000/- कमी दराचे असून त्यांनी पात्रतेबाबतची कागदपत्रे तीन दिवसात सादर करणेबाबत पत्र दिनांक 7.9.2012 नुसार कळविले असून त्यांनी वेळेत कागदपत्रे सादर न केल्यामुळे स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांचे रक्कम रु. 154500/- रक्कमेचे दरपत्रक मान्य केलेले आहे. मायक्रोलिंक इन्फो प्रा.लि यांचे दर रु. 110000/- असतांना त्यांनी पात्रतेचे कागदपत्रे सादर न केल्यामुळे स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग हे पात्र ठरले. त्यामुळे त्यांचेशी मायक्रोलिंक इन्फो प्रा.लि यांचे दर रु.1,10,000/-नुसार काम करणेबाबत वाटाघाटी न करता त्यांचे दर रु. 1,54,500/- मान्य करण्यात आलेले आहेत. सदर कामाबाबत वाटाघाटी न केल्यामुळे रक्कम रु. 44,500/- इतक्या जादा दराचे दरपत्रक मान्य केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार सदरचे दर हे जाहीर प्रसिध्दीकरणाने आलेने व पहील्या कमी दराने काम करण्यास तयार नसल्यामुळे जाहीर प्रसिध्दीकरणाने आलेल्या सेकंड लोएस्ट मक्तेदाराचे रु.1,54,500/- दर मान्य केले असल्याबाबत केलेला खुलासा आहे. मायक्रोलिंक इन्फो. प्रा.लि. हे तांत्रिक लिफाफ्यानुसार पात्र नसल्याने ते अपात्र ठरले. त्यामुळे उर्वरित दरपत्रक धारक स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांचे दरपत्रक मंजूर करण्यात आलेले आहे. सदर कामासाठी पुरेसे दरपत्रधारक नसल्यामुळे मनपाला स्पर्धात्मक दरांचा लाभ झालेला नाही. त्यामुळे विभागाने केलेला खुलासा मान्य करण्या योग्य नाही. तरी सदर मुद्दयाबाबत खुलासा होईपर्यंत रक्कम रु. 154500/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांचेशी कामाचा करारनामा करतांना कामाच्या कालावधीबाबत वा वेळेत काम पुर्ण न झाल्यास दंडाच्या तरतूदीचा उल्लेख करारनाम्यात करण्यात आलेला नाही.याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार करारनाम्यातील अट क्र.3 नुसार मक्तेदाराने काही अपरीहार्य कारणास्तव मक्त्याचे काम मुदतीत पुर्ण न झाल्यास मुदतवाढीचा अर्ज देणेबाबत तरतुद आहे. परंतु मक्तेदाराने सदर काम हे कार्यादेशापासुन किती कालावधीत काम पुर्ण करावे याबाबत उल्लेख करारनाम्यात वा कार्यादेशात केलेला नाही. त्यामुळे सदर कामासाठी किती मुदत होती वा मक्तेदाराने त्याला दिलेल्या मुदतीत

काम पुर्ण केले किंवा कसे याची खात्री करता आली नाही..

4. स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांनी पात्रतेबाबत सादर केलेल्या दस्तऐवजानुसार शॉप ॲक्ट नुसार कन्सल्टींग व्यवसाय व प्लॅनिंग ॲन्ड डिझायनिंग या बाबत नोंदणी करण्यात आलेली असून त्यांना वेब बेस सॉप्टवेअर तयार करणे, सॉप्टवेअर तयार केल्यानंतर त्याबाबत प्रशिक्षण देणे इ.कामाबाबत नोंदणी केलेली नाही. तसेच इतर शासकीय वा निमशासकीय संस्थामध्ये सदर काम केल्याबाबतचे अनुभवाचे प्रमाणपत्र नसतांना त्यांना कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.याबाबत केलेल्या खुलाशानुसार सदर संस्थेस अशा प्रकारचे काम करण्याचा अनुभव असुन मा.आयुक्तांच्या मान्यतेनुसार त्यांना कार्यादेश देण्यात आले असल्याबाबत खुलासा केलेला आहे. खुलाशा सोबत सादर केलेल्या दस्तऐवजानुसार स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांनी कोणत्याही शासकीय व अशासकीय संस्थाकडे काम केल्याचा अनुभव नसून खाजगी संस्थाकडील कामाचा अनुभव असल्याचे दिसुन येते. यावरुन मक्तेदार जाहीरातीतील अटीनुसार शासकीय/निमशासकीय संस्थांकडील समान कामाचा पुरेसा अनुभवाची अट पुर्ण करीत नसतांना त्यांना नियमबाहयपणे पात्र ठरवुन कार्यादेश देण्यात आलेले आहे.

5. सदर कामाचे कार्यादेश क्र. 847 दिनांक 2.11.2012 नुसार स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांना देण्यात आलेले असून सदर आदेशात कामाबाबतच्या अटी,कामाची मुदत इत्यादीचा उल्लेख न करता कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे स्वरा कन्सल्टींग ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग यांनी किती मुदतीत सदर काम पुर्ण केली, तसेच वेबबेस सॉप्टवेअर तयार करुन त्याबाबत प्रशिक्षण दिले वा कसे, किती लाभार्थ्यांची कागदपत्रे स्कॅनिंग केली, किती लाभार्थ्यांचे बायोमेट्रीक सर्व्हे केला याबाबतचे दस्तऐवज नस्तीत उपलब्ध न झाल्याने त्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटली नाही.याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार मक्तेदाराने वेबबेस सॉप्टवेअर तयार केले असुन कार्यालयाच्या संगणकावर लोड केले असून कार्यालयाच्या सेवकांना प्रशिक्षण दिलेबाबत खुलासा केला असून किती सेवकांना प्रशिक्षण दिले, याबाबत कोणतेही दस्तऐवज सादर केलेले नाही.त्यामुळे सदर खुलासा मान्य् करण्या योग्य् नाही.

6. सदर कामाची रक्कम रु. 140595/- चे प्रदान दिनांक 1.3.2013 नुसार करण्यात आल्याबाबत नस्ती परीक्षणानुसार दिसुन आले. त्याबाबत मुळ प्रमाणकाची लेखापरीक्षणासाठी मौखिक मागणी करुन देखील मुळ प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार रु.154500/- चे प्रमाणक जोडल्याबाबत नमुद आहे. तथापि असे कोणतेही प्रमाणक लेखापरीक्षणास प्राप्त करुन दिलेले नाही.

7. दरपत्रक धारकाने काम पुर्ण झाल्यानंतर रक्कम मागणीबाबत सादर केलेल्या बिलाची प्रत खुलाशा सोबत जोडल्याबाबत खुलासा केलेला आहे. तथापि अशी कोणतीही प्रत खुलाशा सोबत सादर करण्यात आलेली नाही.

वरील प्रमाणे मुद्दयांबाबत खुलासा होईपर्यंत रक्कम रु. 154500/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

TDCNSDM6601 (Ref No : 2, Hmm No : 21)

## *117 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत 2012-13 वित्तीय वर्षात घटकनिहाय प्राप्त अनुदानातून झालेल्या कमी अधिक खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

Solapur (M Corp.)

**No. of Irregularities: 5**

*केंद्रशासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 20447000.00/-

***सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत वित्तीय वर्षात घटकनिहाय प्राप्त अनुदानातून कमी अधिक खर्च झाला असून जिल्हा नागरी विकास यंत्रणेस उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत. सनदी लेखापालांमार्फत खर्चाचे लेखापरीक्षण केलेले नाही. रोकडवही विहीत नमुन्यात ठेवलेली नसुन अन्य नोंदवहया लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाल्या नाहीत. योजनेच्या फलनिष्पतीची छाननी करण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही.***

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत राज्य नागरी विकास यंत्रणेकडे उपलब्ध असलेल्या व महानगरपालिका/नगरपरिषदांकडे वर्षाच्या प्रारंभी घटक निहाय शिल्लक असलेल्या निधीचा विचार करुन दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या प्रमाणात राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपारिषदांना आर्थिक उद्दिष्टे घटकनिहाय देण्यात येतात. यामध्ये सात घटकातील उद्दिष्टे जरी स्वतंत्ररित्या दर्शविली असली तरी एका आर्थिक वर्षात किमान 30% कुटुंब दारिद्रय रेषेवर नेण्याचे उद्दिष्ट देण्यात येते.

सोलापूर महानगरपालिकेस आर्थिक वर्ष 2012-2013 साठी घटकनिहाय देय निधी, साध्य करावयाची भौतिक उद्दिष्टेही आयुक्त तथा संचालक, नगरपरिष्द संचालनालय, वरळी, मुंबई यांनी त्यांचे पत्र जा.क्र.सुजयो/उद्दिष्ट धोरण/2012/का-16, दिनांक 05/05/2012 मध्ये दर्शविली आहेत.

त्यास अनुसरुन महानगरपालिकेस प्रत्यक्षात प्राप्त झालेले घटकनिहाय अनुदान, केलेला खर्च व अंतिम शिल्लक अनुदानविषयक माहीती अर्धसमास ज्ञापन क्र.95 दिनांक 21.07.2015 अन्वये मागविण्यात आली होती.

2012-13 या वित्तीय वर्षाची आरंभीचे शिल्लक अनुदान, वित्तीय वर्षात प्राप्त अनुदान , प्रत्यक्ष खर्च, अखर्चित रक्कम तसेच कमी जादा खर्चाची माहिती खालीलप्रमाणे. (आकडे लाखात)

| अ.क्र. | तपशिल | शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (USEP) | शहरी महिला स्वयंसहायता कार्यक्रम (UWSP) | बचत पतसंस्था (T&C) | शहरी समाज विकास नेटवर्क (UCDN) | शहरी गरीबांना संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | STEP UP | PLACEMENT STEP-UP | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | दिनांक 31/03/2012 रोजीची शिल्लक | 100.45 | 133.40 | 33.68 | 39.85 | 67.63 | --- | 375.01 |
| 2) | वित्तीय वर्ष 2012-13 मधील प्राप्त निधी | 67.09 | 75.81 | 11.47 | 22.03 | 66.57 | --- | 242.97 |
| 3) | एकूण निधी | 167.54 | 209.21 | 45.15 | 61.88 | 134.20 | --- | 617.98 |
| 4) | वित्तीय वर्ष 2012-13 मधील खर्च | 82.99 | 100.08 | 12.10 | 9.30 | 8.38 | --- | 212.85 |
| 5) | अखर्चित रक्कम | 84.55 | 109.13 | 33.05 | 52.58 | 125.82 | --- | 405.13 |
| 6) | जादा खर्च | 15.90 | 24.27 | 0.63 | --- | --- | --- | 40.80 |
| 7) | कमी खर्च | --- | --- | --- | 12.73 | 58.19 | | 70.92 |

टीप :- वित्तीय वर्षातील एकूण खर्च 212.85 लाख पैकी कौशल्य प्रशिक्षण (STEP-UP) खर्चानुषंगाने रु.8.38 लाख रक्कमेसाठी स्वतंत्र परिच्छेद घेतलेला आहे. ( रु. 212.85-8.38 = 204.47 लाख )

संबधित विभागाकडून दिनांक 13/08/2015 रोजी माहिती सादर केली असुन एम.आय.एस. नमुना प्रपत्रांचे छाननीअंती खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) आर्थिक वर्षात झालेल्या खर्चाबाबतची घटकनिहाय उपयोगिता / विनियोग प्रमाणपत्रे जिल्हा नागरी विकास यंत्रणेस पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राआधारे महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2012-2013 मध्ये घटकनिहाय खर्च किती केला आहे तसेच गतवर्षामधील घटकनिहाय खर्च किती याबाबत छाननी करुन 2012-2013 च्या अनुदानामधील किती रक्कम अखर्चित राहिली याबाबत तपासणीसाठी उपयोगिता प्रमाणपत्राची मागणी केलेली होती. परंतु आवश्यक माहिती किंवा उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्याने झालेल्या खर्चाबाबत खात्री करता आली नाही.

2) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत महानगरपालिकांनी केलेल्या खर्चाचे लेखापरीक्षण सनदी लेखापालांमार्फत करणे आवश्यक असून नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे परिपत्रक क्र.नपप्रसं/लेखापरीक्षण/प्रक्र.380/04/15,दिनांक 24/06/2004 प्रमाणे लेखापरीक्षण अहवालात परिशिष्ठ -2 अ प्रमाणे वित्तीय बाबी व परिशिष्ठ "ब" प्रमाणे गुणवत्ता विषयक बाबींवर भाष्य करणे आवश्यक आहे. परंतु सदर लेखापरीक्षण अहवाल मागणी करुनही सादर केलेला नाही.

3) वित्तीय वर्ष 2012 - 2013 मध्ये शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम, शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम व बचत पतसंस्था या घटकाखाली प्राप्त व मंजूर निधीपेक्षा अनुक्रमे रु.15.90 लाख, रु.24.27 लाख व रु.0.63 लाख असा एकूण रु.40.80 लाख जादा खर्च झालेला आहे.

शहरी समाज विकास नेटवर्क व शहरी गरीबांना संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण या घटकाखाली मंजूर निधीपेक्षा अनुक्रमे रु.12.73 लाख व रु.58.19 लाख असा एकूण रु.70.92 लाख कमी खर्च झालेला आहे.

प्रारंभीची शिल्लक व अखर्चित रक्कमेचे प्रमाण पाहता निधीचा पुरेपुर विनियोग करण्यासाठी महानगरपालिकेकडून पुरेसा प्रयत्न केला जात नसल्याचे आढळते. पर्यायाने कल्याणकारी योजनांच्या लाभापासून दारिद्रय रेषेखालील लाभार्थी वंचित रहात आहेत.व शासनामार्फत ज्या उद्दीष्टासाठी योजना

राबविली जात आहे ते सफल होत नाही.

4) महानगरपालिकेने अवलंबिलेली लेखांकनाबाबतची लेखापध्दती तपासण्यासाठी रोकडवही, धनादश नोंदवही, गुंतवणुक नोंदवही तसेच लाभार्थी नोंदवही यांची मागणी केली असता रोकडवही वगळता अन्य नोंदवहया लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाल्या नाहीत.

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 32(1) प्रमाणे नमुना-11 मध्ये सर्वसाधारण रोकडवही ठेवलेली नाही. तसेच नियम 51 प्रमाणे व्यवहाराच्या दिवशी जमा व खर्चाच्या नोंदी घेऊन कालक्रमानुसार प्रत्येक नोंद साक्षांकित करणे, प्रत्येक महिन्याच्या शेवटी जमा व खर्चाचा पासबुक प्रमाणे ताळमेळ घेणे, वर्षाच्या शेवटी वार्षिक गोषवारा काढून तफावतीचा तसेच गुंतवणुकीचा तपशील नोंदविणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम-9 व 46(1) प्रमाणे धनादेश पुस्तकांची साठा नोंदवही तसेच नियम 187 प्रमाणे गुंतवणूक नोंदवही अनुक्रमे नमुना-1 व नमुना-142 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच दुबार लाभ टाळण्यासाठी लाभार्थीची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत नोंदवहया ठेवलेल्या नाहीत.गुंतवणूकीबाबतचा अभिलेख लेखापरिक्षणासाठी सादर केलेला नाही.

5) 2007-2008 ते 2012-2013 या सहा वर्षामध्ये किती कुटुंबे दारिद्रय रेषेवर गेली याबाबत वर्षनिहाय नाव व पत्तानिहाय सविस्तर माहिती त्याप्रित्यर्थ एम.एस.आय. नमुन्यातील माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. योजनेच्या फलनिष्पत्ती छाननीसाठी कोणतीही यंत्रणा कार्यान्वीत नसून तसा पत्रव्यवहार उपलब्ध नसल्यामुळे सदर योजनेच्या फलनिष्पत्तीवर लेखापरीक्षणात भाष्य करता आलेले नाही.

उपरोक्त अक्र (1) ते (5) बाबत स्वयंस्पष्ट व साधार अनुपालन सादर करेपर्यंत रक्कम रु. 2,04,47,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATRKJM5901 (Ref No : 50, Hmm No : 95)

## *118 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत 2012-13 आर्थिक वर्षाकरीता निश्चित केलेली भौतिक उद्दिष्टे साध्य झाली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : नागरी समुदाय केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| ***नगर परिषद प्रशासन संचालनालयामार्फत 2012-13 आर्थिक वर्षाकरीता निश्चीत केलेली भौतिक उददीष्टे*** |
|---|

***महानगरपालिकेने साध्य केलेली नाहीत.***

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत **2012-13** या वित्तीय वर्षासाठी आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालया मार्फत महानगरपालिका व नगरपालिकांनी साध्य करावयाची भौतिक उद्दिष्टे निश्चित करून त्याप्रमाणे निधीचे वाटप केलेले होते.

महानगरपालिका, सोलापूर यांना दिलेली भौतिक उद्दिष्टे व महानगरपालिकेने साध्य केलेली उद्दिष्टे याअनुषंगाने अर्धसमास ज्ञापन क्र.**96,** दिनांक **21-07-2015** अन्वये आवश्यक माहितीची मागणी केलेली होती. महानगरपालिकेचे पत्र क्रमांक युसीडी/164, दिनांक 13/08/2015 अन्वये माहिती प्राप्त झाली आहे. भौतिक उद्दिष्ट व साध्य केलेली उद्दिष्ट खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | घटक | निश्चित केलेली भौतिक उद्दिष्टे | साध्य केलेली भौतिक उद्दिष्टे | साध्य उद्दिष्ठांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **1** | शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (USEP) | **1112** | **239** | **21.49** |
| **2**. | शहरी महिला स्वंयसहायता कार्यक्रम (UWSP) | **801** | **83** | **10.36** |
| **3**. | बचत व पतसंस्था (T & C) | **1669** | **156** | **9.34** |
| **4**. | शहरी समाज विकास नेटवर्क (UCDN) | **40052** | **8321** | **20.77** |
| **5**. | शहरी गरिबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण स्टेप अप (STEP UP) | **6675** | **4138** | **61.99** |

निश्चित केलेली भौतिक उदिष्टे व साध्य केलेली उदिष्टे पाहता लेखापरीक्षणामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

**1.** संचालनालयाने निश्चित केलेली घटक निहाय भौतिक उद्दिष्टे व महानगरपालिकेने साध्य केलेली उदिष्टे तपासली असता अक्र.(५) वरील घटक वगळता अक्र. १ ते ४ वरील घटकांसाठी साध्य केलेल्या उददीष्टांची टक्केवारी अनुक्रमे 21.49%, 10.36%, 9.34%, 20.77%, अशी अत्यंत कमी आहे. यावरून संचालनालयाने निश्चित केलेल्या भौतिक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी महानगरपालिकेकडून उददीष्ट पुर्ततेकामी पुरेसे प्रयत्न झालेले नाहीत. हे स्पष्ट होते.

**2.** योजनेच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेकडून पुरेसे प्रयत्न नाहीत, कारण नागरी भागामध्ये दारिद्रय रेषेखाली असलेल्या लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी त्यांना रोजगाराच्या संधी करुन देण्याचे दृष्टीने महानगरपालिकेला घटकनिहाय भौतिक उददीष्ट देण्यांत आलेले होते. परंतु उपरोक्त टक्केवारी पाहता सर्व गरजु लाभार्थींना लाभ मिळालेला नाही**.**

DATRMJM6101 (Ref No : 56, Hmm No : 96)

### *119 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या बचतगट या घटकाच्या भौतिक व आर्थिक उद्दिष्ट साध्य न झाल्याबाबत.*

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : नागरी समुदाय केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नगर परिषद प्रशासन संचालनालयामार्फत ठरवून दिलेली बचत गट व पतसंस्थेची आर्थिक व भौतिक उद्दिष्ट महानगरपालिकेने साध्य केलेली नाहीत.***

केंद्र पुरस्कृत सुवर्ण जयंति शहरी रोजगार योजना दिनांक **1/12/1997** पासुन नागरी क्षेत्रातील दारिद्रय निर्मुल्नासाठी सुरु करण्यांत आली आहे. योजनेच्या बचत गट व पतसंस्था घटकाच्या आर्थिक व भौतिक प्रगतिचा आढावा वार्षीक् अहवाल यावरुन घेतला असता, लेखापरीक्षणाचे वेळी असे निदर्शनास आले आहे की, सन 2012-13 मध्ये बचत गट स्थापनेचे उददीष्ट 1669 इतके होते. परंतु केवळ 156 बचत गट स्थापन करण्यांत आले आहेत. ठरवून दिलेले आर्थिक व भौतिक उदिष्ट साध्य केलेले नाही. **या**बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 129, दिनांक 28/07/2015 अन्वये खुलासा मागविला होता. त्याबाबतचे अनुपालन पत्र् क्रमांक युसीडी/163, दिनांक 13/08/2015 अन्वये प्राप्त झाले आहे. परंतु अत्यंत कमी उददीष्ट साध्य करण्याची कारणे नमुद करण्यांत आली नाहीत. एकुण किती बचत गटांचा सर्व्हे झाला होता, बचत गट निवडीचे

निकष काय होते याबाबत खुलासा केला नाही. तरी लेखापरीक्षणाचे अभीप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. 01/04/2012 ते 31/03/2013 या आर्थिक वर्षात बचत गट स्थापनेचे उद्दिष्ट 1669 एवढे होते मात्र प्रत्यक्षात फक्त 156 बचत गट स्थापन करणेत आलेले आहे फक्त 9.34% एवढे उद्दिष्ट साध्य केले आहे. प्राप्त निधी रक्कम रु.20,86,000/- मधून रु.12,10,000/- एवढा निधी खर्च केला आहे. 58% निधी खर्च झाला आहे. ठरवून दिलेले भौतिक व आर्थिक उद्दिष्ट पूर्ण केलेले नाही.

2. नगर परिषद प्रशासन संचलनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक सुजयो 102003/प्र.क्र.43/03/13, दिनांक 10/09/2004 अन्वये - बचत गट व पतसंस्था स्थापन झाल्यापासून १ वर्षानंतर फिरता निधी मिळण्यास बचतगट पात्र होतात, अशी स्पष्ट तरतूद परिपत्रकात आहे परंतु १ वर्षापेक्षा कमी कालावधी असलेल्या गटांना असा निधी देण्यात आला आहे काय? याची खात्री करणेसाठी बचगटांचे ठराव, बचतगटांचे पासबुक, आवश्यक होते. परंतु उपरोक्त नमुद अर्धसमास पत्राव्दारे मागविण्यांत आलेले संबंधीत अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे बचत गटांचा बँकेचा व्यवहार, शील्लक, खर्च या बाबींचे अवलोकन करता आले नाही.

3. बचत गटाला प्रोत्साहित करणे व आर्थिक पाठबळ या स्वरूपामध्ये हा निधी दिला जातो, फिरता निधी केवळ बँकेत जमा करून त्यावर अत्यल्प दराने व्याज मिळविणे हा त्या मागचा उद्देश नाही या फिरत्या निधीचा वापर सदस्यांना वेगवेगळ्या कामाकरिता कर्ज उपलब्ध करून देण्याकरीता आहे उदा. कच्च्या मालाची खरेदी व पणन व्यवस्थापन करणे, बालसंगोपन, बाल आरोग्य शिबीर, लसीकरण, बँकेला वेळोवेळी भेटी देणेकरीता होणारा खर्च भागविणे इत्यादी सन 2011-12 मध्ये जे बचत गट स्थापन झाले आहेत. त्या बचत गटांना १ वर्ष पूर्ण झालेनंतर म्हणजे 2011-12 मध्ये अनुदान देणे अपेक्षित आहे म्हणून सन 2011-12 मध्ये जे 153 बचत गट स्थापन केले गेले त्यापैकी 119 गटांना फिरता निधी देण्यात आला आहे. 119 बचत गटातील 605 सदस्यना प्रत्येकी 2000/- प्रमाणे रक्कम रु.12,10,000/- ( 605 X 2000 = 12,10,000) एवढी रक्कम दिली आहे ती रक्कम त्या बचत गटांनी वरील कारणासाठीच वापरली याबाबतचा तपशील आवश्यक आहे परंतु लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. परिणामी लेखापरीक्षणाची याबाबत खात्री पटलेली नाही.

DATRMJM6101 (Ref No : 57, Hmm No : 129)

## *120 शहरी स्वयंरोजगार कार्यक्रमातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : नागरी समुदाय मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नागरी भागातील बेरोजगार व अर्धबेरोजगार यांना प्रोत्साहित करून छोटे उद्योग, उत्पादने, सेवा व व्यवसाय सुरु करण्यासाठी शहरी रोजगार कार्यक्रम आहे. परंतु दिलेले आर्थिक उद्दिष्ट मनपाने पूर्ण केलेले नाही. त्यामुळे गरजू लाभार्थी वंचित राहिले आहेत.***

वार्षिक अहवाल, धारीकाची पडताळणी केली असता लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले आहे की, 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये स्वयंरोजगार या घटकांर्गत महानगरपालिकेस रुपये 167.54 (लाख) एवढे अनुदान शासनाकडून प्राप्त झाले असून रुपये 82.99 (लाख) एवढा खर्च झाला आहे. कमी झालेल्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 128, दिनांक 28/07/2015 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. त्याबाबतचे अनुपालन पत्र क्रमांक युसीडी/163, दिनांक 15/08/2015 अन्वये प्राप्त झाले आहे. तथापि अनुपालन संयुक्तीक नसल्याने अमान्य करण्यांत आले आहे. सबब, लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय कायम करण्यांत येत आहेत.

1. ठरवुन दिलेल्या उददीष्टापैकी अत्यंत कमी म्हणजे 29.49% उददीष्ट साध्य केले आहे. खाजगी बँका कर्ज प्रकरणे विहीत वेळेत मंजूर करीत नाहीत त्यामुळे कमी उददीष्ट साध्य केल्याचे अनुपालनात नमुद केले आहे. परंतु राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्ज प्रकरणे मंजूर का करुन घेतली नाहीत याचा खुलासा कलेला नाही. लाभार्थ्यांच्या नावासह त्यांनी सुरु केलेल्या व्यवसायाच्या तपशीलासह कार्यालयाचा मुल्यमापन अहवाल उपलब्ध नाही. लाभार्थ्याने दुबार लाभ घेवू नये यासाठी लाभार्थ्याकडून आवश्यक ते प्रमाणपत्र् घेतले नाही.

2. शहरी स्वयंरोजगार या घटकांसाठी 1112 एवढे भौतिक उद्दिष्ट दिले होते, त्यापैकी फक्त 239 एवढे उद्दिष्ट साध्य केले आहे. फक्त 21.49% उद्दिष्ट पूर्ण झाले आहे उद्दिष्ट पूर्तता अत्यंत कमी आहे.

3.नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक नपप्रसं/लेखापरीक्षण/प्र.क्र.380/04/15,दिनांक 24/06/2004 मधील परिशीष्ठ -2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रत्यक्षात किती फायदा झाला सुरु केलेला स्वयंरोजगार व्यवस्थित आहे किंवा नाही, त्यापासून त्यांना पुरेसे उत्पन्न मिळते किंवा नाही. कर्जाची परतफेड वेळेवर होते किंवा नाही, याबाबतचा मूल्यमापन अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

4. या योजनेचा लाभ देण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून, शासनाच्या/केंद्र शासनाच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नाही, असे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. म्हणजे दुबार लाभ पुन्हा लाभार्थ्यांना मिळणार नाही परंतु तसे प्रमाणपत्र एकाही लाभार्थ्याकडून घेतलेले नाही.

DATRMJM6101 (Ref No : 58, Hmm No : 128)

## *121 हुतात्मा स्मृति मंदीर विभागाकडील लेख्यातील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :9(1) म.न.पा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 106471.00/-

***हुतात्मा स्मृति मंदीर विभागाकडील धनादेश नोंद्वहित नोंदलेले (रु106471) धनादेश वटल्याची खात्री झाली नाही.***

2012-13 या आर्थिक वर्षामध्ये सोलापुर महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मृति मंदीरा (नाट्यगृह) पासून वसूल झालेल्या भाडे रकमा संबधीचे लेखे लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करणेसाठी अर्धसमास पत्र क्रमांक.139 दिनांक 31/07/2015 अन्वये देण्यांत आले होते. त्या नुसार उपलब्ध केलेल्या लेख्यांची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या .

1. सोलापूर महानगरपालिका लेखा विभागामध्ये प्राप्त झालेले धनादेश वटल्या नंतर संबधित विभागास दिनांक निहाय संगणकीय पावती देण्यात येते. सदर पावतीची दिनांकासह धनादेश नोंदवहीत वटल्याची नोंद करण्यांत येते'. परंतु विभागाकडील धनादेश नोंदवही तपासली असता खालील प्रमाणे धनादेशांच्या नोंदी समोर ते वटल्याच्या पावत्यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे .धनादेश वटल्याची खात्री होऊ शकली नाही.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धनादेश क्र. | दिनांक | बँक | रक्कम (रु.) | तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एसपोलिटेकनिक .एस.ई. | 011372 | 12/03/30 | सोलापूर जनता सहबँक. | 4000 | भाडे |
| 2 | टेक्नोहार्ड कॉम्पुटर | 001221 | 12/05/02 | बँक ऑफ बरोदा | 6720 | भाडे |
| 3 | महाराष्ट्रराज्य द्राक्ष बागायत संघसोलापूर | 02907 | 12/05/07 | शिध्येश्वर बँक | 10800 | भाडे |
| 4 | महिला होमिओपॅथीक मेडीकॉलेज. | 10316 | 12/05/08 | जनता बँक | 4000 | भाडे |
| 5 | सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई | 014493 | 12/05/09 | अँक्सीस बँक | 46326 | भाडे |
| 6 | विध्या साहित्य सोसायटी | 078277 | 12/11/27 | महेश अर्बन कोबँक. | 5000 | भाडे |
| 7 | हॅपी होम प्ल्ये गृप | 465917 | 12/12/01 | युनायटेड बँक | 19625 | भाडे |
| 8 | विध्या साहित्य सोसायटी | 086658 | 13/02/30 | महेश अर्बन कोबँक. | 10000 | भाडे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | 106471 | |

2. 2012-13 या वर्षामध्ये महानगरपालिकेने महापालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष खर्चाच्या आकड्यां नुसार हुतात्मा स्मृति मंदीराचा विदयुत देयकांवर एकूण रु.1637080 खर्च झाला आसल्याची दिसते नोंद दिसते परतु विभागाकडील नोंदवहीत रु. 2234048 इतका खर्च नोंदविलेला आहे. तफावत रु.602968 असून सदर तफावतीचा मेळ घेतलेला नाही .

DATRVVM5901 (Ref No : 5, Hmm No : 139)

### *122 निवडणूक खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नसल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :32(ड-1) म.न.पा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3296231.00/-

***निवडणूकी साठी रुपये 3296231 केलेल्या खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केलेले नाहीत.***

2012-13 या आर्थिक वर्षामध्ये सोलापुर महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण निवडणूकी करीता रक्कम रुपये 3296231 इतका खर्च करण्यांत आला आहे.स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011(सुधारणा) मधील कलम 4(3) अन्वये लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे.या बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 115 दिनांक 29/07/2015 अन्वये या बाबतच्या लेख्यांची मागणी केली असता देयक नोंदवही वगळता खर्चाची प्रमाणके, मजुरी आदेश व त्यासंबधित नस्त्या उपलब्ध करण्यांत आलेले नाहीत.

आक्षेपाधीन रक्कम रुपये 3296231

DATRVVM5901 (Ref No : 6, Hmm No : 100)

### *123 विभागीय कार्यालयाकडील वर्ग 4 कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील उणिवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***विभागीय कार्यालातील वर्ग 4 - कडील कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील रजा लेखा अपुर्ण असल्याचे व काही ठिकाणी पेन्सिलने लिहिले असल्याचे आढळून आले. (उदा. विभागीय कार्यालय क्र 6, सुभाष जगलू खारव) विनापरवानगी गैरहजर, बिन पगारी रजा, असाधारण रजा (खाजगी कारणास्तव) अशा अकार्य-दिनाच्या 1/10 अर्जित रजा व 1/18 अर्धवेतनी रजा पुढील सहामाही चे रजा जमा करतेवेळी करणे आवश्यक आहे. शा.नि. दिनांक 09/12/1990 मध्ये नमुद असलेप्रमाणे रजा गणना करुन रजा लेखा अदयावत ठेवणे आवश्यक आहे. परंतु शासन निर्णया प्रमाणे रजेची गणना केली नाही व उपभोगलेल्या रजेची नोंद घेवून शिल्लक काढणे आवशक असताना अशी शिल्लक काढली नसल्याने सदरचे रजा लेखे 2009-2010 पासून अपूर्ण असल्याचे लेखा परीक्षणास आढळुन आले. (उदा.रेवण,सदरशिव सुरवसे कचरा बिगारी, वि.का.क्र.6)***

सोलापूर महानगरपालिकेकडील विभागीय कार्यालयाकडील वर्ग 4 चे कर्मचारी यांची निवडक सेवापुस्तके तपासणी केली असता आढळलेल्या उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्र. 122 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 06/08/2015 सादर केले आहे.अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) विभागीय कार्यालातील वर्ग 4 - कडील कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील रजा लेखा अपुर्ण असल्याचे व काही ठिकाणी पेन्सिलने लिहिले असल्याचे आढळून आले. (उदा. विभागीय कार्यालय क्र 6, सुभाष जगलू खारव)

2) विनापरवानगी गैरहजर,बिन पगारी रजा, असाधारण रजा (खाजगी कारणास्तव) अशा अकार्य-दिनाच्या 1/10 अर्जित रजा व 1/18 अर्धवेतनी रजा पुढील सहामाही चे रजा जमा करतेवेळी करणे आवश्यक आहे.शा.नि.दिनांक 09/12/1990 मध्ये नमुद असलेप्रमाणे रजा गणना करुन रजा लेखा अदयावत ठेवणे आवश्यक आहे. परंतु शासन निर्णया प्रमाणे रजेची गणना केली नाही व उपभोगलेल्या रजेची नोंद घेवून शिल्लक काढणे आवशक असताना अशी शिल्लक काढली नसल्याने सदरचे रजा लेखे अपूर्ण असल्याचे लेखा परीक्षणास आढळुन आले. (उदा.रेवण,सदरशिव सुरवसे कचरा बिगारी, वि.का.क्र.6)

3) सेवापुस्तकामधील सर्व नोंदी सक्षम प्राधिक-यांच्या स्वाक्षरीने करणे आवश्यक असताना काही नोंदीवर सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत.

4) विभागीय कार्यालय क्र 6 कडील प्रभाग क्र.46 मधील सफाई कामगार बाबू गणपत इंगळे. रवि दत्तु हुगले चावीवाला यांचे सेवापुस्तकामध्ये मोठया प्रमाणात बिनपगारी रजा (खाडे) सन 2003 ते 2012 या कालावधीत असल्याचे आढळून आले. बिनपगारी रजेबाबत शासन निर्णय दि. 09/12/1990 मध्ये नमुद असलेप्रमाणे

बिनपगारी रजा दिवसाच्या 1/10 अर्जित रजा व 1/18 अर्धवेतनी रजा पुढील सहामाही चे रजा जमा करतेवेळी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले.तसेच त्याचे बाबतीत 2006 पुर्वीच्या कालावधीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन) नियम 1981 चे नियम 36, 39 नुसार वार्षिक वेतनवाढ मंजुरीबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच 2006 नंतर कालावधीसाठी वार्षिक वेतनवाढ मंजुरीची कार्यवाही करताना शा.नि.वि.26/12/2011 नुसार मागील वर्षाच्या 01 जुलै ते चालू वर्षाच्या 30 जून पर्यंत वैद्यकीय कारणाशिवायच्या असाधारण रजेचा कालावधी सहा महिन्यापेक्षा जास्त असल्यास 1जुलै रोजीची वार्षिक वेतनवाढ देय नाही.असे असताना सदर कर्मचा-यांचे दि.01/07/2007 ते 30/06/2008 या कालावधी 181 दिवस बिनपगारी रजा असल्याने त्यांना दिनांक 1/07/2008 ची वेतनवाढ देय नसताना मंजुर केल्याने त्यांना वेतन व भत्त्यांचे अतिप्रदान दिनांक 01/02/2011 पासुन (6 वेतन आयोग लागू केल्यापासून) होत आहे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन सेवा पुस्तके अद्यावत करुन अतिप्रदान रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 109, Hmm No : 122)

## *124 स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची 2012-2013 आर्थिक वर्षाचे बजेट बुकमधील प्रत्यक्ष जमा व स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्राप्रमाणे जमा यामधील तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***स्थानिक संस्था कर व पारगमन शुल्काची 2012-2013 आर्थिक वर्षाचे बजेट बुकमधील प्रत्यक्ष जमा रक्कम ही स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कमेपेक्षा रुपये 8164808/- ने कमी आहे.***

महानगरपालिकेकडील स्थानिक संस्था करासंदर्भात 2012-2013 या आर्थिक वर्षाची जमा तपासता त्यामध्ये पुढीलप्रमाणे तफावत आढळून आली आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रं.142 दिनांक 31.07.2015 निर्गमित केला असता अनुपालन अप्राप्त आहे.

**1.स्थानिक संस्था करातील जमेच्या तफावतीबाबत.**

| अ.क्रं. | तपशिल | बजेटप्रमाणे 2012-13 ची जमा रुपये | विभागाने सादर केलेल्या विवरणपत्राप्रमाणे 2012-13 ची जमा रुपये |
|---|---|---|---|
| 1 | स्थानिक संस्था कर | 1027657888 | 726238579 |
| 2 | पारगमन शुल्क | निरंक | 336109036 |
| 3 | इतर जमा | 26524919 | निरंक |
| | एकूण रुपये | 1054182807 | 1062347615 |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे बजेट बुकातील प्रत्यक्ष जमा रक्कम ही विभागाने सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कमेपेक्षा रुपये 8164808/- ने कमी आहे.

2. स्थानिक संस्था कर विभागाने जा.क्रं.1307, दिनांक 05.02.2015 अन्वये लेखापरिक्षणास सादर केलेल्या माहितीनुसार माहे मार्च 2013 मध्ये व्यापा-यांनी स्थानिक संस्था करापोटी (एकूण 1507 चलने) रक्कम रु.57259909/- भरणा केल्याचे नमूद केले आहे. मात्र लेखापरिक्षणास पुरविण्यात आलेल्या 2012-2013 या वर्षाच्या जमेच्या विवरणपत्राप्रमाणे माहे मार्च 2013 ची जमा रक्कम रु.89924431/- अशी दर्शविली आहे. परंतु या दोहोमध्ये रक्कम रु.32664522/- ची विसंगती आढळून येते.याबाबतची साधार स्पष्टता झाली नाही.

3. पारगमन शुल्का अंतर्गत माहे मार्च 2013 ची भरणा नोंदवही पावत्यावरुन तपासता एकूण जमा रक्कम रु.28386260/- अशी आहे. मात्र विभागांने 2012-13 च्या पारगमन शुल्कापोटी जमेबाबतचे लेखापरीक्षण सादर केलेल्या विवरणपत्राप्रमाणे माहे मार्च 2013 ची जमा रक्कम रु.28404676/- अशी आहे.भरणा नोंदवहीमधील जमा रक्कम ही सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविलेल्या जमा रक्कमेपेक्षा रुपये 18416/- ने कमी आहे.

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे तफावतीबाबतचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

DATPGDM5901 (Ref No : 13, Hmm No : 142)

## *125 पारगमन शुल्क वसुली संदर्भात अभिलेख्यात आढळून आलेल्या त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***पारगमन शुल्काचा भरणा लेखाशाखेकडे विलंबाने केला जातो.दक्षता विभागाने पारगमन नियम भंगापोटी वसूल केलेल्या शुल्काबाबतची ठेवलेली नोंदवही अपूर्ण आहे.पारगमन शुल्काची आकारणी केल्यानंतर सदरचा माल***

***महानगरपालिका हद्दीबाहेर गेल्याबाबातची पडताळणी केल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.***

पारगमन शुल्क वसुली संदर्भात अभिलेख्यांची पडताळणी करता 2012-2013 या आर्थिक वर्षामध्ये दक्षता विभागाने पारगमन नियम भंगापोटी केलेल्या कार्यवाहीबाबतची उपलब्ध केलेली एकूण 42 प्रकरणे तपासता त्यामध्ये पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

1. पारगमन नियम भंगापोटी प्रती प्रकरणी रक्कम रु.1672/- प्रमाणे वसुली केली आहे ज्यामध्ये पारगमन शुल्क रु.148/- अधिक दहापट दंडाची रक्कम रु.1480/- व फॉर्म फी रु.44/- अंतर्भूत आहे. सदर शुल्काचा लेखाशाखेकडे भरणा विलंबाने केला जातो हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होते.

| नाक्याचे नाव | पावती क्रमांक व पावतीचा कालवधी | रक्कम | लेखाशाखेकडे भरणा केलेले चलन क्र./तारीख |
|---|---|---|---|
| देगाव | 002103 ते 002113<br>दि.28.08.12 ते 10.01.13 | 18372/- | 039789/11.01.2013 |

नाक्यावर शुल्क वसूल झाल्यावर सत्वर ते लेखाशाखेकडे जमा करणे आवश्यक असताना विलंबाने जमा करण्याबाबतचे प्रयोजन स्पष्ट झाले नाही.

2. दक्षता विभागाने पारगमन नियम भंगापोटी वसूल केलेल्या शुल्काबाबतची ठेवलेली नोंदवही अपूर्ण आहे. त्यामध्ये दरमहाचा गोषवारा नमूद नाही. तसेच नोंदवहीवर संबंधित प्राधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत. नोंदवही परीपूर्ण नसल्यामुळे वर्षभरात दक्षता विभागाने अशा प्रकारे किती प्रकरणांत कार्यवाही केली याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. विभागाने सदर नोंदवही परिपूर्ण करुन लेखापरीक्षण वर्षातील कार्यवाही केलेली प्रकरणे उपलब्ध करावीत.

3. दक्षता विभागाने पारगमन नियम भंगापोटी केलेल्या कार्यवाहीबाबतची प्रकरणे तपासता पारगमन शुल्काची पावती केल्यानंतर सदरचा माल विहित मुदतीत ज्या नाक्यावरून महानगरपालिका हद्दीबाहेर जाणार आहे, त्या नाक्यावरून तो माल विहित मुदतीत गेल्याबाबतची पडताळणी करण्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. अशा प्रकरणी महानगरपालिका हद्दीबाहेर माल गेल्याबाबतची पडताळणी केली असल्याचे स्पष्ट होत नाही.प्रस्तुत प्रकरणी अर्धसमास ज्ञापन क्रमांक 92 दिनांक 17/07/2015 निर्गमित करण्यात आला असून प्राप्त अनुपालन परिपूर्ण नाही.

DATPGDM5901 (Ref No : 14, Hmm No : 92)

## ***126 महानगरपालिका यांनी रस्ता अनुदानामधून किमान 10% तरतूद वाहतूक नियंत्रणव्यवस्था, रस्त्यावरील दिशा दर्शक फलक व इतर स्ट्रीट फर्निचर बसविणे, झेब्रा क्रॉसिंग तयार करणे इत्यादीसाठी खर्च करणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.जीईएन-2011/प्र.क्र.147/नवि-16, दिनांक 15/09/2011 अन्वये 2011-12 या वर्षामध्ये सोलापूर महानगरपालिकेस 2.00 कोटी इतके रस्ता अनुदान प्राप्त झाले होते. शासन निर्णयातील तरतुदी नुसार 10% रक्कम रू20.00 लक्ष वरील नमूद कामाकरिता खर्च करणे आवश्यक होते. परंतु वरील नमूद बाबीवर खर्च केलेला नाही.*** |

नगर विकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण 2011/प्र.क्र.74/नवि-16 मंत्रालय मुंबई, दिनांक 18/07/2011 अन्वये शासनाकडून प्राप्त होणाऱ्या रस्ता अनुदानामधून किमान 10% निधी वाहतूक पोलीस यांच्याशी सल्ला मसलत करून ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार शहरातील चौक व रस्त्यावर वाहतूक व्यवस्था निर्माण करणे व त्याची देखभाल व दुरुस्ती करणे, रस्त्यावरील लेन मार्किंग निश्चित करण्यासाठी वेगवेगळ्या रंगातील पट्ट्यांची आखणी करणे, रस्त्यावर झेब्रा क्रॉसिंग पट्टे मारणे, रस्त्यावर दिशा दर्शक फलक व इतर स्ट्रीट फर्निचर बसविणे, पदपथ व रस्त्यांच्या मध्यभागी दुभाजक निर्माण करणे इत्यादी प्रयोजनासाठी खर्च करणे सर्व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक आहे.

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.जीईएन-2011/प्र.क्र.147/नवि-16, दिनांक 15/09/2011 अन्वये 2011-12 या वर्षामध्ये सोलापूर महानगरपालिकेस 2.00 कोटी इतके रस्ता अनुदान प्राप्त झाले होते. उक्त शासन निर्णयातील तरतुदी नुसार 10% रक्कम रू.20.00 लक्ष वरील नमूद कामाकरिता खर्च करणे आवश्यक होते. परंतु वरील नमूद बाबीवर खर्च केल्याचे दिसून येत नाही. या बाबत अर्ध समास पत्र क्रमांक 44, दि.27/04/15 अन्वये विभागास विचारणा केली असता, नगर अभियंता विभागाने त्यांचेकडील पत्र क्रमांक 626 दि.15/06/15 अन्वये भविष्यात यापुढे शासन निर्णयातील तरतुदी नुसार 10% रक्कम वाहतूक शाखेशी सबंधित असल्याने खर्च करण्याची कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल. तथापि, 2012-13 या वित्तील वर्षात सदरची कार्यवाही न झाल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATDSAM7301 (Ref No : 39, Hmm No : 44)

## *127 महानगरपालिकेच्या सर्व विभागाकडील वाहनांचे लॉगबुक हिस्ट्रीशीट नोंदवहया अपूर्ण असल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 15**

*लेखा शीर्ष : वाहन इंधन तेले व दुर    मनपा निधी*

*अनियमितता कलम   : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 7437398.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहनांचे लॉगबुक हिस्ट्रीशीट नोंदवहया इत्यादींची तपासणी केली असता त्या अपुर्ण असल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहनांचे लॉगबुक हिस्ट्रीशीट नोंदवहया इत्यादींची तपासणी केली असता त्या अपुर्ण असल्याचे आढळुन आले. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 160 दि. 24/08/2015 कळविण्यात आले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 29/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) आरोग्य विभागाकडील 46 वाहनांसाठी डीझेल खरेदी साठी 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये रु.7437398/- खर्च करण्यात आला आहे. परंतु सदर वाहनांचे लॉगबुक 2012-13 करीता ठेवण्यत आले नसल्याचे लेखापरीक्षणास सांगण्यात आले. त्यामुळे सदर वाहनांसाठी घेतलेले डिझेल, धावलेले अंतर, इ. बाबत लेखापरीक्षण करता आले नाही. त्यामुळे सदरची रक्कम रु. 7437398/-मान्य करता येत नाही.

2) नगर अभियंता कडील वाहनाचे लॉगबुकमध्ये काम सुरु केलेल्या वेळचे रिडींग, काम संपले वेळचे रिडींग, वापर रिडींग वाहनांसाठी घेतलेले डिझेल, वाहन चालकाची स्वाक्षरी सहा अभियंता यांची स्वाक्षरी या रकान्यामध्ये आवश्यक त्या नोंदी नसल्याचे आढळुन आले. लॉगबुक मध्ये मासिक गोषवारा काढला नसल्याने वाहनांचे मायलेज बाबत खात्री करता आली नाही. लॉगबुक मध्ये आवश्यक ठिकाणी सक्षम अधिकारी यांच्या सह्या नसल्याने लॉगबुक मधील प्रवासाचा तपशिल योग्य असल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

3) अधिका-यांच्या वाहनांचे लॉगबुक मध्ये वाहन गॅरेजमधुन काढल्याची वेळ, वाहन परत गॅरेजमध्ये आल्याची वेळ, प्रवास होऊन प्रवास करणाऱ्या अधिका-यांचे नाव, स्वाक्षरी ,घेतलेल्या इंधनाची नोंद इ. आवश्यक नोंदी घेतला नसल्या चे आढळुन आले. मासिक गोषवारा काढले नसल्याचे आढळुन आले. आवश्यक त्या सर्व ठिकाणी सक्षम अधिका-याच्यास स्वाक्ष-या घेतल्या नसल्याचे आढळुन आले.

4) आयातकर कार्यालयाकडील खालील वाहनांची लॉगबुके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

वाहन क्रमांक 1) MH 13 P 0165 2) MH 13 AA 0015 3) MH 13 P 0103 4) MH 13 P 0102

5) आयातकर कार्यालयाकडील वाहन क्र MH 13 P 0166 साठी रिक्वीजिशन क्र 8268 दि.21/2/2013 अन्वये घेतलेल्या 20 लिटर डिझेलची जमा नोंद वाहनांचे लॉगबुक मध्ये नसल्याचे आढळुन आले त्यामुळे सदर डिझेलची किमत रु.1466.80 वासुलपात्र आहे.

6) नगर अभियंता यांचे कडील वाहन क्र MWC 6115  (झोन क्र.5) साठी रिक्वी्जीशन क्र 144 दि.1/2/2013 अन्वये 70 लिटर डिझेल घेतले होते परंतु त्याची जमा नोंद वाहनांचे लॉगबुक मध्ये नसल्याचे आढळुन आले त्यामुळे सदर डिझेलची किमत रु.5133.80 वासुलपात्र आहे.

7) नगर अभियंता कडील वाहन क्रमांक MH 13 R 6560 साठी रिक्वीजीशन क्र 145 दि.4/2/2013 अन्वये घेतलेल्या 50 लि.डिझेलची सविस्तर जमा नोंद वाहनांचे लॉगबुक मध्ये आढळुन आली नाही. फक्त डिझेल घेतले एवढेच नमुद असल्याचे आढळुन आले. त्यामुळे सदर डिझेलची किमत रु.3667/- वासुलपात्र आहे.
8) नगर अभियंता कडील खालील वाहनांची लॉगबुके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.
वाहन क्रमांक MH 13 R 1748 2) MH 13 R3471 3) MH 13 B 0012 (टेम्पो) 4) MH 13 R 6115 (5) MH 13 G 6801 (6)MH 13 R 1758
9) वाहन क्रमांक MH 13 R 0014 रिक्वीजीशन क्र 524 दि.19/02/2013 अन्वये घेतलेल्या 20 लि.डिझेलची सविस्तर जमा नोंद वाहनांचे लॉगबुक मध्ये आढळुन आली नाही त्यामुळे सदर डिझेलची किमत रु.1466.80 वासुलपात्र आहे.
10) नगर अभियंता कडील जेसीबी, रोलर, यांचेसाठी बॅरलमध्ये डिझेल घेतले जाते. परंतु घेतलेल्या डिझेलची नोंदवही ठेवली नसल्याचे त्याचा वापर कोणत्या वाहनासाठी किती लिटर केला याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. माहे फेब्रुवारी 2013 मध्ये बॅरेल मध्ये 800 लिटर डिझेल दिल्याचे परिवहन विभागाकडील बील क्रमांक 2109 जा.क्र.3453 अन्वये दिल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले. परंतु त्याबाबतची नोंदवही ठेवली नसल्याने जमा व त्यातुन केलेले वाटप याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही त्यामुळे सदर डिझेलची किमत रु.58664/- लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही.
11) नगर अभियंता कडील रोलर क्र 1441 मध्ये दि.12/1/2013 पर्यंतच्या नोंदी आहेत परंतु त्यापुढील नोंदी नाहीत.
12) जेसीबी क्र.184 व 5386 लॉगबुक मध्ये कामाचा तपशिल, दिनांक टाईम, चालकाची स्वाक्षरी या नोंदी आहेत परंतु डिझेल घेतल्याच्या नोंदी नाहीत. कामाच्या वेळाच्या सविस्तर नोंदी नाहीत. सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या नाहीत, मासिक वार्षिक गोषवारा नमुद नसल्याचे आढळुन आले.
13) प्रिमीक्ससाठी 120 लिटर डिझेल दिले असल्याची नोंद आहे. परंतु संबंधित विभागाकडील नोंदवहीमध्ये फक्त 60 लिटर डिझेलच्या नोंदी आढळुन आल्या. त्यामुळे सदर डिझेलची किमत रु.4400/- वासुलपात्र आहे.
14) नगर अभियंता विभागाकडील वाहन क्रमांक 6115 मध्ये दिनांक, खेपांचा तपशिल, डिझेल भरल्याच्या नोंदी आहेत. परंतु कामाचे सुरुवातीचे, शेवटचे रिडींग, फरक, चालकाची स्वाक्षरी, सहा.अभियंता यांच्या स्वाक्ष-या या रकान्यामध्ये नोंदी आढळुन आल्या नाहीत. तसेच पृष्ठ क्र.63 वर दि.25/10/2011 ते दि.31/10/2011 या कालावधीच्या् नोंदी आहेत परंतु त्यानंतर पृष्ठ क्र.64 वर दिनांक 1/11/2012 च्या नोंदी आहेत. म्हणजे दि.1/11/2011 ते 31/10/2012 या एक वर्ष कालावधीच्या नोंदी लिहिल्या नसल्याचे आढळुन आले. यावरुन सदरचे लॉगबुक वेळोवेळी न लिहिता एकदम लिहिल्याचे दिसुन येते. तसेच संबंधित सक्षम अधिकारी यांनी या एक वर्षाच्या कालावधीत लॉगबुक मध्ये नोंदी होत नाहीत याकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते.
15) महिला व बाल कल्याण विभागाकडील वाहन क्रमांक MH 13 P 0342 या वाहनांचे लॉगबुक व हिस्ट्रीशीट लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

## *128 केंद्रशासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेंतर्गत मनपा क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकांकरीता वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबतचे दस्तऐवज उपलब्ध करुन देणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 10778040.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10778040.00/-

***केंद्रशासन पुरस्कृत वैयक्तीक शौचालय बांधकामाबाबत मक्तेदार भारत कन्स्ट्रक्श्न यांनी केलेल्या कामाची निवीदा नस्ती, मोजमाप पुस्त्क, खर्चाची मुळ प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध् करुन दिलेली नाही.***

2012-13 या आर्थिक वर्षात केंद्रशासन पुरस्कृत वैयक्तीक शौचालयाचे बांधकामाबाबत 4 मक्तेदारांना रक्कम रु. 2,97,14,825/- प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यापैकी भारत कन्स्ट्रक्शन या मक्तेदारास रक्कम रु. 1,07,78,040/- चे प्रदान करण्यात आलेले आहे. तरी भारत कन्स्ट्रक्शन या मक्तेदाराचे खालील प्रमाणे दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 6(3) नुसार अर्धसमास ज्ञापन क्रमांक 66 दिनांक 25.6.2015 देण्यात आलेले आहे.

1. भारत कन्स्ट्रक्शन यांचे निवडीबाबतची मुळ निवीदा नस्ती
2. भारत कन्सट्रक्शन यांचे कार्यादेश,करारनामा,
3. भारत कन्स्ट्रक्शन यांनी कार्यादेशानुसार केलेल्या कामाचे मोजमाप पुस्तके,
4. भारत कन्स्ट्रक्शन यांना 2012-13 या वित्तीय वर्षात केलेल्या प्रदानाचे मुळ प्रमाणके

त्याबाबत विभागाने दिनांक 6.7.2015 नुसार दिलेल्या खुलाशानुसार भारत कन्स्ट्रक्शन या मक्तेदारा विरुध्द् आय.आर.नं. 410/13 दिनांक 22.12.2013 नुसार पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल झाल्याने त्यांचे कामाबाबतचा सर्व दस्तऐवज पोलिस कस्ट्डीत असल्याने उपलब्ध् करुन देता येत नसल्याबाबत खुलासा केलेला आहे. परंतू सदर दस्त्ऐवज पोलिस स्टेशन ला जमा केल्याबाबतच्या पत्राची प्रत वा तद्नुषंगीक दस्त्ऐवज खुलाशा सोबत जोडलेले नाहीत. तसेच सदर मूळ दस्त्ऐवज गुन्हाकामी जमा करण्यापुर्वी त्याची छायांकित प्रत करण्यात आलेली नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर मक्तेदारास लेखापरीक्षण वर्षात केलेल्या सर्व प्रदानांबाबत खात्री करता आली नाही. स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011 (सुधारणा) मधील कलम 4(3) नुसार लेखापरीक्षणास आवश्यका असलेले लेखे उपलब्ध् करुन देण्याची जबाबदारी सक्षम प्राधिकरणाची असून त्यानुसार लेखापरीक्षणास लेखे उपलब्ध् करुन देण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर मक्तेदारास प्रदान केलेली रक्कम रु. 10778040/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

## *129 विद्युत विभागाकडील विद्युत साहित्य खरेदी व साठा नोंदवही बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : विद्युत मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***महानगरपालिका सोलापूर आयुक्त यांचे दिनांक 25/10/11 चे आदेश क्रमांक 211 नुसार सोलापूर मनपाच्या कोणत्याही कामासाठी केल्या जाणाऱ्या जाहीर प्रसिद्धीकरणास मिळालेल्या प्रतिसादा नुसार किमान 03 निविदा प्राप्त होणे आवश्यक असतांना एकमेव प्राप्त निविदेव्दारे प्राप्त झालेले दरानुसार साहित्याची दरनिश्चिती केली.*** |

सोलापूर महानगरपालिकेच्या विद्युत विभागासाठी 2012-13 करिता लागणारे विद्युत साहित्य खरेदीची निविदा नस्ती व साठा नोंदवहीची तपासणी केली असता, लेखापरिक्षणात आढळलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 89, दि.17/07/15 अन्वये खुलासा/अभिलेख मागविला होता. विद्युत विभागाने त्यांचेकडील दिनांक 28/07/15 रोजी सादर केलेल्या खुलाशाचा विचार करता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.विद्युत विभागाने विद्युत साहित्य खरेदी साठी सूर्या, फिलिप्स, क्रॉम्पटन, बजाजISO धारक उत्पादक कंपनीकडून विद्युत साहित्याचे दर मागविले. त्यामध्ये प्रथमतः एकही निवीदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे दुसऱ्या वेळेस पुन्हा जाहिरात देवून निविदा दर मागविण्यात आले. त्यामध्ये मे.बागडी एजन्सी सोलापूर यांची एकमेव निविदा प्राप्त झाली. स्थायी समिती ठराव क्रमांक 190 दिनांक 15/09/12 अन्वये सदर निविदा अंतिम करण्यात येवून निविदाधारकास कार्यादेश क्रमांक 518 दिनांक 28/09/2012 अन्वये कार्यादेश देण्यात आले. महानगरपालिका सोलापूर आयुक्त यांचे दिनांक 25/10/11 चे आदेश क्रमांक 211 नुसार सोलापूर मनपाच्या कोणत्याही कामासाठी केल्या जाणाऱ्या जाहीर प्रसिद्धीकरणास मिळालेल्या प्रतिसादा नुसार किमान 03 निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रथम जाहीर प्रसिद्धीकरणानंतर तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास दुसऱ्यांदा प्रसिद्धीकरण करण्यात यावे अशा प्रकारे किमान तीन वेळा प्रयत्न झालेनंतरच मक्ता निश्चित करण्यात यावा असे असतांना तीन वेळा प्रसिद्धीकरण न करता एकमेव निविदेव्दारे प्राप्त झालेले दर अंतिम करण्यात आले. या बाबत विद्युत विभागास अर्धसमास पत्र क्र.89, दि.17/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे कडील दि.28/07/15 चे अनुपालनामध्ये भविष्यामध्ये लागणारे साहित्याची निकड पाहता व नजीकच्या काळात

सोलापूर शहरात सार्वजनिक उत्सव चालू होणार असल्यामुळे इलेक्ट्रिकल साहित्याची आवश्यकता लागणार होती. त्यामुळे तिसऱ्यांदा निविदा प्रसिद्धीकरण न करता एकाच निविदेव्दारे प्राप्त झालेले दर अंतिम केले. असा खुलासा केला आहे, परंतु एकाच निविदेव्दारे प्राप्त झालेले दर स्वीकृत केल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा होवू शकला नाही. विभागाने दिलेले उत्तर संयुक्तिक नसून आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2. विद्युत साहित्याची साठा नोंदवही राष्ट्रीय लेखा संहिता नियम 13.1 मधील विहित नमुन्यात ठेवण्यात आली नाही. या बाबत विद्युत विभागास अर्धसमास पत्र क्र.89, दि.17/07/15 अन्वये विचारणा केली असता, विभागाने त्यांचे कडील दि.28/07/15 चे अनुपालनामध्ये विहित नमुन्यामध्ये नोंदवही ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

DATVCSM6501 (Ref No : 49, Hmm No : 89)

### *130 शासनाकडून निवृत्ती वेतनापोटी अनुदान उपलब्ध करून न घेतलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8427776.00/-

***महानगरपालिकांनी चालविलेल्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या 2012-13 च्या वित्तीय वर्षाच्या निवृत्तीवेतनापोटी शासनाकडून खर्च् प्रतिपूर्तीच्या स्वरूपात 100% अनुदान देण्यात येते. परंतु सोलापूर महानगरपालिकेने शासनाकडे अनुदानाची मागणी करुन अनुदान उपलब्ध करुन घेतले नसुन 2012-13 या वित्तीय वर्षात रुपये 8427776/- निवृत्ती वेतनावर मनपा निधीमधून खर्च केला आहे.***

महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतनापोटी महानगरपालिकांना येणारा खर्च शासन निर्णय, शिक्षण क्रिडा व समाज कल्याण विभाग क्रमांक एस.एस.एन-1968/जी दिनांक 15/10/1971 व शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक एस.एस.एन 1369/9980 जी दिनांक.31/08/1972 परिच्छेद (सहा) मधील तरतुदीनुसार निवृत्तीवेतनावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या स्वरुपात 100% शासनाकडून देण्यात येतो.

तथापि काही महानगरपालिकांच्या माध्यमिक शाळांमधुन निवृत्त झालेल्या शिक्षक/ शिक्षकेतर

कर्मचा-यांना निवृत्ती वेतन नियमित मिळत नसल्याने महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक पीईएन.1089/191 माशि-6 दि. 6 नोंव्हेंबर 1989 च्या शासन निर्णयाद्वारे प्रतिपुर्तीच्या स्वरुपात देण्यात येणारे अनुदान प्रत्यक्ष खर्चाचा चारमाही/आठमाही व अकरामाही आढावा घेऊन अग्रीम अनुदान मंजुर करण्याविषयी निर्णय घेण्यात आला आहे.

वित्तीय वर्षात निवृत्तीवेतनाच्या प्रदानावर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

| अ.क्र | प्रशालेचे नाव | निवृत्तीवेतन धारकांची संख्या | | | निवृत्ती वेतनावरील खर्च रक्कम रुपय |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वीचे निवृत्तीवेतन धारक | 2012-2013 मधील निवृत्तीवेतन धारक | एकूण निवृत्तीवेतन धारक | |
| १ | प्रशाला क्र. 1 | 5 | - | 5 | 895238 |
| २ | प्रशाला क्र. 2 | 3 | - | 3 | 418051 |
| ३ | प्रशाला क्र. 3 | 2 | 2 | 4 | 602899 |
| ४ | प्रशाला क्र. 4 | 2 | - | 2 | 1953800 |
| ५ | जयभवानी प्रशाला | 8 | - | 8 | 1267530 |
| ६ | उर्दू प्रशाला | 3 | - | 3 | 3290258 |
| | **ए ूण** | | | | **8427776** |

परंतु महानगरपालिकेने शासन निर्णयामध्ये सुचित केल्याप्रमाणे प्रत्यक्ष खर्चाचा प्रस्ताव सादर करुन शासनाकडून निवृत्तीवेतनाचे अनुदान प्राप्त करुन घेतलेले नाही. त्यामुळे 2012-13 या वित्तीय वर्षामधील निवृत्तीवेतनासाठीची संपूर्ण रक्कम रुपये 8427776/- महानगरपालिका निधीमधून प्रदान केलेली आहे.

मुंबई शाळा मंडळ लेखासंहिता 1953 मधील नियम 22 प्रमाणे निवृत्ती वेतनविषयक अभिलेख उदा. हयातीचे दाखले, ओळख पटविल्यानंतरचे आदेश, प्रति महिन्याची प्रमाणपत्रे, पी.पी.ओ. रजिस्टर तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता-1971 नियम - 135 (2) प्रमाणे निवृत्तीवेतन नोंदवही, परिशिष्ठ भाग - ब मधील परिच्छेद - 25 (3) नुसार निवृत्ती वेतन लेखापरिक्षा नोंद वही (नमुना- 153) परिच्छेद - 26 (अ) नुसार निवृत्ती वेतन प्रदान आदेश नोंदवही (नमुना- 154), परिच्छेद - 27 नुसार उपदान नोंदवही (नमुना- 155) या सारख्या निवृत्तीवेतन विषयक नोंदवहयांची मागणी अर्धसमास ज्ञापन क्र. 98 दिनांक 22/07/2015 अन्वये लेखापरिक्षणासाठी केलेली होती. परंतु विहीत कालावधीत नोंदवहया सादर न केल्याने त्यांची तपासणी तसेच भाष्य करता आले नाही. तरी वरील खर्चाची रक्कम रु 8427776 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

## *131 महिला व बाल कल्याण समिती नर्सिंग प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 252000.00/-

***कीर्ती प्रोफेशनल अकॅडमी, सोलापूर या खाजगी संस्थेमध्ये एकूण ६३ महिलांना नर्सिंग प्रशिक्षण देण्यात आले असून त्याकरिता रु. 252000/- इतका खर्च झालेला आहे. परंतु सदर खर्च करतांना वित्तीय नियमांचे पालन करण्यांत आले नाही.***

दिनांक 30/01/2012 ते 30/04/2012 या तीन महिन्याच्या कालावधीत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत कीर्ती प्रोफेशनल अकॅडमी, सोलापूर या खाजगी संस्थेमध्ये एकूण 63 महिलांना नर्सिंग प्रशिक्षण देण्यात आले असून त्याकरिता रु. 252000/- इतका खर्च झालेला आहे. परंतु प्रमाणक क्रमांक उपलब्ध झाला नाही. सदर बाबतच्या लेख्यांची पडताळणी करण्यांत आली असता आढळून आलेल्या अनियमीततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 135, दिनांक 30/07/2015 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. त्याबाबतचे अनुपालन पत्र क्रमांक युसीडी/163, दिनांक 13/08/2015 अन्वये प्राप्त झाले आहे. तथापि अनुपालन संयुक्तीक नसल्यामुळे अमान्य करण्यांत आले आहे. किर्ती प्रोफेशनल अकॅडमी संस्थेस रक्कम रुपये 2,52,000/- किती टप्प्यात अदा केली आहे हे नमुद नाही. धनादेश क्रमांक व दिनांक, प्रमाणक क्रमांक यांचा उल्लेख नाही. संस्था शासनमान्य असल्याबाबत प्रमाणपत्र् नाही. लाभार्थी निवडीचे निकष नाहीत. संस्थेबरोबर करारनामा केलेला नाही. अटी व शर्ती ठरविलेल्या नाहीत. सबब, लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. धारिकेतील टीप्पणीवरुन असे दिसून आले आहे की , कीर्ती प्रोफेशनल अकॅडमी, सोलापूर या संस्थेस रु. 2,52,000/- प्रदान करण्यांत आले आहेत . परंतु सदर रक्कम संस्थेस कधी अदा केली, किती टप्प्यात अदा केली, प्रशिक्षण सुरु करणेपूर्वी अदा केली आहे की, प्रशिक्षण संपल्यानंतर अदा केली आहे याबाबतची माहिती धारीकेत उपलब्ध झालेली नाही.

2. महानगरपालिकेतील सुवर्ण जयंती योजनेंतर्गत महिला व बालके गटाने व्यवसाय करण्याची आवश्यकता भासल्यास अशा लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देणेकरीता संस्थेची निवड कशी

करावी इत्यादी बाबत सविस्तर माहिती सुवर्ण जयंती पुस्तीका, 2005 मधील पृष्ठ क्रमांक 23, परिच्छेद क्रमांक 37 मध्ये दिलेली आहे . सदर मार्गदर्शक सुचनानुसार घटकासाठी निवडली जाणारी प्रशिक्षण संस्था ही शासन मान्य संस्था असावी, हे प्रशिक्षण प्राधान्याने शासकीय संस्था/आय.टी.आय. मार्फतच देण्यात यावे. जर शासकीय संस्था उपलब्ध नसतील तर शासन मान्य संस्था व त्याही उपलब्ध नसल्यानंतरच खाजगी संस्थाचा विचार करणे योग्य आहे त्याच धर्तीवर महिला व बालकल्याण विभागाने प्रशिक्षण संस्थेची निवड करणे आवश्यक होते . परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

3. 63 महिला लाभार्थीनीची नर्सिंग प्रशिक्षणासाठी निवड केलेली आहे. या लाभार्थ्यांची निवड करतेवेळी एकूण किती अर्ज प्राप्त झाले होते व या लाभार्थी निवडीसाठी कोणते निकष वापरले याबाबतचा तपशील उपलब्ध झालेला नाही.

4. संबधित संस्थेचा प्रशिक्षणार्थ्यांच्या स्वाक्षरीसह साप्ताहिक हजेरीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

5. योजना राबविण्यापूर्वी अटी व शर्ती तयार करणे आवश्यक होते परंतु अटी व शर्ती विहीत न करताच व करारनामा न करता कीर्ती प्रोफेशनल अकडमी, सोलापूर यांना काम देणेत आले आहे.

6. ज्या 63 महिलांना नर्सिंग कोर्स चे प्रशिक्षण देण्यात आले आहे त्यांनी प्रशिक्षण समाधानकारकरीत्या पूर्ण केले किंवा कसे याबाबतचा महिला व बाल कल्याण अधिकारी/सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल नाही, त्यामुळे प्रशिक्षणाचा उद्देश सफल झालेची खात्री करता आलेली नाही.

उपरोल्लेखीत 1 ते 6 ची पुर्तता करेपर्यंत रक्कम रुपये 2,52,000/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रुपये 2,52,000/-

DATRMJM6101 (Ref No : 59, Hmm No : 135)

## *132 150 एम.एम. व्यासाचे विंधन विहिरी घेणे व त्यावर इंडिया(मार्क2) ची हातपंप पुरवणे व बसविणे कामाची अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष : टंचाई शासकिय निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 470376.00/-

| |
|---|
| ***विंधन विहिरीसाठी वापरणेत आलेले साहित्य हे स्पेसिफिकेशननुसार असल्याचे देयकासोबत प्रमाणपत्र देणेत*** |

***आलेले नाही. साहित्य खरेदीची डिलीव्हरी चलने नाहीत. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के कामाची तपासणी केल्याची मोजमाप पुस्तकामध्ये तारखेसह स्वाक्षरी केलेली नाही.***

150 एम.एम. व्यासाचे विंधन विहिरी घेणे व त्यावर इंडिया(मार्क2) ची हातपंप पुरवणे व बसविणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1)लेखाशिर्ष - टंचाई.

2) प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील जा.क्र. 5076 दि.02/01/2013.

3) ठेकेदाराचे नांव - मे.लक्ष्मीनारायण एंटरप्रायझेस, सोलापूर.

4) निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र. 456 दि.07/02/2013.

5) वार्षिक करार क्र. 1095 दि.03/09/2012.

6) सन 2012-13 मध्ये देणेत आलेले आदेश

अ) जा.क्र. 01 दि. 21/01/2013 - 10 ठिकाणी विंधन विहिरी घेणे व त्यावर हातपंप बसविणे.

आ) जा.क्र. 02 दि. 07/02/2013 - 7 ठिकाणी विंधन विहिरी घेणे व त्यावर हातपंप बसविणे.

ई) जा.क्र. 03 दि. 01/03/2013 - 8 ठिकाणी विंधन विहिरी घेणे व त्यावर हातपंप बसविणे.

7) खर्च रु.10,58,352/- (प्रमाणक क्र. 167/28/03/2013)

8) मोजमाप पुस्तक क्र. 181 पान नं.1 ते 5

सदर कामाच्या नस्तीचे व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.60 दि.23/06/2015 अन्वये खात्यास विचारणा करण्यात आली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)विंधन विहिरीसाठी वापरणेत आलेले साहित्याच्या नोंदी मोजमाप पुस्तक क्र.181 पान नं. 1 ते 5 वर घेणेत आल्या आहेत. सदर साहित्य हे करारामध्ये नमूद केलेल्या स्पेशिफिकेशनप्रमाणे वापरणेत आले असल्याचा दाखला देणेत आलेला नाही. ठेकेदाराने सदर कामासाठी लागणारे साहित्य खरेदी केल्याचे डीलीव्हरी चलने नस्तीमध्ये अढळ होत नाहीत. त्यामुळे सदर कामावर 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये खरेदी करणेत आलेले केसिंग, सिलेंडर पाईप व रॉडवरिल एकूण खर्च रु.4,70,376/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

2) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र. 24 नुसार कार्यकारी अभियंता यांनी कामाचे रकमेच्या 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के कामाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु मोजमाप पुस्तकामधील मोजमापे पाहिले असता कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करण्यात आली नाही.

## *133 8 % ईटीपी (ETP) चार्जेस वसुलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***ETP रक्कम वसुलीबाबतचे प्राधिकाराची प्रत / माहिती लेखापरिक्षणास सादर केली नाही. ETP रक्कम शासन निधीतुन कपात केल्याने शासकीय अनुदानाच्या योजनांवर / विकास कामांवर शासकीय निधीची रक्कम संपुर्णपणे 100% खर्च होणेऐवजी 92% खर्च हात असल्याचे आढळुन आले. सदर ईटीपी चार्जेस कपातीबाबत प्राधिकार लेखापरीक्षणास आढळुन आला नाही. आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये कपात करण्यात आलेली ईटीपी रक्कम बँकेत जमा केल्याचे बँकेचे विवरणपत्र लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या 2012-13 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये शासकीय अनुदान मधुन करण्यात आलेल्या सर्व योजना व विकास काम यावरील खर्चामधून 8% रक्कम ईटीपी चार्जेस म्हणून कपात करुन घेण्यात आली असल्याचे आढळुन आले. सदरची रक्कम मक्तेदाराच्या कामाच्या बिलामध्ये आधी समाविष्ठ केली जाते व नंतर ती 2% सुरक्षा ठेव, 2% आयकर, 2% व्हॅट यांबरोबर 8% ईटीपी चार्जेस म्हणून कपात केली जाते. सदरची कपात करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेच्या स्वतंत्र खात्यामध्ये जमा केली जाते परंतु सदरची ETP रक्कम शासन निधीतुन कपात केल्याने शासकीय अनुदानाच्या योजनांवर / विकास कामांवर शासकीय निधीची रक्कम संपुर्णपणे 100% खर्च होणेऐवजी 92% खर्च हात असल्याचे आढळुन आले. सदर ईटीपी चार्जेस कपातीबाबत प्राधिकार लेखापरीक्षणास आढळुन आला नाही. 2012-13 आर्थिक वर्षामध्ये कपात करण्यात आलेली ईटीपी रक्कम बँकेत जमा केल्याचे बँकेचे विवरणपत्र लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाही. तसेच कोणत्या प्राधिकाराने सदरची ETP रक्कम वसुल केली आहे त्याची प्रत लेखापरिक्षणास सादर केली नाही.

सदर ETP वसूलीबाबत अर्धसमास पत्र क्र.149 दि.31/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाचे अनुपालन विचारात घेऊन परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

DATDSAM7301 (Ref No : 120, Hmm No : 149)

## *134 पेटी कॅशबुक ठेवले नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 3**

*अनियमितता कलम : 9ङ*

***खात्याने सदर खात्याचे जमा व खर्चाचे पेटी कॅशबुक ठेवण्यात आलेले नाही. खात्याने अदा केलेले धनादेश कशासाठी देण्यात आले आहेत त्याचा तपशील खात्याकडील नोंदवहीमध्ये नोंदल्याचे आढळून आले नाही. दिनांक 31/03/2013 रोजी शिल्लक रु.1,69,477.30 ही कशाची आहे याचा तपशील नोंदवहीमध्ये नमूद केलेला नाही.***

झोन क्र. 1 चे ICICI बँक, पार्क चौक, सोलापूर शाखेमध्ये खाते क्र. 139205000562 चे चालू खाते उघडणेत आलेले आहे. सदर बँक खात्यामध्ये दि.31/03/2013 रोजी रु.1,69,477.30 इतकी शिल्लक आहे. खात्याने ठेवण्यात आलेल्या नोंदीवहीतील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र. क्र. 77 दि.09/07/2015 अन्वये विचारणा करण्यात आले होते. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) खात्याने सदर खात्याचे जमा व खर्चाचे पेटी कॅशबुक ठेवण्यात आलेले नाही.

2) बँक खात्याचे माहे मार्च 2013 चे बँकेकडील स्टेटमेंटमधील नोंदीची तपासणी केली असता खाली नमूद केलेले धनादेश कशासाठी देण्यात आले आहेत त्याचा तपशील खात्याकडील नोंदवहीमध्ये नोंदल्याचे आढळून आले नाही. तसेच सदर रक्कम प्रदान केल्याची देयके लेखा परिक्षणास सादर केली नाहीत.

| अ.क्र. | धनादेश क्र. | कोणास धनादेश दिला त्याचे नाव | अदा केलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1. | 005709 | श्री सुदर्शन टायर्स् | 218963/- |
| 2. | 005712 | प्रकाश माने | 10000/- |
| 3. | 005715 | एस.आर. मंदापुरे | 2900/- |
| | | एकूण | 34793/- |

3) दिनांक 31/03/2013 रोजी शिल्लक रु.1,69,477.30 ही कशाची आहे याचा तपशील नोंदवहीमध्ये नमूद केलेला नाही. तरी त्याचा तपशील लेखा परिक्षणास सादर करण्यात यावा.

DGPKVSM6101 (Ref No : 76, Hmm No : 77)

## ***135 झोन क्र.3 मधील रस्त्यासाठी मुरुम पुरवठा केलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 521088.00/-

***मुरुम पसरविण्याच्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये घेण्यात आल्या नाहीत.***

सोलापूर महानगरपालिके अतर्गत असणारे झोन मधील किरकोळ दुरुस्तीकामी विभागीय कार्यालयाने निविदा मागवून मक्तेदार श्री दिनेशजी आळकुंट यांना मुरुम पुरवठा करणेसाठी आदेश देणेत आले आहे. झोन क्र.3 करिता मुरुम पुरवठा केलेल्या नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्र.78 दि.09/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/सक/360 दि.7.8.2015 अन्वये ठेकेदाराने मुरुम पुरवठा केल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तकमध्ये केल्या असून ती मोजमाप पुस्तके लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आल्याचे खात्याने कळविले आहे. खात्याने लेखापरीक्षण कालावधी संपलेनंतर अनुपालन सादर केल्याने उपलब्ध अभिलेखे तपासणे शक्य झाले नाही. त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)झोन क्र.3 ने ठेवण्यात आले बजेट नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता श्री.दिनेशजी आळकुंटे यांनी 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये 1623.32 घ.मी. मुरुम पुरवठा केलेला आहे. मुरूम पुरवठा केल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये घेणेत आलेल्या आहेत. परंतु मुरुम कोठे पसरविण्यात आला आहे यांच्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये करण्यात आल्या नाहीत. प्राभागाचे 2012-13 चे देयक नोंदवहीमधील नोंदीनुसार मुरुम पुरवठा प्रति घ.मी.रु.321/- प्रमाणे रु.5,21,088/- ठेकेदारास प्रदान करण्यात आलेली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. मुरुम पुरवठ्याची नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये घेणेत आली नसल्याने ती रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुरुम पुरवठा केलेल्या कामाचे नाव | प्रदान केलेली रक्कम रु. |
|---|---|---|
| 1. | प्रभाग क्र.20 ब कामगार वसाहत भाग -2 येथे मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 2. | प्रभाग क्र.20 ब मधील गितीननगर व कामगार वसाहत भाग -2 येथे मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 3. | प्रभाग क्र.20 ब कामगार वसाहत भाग -1 येथे मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 4. | प्रभाग क्र.20 ब माळीनगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 5. | प्रभाग क्र.20 ब सुनिलनगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 6. | प्रभाग क्र.20 ब कल्लाप्पा आण्णानगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |

| | | |
|---|---|---|
| 7. | प्रभाग क्र.20 ब कोटानगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 8. | प्रभाग क्र.20 ब नितिननगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 9. | प्रभाग क्र.20 अ विविध नगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 10. | प्रभाग क्र.20 अ विविधनगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 11. | प्रभाग क्र.20 अ विविधनगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 12. | प्रभाग क्र.20 अ विविधनगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 13. | प्रभाग क्र.20 अ माळीनगर म्हेत्रेनगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 14. | प्रभाग क्र.20 अ आशानगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 15. | प्रभाग क्र.20 अ कल्लाप्पा आण्णानगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 16. | प्रभाग क्र.20 अ सिध्देश्वरनगर समरानगरमध्ये मुरुम पुरविणे. | 24768/- |
| 17. | गणेशपेठ शॉपींग सेंटर ते पेट्रोल पंप मुरुम पुरविणे. | 24960/- |
| 18. | रविवारपेठ 256 हनुमान मंदिर खारीबावडा ते खापर बोळ मुरुम पुरविणे. | 24960/- |
| 19. | राजेंद्र चौक परिसरात मुरुम पुरविणे. | 24960/- |
| 20. | मंगल बाजार दलाल बोळ ,गोल चावडी दवाखाना व परिसर मुरुम पुरविणे. | 24960/- |
| 21. | वारद बोळ मंगल बाजार म.न.पा. चाकोते मंगल कार्यालय परिसरात मुरुम पुरविणे. | 24960/- |
| | एकूण | 521088/- |

DGPKVSM6101 (Ref No : 77, Hmm No : 78)

## *136 झोन क्र.1 मधील रस्त्यासाठी मुरुम पुरवठा केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 1**

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 512930.00/-

***मुरूम पुरवठा केल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये घेणेत आलेल्या नाहीत.***

सोलापूर महानगरपालिके अतर्गत असणारे झोन मधील किरकोळ दुरुस्तीकामी विभागीय कार्यालयाने

निविदा मागवून वार्षिक मक्तेदार श्री दिनेशजी आळकुंट व बी.एच.लामकाणे यांना मुरुम पुरवठा करणेसाठी आदेश देण्यात आले आहेत. झोन क्र.1 करिता मुरुम पुरवठा केलेल्या नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्र. 79 दि. 09/07/2015 अन्वये विचारणा केली असता खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)झोन क्र.1 कडील बजेट नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता श्री.दिनेशजी आळकुंटे व बी.एच.लामकाणे यांनी 2012-13 या आर्थिक वर्षामध्ये 1597.91 घ.मी. मुरुम पुरवठा केलेला आहे. मुरूम पुरवठा केल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये घेणेत आलेल्या आहेत. परंतु मुरुम कोठे पसरविण्यात आला आहे यांच्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे मुरुम पुरवठा प्रति घ.मी.रु.321/- प्रमाणे रु.5,12,930/- प्रदान करण्यात आलेली रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 78, Hmm No : 79)

## *137 झोन क्रमांक 2 कडील प्रभाग समिती बैठकीच्या नोंदवहीतील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 04**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3585073.00/-

***प्रभाग समिती बैठकीची नोंदवही अद्ययावत नमुन्यात ठेवलेली नाही. 2010-11 व 2011-12 मध्ये मंजूर असलेल्यां 08 कामांचे ठराव विखंडीत न करता 2012-13 मध्ये घेण्यात आलेल्या प्रभाग समिती बैठकीत ठरावाव्दारे जुन्या कामांना पुनः श्च मान्यता घेण्यात आलेली आहे.***

सोलापूर मनपाच्या झोन क्रमांक 2 चे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या प्रभाग समिती बैठकीच्या नोंदवहीची पडताळणी करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 6(3) नुसार अर्धसमास ज्ञापन पत्र 68 दिनांक 25/06/2015 नुसार मागविण्यात आलेला खुलासा अप्राप्त् असुन त्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. प्रभाग समिती बैठकीची नोंदवही विहीत नमुन्यात न ठेवता साध्या रजिष्टर मध्ये संगणकीय प्रतीत ठेवण्यात आलेली आहे.त्यावर प्रभाग अधिकारी व प्रभाग सभापती यांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाहीत.
2. 2012-13 मध्ये प्रभाग समितीच्या 7 बैठका झालेल्या असून दिनांक 18.12.2012 व दिनांक 5.2.2013

च्या बैठकीची विषयसूची व बैठकीबाबतच्या नोंदी नोंदवहीत आढळुन आल्या नाहीत.

3. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम 29(ड) नुसार दिनांक 10.10.2012 रोजी प्रभाग समितीची 2 री बैठक घेण्यात आलेली असून सदर बैठकीत 2010-11 व 2011-12 वर्षात मंजूर असलेल्या खालील कामांचा तातडीचे विषय म्हणून समाविष्ट करुन त्यांना मंजूरी घेण्यात आलेली आहे.

1.ठराव क्रमांक 2 - वार्ड क्र.41 सोमवार पेठ ड्रेनेज लाईन घालने जागेत बदल वार्ड क्र.2 विडी घरकुल येथे संभाजी विडी कारखाना ते पाटील घरापर्यंत ड्रेनेज लाईन घालनेचे कामाचे पुर्वगणना पत्रक क्र.31/ 2010-11 रक्कम रु. 4,99,999/- यास मान्यता (बजेट तरतूद-भांडवली कामे 2010-11 दुषीत पाणी व लिकेज डेनेज दुरुस्ती)

2. ठराव क्र.3 वार्ड क्र.41 गुरुवार पेठ,जोडभावी पेठ येथे ड्रेनेज लाईन घालने कामाच्या जागेत बदल वॉर्ड क्र.31,32 व 33 विडी घरकुल परिसरात ड्रेनेज लाईन घालनेबाबत(पाटील घर ते चव्हाण घर) कामाचे पुर्वगणना पत्रक क्र.36/2011-12 रक्कम रु. 4,99,825/- यास मान्यता (बजेट तरतूद - 2011-12 भांडवली कामे)

3.ठराव क्र.4 विडी घरकुल येथे भाजी मंडई बांधने कामाचे पुर्वगणनापत्रक क्र.2 / 2012-13 रक्कम रु.4,99,298/- यास मान्यता ( बजेट तरतूद 2011-12 भांडवली कामे)

4. ठराव क्र.5 - विडी घरकुल येथे पोलिस चौकी बांधनेचे पुर्वगणनापत्रक क्र.71 / 2011-12 रक्कम रु. 4,99,897/- यास मान्यता ( बजेट तरतूद - 2011-12 भांडवली कामे)

5. ठराव क्र.1/6 -(तातडीचा विषय क्र.1/6) वार्ड क्र.32 सरवदे नगर भाग.1,2,3 मध्ये रस्ते डांबरीकरण करणेचे कामाचे पुर्वगणनापत्रक क्र. 70 / 2011-12 रक्कम रु. 3,98,572/- यास मान्यता (बजेट तरतूद - 2011-12 भांडवली कामे)

6. ठराव क्र.2/7 (तातडीचा विषय क्र.2/7) विडी घरकुल येथे संस्कृत वेदपाठशाला बांधेणेचे कामाचे पुर्वगणनापत्रक क्र.3 / 2012-12 रक्कम रु. 4,96,832/- यास मान्यता (बजेट तरतूद - 2011-12 भांडवली कामे.)

7. ठराव क्र. 3/8 (तातडीचा विषय क्र3/8) विडी घरकुल येथील आर.सी.एच.दवाखाना सुधारणा करणेचे कामाचे पुर्वगणनापत्रक क्र.4 / 2012-13 रक्कम रु. 4,99,872/- यास मान्यता (बजेट तरतुद - 2011-12 भांडवली कामे)

8.ठराव क्र.4/9 (तातडीचा विषय क्र.4/9) शिकलकर वस्ती येथे 9 इंची ड्रेनेज लाईन घालणेचे कामाचे पुर्वगणनापत्रक 2012-13 रक्कम रु. 1,85,538/- यास मान्यता (बजेट तरतूद 2011-12 भांडवली कामे)

वरील प्रमाणे 8 कामांपैकी अ.क्र.1 वरील कामासाठी 2010-11 या वित्तीय वर्षात प्रभाग समिती बैठकीत ठराव करुन तरतुद करण्यात आली आहे. असे असतांना सदर कामासाठी पुन:श्च 2012-13 मध्ये ठराव करण्यात आलेला आहे. सदर कामाचे पुर्वगणना पत्रक क्र.31 हे 2010-11 या वर्षात तयार करुन त्यास ठरावाव्दारे मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदर कामांची रक्कम 2010-11 मधील तरतुदी खर्च झालेली नसून त्यास लेखापरीक्षण वर्षात पुन:श्च् ठरावाव्दारे मान्यता घेण्यात आलेली आहे. यावरुन एकाच कामासाठी दोन वेळा ठराव करण्यात आलेले आहेत.

तसेच अ.क्र.2 ते 8 वरील कामासाठी 2011-12 मध्ये तरतुद केलेली असून सदर कामासाठी पुन:श्च 2012-13 मध्ये ठराव करण्यात आलेला आहे सदर कामाचे पुर्वगणना पत्रक क्र.31 हे 2011-12 या

वर्षात तयार करुन त्यास ठरावाव्दारे मान्यता घेण्यात आलेली असून सदर कामे पुर्ण आली नसल्याचे दिसून येते. तसेच सदर कामांची 2011-12 मधील तरतुदी नुसार त्यास लेखापरीक्षण वर्षात पुनःश्च् ठरावाव्दारे मान्यता घेण्यात आलेली आहे.

यावरुन वरील प्रमाणे अ.क्र.1 ते 8 नुसार एकाच कामासाठी दोन वेळा ठराव करण्यात आलेले आहेत. तसेच उक्त अ,ब,क,ड या कामाबाबत यापुर्वी केलेले ठराव विखंडीत केले किंवा कसे याबाबत दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही.

4. दिनांक 25.3.2013 च्या 7 व्या बैठकीतील विषय क्र.53 - वि.का.मु.2 कडील कामकाजा करीता स्टेशनरी रु.2860/-,बजेट तक्ते रिपेअरींग रु. 2380/- व प्रभाग समिती सभा क्र.7 खर्च रु. निरंक खर्चास प्रभाग समिती ऐच्छीक खर्च या लेखाशिर्षातून मान्यता देण्यात आलेली आहे. दिनांक 25.3.2013 रोजी घेण्यात आलेली प्रभाग समितीची 7 वी बैठक असुन सदर बैठकीत किती खर्च झाला याबाबत अंदाज नसतांना रक्कम रु.निरंक खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे मुद्द्यांबाबत खुलासा होईपर्यंत रक्कम रुपये 3585073/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

TDCNSDM6601 (Ref No : 135, Hmm No : 68)

## *138 मालकत्ता कराची धनादेशाव्दारे / जमा रकमांची पक्की पावती उशिराने केली जात असल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : करनिर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागामध्ये मिळकतदाराकडुन मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारे ही जमा होते. मिळकत दाराने धनादेश दिल्यानंतर त्याची नोंद नोंदवहीस न घेता कच्ची पावती दिली जाते व धनादेश बँकेत वटल्यावर त्याची पक्की पावती केली जाते. सदर विभागाकडील धनादेश नोंदवहीची निवड महिन्याकरीता तपासणी केली असता काही धनादेश बँकेत वटल्यानंतर खुप उशिराने त्याची पक्की पावती केल्या जात असल्याचे आढळुन आले. मार्च महिना अखेरीस अशा मोठया प्रमाणात पावत्या केल्याचे आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागामध्ये मिळकतदाराकडुन मालमत्ता कराची रक्कम धनादेशाव्दारेही जमा होते. मिळकत दाराने धनादेश दिल्यानंतर त्याची नोंद

नोंदवहीस न करता कच्ची पावती दिली जाते व धनादेश बँकेत वटल्यावर त्याची पक्की पावती केली जाते. सदर विभागाकडील धनादेश नोंदवहीची निवड महिन्याकरीता तपासणी केली असता काही धनादेश बँकेत वटल्यानंतर दोन महिने ते सहा महिने उशिराने त्याची पक्की पावती केल्या जात असल्याचे आढळुन आले. मार्च महिना अखेरीस अशा मोठया प्रमाणात पावत्या केल्याचे आढळुन आले. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 121 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि.14/08/2015 रोजी सादर केले असुन सदरचे अनुपालन संयुक्तीक नाही.

| अ.क्र. | धनादेशाची पक्की पावती केलेला दिनांक | विभाग | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 28/03/2013 | हद्दवाढ विभाग | 2263096 |
| 2 | 28/03/2013 | शहर विभाग | 1234179 |
| 3 | 30/03/2013 | शहर विभाग | 16040008 |
| 4 | 30/03/2013 | हद्दवाढ विभाग | 469729 |
| 5 | 31/03/2013 | शहर विभाग | 1069337 |
| 6 | 31/03/2013 | हद्दवाढ विभाग | 3070330 |

वरील प्रमाणे धनादेशाची पक्की पावती केलेला दिनांक व धनादेश बँकेत वटलेला कालावधी पाहिला असता काही धनादेश खालील प्रमाणे सप्टेंबर 12 ते डिसेंबर 12, फेब्रुवारी 2013 मध्ये वटल्याचे आढळुन आले.

| अक्र. | धनादेश क्र | दिनांक | रक्कम रु. | बँकेत वटल्याचा दिनांक | पक्की पावती क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 182611 | 15/02/2013 | 25000 | 26/2/2013 | 33014894/31/03/2013 |
| 2 | 202315 | 13/02/2013 | 15000 | 15/02/2013 | 33014896/31/03/2013 |
| 3 | 001818 | 15/02/2013 | 13000 | 18/02/2013 | 069151/31/03/2013 |
| 4 | 273805 | 24/03/2013 | 25000 | 27/02/2013 | 69153/31/03/2013 |
| 5 | 274823 | 17/09/2012 | 7497 | 24/09/2012 | 33014633/30/03/2013 |
| 6 | 274824 | 17/09/2012 | 11602 | 24/09/2012 | 33014633/30/3/2013<br>3301435/30/03/2013 |

उशिराने पक्की पावती केल्याने रक्कम लेख्याबाहेर राहते त्यामुळे करांची वसुली टक्केवारी कमी दर्शिवते तसेच बँक खात्यातील शिल्लक व एकत्रित किर्द शिल्लक यामधील तफावत वाढते तरी धनादेशाव्दारे

जमा रकमांची पक्की पावती वेळीच करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 110, Hmm No : 121)

## *139 कर संकलन विभाग व संगणक विभाग यांचे कडील मालमत्ता करांचे जमा रकमा यामध्ये असलेल्या तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : कर निर्धारन व संकलन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***CFC केंद्राकडील मालमत्ता करांची वसुल रक्कम व वसुलीकर्मचाऱ्याकडील पावती पुस्तकाव्दारे वसुल रक्कम शहर व हद्दवाढ विभागामध्ये ठेवण्यात आलेल्या एकत्रित किर्दीस जमा घेतली जाते. त्यामुळे एकत्रित किर्दीनुसार करांची जमा रक्कम व संगणकीय विभागानुसार करांची जमा रक्कम एकच असणे आवश्यक आहे. परंतु वित्तीय वर्ष 2012-13 ची मालमत्ता करांची एकूण जमा रक्कम यामध्ये तफावत असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.***

सोलापूर महानगरपालिकेच्या शहर विभाग व हद्दवाढ विभागाकडील वित्तीय वर्ष 2012-13 या कालावधीच्या मालमत्ता करांच्या जमा रकमा व संगणक विभागाकडील सदर करांच्या जमा रकमा यामध्ये तफावत असल्याचे आढळुन आले. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 119 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 13/08/2015 रोजी सादर केले आहे.सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) सोलापूर महानगरपालिकेत मालमत्ता करांची रक्कम नागरिकांकडून वसुली कर्मचारी यांचे मार्फत पावती पुस्तकाव्दारे वसुल केली जाते. तसेच संगणक विभागाचे CFC सेंटर मध्ये संगणकीय पावत्याव्दारे वसुल केली जाते. धनादेशाव्दारे जमा झालेली मालमत्ता कराची रक्कम धनादेश वटल्यानंतर संगणकीय पावतीव्दारे अथवा कर्मचाऱ्यांकडील पावती पुस्तकाव्दारे बनविली जाते.. संगणकीय प्रणालीव्दारे मालमत्ता कर वसुली रकमा संबंधित मिळकतदारांच्या खात्यास आपोआप नोंदली जाते तर कर्मचाऱ्याकडील पावती पुस्तकाव्दारे वसुल रक्कम पुन्हा संगणक विभागामध्ये संबंधित मिळकतदाराच्या खात्यामध्ये नोंदवली जाते त्यामुळे वसुल करण्यात आलेल्या सर्व करांची रक्कम सर्व संबंधित मिळकतदारांचे मागणी (डिमांड )मधुन कमी केली जाते.

CFC केंद्राकडील मालमत्ता करांची वसुल रक्कम व वसुली कर्मचाऱ्याकडील पावती पुस्तकाव्दारे वसुल

रक्कम शहर व हद्दवाढ विभागामध्ये ठेवण्यात आलेल्या एकत्रित किर्दीस जमा घेतली जाते. त्यामुळे एकत्रित किर्दीनुसार करांची जमा रक्कम व संगणकीय विभागानुसार करांची जमा रक्कम एकच असणे आवश्यक आहे. परंतु वित्तीय वर्ष 2012-13 ची मालमत्ता करांची एकूण जमा रक्कम यामध्ये खालीलप्रमाणे तफावत असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.

कर संकलन विभाग, संगणक विभाग व मुख्यलेखापाल कार्यालयाकडील जमा रक्कम यामध्येही तफावत असल्याचे आढळुन आले.

अ) शहर विभाग

| अ.क्र. | कराचे नाव | शहर विभागाकडील एकत्रित किर्दनुसार जमा रक्कम रु | संगणक विभागानुसार शहर विभागाची जमा रक्कम रु. | तफावत रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण कर | 138880121/- | 138825784/- | (+) 54337/- |
| 2 | स्वच्छता कर | 37578666/- | 37619031/- | (-) 40365/- |
| 3 | उपांग फी | 63658448/- | 63614686/- | (+) 43762/- |
| 4 | सार्व.पाणीपट्टी | 5512988/- | 5571863/- | (-)58874/- |
| 5 | खाजगी पाणपट्टी | 99536079/- | 99449717/- | (+) 86362/- |
| 6 | इतर कर | 23918152/- | 23891017/- | (+)27135/- |
| 7 | नोटीस कर | 256629/- | 237833/- | (+) 18796/- |
| 8 | वारंट फी | 372511/- | 330460/- | (+) 42057/- |
| | | | एकूण | (+)173210/- |

ब ) हद्दवाढ विभाग

| अ.क्र. | कराचे नाव | शहर विभागाकडील एकत्रित किर्दनुसार जमा रक्कम रु | संगणक विभागानुसार शहर विभागाची जमा रक्कम रु. | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण कर | 90677742/- | 90685724-/ | (-) 7982/- |
| 2 | स्वच्छता कर | 1964238/- | 19645337-/ | (-) 99/- |
| 3 | सार्व.पाणीपट्टी | 7500524/- | 7550185/- | (-) 49661/- |
| 4 | खाजगी पाणपट्टी | 74761562/- | 74709033/- | (+) 52529/- |
| 5 | उपांग फी | 27332866/- | 27228635/- | (+)104231/- |

Solapur (M Corp.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | इतर कर | 16155896/- | 16215260/- | (-)59364/- |
| 7 | नोटीस कर | 125922-/ | 97596-/ | (+) 28326/- |
| 8 | वारंट फी | 165126/- | 138422/- | (+) 26704 |
| | | | एकूण | (+)94,684/- |

तरी संगणक विभाग, व मुख्य लेखापाल कार्यालय यांचेकडील जमा रक्कम यांचा मेळ घेणे आवश्यक आहे. परंतु तफावतीचा ताळमेळ घेतलेला नाही.

DATRNDM7201 (Ref No : 113, Hmm No : 119)

### *140 करमणूक कराची रक्कम वेळीच वसूल केली नाही....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : कर निर्धारण व संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागा (शहर) कडून करमणूक कराची वसुली केली जाते. वित्ती वर्ष 2012-13 मध्ये सोलापूर शहरातील सिनेमागृह ची करमणूक कराची वसुली रक्कम रु.2,33,000/- असल्याचे आढळून आले. करमणूक कराची मागणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. वित्तीय वर्ष 2012-13 करीता अशी मागणी नोंदवही ठेवली नसल्याचे आढळून आले. त्यामुळे कोणत्या सिनेमागृह, नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर इ. करमणूक कर देय असणा-या करदात्याकडे किती रक्कम थकीत आहे. कराची मागणी, त्याची वसुली, थकबाकी इ. बाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागा (शहर) कडून करमणूक कराची वसुली केली जाते. वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये सोलापूर शहरातील सिनेमागृह ची करमणूक कराची वसुली रक्कम रु.2,33,000/- असल्याचे आढळून आले. याबाबतची तपासणी करुन आढळुन आलेल्या उणीवांबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 123 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे उत्तर दि. 13/08/2015 रोजी सादर केले आहे. सदर अनुपालन विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) करमणूक कराची मागणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. वित्तीय वर्ष 2012-13 करीता अशी मागणी नोंदवही ठेवली नसल्याचे आढळून आले. त्यामुळे कोणत्या सिनेमागृह, नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर इ.

करमणूक कर देय असणा-या करदात्याकडे किती रक्कम थकीत आहे. कराची मागणी, त्याची वसुली, थकबाकी इ. बाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) कर संकलन विभाग (शहर) यांनी दिलेल्या माहिती मध्ये वित्तीय वर्ष 2012-13 करीता रु.233000/- कर वसूल झाला असल्याचे नमूद आहे तर संबंधित करमणूक कर वसुली लिपीकाकडील किर्दीमध्ये रु.2,30180/- रक्कम वसूल केल्याचे आढळून आले. रु.2,820/- ची तफावत आहे. सदर तफावतीचा मेळ घेणे आवश्यक आहे.परंतु मेळ घेतलेला नाही.

3) वसूल केलेल्या कराची तपासणी केली असता फक्त सिनेमागृहाकडील करमणूक कराची वसुली केली जात असल्याचे आढळून आले तर नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर, सर्कस इ. कडून करमणूक कर वसूल केला जात नसल्याचे आढळून आले. तसेच सिनेमा गृहाकडून वसुल करण्यात आलेल्या करमणूक कर हा वेळीच वसूल न करता खालीलप्रमाणे खूप उशिराने वसूल केला आहे.

| अ.क्र. | सिनेमा गृहाचे नांव | कालावधी | वसूली दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | उमा मंदिर | मे 2011 ते जून 2012 | 02/07/2012 |
| 2 | मीना टॉकिज | जुलै 2011 ते मार्च 2012 | 03/07/2012 |
| 3 | कल्पना टॉकिज | जानेवारी 2010 ते एप्रिल 2010 | 18/03/2013 |

तरी करमणूक कर वेळीच वसूल करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 114, Hmm No : 123)

### *141 विवाह नोंदणी फी रक्कम वसुलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*अनियमितता कलम : 9ड*

***विवाह नोंदणी रजिस्टर विहीत नमुन्यात ठेवण्यात आले नसून सदर रजिस्टर मधील नोंदणीबाबत एकसुत्रता नसल्याचे आढळून आले. विवाह नोंदणी फी कमी जास्त प्रमाणात वसूल केली जात असल्याचे आढळून आले.***

सोलापूर महानगरपालिकेकडे विभागीय कार्यालय अधिकारी यांना विवाह नोंदणीचे अधिकार सन 2008 पासून

देण्यात आले आहेत. विभागीय कार्यालय क्र 1,2 व 3 कडे वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये विवाह नोंदणी फी ची रक्कम खालील प्रमाणे वसुल केल्याचे आढळून आले .

| अ.क्र. | विभागीय कार्यालय क्र. | शासन जमा रक्कम | मनापा जमा रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 17250 | | 17250 |
| 2 | 2 | 18750 | 1635 | 20385 |
| 3 | 3 | 15750/- | 1180/- | 16930/- |

लेखापरीक्षणामध्ये तपासणी केली व आढळुन आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्र. 125 दि. 28/07/2015 अन्वये कळविले होते. विभागाने त्याचे अनुपालन दि. 14/08/2015 रोजी सादर केले आहे.सदर अनुपालन विचारात घेवून लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) विवाह नोंदणी रजिस्टर विहीत नमुन्यात ठेवण्यात आले नसून सदर रजिस्टर मधील नोंदणीबाबत एकसुत्रता नसल्याचे आढळून आले.

2) विवाह नोंदणी फी खालीलप्रमाणे विहित असताना ती कमी जास्त प्रमाणात वसूल केली जात असल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | कालावधी | विहित दर |
|---|---|---|
| 1 | विवाह दिनांकानंतर 3 महिन्यापर्यंत | 50 |
| 2 | विवाह दिनांकानंतर 3 महिने व 1 वर्षापर्यंत | 150 |
| 3 | विवाह दिनांकानंतर 1 वर्षापासून पुढे | 250 |

3) विभागीय कार्यालय क्र. 2 व 3 मध्ये प्रती प्रमाणपत्र रु.15/- जादा आकारणी करुन मनपाकडे पैसे जमा केले आहेत. तर विभागीय कार्यालय क्र.1 मध्ये अशी रक्कम वसुल केली जात नव्हती. तसेच इंग्रजी प्रतीस रक्कम आकारणी केली नसल्याचे आढळून आले व आकारणी करण्यात आलेली रक्कम कमी जादाप्रमाणे वसुली केल्याचे आढळून आले.

4) विवाह नोंदणी फी ची रक्कम त्वरीत शासनाकडे चलनाने जमा करणे आवश्यक असताना सर्व विभागीय कार्यालयामधील वसूल रक्कम खूप उशिराने शासनाकडे जमा केल्याचे आढळून आले.

दि.17/01/2013 ते दि.13/03/2013 या कालावधीत जमा झालेली विवाह नोंदणी फी ची रक्कम रु.6,500/- शासनाकडे दि.14/03/2013 रोजी भरणा केली आहे.

5) विभागीय कार्यालय क्र.3 मध्ये वसुली किर्द लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच नोंदणी रजिस्टर ठेवण्यात आली नाही.

तरी विवाह नोंदणी फी ची योग्य ती रक्कम वसुल करुन वेळीच शासन लेख्यात भरणा करणे आवश्यक असुन वसुल केलेल्या रकमेबाबतच्या नोंदवहया ठेवून अद्यावत करणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 116, Hmm No : 125)

## *142 अतिक्रमण विभागाकडील नोंदवहयातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 09**

*मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 8453690.00/-

***शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एपीओ.3297/3112/प्र.क्र.64/पोल.3 दिनांक 12 मे 1998 नुसार मंजूर असलेल्या पदां व्यतिरिक्त मंजूर नसलेल्या 10 पोलिस हवालदार व 7 पोलिस शिपाई असे 17 जादा पदांचे वेतनापोटी रु. 5088648/- व मंजूर असलेल्या पोलिस निरीक्षक पदापेक्षा 1 जादाचे पद भरल्याने वेतनापाटी रु. 353880/- असे एकुण रु. 5442528/- वाढीव वेतनाचा भार मनपावर पडलेला आहे.***

सोलापुर मनपाच्या अतिक्रमन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या दस्तऐवजाचे परीक्षणावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 6(3) नुसार अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 67 दिनांक 25.6.2015 देण्यात आलेले असून त्याबाबतचा खुलासा अप्राप्त असुन त्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.शासन निर्णय गृह विभाग क्रमांक एपीओ.3297/3112/प्र.क्र.64/पोल.3 दिनांक 12 मे 1998 नुसार सोलापुर मनपा अतिक्रमण विभागासाठी स्वतंत्र पोलिस पथक निर्माण करुन खालील प्रमाणे पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | पद व वेतनश्रेणी | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|
| 1 | पोलिस निरिक्षक | 2200-75-3500 | 01 |
| 2 | सहाय्यक पोलिस निरिक्षक | 2000-60-3200 | 03 |
| 3 | पोलिस शिपाई | 950-20-1400 | 30 |
| एकूण | | | 34 |

सध्या कार्यरत असलेले पोलिस अधिकारी व कर्मचारी

| अ.क्र. | पद व वेतनश्रेणी | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|
| 1 | पोलिस निरिक्षक | 2200-75-3500 | 01 |
| 2 | सहाय्यक पोलिस | 2000-60-3200 | 04 |

| | | | |
|---|---|---|---|
| | निरिक्षक | | |
| 3 | पोलिस हवालदार | 1320-30-2040 | 10 |
| 4 | पोलिस शिपाई | 1320-30-2040 | 07 |
| एकूण | | | 22 |

वरील प्रमाणे मंजूर पदे व सध्या कार्यरत पदे यांचा ताळमेळ घेतला असता सहाय्यक पोलिस निरिक्षकाची 3 पदे मंजूर असून 4 पदे भरलेली आहेत. तसेच पोलीस शिपाई 30 पदे मंजूर असुन सदर पदे न भरता शासन निर्णया व्यतिरिक्त पोलिस हवालदार 10 पदे व पोलिस शिपाई 07 असे एकूण 17 पदे जादाची भरण्यात आलेली असून त्यांचे वेतनावर 2012-13 मध्ये रु. 5088648/- इतका खर्च करण्यात आला आहे. सदर जादा भरलेल्या पदांची वेतनश्रेणी व मंजूर पोलिस शिपाई पदांची वेतनश्रेणी मध्ये मोठी तफावत असल्याने जादाच्या 17 पदाच्या वाढीव वेतनाचा आर्थिक बोजा मनपावर पडलेला आहे. तसेच पोलिस निरिक्षकाचे मंजूर पदापेक्षा 1 पद जास्त भरल्यामुळे रक्कम रु. 3,53,880/- इतका वाढीव आर्थिक बोजा मनपावर पडलेला आहे. शासन मंजूरी शिवाय सदर 17 पदे भरलेली असल्यामुळे त्या पदांच्या वेतनावर करण्यात आलेला खर्च रक्कम रु.5088648/- व जादा भरलेले सहाय्यक पोलिस निरिक्षक पदाचे वेतनावरील खर्च रक्कम रु. 353880/- असा एकूण खर्च रक्कम रु. 54,42,528/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. उपरोक्त गृह विभागाचे शासन निर्णय दिनांक 12,5,1998 नुसार अतिक्रमण विभागासाठी निर्माण केलेल्या 34 पदांना प्रथमत: कार्यभार स्विकारल्या नंतर 1 वर्षासाठी मुदत आहे. सोलापुर मनपा यांनी सदर पदे 1.4.2001 पासुन वापरण्यास सुरुवात केली असून त्या त्या पदांना 31.3.2002 पर्यंत मुदत होती. त्यानंतर सदर पदांना दिनांक 1.4.2002 ते 31.3.2013 अखेत वेळोवेळी मुदतवाढ दिल्याबाबत शासन आदेश उपलब्ध झाले नाही. त्यामुळे 2012-13 मध्ये सदर पदांच्या वेतनावर खर्च केलेली रक्कम रु. 84,53,690/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. शासन निर्णयातील तरतुदीनुसार सोलापुर मनपासाठी एकूण 34 पदे मंजूर असून सद्यस्थितीत पोलिस अधिकारी व कर्मचा-यांची 22 पदे सोलापुर मनपाच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत. उर्वरित 12 पदे पोलीस आयुक्त,सोलापूर हे वापरित असुन सदर पदे वापरण्याबाबत शासन निर्णयातील अ.क्र.4(ड) नुसार पोलिस आयुक्त यांचे कडे पत्रव्यवहार करण्यात येत असल्याबाबत खुलासा केलेला असून त्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटविलेली नाही.

4.शासन निर्णयातील 4(अ) नुसार सोलापुर मनपासाठी निर्माण केलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचा-यांच्या पदांवर आयुक्त,मनपा,सोलापुर यांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. सदर पदांवर पोलिस आयुक्त, सोलापुर यांचे नियंत्रण असल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले.याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार शासन निर्णयातील तरतूदीनुसार पोलिसांच्या मंजूर पदांवर मनपा आयुक्तांचे नियंत्रण राहणेबाबत दक्षता घेणेत येईल असा खुलासा केलेला असुन सदर खुलासा मान्य् करण्यायोग्य नाही.

5. 2012-13 वर्षात 211 अतिक्रमणे तोडण्यात आली असून दंडापोटी रु.104025/- रक्कम जमा करण्यात आलेली आहे. परंतू सदर अतिक्रमणे तोडण्यासाठी किती कर्मचारी व पोलीस कर्मचारी गेले, तसेच अतिक्रमण तोडण्यासाठी आलेला खर्च याबाबतची नोंदवही विभागाकडे ठेवण्यात आलेली नाही.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 260(2),267(2),478(2) नुसार संबधित मालकाकडुन अतिक्रमण तोडण्यावर झालेल्या खर्चाची रक्कम वसुल करणेत आली याबाबत लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही. याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार अतिक्रमण तोडण्यासाठी आलेला खर्च संबधित

मालकांकडुन वसुल करण्याबाबत नोटीस देण्यात येत असून रक्कमेच्या वसुलीबाबत कर आकारणी कार्यालयाला कळविण्यात आल्याबाबत खुलासा केलेला असून त्याबाबत लेखापरीक्षणाची कागदोपत्री खात्री पटविलेली नाही.

6. अतिक्रमण विभागाने संपुर्ण वर्षभरात अनाधिकृत बांधकामे शोधुन त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे आवश्यक आहे. व शासन निर्णय दिनांक 12 मे 1998 नुसार मनपा कर्मचा-यांना अतिक्रमण कार्यवाहीवेळी पोलिस अधिकारी व कर्मचा-यांनी संरक्षण देणे आवश्यक आहे. परंतू लेखापरीक्षण वर्षात 211 अनाधिकृत बांधकामांवर कार्यवाही केली असून दंडापोटी अतिक्रमण धारकांकडुन वसुल केलेली रक्कम रु. 104025/- अत्यंत नगण्य असुन मनपाचे 19 कर्मचारी वेतन रु. 1831613/- व 22 पोलीस कर्मचारी वेतन रु. 5616481/- असा एकूण 7448094/- (140 टक्के) इतका प्रशासनीक खर्च करण्यात आलेला आहे.यावरुन ज्या हेतून पोलिस पदांची निर्मीती करण्यात आलेली आहे तो उद्देष साध्य झालेला नाही. याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार सदर पोलिस कर्मचा-यांच्या सेवा विभागाकडील कामकाजाशिवाय कर आकारणी व कर संकलन विभाग, हद्दवाढ वसुली विभाग, आयात कर विभागाकडील जकात नाक्यावर एस्कॉर्ट वसुली करीता, मनपा सर्वसाधारण सभेच्या वेळी मनपा पदाधिकारी यांची निवडीच्या वेळी उमेदवारी फॉर्म भरणे,निवडणुकीच्या वेळी पोलिस बंदोबस्त् ठेवणे,लोकशाही दिना करीता बंदोबस्त् देणे इ.काम पोलिस कर्मचारी व अधिकारी यांचेकडुन करुन घेण्यात येत असल्याबाबत खुलासा केलेला आहे. यावरुन विभागाकडील पोलिस कर्मचारी व मनपा कर्मचारी यांना विभागाकडे पुरेसे काम नसल्याने त्याच्या सेवा इतरत्र वापरण्यात येत असल्याबाबत विभागाने मान्य केलेले आहे.सदर दोन्ही आस्थापनेवरील खर्च रक्कम रु. 7448094/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

7. शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्रमांक जीईएन.1096/45/प्र.क्र.15/नवि.27 दिनांक 4.3.1996 नुसार मनपाने प्रत्येक अनाधिकृत बांधकाम तोडण्यासाठी त्या विभागात एक क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे. सदर शासन परिपत्रकानुसार कार्यवाही न करता मनपा,सोलापुर यांनी अतिक्रमण विभागाचा अतिरिक्त कार्यभार शहर अभियंता यांना दिलेला आहे. याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार अनाधिकृत बांधकामे तोडण्यासाठी विभागवार क्षेत्रिय अधिकारी यांची नियुक्ती केलेली असून सदर क्षेत्रिय अधिकारी त्यांचे क्षेत्रामध्ये अनाधिकृत बांधकाम झाल्याबाबतचा अहवाल आरोग्य् निरिक्षकांमार्फत बांधकाम विभागास देतात.त्यानुसार अतिक्रमन विभागाकडुन त्याबाबत नोटीस देवुन कार्यवाही करण्यात येते.अतिक्रमण विभागाचा कार्यभार शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली असल्याबाबत खुलासा केलेला असून त्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटविलेली नाही.

8. अतिक्रमित बांधकामापोटी वसुल करण्यात येणा-या दंडाच्या रक्कमेबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 685 दिनांक 10.10.2003 नुसार ठराव करण्यात आलेला असून 12 वर्षात सदर फीच्या रक्कमेत वाढ न केल्याने अपेक्षित उत्पन्नात वाढ झालेली नाही. याबाबत सादर केलेल्या खुलाशा नुसार दंडाच्या रक्कमेतील वाढीबाबत स्थायी समितीला प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याबाबत खुलासा केलेला असुन त्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटविलेली नाही.

9. 2012-13 मध्ये 211 अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आलेली असून त्यानुसार जप्त करण्यात आलेल्या वस्तुंची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.त्यामुळे जप्त केलेल्या वस्तुंची पडताळणी करता आली नाही.याबाबत सदर नोंदवहीचा शोध सुरु असल्याबाबत खुलासा केलेला आहे.

वरील प्रमाणे मुद्दयांबाबत खुलासा होईपर्यंत रक्कम रु. 8453690/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

TDCNSDM6601 (Ref No : 136, Hmm No : 67)

## *143 जन्म-मृत्यू विभागाचे जमा रक्कमांचे लेखापरीक्षणाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***सोलापूर मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 10/3.7.2003 व कार्यालयीन आदेश क्रमांक विकाअ/हद्दवाढ/अभिले/376 दिनांक 7.7.2003 नुसार जन्म दाखला व मृत्यू दाखला देण्यासाठी ठरवुन दिलेल्या शुल्का पेक्षा जास्त दराने शुल्क आकारणी, राज्य आयोग, माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग,पुणे यांचे पत्र क्रमांक आमाजीआ/कक्ष.83/कायदा/10244-10331 दिनांक 29.12.2012 मधील अ.क्र.4 नुसार नागरीकांनी जन्म-मृत्यूची घटना घडल्यानंतर 21 दिवसांचे आंत नोंदणी केल्यास निशुल्क दराने जन्म-मुत्युचा दाखला न देता शुल्क आकारुन दाखला देण्यात येतो. जन्म-मृत्यु नोंदवहीतील नोंदी साक्षांकित करण्यात येत नाहीत.*** |

सोलापूर मनपा जन्म-मृत्यू विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या नोंदवहया व दस्तऐवजाची पडताळणी करुन अर्धसमास ज्ञापन क्रमांक 69 दिनांक 25.6.2015 बाबत विभागाने दिनांक 5.8.2015 नुसार दिलेला खुलासा विचारात घेवून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत. .

1. सोलापूर मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 10/3.7.2003 व कार्यालयीन आदेश क्रमांक विकाअ/हद्दवाढ/अभिले/376 दिनांक 7.7.2003 नुसार जन्म दाखला व मृत्यू दाखला देण्यासाठी पहील्या प्रतीस रु. 30/- व दुस-या व पुढील प्रत्येक प्रतीस रु.20/- शुल्क आकारणीबाबत आदेश आहेत. जन्ममृत्यू दाखला पावत्यांचे लेखापरीक्षण केले असता पहील्या प्रतीस रु.30/- प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येते. परंतू तद्नंतरच्या दुस-या व पुढील प्रतीस रु.30/- नुसार आकरणी करण्यात येत असल्याचे दिसून आले. यावरुन नागरीकांकडुन दुस-या व पुढील प्रत्येक प्रतीस नियमबाहयपणे रु.10/- प्रमाणे जादाच्या शुल्काची आकारणी करण्यांत आलेली आहे.याबाबत सादर केलेल्या खुलाशा नुसार सदर जन्म्-मृत्य् प्रमाणपत्राच्या दरात स्थायी समिती ठराव क्र.1335 दिनांक 15.2.2011 नुसार वाढ केल्याबाबत खुलासा केलेला असून त्याबाबतची प्रत खुलाशा सोबत सादर केलेली नाही. तसेच सुधारीत दरांनुसार जन्म दाखला व मृत्यू दाखला देण्यासाठी पहिल्या प्रतीस व दुस-या व पुढील प्रत्येक प्रतीस कोणत्या दराने शुल्क आकारणीबाबत आदेश आहेत याची खात्री करता आली नाही.

2.राज्य आयोग, माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग,पुणे यांचे पत्र क्रमांक आमाजीआ/कक्ष.83/कायदा/10244-10331 दिनांक 29.12.2012 नुसार जन्म-मृत्यु नोदंवहीत नोंद केल्यानंतर निबंधक अथवा उपनिबंधक यांनी आद्याक्षरासह दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. विभागाने उपलब्ध करुन दिलेली नोंदवही तपासली असता नोंदवहीतील नोंदीपुढे निबंधक अथवा उपनिबंधक

यांनी आद्याक्षरासह दिनांकीत स्वाक्षरी करण्यात आलेली नाही.याबाबत सादर केलेल्या खुलाशानुसार सदर नोंदवहीत नोंदीवर आक्षेपानुसार स्वाक्षरी घेण्यात आलेली असल्याबाबत खुलासा केलेला आहे. परंतु त्याबाबत लेखापरीक्षणची खात्री पटविलेली नाही.

3. राज्य आयोग, माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग,पुणे यांचे पत्र क्रमांक आमाजीआ/कक्ष.83/कायदा/10244-10331 दिनांक 29.12.2012 मधील अ.क्र.4 नुसार नागरीकांनी जन्म-मृत्यूची घटना घडल्यानंतर 21 दिवसांचे आंत नोंदणी केल्यास अशा नागरीकांनी जन्म-मृत्यू प्रमाणपत्राची मागणी केल्यास ती निशुल्क देणेबाबत आदेश आहेत. असे असतांना विभागाकडुन अशा नागरीकांकडुन नियमबाहयपणे रु.30/- शुल्काची आकारणी करण्यात येत असल्याचे लेखापरीक्षणास दिसून आले.

TDCNSDM6601 (Ref No : 138, Hmm No : 69)

## *144 आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेतल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*अनियमितता कलम : 9ङ*

***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम 2009 मधील नियम क्र.4(1) नुसार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे इमारतीतील किंवा त्याच्या भागातील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनाचे अनुपालनासंबंधी अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून नमुना अ मध्ये प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. उत्तम व कार्यक्षम स्थितीत असलेल्या इमारती किंवा तिच्या जागेतील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या परीक्षणासंबंधी वर्षातून दोनदा जानेवारी व जुलै महिन्यात अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून परीक्षण करुन नमुना ब मध्ये प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे अग्निशमन विभागाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता अनियमिततेबाबत अर्धसमास क्रमांक 102, दि.23/07/15 अन्वये विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने त्यांचेकडील दि.28/07/15 रोजी दिलेल्या उत्तराचा विचार करता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 व नगरविकास विभागाकडील

अधिसूचना क्र.अशस-2008/प्र.क्र.181/08/नवी-20 दिनांक 13 जानेवारी 2009 व्दारे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम 2009 विहित केलेले आहेत. सदर नियमातील नियम क्र.4(1) नुसार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे इमारतीतील किंवा त्याच्या भागातील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनाचे अनुपालनासंबंधी अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून नमुना अ मध्ये प्रमाणपत्र घेण आवश्यक आहे.

नियम 4(2) नुसार अधिनियमाच्या कलम 3 च्या पोट कलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उत्तम व कार्यक्षम स्थितीत असलेल्या इमारती किंवा तिच्या जागेतील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या परीक्षणासंबंधी वर्षातून दोनदा जानेवारी व जुलै महिन्यात अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून परीक्षण करुन नमुना ब मध्ये प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

सोलापूर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागाने वरील नियमांची अंमलबजावणी केल्याचे आढळुन आले नाही.

DATDSAM7301 (Ref No : 141, Hmm No : 102)

**<u>आक्षेप विवरणपत्राबाबत</u>** :- लेखापरीक्षण अहवालात समाविष्ठ केलेल्या सर्व परिच्छेदांबाबत लेखापरीक्षण चालू असताना अर्धसमास पत्रे निर्गमित करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त उत्तरे व अनुपालने तपासुन सर्वसामान्य स्वरुपाच्या आक्षेपांची पूर्तता करुन घेण्यात आली असल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित केले नाही.

**<u>विवरण व परिशिष्टे</u>** :- आवश्यक विवरणपत्रके या लेखापरीक्षण अहवालासोबत जोडण्यात आली आहेत.

**<u>अनुपालन</u>** :- या लेखापरीक्षण अहवालाचे परिपूर्ण अनुपालन 3 प्रतीमध्ये महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 10 (1) मधील तरतुदीनुसार, हा लेखापरीक्षण अहवाल मिळाल्यापासून चार महिन्याच्या आत, महासभेच्या मान्यतेच्या ठरावाच्या प्रतीसह आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

**<u>पोहोच</u>** :- हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याची तारीख कळवून तात्काळ पोहोच देण्यात यावी.

**(सिताराम काळे)**

**उपसंचालक (मनपालेप)**

**उपविभाग - 2**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा**

**नवी मुंबई**

**प्रत अग्रेषित -**

1) मा. प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-1,(लेखा परीक्षा) मुंबई
2) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32
3) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
4) मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
5) मा. सहसंचालक(मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
6) पुनर्विलोकन अहवाल शाखा, रायगड भवन, नवी मुंबई.

**(सिताराम काळे)**

**उपसंचालक (मनपालेप)**

**उपविभाग - 2**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा**

**नवी मुंबई**

Solapur (M Corp.)

## *लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र*

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| धनंजय साहेबराव आंधळे, सहाय्यक संचालक | 1, 2, 6, 25, 34, 69, 70, 81, 92, 96, 104, 126, 133, 144 |
| प्रविण गजानन डोळस, लेखापरिक्षा अधिकारी | 13, 14, 51, 52, 124, 125 |
| रमेश कृष्णा जाधव, लेखापरिक्षा अधिकारी | 11, 12, 22, 33, 89, 117, 130 |
| विष्णू चिंकूजी सांगळे, लेखापरिक्षा अधिकारी | 5, 18, 19, 21, 23, 24, 35, 37, 38, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 83, 84, 87, 88, 90, 91, 114, 129 |
| किसन विठ्ठल साळुंखे, लेखापरिक्षा अधिकारी | 15, 16, 17, 27, 28, 29, 30, 31, 36, 39, 40, 41, 42, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 93, 94, 95, 99, 100, 101, 102, 103, 105, 106, 115, 132, 134, 135, 136 |
| रविंद्र मल्हारी जाधव, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 118, 119, 120, 131 |
| रामकृष्ण नारायण डंके, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 3, 4, 7, 8, 9, 20, 26, 32, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 63, 64, 65, 66, 67, 68, 85, 86, 97, 98, 107, 108, 109, 110, 111, 112, 113, 123, 127, 138, 139, 140, 141 |
| राजाराम विठ्ठल विशे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 121, 122 |
| नंदकुमार शंकरराव धात्रक, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 10, 82, 116, 128, 137, 142, 143 |

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 154789.00 | ---- | ---- | ---- | 154789.00 |
| 2 | 6 | ---- | ---- | ---- | ---- | 31103862.00 |
| 3 | 10 | 96000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 4 | 11 | 838000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 5 | 12 | 930225.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 6 | 13 | 47224601.00 | ---- | ---- | ---- | 47224601.00 |
| 7 | 15 | 81380248.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 8 | 16 | 2808242.00 | 65912.00 | ---- | ---- | ---- |
| 9 | 17 | 9783186.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 10 | 19 | ---- | 32877.00 | ---- | ---- | ---- |
| 11 | 21 | 2495532.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 12 | 22 | 6869252.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 13 | 35 | ---- | 343001.00 | ---- | ---- | ---- |
| 14 | 36 | ---- | 44389.00 | ---- | ---- | ---- |
| 15 | 37 | ---- | 10000.00 | ---- | ---- | ---- |
| 16 | 38 | ---- | 5129050.00 | ---- | ---- | ---- |
| 17 | 41 | ---- | 503738805.00 | ---- | ---- | ---- |
| 18 | 49 | 1780449.00 | ---- | ---- | ---- | 2538669.00 |
| 19 | 50 | 12403987.00 | ---- | ---- | ---- | 26031094.00 |
| 20 | 51 | ---- | 99619.00 | ---- | ---- | 99619.00 |
| 21 | 52 | ---- | 3366312.00 | ---- | ---- | 3366312.00 |
| 22 | 53 | ---- | 63462.00 | ---- | ---- | ---- |
| 23 | 55 | ---- | 36000.00 | ---- | ---- | ---- |
| 24 | 57 | ---- | 68334.00 | ---- | ---- | ---- |
| 25 | 58 | 117010.00 | 64762.00 | ---- | ---- | ---- |
| 26 | 59 | 1763633.00 | 833000.00 | ---- | ---- | ---- |
| 27 | 60 | ---- | 14100.00 | ---- | ---- | 3831957.00 |
| 28 | 61 | ---- | 40582.00 | ---- | ---- | ---- |
| 29 | 62 | ---- | 307380.00 | ---- | ---- | ---- |
| 30 | 63 | 9749009.00 | ---- | ---- | ---- | 9749009.00 |
| 31 | 64 | 4122647.00 | ---- | 858145.00 | ---- | 4122647.00 |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | 65 | 4143624.00 | ---- | 2071812.00 | ---- | 4143624.00 |
| 33 | 66 | 12693069.00 | 528488.00 | 6981188.00 | ---- | 12693069.00 |
| 34 | 67 | 3999872.00 | 9937.00 | 398876.00 | ---- | 3999872.00 |
| 35 | 68 | 1225571.00 | ---- | ---- | ---- | 32483846.00 |
| 36 | 70 | ---- | 2748650.00 | ---- | ---- | ---- |
| 37 | 71 | ---- | 329378.00 | ---- | ---- | ---- |
| 38 | 72 | 31851744.00 | 23251579.00 | ---- | ---- | ---- |
| 39 | 73 | ---- | 17913.00 | ---- | ---- | ---- |
| 40 | 74 | ---- | 317558.00 | ---- | ---- | ---- |
| 41 | 75 | 25329.00 | 289517.00 | ---- | ---- | ---- |
| 42 | 76 | ---- | 77085.00 | ---- | ---- | ---- |
| 43 | 77 | ---- | 409376.00 | ---- | ---- | ---- |
| 44 | 78 | ---- | 385639.00 | ---- | ---- | ---- |
| 45 | 79 | 152090.00 | 78930.00 | ---- | ---- | ---- |
| 46 | 80 | ---- | 183013.00 | ---- | ---- | ---- |
| 47 | 81 | ---- | 153216.00 | ---- | ---- | ---- |
| 48 | 82 | 140924837.00 | 6575855.00 | ---- | ---- | 166761000.00 |
| 49 | 83 | ---- | 38500.00 | ---- | ---- | ---- |
| 50 | 84 | 649129.00 | 219271.00 | ---- | ---- | ---- |
| 51 | 85 | 3980543.00 | ---- | ---- | ---- | 3980543.00 |
| 52 | 87 | ---- | 8325.00 | ---- | ---- | ---- |
| 53 | 88 | 3106731.00 | 261440.00 | ---- | ---- | ---- |
| 54 | 89 | ---- | 1097008.00 | ---- | ---- | ---- |
| 55 | 90 | ---- | 88945.00 | ---- | ---- | ---- |
| 56 | 91 | ---- | 111080.00 | ---- | ---- | ---- |
| 57 | 92 | ---- | 5721496.00 | ---- | ---- | ---- |
| 58 | 93 | ---- | 38005.00 | ---- | ---- | ---- |
| 59 | 94 | ---- | 28510.00 | ---- | ---- | ---- |
| 60 | 95 | ---- | 807719.00 | ---- | ---- | ---- |
| 61 | 96 | 245000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 62 | 99 | ---- | 2364393.00 | ---- | ---- | ---- |
| 63 | 101 | ---- | 1120958.00 | ---- | ---- | ---- |
| 64 | 102 | ---- | 59763896.00 | ---- | ---- | ---- |
| 65 | 103 | ---- | 860857.00 | ---- | ---- | ---- |
| 66 | 105 | ---- | 1054469.00 | ---- | ---- | ---- |

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 67 | 106 | 3950375.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 68 | 108 | 958880.00 | ---- | 43382.00 | ---- | 958880.00 |
| 69 | 109 | 1644368.00 | ---- | ---- | ---- | 1644368.00 |
| 70 | 110 | 50652.00 | 5628.00 | ---- | ---- | 50652.00 |
| 71 | 111 | 621880.00 | ---- | ---- | ---- | 621880.00 |
| 72 | 112 | ---- | 270000.00 | ---- | ---- | 6062625.00 |
| 73 | 113 | 6000000.00 | ---- | ---- | ---- | 6000000.00 |
| 74 | 116 | 154500.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 75 | 117 | 20447000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 76 | 121 | 106471.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 77 | 122 | 3296231.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 78 | 127 | 7437398.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 79 | 128 | 10778040.00 | ---- | ---- | ---- | 10778040.00 |
| 80 | 130 | 8427776.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 81 | 131 | 252000.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 82 | 132 | 470376.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 83 | 135 | 521088.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 84 | 136 | 512930.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 85 | 137 | 3585073.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 86 | 142 | 8453690.00 | ---- | ---- | ---- | ---- |